# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

बी. ए. भाग–३ इतिहास

सत्र–५ : पेपर–७ DSE-E61

# प्रारंभीचा भारत

**(Early India from beginning to 4th C. BC)**

सत्र–६ : पेपर–१२ DSE-E186

# प्राचीन भारत

**(From 4th C. BC to 7th C. AD)**

(शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२१
बी. ए. भाग - ३ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ५००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-92887-18-5

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


## ■ अभ्यासमंडळ : इतिहास ■

अध्यक्ष – **डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती एन. डी. पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. डी. बी. मासाळ**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. श्रीमती संघमित्रा व्ही. सरवदे**
  आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. दिपक शंकरराव जाधव**
  लाल बहाद्दूर शास्त्री कॉलेज, सातारा
- **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
  चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. एम. व्ही. जाधव**
  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. निवासराव अधिकराव वरेकर**
  आदर्श महाविद्यालय, विटा, ता. खानापूर,
  जि. सांगली
- **डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
  आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. राजश्री दिलीप निकम**
  कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।, शिवनगर,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मंजिरी कामत**
  इतिहास अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
- **डॉ. चंद्रकांत अभंग**
  सचिव, भारत इतिहास संशोधक मंडळ,
  इमिनंट स्कॉलर ऑफ मराठा हिस्ट्री.
- **डॉ. अरुण भोसले**
  निवृत्त प्राध्यापक, इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. भरतभूषण माळी**
  सचिव, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
- **डॉ. अमर आडके**
  सल्लागार, किल्ले जतन आणि संवर्धन, कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्यामार्फत जून २००७ पासून बहिःस्थ विद्यार्थ्यांची गरज ओळखून दूरशिक्षण योजनेचा उपक्रम हाती घेतला आहे. तसेच २०२०-२०२१ पासून अभ्यासक्रम बदललेला आहे. सत्रपद्धती राबविण्यात येत आहे. सदरच्या योजनेअंतर्गत बी.ए.भाग-३ इतिहास पेपर क्र. ७ व १२ (सत्र ५ व ६) या विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी सत्र ५ साठी प्रारंभीचा भारत व सत्र ६ साठी प्राचीन भारत या पेपरचे स्वयं अध्ययनासाठी हे पुस्तक लिहिले आहे. अभ्यासक्रमातील वेगवेगळ्या घटकांचे स्पष्टीकरण सुलभ भाषेतून केल्यामुळे विद्यार्थी वर्गाला विषयाची माहिती होण्यास अडचण राहणार नाही असे वाटते. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयं अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, सारांश व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची यादी दिलेली आहे.

या पुस्तकामध्ये प्रारंभीचा भारत व प्राचीन भारत या पेपरची माहिती दिलेली आहे. या पेपरमध्ये सत्र पाच साठी चार व सत्र सहा साठी चार घटकांचा समावेश केलेला आहे. यामध्ये सत्र पाच साठी प्रारंभ, वैदिक युग आणि महाकाव्ये, दुसरे नागरीकरण, मौर्य साम्राज्य तसेच सत्र सहा साठी पूर्व ऐतिहासिक भारत, अभिजात युग, गुप्तोत्तर कालखंड, समाज आणि संस्कृती इत्यादींचा समावेश या पेपरमध्ये केलेला आहे. यामध्ये प्रारंभीचा भारत व प्राचीन भारत चा अभ्यास बारकाईने करणे अगत्याचे आहे.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा राहिल्यास प्राध्यापक व विद्यार्थी यांनी त्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी होईल. हे पुस्तक पदवी व विविध स्पर्धा परीक्षांच्यासाठी महत्त्वाचे ठरेल असा आम्हाला विश्वास वाटतो. तसेच सदरच्या पुस्तकाच्या लेखनाची जबाबदारी संबंधीत घटक लेखकांवर आहे.

सदर पुस्तकाच्या लिखानाचे काम शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विविध मान्यवर प्राध्यापकांनी पूर्ण केल्याबद्दल संपादक मंडळ त्यांचे आभारी आहे. या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठ आणि दूरशिक्षण विभागातील प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल संपादक मंडळ मनापासून आभार मानत आहे.

**■ संपादक ■**

**डॉ. निरंजन कुलकर्णी**
मा. श्री. आण्णासाहेब डांगे आर्टस, कॉमर्स
ॲण्ड सायन्स कॉलेज, हातकणंगले,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**प्रा. श्रीधर शिंदे**
मिरज महाविद्यालय, मिरज,
ता. मिरज, जि. सांगली

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**सत्र ५ : प्रारंभीचा भारत**
**सत्र ६ : प्राचीन भारत**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–५ घटक क्रमांक | सत्र–६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **डॉ. निरंजन कुलकर्णी**<br>मा. श्री. आण्णासाहेब डांगे महाविद्यालय, हातकणंगले,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | १, २ | १, ४ |
| **डॉ. शर्मिला अशोक साबळे**<br>राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय, रुकडी | ३ | – |
| **डॉ. संजय नवले**<br>श्री संत गाडगेबाबा महाविद्यालय, कापशी,<br>ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर | ४ | – |
| **डॉ. माधुरी राजाराम खोत**<br>जयवंत महाविद्यालय, इचलकरंजी | – | २ |
| **प्रा. श्रीधर भाऊसाहेब शिंदे**<br>मिरज महाविद्यालय, मिरज, ता. मिरज, जि. सांगली | – | ३ |
| **डॉ. संतोष बाबरे**<br>रावसाहेब रामराव पाटील कॉलेज, सावळज,<br>ता. तासगाव, जि. सांगली | – | ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. निरंजन कुलकर्णी**
मा. श्री. आण्णासाहेब डांगे आर्टस, कॉमर्स
ॲण्ड सायन्स कॉलेज, हातकणंगले,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**प्रा. श्रीधर शिंदे**
मिरज महाविद्यालय, मिरज,
ता. मिरज, जि. सांगली

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५ : पेपर–७**<br>**प्रारंभीचा भारत** | |
| १. | प्रारंभ | १ |
| २. | वैदिक युग आणि महाकाव्ये | ३६ |
| ३. | दुसरे नागरीकरण | ५७ |
| ४. | मौर्य साम्राज्य | ९१ |
| | **सेमिस्टर–६ : पेपर–१२**<br>**प्राचीन भारत** | |
| १. | पूर्व ऐतिहासिक भारत | १२७ |
| २. | अभिजात युग | १५० |
| ३. | गुप्तोत्तर कालखंड | १८३ |
| ४. | समाज आणि संस्कृती | २०८ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२०-२१ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक – १

# प्रारंभ

**अनुक्रमणिका :**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ विभाग १ : शिकारी आणि अन्न संकलक : पुराश्मयुग आणि मध्याश्मयुग

स्वयं-अध्ययन प्रश्न-१

१.२.२ विभाग २ : आद्यशेतकरी : नवाश्मयुग आणि ताम्रपाषाणयुग

स्वयं-अध्ययन प्रश्न-२

१.२.३ विभाग ३ : पहिले नागरीकरण : हडप्पा संस्कृती

स्वयं-अध्ययन प्रश्न-३

१.२.४ विभाग ४ : महाशिलायुगीन भटकेः दफनांचे प्रकार, अवशेषांचे स्वरुप

स्वयं-अध्ययन प्रश्न-४

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


## १.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

- अश्मयुगीन मानवाची प्रारंभीची जीवनशैली समजून येईल.
- नवाश्मयुगीन क्रांती म्हणजे काय ते समजून येईल आणि ताम्रपाषाण युगीन काळातील शेतकऱ्यांचे जीवन समजून येईल.

- हडप्पा संस्कृतीतील भारताचे पहिले नागरीकरण कसे घडून आले? तिची वैशिष्ट्ये कोणती ते समजून येईल.
- महाशिलायुगीन भटक्यांची वैशिष्ट्यपूर्ण दफन पध्दती समजून येईल.

### १.१ प्रस्तावना :

मानवी इतिहासाचा अगदी सुरुवातीचा काळ म्हणजे प्रागैतिहासिक (Prehistory) काळ होय. या काळातील मानव हा मुख्यत्वे दगडी हत्यारांच्या सहाय्याने, प्रकृतीशी झुंझत होता. तसेच तिच्याशी जुळवून घेत, तिला आपल्या उपयोगी आणीत होता. म्हणून या काळास 'अश्मयुग' (Stone Age) असेही म्हंटले जाते. या युगामध्ये पुराश्मयुग (Paleolithic) आणि मध्याश्मयुग (Mesolithic) असे त्याच्या विकासाचे दोन टप्पे दिसतात. अर्थात, या दोन्ही टप्प्यावर तो शिकारी आणि अन्न-संकलक असतो. तो भटका असतो. पुढे नवाश्मयुग (Neolithic), या विकासाच्या तिसऱ्या टप्प्यामध्ये मात्र त्याच्या जीवनामध्ये क्रांती होते. त्याला शेती, पशुपालन असे शोध लागतात. त्याची कुटुंबसंस्था अस्तित्वात येते. तो स्थिर होऊ लागतो. पुढे त्याला तांबे या धातूचा शोध लागतो. या काळाला 'ताम्रपाषाणयुग' (Chalcolithic) असे म्हणले जाते. आता तो व्यवस्थित शेती करु लागतो; त्यात प्रयोग करु लागतो. त्याचे अन्य संस्कृतींशी संबंध तयार होतात. त्याची छोटी-छोटी खेडी तयार होतात. जवळपास याच काळात, भारताच्या वायव्य भागात, तो विकासाच्या पुढच्या टप्प्यावर मोठी झेप घेतो. या भागात, तो भारतातील पहिल्यावाहिल्या नगरांची निर्मिती करतो. या काळात उपजीविकेची साधने, नगर रचना-राहणीमान, सामाजिक-आर्थिक परिस्थिती इ. विविध अंगात उत्तम दर्जाचा विकास घडून येतो. या काळालाच 'हडप्पा संस्कृतीचा काळ' असे म्हंटले जाते. पुढे, विविध नैसर्गिक कारणांमुळे, या संस्कृतीचा ऱ्हास होतो. यानंतर, दक्षिणेकडे आपल्याला एक आगळी वेगळी संस्कृती दिसून येते. यांच्या वैशिष्ट्यपूर्ण दफन पध्दतीमुळे यांना 'महाशिलायुगीन संस्कृती' (Megalithic) असे म्हंटले जाते.

थोडक्यात; साध्या, भटक्या शिकारी-अन्न संकलकापासून, शहरी मानवापर्यंत, मानवाचा कसा विकास झाला हे आपल्याला याठिकाणी पहायचे आहे.

या काळाचा अभ्यास करताना, लिखित साधने मिळत नसल्याने तसेच जी मिळतील ती अद्याप वाचता न आल्याने, आपल्याला पुरातत्वीय साधनांचा आधार घ्यावा लागतो.

### १.२ विषय विवेचन :

#### १.२.१ विभाग १ : शिकारी आणि अन्न संकलक : पुराश्मयुग आणि मध्याश्मयुग :

#### अ) प्रागैतिहासिक संस्कृतीचा कालक्रम :

पर्यावरणातील बदल, मानवाचे प्रयोग, त्याच्या हत्यारातील-बनविण्याच्या तंत्रातील-लागणाऱ्या कच्च्या मालातील बदल इ. निकषांवर भारतीय प्रागैतिहासाचे अथवा अश्मयुगाचे साधारणत: तीन मुख्य कालखंड पडतात. जसे, पुराश्मयुग (इ.स.पू. २.५ लाख ते १०,०००); मध्याश्मयुग (इ.स.पू. १०,००० ते ८,०००) आणि नवाश्मयुग (इ.स.पू. ८,००० ते ४,०००). त्याचबरोबर, वरील निकषांवरुन, पुराश्मयुगाचेही तीन उपकालखंड

पडतात, जसे, पूर्व (इ.स.पू. २.५ लाख ते १ लाख), मध्य (इ.स.पू. १ लाख ते ४००००)आणि उत्तर (इ.स.पू. ४०००० ते १००००).

याठिकाणी, पुराश्मयुग; तिच्या उपकालखंडासह आणि मध्याश्मयुग जीवन पहायचे आहे. या काळातील मानव हा शिकारी आणि अन्न संकलक होता.

या काळातील मानव हा पूर्णपणे भटका असून, मुख्यत्वे शिकार व अन्न-संकलन-मासेमारी हेच त्याचे उपजिविकेचे साधन होते. सुरुवातीच्या काळात हा गेंडा, हत्ती असे मोठे प्राणी आणि पुढे मध्याश्मयुगामध्ये जंगली वराह, चिंकारा, नीलगाय, हरणांसारख्या वेगवान आणि छोट्या प्राण्यांची तो शिकार करु लागलेला दिसतो. त्याच्या आहारात कासव, मासे यांचाही समावेश दिसून येतो. शिकारी बरोबरच मध, फळे, मूळं, बीया इ. चा तो खाण्यासाठी संग्रह करीत असे. त्याचीही अवस्था अश्मयुगाच्या सर्व टपटप्प्यातून विकसित होताना दिसते. हा मानव भटका असल्यामुळे, शक्यतो हा उघड्यावरच रहात असे. प्रसंगी गुहा/कपारींच्या आश्रयानेही रहात असे.

साधारणतः पुरुष हे शिकारीचे काम करताना दिसतात तर स्त्रिया अन्नसंकलनाचे. शतकानुशतके त्यांचे अनुभव साठत गेले. यातून, पुरुषांना वन्य पशुंचे तर स्त्रियांना वनस्पतींचे जीवनचक्र समजत गेले.

**ब) हत्यारे व तयार करण्याचे तंत्र :**

प्रागैतिहासिक मानवाने हत्यारांसाठी मुख्यत्वे दगडांचा वापर केला. याचा विकास, आपल्याला, त्याच्या हत्यारांमध्ये झालेल्या विकासावरुन लक्षात येतो. जसे, पूर्व पुराश्मयुगात स्थानिक ठिकाणी मिळणाऱ्या दगडांच्या छिलक्यांचा (Flakes) तसेच गोट्यांचा (Pebbles) वापर करुन, अनुक्रमे हात कुऱ्हाडी (Hand Axe) व तोड हत्यारे (Chooping tools ) त्याने तयार केली. पुढे, त्याला क्रिप्टो क्रिस्टलाईन सिलिसियस दगडाचा शोध लागला. यातून उत्तम हत्यारे तयार करता येतात हे त्याच्या लक्षात आले. यातून, पुढे मध्यपुराश्मयुगात फक्त छिलक्यांचा आणि पुढे उत्तर पुराश्म युगात दगडी पात्यांचा (Blade) वापर त्याने केला.

पुढे, मध्याश्मयुगात पर्यावरणात बदल झाला. तुलनेने पाऊस कमी झाला. त्यामुळे घनदाट जंगलांचे प्रमाण कमी होत गेले. तर गवताळपट्ट्यांचे प्रमाण वाढले. स्वाभाविकतः या काळात, गवतांच्या आधाराने राहणारे छोटे आणि वेगवान प्राणी दिसू लागले. पूर्वीच्याच हत्याराने, या प्राण्यांची शिकार करणे आता अवघड झाले होते. नव्या शोधाची गरज होती.

या गरजेतूनच, मध्याश्मयुगीन मानवाने छोट्या-छोट्या हत्यारांची, संयुक्त हत्यारे वापरण्यास सुरुवात केली. हा मानव आता पूर्वीपेक्षा अधिक विकसित झालेला होता. त्याने पूर्वजांच्या पाते संस्कृतीतून, सूक्ष्मास्त्रांचा (Microliths) शोध लावला. ही सूक्ष्मास्त्रे साधारणत: टोकदार आणि विविध भौमितिक आकारांची असून, संयुक्त हत्यारे म्हणूनच यांचा उपयोग होत असे. पूर्वीप्रमाणेच त्याने यासाठी क्रिप्टो क्रिस्टलाईन दगड व संयत स्वरुपाने दाब तंत्राचा (Pressure technique ) वापर करुन हत्यारे निर्माण केली. अर्थातच अशाप्रकारच्या हत्यारांचा त्याला फार फायदा झाला. जसे, ही हत्यारे मुख्यत्वे संयुक्त स्वरुपाची असल्याने, कोणताही विशिष्ट

आकार गृहीत धरुन हत्यारे करणे आता फारसे गरजेचे राहिलेले नाही. फक्त ही सूक्ष्मास्त्रं ज्या लाकडात /हाडांत जोडायची आहे ते हव्या त्या आकारांचे असले की झाले! तसेच, या काळातील हत्यारे ही पूर्वीपेक्षा वजनाने हलकी असल्याने सोबत बाळगणे हे आता अधिक सोयीचे झाले. शिवाय ही हत्यारे तुटली अथवा हरवली तरी जागच्या जागी तयार करणेही सोपे होते. विशेषत: अशा सूक्ष्मास्त्रांचा वापर करुन त्याने आपले धनुर्धारी कौशल्य विकसित केले.

त्याच्या या शोधामुळे, आता त्याला, एका जागेवरुन, दूरचे धावणारे, छोटे प्राणी टिपणे शक्य झाले. त्याचे आता शिकारीवर-आणि बदललेल्या पर्यावरणावर नियंत्रण निर्माण झाले. तो आता अनोळखी प्रदेशामध्ये भटकण्याचे धाडस करु लागला. पूर्वीच्या तुलनेने, तो आता स्थैर्याकडे वाटचाल करु लागला. त्याची लोकसंख्या वाढू लागली. शिकारीवरील नियंत्रणामुळे, तो आता पूर्वीपेक्षा निवांत झाला. यामुळेच, त्याचे कलेतले प्रयोग सुरु झाले.

**क) मध्याश्मयुगीन गुहा चित्रे** (Rock Art)

मध्याश्मयुगीन मानवाच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनातील एक महत्वाचा भाग म्हणजे गुहाचित्रे होय. साधारणत: १८६७-६८ मध्ये भारतीय पुरातत्व खात्याच्या कार्लाइल यांनी सोहागी घाट (जि. मीर्झापूर) याठिकाणी गुहाचित्रांचा शोध लावला. त्यापासून आतापर्यंत एकूण १५० गुहांचा शोध लागलेला असून त्याची १९ गटांत विभागणी होते. यातील बहुतेक गुहा (३/४) या मध्य प्रदेशातील विंध्य-सातपुडा पर्वतरांगामध्येच वसलेल्या आहेत. यामध्ये, भीमबेटकाची (भोपाळ पासून ४५ किमीवर) गुहाचित्रं ही प्रातिनिधिक व प्रसिध्द अशी आहेत. याठिकाणी जवळपास दहा किमीच्या वर्तुळात आणि सात डोंगर रांगात एकूण ६०० गुहा आहेत. चांगले पर्यावरण, पाण्याचा बारमाही पुरवठा, हत्यारांसाठी उपयुक्त अशा दगडांचे प्रचंड साठे, विविध लहान मोठे प्राणी वसत असलेली घनदाट जंगले यामुळे या गुहांमध्ये मानवाने अगदी पूर्व पुराश्मयुगापासून याठिकाणी आश्रय घेतलेला दिसून येतो. व्हि.एस.वाकणकर यांनी या गुहाचित्रांचा सर्वप्रथम अभ्यास केलेला दिसून येतो.

ही चित्रे गुहांच्या छतावर व भिंतीवर काढलेली आहेत. यासाठी या मानवाने रंगासाठी नैसर्गिक (स्थानिक खनिजे आणि वनस्पती) रंगांचा वापर केलेला दिसून येतो. या रंगांमध्ये लाल, पांढरा, हिरवा, पिवळा यांचा विविध छटांमध्ये समावेश होतो. रंग टिकावा म्हणून हे रंग, चरबी आणि डिंकामध्ये कालवून वापरलेले दिसतात. तर, प्राण्यांच्या शेपटांपासून ब्रश तयार केलेले आहेत. अर्थात, ही मुख्यत्वे रेखाचित्रे असून यामध्ये नंतर रंग भरला जाई. अभ्यासकांनी या चित्रांवरुन चित्रकलेच्या एकूण १२ शैली ओळखलेल्या आहेत. तसेच, तीन टप्पे लक्षात घेतलेले आहेत. प्रागैतिहासिक गुहाचित्रे, ऐतिहासिक गुहाचित्रे आणि दोघांतील संक्रमणावस्था.

चित्रविषयांमध्ये मुख्यत्वे प्राणी व शिकारीचे प्रसंगप्रधान दिसतात. प्राण्यांचा विचार करता या मध्ये वाघ, गेंडा, हरिण, रानडुक्कर, माकड, ससे, कोल्हा इ. विविध प्राण्यांचा, त्यांच्या हालचालीसह समावेश करता येईल. त्याने, विविध भौमितिक आकारांनी यांचे शरीर सुशोभित केलेले दिसते. तर शिकारीच्या दृश्यात सामुहिक तसेच एकेकट्याने केलेल्या शिकारींची तसेच प्राण्यांना सापळ्याद्वारे पकडण्याची चित्रं आहेत. यामध्ये सूक्ष्मास्त्रं जोडलेली भाले, धनुष्य-बाण इ. हत्यारेही दिसून येतात. तसेच, मधासारखी वन्यत्पादनं गोळा करणारी आणि

मासेमारी करणारी माणसे ही या चित्रांत आहेत. त्याचबरोबर, बाळाचा जन्म, त्याचे पालन-पोषण, दफन विधी अशी जीवनचक्रं दाखविणारी ही चित्रं आहेत.

काही अभ्यासकांना असे वाटते की ही चित्रे मानवाने निव्वळ गुहा सजवण्यासाठी काढलेली नव्हती. तर ही चित्रे काढण्यामागे त्याचा धार्मिक दृष्टिकोन असावा. कारण ही चित्रे अशा गुहांत काढलेली असत की यांचा वापर मानव नियमितपणे रहाण्यासाठी करत नसे. शिवाय, बरीचशी चित्रे ही अगोदरच्या चित्रांवर जणूकाही गिरवल्यासारखी काढलेली आहेत. जसे, एखादा प्राणी, वारंवार गिरवल्यावर तो मोठ्या प्रमाणावर आपल्याला मिळेल ही त्याची श्रध्दा असावी. एकंदरीत यावरुन असे दिसते की हा मानव, पूर्वीपेक्षा सामाजिकदृष्ट्या अधिक व्यवस्थित आणि संगठित झालेला आहे. तसेच, त्याने विविध प्रकारच्या उपजीविकेची माध्यमं हाताळलेली आहेत. अशा गोष्टींमुळेच तो कोणत्याही पर्यावरणावर नियंत्रण ठेवण्यात यश मिळवू शकला असावा.

**● स्वयं-अध्ययन प्रश्न-१**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. .........ही पूर्वपुराश्मयुगीन मानवाची हत्यारे होत.

अ. हात कुऱ्हाडी व तोड हत्यारे　　ब. सूक्ष्मास्त्रे

क. पात्यांची हत्यारे　　ड. गुळगुळीत हत्यारे

२. ............या काळात मानव गुहांमध्ये चित्रे काढू लागला.

अ. पुराश्मयुग　　ब. मध्याश्मयुग　　क. नवाश्मयुग　　ड. ताम्रपाषाणयुग

३. ............ ही मध्याश्मयुगीन मानवाची हत्यारे होत.

अ. हातकुऱ्हाडी　　ब. सूक्ष्मास्त्रे　　क. पात्यांची हत्यारे　　ड. गुळगुळीत हत्यारे

४. मध्य प्रदेशातील...........याठिकाणी गुहाचित्रे सापडलेली आहेत.

अ. बूर्झाहोम　　ब. भीमबेटका　　क. बागोर　　ड. धोलावीरा

५. १८६३ मध्ये...............यांनी मध्याश्मयुगीन गुहाचित्रांचा शोध लावला.

अ. मार्शल　　ब. कार्लाईल　　क. बॅबिंग्टन　　ड. प्रिन्सेप

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. प्रागैतिहासिक काळ म्हणजे काय?

२. अश्मयुगीन मानवाच्या उपजीविकेची साधने काय होती?

३. अश्मयुगीन पुरुष आणि स्त्रिया कोणती कामे करीत असत?

४. पुराश्मयुगीन मानव कोणकोणती हत्यारे तयार करीत असे?

५. भीमबेटका येथील गुहाचित्रांचा कोणत्या भारतीय संशोधकाने सर्वप्रथम अभ्यास केला?

## १.२.२ विभाग २: आद्य शेतकरीः नवाश्मयुग आणि ताम्रपाषाणयुग :

**● नवाश्मयुग :**

नवाश्मयुग म्हणजेच निओलिथिक हा शब्दप्रयोग सर्वप्रथम सर जॉन लुबॉक यांनी आपल्या(१८६५) या ग्रंथात केला. 'घासून गुळगुळीत केलेली दगडाची हत्यारे' ही, तो या नव्या युगाचे विशेष लक्षण मानतो. नवाश्मयुग हा मानवाच्या इतिहासातील क्रांतीकारक टप्पा होय. या काळात त्याला शेती आणि पशुपालन यांचा शोध लागला. या शोधाने त्याचे जीवनपार बदलून गेले. या काळातील शेतीचा शोध प्रथम नाईल नदीच्या खोऱ्यात लागला. तर पशुपालनाचा शोध पश्चिम आशियामध्ये लागलेला होता. तसेच या भागातील लोक, अशा नव्या शोधांमुळे स्थिरही झालेले दिसून येतात. हे नवे शोध वायव्य भागातूनच भारतात आलेले दिसतात.

भारतामध्ये शेती आणि पशुपालनाचे पहिले वहिले पुरावे नवाश्मयुगापासून मिळण्यास सुरुवात होते. ही नवाश्मयुगीन स्थळे भारतातील काही ठराविक भागात वसलेली दिसून येतात, तशीच ती आपली काही प्रादेशिक वैशिष्ट्ये ही घेऊन येतात. यांचे वितरण अफगाणिस्थान-बलुचिस्तान (मेहेरगढ), काश्मीर (बुर्झाहोम, गुफकराल), आग्नेय उत्तर प्रदेश (बेलन नदीचे खोरेः चौपानी मंडो, कोल्डी हवा, महागरा), उत्तर बिहार (सेनुआर, चिरांद), दक्षिण भारत (बुधिहाळ, नागार्जुन कोंडा, संगणकल्लू) असे दिसून येते. यातील मेहेरगढमध्ये तो पशुपालक तर होताच शिवाय तो आता गहू आणि जव पिकवू लागला तसेच खजूर ही उगवू लागला. तसेच तो राहण्यासाठी कच्च्या विटांची आयताकार घरे बांधू लागला. हा मानव सामुहिक स्वरुपात धान्य साठवण्यासाठी विविध खोल्या असलेल्या इमारतीही बांधू लागला. पुढील हडप्पा काळातील धान्य कोठारांचीही जणूकाही नांदीच होती.

**अ) नवाश्मयुगीन क्रांती :**

'शिकार आणि अन्न संकलक' मानवामध्ये फार मोठा बदल होऊन तो 'शेती-पशुपालन' करणारा आणि एका ठिकाणी स्थिर राहणारा मानव झाला. या बदलाला विद्वानांनी 'नवाश्मयुगीन क्रांती' असे म्हंटलेले आहे. हे याठिकाणी लक्षात घेतले पाहिजे की, शतकानुशतके शिकार करणाऱ्या पुरुषांना, वन्यजीवांच्या जीवनचक्राची- त्यांच्या सवयींची माहिती झाली होती. त्याचप्रमाणे, स्त्रीयांना वनस्पतींच्या जीवनचक्रांची माहिती झाली होती. यातूनच, पुरुषांनी 'पशुपालनाचा' तर स्त्रियांनी 'शेतीचा' शोध लावलेला दिसून येतो.

अशा या नवाश्मयुगाची ठळक लक्षणे खालीलप्रमाणे मांडता येतील.

**शेतीचा शोध :** या काळात विविध जंगली बियांचे नियंत्रितपणे पिकवणे अथवा त्यांची लागवड करणे सुरु झाले. जसे जंगली तांदळाची, नियंत्रित स्वरुपात तांदळाची शेती सुरु झाली. हा मानव आता गहू, ज्वरी, तांदूळ, वाटाणा, मूग, मसूर, कुळीथ, रागी पुढे कापूस, द्राक्षे इ. महत्वाची पीके घेताना दिसतो. थोडक्यात, या काळात शेतीचा शोध लागला. हा शेतीचा शोध पुढे खाजगी मालमत्तेच्या संकल्पनेला जन्म देणारा ठरला.

**पशुपालन :** तसेच, आहार आणि इतर कष्टाच्या कामासाठी योग्य अशा प्राण्यांची निवड करुन, त्यांचे नियंत्रितपणे पालन सुरु झाले. यात शेळ्या-मेंढ्यांबरोबर, गुरांचाही समावेश होतो.

**स्थिर स्वरुपाची वसाहत :** वरील दोन्ही बाबींसाठी अथवा दोन्ही बाबींमुळे त्याला एका ठिकाणी स्थिर रहावे लागले. त्याने कुटुंब निर्माण केले. ही त्याची खाजगी मालमत्ता बनली. आता आपल्या कुटुंबासाठी तो घरे बांधू लागला. यावेळी प्रथम तो जमिनीखाली राहत असे पुढे तो जमिनीवर आयताकार मातीची, कुडाची, कच्च्या विटांची घरे बांधून राहू लागला.

**खेड्यांचा उदय :** या घरांतून आणि कुटुंब व्यवस्थेतून, सामाजिक संबंध अधिक घट्ट विणले गेले. यातूनच पहिल्यावहिल्या खेड्यांचा उदय झाला. तसेच धान्य कोठारे, तटबंदी, शेणाचे ढिगारे पेटवण्यासारख्या नियमित अशा रिवाजासारख्या सामूहिक वास्तू आणि रीतीही उदयास आल्या. अर्थात यावेळी काही प्रमाणात सामाजिक स्तरीकरणाबरोबरच, अन्य संस्कृतीसंबंधांचे संकेतही मिळू लागतात.

वरील काही सांस्कृतिक प्रक्रियांबरोबरच मृद्भांडी, घासून गुळगुळीत केलेली हत्यारे, हाडांची हत्यारे आणि अवजारे, मौल्यवान खड्यांचे मणी इ. या युगाची ठळक लक्षणे होती.

**ब) हत्यारे :**

या काळातील मानव, पूर्वजांच्या हत्यारासोबत, आता घासून गुळगुळीत केलेल्या दगडांचा वापर करु लागला. यामध्ये, कुऱ्हाडी, कुदळ, रापी, छिन्नी, रिंगस्टोन, खलबत्ता, वरवंटा यांचा समावेश होतो. या दगडांच्या हत्यारांबरोबरच तो लाकडांची व हाडांची हत्यारे वापरु लागलेला दिसतो. त्याचे हे हत्यारांचे भांडार एकंदरीतच त्याच्या शेती आणि स्थिर राहणीकडे निर्देश करते.

**क) वसाहती :**

नवाश्मयुगीन मानवाच्या वसाहती वैविध्यपूर्ण दिसून येतात. काश्मीरसारख्या प्रदेशात तो जमिनीमध्ये खड्डे करुन राहतो, उर्वरित ईशान्य आणि उत्तर भारतामध्ये तो कच्च्या विटांच्या झोपड्यांमध्ये राहतो, तर दक्षिणेकडे-कर्नाटकामध्ये त्याची घरेच मिळत नाहीत. उलट, तेथे 'राखेचे मोठमोठे ढिगारे' दिसून येतात.

काश्मीरमध्ये बुर्झाहोम येथील लोक थंडीपासून संरक्षण करण्यासाठी गर्तावासात म्हणजे जमिनीत खड्डे/घरे करुन रहात असत. अशावेळी जमिनीवर, या खड्डयाच्या भोवती शंखाकृती गवताची झोपडी असावी. पुढे मात्र ते आयताकृती, कुडांच्या झोपड्यात-आणि पुढे, मातीच्या विटांनी बनवलेल्या घरांत राहू लागले. यांनी बैल, घोडा, शेळी समुहातील प्राणी माणसाळवले-पाळलेले होते. यातील रेडा व गाढवाचा (घोडा समुह) वापर ते ओझी वाहण्यासाठी करीत असत. तसेच ते धान्यांचीही, किमान पोटापुरती प्राथमिक स्वरुपातील पैदास करु लागले. यामध्ये, गहू, बार्ली, जवस यांचा समावेश होतो. हे धान्य साठविण्यासाठी तसेच इतर कामांसाठी ते आता चाकावरील मृद्भांडी बनवू लागले. तर गुफकराल या ठिकाणी दगडी मात्र अधिक लांब व सुधारीत अशा कुऱ्हाडी, हाडांची सुधारीत अवजारे (बाणाग्रे) तसेच हार्वेस्टरचा समावेश होतो.

असे दिसते की हा मानव आपल्या पूर्वजांप्रमाणेच विविध संस्कृत्यांशी संबंध ठेवून होता. हा त्यांच्याशी शंख, हार यामध्ये विनिमय करताना दिसतो. बुर्झाहोम येथील गर्तावास, तर गुफकराल येथील हार्वेस्टर आणि कुत्र्याची दफने त्याचा चीनी नवाश्मयुगीन लोकांशी संपर्क दाखवितात. तर येथे सापडलेली मृद्भांडी त्याचा पूर्व-हडप्पा काळाशी संपर्क दाखवतात. त्यांच्या दफनांमध्ये, प्रेतासोबत मिळालेल्या विविध वस्तूवरुन असे दिसते की यांच्या मरणोत्तर जीवनाबद्दलही काही श्रध्दा होत्या. थोडक्यात, काश्मीर खोऱ्यात घर, त्याच्या जवळ गोठा व सभोवती पसरलेले शेत आणि कुरण अशापध्दतीचे एक खेडेच या काळात निर्माण झाले. याबरोबरच आता, शेती-पशुपालन करणारा, काही श्रध्दा बाळगणाऱ्या आणि समूहात राहणाऱ्या अशा कुटुंबवत्सल सामाजिक मानवाचाही उदय होऊ लागला. या उदयाला वायव्य भारत, मध्य आशिया, चीन यांच्याशी असणाऱ्या संपर्कांची ही जोड होती.

तर आग्नेय उत्तर प्रदेशातील चौपानी मंडो येथे मध्याश्मयुगाच्या शेवटी शेवटी मानव निमभटका असला तरी तो काही काळासाठी स्थिर रहात असून, शेती करीत होता. याठिकाणी झोपड्या, चुली, सूक्ष्मास्त्रं, जाती, रिंगस्टोन आणि हातावर बनवलेली मृद्भांडी तसेच जंगली तांदूळ, जंगली गुराबरोबरच पाळीव शेळ्या-मेंढ्यांची हाडे मिळालेली आहेत. असे कळते की, शेती आणि पशुपालनाअगोदरच येथील मानवाने मृद्भांड्यांचा शोध लावलेला होता. हे लक्षात ठेवले पाहिजे की येथील मृद्भांडी ही जगातील सर्वात पहिली मृद्भाडी आहेत (इसपू ९-८०००). म्हणजेच, मृद्भांडी व काही प्रमाणात दगडी जाती ही त्याच्या अन्न संग्राहक व्यवस्थेशी जोडलेली आहेत. असे दिसते की हा मानव अन्नसंग्रहणा बरोबरच, पशुपालन आणि थोडीफार शेती करुन स्थिर झालेला होता. तर महागराही फक्त नवाश्मयुगीन वसाहत असून याठिकाणी एक मोठा गोठा मिळालेला आहे.

या दोन्ही ठिकाणी मानव तांदूळ पिकवित होता, शेळ्या-मेंढ्या आणि गुरे पाळत होता व स्थिर झालेला होता असे दिसते. या बेलन नदीच्या खोऱ्यातील नवाश्मयुगीन संस्कृतीचा विचार करता असे दिसते की हे लोक विशेष करुन तांदळाची लागवड करीत आणि पशुपालन करीत होते. तसेच, अन्न संग्रहणाचाही एक पर्याय उपलब्ध होता. हे दगडांची अवजारे वापरीत मात्र ही पूर्वीपेक्षा अधिक सुधारीत व पॉलिश केलेली असत. तसेच, मृद्भांड्यांच्या कारागिरीत एक प्रमाणबध्दता येऊ लागलेली होती. अशा या वसाहतींत कुटुंबव्यवस्था आणि समाज व्यवस्था उदयास आलेली होती.

उत्तर बिहार याठिकाणी पर्यावरणीय अनुकुलता असूनही, येथे तुलनेने फार पुढे (इ.स.पू. २०००-१६००) नवाश्मयुगीन वसाहती निर्माण झाल्या. येथे सेनुआर, चिरांद याठिकाणी नवाश्मयुगीन अवशेष मिळालेले आहेत. हा मानव गहू, तांदूळ, जव, वटाणे आणि मसूर शिवाय हरभरा आणि मूग यांची लागवड करीत असे. शिवाय या ठिकाणी मृद्भांडी, घासून गुळगुळीत केलेली हत्यारे, हाडांची हत्यारे, मौल्यवान खड्यांचे मणी, टेराकोटाचे पुतळे इ. मिळालेले आहेत. दोहीही ठिकाणी हाडांची उल्लेखनीय अशी हत्यारे मिळालेली आहेत. म्हणजेच येथील मानव शेतीबरोबरच, पशुपालन तर करीत होताच तसेच आता तो आपली सौदंर्य अभिरुचीही जपू लागलेला दिसून येतो.

आसाम आणि नजीकचा हिमालय पर्वत हा प्रचंड पर्जन्यमानाचा प्रदेश असून आसाम आणि गारो, नागा या

पर्वतरांगामध्ये नवाश्मयुगीन अवशेष मिळालेले आहेत (जवळपास इ.स.पू. २०००). येथील देवजाली हाडिंग याठिकाणी स्कंधयुक्त कुऱ्हाडी, घासून गुळगुळीत केलेल्या कुऱ्हाडी, दोऱ्याची नक्षी असणारी मृद्भांडी मिळालेली आहेत.

**ड) दक्षिण भारत आणि उत्तर कर्नाटकातील राखेचे ढिगारे :**

दक्षिण भारतामध्ये विशेष पर्यावरणीय अनुकुलता नसतानाही (पावसाचे प्रमाण २५ सेमी पेक्षा कमी) उल्लेखनीय अशा नवाश्मयुगीन वसाहती दिसून येतात.

या वसाहती डोंगराळ भागात तसेच दख्खनच्या कोरड्या पठारावर मिळालेल्या आहेत. येथील नागार्जुनकोंडा, संगणकल्लू या महत्वाच्या वसाहती होत. यातील नागार्जुन कोंडा (इ.स.पू. २६००–१०००) येथे सुरुवातीला (इ.स.पू. २५००) शेतीचे अल्प–ज्ञान होते आणि पशुपालन तर जवळजवळ माहितच नव्हते. मात्र पुढील काळात मानव लाल रंगाची मृदूभांडी बनवू लागला. तो गुरे, शेळ्या–मेंढ्या, गाढव, वराह, घोडे आदि पशु पाळू लागला. तसेच, तो, सांबर, बारशिंग्या, चिंकारा अशा हरीण समुहातील प्राण्यांची शिकार करताना दिसू लागला. तसेच, मणीही बनवू लागला. पुढे तर विकासाच्या पुढील टप्प्यात तो धूसर अशी मृद्भांडी आणि गुळगुळीत हत्यारंही मोठ्या प्रमाणावर तयार करु लागलेला दिसतो. तसेच तो आता गर्तावासात राहू लागलेला आहे. म्हणजेच तो आता पूर्वीचे अन्नसंग्रहण बाजूला ठेवून, शेतीसह पशुपालान ही करु लागलेला दिसून येतो. अर्थात, शिकार आणि मासेमारी हे पर्याय सोबत होतेच. याठिकाणी हे लक्षात घेतले पाहिजे की या ठिकाणी शेतीचा शोध हा पशुपालनाच्या अगोदर लागलेला आहे.

पशुपालनाचा विचार करता, उत्तर कर्नाटकामध्ये, नवाश्मयुगाचे आणखीन एक वैशिष्ट्य आपल्यासमोर येते. ते म्हणजे 'राखेचे ढिगारे' (Ashmounds).

या प्रदेशात, कित्येक ठिकाणी, मानवी वसाहतीपासून दूर राखेचे मोठमोठे ढिगारे दिसून येतात, जसे, बुधिहाळ, उटनूर, कोडेकल आणि कुपगल इ. ठिकाणी. असे दिसते की हा पशुपालक मोठ्या प्रमाणावर आणि एका विशिष्ठ ठिकाणी शेण साठवून ठेवत असे. इथे शेतीचा शोध लागलेला नसल्याने, या शेणाचा तसा काही उपयोग नव्हता. म्हणून, रोगराईपासून वाचण्यासाठी, कालांतराने हा, हे शेणाचे ढिगारे पेटवून देत असावा. काही अभ्यासकांच्या मते या 'शेणाचे ढिगारे जाळणे' या कृतीला काही धार्मिक आशय असू शकतो व म्हणून, आजच्या होळीच्या सणाची पूर्व परंपराही असावी. काहीही असो, यातून आपल्याला या समाजजीवनातील पशुपालनाचे महत्व (आणि शेतीचे अज्ञान) कळते. असे दिसते की हा पशुपालक वर्षातील काही ठरावीक महिने आपली जनावरं घेऊन वसतीपासून दूर चरण्यासाठी घेऊन जात असावा. आजही सातारा भागातील पशुपालक पावसाळ्याव्यतिरिक्त उरलेले महिने आपली जनावरं घेऊन कोकणात जाताना दिसतात.

दक्षिण भारताचे नवाश्मयुगीन जीवन पाहता असे दिसते की हा मानव पायऱ्यांची शेती करुन; गहू, कुळीथ, मूग आणि रागी पिकवित होता. तसेच, मुख्यत्वे आहारासाठी आणि पुढे वजन वाहण्यासाठी तसेच नांगर चालवण्यासाठी पशुंचे पालन करीत होता. याशिवाय शिकार आणि मासेमारी हे त्याच्या अन्नवैविध्यातील महत्वाचे

घटक होते. एकंदरीत असे दिसते की या मानवाच्या उपजीविकेमध्ये शेती आणि पशुपालन हे मुख्य घटक असून हा आता स्थिर झालेला होता.

**● ताम्रपाषाणयुग :**

ढोबळपणे ज्याकाळातील मानव तांब्यासह अश्महत्यारेही वापरत होता. त्याकाळास ताम्रपाषाणयुग असे म्हणतात. भारतीय ताम्रपाषाण युगाला 'आद्य शेतकऱ्यांचे' युग असे म्हटले जाते. हा काळ साधारणतः इसवीसन पूर्व ३००० ते इसवीसन पूर्व ७०० असा ढोबळमानने सांगता येईल. साधारणतः नवाश्मयुगानंतर भारतामध्ये ताम्रपाषाणयुग अवतरले. या काळात सर्वत्र आद्य शेतकऱ्यांची खेडी निर्माण झालेली होती. यातील सिंधु-सरस्वती खोऱ्यातील खेड्यांनी तुलनेने अधिक विकास केला. यातून त्या खोऱ्यांत एक नागरी स्वरुपाची 'हडप्पा संस्कृती' निर्माण झाली. अर्थात, हडप्पा संस्कृतीच्या अगोदर, तिच्या काळामध्ये आणि तिच्या नंतरही भारतातील ताम्रपाषाणयुगीन खेडी ही अस्तित्वात होतीच.

अशा या ताम्रपाषाणयुगीन खेड्यातील संस्कृतींची काही ठळक लक्षणे आहेत.

हे आयताकृती किंवा गोल अशा कुडाच्या आणि मातीच्या विटानी बनवलेल्या घरांमध्ये रहात. या घरांमध्ये एकापेक्षा अधिक खोल्याही असत. व्यवस्थित चोपलेली जमिन आणि शाकारलेले छत हे मुख्य लक्षण. तर स्वयंपाकघरामध्ये चूल, जमिनीत पुरलेले साठपाचे भांडे व धान्यासाठी मोठ्या कणग्या हे दिसतेच.

हे लोक शेती, पशुपालन, शिकार आणि मासेमारी असे उपजीविकेचे वेगवेगळे पर्याय हाताळत. शेती ही हाडांच्या /लाकडाचा नांगर वापरुन, जलसिंचनाच्या वेगवेगळ्या योजना राबवून केली जात असे. यांच्या पशुपालनामध्ये गुरांचा समावेश हा प्रामुख्याने होता. मात्र ज्यावेळी हवामान प्रतिकूल झाले त्यावेळी त्यांनी शेळ्या-मेंढ्यांना पाळायला मोठ्या प्रमाणावर सुरुवात केली. यांनी तांब्याच्या कारागीरीत विकासावस्था गाठलेली होती. ते तांब्याची तसेच तांब्याच्या मिश्र धातूची हत्यारे/साधने वापरीत. अर्थात राजस्थान वगळता, इतर प्रांतात तांबे दुर्मिळ असल्याने, मागील काळातील दगडी पात्यांपासून बनविलेली हत्यारे अधिक प्रचारात होती. ही अश्महत्यारे चॅल्सिडोनी, चर्ट सारख्या दगडांच्या पात्यांपासून बनवलेली असत. काही ठिकाणी सूक्ष्मास्त्रेही वापरली जात. तसेच हाडांची हत्यारेही वापरत असत. मातीच्या भांड्यांना दैनंदिन जीवनामध्ये महत्वाचे स्थान असल्याने, प्रचंड प्रमाणावर गुणवत्ता आणि विविधता दिसून येते. साधारणतः हे 'काळ्या रंगाने चित्रित लाल भांडी' वापरत असत. अर्थात यांच्यामध्ये संस्कृतीनिहाय वैविध्य जाणवते. हे काही वस्तूंमध्ये विनिमयही करीत असत. यांचा एकमेकांशी, विशेषतः शेजाऱ्यांशी सहसंबंध असे. त्यांच्यात देवाण-घेवाण चालत असे. हे पशू आणि मातृदेवतेचे पूजक होते. तसेच यांचा मरणोत्तर जीवनावर विश्वास होता. त्यामुळे मृतांचे शक्यतो घरांमध्येच किंवा घराजवळ, विविध वस्तूंसह दफन केले जाई.

भारताच्या भौगोलिक विविधतेमुळे, येथे ताम्रपाषाणयुगाच्या विविध उपसंस्कृती ही निर्माण होत गेल्या, जसे, राजस्थानमधील आहाड/बनास संस्कृती, माळवा (पश्चिम मध्यप्रदेश) येथील प्रथम कायथा, पुढे आहाड नंतर माळवा संस्कृती; महाराष्ट्रातील जोर्वे संस्कृती इ. तर उत्तर कर्नाटकामध्ये नवाश्मयुग हे ताम्रपाषाणाबरोबर

नांदताना दिसते. तसेच पश्चिमेला गुजरात आणि पूर्वेला बंगालपर्यंत या संस्कृतीचा विस्तार दिसून येतो. या सर्व संस्कृती देवाण घेवाणीच्या संबंधाने एकमेकांशी जोडलेल्या होत्या. विशेषत: भौगोलिकदृष्ट्या जवळच्या संस्कृतींमध्ये हे अधिक आढळून येते.

हडप्पा संस्कृतीच्या समकालीन मात्र स्वतंत्र ओळख असणारी म्हणजे **राजस्थानमधील** आहाड संस्कृती (इसवीसन पूर्व २१००-१५००). ही बनास नदीच्या खोऱ्यातील, मेवाड भागात निर्माण झाली. आहाड, गिलूंड, बालाथल ही या संस्कृतीची महत्वाची स्थळं होत. ही संस्कृती तांब्याच्या खाणींच्या प्रदेशामध्ये निर्माण झाल्याने, यांचा विकास मोठ्या प्रमाणावर झाला. यांची लोकसंख्याही अधिक होती. त्यामुळे यांच्या वसाहती खूप मोठ्या झाल्या. तांब्याच्या उत्कृष्ठ कारागीरीबरोबरच, हे लोक मुख्यत्वे शेतकरी होते. त्याचबरोबर मेवाडच्या डोंगराळ भागामुळे पशुपालनही शक्य होते. शिवाय शिकार आणि मासेमारी हे जोड उद्योग होतेच. येथील लोक मातीच्या विटांनी बनवलेल्या, कुडाच्या किंवा दगडी घरांमध्ये रहात असत. स्वयंपाकघरात चूल, भट्टी आणि जमिनीतील साठपाचे राजंण या महत्वाच्या गोष्टी असत. हे पांढऱ्या रंगाने चितारलेली काळी-तांबडी भांडी वापरत असत. विविध मौल्यवान दगडांनी बनवलेल्या मणींवरुन येथील मणीकारीचे कौशल्य समजतेच शिवाय यांची आभूषणांची आवडही कळते. या संस्कृतीने अगदी माळव्यापर्यंतचा प्रदेश प्रभावित केलेला होता.

हडप्पा संस्कृतीच्या समकालीन, **माळव्यामध्ये** आपल्याला प्रथम कायथा संस्कृती दिसून येते. हिच्यावर हडप्पा संस्कृतीचा प्रभाव दिसून येतो. येथे पुढे राजस्थानमधून आहाड संस्कृतीचे लोक आले. पुढे याठिकाणी माळवा संस्कृती विकसित झाली. कायथा, महेश्वर, नावडाटोली, ऐरण ही येथील संस्कृतीची महत्वाची पुरातत्वीय स्थळे होत. कापसाची उत्तम काळी जमिन आणि बारमाही वाहणाऱ्या नद्यांतून होणारा पाण्याचा पुरवठा यामुळे याठिकाणी शेती प्रचंड विकसित झालेली दिसून येते. कायथा संस्कृतीच्या काळामध्ये याठिकाणी लोक कुडांच्या घरांमध्ये रहात असत. हे लोक शेती करीत असत. तसेच पशुपालन, शिकार, मासेमारी हे ही पर्याय स्विकारत. ते कारागीरी आणि विनिमयात ही गुंतलेले होते. त्यांनी तांब्याच्या कारागिरीत कौशल्य मिळवलेले होते. हे आपल्याला बाणाग्रं, तलवारी, छिन्नी, कुऱ्हाडी; तसेच मणी, अंगठ्या, बांगड्यावरुन कळून येते. पूर्वीप्रमाणे दगडाचीही हत्यारे ते बनवत असत, जसे, रिंगस्टोन, पाती, सुरे, वेधण्या इ. हे उत्तम मणीकारही होते. १५० च्या वर मौल्यवान दगडांचे मणी गुंफलेला कंठहार याठिकाणी सापडलेला आहे. यावरुन दिसते की यांना अलंकार आणि आभूषणांचा छंद होता. पुढे आहाड संस्कृतीने यांना भाजीव मातीचे पुतळे आणि खेळण्या बनविण्याची तसेच बैल पूजनाची देणगी दिली. वास्तविक आहाड लोक हे तांब्यामध्ये हत्यारे बनवणारे. मात्र, याठिकाणी तांबे मिळत नसल्याने, दगडी पात्यांची हत्यारे ते बनवू लागले. पुढे माळवा संस्कृतीच्या काळामध्ये या प्रदेशात विकासावस्था निर्माण झाली. आता ऐरणसारखी मोठी स्थळं मातीच्या तटबंदीने सुरक्षित करण्यात आली. येथील लोक आयताकृती आणि गोलाकार घरांमध्ये रहात असत. घरं कुडाची असून, जमिन व्यवस्थित चोपलेली आणि छत गवताने शाकारलेले असे. या काळानंतर हे लोक पुढे महाराष्ट्रात गेल्याचे दिसून येते.

**महाराष्ट्रातील** ताम्रपाषाणयुगाचे अवशेष हे तापी, गोदावरी, भीमा नदींच्या खोऱ्यात मिळालेले आहेत.

यामध्ये प्रकाश, दायमाबाद, इनामगाव ही मोठी स्थळं तर जोर्वे, नाशिक, नेवासा, कवठे, वाळकी, सोनगाव, चांदोली अशी छोटी स्थळं आपल्याला दिसून येतात. अलीकडे सांगली जिल्ह्यात सिध्देवाडी येथेही या काळाचे अवशेष मिळालेले आहेत. १९८० च्या दशकात, ढवळीकरांच्या नेतृत्वाखाली, डेक्कन कॉलेजने इनामगाव (जि. अहमदनगर) याठिकाणी एक महत्वाचे उत्खनन केले. यातून महाराष्ट्रातील ताम्रपाषाण युगावर सविस्तर प्रकाश पडलेला दिसून येतो.

महाराष्ट्रातील ताम्रपाषाण युगाचे एकूण पाच उपकालखंड पडतात, सावळदा संस्कृती, उत्तर हडप्पा संस्कृती, माळवा संस्कृती, जोर्वे संस्कृती आणि उत्तर जोर्वे संस्कृती.

**सावळदा संस्कृती** (इसवीसन पूर्व २५००-२२००) ही मुख्यत्वे तापी-गोदावरी नदीच्या खोऱ्यात उदयास आली आणि विकसित झाली. दायमाबाद हे या काळातील एक विकसित खेडे होय. येथील लोक मातीच्या विटांनी बनवलेल्या चतुष्कोनी घरात रहात. उत्तम चोपलेली जमिन आणि गवताने शाकारलेले छत अशा स्वरुपाचीही घरं असत. एकत्र कुटुंब पध्दती असल्याने, या घरांमध्ये एकापेक्षा अधिक खोल्या आढळून येतात. या काळातील तुलनेने साध्या वसाहतीतील लोक मात्र खड्ड्यातील छोट्या झोपड्यांमध्ये रहात अस. अर्थात अशा झोपड्या या फक्त साठवणूकीसाठी असून, खरा वावर हा अंगणातच असे. या काळातील लोक स्थिर शेतकरी असून; गहू, बार्ली, वाटाणा, विविध डाळी पिकवत असत. हे लोक उत्तम कारागीरही होते. काळ्या रंगाने चितारलेली लाल मडकी हे बनवत असत. या मडक्यावर विविध चित्रे, नक्षी काढलेली असे. हे दगडाचे पाटा-वरंवटा बनवत. तांबे/कास्याच्या अंगठ्या, कार्नेलियन, अगेटच्या मण्या इ. आभूषणं ते बनवत. मात्र हरणांची हाडं वापरुन, त्यांनी मोठ्या प्रमाणावर हाडांच्या हत्यारांचा वापर केलेला दिसून येतो. हे लोक, हाडांची बाणाग्र असलेले बाण वापरुन शिकारही करीत असत. तसेच मासेमारीही करीत असत. यांच्या मडक्यांवर, मासे आणि मत्स्य बाणांची चित्रं आढळतात.

**पुढे उत्तर हडप्पा संस्कृतीचे लोक** (इसवीसन पूर्व २२००-२०००), गुजरात मार्गे याठिकाणी आले. यांनी नियोजनबध्द वसाहतीची सुरुवात केली. आपल्या वसाहतींना मातीची तटबंदी बांधून सुरक्षित केले. तसेच पुराच्या पाण्यापासून वाचण्यासाठी नदीला बांधही घातला. हे विविध खोल्या असलेली, मोठी घरे बांधून रहात असत. यातील काही खोल्या फक्त धान्य साठविण्यासाठी, काही जनावरांचा गोठा म्हणून उपयोगी आणली जात असत. यातील काही मोठ्या कुटुंबानी आपल्या सुरक्षिततेसाठी स्वतंत्र तटबंदीही बांधलेली होती. हे उत्तम शेतकरी होतेच. हे लाकडी नांगराच्या मदतीने गहू, बार्ली, मसूर, वाटाणे, तीळ, भाजीपाला, फळे पिकवीत असत. शेती बरोबरच पशुपालन, शिकार, मासेमारी हे विविध पर्यायही हाताळले जात. हे गुरांबरोबरच शेळ्या-मेंढ्यांचेही पालन करीत. तर शिकारीसाठी हरीण, नीलगाय, ससे हे विशेष आवडीचे प्राणी होत. शिवाय यांना कारागीरीचेही उत्तम ज्ञान होते. त्यामुळेच, या काळातील दायमाबाद येथून कांस्यांची सारथ्यासह बैलांचा रथ, हत्ती, रानगवा, गेंडा अशी उत्कृष्ट शिल्पं मिळालेली आहेत. या लोकांची दफनं वस्तीपासून दूर असत. यांची वसाहतही मुख्यत्वे तापी नदीच्या खोऱ्यातच राहिली.

त्यानंतर, **माळवा संस्कृतीचे लोक** या खोऱ्यांमध्ये आले (इसवी सन पूर्व १७००-१४००). हे अगदी भीमा

नदीच्या खोऱ्यापर्यंत महाराष्ट्रात पसरलेले होते. या संस्कृतीमध्ये महाराष्ट्राने समृध्दी पाहिली. येथील शेतकरी मातीच्या विटांनी बनवलेल्या मोठ्या आयताकृती घरांमध्ये रहात असत. यांची घरं ही नियोजनबध्द होती. शेती हे उपजीविकेचे प्रमुख साधन. त्यामध्ये गहू, बार्ली, वाटाणा, तीळ इ. वैविध्यपूर्ण पीक पिकवित. शेती बरोबरच यांची कारागिरीही वैशिष्ट्यपूर्ण अशी होती. हे विविध प्रकारची लाल मडकी बनवत. त्यांवर काळ्या रंगात विविध चित्रे काढीत असत. यांच्या चित्रांमध्ये भौमितिक आकृत्यांबरोबरच, विविध प्राण्यांचीही चित्रं आढळतात. जसे, हरीण, बैल, कुत्रा, सुसर, सरडे इ. मांसाहारासाठी हरणाचे मांस हे अधिक पसंतीचे त्यात त्याची हाडंही टणक. यांचा वापर शस्त्रं तयार करण्यासाठी होतो. त्यामुळे याच्या मडक्यांवर हरणांची चित्रे मोठ्या प्रमाणावर आढळतात. एका मडक्यावर, एका पुरुषा समोर विविध प्राणी नम्रपणे उभे आहेत असे एक चित्र आहे. यावरुन, यांच्या धार्मिक जीवनात 'पशुपती' चे पूजन होत असावे असा एक संकेत मिळतो. यांच्या मुख्य वसाहतींमध्ये प्रकाश, दायमाबाद आणि इनामगाव या स्थळांचा समावेश होतो.

पुढे, मागील माळवा संस्कृती आणि उत्तर कर्नाटकातील नवाश्मयुगीन-ताम्रपाषाणयुगीन संस्कृतींच्या सहसंबंधातून, **जोर्वे संस्कृतीचा उदय** झाला (इसवी सन पूर्व १४००-१२००). या संस्कृतीतील लोक एकत्र कुटुंब पध्दतीत रहात असत. यांची नियोजनबध्द अशी मोठमोठी आयताकृती घरे होती. याबरोबरच चौकोनी आणि गोलाकार अशी घरंही बांधली जात. यांच्या घरांमध्ये एकापेक्षा अधिक खोल्या दिसून येतात. यातील स्वयंपाकघरामध्ये चुलीबरोबरच, जमिनीमध्ये धान्याचे बळद असे तर साठपासाठी कणगीही असे. घराच्या जमिनीबरोबरच, अंगणसुध्दा अगदी चोपून तयार केलेले असे. या अंगणामध्ये ही बळद असे तसेच मोठे चुलाणे असे. अशा घरांच्या ओळी असत आणि या ओळींमधून जाणारी वाटही होती.

साधारणत: वसाहतीचा मुख्य हा मध्यभागी रहात असे. या मुख्याचे घरही मोठे आणि नियोजनबध्द असे होते. याच्या घराजवळच एक धान्याचे कोठारही होते. म्हणजेच या मुख्याचे सर्व वसाहतीच्या अर्थकारणावर एकप्रकारे नियंत्रण होते. म्हणूनच याचे दफनही, इतरांच्या दफनापेक्षा वेगळे केलेले दिसून येते. या मुख्याच्या घराजवळच सुखवस्तू लोक राहताना दिसतात. हे लोक उत्तम प्रथिनयुक्त आहार घेत असत. यांच्यापासून काही दूर, बाकींच्या लोकांची घरं, तुलनने निकृष्ठ स्वरुपाची दिसून येतात. यामध्ये कुंभाराचे, मणीकाराची, खाटकाची अशी घरं दिसून येतात.

या काळातील लोक मुख्यत्वे शेती करीत. जलसिंचनासाठी, इनामगावमधील लोकांनी; घोड नदीचे अतिरिक्त पाणी, कालव्याद्वारे एका तलावात साठवून ठेवलेले होते. त्याला समांतर असा दगडमातीचा बांधही घातलेला होता. पाण्याच्या या बारमाही सोयीमुळे, हे लोक रब्बी आणि खरिफ अशा दोन्ही हंगामात शेती करीत असत. येथे गहू, ज्वारी, बाजरी, सातू, वटाणे, कुळीथ इ. पीके घेतली जात. काही वेळा, मुख्य वसाहतीपासून सुपीक जमिन फार दूर असेल तर अशावेळी या लोकांनी, त्याठिकाणी हंगामी वस्त्याही उभ्या केलेल्या आहेत. जसे इनामगावचे लोक संगमावरील वाळकीला येत असत. बैलाच्या हाडाचा नांगर वापरुन हे शेती करीत असत. थोडक्यात या काळात शेतीतून भरघोस उत्पादन काढले जाऊ लागले.

शेतीबरोबरच गुरे, शेळ्या-मेंढ्या, डुकरं, कोंबड्यांचे पालन केले जाई. तसेच शिकार आणि मासेमारी हे

पर्यायही होतेच. शेतीच्या विकासामुळे, कारागीरी आणि विनिमयही विकसित झालेला दिसतो. मुख्यत्वे साधने/हत्यारेही गारेच्या दगडांची केली जात. 'मडकी'ना जीवन शैलीतील महत्वाचे साधन असल्याने, कुंभारकला अतिशय विकसित झालेली दिसते. दायमाबादमध्ये कुंभाराच्या मोठ्या भट्टया मिळालेल्या आहेत. लहान वाटग्यापासून, साठपाच्या मोठ्या रांजणापर्यंत, या मडक्यांमध्ये वैविध्य येते. काळ्या रंगामध्ये चितारलेल्या चित्रांमध्ये, पारंपारिक भौमितिक आकृत्यांप्रमाणे, मानवाच्या अनुभवविश्वातील वनस्पती आणि प्राण्यांचाही समावेश होतो. यांच्यात तांब्यात काम करणारे तांबट होते, सोनार होते, मणीकार होते. तसेच चुना तयार करणारेही होते. हे लोक तांब्यामध्ये कुऱ्हाडी, छिन्नी, गळ, अलंकार, मणी तयार करण्यासाठी गिरमिटे, सोनारकामाचे चिमटे तयार करीत असत. तसेच सोन्याचे मणी, कर्णफुलं अशी आभूषणंही तयार करीत. यांचे कोकण, सौराष्ट्र, कर्नाटक इ. भागांशी सहसंबंध होते. कडवे वाल, सागरी मासे कोकणातून, सौराष्ट्रातून शंख तर कर्नाटकातून सोने येत असे.

'मातृदेवतेला' यांच्या धार्मिक जीवनात महत्वाचे स्थान होते. अशा शिरोविहीन मातृदेवतेच्या मूर्ती इनामगावामध्ये मिळालेल्या आहेत. त्याचप्रमाणे 'बैला'चेही पूजन केले जात असावे. ही परंपरा अगदी हडप्पा संस्कृतीपासून दिसते. दफनांचा विचार करता, या काळातील मानवावर कर्नाटकातील नवाश्मयुगीन-ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचा प्रभाव दिसून येतो. यांचा मरणोत्तरजीवनावर विश्वास असून, मृतांना घरांमध्ये अथवा घराजवळच पुरले जात असे. मृत मुलांचे ते, तोंडे जुळविलेल्या भांड्यामध्ये दफन करीत. तर प्रौढ मृतांचे, एका खड्डयात दक्षिणेकडे पाय करुन, उताणे ठेवून दफन केले जात असे. इनामगावमध्ये अशा प्रौढ मृतांचे पाय घोट्यापासून तोडलेले आहेत. मात्र येथील मुखियाच्या दफनात वेगळेपणा दिसून येतो. याला एका मोठ्या रांजणात ध्यानस्थ स्वरुपात बसवलेले आहे. तसेच याचे पायही तोडलेले नाहीत. अशा मृतांबरोबरच, त्याचा पुढील प्रवास सुखकर व्हावा यासाठी विविध भांड्यामध्ये अन्न, पाणी, विविध वस्तूही ठेवल्या जात.

पुढे महाराष्ट्रातील हवामान हे शेतीसाठी प्रतिकूल झाले; पाऊस कमी झाला आणि हवामान हे अधिक कोरडे झाले. स्वाभाविकच यांची आर्थिक परिस्थती ढासळली. लोकसंख्याही कमी झाली. या काळाला **उत्तरजोर्वे कालखंड** असे म्हणतात (इ.स.पू. १२००-९००). इनामगावसारख्या ठिकाणी आपल्याला आता छोट्या छोट्या झोपड्या दिसून येतात. यांच्यामध्ये कोणत्याही स्वरुपाची नियोजनबध्दता दिसून येत नाही. झोपड्याही हंगामी स्वरुपाच्या असतात. यांच्या भांड्यांचा, हत्यारांचा दर्जाही खालावतो. अशा परिस्थितीत एकाजागी स्थिर करुन शेती करीत राहणे या लोकांसाठी अशक्य बनले. ते पशुपालनाकडे वळले. बैल, गायी सारख्या मोठ्या जनावरांना पाणी जास्त लागत असल्याने, यांनी, शेळ्या-मेंढ्याचे पालन करुन, निमभटकी जीवनशैली स्विकारली. त्यांच्या आहारामध्येही शेळ्या-मेंढ्यांचे प्रमाण अधिक आले. तसेच शिकार, मासेमारीचे प्रमाणही वाढले. या काळात हरणांच्या शिकारीचे प्रमाणही वाढलेले दिसते. मात्र अशाही परिस्थितीत धार्मिक परंपराचे पालन पूर्वीप्रमाणेच केले जात असे. अर्थात, स्थैर्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी शिल्लक न राहिल्याने, या काळात, हे लोक अन्नाच्या शोधात भटकू लागले. यावेळी त्यांचा महाशिलायुगीन लोकांशी संपर्क येऊ लागतो.

**उत्तर कर्नाटकातील** ताम्रपाषाण युगामध्ये, नवाश्मयुगाच्याही ठळक परंपरा दिसतात. या लोकांचा महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीशी जवळचा संबंध होता. मस्की, पिकलीहाळ, ब्रह्मगिरी, संगनकल्लू, हल्लूर, टेक्कलकोटा

ही या काळातील काही महत्वाची स्थळे होत. हे लोक कुडाच्या गोलाकार आणि शंक्वाकृती झोपड्यांमध्ये रहात असत. येथील कुंभार वेगाने फिरणाऱ्या चाकावर उत्कृष्ठ भांडी बनवित असत. हे दगडी पात्यांची हत्यारे वापरीत. तसेच हे तांब्याची विविध हत्यारे वापरीत असत, जसे, कुऱ्हाड, छिन्नी इ. यांना अलंकार आणि आभूषणांचाही छंद होता. यांचा मरणोत्तर जीवनावर विश्वास होता. हे आपल्या घरांच्याखाली किंवा जवळच मृतांचे दफन करीत असत. मृत मुलांचे मडकी जोडून तर मृत प्रौढांचे मडकी जोडून किंवा आडवे झोपवून दफन केले जात असे. मृतांबरोबर विविधवस्तू आणि अन्नही ठेवले जात असे.

**● स्वयंअध्ययन प्रश्न–२**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. 'निओलिथिक' हा शब्दप्रयोग .............. यांनी सर्वप्रथम वापरला.

अ. मार्शल ब. कार्लाईल क. बॅबिंग्टन ड. लुबॉक

२. 'राखेचे ढिगारे'हे........... या काळाचे ठळक लक्षण आहे.

अ. पुराश्मयुग ब. मध्याश्मयुग क. नवाश्मयुग ड. ताम्रपाषाण युग

३. ............ हे एक प्रसिध्द नवाश्मयुगीन ठिकाण होय.

अ. बूर्झाहोम ब.नेवासे क. बागोर ड. धोलावीरा

४. ......... ही महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृती होय.

अ. आहाड ब. कायथा क. रंगपूर ड. जोर्वे

५. ........... हे महाराष्ट्रातील एक महत्वाचे ताम्रपाषाणयुगीन स्थळ होय.

अ. इनामगाव ब. कोल्हापूर क. नागपूर ड. रत्नागिरी

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. शेती आणि पशुपालनाचा शोध कोणत्या काळात लागला?

२. बूर्झाहोम येथील नवाश्मयुगीन मानव कोठे रहात असे?

३. ताम्रपाषाणयुगीन राजस्थान आणि मध्यप्रदेशमध्ये कोणत्या संस्कृती होत्या?

४. महाराष्ट्रातील ताम्रपाषाण युगाचे विविध टप्पे सांगा.

५. इनामगावचे उत्खनन कोणत्या संस्थेने आणि कोणाच्या नेतृत्वाखाली केले गेले?

## १.२.३ विभाग ३: पहिले नागरीकरणः हडप्पा संस्कृती :

### अ. हडप्पा संस्कृतीचा शोध व तिला हडप्पा का म्हणतात?

अश्मयुगाच्या शेवटच्या टप्प्यात; म्हणजे नवाश्मयुगीन क्रांतीनंतर भारताने ताम्रपाषाण युगात प्रवेश केला. यास 'इतिहास पूर्व काळ' असेही म्हणतात. साधारण १८५३ व १८५६ या काळात कनिंगहॅमने हडप्पा या ठिकाणी प्राथमिक उत्खनन केल्याने तसेच लाहोर-मुलतान रेल्वेमार्गासाठी वीटा आणताना येथे एका नव्या सभ्यतेचा अंदाज आलेला होता. मात्र त्यांना या संस्कृतीचा कालर्णिय करता आलेला नव्हता. पुढे सर जॉन मार्शलने, एम.एस.वत्स बरोबर पुरातत्व विभागामार्फत विस्तृत प्रमाणावर उत्खनन करुन या सभ्यतेचा व्यवस्थित शोध लावला (१९२१). तसेच, पुढे दयाराम साहनी यांनी हडप्पा येथे व राखालदास बॅनर्जी यानी मोहेनजोदडो येथे उत्खनन करुन हडप्पासंस्कृतीस आंतराराष्ट्रीय महत्व प्राप्त करुन दिले. भारताच्या स्वातंत्र्यानंतर मॉर्टिमर व्हिलर, ग्रेगरीपॉसेल, बी.बी.लाल, ए. घोष, राव, बीश्त इ. संशोधकासह; इतर संशोधकांनी किमान २०० ते १५०० स्थळांचा शोध लावला. यातील कालीबंगा (राजस्थान), राखीगढी (हरियाणा), लोथल (गुजरात) तसेच धोलावीरा (गुजरात) या नगरांचा शोध आणि तेथील उत्खननं महत्वाची ठरली.

भारताचे पहिले नागरीकरण घडवून आणणारी ही सभ्यता मुख्यत्वे सिंधू नदीच्या खोऱ्यात विकसित झालेली असल्याने हिला 'सिंधु संस्कृती' असे म्हणले जात होते. पुढे, या सभ्यतेची अनेक स्थळं सरस्वती नदीच्या खोऱ्यात मिळाली. यातूनच, स्थळांच्या वितरणावरुन आणि काही मतांच्या अभिनेवशामुळे हिला 'सिंधु-सरस्वती' आणि 'सरस्वती संस्कृती' असेही म्हंटले जाऊ लागले. मात्र पुरातत्वशास्त्रज्ञांच्या मते, या संस्कृतीच्या पहिल्यावाहिल्या खुणा हडप्पा याठिकाणी मिळालेल्या असल्याने, यास 'हडप्पा संस्कृती' असेच म्हणावे लागते. हे नाव बरेच व्यापक आणि वर्तमाकालीन विविध वादापासून निरपेक्ष असल्याने, हेच नाव सध्या सर्वत्र स्विकारलेले आहे.

### ब. हडप्पा संस्कृतीचा कालक्रम :

अशा या हडप्पा संस्कृतीचा उदयही काही एका रात्रीत घडून आलेली घटना नव्हती. साध्या खेड्यापासून ते विकसित प्रचंड शहरापर्यंत आणि पुन्हा ऱ्हासापर्यंत, जवळ जवळ अडीच-तीन हजार वर्षे प्रवास केलेली ही एक सांस्कृतिक प्रक्रिया होती. ही प्रक्रिया खालील टप्प्यातून उलगडताना दिसतेः

(नवाश्मयुग: इ.स.पू. ८००० ते ४०००), पूर्व हडप्पा काळ- इ.स.पू. ४००० ते २६००, विकसित हडप्पा काळ-इ.स.पू. २६०० ते १८००, उत्तर-हडप्पा काळ-इ.स.पू. १८०० पासून पुढे.

'हडप्पा संस्कृती'ची, जी आपण वैशिष्ट्ये पाहणार आहोत ती 'विकसित हडप्पा काळामध्ये' मोडतात.

### क. हडप्पा संस्कृतीची वैशिष्ट्ये :

#### अ) विस्तार :

आतापर्यंत हडप्पा संस्कृतीची जवळ-जवळ २००० स्थळं सापडलेली आहेत. मात्र यातील मोजक्या ठिकाणांचेच उत्खनन झालेले आहे. मुख्यत्वे सिंधु व सरस्वती नद्यांच्या खोऱ्यातही संस्कृती विकसित झालेली

असून, सर्वसाधारणत: तिचा विस्तार उत्तरेस सरायखोला (इशान्य पाकिस्तान) पासून ते दक्षिणेस दायमाबाद (महाराष्ट्र) पर्यंत तर पश्चिमेस मुंडिगाक, शोर्तुघाई (अफगाणिस्तान) पासून अथवा सुत्काजेनदोर पासून (मकरान किनारा, नैऋत्य पाकिस्तान) पूर्वेस आलमगीरपूर (वायव्यप्रदेश) पर्यंत जवळज्वळ १५-२० लाख चौ. कि.मी. इतके क्षेत्र या सभ्यतेने व्यापलेले आहे. तर विशेष करुन भारताचा विचार करता, काश्मीर (मांडा), पंजाब (रुपर), हरीयाणा (बनावली, राखीगढी), उत्तर प्रदेश (आलमगीरपूर), राजस्थान (कालीबंगा), गुजरात (लोथल, धोलावीरा, भगतराव), महाराष्ट्र (दायमाबाद) इ. प्रदेशात, म्हणजे एकंदर १२,९९,६०० चौ.कि.मी. (दक्षिणोत्तर लांबी ११०० कि.मी. तर पश्चिमोत्तर लांबी १५५० कि.मी.) हिचा विस्तार आढळून येतो. सर्वसाधारणत: ही संस्कृती पूर्व अफगाणिस्तान, पूर्व पाकिस्तान आणि पश्चिम/वायव्य भारत या विस्तृत क्षेत्रात पसरलेली असून; डोंगराळ भाग, मैदानी भाग, नद्यांची खोरी, वाळवंट, समुद्रकिनारा इ. सर्व प्राकृतिक वैशिष्ट्यांत वसलेली आहेत.

या संस्कृतीचा विस्तार हा प्रचंड जरी असला तरी तिचा मुख्य गाभा हा भारताच्या वायव्य/पश्चिम भागात प्रामुख्याने दिसून येतो. बऱ्याचवेळा व्यापारी संबंधातून आणि कच्चा माल मिळविण्याच्या उद्देशाने दूरवर वसाहती निर्माण झालेल्या दिसून येतात.

**ब) नगररचना :**

हडप्पा संस्कृतीची वैशिष्ट्यपूर्ण नगरे आपल्याला मिळतात. हजारो वर्षांपूर्वीची, अतिशय अत्याधुनिक अशी ही नगरे पाहून आपण आश्चर्यचकित होतो.

ही नगरे एकतर नदींच्या काठावर आहेत. किंवा, खनिज संपत्तीच्या जवळ वसवलेली आहेत. या नगरांची अतिशय शिस्तबध्द आणि व्यवस्थित अशी नगररचना असे. त्याचप्रमाणे त्यानगरांमध्ये लक्षणीय असे सार्वजनिक स्थापत्य सुध्दा आपल्याला आढळते.

या नगरांचे बालेकिल्ल्याचा भाग (Citadel) व लोकवस्तीचा भाग (Lower Twon ) असे दोन भाग असत. कालिबंगा या ठिकाणी मात्र काही घरे नगरांबाहेरही आढळून आलेली आहेत. तर, धोलावीरामध्ये लोकवस्तीचा आणखीन एक भाग, क्रिडांगण आणि प्रशासकीय-निवासी संकुलही दिसून येते.

ही नगरे व्यवस्थित तटबंदीने संरक्षितही केलेली असत. काही ठिकाणी सर्व वसाहतीला एक सामायिक स्वरुपाची तटबंदी आहे. तर काही ठिकाणी, या सामायिक तटबंदीसह, प्रत्येक विभागाला स्वतंत्र तटबंदी आहे. तर काही ठिकाणी फक्त बालेकिल्ल्याला तटबंदी आहे. ही तटबंदी मातीच्या विटांनी बनवलेली असे. तसेच अधिक मजबूतीसाठी; तटबंदीस, बाहेरुन भाजक्या विटांच्या दुय्यम तटाने आधार दिलेला आहे. या तटबंदीच्या कोपऱ्यांवर तसेच विविध ठिकाणी बुरुजही (भाजीव विटांचे) बांधलेले आहेत, या बालेकिल्ल्यात प्रवेश करण्यासाठी प्रवेशद्वारं असत.

**घरे :** ही घरे साधारणत: लोकवस्तीच्या भागात दिसून येतात. ही घरे भाजीव वीटांची बांधलेली असत. ४:२:१ असे विटांचे प्रमाण असे. या घरांची 'एक चौकोनी अंगण आणि त्याच्या चारही बाजूला खोल्या' अशी रचना दिसून येते. अगदी अलीकडेपर्यंत भारतात या रचनेचे वाडे बांधले गेलेले दिसून येतात. या घरांची

जमिन मातीच्या विटांनी तयार केलेली असे. तर काही ठिकाणी फरश्याही बसवलेल्या होत्या. तसेच गुरांना चारा खाण्यासाठी व पाणी पिण्यासाठी अंगणात मातीच्या विटांचे एक मोठे भांडे व जमिनीत एक मडके पुरलेले असे.

सर्वसाधारणत: ही घरं एकमजली आहेत. काही दुमजली घरं सुध्दा दिसून येतात. काही घरांमध्ये तर जवळ-जवळ १२ खोल्या दिसून येतात. याहीपेक्षा मोठी घरे आढळलेली असून, यामध्ये स्वयंपाकघर तसेच शौचालयांची सोय करण्यात आलेली होती. काही धनाढ्यांच्या घरांमध्ये स्वतंत्र जलतरण तलावाचीही सोय होती असे दिसते. पाणी पुरवठ्यासाठी घरांमध्ये विहिरीची सोय केलेली दिसते. येथे सांडपाणी वाहून जाण्यासाठी उत्तम व्यवस्था असून, गटारे विटांनी बांधलेली असत. या घरांचे दरवाजे अरुंद गल्ल्यांमध्ये उघडत असत. काही मोठ्या घरांचा अंगणात घडणारा दरवाजा हा बैलगाडी जाण्याइतका मोठा केलेला दिसून येतो.

या भागातील रस्ते उत्तर-दक्षिण जाणारे असून, एकमेकांना व्यवस्थित काटकोनात छेदत असत. मोहेनजोदडो येथील मोठा रस्ता हा कमीत कमी १० फूट रुंद आहे.या घरांबरोबरच, लोकवस्तीच्या भागात; घरांबरोबरच, कारागीरांच्या कार्यशाळा आणि दुकानेही होती, जसे, कुंभारांच्या भट्टया, रंगाऱ्यांचे कुंड, धातुमध्ये काम करणाऱ्यांची, शंख-शिंपल्यांचे अलंकार करणाऱ्यांची तसेच मणीकारांची.

नगररचनेचा विचार करता धोलावीराचा विशेष करुन आपल्याला विचार करणे आवश्यक आहे. धोलावीरा (ता. बछाऊ, जि. कच्छ) हे गुजरातमधील कच्छच्या वाळवंटातील 'खादिर' नावाच्या बेटावर बसलेले आहे. येथील नगररचना मात्र अतिशय विकसित अशा स्वरुपाची दिसून येते. याठिकाणी, बालेकिल्ला आणि लोकवस्तीचा भाग आहेच. शिवाय, वाढीव लोकसंख्येमुळे येथे लोकवस्तीचा आणखीा एक भाग निर्माण केलेला आहे. तसेच बालेकिल्ल्याजवळ एक स्वतंत्र तटबंदीचे 'निवासी-कार्यालयीन संकुल' उभारण्यात आलेले होते. येथे मुख्यत्वे व्यापारी प्रशासनाचे कार्यालय असावे. त्याचबरोबर या ठिकाणी एक 'खुले सभागृह' निर्माण करण्यात आलेले होते. या नगराला एक सामायिक तटबंदी होतीच, शिवाय, प्रत्येक विभागाला, त्याची त्याची स्वतंत्र तटबंदी होती. हे नगर आयताकृती आहे. या नगराच्या तटबंदीचा पाया जवळ जवळ ११ मीटरचा होता. अधिक मजबूतीसाठी तटाला ५ मीटर रुंद मातीच्या विटांचा आधारही दिलेला होता. या तटाला चुन्याचा गिलावा देण्यात आला. मातीच्या विटा टिकून रहाव्यात तसेच कच्छचा उन्हाळा सुसह्य व्हावा यासाठी येथील घरांनाही चुन्याचा गिलावा देण्यात आलेला होता. या नगराच्या प्रवेशद्वारासमोर, बहुधा नगराच्या नावाचे लाकडी फलकही बसवण्यात आलेले होते. या फलकावर खाचा पाडून त्यामध्ये स्टेटाईटची १० अक्षरे (३३ सेमी X २७ सेमी) बसवण्यात आलेली होती.

**सांडपाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था :**

सांडपाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था असणे हे कोणत्याही नगराचे प्रधान वैशिष्ट्य असते. आजसुध्दा अनेक शहरं या समस्येनी त्रस्त आहेत. असे असताना, हजारो वर्षापूर्वी हडप्पा संस्कृतीतील नगरांमध्येही एक अद्‌भूत व्यवस्था होती असे दिसून येते.

या नगरांमध्ये घरटी स्नानगृह दिसून येते. यातील सांडपाणी गटारांद्वारे बाहेर काढले जात असे. अशी प्रत्येक घरांतून निघणारी गटारे पुढे रुंद अशा एका सामाईक गटारीला जोडलेली होती. पुढे हे सामाईक गटार नगराबाहेर जात असे. तेथे हे सांडपाणी डंप केले जाई.

अशी ही व्यवस्था पूर्णपणे भूमिगत होती. भाजीव विटांनी ती बांधून घेतलेली होती. तसेच, या गटारींवर टप्प्याटप्प्यावर चेंबर्स असत. ही पुरुषभर मोठी असून, गटारींची नियमित स्वच्छता करण्यासाठी यांचा उपयोग होत असे.

**सार्वजनिक स्थापत्य:** कोणत्याही नगराचे सार्वजनिक स्थापत्य हे एक महत्वाचे वैशिष्ट्य असते. यामध्ये, सार्वजनिक उपयोगाच्या विविध इमारतींचा समावेश होतो. खालीलप्रमाणे:

**महास्नानगृह :**

मोहेनजोदडोच्या बालेकिल्ल्यातील महास्नानगृह ६० X ३६ मी. असून, मध्यभागी पोहण्यासाठी १२ X ७ मीटरचा चा तलाव (तीन मीटर खोली) होता. हे भाजीव विटांनी बांधलेले आहे. याचा तळ २ ते ३ मी. रुंद असून, पाणी झिरपू नये यासाठी आतील बाजूने चुन्याचा गिलावा केलेला होता. या तलावात उतरण्यासाठी पायऱ्या असून, कपडे बदलण्यासाठी तसेच पूजा विधी करण्यासाठी भोवताली खोल्याही आहेत. यात सतत पाणी पुरवठा व्हावा यासाठी जवळच एक तळे आहे तर सांडपाण्यासाठी भूमिगत व्यवस्था आहे.

**धान्याचे कोठार :**

हडप्पा येथे रावी नदीच्या दक्षिणेस व खळ्याजवळ धान्यकोठार आहे. हे कोठार एकूण ५५ X ३ मीटरच्या क्षेत्रात तयार केलेले आहे. यामध्ये कोठारांच्या एकूण दोन रांगा असून, प्रत्येक रांगात सहा कोठारे (प्रत्येकी १५ह्व६ मी.) आहेत. या कोठारांचा पाया भाजीव वीटांचा असून, कोंदट हवा जाण्यासाठी छिद्रं तयार केलेली आहेत. जवळच कामगारांच्या चाळी आहेत. आणि त्याजवळ खळे आहे. हे खळे म्हणजे धान्य कुटण्यासाठी उंचवटे तयार केलेले आहेत. एकूण पाच पूर्व-पश्चिम रांगात हे उंचवटे असून, प्रत्येक रांगात सहा उंचवटे आहेत. हे उंचवटे (३.५ मी व्यासाचे) भाजीव विटांच्या वेटोळ्यांनी वेढलेले असून, त्यामुळे मध्यभागी खोलगट भाग तयार झालेला आहे. थोडक्यात, धान्य हे खळ्यावर साफ केले जात असावे. पुढे, असे साफ केलेले धान्य कोठारात ठेवले जात असावे. आणि, पुढे रावी नदीतून व्यापाराला जात असावे. आणि हे काम करणारे कामगार चाळीत रहात असावेत.

तसेच, मोहेनजोदडो येथे पश्चिमेस धान्याचे कोठार (५५ह्व३७ मी) एका जोत्यावर, भाजीव विटांनी बांधलेले आहे. यावर बहुधा लाकडाचे बांधकाम असावे. यामध्ये, तीन रांगात, प्रत्येकी नऊ अशा प्रकारे २७ कोठ्या आहेत. प्रत्येक कोठ्यांच्या मधून १ मी. रुंद अशी हवा खेळती राहण्यासाठी मोकळी जागा आहे. या कोठाराच्या उत्तरेस धान्य उतरवण्यासाठी एक उंचवटाही तयार केलेला आहे.

तसेच, लोथल येथे बालेकिल्ल्याच्या भागात, धक्क्याजवळच एक मालाचे कोठार आहे. याठिकाणी एका

विटांच्या उंचवट्यावर (४ फूट उंच) चार रांगात, प्रत्येकी तीन अशा १२ आयताकृती मातींच्या विटांच्या कोठ्या आहेत (क्षेत्र: १७ x १४ मी.) तर हवा खेळती राहण्यासाठी प्रत्येक कोठ्यांच्यामध्ये मोकळी जागाही ठेवलेली आहे.

**राजमहाल :**

मोहेनजोदडो येथे, महास्नानगृहाजवळ राजमहालाची एक लांब (२३० x ७८ फूट) इमारत आहे. या इमारतीला तीन व्हरांडे असून, समोरच ३३ चौरस फुटाचे अंगण पसरलेले आहे. तर मुंडिगाक येथे एक खांबांची रांग असलेला मोठा महालही सापडलेला आहे. हे अवशेष राजमहालासारख्या इमारतीकडे निर्देश करतात.

**सभागृह :**

मोहेनजोदडो येथील सभागृह आठ मीटर लांबी रुंदीचे असून, हे चार रांगात, प्रत्येकी पाच अशा २० खांबांनी बांधलेले आहे. हे सभागृह एकूण ७५० चौ.मी. इतक्या जागेत बांधलेले आहे. असेच एक धोलावीरा येथे, बालेकिल्ल्याला जोडूनच 'खुले सभागृह' आढळते.

**कामगारांच्या चाळी :**

हडप्पा येथे बालेकिल्याच्या वायव्येस कामगारांच्या चाळी असून त्याभोवती छोटी तटबंदी आहे. या चाळी पूर्वपश्चिम अशा दोन रांगात वसलेल्या आहेत. यामध्ये प्रत्येक घरास (१७ x ७ मी) एक खोली व अंगणाची सोय केलेली आहे.

**पाण्याची सोय :**

सर्वसाधारणतः या संस्कृतीची बरीच शहरे ही नदीकाठी वसलेली आहेत. तसेच, या नगरांमध्ये घरटी विहिरीही आढळतात. या बांधीव विहिरी असून, रहाटाद्वारे पाणी उपसले जात असे.

कच्छच्या वाळवंटातील धोलावीरा या शहरामध्ये एक अभूतपूर्व अशी पाण्याची व्यवस्था दिसून येते. याठिकाणी पाण्याची सदैव चिंता होती; आणि आजही आहे. मात्र, येथील स्टेज ३ अ या टप्प्यातील हडप्पावासियांनी याठिकाणी एक अभिनव कल्पना वास्तवात आणली. धोलावीराच्या दक्षिण व उत्तर बाजूंनी फक्त पावसातच वाहणारे नाले होते. त्यांनी या नाल्यांना बांध घालून यातील पाणी शहरात वळविले. तर, त्यांनी शहरातील तटबंदीला जोडून आतल्या बाजूस, चारी बाजूंनी, थोड्याथोड्या अंतराने तलाव बांधले. अशाप्रकारे त्यांनी नाल्याचे वळविलेले पाणी या तलावांच्या मालिकेत साठवून ठेवले व धोलावीरासमोरील पाण्याचा प्रश्न सोडविला.

थोडक्यात, या लोकांना एकंदर शिस्तप्रियता, नियमबध्दता व स्वच्छतेची आवड दिसते. प्रमाणबध्द वीटा, सरळ-रुंदरस्ते, उभ्या आडव्या छेदणाऱ्या रस्त्यांनी शहराची बुध्दिबळाच्या पटासारखी केलेली मांडणी, सुखवस्तू सधन घरे, विहिरी, सांडपाणी व्यवस्थित वाहून नेण्यासाठी बांधीव भुयारी गटारे व सामूहिक मोठे गटार, धान्य

कोठारं, कामगारांच्या चाळी, सभागृह, राजमहाल, इ. वरुन हडप्पा संस्कृतीही त्याकाळी किती समृध्दी होती आणि तसेच, त्यांची नागरी जाणीव किती सजग होती हे दिसून येते.

अर्थात, एकंदर नगररचनेवरुन हडप्पा संस्कृतीतील ज्याप्रमाणे नगररचनेची नियोजनबध्दता दिसून येते त्याचप्रमाणे सामाजिक भेदाकडेही निर्देश होतो. यामध्ये प्रमुख किंवा पुरोहितवर्गाचे धर्मिक, आर्थिक (धान्य पुरवठ्यावर) तसेच सामाजिक वर्चस्व दिसून येते.

ही शहरे पूर अथवा भूकंप अशा नैसर्गिक आपत्तीमुळे ऱ्हास पावली.

**क) व्यापार :**

हडप्पा नगरातील धनाढ्य तसेच प्रभावशाली लोकांच्या गरजापूर्ण करण्यासाठी मुख्यत्वे दूरदेशी व्यापाराला प्रोत्साहन मिळालेले दिसते. येथील लिपीची समानता, व्यापारातील वस्तूंचे वैविध्य व दूरच्या प्रदेशांशी संबंध यावरुन हे निश्चित होते की हडप्पा संस्कृती ही व्यापारप्रधान होती. येथील महत्वाची शहरे हडप्पा संस्कृतीच्या इतर शहरांबरोबर, तसेच भारतातील दुसऱ्या संस्कृतींशी तसेच आशियातील संस्कृतींशी एका व्यवस्थित व्यापारी जाळ्याने/नेटवर्कने जोडली गेली होती. लोथल हे हडप्पा संस्कृतीचे अरबीसमुद्राकडे उघडणारे एक महत्वाचे बंदर होते.

**अ) अंतर्गत व्यापार :**

हडप्पा संस्कृतीचा प्रचंड विस्तार आणि तोही विविध स्वरुपाच्या भौगोलिक प्रदेशात झालेला होता. असे का असावे? याचे एक कारण कच्च्या मालाची गरज हे ही असू शकेल, जसे सोने (कर्नाटक), तांबे (खेत्री: राजस्थान), मौल्यवान दगडांमध्ये (मणी तयार करण्यासाठी) ॲमेथिस्ट (महाराष्ट्र), गोमेद/अगेट, चॅल्सिडोनी, अकिक (सौराष्ट्र), कार्नेलियन (कच्छ) इ. अर्थात, हा कच्चा माल मिळवण्यासाठी विविध स्वरुपाच्या प्रदेशात काही केंद्रे निर्माण झाली. तसेच, याठिकाणी पूर्वीपासूनच काम करत असणारी केंद्रेही दळणवळणाच्या साधनांनी जोडली गेली. प्रचंड विस्ताराच्या देशात, एकाच स्वरुपाच्या अवशेषांची प्राप्ती होणे हे वरील बाबीला पुष्टी देते.

**ब. आंतरराष्ट्रीय व्यापार :**

हडप्पाच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विचार करता मुख्यत्वे मेसोपोटेमिया (इराक-सिरिया येथील प्राचीन संस्कृती) आणि इराणशी होणारा व्यापार लक्षात घ्यावा लागतो. मेसोपोटेमिया मधील सूसा, ऊर, निप्पूर, किश, उम्मा, तेलअस्मार अशा ठिकाणी हडप्पा संस्कृतीची शिक्के, वजन-मापे, मातीच्या तसेच टेराकोटाच्या मूर्ती, अकिकाचे मणी, नक्षीदार हाडे सापडलेले आहेत. यातील काही शिक्क्यांवर एकशिंगी प्राणी तसेच हडप्पा लिपी मिळालेली आहे. तसेच, पर्शिया/इराण येथील फेलका, बहारीन इ. ठिकाणीही अशाप्रकारचे हडप्पा शिक्के मिळालेले आहेत.

तर, इकडे हडप्पा संस्कृतीच्या स्थळांमध्ये मात्र मेसोपोटेमियाच्या वस्तू कमी प्रमाणावर मिळालेल्या आहेत.

कदाचित असे असावे की मेसोपोटेमिया संस्कृती ही कपडे, लोकर, वासाचे तेल, कातडी वस्तू इ. सारख्या नाशवंत मालामध्ये व्यापार करीत असल्याने या वस्तूंचे अवशेष टिकलेले नाहीत. मात्र हडप्पा संस्कृतीच्या स्थळांतील चांदीच्या वस्तू आणि काही लंबाकार शिक्के आणि तांब्याचा धातूपिंड निश्चितच मेसोपोटेमियाकडे बोट दाखवितात.

आपल्याला असे दिसते की अक्कडचा सम्राट सारगॉनच्या (इसपू २३५०) राजधानीत दिलमून, मगान आणि मेलुहाच्या जहाजांनी पाडाव टाकलेला होता. यातील मेलुहा म्हणजे हडप्पा बंदरे होत. तसेच मेसोपोटेमियातील प्राचीन दस्तऐवज सांगतात की उर येथील व्यापारी मेलूहातून तांबे, गोमेद, हस्तीदंत, शिंपले, वैदूर्य, मोती आयात करीत होते. असे दिसते की, पूर्व हडप्पा काळापासूनच या दोन प्राचीन संस्कृतींमध्ये व्यापारी देवाण-घेवाण चाललेली होती. हडप्पा संस्कृतीतील काही व्यापारी समुदाय त्याठिकाणी रहात असून, संवादासाठी एक दुभाषाही नेमलेला दिसून येतो. यावरुनच दोहोंच्यातील घनिष्ठ व्यापारी संबंध आपल्या लक्षात येऊ शकतो.

**क. आयात व निर्यात :**

यातील आयात मालांचा विचार करता चांदी (अफगाणिस्तान, इराण), मौल्यवान दगडांमध्ये (मणी तयार करण्यासाठी) राजवर्द (बदक्शान, इशान्य अफगाणिस्थान), नीलमणी (मध्य आशिया, इराण), जेड (मध्य आशिया) याचा विचार होतो. तर निर्यातीमध्ये मेसोपोटेमियाशी होणाऱ्या व्यापारात तांबे, सोने, अकिक, हस्तीदंत, मोती, कापूस, मसाल्याचे पदार्थ, वेगवेगळ्या प्रकारचे लाकूड इ.बाबींचा समावेश होतो.

**ड. वजन-मापे :**

येथील वजनमापांमध्येही एक प्रकारची प्रमाणबध्दता दिसून येते. या वजनांची एक मालिका असून, प्रथम दुपटीत म्हणजे १, २, ४, ८, ६४ अशी व नंतर १६ च्या पटीतील दशमान पध्दतीची म्हणजे ३२०, ६४०, १६००, ३२००, ६४०० अशी होती. येथे लांबी '३७.६ सेमी चा एक फूट' अशा मोजपट्टीने मोजली जात होती. ही वजनं गारगोटी, जास्पर, स्टेटाईट तसेच चुनखडीपासून बनवलेली असत. वजन करण्यासाठी तांब्याचा तराजू वापरला जात असे. वजनमापांतील अशाप्रमाणबध्दतेतून हडप्पा संस्कृतीच्या व्यापारी प्रशासनाचा, विस्तृत प्रदेशांवरील नियंत्रणाचा यशस्वी प्रयत्न दिसून येतो.

**इ. वाहतुकीची साधने :**

हा व्यापार विविध अशा साधनांद्वारे केला जात असे. या वाहतूक साधनांत, अंतर्गत व्यापारासाठी बैलगाड्या, बैलांचे तांडे, ऊंट यांचा वापर केला जात असे. हडप्पा येथे कांस्याची एक गाडी मिळालेली आहे, तसेच इतर ठिकाणाहून गाडीची खेळणीही मिळालेली आहेत. तसेच, दूरवरील व्यापारासाठी पशुपालक जमातीच मुख्यत्वे बैलांचे तांडे घेऊन माल वाहतूकीची कामं करीत असत. तर सागरी व्यापाराचा विचार करता, मोहेनजोदडो आणि हडप्पाच्या शिक्क्यांवर जहाज, नावांच्या आकृत्या दिसतात. तर लोथलमध्ये एका जहाजाची मातीची प्रतिकृतीही मिळालेली आहे. अर्थातच, सागरी व्यापार याद्वारे केला जात असून, पश्चिम किनारपट्टीवर लोथल, बालाकोटसारखी बंदरेतर मकरान किनाऱ्यावर सुतकाजेन-डोर (पाकिस्तान आणि इराणच्या रस्त्यावर),

सुत्काकोह अशा चौक्या दिसतात. यावरुनच हडप्पा संस्कृतीचा आंतरराष्ट्रीय व्यापार सुव्यवस्थित आणि विकसित होता हे दिसून येते.

**फ. बंदर :**

लोथल येथील मानव निर्मित बंदराची सोय विशेष लक्षणीय आहे.

लोथल (गुजरात) हे भोगाव नदीच्याकाठी वसलेले असून याठिकाणी हडप्पा संस्कृतीचे महत्वाचे बंदर होते. ही भोगाव नदी साबरमती नदीची एक उपनदी असून, खंबायतच्या आखाताद्वारे अरबी समुद्राला जाऊन मिळते. येथील हडप्पाकालीन लोकांनी, या शहराच्या पश्चिमेस, एक बंदर (२१६ मी. -द x ३६ मी. पू-प) बांधले. म्हणजे, भाजीव वीटांचा एक तलाव (४.३ मी. x १.२ मी रुंद) त्यांनी बांधला. पुढे, हे बंदर, त्यांनी कालव्याद्वारे (७ मी. रुंद) नदीला जोडले. अशापध्दतीने या बंदरामध्ये पाण्याचा कायमचा पुरवठा राहिला. अधिकचे पाणी, एक दुसरा चर बांधून, पुन्हा नदीमध्येच सोडण्याची व्यवस्था केली. अशा पध्दतीने, येथील पाणी एकापातळीवर आणि स्थिर राहील अशी व्यवस्था केली.

असे दिसते की व्यापारी जहाजेही अरबी समुद्र-खंबायतचे आखात-साबरमती अशा मार्गाने प्रवास करीत येत असत. पुढे ही जहाजे साबरमतीतून, भोगावनदीत येत. मग, भोगाव नदीतून प्रवास करुन, भरतीच्या वेळी, कालव्यातून लोथलच्या बंदरामध्ये येऊन थांबत असत. पुढे, बंदराला जोडूनच एक धक्काही आहे. या धक्क्यावर हा माल उतरवला जात असे/जहाजांत चढवला जात असे. पुढे ओहोटीच्यावेळी ही जहाजे पुन्हा कालवा-भोगावनदी-साबरमती-खंबायतचे आखात-अरबी समुद्र अशी जात असत.

**ड) धर्म :**

मोहेनजोदडो येथील पुराव्यावरुन असे दिसते की, याठिकाणी धर्मगुरुंची एक प्रकारे सत्ता असावी. महास्नानगृहाजवळील प्रार्थनेची जागा या धर्मगुरुंचे स्थान व पूजा विधी दर्शवितात. त्याचप्रमाणे या स्नानगृहाजवळच असणाऱ्या धान्याच्या कोठारावरुन दिसून येते की या धर्मगुरुंचीच सत्ता या धान्याच्या कोठारावर म्हणजेच अर्थकारणावर असावी. असेच चित्र कालीबंगामध्ये सुध्दा दिसून येते.

**अ) पूजा/धार्मिक विधी स्थाने :**

हडप्पा संस्कृतीमध्ये मंदिरांसारखी निश्चित अशी रचना दिसून येत नाही. तरी पूजास्थान अथवा काही धार्मिक विधीच्या जागा आपणास दाखवता येतात. जसे, मोहेनजोदडो येथील लोकवस्तीच्या भागामध्ये एक, मध्यवर्ती मंच असलेली मोठी इमारत मिळालेली आहे. हिला एक मोठे प्रवेशद्वार असून, मंचाकडे जाण्यासाठी दुहेरी पायऱ्याही आहेत. हे एक पूजास्थान असावे. येथील महास्नानगृहाजवळ पूजापाठासाठी खोल्या दिसून येतात. तसेच लोथलमध्येही बालेकिल्ल्यात एका उंचवट्यावर (४ मी. उंच) १२ स्नानगृहांच्या रांगा आहेत. कालीबंगात अग्नीवेदी जवळ, विहीर व अंघोळीसाठी उंचवटे केलेले होते. हे पुरावे धार्मिक विधीतील स्नानाचे महत्व दाखवितात.

याठिकाणी कालीबंगा येथील पुरावे विशेष महत्वाचे आहेत. येथील बालेकिल्ल्याचे उत्तर व दक्षिण असे

पुन्हा दोन समान आकाराचे (१२० मी) भाग केलेले आहेत. यामधील दक्षिण भागात धार्मिक स्थळे आहेत. याठिकाणी मातीच्या विटांनी बांधलेले उंच जोते दिसून येतात. प्रत्येक जोत्यामध्ये मोकळी जागा ठेवलेली आहे. यातील एका जोत्यावर सात अग्नीवेदी बांधलेल्या आहेत. जवळच एक विहिर व अंघोळीसाठी उंचवटे केलेले आहेत. अर्थातच, स्नान व त्यानंतर पूजापाठ करण्याचीही जागा असावी. अशीच रचना दुसऱ्याही जोत्यावर आहे. बालेकिल्याच्याया दक्षिण भागास दोन दरवाजे (उत्तर व दक्षिणेस) असून, पायऱ्यांची सोय केलेली आहे. म्हणजेच, या दरवाज्यातून दक्षिण भागात जायचे असेलतर पायउतार होऊनच जावे लागते. म्हणजेच या दक्षिण भागास एकप्रकारचे धार्मिक पावित्र्य व महत्व होते असे दिसते. तर, उत्तर भागात रस्त्याच्या दोन्ही बाजूस घरांची रांग दिसून येते. यापलिकडे कोणतीही राजकीय स्वरुपाची इमारत दिसून येत नाही. म्हणजेच, कालींबगामध्येही एक प्रकारे पुरोहितांची सत्ता असावी. हे पुरोहित बालेकिल्ल्याच्या उत्तर भागात रहात असून, धार्मिक कार्य करण्यासाठी ते दक्षिण भागात येत असावेत. याठिकाणी इतरांना प्रवेश जरी असला तरी याठिकाणी त्यांना पायउतार होऊन नम्रपणेच जावे लागत असावे.

**ब) दैवते :**

हडप्पा संस्कृतीत सापडलेले विविध शिक्के तसेच मातीच्या आणि टेराकोटांच्या मूर्ती येथील देव-देवतांबद्दल लक्षणीय माहिती पुरवतात. याठिकाणी पुरुष, स्त्रिया, पशु-वनस्पती, संयुक्त/काल्पनिक अशा देवदेवतांचे पूजन होत असे. जसे, पशुपती. यामध्ये योगासनात बसलेली एक व्यक्ती दाखवलेली असून; ती, बकरी, हत्ती, सिंह आणि हरिणांनी घेरलेली आहे. हिच्या डोक्यावर शिंगांचा मुकुट असून, मार्शलच्या मते ही पशुपती (पुढील शिव) ची मूर्ती असावी. याचबरोबर, टेराकोटाच्या मातृदेवतांच्या मूर्तीही मिळालेल्या आहेत. यांच्या डोक्यावर पंख्याचे शिरोभूषण आहे. काही मातृदेवतांच्या मूर्ती बाळांबरोबरही दिसतात.

अशा पुरुष आणि मातृदेवतांबरोबरच, काही वृक्षदेवताही दिसून येतात. विशेषत: पिंपळाचे महत्व अगदी पूर्व हडप्पा काळापासून (ते आजपर्यंतही!) दिसून येते. काही शिक्क्यांवर सभोवती पार असलेला पिंपळ दाखविलेला आहे. तसेच, एका ठिकाणी एका देवतेच्या डोक्यावरील शिंगामधून एक झाड उगवताना दिसते. दुसऱ्या एका शिक्क्यावर एक लांब सडक केस असलेली देवता पिंपळाच्या फांद्यांमधून वर येताना दिसते. तिच्यासमोर एक भक्त साष्टांग नमस्कार घालत आहे व सोबत सात आकृत्या आहेत.

याचबरोबर प्राण्यांचेही पूजन केले जात होते. विशेषत: वशिंडयुक्त बैल विशेष श्रध्देय दिसतो. काही संयुक्त/पौराणिक/काल्पनिक प्राणीही पूजले जात असावेत, जसे, नर-सिंह, एकशिंगी/युनिकॉर्न इ. तसेच, मेसोपोटेमिया पौराणिक कथांतील दोन सिंहांशी लढणारा शूर गिलगामेशसारखा देवही पूजला जात असावा. वरील दैवतांसह, अग्नीदेवता (वेदी), सूर्यदेवतेचेही (स्वस्तिक/चक्र अशी चिन्हे) पूजन असण्याची शक्यता वर्तविली जाते.

**क) अंत्यसंस्कार पध्दती :**

अंत्यसंस्काराला धार्मिक जीवनात एक महत्वाचे स्थान असते. यातून, त्या संस्कृतीच्या मरणोत्तर जीवनावरील विश्वास आणि, त्याबाबतच्या कल्पना दिसून येतात. हडप्पा संस्कृतीमध्ये अंत्य संस्काराच्या विविध पध्दती दिसून

आलेल्या आहेत, जसे, पूर्ण दफन, अंशत: दफन, दहनोत्तर दफन इ. येथे प्रेताला उत्तर-दक्षिण दिशेत ठेवले जात असत. तसेच, मृतदेहाचे दफन करताना त्याबरोबर शिंपल्यांच्या बांगड्या, हार, कर्णभूषण, तांब्यांचे आरसे, कज्जलशलाका, मातीचे लाडू, चमचे, मणी, हस्तीदंती वस्तूसोबत ठेवली जात. काही दफनं व्यवस्थित विटांनीही बनवलेली दिसून येतात. तसेच, लोथल मध्ये प्रेतांची जोडीही दिसून येते. यावरुन मरणोत्तर जीवनाबद्दल त्यांच्या काही कल्पना असाव्यात असेही दिसते.

हे लक्षात घेतले पाहिजे की यांची स्मशानभूमी ही शहरांपासून स्वतंत्र असे.

हडप्पा संस्कृतीतील एकंदर धार्मिक परिस्थितीचा विचार करता, विविध क्षेत्रांमध्ये विविध प्रकारचे विधी प्रचलित होते असे आढळते. जसे, कालीबंगा-लोथल मध्ये अग्नीवेदी दिसतात, मात्र इतरत्र कुठे नाही. तर, या दोघांबरोबर, मोहेनजोदडो येथे स्नानाचे पूजा विधीसाठी महत्व दिसते, हडप्पा मध्ये नाही. अंत्य संस्कारामध्येही एक प्रेत, जोडी प्रेत, पूर्ण/अंशतः/दहनोत्तर इ. वैविध्य दिसून येते. अर्थातच, हडप्पा संस्कृतीचा प्रचंड विस्तार आणि तत्कालिन मर्यादित दळण वळण/संपर्क व्यवस्थेमुळे हे स्वाभाविकच होते. त्याचबरोबर यातून हडप्पा संस्कृतीच्या समाजजीवनाचे वैविध्यपूर्ण स्वरुप आणि तरीही सांस्कृतिक ऐक्य आपल्याला बरेचकाही शिकवू पाहते!

**इ) शिक्के :**

हडप्पा संस्कृती मध्ये व्यापारी मालाची हमी देण्यासाठी शिक्क्यांचा वापर केला जात होता. येथे शिक्क्यांबरोबरच (Seal) शिक्क्यांचे ठसेही (Sealing) मिळालेले आहेत. हडप्पा संस्कृतीतून जवळ जवळ २००० पेक्षा अधिक शिक्के मिळालेले आहेत. हे साधारणत: चौकोनी असून, स्टेटाईट पासून बनवलेले असत. हे शिक्के १ ते ५ सेमी पर्यंत आकाराचे असून, साधारणत: त्यांच्या एका बाजूवर चित्र तर दुसऱ्या बाजूस अक्षरे दिसतात. यातील काही शिक्क्यांवर केवळ लिपी तर काहींवर माणूस, प्राणी, अर्ध-मानव, वनस्पती इ. आकृत्या दिसून येतात. तसेच, यांवर भौमितिक आकृत्याही दिसून येतात.

प्राण्यांच्या आकृतींचा विचार करता यामध्ये भारतीय हत्ती, रेडा, गेंडा, वाघ आणि मुख्यत्वे वशिंडयुक्त बैल दिसून येतात. त्याचप्रमाणे काही संयुक्त पशु ही दिसून येतात. एका आकृतीत तर एक माणूस दाखविलेला असून, चेहरा हत्तीचा, डोक्यावर बैलाचे शिंग असून, पुढील शरीर मेंढ्याचे असून मागील वाघाचे आहे. तर काही शिक्क्यांवर पशुपती आणि मातृदेवताही दिसून येतात. कदाचित असे शिक्के धार्मिक उपयोगासाठी वापरले जात असावेत. या शिक्के त्या काळची कलेतील प्रगती सांगतातच शिवाय त्याकाळातील लोकांचे लेखन कलेचे ज्ञान, कलेतील प्रमाण बद्धता, सभोवतालचा निसर्ग (प्राणी-पक्षी-झाडे), त्यांच्या धार्मिक कल्पना/श्रध्दा, प्रगत व्यापारही दाखवितात.

अर्थात, अजूनही हडप्पा संस्कृतीची लिपी आपल्याला वाचता आली नाही याची ही नोंद घ्यावी.

**ड) हडप्पा संस्कृतीचा ऱ्हास :**

अशा या वैभवशाली संस्कृतीचा ऱ्हास कसा झाला असावा? याबाबत विद्वानांमध्ये मतभेद होते. पुराव्यांचे चुकीचे वाचन झाल्याने, त्याबाबत काही गैरसमजही प्रचलीत झाले होते. जसे, नंतर आलेल्या वैदिक आर्यांनी,

हडप्पा संस्कृतीतील लोकांची कत्तल केली, नगरं उध्वस्त केली अशी एक चुकीची समजूतही करुन दिली गेली होती. पण पुढे, पुराव्यांचे व्यवस्थित वाचन केल्यानंतर, तसेच, विविध वैज्ञानिक पध्दतींचा उपयोग करुन या संस्कृतीचा ऱ्हास कसा झाला असावा? हे शास्त्रज्ञांनी सिध्द करुन दाखवलेले आहे.

या ठिकाणी हे लक्षात घेतले पाहिजे की हडप्पा संस्कृतीचा उदय ही जशी एका रात्रीत घडलेली घटना नव्हती तसाच तिचा ऱ्हास ही एकाच दिवशी घडलेला नाही. तरही ऱ्हासाची प्रक्रिया बरीच वर्षी चाललेली होती. दुसरी गोष्ट म्हणजे कोणत्या एकाच कारणाने, एवढ्या मोठ्या प्रदेशावर पसरलेली ही संस्कृती नष्ट झाली नाही. तर विविध ठिकाणच्या ऱ्हासासाठी, वेगवेगळी कारणे आहेत. जसे, धोलावीरा भुकंपामुळे, मोहेनजोदडो पूरामूळे, नदीचे पात्र बदलल्याने तिच्या काठावरील काही शहरे अशी ओसाड झाली असे आपल्याला आढळते.

अर्थात, सगळ्यात महत्वाचे कारण म्हणजे पर्यावरणातील प्रतिकूल बदल. यावेळी पर्यावरण हे अगदी कोरडे झाले, पर्जन्यमान कमी झाले. त्याचा फटका समृध्द शेतीला बसला. आणि पुढे, शेतीवर आधारलेल्या कारागीर-व्यापाऱ्यांना बसला. या सगळ्याचा परिणाम म्हणजे शहरांचे अर्थकारण ढासळले. ती निर्मनुष्य झाली. अर्थात, हे काही एका दिवसात घडले नाही.

थोडक्यात, हडप्पा संस्कृतीचा ऱ्हासही एक प्रक्रिया होती आणि ती अनेक वर्षं चालली. प्रतिकूल निसर्ग हे हडप्पा संस्कृतीच्या ऱ्हासाचे कारण आहे.

**● स्वयं-अध्ययन प्रश्न-३**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. ............ हे महाराष्ट्रातील हडप्पा संस्कृतीचे स्थळ होय.

अ. दायमाबाद ब. नेवासा क. पैठण ड. कऱ्हाड

२. हडप्पा संस्कृतीतील महास्नानगृह............. याठिकाणी सापडलेले आहे.

अ. मोहेनजोदडो ब. लोथल क. कालीबंगा ड. धोलावीरा

३. ............. याठिकाणी हडप्पा संस्कृतीतील बंदर सापडलेले आहे.

अ. मोहेनजोदडो ब. लोथल क. कालीबंगा ड. धोलावीरा

४. हडप्पा संस्कृती मध्ये सोन्याचीआवक............ येथून होत असे.

अ. महाराष्ट्र ब. राजस्थान क. कर्नाटक ड. केरळ

५. महाराष्ट्रातून...............ची आवक हडप्पा संस्कृतीमध्ये होत असे.

अ. ॲमेथिस्ट ब. तांबे क. अगेट ड. चॅल्सिडोनी

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. हडप्पा संस्कृतीला 'हडप्पा संस्कृती' असे का म्हणतात?

२. धोलावीराच्या नगररचनेमध्ये कोणकोणते भाग येतात?

३. हडप्पा संस्कृतीतील कोणत्या स्थळी अग्नीवेदी आढळलेल्या आहेत?

४. हडप्पा संस्कृतीचा ऱ्हास कोणत्या कारणांनी झाला?

५. हडप्पा संस्कृतीतील शिक्के कशाचे बनवत असत?

## १.२.४ विभाग ४: महाशिलायुगीन भटकेः दफनांचे प्रकार, अवशेषांचे स्वरुप :

ज्या काळातील मानवी संस्कृतीमध्ये, मोठ्या दगडांचा खुणेसाठी वापर करुन, मृतांचे दफन करण्याची पध्दती होती अशा संस्कृतीला 'महाशिलायुगीन संस्कृती' असे म्हणतात. या संस्कृतीची दफनं आपल्याला मोठ्या प्रमाणावर मिळतात, मात्र वसाहतीचे पुरावे खूप मोजक्या स्वरुपाचे आणि अप्रत्यक्ष स्वरुपाचे आहेत. त्यामुळे या संस्कृतीची मुख्य माहितीही आपणाला त्यांच्या दफनांवरुनच मिळते. अशी ही संस्कृती साधारणतः इसवी सन पूर्व १००० मध्ये दख्खनच्या पठारावर दिसू लागते. या वेळी पूर्वीच्या ताम्रपाषाणाची जागा आता लोह हत्यारे घेतात. दक्षिण भारतामध्येही या संस्कृतीचे पुरावे आपणास मिळतात. साधारणतः इसवी सन पूर्व ३०० च्या दरम्यानही संस्कृती अस्पष्ट होत जाऊन, या भागात सातवाहनांचे राज्य निर्माण होते. मात्र, पुढे अनेक वर्षे, अगदी आजपर्यंतही या संस्कृतीच्या खूणा आपल्याला काही आदिवासी समाजात दिसून येतात. त्याच बरोबर युरोप आणि आशियाई देशांमध्ये ही या संस्कृतीशी साधर्म्य असणाऱ्या संस्कृती आपल्याला दिसून येतात.

लोह तंत्रज्ञान, घोडा दफनांच्या खुणेसाठी दगडांचा वापर आणि लाल-काळी मडकी ही या संस्कृतीची ठळक लक्षणं आहेत.

१८२३ मध्ये बॅबिंग्टन यांनी दक्षिण भारतातील मलबार भागामध्ये महाशिलायुगीन दफनांचा सर्वप्रथम शोध लावला. आत्तापर्यंत भारतामध्ये २००० महाश्मयुगीन स्थळं सापडलेली असून, फक्त ४० ठिकाणी त्यांच्या वसाहतींचे पुरावे सापडलेले आहेत. तर महाराष्ट्रातील विदर्भात जी शेकडो दफनं मिळतात, त्यामध्ये फक्त चार ठिकाणी वसाहतींचे पुरावे आपल्याला मिळतात.

महाशिलायुगीन मानवाची संस्कृती ही दफनांवरुन ओळखत जरी जात असली तरी या संस्कृतीमध्ये दफनांचे विविध प्रकार आपल्याला दिसून येतात. जसे, शिलावर्तुळं (Cairn Circles), पेटी-दफन असलेली शिळा वर्तुळं (Cist & Cairn Circles), डॉलमेन/चेंबर दफनं (Dolmen/Chamber Stone), मेनहिर (Menhir), टोपी-शिला (Topi Kal), मडक्यांतील दफन (Urn Burials), सार्कोफॅगस (Sarcophagus), गुहा (Cave Burials) इ. यातील **शिलावर्तुळं मुख्यत्वे विदर्भात** सापडतात. उर्वरीत प्रकार कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामीळानाडू, केरळ इ. प्रदेशांमध्ये सापडतात.

शिलावर्तुळांमध्ये,एका खड्ड्यात मृताचे दफन केले जात असे. मृतांसोबत,त्याच्या पुढील प्रवासाच्या सोबतीसाठी, अन्न, पाणी, घोडा, घोड्याचे अलंकार इ. ठेवले जात. त्याचप्रकारे, तो वापरत असणारी साधने आणि हत्यारे ही ठेवली जात. त्या नंतर, माती लोटून हे दफन पूर्ण केले जाई. त्यानंतर, खुणेसाठी, या दफनाभोवती, मोठेमोठे दगड वर्तुळाकार मांडले जात. या वर्तुळांतील जागा खडींनी भरलेली असे. याला शिलावर्तुळ असे म्हंटले जाते. अशी शिलावर्तुळं मोठ्या प्रमाणावर विदर्भात सापडलेली आहेत. यातील काही दफनांमध्ये, एकापेक्षा दोन व्यक्तींचेही दफन केलेले दिसते. यातील काही शिलावर्तुळांचे उत्खननही अभ्यासकांनी केलेले आहे, जसे, टाकळघाट-खापा, माहुरझरी, भागीमोरी, नैकुंड, रायपूर, पाचखेडी इ. अशा शिलावर्तुळाप्रमाणेच, विदर्भात रायपूर येथे 'शिलावर्तुळ' आणि 'पेटी-दफन' हे एकाच ठिकाणी सापडते. तसेच दफनामध्ये एक खोलीही दिसून येते. तर पाचखेडी येथे एका ठिकाणी शिळावर्तुळाऐवजी एक उंच दगड म्हणजेच 'मेनहिर' हा प्रकार दिसून येतो.

काही शिलावर्तुळांमध्ये, एका खड्यामध्ये पातळ दगडांची एक पेटी केली जाते आणि जमिनीवर शिलावर्तुळ निर्माण केले जाते. याला 'पेटी-दफन असलेले शिलावर्तुळ' असे म्हणता येईल. बऱ्याच ठिकाणी पेटीच्या एका भिंतीवर एक मोठा पोकळ गोलही दिसून येतो. तर काही ठिकाणी या पेटीपर्यंत जाण्यासाठी, जमिनीवरुन एक छोटी वाटही काढलेली असते. काही ठिकाणी या पेटीला जोडून दुसरी पेटी असते किंवा एका मोठ्या पेटीचे दोन भाग केलेले असतात. आंध्र प्रदेशामध्ये अशी दफनं पूर्णपणे जमिनीखाली दिसून येतात. तर कर्नाटकमध्ये, ब्रह्मगिरी याठिकाणी, याचा अर्धा भाग जमिनीवर आहे. तर बेंगलोर जवळील सुवणदुर्ग याठिकाणी, ते पूर्णपणे जमिनीवर उभे आहेत.

डॉलमेन दफन प्रकारामध्ये, चार भिंतीची एक मोठ्या दगडांची खोली केलेली असते. तिच्यावर एका दगडाचे छत असते. ही एकतर पूर्णपणे जमिनीवर असते किंवा हिचा अर्धा भाग जमिनीवर व उरलेला जमिनीच्या आत असतो. दक्षिण कर्नाटक, आंध्र प्रदेश, तामीळनाडूच्या भागामध्ये अशी दफनं दिसून येतात. दक्षिण कर्नाटकातील गुंटुर जिल्ह्यात अशाप्रकारची दफनं मोठ्या प्रमाणावर सापडतात. यालाच चेंबर/खोली-दफन असे म्हणता येईल. उत्तर कर्नाटकामध्येही यांचे मोठे प्रमाण दिसून येते.

तर, मेनहीर प्रकारामध्ये, दफनावर एक खूण म्हणून उंच दगड उभा केलेला असतो. काश्मीर भागामध्येही प्रथा असून, आजही पूर्व भारतामध्ये ही प्रथा आढळून येते. छोटा नागपूर आणि पूर्व भारतामध्ये ही प्रथा होती. टोपी-शिलामध्ये, दफनावर, तीन/चार मोठ्या शिला उभ्या-तिरक्या ठेवून त्यावर टोपी सारखा एक दगड आडवा ठेवलेला असतो. केरळमध्ये अशा स्वरुपाची दफनं सापडतात. मडक्यातील दफनं ही तामीळनाडूच्या प्रदेशात सापडतात. यामध्ये, जमिनीमध्ये भांड्यांचे दफन ठेवून, त्यावर खडीचा ढीग पसरलेला असतो.

सार्कोफेगस/रांजण दफनामध्ये एक भाजीव मातीचे उभे रांजण तयार करुन, त्यामध्ये दफन केले जाते. किंवा प्रतिकात्मक (म्हणजे प्रेतरहित) असे रांजण उभे केले असते. या रांजणाला मातीचे पायही केलेले असतात. आंध्र प्रदेशामध्येही दफनं सापडतात. येथील चित्तूर आणि कडप्पाच्या भागामध्ये, जमिनीमध्ये एक पेटी तयार करुन, त्यामध्ये असे रांजण ठेवलेले दिसतात. कर्नाटकातील जदिगेनहेल्ली येथेही दफनं दिसतात. तर, तामीळनाडूमध्ये असे

सार्कोफॅगस जमिनीमध्ये ठेवून, त्याभोवती दफनवस्तू ठेवल्या जात. त्यावर माती लोटून, खुणेसाठी शिलावर्तुळ निर्माण केलेले दिसते.

तर, केरळमध्ये, दगडामध्ये एक अंडाकृती गुहा करुन त्याठिकाणी दफन केलेले दिसते. याचा दरवाजा आयताकृती असतो. कधीकधी गुहेत एक खांब उभा केलेलाअसतो तर कधी छतावर एक मोठे छिद्र कोरलेले असते. तर आत गुहेत दगडी बाकं तयार करुन त्यावर दफन साहित्य ठेवलेले असते.

महाशिलायुगीन लोकांच्या दफनांच्या तुलनेने, यांच्या वसाहतींचे प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसून येते. विदर्भातील टाकळघाट, नैकुंड, भागीमरी आणि रायपूर मध्ये अशा वसाहती दिसून येतात. या वसाहती हंगामी स्वरुपाच्या असाव्यात असे संशोधकांचे म्हणणे आहे. हे लोक आयताकार, चतुष्कोणी तशाच गोलाकार झोपड्यांमध्ये रहात. चुन्याने सारवलेली जमिन, कुडाच्या भिंती आणि गवताने शाकारलेले छत ही पंरपरा कायम राहिलेली दिसून येते. गोलाकार झोपड्यांचे छत मात्र शंक्वाकृती असे. चूल आणि धान्य साठविण्यासाठी मातीच्या कणग्या ही या घरांतील महत्वाच्या गोष्टी. ही निवास व्यवस्था, मागील ताम्रपाषाणयुगाचीच नियमितता दाखवते.

काही ठिकाणी महाशिलायुगीन दफनाजवळ शैलचित्रेही दिसून येतात. या शैलचित्रांवरून या महाशिलायुगीन मानवाच्या जीवनावर प्रकाश पडतो, जसे, हिरेबंकल येथील शैलचित्रे. अशा चित्रांमधून शिकार करण्याची पध्दती, समूह नृत्यासारखे धार्मिक विधी दिसून येतात.

महाशिलायुगीन लोकांचे जीवन हे निमभटके असल्याने; शेतीपेक्षा, शिकार, पशुपालन हे यांचे उपजीविकेचे प्रमुख मार्ग दिसून येतात. यांच्या आहारामध्ये कंदमुळे, फळे, वनस्पतींचे प्रमाण जास्त असल्याने, त्यांच्या दाढा मोठ्या दिसून येतात.

तसेच, हे उत्तम कारागीरही होते असे आपल्याला दिसून येते. विशेषत: लोह तंत्रज्ञानामध्ये हे पुढारलेले असे होते. विदर्भातील नैकुंड या ठिकाणी अशी लोखंडाची भट्टीही मिळालेली आहे. ही जमिनीच्या आत १.२५ मीटर खोलीवर होती. ही चार सेमी जाडीच्या विटांनी बांधलेली असून, ३० सेमी व्यासाची होती. आत हवा मारण्यासाठी दोन मातीचे नळ होते. तसेच, लोखंड तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये, गाळ काढण्यासाठी तळाशी तोंड ही ठेवलेले होते. असे दिसते की, यांच्या हत्यारामध्ये लोखंडाचे प्रमाण अतिशय शुध्द (९९%) असे आहे. हे लोक लोखंडाची विविध साधने, अवजारे आणि हत्यारे तयार करीत असत. या साधनांमध्ये प्रचंड प्रमाणावर वैविध्य आहे. जसे, तलवार, खंजीर, भाले, बाण, छिन्नी, कुऱ्हाडी, नांगर, विळे, तिपाई, थाळी, हस्तभूषण, कढई, नेलकटर, खिळे, दिवे, घोड्याची रिकीब इ.

तसेच, यांनी तांब्याची आभूषणं आणि विविध वस्तू बनवलेल्या दिसून येतात. जसे, कर्णभूषणं, बांगड्या, घंटा, आरसा इ. घोडा हा प्रिय प्राणी असल्याने हे तांब्याचे घोड्याचे अलंकारही, विशेषत: तोंडावरील पत्रा, बनवत असत.

लोह आणि तांब्याच्या तंत्राप्रमाणेच; हे लोक चांदी आणि सोन्यामध्येही आभूषणं बनवताना दिसून येतात.

चांदीमध्ये बुंदके तर सोन्यामध्ये अंगठ्या, बांगड्या, कर्णभूषण, हस्तभूषण, पदके, पट्टे, वेढण्या बनविल्या जात. दागिन्यांसाठी सोन्यामध्ये चांदी मिसळली जात असे.

लोहतंत्रज्ञानाप्रमाणेच, कुंभारकामही गरजेचे होते. हे लोक 'लाल-काळी' अशा दुहेरी रंगातील भांडी वापरीत. यामध्ये वाडगे, वाट्या, कुंडे, थाळ्या यांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे हे लाल मडकीसुध्दा वापरत. या लाल मडक्यांमध्ये अभ्रकाचे अंश असल्याने, ही चकाकताना दिसतात. एकतर हे लोक स्वत: अशी भांडी बनवत किंवा, ढवळीकर म्हणतात त्याप्रमाणे लोह अवजारांच्या मोबदल्यात, गावकऱ्यांकडून भांडी घेत. 'मणीकारी' हा उपजीविकेचा आणखीन एक पर्याय. हे लोक विविध प्रकारच्या मौल्यवान दगडांपासून मणी बावताना आपल्याला दिसतात,जसे, गारेच्या दगडांपासून, अकिक, पोवळे, वैदूर्य/इंद्रनील, शंख अशापासून. यातील अकिकाचे मणी हे पाढंरी नक्षी असलेले असे आहेत.

हे मुख्यत्वे फिरस्ते असल्याने, यांचा इतर संस्कृतींशी सहसंबंध असणे स्वाभाविकच होते. अशा संस्कृतीसह हे लोक विविध वस्तूमध्ये विनिमयही करीत. जसे, वैदूर्य, शंख इ. मण्यांचा कच्चा माल, तसेच, सोने, चांदी हे विनिमयातूनच यांच्या संस्कृतीत आलेले दिसतात. यातील शंखाचा वापर ते मण्यांबरोबरच, बांगड्या बनविण्यासाठीही करीत असत.

महाशिलायुगीन लोक कोण होते याबद्दल संशोधकामध्ये मतभेद आहेत. युरोपियन दफनांशी साधर्म्य असल्याने हे भूमध्य सागराकडून भारतामध्ये आले असावेत असे समजले जात होते. पण अलिकडच्या अभ्यासावरुन असे दिसून आलेले आहे की हे लोक भारतीयच होते. एक मात्र निश्चित की यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणावर सांस्कृतिक वैविध्य होते. याचे कारण त्यांच्या भटकण्याच्या भौगोलिक वैविध्यामध्ये दडलेले आहे.

या काळातील वसाहतींचे पुरावे अत्यल्प मिळाल्याने, हे एका जागी रहात होते का? यांचे उपजीविकेचे मार्ग कोणते होते? असे विविध प्रश्न संशोधकामध्ये आजही दिसून येतात. साधारणत: असे समजले जाते की हे भटके पशुपालक होते. पण पुन्हा प्रश्न निर्माण होतात की, हे जर भटके असतील तर जे वसाहतींचे पुरावे मिळालेले आहेत, त्या वसाहतींचे उपयोजन काय होते? तसेच, हे जर पशुपालक होते तर यांच्या दफनांमध्ये शेतीची अवजारं कशी सापडतात? अशा प्रश्नांची उत्तरं ही अधिकाधिक संशोधनानंतरच मिळणार हे उघड आहे. तूर्त तरी, ढवळीकरांसारखे विद्वान असे म्हणतात की, महाशिलायुगीन लोक हे भटके पशुपालक होते. तसेच यांचे लोहारकामाचे ज्ञान उच्च दर्जाचे होते. हे लोक, आपल्या भटकंतीच्या दरम्यान, गावाजवळ तात्पुरती वसाहत करत. त्या गावांची जशी गरज असेल त्याप्रमाणे ते लोकांना लोखंडाची साधने, अवजारे तयार करुन देत. त्यानंतर पुढे जात. असे वारंवार घडल्याने, या लोकांचे प्रवासाचे मार्ग आणि थांबे निश्चित होत असत. अशा मार्गातच आणि थांब्यावरच त्यांची दफने असत. तसेच दफनातील वेगवेगळे प्रकार, या काळातील विविध टोळ्यांचे वितरण, विचरण आणि सहाचर्य दर्शवितात. अशा या महाशिलायुगीन काळाच्या शेवटी-शेवटी आपल्याला सातवाहनांचे राज्य पुढे येताना दिसून येते.

● **स्वयं-अध्ययन प्रश्न-४**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. ................यांनी महाशिलायुगीन दफनांचा सर्वप्रथम शोध लावला.

अ. मार्शल ब. कार्लाईल क. बॅबिंग्टन ड. प्रिन्सेप

२. महाराष्ट्रामध्ये, प्रामुख्याने................भागात महाशिलायुगीन दफने सापडतात.

अ. कोकण ब. पश्चिम महाराष्ट्र क. खानदेश ड. विदर्भ

३. महाशिलायुगीन लोखंडाची भट्टी ............ या ठिकाणी सापडलेली आहे.

अ. नैकुंड ब. रायपूर क. पाचखेडी ड. भागीमोरी

४. 'मेनहिर' स्वरुपाची दफने ही प्रामुख्याने ................ येथे सापडतात.

अ. तामीळनाडू ब. केरळ क. काश्मीर ड. आंध्र प्रदेश

५. महाशिलायुगीन शैलचित्रे ............ याठिकाणी आढळलेली आहेत.

अ. माहूरझरी ब. हिरेबंकल क. भीमबेटका ड. नैकुंड

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. महाशिलायुगीन संस्कृती म्हणजे काय?

२. शिला वर्तुळ म्हणजे काय? ती कुठे सापडतात?

३. विदर्भातील काही महाशिलायुगीन स्थळांची नावे सांगा.

४. महाशिलायुगीन लोहार लोखंडाची कोणती साधने बनवित असत?

५. महाशिलायुगीन लोहार तांब्याची कोणती साधने बनवित असत?

## १.३ सारांश :

भारताच्या आद्य मानवाचा इतिहास अश्मयुगापासून सुरु होतो. तो आपल्या भोवतालच्या गोष्टींमधून, दगडाची, हत्यारासाठी निवड करतो. या हत्यारांचा वापर करुन तो शिकार करत असतो, अन्न संकलन करत असतो. त्याच्या विकासाचे विविध टप्पे आपल्याला अश्मयुगाच्या विविध टप्प्यांमध्ये दिसून येतात. भटका शिकारी आणि अन्न संकलकापासून, नवाश्मयुगामध्ये त्याला शेतीचा आणि पशुपालनाचा शोध लागतो. पुढे ताम्रपाषाण युगात तो गावं वसवतो. तो स्थिर होतो. यातूनच, कालांतराने, भारतामधील पहिलीवाहिली नगरे निर्माण होतात. याला हडप्पा संस्कृती म्हणतात. या काळात संस्कृतीच्या प्रत्येक अंगामध्ये प्रचंड विकास घडून येतो. भारताची पहिली नागरी सभ्यता अस्तित्वात येते. मात्र विविध नैसर्गिक कारणांमुळे या संस्कृतीचा हळूहळू

ऱ्हास होतो. पुढे, दक्षिण भारतात, भटक्या कारागीर-पशुपालकांची महाशिलायुगीन संस्कृती आढळते. वैशिष्ट्यपूर्ण दफनपध्दती हे या संस्कृतीचे महत्वाचे लक्षण असते.

## १.४ पारिभाषिक संज्ञा व टीपा :

**पुरातत्वशास्त्र** (Archaeology) **:** मानवाने हेतूपूर्वक/निर्हेतूकपणे आपल्या मागे सोडलेल्या भौतिक अवशेषांचा अभ्यास करुन, त्याच्या इतिहासाची पुनर्बांधणी आणि विश्लेषण करणारे शास्त्र होय.

**प्रागैतिहास** (Prehistory) : हा आद्य मानवाच्या इतिहासाचा कालखंड. डॅनियल विल्सन याने १८५१ मध्ये या शब्दाचा प्रयोग प्रथमत: केला. ज्याकाळाचा इतिहास लिहिताना लिखित साधनांचा अभाव जाणवतो. त्यामुळे आपल्याला पुरातत्विय अवशेषांवरच अवलंबून रहावे लागते. या कालखंडात भारतातील अश्मयुग येते.

**इतिहासपूर्वकाळ** (Protohistory) **:** हा प्रागैतिहास आणि लिखित-इतिहास कालखंडाच्या मधील कालखंड.

**शिक्का** (Seal) **आणि ठसा/मुद्रा** (Sealing) **:** हडप्पा संस्कृतीमध्ये शिक्का हा आकृती असलेला एक लाखेचा अथवा सेलखडीचा तुकडा असून, प्रमाणीकरणासाठी याचा वापर केला जातो. तर, हा शिक्का एका गोष्टीवर मारल्यानंतर, जो छाप उमटतो त्यास ठसा/मुद्रा असे म्हणतात.

**नागरीकरण** (Urbanization) **:** नागरीकरण हा मानवी विकासाच्या प्रक्रियेतील एक टप्पा असून, हिची; नियोजनबध्द आणि तटबंदीयुक्त शहरे, सार्वजनिक इमारती, लोकसंख्येत वाढ, सामाजिक स्तरीकरण, शेतीतील अतिरिक्त उत्पादन, व्यवसायाचे विशेषीकरण, मोठ्या व्याप्तीचा व्यापार, प्रमाणबध्द वस्तू आणि मानकं, वाजन मापं, नाणी/शिक्के आणि एकंदर प्रक्रियेवर नियंत्रण ठेवणारी व्यवस्था इ. ठळक लक्षणं मांडता येतात.

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

● **स्वयंअध्ययन प्रश्न-१**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. अ. हात कुऱ्हाडी व तोड हत्यारे, २. ब. मध्याश्मयुग, ३. ब. सूक्ष्मास्त्रे,
४. ब. भीमबेटका, ५. ब. कार्लाईल

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. प्रागैतिहासिक काळ म्हणजे मानवाच्या इतिहासातील सुरुवातीचा कालखंड. या काळातील मानव हा मुख्यत्वे दगडी हत्यारांच्या सहाय्याने, प्रकृतीशी झुंझत होता तसेच तिच्याशी जुळवून घेत, तिला आपल्या उपयोगी आणीत होता. या काळास 'अश्मयुग' असेही म्हंटले जाते.

२. शिकार आणि अन्न संकलन

३. पुरुष शिकारीचे आणि स्त्रिया अन्न संकलनाचे

४. हात कुऱ्हाडी, तोड हत्यारे, पात्यांची हत्यारे इ.

५. व्हि. एस. वाकणकर

● **स्वयंअध्ययन प्रश्न–२**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. ड. लुबॉक २. क. नवाश्मयुग ३. अ. बूर्झाहोम

४. ड. जोर्वे ५. अ. इनामगाव

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. नवाश्मयुगात.

२. गर्तावासामध्ये (खड्ड्यांमध्ये).

३. राजस्थानमध्ये आहाड/बनास संस्कृतीतर मध्य प्रदेशमध्ये कायथा आणि माळवा.

४. सावळदा संस्कृती, उत्तर हडप्पा संस्कृती, माळवा संस्कृती, जोर्वे संस्कृती आणि उत्तर जोर्वे संस्कृती

५. पुण्याच्या डेक्कन कॉलेजने, ढवळीकर यांच्या नेतृत्वाखाली.

● **स्वयंअध्ययन प्रश्न–३**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१.अ. दायमाबाद, २.अ. मोहेनजोदडो, ३.ब. लोथल

४.क. कर्नाटक, ५.अ. ॲमेथिस्ट

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. या संस्कृतीच्या पहिल्यावाहिल्या खुणा हडप्पा याठिकाणी मिळालेल्या असल्याने, यास 'हडप्पा संस्कृती' असे म्हंटले जाते.

२. लोकवस्तीचा भाग–१, लोकवस्तीचा भाग–२, निवासी–कार्यालयीन संकुल, सभागृह/क्रिडांगण

३. कालीबंगा येथे

४. भूकंप, पूर, नद्यांचे प्रवाह बदलणे, हवामान कोरडे होणे इ. नैसर्गिक कारणांमुळे

५. स्टेटाईटपासून बनवलेले असत.

● **स्वयंअध्ययन प्रश्न–४**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१.क. बॅबिंग्टन, २.ड. विदर्भ, ३.अ. नैकुंड,

४.क. काश्मीर, ५.ब. हिरेबंकल

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. ज्याकाळातील मानवी संस्कृतीमध्ये, मोठ्या दगडांचा खुणेसाठी वापर करुन, मृतांचे दफन करण्याची पध्दती होती अशा संस्कृतीला 'महाशिलायुगीन संस्कृती' असे म्हणतात.

२. दफनांभोवती ज्याठिकाणी दगड वर्तुळाकार ठेवलेले असतात त्यांना 'शिलावर्तुळ' असे म्हणतात. ती प्रामुख्याने महाराष्ट्रातील विदर्भात सापडतात.

३. नैकुंड, भागीमोरी, माहूरझरी, रायपूर

४. तलवार, खंजीर, भाले, बाण, छिन्नी, कुऱ्हाडी, नांगर, विळे, तिपाई, थाळी, हस्तभूषण, कढई, नेलकटर, खिळे, दिवे, घोड्याची रिकीब इ.

५. कर्णभूषणं, बांगड्या, घंटा, आरसा इ. घोडा हा प्रिय प्राणी असल्याने हे तांब्याचे घोड्याचे अलंकारही, विशेषत: तोंडावरील पत्रा, बनवत असत.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) टीपा द्या.**

१. अश्मयुगीन हत्यारे, २. मध्याश्मयुगीन गुहाचित्रे, ३. हडप्पाकालीन धर्म,

४. हडप्पा संस्कृतीचा ऱ्हास, ५. महाशिलायुगीन दफनांचे प्रकार

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. अश्मयुगीन जीवनाची माहिती द्या.

२. नवाश्मयुगीन मानवी जीवनाची माहिती द्या.

३. महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगाची माहिती द्या.

४. हडप्पा संस्कृतीच्या नगररचनेची माहिती द्या.

५. महाशिलायुगीन संस्कृतीची माहिती द्या.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ :


१. ढवळीकर, म. के., महाराष्ट्राची कुळकथा. पुणे : राजहंस प्रकाशन, २०११

२. ढवळीकर, म. के., आर्यांच्या शोधात, पुणे : राजहंस प्रकाशन, २००८

३. ढवळीकर, म. के., कोण्या काळची सिंधु संस्कृती, पुणे : राजहंस प्रकाशन,

४. ढवळीकर, म. के. पुरातत्व विद्या, पुणेः कॉंटिनेंटल प्रकाशन.

५. देव, एस. बी. पुरातत्व विद्या, पुणे : कॉंटिनेंटल प्रकाशन.

६. Allchin, B. and R. The Rise of Civilization in India and Pakistan. Cambridge University Press (Cambridge World Archaeology).1983

६. Ghosh, A., Encyclopaedia of Indian Archaeology, Vol.II., New Delhi: Munshiram & Manoharlal,1989

७. Majumdar, R. C. (Ed.) The History and Culture of the Indian People. Bharatiya Vidya Bhavan 1951

८. Singh, U.A. History of Ancient and Early Medieval India : From the Stone Age to the 12th Century. Pearson India. 2009

९. Thapar, R. Early India : From the Origins to AD 1300 : University of California Press.2004

❖❖❖

## घटक – २

# वैदिक युग आणि महाकाव्ये

**अनुक्रमणिका :**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

२.२.१ विभाग १: वैदिक साहित्य

स्वयं-अध्ययन प्रश्न-१

२.२.२ विभाग २: पूर्व ते उत्तर वैदिक काळातील बदलः राज्यसंस्था आणि आर्थिक परिस्थिती

स्वयं-अध्ययन प्रश्न-२

२.२.३ विभाग ३: पूर्व ते उत्तर वैदिक काळातील बदलः समाज आणि धर्म

स्वयं-अध्ययन प्रश्न-३

२.२.४ विभाग ४ः महाकाव्येः रामायण आणि महाभारत

स्वयं-अध्ययन प्रश्न-४

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द

२.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ

## २.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

- वैदिक संस्कृती म्हणजे काय ते लक्षात येईल.
- वैदिक साहित्याचा परिचय होईल; त्याचा उपयोग वैदिक संस्कृतीच्या अभ्यासासाठी कसा होतो हे लक्षात येईल.

- पूर्व वैदिक काळाच्या अभ्यासातून, वैदिक संस्कृतीचा प्राथमिक टप्पा कळून येईल.
- उत्तर वैदिक काळाच्या अभ्यासातून, वैदिक संस्कृतीतील विविध संस्था आणि त्यांच्यातील बदल लक्षात येतील.
- रामायण आणि महाभारत या महाकाव्यांचा परिचय होईल; त्यांची वैशिष्ट्ये लक्षात येतील.

## २.१ प्रस्तावना :

भारतातील ताम्रपाषाण युगाच्या ऱ्हासानंतर, सप्तसिंधुच्या प्रदेशात एक वेगळ्या अशा संस्कृतीचे उल्लेख सापडण्यास प्रारंभ होतो. ही संस्कृती पशुपालक असून, भटकी होती. हे संस्कृत भाषा बोलत असत. तसेच होमहवनाद्वारे, निसर्गपूजेवर विश्वास ठेवणारी असे होते. यांनी आपल्या निसर्गपूजेसाठी संस्कृत मधील विविध श्लोकांची/प्रार्थनांची निर्मिती केलेली होती. अशा रचनांना 'वेद' असे म्हंटले जाते. हे वेद ज्या भाषेत निर्माण झाले-म्हणजे संस्कृत भाषा; अशी संस्कृत भाषा बोलणाऱ्या भाषासमुहास 'आर्य' म्हणतात. तर हे वेद ज्या संस्कृतीत निर्माण झाले त्या संस्कृतीस 'वैदिक संस्कृती' असे म्हंटले जाते. या संस्कृतीची निश्चितपणे माहिती देणारी भौतिक साधने उपलब्ध नाहीत. तरी यांच्या वैदिक साहित्यातून मात्र या संस्कृतीच्या विविध अंगांची माहिती मिळते. ही संस्कृती सर्वसाधारणपणे इ.स.पू. १५०० च्या दरम्यान उदयास आली असे म्हणता येईल.

याठिकाणी या संस्कृतीच्या प्रारंभिक कालखंडाचा, म्हणजे उदय (इ.स.पू. १५००)ते पूर्व ऐतिहासिक काळापर्यंतचा (इ.स.पू. ६ वे शतक) विचार करावयाचा आहे.

हे वैदिक आर्य कोठून आले? त्यांचा वंश कोणता? असे विविध वादग्रस्त प्रश्न आर्यांशी निगडित आहे. काहींच्या मते हे आर्य परकीय (हंगेरी: गाईल्स-मॅक्डोनाल्ड; जर्मनी:, दक्षिण रशिया: घोष; इराण: मॅक्समूलर; उत्तरध्रुव: टिळक; तिबेट: पार्जिटर इ.) होते. तर काहींच्या मते हे आर्य हे स्थानिकच असून, हडप्पा संस्कृतीतूनच यांचा उदय झालेला दिसून येतो (बी.बी. लाल, एस.पी. गुप्ता वगैरे). अर्थात, दोन्हीही पक्षांचा मुद्दा निव्वळ तर्कावर आधारीत आहे असे लक्षात येते.

शिवाय, त्याकाळी देश, स्वदेश, परदेश या शब्दांनाच फारसा अर्थ नव्हता. सारे विश्वच मानवी कर्तृत्वाला खुले होते. आपल्या उपजीविकेसाठी हा मानव सर्वत्र भटकत असायचा.

तूर्त, सद्या; वैदिक आर्य हे परकीयच असून, वेगवेगळ्या टप्प्यात यांचे भारतात येणे झाले असे समजले जाते. त्याचबरोबर मुख्यत्वे हा एकच एक असा वंश नसून, संस्कृत बोलणारा एक भाषा समूह होता असे मत सर्वसाधारणपणे ग्राह्य धरले जाते. जसजसे अधिक संशोधक होत जाईल तसा या प्रश्नावर प्रकाश पडत जाईल.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ विभाग १ : वैदिक साहित्य :

हे आर्य निसर्गपूजक असून, होम हवनाद्वारे हे लोक इश्वरांची प्रार्थना करीत असत. अशा त्यांच्या

श्रध्दांतूनच, त्यांनी, संस्कृतमधून व्यापक अशा साहित्याची निर्मिती केली. हे साहित्य विविध ज्ञानी ऋषींनी निर्माण केलेले होते. यांचा वैदिक साहित्यातील शब्दांवर, त्यांच्या उच्चाराच्या तंत्रावर हुकुमत होती. तसेच, ते शब्द जसेच्या-तसेच उच्चारले जावे यावर त्यांचा कटाक्ष असे. त्यामुळे, त्याकाळातील वैदिक साहित्य आजही जसेच्या तसे आहे! याचे कारण म्हणजे गुरु-शिष्य परंपरेतून त्यांनी हे साहित्य, शब्द आणि उच्चाराकडे बारीक लक्ष देऊन, मौखिक परंपरेने शतकानुशतके जतन केलेले आहे.

वैदिक साहित्यामध्ये महत्वाचे आहेत ते म्हणजे प्रमुख चार वेद. पुढे याचबरोबर, या वेदांचा अर्थ स्पष्ट करणाऱ्या, चिंतन करणाऱ्या, कायदा-नियम सांगणाऱ्या अशा विविध रचनांचा समावेश होतो. या साहित्यातून वैदिक संस्कृतीची आपणास माहिती मिळते.

पूर्व वैदिक काळातील समाज हा सप्तसिंधु प्रदेशात वास्तव्य करुन होता. या काळात, त्यांचा इतर संस्कृतींशी फारसा संबंध येत नसे. मात्र पुढे, उत्तर वैदिक काळात त्यांचा भारताच्या विविध भागात विस्तार झाला. त्यांचा विविध समाज-संस्कृत्यांशी संबंध आला. यामुळे, त्यांच्या मूळच्या जीवनशैलीत-संस्कृतीत बदल होत गेला. हे त्यांच्या साहित्यातून दिसून येते. त्यामूळेच त्यांच्या या विविध टप्प्यातील निर्माण झालेल्या वैदिक साहित्याचा जर विचार केला तर आपल्याला या वैदिक संस्कृतीचे दोन उपभाग पाडता येतात; पूर्व वैदिक व उत्तर वैदिक.

अशा या वैदिक संस्कृतीचा विचार करण्यापूर्वी, तिची ज्यातून माहिती मिळते अशा वैदिक साहित्याची/साधनांची माहिती करुन घेणे आवश्यक आहे. वैदिक काळातील साहित्यात चार वेद, वेद स्पष्ट करणारी ब्राह्मणे, आरण्यके व उपनिषदांसारखी परिशिष्टं, आणि व्याकरणादि व तत्वज्ञानांचे विवेचन करणाऱ्या वेदांगे व षडदर्शनांचा समावेश होतो.

- **पूर्व वैदिक काळातील साहित्य**

या काळामध्ये फक्त ऋग्वेदाची निर्मिती झाली. त्यातही २ ते ९ मंडलं या काळात रचली गेली.

आर्यांची ही सर्वात प्राचीन रचना असून, याची एकूण १० मंडलं (प्रकरणं) आहेत. यामध्ये, १०२८ सुक्त (अध्याय) व त्यात १०५५२ ऋचा (श्लोक/प्रार्थना) आहेत. हे प्रत्येक मंडल एकेका ऋषीपरंपरेला वाहिलेले आहे. यात मुख्यत्वे ईश्वराचे स्तवन करणाऱ्या प्रार्थना आहेत. पुढील वेदांचा हा महत्वाचा आधार आहे.

- **उत्तर वैदिक काळातील साहित्य**

**अ) वेद**

**अ) ऋग्वेदातील उर्वरित मंडलं** : या काळात ऋग्वेदाची १ ले आणि १० वे मंडल तयार झाले आणि ऋग्वेदाची रचना पूर्ण झाली. यातील दहाव्या मंडलातील 'पुरुषसुक्त' हे महत्वाचे आहे. कारण वैदिक वर्णव्यवस्थेचा सर्वप्रथम उल्लेख या पुरुष सुक्तात सापडतो. ही वर्ण व्यवस्था वैदिक समाजाचे महत्वाचे लक्षण बनले.

**ब) यजुर्वेद :** ऋग्वेदातील ऋचा या होमहवन करताना म्हंटल्या जायच्या. हे होमहवन करण्याच्या पध्दतीबद्दल यामध्ये ऋचा आहेत. त्यामूळे, अर्थातच यामध्ये मुख्यत्वे ऋग्वेदातीलच ऋचा पुन्हा दिलेल्या आहेत. याचे दोन भाग आहेत (१) शुक्ल यजुर्वेद (२) कृष्ण यजुर्वेद

**क) सामवेद :** ऋग्वेदातील ऋचा म्हणावयाच्या पध्दतीबद्दल यात ऋचा आहेत. त्यामूळे अर्थातच यामध्ये ऋग्वेदातीलच ऋचा पुन्हा दिलेल्या असून (१६०३ पैकी १५०४ मूळ ऋग्वेदातीलच) त्या फक्त रागात/चालीत दिलेल्या आहेत. याचे एकूण दोन भाग आहेत; (१) आर्चिक-४८५ रागांचा संग्रह (२) उत्तरार्चिक-४०० गाण्यांचा संग्रह.

**ड) अथर्ववेद :** हा शेवटचा वेद. हा २० भागात असून यामध्ये ७३१ ऋचा आहेत. यामध्ये, जादूटोणा, भूतपिशाच, श्रध्दा, अंधश्रध्दा यांचा समावेश होतो.

असे हे वेद, वैदिक धर्मासाठी; आणि त्यातून विकसित झालेल्या हिंदूधर्मासाठी अत्यंत पवित्र असे ग्रंथ आहेत. हे अपौरुषेय आहेत असे मानले जाते. तसेच, यामध्ये कोणताही बदल करण्यावर निर्बंध आहेत. त्यामुळे, गुरुशिष्य परंपरेतून, हे ग्रंथ-व त्यातील रचना आजही जसेच्या तसे टिकून राहिलेले आहेत.

**ब) वेदांच्या परिशिष्ठ रचना : ब्राह्मणे, आरण्यके व उपनिषदे**

वेद निर्माण झाले. मात्र कालांतराने, वेद, त्यातील शब्द, त्यांचे अर्थ, त्यातील विचार हा स्पष्ट करुन सांगणे आवश्यक बनत गेले. त्यासाठी, हे ग्रंथ तयार झाले. वेदातील ज्ञान स्पष्ट करणे हाच उद्देश या ग्रंथांचा आहे.

या मुख्यत्वे गद्य रचना आहेत. यातील ब्राह्मण ग्रंथ हे वेदांतील यज्ञविधी स्पष्ट करतात; त्यांचे नियम सांगतात. उपनिषदे हे गुरुंकडून वेद समजून घेण्यावर, त्यांच्याशी अध्यात्मिक चर्चेवर भर देतात. तर आरण्यके ही चिंतनावर भर देतात.

'वेदांतील ज्ञान स्पष्ट करणे' हा उद्देश असल्याने, प्रत्येक वेदांची-तो, तो वेद स्पष्ट करणारी वेगवेगळी ब्राह्मणे, आरण्यके व उपनिषदे आहेत.

जसे, ऋग्वेदाची ऐतरेय, कौशितकी ही ब्राह्मणे; ऐतरेय, कौशितकी ही आरण्यके; तर ऐतरिय, कौशितकी ही उपनिषदे आहेत. तर यजुर्वेदाची तैतरीय व शतपथ ब्राह्मणे; तैतरिय, बृहत् ही आरण्यके; व तैतरिय, बृहत, काठक अशी उपनिषदे आहेत. तसेच, सामवेदाची ताण्ड्य, जैमिनिय अशी ब्राह्मणे तर छांदोग्य व जैमिनिय ही उपनिषदे आहेत. अथर्ववेदाची मुण्डक, प्रश्न ही उपनिषदे आहेत.

**क) व्याकरण-तत्वज्ञानादी रचना: सहा वेदांगे व षड्दर्शने**

पुन्हा या ग्रंथांचाही 'वेदांना स्पष्ट करुन सांगणे' हाच उद्देश आहे. इथे मुख्यत्वे वेदातील व्याकरण, त्यांतील तत्वज्ञान स्पष्टीकरणे आहे. यामध्ये सहा वेदांगे येतात. तशीच सहा दर्शने-षडदर्शने येतात.

यामधील वेदांगामध्ये, शिक्षा (वैदिक मंत्रांचे उच्चारण स्पष्ट करण्यासाठी शिकवण), कल्प (वैदिक यज्ञातील

नियमांचे विवेचन), व्याकरण (वैदिक भाषांचे व्याकरण), निरुक्त (वैदिक ऋचामधील शब्दांची व्युत्पत्ती), छंद (वैदिक ऋचा तालात म्हणावयाची पध्दती) व ज्योतिष (वैदिक यज्ञासाठी शकुन सांगणारे) यांचा समावेश होतो. हे सर्व वेदांचे एक प्रकारे उपग्रंथच असल्याने; तसेच वेदातीलच ज्ञान उलगडवून दाखणारे असल्याने, यांना 'वेदांगे' म्हंटलेले आहे.

त्याचप्रमाणे वेदांतील कर्मकांड, अध्यात्म, चिंतन, तत्वज्ञान उलगडून सांगणारे सहा ग्रंथ निर्माण झाले. यांना 'षड्‌दर्शने' असे म्हणले जाते. यामध्ये, न्याय (कर्ता-गौतम ऋषी: अनुमान-उपमान स्पष्ट करणारे तत्वज्ञान), सांख्य (कर्ता-कपिल: निरिश्वरवाद, जीवशिव ऐक्य इ.), योग (कर्ता-पातंजली: योगविद्या), वैशेषिक (कर्ता-कणाद: अणूविषयक), पूर्वमिमांसा (कर्ता-जैमिनी: वैदिक कर्मकांड) व उत्तर मिमांसा (कर्ता-बादरायण: विश्वरचना, अध्यात्म इ.) यांचा समावेश होतो.

अशाप्रकारे, या वैदिक साहित्यातून आपल्याला वैदिक संस्कृतीची माहिती मिळते. तिच्या दोन टप्प्यातून, वैदिक संस्कृतीच्या अंगांमध्ये कोणकोणते बदल झाले? हे ही आपल्याला लक्षात येते. यापुढे आपण, वैदिक संस्कृतीच्या विविध अंगांचा विचार करणार आहोत. आणि यातील बदल समजून घेण्यासाठी, प्रत्येक अंग हे पूर्व वैदिक काळात कसे होते? आणि उत्तर वैदिक काळात त्यामध्ये कोणते बदल झाले? हे लक्षात घेणार आहोत.

- **स्वयं-अध्ययन प्रश्न-१**

**अ. योग्य पर्याय निवडा.**

१. आर्यांच्या होम हवन करण्याच्या पध्दतीबद्दल ऋचा ............... या वेदात आहेत.

अ. ऋग्वेद　　ब. यजुर्वेद　　क. सामवेद　　ड. अथर्ववेद

२. ........... या वेदांगामध्ये वैदिक शब्दांची व्युत्पत्ती सांगीतलेली आहे.

अ. शिक्षा　　ब. निरुक्त　　क. व्याकरण　　ड. छंद

३. ........... या वेदांगामध्ये वैदिक ऋचा कशाला म्हणायच्या याची पध्दती सांगीतलेली आहे.

अ. शिक्षा　　ब. कल्प　　क. व्याकरण　　ड. छंद

४. ........... याने योगविद्या सांगीतली.

अ. गौतम　　ब. कपिल　　क. पातंजली　　ड. कणाद

५. ............... हा सांख्य या दर्शनाचा कर्ता होय.

अ. गौतम　　ब. कपिल　　क. पातंजली　　ड. कणाद

**ब. थोडक्यात उत्तरे द्या.**

१. आर्य म्हणजे कोण?

२. ऋग्वेदात किती मंडलं, सुक्तं आणि ऋचा आहेत?

३. सहा वेदांगे कोणती?

४. सहा दर्शने कोणती?

५. वर्णव्यवस्थेचा सर्वप्रथम उल्लेख कोणत्या वेदात, कोणत्या मंडलात आणि कोणत्या सूक्तात आलेला आहे?

## २.२.२ विभाग २: पूर्व ते उत्तर वैदिक काळातील बदलः राज्यसंस्था आणि आर्थिक परिस्थिती

● **राज्यसंस्था**

पूर्व वैदिक काळात लढाईच्या गरजांतून लढवय्या लोकांची व राजाची आवश्यकता निर्माण झालेली होती. या काळात प्रजेने राजा निवडायला सुरुवात केली. या काळात समाजात स्पष्ट असे विभाजन नव्हते. तरीही लढवय्ये लोकांची, वैवाहिक संबंधाद्वारे, एक वेगळी भावकी विकसित होत गेलेली होती. ही लढवय्यांची भावकी, प्रजेसाठी, या राजाची शिफारस अशी करीत असे.

राजा निवडला जरी गेला तरी त्याला कर घेण्याचा/न्यायदान करण्याचा अधिकार घेण्यासाठी धर्माची म्हणजेच पुरोहितांची गरज लागत असे. त्यामूळेच, राजा व लढवय्यावर्ग/त्याची भावकी (राजन्यः पुढे क्षत्रिय) तर पुरोहित (ब्राह्मण) या वर्गांचे महत्व वाढत गेलेले दिसून येते. या व्यवस्थेत राजाचे स्थान हे सर्वोच्च असून, तो आपल्या मंत्र्यांच्या सल्ल्याने व इतर अधिकाऱ्यांच्यामार्फत राज्यकारभार करत असे.

अर्थात या राजावर बरीच नियंत्रणं असत. याच्यावर त्याच्या भावकीचा दबाव असे कारण त्यांच्यातूनच त्याला शिफारस मिळत असे. तसेच, पुरोहिताचेही नियंत्रण असे कारण तो, राजाला धर्माची मान्यता मिळवून देत असे. तसेच, त्याकाळातील वैदिक सभा-समितीचेही त्याला ऐकावे लागे. कारण हीच मुख्य प्रजा असून, तेच राजाला मान्यता देत असत. तसेच मंत्रींना ही तो मान देत असे कारण त्याला राज्यकारभारासाठी हे मंत्री सल्ला देत असत. थोडक्यात, पूर्ववैदिक काळातील राजपद हे एक नियंत्रित राजपद असे.

यावेळी करव्यवस्था सक्तीची नव्हती आणि नियमितही नव्हती. तर कर हा नजराण्याच्या स्वरुपाचा आणि ऐच्छिक असे. त्याचप्रमाणे पायदळ, घोडदळ व रथदळ अशा स्वरुपाचे सैन्य जरी असले तरी ते कायमस्वरुपी नसे. तसेच सैन्याचे व्यवस्थिकरणही झालेले नव्हते. या काळात प्रशासनासाठी सर्वसाधारणत: राष्ट्र/जनपद (राजा हा प्रमुख)-विश (विशपती)-ग्राम(ग्रामिणी) अशी रचना असे. 'विश' म्हणजे सर्व प्रजा असल्याने, हे नजराणे देत असत. तर ग्राम हे विविध कुलांनी बनलेले असून कुलप्रमुखास 'कुलपती' असे म्हंटले जात होते. यांतील न्यायदानावर रुढी-परंपरेचाच प्रभाव दिसून येतो.

अशी वैदिक राज्यं/जनपद, त्यांच्या जमातीवरुन ओळखली जात असत.

पुढे, उत्तर वैदिक काळातील लढायांचे व इतर व्यापाचे प्रमाण वाढले. विस्तार वाढला. त्यामुळे राजाची अधिकच गरज वाढली. त्यामूळे राजाचे महत्व वाढले. यातून राजपद हे वंशपरंपरागत झाले. तसेच, राजा अश्वमेधासारखे मोठ्या प्रमाणावर यज्ञयागादि धार्मिक विधी करु लागला. त्यावेळी प्रचंड दक्षिणा- मोठ्या प्रमाणावर बळी, समुहभोजन देऊ लागला. अशाप्रकारे, राजाने, पुरोहितांकडून राज्य करण्याचा कायदेशीर आणि वंशपरागत अधिकारच प्राप्त करुन घेतले. त्यामूळेच त्याला कर घेण्याचा, न्यायदान करुन हिंसक शिक्षा देण्याचा सर्वोच्च अधिकार प्राप्त झाला. त्यामूळे राजा व त्याची भावकी (राजन्य/क्षत्रिय वर्ण) ही समाजातील सर्वोच्च सत्ता बनली. तर, या राजाला कायदेशीरपणा प्राप्त करुन देणारा पुरोहितवर्ग (ब्राह्मणवर्ण) सुध्दा सर्वोच्च बनला.

ही सत्ता टिकविण्याच्या हेतूने अशी वर्णव्यवस्था वंशपरंपरागत केली जाऊन जन्मावर आधारीत बनली. यामूळेच, नियमितपणे कर भरणे हे वैश्य वर्णाचे तर नियमिपणे सेवा-मजूरी करणे हे शूद्र वर्णाचे जन्माधिष्ठित कर्तव्यच बनले. अशा बंदिस्त वर्णव्यवस्थेला आधार देण्यासाठीच पुनर्जन्माचे सिध्दांत मांडले जाऊ लागले.

अर्थात यामूळे राजपद हे वंशपरंपरागत आणि अनियंत्रित बनले. त्याला निवडण्याचा प्रजेचा अधिकार संपुष्टात आला. राजावर नियंत्रण ठेवणाऱ्या विविध घटकांचे (मंत्री, सभा-समिती इ.) महत्व नाहीसे होऊन या संस्था मोडकळीस आल्या. पुढे पुढे तर राजाने, आपल्या भावकीचेही ऐकणे सोडून दिले. अशा राज्य व्यवस्थेतूनच, प्रत्येक बाबीचे आता व्यवस्थिकरण घडून आले, जसे मंत्री-अधिकाऱ्यांची कर्तव्ये निश्चित करण्यात आली, न्यायदानासाठी धर्मावर आधारीत रीतसर कायदे करण्यात आले, कर पध्दती सक्तीची झाली; ती व्यवस्थित करण्यात आली, सैन्य व्यवस्थित करण्यात येऊन त्यामध्ये श्रेणी पध्दती आली तसेच युध्दाचे नियम ही तयार झाले.

या काळातही वैदिक राज्यं/जन ही त्यांच्या जमातीच्या नावावरुन ओळखली जायची, जसे, तुर्वसू, यदू, पुरु, भरत इ.

● **आर्थिक परिस्थिती :**

पूर्व वैदिक काळातील वैदिक आर्य समाज हा मुख्यत्वे पशुपालक होता. गुरे-ढोरे पाळणाऱ्या या भटक्या समाजामध्ये 'गुरे' हीच संपत्ती होती. त्यामुळे अर्थातच गाईला प्रचंड महत्व होते. म्हणूनच, विवाह 'गोरज' मुहुर्तावर संपन्न होत, कुटुंबं 'गोत्रा' वरुन ओळखली जात. अर्थातच गुरे पळविण्यावरुनच वैदिक काळातील युध्दे होत. म्हणूनच या काळातील युध्दांना 'गविष्टी' असे म्हणले जात असे. या गुरांना चरण्यासाठी सामूहिक राखीव कुरणे असत.

याशिवाय शिकार, मासेमारी ही उपजीविकेची पारंपारिक साधने अजूनही वापरात होतीच. हे लोक प्रामुख्याने पशुपालक जरी असले तरी त्यांना शेतीचेही प्राथमिक ज्ञान होते. कारण, गुरांच्या कुरणाशिवाय काही जमिन लागवडीखाली आणल्याचेही उल्लेख मिळतात. ही जमिन कुटुंबांच्या मालकीची असे. यांना जमिन

ओलिताखाली आणण्याचे, खते वापरण्याचे व विळ्याने कापणी करण्याचे ज्ञान होते. यामध्ये गहू, बार्लि हीच मुख्य पीक असून पुढे तांदळाची लागवड करण्यास सुरुवात झाली. अर्थात ही शेती पूर्णपणे निर्वाह-स्वरुपाची होती.

याबरोबरच, या संस्कृतीत कारागीरीही दिसून येते. अर्थात, या काळात व्यवसायाचा जातींशी संबंध नसे. कोणत्याही व्यवसायात, कोणत्याही जातीची मक्तेदारी नव्हती. या समाजातील कारागीरीही सुतारकाम, कुंभारकाम, लोहारकाम, वीणकाम, शिवणकाम इ. लघुद्योगासारखी मर्यादित अशी होती. छोट्या प्रमाणावर व्यापारही असे; आपण त्याला 'विनिमय' असे म्हणू. हा व्यापार हा मुख्यत्वे वस्तुविनिमय पध्दतीचा असून; गाईं बरोबरच, कापड व कातडे यामध्येच प्रामुख्याने हा व्यापार चालत असे. गुरे सुध्दा विनिमयामध्ये वापरली जात. अर्थात, कारागीरी काय आणि व्यापार काय सर्व काही प्राथमिक स्तरावर असे. मर्यादित प्रमाणात चालत असे.

पुढे उत्तर वैदिक काळामध्ये अर्थव्यवस्था अशीच राहीली. फक्त एकंदर प्रमाणामध्ये विस्तार झाला. वाढ झाली.

यावेळीही पशुपालन हाच प्रधान व्यवसाय होता. तरी या समाजाचा, आता, शेतीकडे अधिकाधिक झुकाव झालेला दिसून येतो. पिकांमध्ये वैविध्य वाढून गहू, बार्ली, तांदूळ याचबरोबर कापूस, भाजीपालाही घेतला जाऊ लागला. शेतीसाठी नांगरणी आता ६ ते २४ बैलांचा नांगर वापरुन सुरु झाली. पिकांची नांगरणी, पेरणी, कापणी, मळणी इ. टप्पे आता अधिक व्यवस्थित होऊ लागले. पाणीपुरवठा करण्यासाठी शेतकरी प्रसंगी नदींना बांधही घालू लागले.

या काळात वर्णव्यवस्थाही अधिकाधिक कडक झाल्याने आता कारागीरीही जातींशी निगडित झाली. ती जन्माधिष्ठित झाली; वंशपरंपरागत झाली. ही कारागीरी विविध क्षेत्रात वाढली. या काळात वैदिक संस्कृतीच्या विस्तारामुळे, बाजारपेठही वाढलेली होती. देशी-विदेशी विविध संस्कृत्यांशी संबंध येऊन व्यापारामध्ये वैविध्याबरोबर विस्तारही झालेला होता. यामूळेच विशिष्ठ वस्तूंमध्ये व्यापार करणाऱ्या संघांची सुरुवात झाली. त्याचप्रमाणे वस्तूविनिमयाबरोबरच, थोड्याफार प्रमाणावर धातूंच्या तुकड्यांचा चलन म्हणून वापर सुरु झाला. बैलगाड्यांबरोबरच हा व्यापार प्रसंगी जलमार्गानेही होऊ लागला. या सर्व चलनवलनाचे व्यवस्थापन करणे आवश्यक बनले. त्यासाठी छोट्या मोठ्या व्यापारी केंद्रांचाही उदय होऊ लागला. अर्थात या बाबी अजूनही प्राथमिक स्तरावरच होत्या हे लक्षात घेतले पाहिजे. मात्र या बाबींमूळे आगामी पूर्व इतिहाकालिन नागरीकरणाची तयारी/कच्चा माल/पायाभूत बैठक तयार झालेली होती.

**● स्वयं-अध्ययन प्रश्न-२ :**

**अ. योग्य पर्याय निवडा**

१. उत्तर वैदिक काळात ............. या वर्णावर नियमित कर भरण्याची सक्ती असे.

अ. ब्राह्मण ब. क्षत्रिय क. वैश्य ड. शूद्र

२. राजन्य म्हणजे .............. ची भावकी होय.

अ. लढाऊ लोकांची ब. शेतकऱ्यांची क. व्यापाऱ्यांची ड. पुरोहितांची

३. वैदिक राज्य ला ........... असे म्हणले जात असे.

अ. विश ब. ग्राम क. कुल ड. जनपद

४. ............. वैदिक संस्कृतीचे प्रमुख उपजीविकेचे साधन होते.

अ. शेती ब. पशुपालन क. उद्योग ड. व्यापार

५. पूर्व वैदिक काळात ........... ही संपत्ती असे.

अ. गुरे ब. शेळ्या-मेंढ्या क. ऊंट ड. हत्ती

**ब. थोडक्यात उत्तरे द्या.**

१. पूर्व वैदिक काळात, राजावर कोणकोणती नियंत्रण असत?

२. पूर्व वैदिक काळात करव्यवस्था कशी असे?

३. वैदिक संस्कृतीमध्ये विवाह कोणत्या मुहुर्तावर संपन्न होत असे?

४. 'गविष्टी' म्हणजे काय?

५. वैदिक संस्कृतीच्या विनिमयामध्ये कोणत्या वस्तू वापरल्या जातात?

## २.२.३ विभाग ३: पूर्व ते उत्तर वैदिक काळातील बदलः समाज आणि धर्म :

● **समाज :**

पूर्व वैदिक काळातील वैदिक समाज हा सप्तसिंधुच्या प्रदेशात बऱ्यापैकी स्थिर झाला. हे लोक बांबू-चिखलाच्या झोपडीत रहात असावेत. यांची कुटुंबपध्दती एकत्रित होती तशीच पितृसत्ताक होती. त्यामुळे यांच्यात वयाने ज्येष्ठ अशा कुटुंबप्रमुखाच्या (गृहपती) नियंत्रणाखाली सारे कुटुंब असे. या काळातील स्त्रीला कुटुंबाप्रमाणेच, समाज जीवनातही महत्वाचे स्थान होते. पुरुषांच्या बरोबरीने या स्त्रिया शिक्षण, राजकारण, समाजकारण, चर्चा यामध्ये भाग घेत असत. यांच्यामध्ये, प्रौढविवाह, स्वेच्छेने विवाह, विधवा विवाह इ. बाबी प्रचलित असून स्त्रीयांची एकंदर परिस्थिती चांगली होती असे दिसते.

या समाजात फारसे भेद नसून, व्यवसायावरुन ब्राह्मण व राजन्य (क्षत्रिय) असे दोन महत्वाचे वर्ग होते असे दिसून येते. मात्र, कोणतेही भेद हे जन्मावर आधारीत नव्हते हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

शिक्षण हे गुरुगृही-आश्रमात चालत असून, राजाचे यास अनुदान असे. स्त्री-पुरुष या दोहोंनाही याठिकाणी प्रवेश असून, स्वतंत्र स्त्री शिक्षकांचीही सोय असे. लेखन कला जरी ज्ञात नसली तरी मौखिक

पाठांतराने ज्ञान संग्रहित केले जात होते. व्यावहारीक शिक्षणाबरोबरच नैतिक मूल्यांचीही शिकवण दिली जात असे.

हा समाज मुख्यत्वे पशुपालक असून यांच्या आहारात दुग्धजन्य पदार्थ, त्यासह मांसाहाराचा समावेश होता. तसेच, मद्यपानही नियमित चालत असे.

पुढे उत्तर वैदिक काळात वैदिक समाज हा आता भारताच्या विविध भागात विस्तारला. त्यांचा निरनिराळ्या समाज-संस्कृत्यांशी संबंध येऊ लागला. सामाजिक अभिसरण झपाट्याने होत होते. एकंदर संस्कृतीमध्ये बरेच बदल होत होते. ती अधिक गुंतागुंतीची होत गेली. त्यामूळे वैदिक संस्कृतीतील यम-नियमही कडक व गुंतागुंतीचे बनत गेले. याचा महत्वाचा फटका स्त्रीयांवर बसून त्यांचे स्वातंत्र्य मर्यादित केले गेले. त्यांचे विवाहाचे वय कमी करण्यात आल्याने त्यांना शिक्षण आपोआपच नाकारले गेले. त्यांच्यातील समाजातील वावरावर, पुनर्विवाहासारख्या बाबींवर निर्बंध घालण्यात येऊन, तिला उंबऱ्याआड करण्यात आले.

या काळात विवाहाचे आठ प्रकार दिसून येतात, जसे आर्ष, ब्राह्म, प्रजापत्य, दैव आणि गांधर्व, असूर, राक्षस, पिशाच्च असे. मात्र पहिल्या चार प्रकारांनाच मान्यता होती.

समाजातील बंडखोर लोकांना नियंत्रित करण्यासाठी तसेच कुटुंब व्यवस्था व व्यक्तीची सामाजिक बांधीलकी मजबूत करण्यासाठी आश्रमव्यवस्था निर्माण करण्यात आली. यामध्ये व्यक्तींच्या संपूर्ण आयुष्याचे चार भाग करण्यात आले. ब्रह्मचर्याश्रमातून शिक्षणाचे महत्व ठसवले गेले. पुढे, गृहस्थाश्रमात विवाह करणे, अपत्य जन्म, कुटुंबांची सेवा आणि सामाजिक कर्तव्ये यांना महत्व देण्यात आले. पुढे, वानप्रस्थाश्रमामध्ये; मुलाचा विवाह झाल्यावर, संसारातून पालकांनी निवृत्त होण्याला महत्व देण्यात आले. तर, शेवटी संन्यासाश्रमामध्ये, संन्यास घेण्याची परवानगी देण्यात आली.

तर, सांस्कृतिक सरमिसळीतून समाजातील वर्णभेद/वर्गभेद हा अधिक स्पष्ट स्वरुपात मांडला गेला. तो जन्मावर आधारीत करण्यात आला. राजन्य/क्षत्रिय, ब्राह्ण, वैश्य आणि शूद्र असे हे चार वर्ण होते. या काळात राजपद वंशपरंपरागत झाले आणि ते राजन्यांच्या भावकीतच राहिले. त्यामुळे हा राजन्यांचा/क्षत्रियांचा वर्ण सर्वोच्च ठरला. त्यानंतर, राजाला कायदेशीरपणा प्राप्त करुन देणारे ब्राह्मण महत्वाचे ठरले. या काळात यज्ञांचे महत्व वाढले; धर्मशास्त्रावर त्यांचा अधिकार निर्माण झाला. अशाप्रकारे या दोन वर्णांना समाजामध्ये महत्वाचे स्थान मिळाले. अर्थात, उत्पन्न मिळविण्याची जबाबदारी तिसऱ्या म्हणजेच वैश्य वर्णावर आली. हे शेती-व्यापार करीत आणि कर भरीत. काहीकाळ यांचेही समाजात महत्व राहिले. त्यानंतर, सर्व समाजाची सेवा करण्याची जबाबदारी शूद्र या चवथ्या वर्णाकडे आली. त्यात शुध्द-अशुध्द या कल्पनेतून अस्पृश्यांच्या वर्गांचा उदय झाला. थोडक्यात, ही वर्णव्यवस्था आता कठोर झाली. ती जन्माधिष्ठित झाली. त्यामुळे लाभ मिळविण्याचे सर्व क्षेत्र क्षत्रिय आणि ब्राह्मण यांच्याकडेच कायमस्वरुपी राहिले. राज्याला उत्पन्न मिळवून देणे आणि कर भरणे ही वैश्य वर्णांची कायमस्वरुपी जबाबदारी झाली. तर सर्वांची सेवा करणारे शूद्र हे ही कायमस्वरुपीच झाले.

पशुपालन हा यांचा महत्वाचा व्यवसाय जरी असला तरी शेतीचाही एक महत्वाचा उपजीविकेचा मार्ग म्हणून उदय झाला. अर्थात, आहारात शाकाहार, मांसाहार व मद्यसेवन हे पूर्वीचे घटक कायम राहीले.

● **धर्म :**

पूर्व वैदिक काळातील आर्य समाज हा मुख्यत्वे निसर्गपूजक होता. निसर्गातील शक्तींना व संकटांना त्याने इश्वर मानले. त्यांच्या कृपेसाठी तो स्तवन करीत असे; प्रार्थना म्हणत असे. या प्रार्थनांचा संग्रहच ऋग्वेदात आहे. हे स्तवन यज्ञाच्या साक्षीने केले जात असत. त्यामुळे, यज्ञ हे इश्वराच्या कृपाप्राप्तीसाठीचे एक साधन मात्र होते. असे यज्ञ घराघरातून केले जात असून, कुटुंबप्रमुख हे यज्ञ करीत असे. त्यांना स्त्रिया मदत करीत. तर कुटुंबप्रमुखाच्या अनुपस्थितीत स्त्रिया यज्ञ करीत. इंद्र, रुद्र, वरुण, अग्नी, सूर्य, वायू असे देव असून, यामध्ये इंद्राला महत्वाचे स्थान होते.

उत्तर वैदिककाळात मात्र धर्मामध्ये वैविध्य व गुंतागुंत निर्माण झाली. त्यामूळे धर्म व विधी यांचे विविध नियम करण्यात आले अणि ते कडक करण्यात आले. पूर्वी कृपाप्राप्तीसाठी यज्ञाचा वापर फक्त साधन म्हणून केला जायचा. आता यज्ञ जर व्यवस्थित केले गेले तर इश्वराला कृपा ही करावीच लागते असा समज करुन देण्यात आला. त्यामूळे यज्ञ व्यवस्थित करणेही एक महत्वाची बाब बनली. त्यामुळे पूर्वी साधन असणारे यज्ञ आता एकमेव साध्य ठरले.

अर्थातच, हे यज्ञ व्यवस्थित करणाऱ्या पुरोहित वर्गाचे प्रचंड महत्व वाढले. यज्ञातील वैविध्य आणि गुंतागुंत लक्षात घेता, पुरोहित वर्गाने यज्ञ करणे हे क्षेत्र आपल्या ताब्यात घेतले. आणि जन्माधिष्ठित वर्णव्यवस्थेमुळे ते त्याच वर्गात कायमस्वरुपी राहिले. अर्थातच, यज्ञ करणे हा पुरोहित वर्गाचा हक्क बनला. कुटुंबप्रमुखाकडून हा अधिकार काढून घेण्यात आला. परिणामी यज्ञामध्ये वैविध्य आणि नियमामध्ये गुंतागुंत निर्माण झाली. आणि त्यानुसार, पुरोहितांमध्येही वैविध्य निर्माण झाले. यातून प्रचंड खर्चाचे आणि वेळ खाऊ असे एक कर्मकांडच तयार झाले.

यातूनच, देवादिकांमध्येही वैविध्य व संख्या वाढली. त्यांचे तीन गटांमध्ये (कोटी) वर्गीकरण झाले. प्रत्येक गटामध्ये ११ देव आणि त्यातील प्रमुख १ अशी रचना तयार झाली. अंतरिक्ष गटाचा इंद्र, आकाश गटाचा सूर्य तर पृथ्वी गटाचा अग्नी हा प्रमुख देव झाला. पुढे सूर्य देवतेचे महत्व वाढून पुढे यातूनच विष्णू या देवतेचा उदय झाला. तर रुद्र या देवतेतून, शिव या देवतेचा उदय झाला. या काळातील सामाजिक अभिसरणातून, इतर संस्कृत्यांतील देवादिकांचा व विधींचाही समावेश वैदिक संस्कृतीत होऊ लागला. यातून देवतांची संख्या वाढत गेली. त्याचप्रमाणे, विविध प्रकारच्या मूर्तीपूजा, प्राणीपूजा, जादूटोणा, अंधश्रध्दा इ. बाबी विकसित होऊ लागल्या.

याच काळात व्यक्तीच्या आयुष्यातील विविध टप्प्यांना/बदलांना सामाजिक मान्यता देणे आवश्यक बनू लागले. यातूनच संस्काराच्या संकल्पनेचा उदय झाला. व्यक्तीच्या गर्भावस्थेपासून, त्यांच्या मृत्युपर्यंत विविध शारिरिक/मानसिक बदलाचे टप्पे येत असतात. याला कुटुंब तसेच समाजाचाही आधार लागत असे. यासाठी, या प्रत्येक टप्प्यावर संस्कारांची व्यवस्था करण्यात आली. या कार्यक्रमांत सारे कुटुंब आणि समाज उपस्थित असल्याने, त्या व्यक्तीला एक आधार, मान्यता मिळत असे. जसे, जातकर्म (बाळ जन्माला आल्यानंतर लगेच),

नामकरण (बारसं), कर्णवेध (कानाच्या पाळीला छिद्र पाडणे), निष्क्रमण (बाळाला पहिल्यांदा अंगणात नेणे) अन्न प्राशन (बाळाचा पहिला शिजवलेला खाऊ), वर्षवर्धन (पहिला वाढदिवस), चूडाकर्म/चौल (जावळ काढणे), उपनयन (पहिल्यांदा शाळेला जाताना), विवाह (यात काही उपसंस्कारांचे टप्पे), अंत्यसंस्कार आदि असे १६ प्रमुख संस्कार निर्माण झाले.

तर, कुटुंबातील जबाबदारी आणि सामाजिक कर्तव्याचे पालन यासाठी धर्म, अर्थ, काम, मोक्ष असे चार पुरुषार्थही तयार केले गेले. प्रत्येकाने आपल्या धर्माचे पालन करावे, धर्म विहित कर्तव्यांचे पालन करावे, आपापल्या वर्णानुसार जबाबदाऱ्या पार पाडाव्यात म्हणजे धर्म हा पुरुषार्थ. तर समाजमान्य उपजिविकेचे पालन करावे म्हणजे अर्थ. विवाह करुन, अपत्यांना जन्म देणे म्हणजे काम हा पुरुषार्थ. तर, जन्म-मृत्युच्या फेऱ्यातून सुटका करुन घेण्यासाठी म्हणजेच मोक्ष (मुक्ती) मिळविण्याच्या प्रयत्नात राहणे म्हणजे मोक्ष हा पुरुषार्थ होय.

**● स्वयं-अध्ययन प्रश्न-३ :**

**अ. योग्य पर्याय निवडा.**

१. .............. या आश्रमातून शिक्षणाचे महत्व अधोरेखित करण्यात आले.

अ. ब्रह्मचर्याश्रम  ब. गृहस्थाश्रम  क. वानप्रस्थाश्रम  ड. संन्यासाश्रम

२. ............ या आश्रमामध्ये, विवाह करुन अपत्य जन्म देणे, कुटुंब आणि समाजाची सेवा करणे हे अपेक्षित होते.

अ. ब्रह्मचर्याश्रम  ब. गृहस्थाश्रम  क. वानप्रस्थाश्रम  ड. संन्यासाश्रम

३. विष्णू या देवतेचा विकास .............. या देवतेतून झाला.

अ. इंद्र  ब. सूर्य  क. वरुण  ड. रुद्र

४. शिव या देवतेचा विकास ............... या देवतेतून झाला.

अ. इंद्र  ब. सूर्य  क. वरुण  ड. रुद्र

५. ............. ही पृथ्वीवरील देवतांची प्रमुख देवता होती.

अ. अग्नी  ब. मरुत  क. वरुण  ड. रुद्र

**ब. थोडक्यात उत्तरे द्या.**

१. पूर्ववैदिक काळातील स्त्रीचे स्थान कसे होते?

२. वैदिक संस्कृतीत कोणत्या प्रकारांच्या विवाहांना समाजमान्यता होती?

३. उत्तर वैदिक काळात देवतांचे कोणते गट होते? प्रत्येकाची प्रमुख देवता कोण होती?

४. कर्णवेध संस्कार म्हणजे काय?

५. उपनयन संस्कार म्हणजे काय?

**२.२.४ विभाग ४: महाकाव्येः रामायण आणि महाभारत :**

रामायण आणि महाभारत ही दोन महाकाव्ये. यांना 'इतिहास' असेही म्हणले जाते. यांनी निव्वळ भारतावर नव्हेतर जगावर आपला प्रभाव टाकलेला आहे.

सर्वसाधारणतः असा समज आहे की, रामायण प्रथम आणि महाभारत हे नंतर निर्माण झाले. तर ते तसे नसून, महाभारत हे प्रथम निर्माण झाले. कारण महाभारतामध्ये जी राज्य पध्दती आहे ती जमातीवर आधारीत अशी पध्दती आहे. तसेच, ते ज्या भूभागात घडते, तो फक्त उत्तर भारताचा मर्यादित असा आहे. याउलट, रामायणामधील राज्यपध्दती ही व्यवस्थित राजसत्तात्मक राज्य पध्दती आहे. प्रादेशिक ओळख असलेली ही राज्ये आहेत. शिवाय, रामायणामध्ये वर्णिलेल्या भूगोलात भारताचा व्यापक भूप्रदेश येतो. या काळात आर्यीकरण हे भारताच्या दक्षिण टोकापर्यंत पोचू लागले होते असे दिसते.

दोन्ही महाकाव्ये, मूळ स्वरुपात, इसपू १० व्या ते ८ व्या शतकाच्या दरम्यान निर्माण झालेली दिसून येतात.

● **महाभारत :**

महर्षी वेद व्यासांनी हे महाकाव्य लिहिले. व्यास, महाभारताला 'इतिहास' असे म्हणतात. व्यासांनी आपला शिष्य वैशंपायन याला महाभारत सांगीतले. पुढे वैशंपायनने, जनमेजय राजाला हे सांगीतले. नंतर, नैमिषारण्यात, उग्रश्रवासौती याने, एका यज्ञाच्यावेळी जमलेल्या ऋषींना हे महाभारत पुन्हा सांगीतले. याला 'जय', 'इतिहास', 'महाभारत' अशी विविध नावे आहेत.

हस्तीनापूर येथे राज्य करणाऱ्या कुरु जमातीतील, चुलत भावांमधील, कुरुक्षेत्र येथे घडलेल्या युध्दाची कथा ही महाभारतातील मुख्य कथा आहे.

यात एकूण १८ पर्व आणि जवळजवळ १ लाख श्लोक आहेत.

**१. आदिपर्व** : महाभारत केंव्हा, केंव्हा सांगीतले गेले, कौरव आणि पांडवांचे पूर्वज, कौरव, पांडवांचे बालपण.

**२. सभापर्व** : पांडवांचे लग्न, द्यूताचा खेळ, इंद्रप्रस्थ नगरीची स्थापना, द्रौपदीचा भर सभेत अपमान, पांडवांचे वनवासाला निघून जाणे.

**३. वनपर्व** : पांडवांचा १२ वर्षांचा वनवास.

**४. विराटपर्व** : १३ व्यावर्षी, म्हणजे अज्ञातवासातील पांडव, विराटाच्या राज्यात.

**५. उद्योग पर्व** : कौरव आणि पांडवांची युध्दाची तयारी, कृष्णाची असफल शिष्ठाई.

**६. भिष्म पर्व** : युध्द सुरु, भिष्माच्या नेतृत्वाखाली कौरवांची लढाई, ते शरपंजरी पडतात. याच पर्वात 'श्रीमद् भगवतगीता' येते. यात १८ अध्याय आणि ७०० श्लोक आहेत. हा, कृष्णाने, अर्जुनाला केलेला उपदेश आहे.

**७. द्रोण पर्व** : द्रोणाच्या नेतृत्वाखाली कौरव. त्यांचा अंत.

**८. कर्ण पर्व** : कर्णाच्या नेतृत्वाखाली कौरव, त्याचा अंत.

**९. शल्य पर्व** : शल्याच्या नेतृत्वाखाली कौरव. भीमाच्या हल्ल्याने दुर्योधन जखमी. तो मरणासन्न.

**१०. सौप्तिक पर्व** : झोपलेल्या पांडवांच्या छावणीवर अश्वत्थाम्याचा हल्ला, पांडवांचा वंश उच्छेद करण्याचा प्रयत्न. समाधानाने दुर्योधन प्राण सोडतो.

**११. स्त्री पर्व** : पराभूत कौरवांच्या स्त्रियांची रणभूमीला भेट, त्यांचा आक्रोश.

**१२. शांती पर्व** : युधिष्ठीराचा राज्याभिषेक होतो.

**१३. अनुशासन पर्व** : राजाने कसे लोककल्याणकारी असावे? याचा भिष्माकडून उपदेश.

**१४. अश्वमेध पर्व** : अर्जुनाच्या नेतृत्वाखाली अश्वमेधाचा प्रवास. त्याचा दिग्वीजय.

**१५. आश्रमवासिका पर्व** : धृतराष्ट्र, गांधारी आणि कुंतीचे अरण्यात निघून जाणे. तेथे त्यांचा मृत्यु.

**१६. मौसूल पर्व** : द्वारकेत यादवांचे एकमेकांतील युध्द-यादवी युध्द, यादवांचा अंत. कृष्णाचा मृत्यु.

**१७. महाप्रस्थानिका पर्व** : पांडव आणि द्रौपदीचे भारत भ्रमण आणि शेवटी हिमालयामध्ये. तेथे युधिष्ठिर वगळता, सर्वांचा मृत्यु.

**१८. स्वर्गारोहण पर्व** : युधिष्ठिराची परिक्षा आणि विजय. सर्वांचे स्वर्गाला जाणे.

या १८ पर्वाबरोबरच, एक खिल किंवा उपपर्व आहे. याला 'हरीवंशपर्व' असे म्हणतात. येथे कृष्णाचे चरित्र दिलेले आहे.

यामध्ये पुढे प्रसिध्द झालेल्या अन्यही काही कथा आहेत जसे, हरिश्चंद्र, सत्यवान सावित्री, नलदमयंती, शकुंतला, कच-देवयानी, पुरुरवा-उर्वशी इ.

महाभारत हे लोकप्रिय महाकाव्य आहे. त्यामुळे, भारतातील विविध भाषांमध्ये महाभारताची रुपांतरे झालेली आहेत. त्याचप्रमाणे जगामध्येही रुपे दिसतात; विशेषतः आग्नेय आशियामध्येही रुपं दिसून येतात.

- **रामायण :**

हे महर्षी वाल्मिकी यांनी रचले. कोसल राज्यातील, अयोध्या हे शहर. येथील इक्ष्वाकू घराण्यातील, सूर्यवंशी राजा म्हणजे राम होय. याची ही कथा आहे.

एकूण ७ कांडात आणि २४,००० श्लोकांचे हे महाकाव्य आहे. साधारण इसपू च्या ८-७ व्या शतकामध्ये हे रचलेले असावे. यात सात कांडात बाल, अयोध्या, अरण्य, किष्किंधा, सुंदर, युध्द आणि उत्तर यांचा समावेश होतो.

● बालकांडमध्ये रामाचे बालपण, त्याचा परिवार, त्याचे शिक्षण, सीतेशी विवाह आणि अयोध्येला परत येणे हे प्रसंग येतात.

● अयोध्याकांडमध्ये रामाचा राज्याभिषेक करण्याचे ठरते. मात्र कैकेयीच्या हस्तक्षेपामुळे त्याला वनवासाला जावे लागते. तो, सीता आणि लक्ष्मणासह वनांकडे निघून जातो. त्याने परत फिरावे अशी भरताची विनवणी तो अमान्य करतो.

● अरण्यकांडामध्ये रामाचा १३ वर्षाचा वनवास पूर्ण होतो. पंचवटीच्या अरण्यात, सीतेचे अपहरण होते. जटायूचा प्रसंग येतो. सीतेचा शोध सुरु होतो.

● किष्किंधाकांडमध्ये राम आणि हनुमानाची भेट होते. वाली-सुग्रीवाचा प्रसंग घडतो. हनुमानाला कळते की सीतेला रावणाने पळवलेले आहे. ती लंकेत आहे.

● सुंदरकांड हे हनुमानाच्या पराक्रमाला वाहिलेले आहे. त्याचे सीतेला, रामाचा निरोप सांगणे. लंकेत गोंधळ घालणे. आणि, बातमीसह, रामाकडे परत येणे हे प्रसंग येतात.

● युध्दकांडामध्ये राम आणि रावणाचे युध्द येते. रावणाचा वध होतो. राम सीता भेटतात. सीतेची अग्नीपरिक्षा होते. रामसीता, सर्वांसह अयोध्येला परत येतात.

● उत्तरकांड हे नंतर रचलेले आहे. वास्तविक युध्दकांडानंतर मूळ रामायण संपन्न होते. पण हा भाग नंतर जोडलेला आहे. यामध्ये रामाचे राज्य, सीतेला जंगलात पाठवणे, लवकुशांचा जन्म, सीतेचा मृत्यु, रामाचा मृत्यु हे प्रसंग येतात.

महर्षी वाल्मिकींनी जरी हे रचले असले तरी भारतभर रामायणाची विविध रुपे दिसून येतात जसे, मराठीतील एकनाथांचे भावार्थ रामायण, गोंड आदिवासींचे रामायण, जैन रामायण, तामीळ भाषेतील कंबनचे रामावतरम, तेलुगूतील गोणारेड्डीचे रंगनाथ रामायण, मल्याळीतील अधात्म्य रामायण, आसामीत माधव कंदलीचे सप्तकांड रामायण, बंगालीत कृतीबास ओझा चे क्रितीवासी रामायण, उडियातील बलराम दास चे जगमोहन रामायण, हिंदीतील तुलसीदासांचे रामचरित मानस. त्याचप्रमाणे जगातही रामायणची रुपे दिसतात, कंबोडिया, ब्रह्मदेश, थायलंड, इंडोनेशिया, फिलिपाईन्स, लाओस इ. आग्नेय आशियाई देशात; त्यांची, त्यांची रामायणाची रुपे आहेत. थोडक्यात, रामायणाने भारतासह, जगावरही मोहिनी टाकलेली आहे असे दिसून येतात.

**महाकाव्यांची वैशिष्ट्ये :**

● ही महाकाव्ये एकेका व्यक्तीने लिहिली असे मानले जाते. मात्र, एकंदर यांची प्रचंड व्याप्ती पाहता हे अशक्य वाटते. मूळातही महाकाव्ये छोटी असावीत, पुढे त्यामध्ये भर पडत गेली असे वाटते. त्याचप्रमाणे, विविध 'सूत'

(राजाचा सारथी) जे असत, त्या सूतांद्वारे या कथा प्रसारीत झालेल्या दिसून येतात. पुढे, या कथांचे संकलन ऋषींनी केले असावे. म्हणजेच, ही महाकाव्ये, प्रथम लोककथांच्या स्वरुपात असावीत, पुढे त्यांचे प्रमाण महाकाव्यात रुपांतर झाले असावे.

- तसेच, अगदी सुरुवातीला, गुरुशिष्यांच्या मौखिक परंपरातूनच ही महाकाव्ये पुढे जात राहीली. पुढे भूर्जपत्र/ताडपत्र यांवर लिहिली गेली. पुढे कागदावर लिहिली गेली. आणि आता त्यांची छपाई होते.

- यातील, महाभारत हे मानवाच्या सर्व गुण-अवगुणांवर प्रकाश टाकते. तर रामायण हा कुटुंबसंस्थेबाबत आदर्श निर्माण करते.

- ही महाकाव्ये फक्त गोष्टी सांगत नाहीत. तर, राजाने लोककल्याणकारी कसे वागावे? कुटुंबामध्ये कसे वागावे? समाजात, सामाजिक बांधीलकीने कसे वागावे? पुरुषार्थ म्हणजे काय? अशा विविध माध्यमातून, लोकशिक्षण करतात; त्यांच्यावर संस्कार करतात.

- 'कर्तव्याला प्रधान स्थान' (कर्मयोग) देणाऱ्या भगवत्‌गीतेला भारतीय संस्कृतीत मानाचे स्थान आहे. तो हिंदूचा धर्मग्रंथ समजला जातो. भारतीय विद्वानांवर या ग्रंथाची खूप मोहिनी आहे. शंकराचार्य, रामानुजाचार्य, संत ज्ञानेश्वर, लोकमान्य टिळक अशा विद्वानांनी गीतेचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केलेला आहे.

- ही महाकाव्ये इतिहासाचे महत्वाचे साधन ग्रंथ आहेत. इ.स.पू. १० ते ६ व्या शतका दरम्यान भारत कसा होता याचे दर्शन यातून घडते. तत्कालिन भूगोल, राजकीय जीवन, सामाजिक जीवन, आर्थिक जीवन, धार्मिक जीवन, कलात्मक जीवन अशा तत्कालिन संस्कृतीच्या सर्व अंगांची माहिती मिळते.

- या महाकाव्यांचा काळ हा इसपू १० ते ६ वे शतक जरी असला तरी, काळाच्या ओघात त्यामध्ये अनेक गोष्टींची भर पडत गेलेली आहे. त्यांचे पुनर्लेखन वारंवार घडत आलेले आहे.

- ही महाकाव्ये अन्य महत्वाच्या गोष्टींवरही प्रकाश टाकतात, जसे, राजपदाचे स्वरुप काय होते? विविध संस्कृतींमध्ये कसे संबंध होते? वैदिक संस्कृतीचा प्रसार कसा झाला? अशा अनेक बाबींची आपल्याला माहिती मिळते.

- पूर्वी वैदिक संस्कृती ही गंगेपर्यतच मर्यादित होती. या महाकाव्यांनीच खऱ्या अर्थाने, दक्षिणेमध्ये, वैदिक संस्कृतीचा प्रसार केला. हा प्रवास या महाकाव्यांतूनही दिसून येतो.

- महाकाव्यातील एकेकाळचे नायक, पुढेही प्रभाव टाकत राहिले. काही काळानंतर, त्यांचे देवांमध्येही रुपांतर झालेले दिसून येते. जसे, कृष्ण, राम, सीता, हनुमान.

- ही महाकाव्ये संस्कृत भाषेतील अजरामर कृती समजल्या जातात. यांची भारतातील विविध भाषांमध्ये रुपांतरे आहेत. शिवाय आग्नेय आशियातील देशांमध्ये ही रुपांतरे दिसून येतात. शिवाय, याची भाषांतरेही विविध युरोपियन भाषेत झालेली आहेत.

● या महाकाव्यांमुळे शिल्पकला, चित्रकला, सादरीकरणाच्या कला अशा कलेच्या प्रत्येक प्रांतावर आपला ठसा उमटवलेला आहे.

● या महाकाव्यांनी विविध कला प्रकारांवर प्रभाव टाकलेला आहे. लोककलांवरही या महाकाव्यांचा प्रभाव दिसून येतो. जसे चित्रपट, नाटक, संगीत नाटक, तमाशे, रामलीला, दशावतार, यक्षगान, कथकली, पपेटस् चे खेळ इ. आणि हे फक्त भारतातीलच नव्हे. तर आग्नेय आशियातीलही संगीत नाटके, नृत्य नाटके ही महाकाव्यांवर आधारीत आहेत.

**● स्वयं अध्ययन प्रश्न–४ :**

**अ. योग्य पर्याय निवडा.**

१. महाभारताची मूळ कथा म्हणजे .......... जमातीतील भावांतील युध्द होय.

अ. यदू   ब. पुरु   क. तुर्वसू   ड. कुरु

२. महाभारतात एकूण ............ पर्व आहेत.

अ. १२   ब. १६   क. १८   ड. ७

३. 'भगवद्‌गीता' ही महाभारताच्या .......... पर्वात येते.

अ. भिष्मपर्व   ब. द्रोणपर्व   क. कर्णपर्व   ड. शल्यपर्व

४. रामायणात, सीतेचे हरण हा प्रसंग ........... मध्ये येतो.

अ. बालकांड   ब. अयोध्याकांड   क. अरण्यकांड   ड. किष्किंधाकांड

५. ............ यांनी 'भावार्थ रामायण' लिहिले.

अ. संत एकनाथ   ब. रामदास   क. तुलसीदास   ड. सुरदास

**ब. थोडक्यात उत्तरे द्या.**

१. 'भगवत्‌गीतेत' किती अध्याय आणि किती श्लोक आहेत?

२. महाभारताच्या कोणत्या पर्वामधून, कल्याणकारी राजाची वैशिष्ट्ये सांगीतलेलीआहेत?

३. महाभारतीतील 'मौसूल पर्व' कशाची माहिती देते?

४. रामायणात किती कांड आणि श्लोक आहेत?

५. हनुमानाचा पराक्रम कोणत्या रामायणाच्या कोणत्या कांडात येतो?

## २.३ सारांश :

हडप्पा संस्कृतीच्या ऱ्हासानंतर, साधारण २०० वर्षानंतर, वायव्य भारतामध्ये एका वेगळ्या संस्कृतीचा

परिचय होऊ लागतो. ही वैदिक संस्कृती. प्रारंभी, ही संस्कृती या सप्तसिंधूच्या प्रदेशामध्येच विचरण करीत असते. हा एक भटका, पशुपालक, साधा समाज असतो. यावेळी हा समाज समता प्रधान, समानसंधी असणारा, भेद नसणारा, सभा-समितीसारख्या लोकसंस्थेचे महत्व असणारा असा असतो. पुढे, फक्त सप्तसिंधूच्याच प्रदेशात वितरीत झालेला हा समाज, उत्तरवैदिक काळात विविध संस्कृत्यांशी संबंधित होतो. यातूनच सामाजिक अभिसरण होऊ लागते. यातून एकीकडे शेती, कारागीरी, व्यापार हा विकसित होतो. त्याचबरोबर स्वत:च्या संस्कृतीची वेगळी ओळख जपण्यासाठी नियमांना कडक केले जाते. आश्रम, ऋण, पुरुषार्थ अशा संकल्पनांतून व्यक्तीची कुटुंबाप्रती तसेच समाजाप्रति बांधीलकी या कर्तव्यांची जाणीव करुन दिली जाते. संस्कारासारख्या संकल्पनेतून, व्यक्तीच्या शारीरिक-मानसिक बदलांना मान्यता आणि पाठिंबा दिला जाते. त्याचबरोबर, सत्ता टिकविण्याच्या लालसेतून समाजातील क्षत्रिय व ब्राह्मणवर्ण; वर्णव्यवस्था निर्माण करतात. ती जन्माधिष्ठित, कडक व साचेबंद करतात. स्त्रीयांवर बंधने येतात. एकंदर या सर्व प्रक्रियेत कायदेशीरपणा येण्यासाठी धर्माचे महत्व वाढल्याने कर्मकांडाबरोबर प्रचंड खर्चाचे व हिंसेचे असे विधी निर्माण होतात. मात्र, या व्यवस्थेतून व्यापार-शेती करुन कर भरणारा वैश्य वर्ण व शारिरिक कष्ट करणारा शूद्र वर्ण हा खालच्या पातळीवर फेकला जातो. या वैदिक संस्कृतीतील दोन्ही काळातील बदल आपल्याला वैदिक साहित्यातून लक्षात येतो. याच उत्तर वैदिक काळामध्ये महाभारत आणि रामायणही महाकाव्ये घडतात. नायकांच्या कथांद्वारे, लोकसंस्कार करणे, लोकशिक्षण देणे हा या महाकाव्यांचा हेतू असतो. आजही, या महाकाव्यांची मोहिनी; भारताप्रमाणेच, साऱ्या जगावर पडलेली आहे.

## २.४ पारिभाषिक शब्द :

गविष्टी : गाईंचा शोध.

अश्वमेध यज्ञ : राज्य विस्तारासाठी करावयाचा यज्ञ.

पुनर्जन्म : मृत्युनंतर शरीर नष्ट होते. मात्र आत्मा पुन्हा, पुन्हा वेगवेगळ्या रुपात जन्म घेत राहतो अशी धारणा.

भावकी : रक्तसंबंधाने निर्माण झालेला समूह.

नजराणा : भेटी

निसर्गपूजक : निसर्गातील शक्तींना देवता मानून, त्यांचे पूजन करणारे.

वस्तूविनिमय : चलन/नाणी याऐवजी, वस्तूंची देवाण घेवाण करुन विनिमय केला जातो.

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

- **स्वयं अध्ययन प्रश्न-१**

**अ. योग्य पर्याय निवडा.**

१.ब. यजुर्वेद २.ब. निरुक्त ३.ड. छंद ४.क. पातंजली ५.ब. कपिल

**ब. एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. संस्कृत भाषा बोलणाऱ्या भाषा समूहास आर्य असे म्हणतात.

२. १० मंडलं, १०२८ सुक्त, १०५५२ ऋचा आहेत

३. शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद, ज्योतिष

४. न्याय, सांख्य, योग, वैशेषिक, पूर्वमिमांसा, उत्तरमिमांसा

५. ऋग्वेदात, १० व्या मंडलात, पुरुष सुक्तात

● **स्वयं अध्ययन प्रश्न-२**

**अ. योग्य पर्याय निवडा.**

१. क. वैश्य  २. अ. लढाऊ लोकांची  ३. ड. जनपद

४. ब. पशुपालन  ५. अ. गुरे

**ब. एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. भावकी, पुरोहित, सभा-समिती, मंत्री

२. नजराण्याच्या स्वरुपात आणि ऐच्छिक

३. गोरज

४. गुरे पळविण्यावरुनच वैदिक काळातील युध्दे होत. म्हणूनच या काळातील युध्दांना 'गविष्टी' असे म्हणले जात असे.

५. कापड, कातडे, गाई

● **स्वयं अध्ययन प्रश्न-३**

**अ. योग्य पर्याय निवडा.**

१. अ. ब्रह्मचर्याश्रम  २. ब. गृहस्थाश्रम  ३. ब. सूर्य

४. ड. रुद्र  ५. अ. अग्नी

**ब. एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. पूर्ववैदिक काळात स्त्रियांना कुटुंबाप्रमाणेच, समाजजीवनात महत्वाचे स्थान होते.

२. आर्ष, दैव, ब्राह्म आणि प्रजापत्य

३. अंतरिक्ष गटाचा इंद्र, आकाश गटाचा सूर्य तर पृथ्वी गटाचा अग्नी

४. बाळाच्या कानाच्या पाळीला छिद्र पाडणे.

५. पहिल्यांदा शाळेत प्रवेश करताना करावयाचा संस्कार.

● **स्वयं अध्ययन प्रश्न–४**

**अ. योग्य पर्याय निवडा.**

१. ड. कुरु    २. क. १८    ३. अ. भिष्मपर्व

४ .क. अरण्यकांड    ५. अ. संत एकनाथ

**ब. एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. १८ अध्याय आणि ७०० श्लोक.

२. अनुशासनपर्व

३. द्वारकेत यादवांचे एकमेकांतील युध्द–यादवी युध्द, यादवांचा अंत. कृष्णाचा मृत्यु.

४. ७ कांड, २४००० श्लोक

५. सुंदरकांड

**२.६ सरावासाठी स्वाध्याय :**

**अ. टीपा**

१. वैदिक साहित्य

२. रामायण

३. महाभारत

४. वैदिक राजपद

५. वैदिक धर्म

**ब. दीर्घोत्तरीप्रश्न**

१. वैदिक काळातील राजकीय आणि आर्थिक परिस्थिती स्पष्ट करा.

२. वैदिक काळातील सामाजिक आणि धार्मिक परिस्थिती स्पष्ट करा.

३. रामायण आणि महाभारत या महाकाव्यांचे महत्व स्पष्ट करा.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ :

१. भट, यशवंत आबाजी. धर्मशास्त्राचा इतिहास, पूर्वार्ध आणि उत्तरार्ध. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ. १९८०

२. जोशी, महादेवशास्त्री. भारतीय संस्कृतीकोश,

३. थापर, रोमिला (मराठी अनुवाद), अर्लि इंडिया. के' सागर प्रकाशन. पुणे.

४. ढवळीकर, म.के. आर्यांच्या शोधात. राजहंस प्रकाशन. पुणे.

❖❖❖

# घटक – ३

# दुसरे नागरीकरण

**अनुक्रमणिका :**

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ दुसरे नागरीकरणाचे स्वरुप

३.२.२ महाजनपदे – सोळा महाजनपदांचा उदय

३.२.३ आजीविक पंथ, बौद्ध आणि जैन धर्म, सुधारक पंथ व धर्माचा उदय

३.२.४ गौतम बुद्ध आणि वर्धमान महावीर यांची शिकवण.

३.३ सारांश

३.४ पारिभाषीक संज्ञा, संकल्पना व अर्थ

३.५ स्वयं : अध्ययन प्रश्नाची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला –

१. नागरीकरण, शहरीकरणाची प्रक्रिया, कारणे यांचा आढावा घेता येईल.

२. सोळा महाजन पदांच्या उदयाबद्दल माहिती घेता येईल.

३. आजीविक पंथ, सुधारक धर्म-पंथाच्या उदयाबद्दल माहिती घेता येईल.

४. बौद्ध धर्माच्या उदयाची पार्श्वभूमी स्पष्ट करता येईल.

४. जैन धर्म विकास, पंथ, कार्य हे स्पष्ट करता येईल.

५. गौतम बुद्धांचा पूर्ववृत्तांत व त्यांची शिकवण यांची माहिती घेता येईल.

६. वर्धमान महावीर यांचा पूर्ववृत्तांत व त्यांची शिकवण यांची माहिती घेता येईल.

### ३.१ प्रास्ताविक :

प्राचीन भारताच्या इतिहासातील इ.स. पूर्व ६ वे शतक हे क्रांतीकारी व वैभवशाली शतक मानले जाते. कारण या काळात धार्मिक पुनरुज्जीवनाची सुधारणावादी चळवळ सुरू होऊन बौद्ध धर्माचा उदय व जैन धर्माचा विकास झाला. महाविरांच्या दैदिप्यमान व्यक्तीमत्त्वाने जैन धर्म आणि गौतम बुद्धांच्या लौकिकाने संपूर्ण जगाला स्वयंप्रकाशित करणारा बौद्ध धर्म यांनी धार्मिक स्थितीमध्ये परिवर्तन केले. याच काळात लोहयुग महत्त्वपूर्ण ठरले. लोखंडाच्या वापरामुळे कृषी व्यवस्था स्थिर व भक्कम बनली. त्याच्याच जोडीला अनेक व्यवसाय व कारागीरांचा विकास झाला. तसेच व्यवहारात नाण्यांचा वापर सुरू झाला, सामाजिक, सांस्कृतीक क्षेत्रात परिवर्तन घडून आले. व्यापार, उद्योग धंद्यांची भरभराट झाली. त्यामुळे अनेक नगरांचा उदय होऊन अनेक नगरे व्यापारी केंद्रे म्हणून प्रसिद्धीस आली. या अनुषंगाने प्राचिन भारताचे नागरीकरण घडून आले.

### ३.२ विषय विवेचन :

प्राचीन भारताच्या इतिहासात पहिले नागरीकरण हडप्पा संस्कृतीच्या काळात घडून आले होते. पहिल्या नागरीकरणाचे केंद्र सिंधूच्या खोऱ्यात होते. हडप्पा संस्कृतीच्या ऱ्हासानंतर पुन्हा भारतात भटकी अवस्था प्राप्त झाली. त्यानंतर इ.स. पूर्व ६ व्या शतकात लोकांच्या जीवनाला स्थैर्य प्राप्त झाले. त्याचे मुख्य कारण म्हणजे कृषी व्यवस्था भक्कम झाली. लोकांच्या जीवनातील भटकी अवस्था जाऊन स्थैर्य प्राप्त झाली. अनेक वस्त्या अस्तित्वात आल्यानंतर दुसऱ्या नागरीकरणाची पूर्व तयारी झाली. अशा नगरांमधून वस्तू विनिमय बंद होऊन कारागिर व व्यापाऱ्यांनी प्रथमच नाण्यांचा वापर सुरू केला. यातूनच दुसऱ्या नागरीकरणाची सुरूवात झाली. भारतातील राज्याचे स्वरूप, नावे शेजारची राज्ये, प्रशासक या सर्वांची माहिती 'महापरिनिर्वाणसूत्र' या बौद्ध ग्रंथात मिळते. तत्कालीन वाङ्मयात पूर, पतन, निगम, नगर, महानगर, दुर्ग इत्यादी नागरीकरण दर्शविणारे शब्द मिळतात.

#### ३.२.१ : दुसरे नागरीकरणाचे स्वरूप :

● **दुसरे नागरीकरण** (Second Urbanization) :

इ.स. पू. ६ व्या शतकामध्ये दुसऱ्या नागरीकरणाची सुरूवात झाली. या नागरीकरणाचे केंद्र मध्य गंगेच्या खोऱ्यात होते. या कालखंडात उत्तर भारतात प्रादेशिक राज्यांचा उदय झाला. भारतामध्ये विशेषत: पूर्व भागात अनेक नगरांचा उदय झाला. या नगरांचा उदय व विकास ही प्रक्रिया हजारो वर्षाच्या परिवर्तनामधून झालेली आहे. इ.स.पू. ६ वे शतक हे क्रांतीकारी व वैभवशाली मानले जाते. त्याचप्रमाणे नगरांचा उदय व विकास या दृष्टीने देखील अत्यंत महत्त्वपूर्ण व विशेष उल्लेखनीय घटना आहे. या काळात उत्तरेकडे प्रामुख्याने बिहार परिसरातील कौशांबी, श्रावस्ती, अयोध्या, कपिलवस्तू, कुशिनगर, बनारस, वैशाली, पाटलीपूत्र, चिरांद, राजगीर चंपा ही भरभराटीस आलेली महानगरे होती. या सर्वांमध्ये मगध साम्राज्य बलाढ्य होते. मगधावरील घराणे व कुशल, पराक्रमी राज्यकर्ते यामुळे अफगाणिस्थानच्या पूर्व भागापासून बंगालपर्यंत आणि काश्मिर पासून म्हैसूर पर्यंतचा प्रदेश मगध साम्राज्यात होता.

● **नगरांची शास्त्रशुद्ध रचना :**

ही सर्व नगरे तटबंदी युक्त होती. यांची रचना वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपाची असल्याचे दिसते. ग्रामीण भाग हा नगरांशी जोडला असून नगरातील रस्ते हे चांगलेच लांब-रुंद असत. उत्तम मृद्‌भांडी, मातीची प्राणीचित्रे, हाडे, हस्तिदंत, दगड, काच इत्यादी पासूनच्या वस्तू तांबे, लोखंड धातूंच्या वस्तू तयार करण्याचे कारखाने त्या कालखंडात होते. तसेच या नगरातून अंतर्गत व परराष्ट्रीय व्यापार सुद्धा भरभराटीस आलेला होता. ही सर्व नगरांची प्रक्रिया प्राचिन कालखंडातील समृद्ध जडण-घडणच स्पष्ट करते. ह्या सर्व नगरांचा उदय उत्तरेकडे घडून आल्याचे दिसते.

● **दुसऱ्या नागरीकरणाची कारणे :**

**१) आर्थिक पार्श्वभूमी :**

लोखंड या धातूच्या शोधामुळे सर्व बाबतीत परिवर्तन घडून आले. लोखंडाच्या विस्तृत वापरामुळे हे 'लोहयुग' ही ठरले. लोखंडापासून शेतीची अवजारे, शस्त्रे बनविली गेल्यामुळे कृषी व्यवस्था समृद्ध झाली. त्याच्याच जोडीला कारागीर व व्यापारी यांच्या व्यवसायाचा विकास घडून आला. कृषी व्यवस्था समृद्ध झाल्यामुळे शेतीचे उत्पन्न वाढले व त्यातून व्यापार वाढला. वस्तूविनिमयता बंद होऊन कारागीर व व्यापारी यांनी प्रथमच नाण्यांचा वापर सुरू केला. त्यामुळे वस्तूविनिमयाची पद्धती मागे पडून नाणेपद्धतीचा झालेला उदर हा या नागरीकरणाचा महत्त्वाचा टप्पा ठरला. नाण्यांच्या वापरामुळे व्यापार, उद्योग भरभराटीस आले. त्यातून कृषी केंद्रित स्थिर वस्त्या अस्तित्वात आल्यानंतर या दुसऱ्या नागरीकरणाची पूर्व तयारी झाली. एकूणच पुरातत्व संशोधकांच्या मते शेतीची पद्धत सुधारित पद्धती, नद्यांची बदलती पात्रे, अवर्षण इत्यादीमुळे काही वस्त्यांचे स्थलांतर होऊन ते सुपिक प्रदेशातील वस्त्यांमध्ये येऊन मिसळले व त्यांची नगरे आली.

लोहवस्तूंच्या वापरांबरोबर लोकजीवनात काळ्या मातीची सुबक, गुळगुळीत भांडी (मृदभांडी) यांचाही वापर सुरू झाला. चिन्हे पाडलेली नाणी व आर्थिक देवघेव व्यवहारात त्यांचा होणारा उपयोग आर्थिक विकासासाठी उपयोगी ठरला. गंगा नदीच्या पठरावरील जंगले तोडून त्याचा शेतीसाठी उपयोग करण्यास ज्या साधनांचा, हत्यारांचा वापर केला, त्याचे उल्लेख पाली, बौद्ध व पाणिनी यांच्या वाङ्‌मयात आढळतात.

**२) कृषी विकास :**

जमिनीच्या प्रतीनुसार कृषी क्षेत्राची विभागणी होऊन कृषी व्यवसाय वाढला. शेतीसाठी पाण्याचा वापर जमिनीच्या उतारानुसार मशागत अशा पद्धतींचा उपयोग केला जात होता. शेतीचे वार्षिक कॅलेंडर २७ नक्षत्रात विभागून करण्यात आले होते. आंबे, जांभूळ इत्यादी फळझाडंची लागवड केली जात होती. कारागिरांचे हस्तकला व्यवसायाकडे लक्ष होते. एकंदरीत वाढत्या भरपूर प्रमाणात उपलब्ध झाल्यामुळे राज्यात नगरांची संख्या वाढली. याशिवाय इ.स.पू. ६ व्या शतकापासून लाकडाचा वापर घर बांधणीसाठी मोठ्या प्रमाणावर केल्याचे दिसून येते. गंगेच्या पठारावर कच्च्या व भाजीव विटांची वापर घरासाठी केला जात होता. तांबे व चांदी या धातूंच्या नाण्यावर कोरीव अक्षरे सापडली असून त्याचा उपयोग व्यापारासाठी केला जात होता.

नाण्यांमुळे कर संकलन करणे सोपे झाले. त्याचप्रमाणे नाण्यांच्या रूपात कर्ज देणारा नवा सावकार वर्ग तयार झाला. चांदीची 'शतमान' व 'कार्षापण' अशी नाणी आणि तांब्याची 'कासा व काकिणी' अशी नाणी होती. या नाण्यांवर प्राणी, वृक्ष, टेकडी, साप, मानवी आकृती, फुले, धार्मिक चिन्हे दोन्ही बाजूला कोरलेली होती.

**३) व्यापार उदीम :**

उत्तम मृद्‌भांडी, मातीची प्राणी चित्रे, हाड, हस्तिदंत, दगड, काच इत्यादी पासून तयार केलेल्या वस्तू, तांबे, लोखंड या धातूच्या वस्तू तयार करण्याचे कारखाने त्या काळात होते. विटांचे बांधकाम लाकडावर नक्षीकाम करणारे कारागीर, हारतुरे करणारे फुलमाळी, धनुष्य बाण तयार करणारे कारागीर, टोपली कारागीर, सुगंधी तेले इत्यादी व्यवसाय त्या काळी तेजीत होते. देशांतर्गत व विदेशी व्यापार भरभराटीत होता. पूर्वेकडील आम्रपाली व पश्चिमेकडील भृगुकच्छ या महानगरातून ब्रह्मदेशाशी व श्रीलंकेशी मोठ्या प्रमाणावर व्यापार-व्यवहार चालत होता. त्यामुळे राज्याचा खजिना समृद्ध झाला. परिणामी नगरांच्या विकासासाठी त्याचा परिणाम झाल.

भारतातील व्यापारी जहाजामध्ये माल भरून देशामध्ये जात होते. भारतातून रेशीम, मलमल, अस्त्र शस्त्र, हत्तीचे दात, सोने व चांदी निर्यात होत होती. बौद्ध साहित्य व जातक कथा साहित्यामधून प्राचीन काळातील व्यापाराचा उल्लेख सापडतो. विदेशी व्यापार लंका, बर्मा, बेबीलोन इ. देशांबरोबरच चालत होता. विदेशी व्यापारात वाढ झाल्यामुळे अनेक बंदरांचा उदय झाला. आणि व्यापारी मार्गावर अनेक बाजार ठिकाणे निर्माण होऊन हळूहळू त्याचे नगरांमध्ये रुपांतर झाले.

अंतर्गत व्यापारामध्ये ही वाढ झाल्यामुळे दळणवळणाची सोय झाली. व्यापार व लोकांच्या सोईसाठी रस्ते व महामार्ग निर्माण करण्यात आले. मोठी शहरे एकमेकांना जोडली. महाराष्ट्रातील पैठण ते उत्तरेतील मथुरा, दक्षिणेत आंध्र प्रदेश व पूर्वेकडे बंगाल असे महामार्ग होते. यामुळे नागरीकरण होण्यास मदत झाली.

**४) धार्मिक पार्श्वभूमी - बौद्ध व जैन धर्माचा परिणाम :**

इ.स.पू. ६ व्या शतकात बौद्ध धर्माचा उदय व त्यांचा दृष्टीकोण शहरी कारणासाठी उद्‌बोधक ठरला. जैन धर्माचा विकास व महाविरांच्या दैदिप्यमान कालखंडाचा परिणाम झाला. या काळात धार्मिक पुनरुज्जीवनाची चळवळ सुरू झाली. वैदिक धर्म, त्यातील कर्मकांड याला लोक कंटाळले होते. अशा परिस्थितीत धर्म सुधारणेचे आंदोलन सुरू झाले. जैन धर्म व बौद्ध धर्म यांनी धार्मिक स्थितीमध्ये परिवर्तन केले. गौतम बुद्ध व वर्धमान महावीर यांनी धर्मप्रवर्तक विचार मांडले. या काळातील जैन धर्म व बौद्ध धर्माच्या उदयामुळे तत्कालीन समाज जीवनावर दूरगामी परिणाम झाला. वैदिक धर्मातील यज्ञयाग, अंधश्रद्धा, वर्णव्यवस्था इ. गोष्टींमध्ये मूलभूत परिर्वतन घडून येण्यास चालना मिळाली. या दोन्ही धर्मांचे त्यांच्या विचारांचे समाजातील सामान्य जनतेने समर्थन केले. तसेच व्यापार आणि वाणिज्य हे शहरीकरणाचे मूळ आधार होते. दोन्ही धर्मांनी चैत्यगृहे, बौद्ध विहार, स्तूप यांची निर्मिती करून नागरीकरण प्रक्रियेला प्रोत्साहन दिले. दोन्ही धर्मानी आपल्या धर्माचा प्रसार प्रामुख्याने नगरांमध्ये केल्यामुळे नागरीकरणाच्या विस्तारास चालना मिळाली.

**५. राजकीय पार्श्वभूमी :**

इ.स.पू. ६ व्या शतकामध्ये विशाल राजकीय सत्तांचा उदय झाला. 'ऐतरेय ब्राह्मणा'मध्ये वेदोत्तर काळात विविध प्रदेशात असलेल्या दहा राज्यांचा उल्लेख आढळतो. 'राजा दैवी अंश आहे' ही संकल्पना लोकमान्य झाली होती. किंबहुना प्रजेवर राज्य करण्यासाठी देवाकडूनच राजा पाठविला जातो. त्यामुळे त्याला सर्वाधिकार प्राप्त होतात. या संकल्पनेचा प्रजेवर प्रभाव असल्यामुळे प्रशासन व्यवस्था व प्रजेचे कल्याण यासाठी कर गोळा करण्याचे राजाला हक्क मिळाले. याचा परिणाम असा झाला की, कर संकलन व प्रशासन व्यवस्था चांगलीच रूजली गेली. राजा ही संस्था संरक्षण, न्यायदान, समाज नियमन या क्षेत्रात सर्व सत्ताधीश मानली जाऊ लागली. अश राजांच्या सर्वंकष सत्तेमुळे छोट्या राज्याचे विस्तार वाढले. त्याचे नागरीकरण होऊन मोठी नगरे निर्माण झाली. कारागिर वर्ग व व्यापारी वर्ग तयार झाले. राजधानी करणारी नगरे व्यापार उद्योगाची प्रमुख केंद्रे बनली. तसेच जातक कथांमध्ये शिल्प व्यवसायांबद्दल ही माहिती मिळते. अनेक प्रकारच्या कारागिरांबद्दल माहिती मिळते. उदा. लोहार, चांभार, कुंभार, सुतार इ. तसेच व्यापाराच्या श्रेणी असत. एकाच प्रकारच्या व्यवसाय करणाऱ्या लोकांच्या गटाला श्रेणी म्हणत, श्रेणीच्या प्रमुखास श्रेष्ठी म्हटले जाईल. काशी, कंबोज, गोधार, कोशांबी ही नगरे व्यापारी मार्गावर होती. त्यामुळे या व्यापारी नगरांचा विकास झाला. विकसीत झालेल्या राजधानी पाटलीपूत्र, राजगृह, वाराणसी, श्रावस्ती, तक्षशिला इ. केंद्रे व्यापारीदृष्ट्या प्रसिद्धीस आले. ही राजकीय सत्ताकेंद्रे उद्योग, व्यापार, शिक्षण व धार्मिक केंद्रे म्हणून प्रकाशात आली. याचा परिणाम नागरीकरणाची प्रक्रिया जलद गतीने वाढली. संपूर्ण उत्तर भारतात अनेक नवीन राज्ये ही उदयाला आली. या सर्व राज्यांची आर्थिक भरभराट ही मोठी राज्ये विकसित होण्यास कारणीभूत ठरली. त्यापैकी सोळा महाजन पदे ही प्रमुख राज्ये होती.

अशाप्रकारे विविध कारणे दुसऱ्या नागरीकरणाची दिसून येतात.

नागरीकरणाची प्रक्रिया प्राचीन काळापासून चालू आहे. पहिले नागरीकरण हडप्पा व मोहेंजोदडो या संस्कृतीच्या काळात घडून आले. आज आपणास त्यांचे अवशेष पाहता येतात. दुसरे नागरीकरण इ.स.पू. ६ व्या शतकात सुरू झाले. हे नागरीकरण उत्तर भारतात प्रामुख्याने घडून आले. त्याच प्रमाणे दक्षिण भारतामध्ये घडून आले. उत्तरेकडे कोशांबी, श्रावस्ती, अयोध्या, कपिल वस्तू, वाराणसी, राजगीर, पाटलीपूत्र, चंपा इत्यादी प्रमुख शहरांचे उल्लेख पाली व स्मृती वाङ्मयात आढळतात. या ठिकाणच्या उत्खननातून या शहरांच्या नागरीकरणाचे अवशेष उपलब्ध होतात. लोखंडाच्या वस्तू, तांब्याच्या वस्तूंचा वापर, तलवार, शेतीची उपकरणे इत्यादीमुळे या प्राचिन नगरांची भरभराट झाली. हे नागरीकरण गंगेच्या प्रदेशात व उत्तर भारतात वाढत गेले.

दक्षिण भारतातील नागरीकरणाची प्रक्रिया इ.स.पू. ५ व्या शतकापासून सुरू झाली. तमीळ भाषेतील संगम साहित्यामध्ये द. भारतातील नागरीकरणाचे वर्णन आढळते. मॅगेस्थेनीसच्या अहवालामध्ये व कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्ये मदुराई व कांचीपूरम या शहरांचे विशेष उल्लेख आढळतात. दक्षिणेतील नागरीकरणावर द्रविडीयन संस्कृतीची छाप दिसून येते. केरळ आणि तामिळनाडू ही दोन राज्ये नागरीकरणाच्या प्रक्रियेतून गेली. अशा प्रकारे भारतातील दुसऱ्या नागरीकरणाचा सविस्तर आढावा घेता येतो.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. ........... नदीच्या खोऱ्यात दुसऱ्या नागरीकरणाचे केंद्र होते.

अ) गंगा ब) यमुना क) नर्मदा ड) कावेरी

२. इ.स.पू. ६ व्या शतकात ........... या धातूच्या शोधामुळे सर्व क्षेत्रात परिवर्तन घडून आले.

अ) लोखंड ब) सोने क) तांबे ड) जस्त

३. ........... मध्ये वेदोत्तर काळात विविध प्रदेशात आलेल्या दहा राज्यांचा उल्लेख आढळतो.

अ) ब्राह्मणे ब) अरण्यके क) ऐतरेय ब्राह्मणे ड) उपनिषदे

४. ........... या धर्मानी इ.स.पू. ६ व्या शतकात धार्मिक स्थितीमध्ये परिवर्तन केले.

अ) हिंदू व बौद्ध ब) बौद्ध व पारशी क) हिंदू व जैन ड) बौद्ध व जैन

५. दक्षिणेतील नागरीकरणावर ........... संस्कृतीची छाप दिसून येते.

अ) भारतीय ब) द्रविडीयन क) आर्य ड) वैदिक

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. प्राचिन भारताच्या इतिहासात पहिले नागरीकरण केव्हा घडून आले?

२. भारतामधून कोणत्या गोष्टीची निर्यात होत होती?

३. दक्षिण भारतातील नागरीकरणाची प्रक्रिया कोणत्या शतकात सुरू झाली?

४. दुसऱ्या नागरीकरणाचे केंद्र कोठे होते?

५. दक्षिण भारतातील नागरीकरणाचे वर्णन कोणत्या साहित्यामध्ये आढळते?

## ३.२.२ महाजनपदे – १६ महाजनपदांचा उदय.

● **प्रास्ताविक :**

इ.स.पू. ६ व्या शतकात सोळा मोठी राज्ये अस्तित्वात होती. त्यानंचा महाजनपदे असे म्हणत. साधारणपणे इ.स.पू. १००० ते इ.स.पू. ६०० हा कालखंड म्हणजे वैदिकोत्तर कालखंड मोजला जातो. या काळात जनपदे अस्तित्वात आली. ही जनपदे म्हणजे छोटी छोटी राज्ये होती. भारतीय उपकंडाच्या वायव्येला असलेल्या आजच्या अफगाणिस्थानापासून पूर्वेला बिहार, बंगाल, ओरिशा पर्यंतच्या प्रदेशात आणि दक्षिणेला महाराष्ट्रापर्यंत ही जनपदे पसरलेली होती. आजच्या महाराष्ट्राचा काही भाग तेव्हाच्या अश्मक या जनपदाने व्यापलेला होता. संस्कृत, पाली व अर्धमागधी साहित्यात या जनपदांची नांवे आढळतात. त्यातील काही

जनपदामध्ये राजेशाही होती तर काही जनपदामध्ये गणराज्य होते. गौतम बुद्ध शाक्य गणराज्यातील होते. पुढे ही जनपदे प्रदेश व  लोकसंख्या या दृष्टीने मोठी झाली. अशी जनपदे महाजनपदे म्हणून प्रसिद्धीस आली. या १६ महाजन पदांची माहिती बौद्ध व जैन ग्रंथातून मिळते. तसेच हिरोडोटस्, एरियन स्ट्रॅबो, प्लीनी, कार्रियस व थ्युसिडिडज या परकीय लेखकांनी सोळा महाजन पदांविषयी विश्वसनीय माहिती लिहून ठेवलेली आहे. सर्वच ग्रंथातून १६ ही महाजन पदांची संख्या समान आहे. महाजन पदांच्या राज्यकर्त्यांमध्ये परस्पर संघर्ष होऊन त्यातील काही महाजनपदे नष्ट झाली व ती मगध साम्राज्यात विलिन झाली.

● **महाजनदांची वैशिष्ट्ये :-**

१. महाजनपदे ही नद्यांच्या समृद्ध प्रदेशातच आकारास आली.

२. काही महाजनपदे मोठी तर काही महाजनपदे छोटी होती.

३. प्रत्येक महाजनपदांची प्रशसान व्यवस्था भिन्न होती. काहींचे प्रशासन गणतंत्र पद्धतीने तर काहींचे राजेशाही पद्धतीने चाले.

४. काही महाजन पदांचे स्वरूप संघराज्यात्मक स्वरुपाचे होते. तर काहींचे राज्यसंघ अस्तित्वात होते.

५. महाजनपदांमध्ये यादवी युद्ध हा स्थायी भाव होता.

६. महाजन पदात शत्रू-मित्राचे गट होते व गट स्थिर करण्यासाठी वैवाहिक संबंध प्रस्थापित केले जात होते.

● **सोळा महाजन पदांची प्राचीन व आधुनिक नांवे :**

१) काशी (बनारस), २) कोसल (लखनौ), ३) मल्ल (गोरखपूर), ४) वत्स (अलाहाबाद), ५) चेदि (कानपूर), ६) कुरु (दिल्ली), ७) पांचाल (रोहिलखंड), ८) मत्स्य (जयपूर), ९) शूरसेन (मथूरा), १०) अश्मक (औरंगाबाद-महाराष्ट्र), ११) अवंती (उज्जैन), १) अंग (चंपा-पूर्व बिहार), १३) मगध (दक्षिण-बिहार), १४) वृज्जी (उ. बिहार), १५) गांधार (पेशावर), १६) कंबोज (गांधार जवळ)

● **महाजनपदे :**

**१) कोसल :**

इ.स.पू. ६ व्या शतकातील हे एक महत्त्वाचे महाजनपद होते. या महाजनपदाचा विस्तार हिमालयाच्या पायथ्याशी नेपाळ आणि उत्तर प्रदेश या ठिकाणी झाला होता. या राज्यातील श्रावस्ती, कुशावती आणि साकेत ही नगरे प्रसिद्ध होती. श्रावस्ती ही कोसल महाजन पदाची राजधानी होती. गौतमबुद्ध श्रावस्ती मधील जेतवन या प्रसिद्ध विहारात दीर्घकाळ राहिले होते. कोसलचा राजा प्रसेनजीत हा वर्धमान महावीर व गौतम बुद्ध यांचा समकालीन होता. तो तत्कालीन भारतातील प्रसिद्ध राजा होता. विद्वान, पराक्रमी व उदारमतवादी होता.याने मगधाबरोबर वैवाहिक संबंध प्रस्थापित केले होते. पुढील काळात कोसलचे राज्य मगधात विलीन झाले.

**२) वत्स :**

वत्स महाजनपदाचा विस्तार उत्तर प्रदेशातील प्रयाग म्हणजे अलाहाबादच्या आसपासच्या प्रदेशात झाला होता. यमुना तीरावर हे महाजनपद असून कोसम ही वत्सची रजाधानी होती. कोसम म्हणजे प्राचिन काळचे कोशांबी नगर होय. हे एक महत्त्वाचे व्यापारी केंद्र होते. कोशांबीतील तीन श्रीमंत व्यापाऱ्यांनी गौतम बुद्ध आणि त्यांचे अनुयायी यांच्यासाठी तीन विहार बांधले हेते. वत्सचा राजा उदयन हा गौतम बुद्धांचा समकालीन होता. राजा उदयन नंतर या महाजनपदाचे स्वतंत्र अस्तित्व फार काळ टिकले नाही. ते अवंती महाजनपदाच्या राजाने जिंकून घेतले.

**३) अवंती :**

हे महाजनपद अत्यंत प्रभावशाली होते. मध्य प्रदेशातील माळवा प्रदेशामध्ये हे महाजनपद होते. उज्जयिनी ही त्याची राजधानी असून ते एक महत्त्वाचे व्यापारी केंद्र होते. अवंतीचा राजा प्रद्योत हा वर्धमान महावीर आणि गौतम बुद्ध यांचा समकालीन होता. प्रद्योत हा बौद्ध धर्माचा उपासक असल्याने अवंती हे बौद्ध धर्माचे केंद्र बनले. अवंतीचा राजा नंदीवर्धन याच्या कारकिर्दीत अवंती मगध साम्राज्यात विलिन झाले.

**४) मगध :**

बिहार मधील पाटणा, गया या शहरांच्या आसपासचा प्रदेश आणि बंगालचा काही भाग या प्रदेशात प्राचीन मगध महाजनपद होते. राजगृह (राजगीर) ही त्याची राजधानी होती. महागोविंद या वास्तुविशारदाने बिंबीसारचा राजवाडा बांधला होता. जीवक हा प्रसिद्ध वैद्य बिंबिसारच्या दरबारात होता. मगधाचा इतर महाजनपदाबरोबर सतत संघर्ष होता. परंतु या संघर्षात मगध विजयी होऊन एक शक्तीशाली राज्य बनले. महाभारत काळात येथे बौद्ध घराण्याची सत्ता होती. जरासंध हा मगधाचाच राज्यकर्ता होता. मगधावर बृहद्रथ, शिशूनाग, नंद व मौर्य घराण्यांनी राज्य केले. मौर्य शासकांनी या राज्याचे साम्राज्य रुपांतर केले. गुप्त साम्राज्याच्या उदयापर्यंत मगध हे भारतीय राजकारणाचे केंद्र होते.

**५) काशी :**

काशी हे राज्य पुरातन राज्य असून प्रभावशाली व वैभव संपन्न राज्य होते. काशीची राजधानी वाराणशी हे शहर भारतातील प्रसिद्ध सहा शहरांपैकी एक होते. दशरथ जातककथेमध्ये दशरथ, राम व त्यांचे वंशज यांनी राज्य केल्याची नोंद मिळते. २३ वे जैन तिर्थंकर पार्श्वनाथ यांचे वडील अश्वसेन हे काशीचे सम्राट होते. गौतम बुद्धांनी आपली पहिली धार्मिक प्रवचन काशीजवळ 'सारनाथ' येथे केले होते. महाभारतातील वर्णनावरून असे दिसते की, काशीचा राज प्रतदन याने वित्तीहव्य लोकांच्या शक्तीचा नाश केला होता. बौद्ध कालखंडात काशीचे राजकारण अस्तित्वात नष्ट होऊन ते मगध साम्राज्यात विलीन झाले.

**६) अंग :**

अंग हे राज्य मगधाच्या शेजारी असून आधुनिक बिहार मधील 'भागलपूर' या जिल्ह्याच्या परिसरात

अस्तित्वात आले होते. 'चंपा' ही या राज्याची राजधानी होती. चंपादनगर हे व्यापार आणि वैभव संपन्न समृद्धीसाठी प्रसिद्ध होते. हे नगर महागविंदाने वसवले असून बौद्ध काळात भारतातील सहा महानगरात चंपाचा समावेश होता. अश्वपूर आणि भद्रिका ही अंग राज्यातील दोन प्रसिद्ध शहरे होती. चंपा येथील व्यापारी व्यवसायासाठी सुवर्ण भूमी पर्यंत जात होते. अंगची महाराणी हीने बोधलेल्या गग्गल पोखरणी तलावासाठी गौतम बुद्धाने काही काळ वास्तव्य केले होते. इ.स.पू. ६ व्या शतकाच्या मध्यास मगधाचा राजा बिंबिसारने हे राज्य जिंकले व मगधात विलिन केले.

**७) वज्जी किंवा वृजि :**

बिहरच्या उत्तर भागामध्ये हे राज्य होते. येथे आठ वेगवेगळ्या जमाती असून विदेह, लिच्छवी, वज्जी या महत्त्वाच्या होत्या. वैशाली हे राजधानीचे ठिकाण होते. रामायण काळात विदेहच्या राज्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. मिथिला ही या राज्याची राजानी होती. लिच्छवी या दुसरे प्राचिन गणराज्याची राजधानी वैशाली होती. २४ वे तिर्थंकर महावीर यांचे घराणे असलेले ज्ञातृक राज्याची राजानी कुण्डनपूर वैशालीचे एक उपनगरच होते. वृज्जी या राज्याचाही वैशालीशी संबंध होता. लिच्छवीच्या कार्यपद्धतीची व सामर्थ्याची गौतम बुद्धांनी स्तुती केलेली होती. वर्धमान महावीरांची आई वैशालीची राजकुमारी होती. महावीरांचा जन्म सुद्धा वैशालीजवळ कुंदग्राम येथे झाला होता. जामुकाची राजधानी कुंदग्राम होती. जैन व बौद्ध ग्रंथ आणि रामायणामध्ये वैशाली नगराचे वर्णन असून वैशाली हे तटबंदी असणारे नगर असून अतिशय वैभवसंपन्न व सुंदर होते. येथे बौद्ध धर्माची दुसरी धर्म परिषद भरविण्यात आली होती. मगधचा राजा बिंबिसार याने लिच्छवी राजकन्या छेल्लना हिच्या बरोबर विवाह केला होता. त्यामुळे मगध राज्याला राजकीय जीवनात यश मिळाले. पुढे मगधाचा राजा अजातशत्रू याने वृज्जी संघराज्याला आपल्या साम्राज्यात विलीन करून घेतले.

**८) मल्ल :**

मल्ल हे सुद्धा ९ राज्याचा संघ असलेले महाजनपद होते. रामायण-महाभारत काळापासून मल्ल राज्याचे अस्तित्व असल्याचे दिसते. या राज्याचे दोन भाग असून कुशीनगर व पावा या दोन राजधान्या होत्या. आजचे 'कासिया' म्हणजे पूर्वीचे 'कुशिनारा' होय. गौतम बुद्धांचे महापरिनिर्वाण 'कुशिनारा' याच ठिकाणी झाले. मल्ल राज्यात गणराज्य शासन प्रणाली होती. या राज्यात जैन व बौद्ध धर्माचा प्रभाव होता. मल्ल आणि लिच्छवी यांच्यामध्ये कधी संघर्ष तर कधी मैत्रीचे संबंध होते. शेवटी मगध साम्राज्यापुढे मल्ल राज्याचा निभाव लागला नाही. त्यामुळे हे राज्य मगधात विलिन झाले.

**९) चेदी :**

आजच्या बुंदेल खंडातील परिसरात 'चेदी' राज्य होते. कुस आणि वत्स या दोन जनपदाच्यामध्ये चेदी राज्य होते. सोत्थिवती किंवा शुक्तिमती चेदीची राजधानी होय. भगवान श्रीकृष्णाने ज्या शिशुपालाचा वध केला. तो शिशुपाल चेदी राजाच होता. चेदींनी कलिंग परिसरात तही राज्य स्थापन केल्याचा संदर्भ हाथीगुंफा शिलालेखात येतो. चेदी या राज्याला ही मगध महाजन पदाने जिंकून घेतले.

**१०) कुरु :**

इंद्रप्रस्थ त्याची राजधानी होती. महाभारत काळातील एक प्रमुख सत्ता असून सध्याचे मीरत जिल्ह्याच्या आसपास कुरुचे राज्य होते. बौद्ध काळात 'कौरव्य' नावाचा जनपती होता. महाभारत काळात हे जनपद राजसत्ताक पद्धतीचे असून येथे कौरवांची सत्ता होती. नंतर येथे गणराज्य पद्धतीचा स्विकार केलेला दिसतो. कालांतराने कुरु राज्य कमजोर बनले व मगधाने याला आपल्या साम्राज्यात विलिन केले.

**११) पांचाल :**

वैदिक काळात प्रसिद्ध पावलेले दुसरे राज्य होते. आजच्या रोहिल खंडाचा आसपासचा प्रदेश म्हणजे पांचाल राज्य होते. याचे उत्तर पांचाल व दक्षिण पांचाल असे दोन विभाग पडले होते. बौद्ध ग्रंथानुसार व महाभारतानुसार भागीरथी नदी ही या दोन राज्याची सीमा होती. उत्तर पांचालची राजधानी अहिच्छत्र व दक्षिण पांचालची राजधानी कांपिल्य होती. प्राचिन भारतातील व्यापारी केंद्र म्हणून प्रसिद्ध पावलेले कनौज हे पांचालच्या राज्यात होते. तसेच महाभारताची नायिका द्रौपदी ही पांचाल राजकन्या होती. इ.स.पू. ५ व्या शतकापासून पांचालचे अस्तित्व नष्ट झाले.

**१२) मत्स्य :**

राजस्थान मधील जयपूरच्या प्रदेशांत 'मत्स्य' हे राज्य होते. विराटनगर ही त्याची राजधानी होती (आजचे बैराठ). महाभारत काळातील वैराट राजाने वसलेली नगरी ती हीच विराट नगरी होती. पांडवांनी वनवासातील अज्ञात वर्षे विराट नगरी मध्येच गुप्त रूपाने काढली. महाभारतानुसार शहाज नावाच्या एका राजाने चेदी व मत्स या दोन्ही राज्यांवर राज्य केले होते. परंतू बौद्ध साहित्यात अशा प्रकारचे वर्णन सापडत नाही. त्यामुळे प्रारंभीच्या काळात मत्स हे राज्य चेदी राज्याचे अंग असावे आणि नंतरच्या काळात ते मगधात विलिन झाले.

**१३) शूरसेन :**

यमुना नदीच्या खोऱ्यात शूरसेन हे राज्य होते. या राज्याची राजधानी मथुरा होती. महाभारत व पुराण ग्रंथांमध्ये मथुरेवर यदु वंशाचे राज्य होते असे म्हटले आहे. बौद्ध ग्रंथानुसार शूरसेनचा राजा अवंतीपुत्र हा गौतम बुद्धांचा समकालीन होता. या राज्यात प्रारंभी गणराज्य शासन प्रणाली होती. परंतू नंतर या ठिकाणी राजतंत्राक शासक प्रणाली अस्तित्वात आली. मथुरा परिसरात बौद्ध धर्माचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला. कौटिल्याने मथुरेचा उल्लेख कृषीसंघ म्हणून केला आहे. तर चंद्रगुप्ताच्या दरबारी असलेल्या मॅगेस्थेनिस या ग्रीक वकीलाने कृष्णभक्तीचे एक प्रमुख केंद्र म्हणून मथुरेचा उल्लेख केला आहे.

**१४) गांधार :**

आजच्या पेशावर व रावळ पिंडीच्या परिसरात गांधार हे महाजनपद अस्तित्वात होते. तक्षशिला ही त्याची राजधानी होती. तक्षशिला हे नगर व्यापार व प्रमुख केंद्र होते. प्रारंभिच्या काळात ते विद्येचे केंद्र होते. कालांतराने ती बौद्ध धर्माचे केंद्र बनले. इ.स.पू. ६ व्या शतकातील गांधारचा राजा पुक्कुसानी हा बिंबिसारचा समकालीन

होता. गांधारचे राजे जैन धर्माचे अनुयायी होत असा उल्लेख जैन साहित्यात आहे. गांधारचे राजे धार्मिकदृष्ट्या उदारमतवादी होते व ते महाजनपद वैभवसंपन्न होते. महाभारतातील धृतराष्ट्राची पत्नी ही गांधारची राजकुमारी होती.

**१५) कंबोज :**

आधुनिक पाकीस्तानमध्ये कंबोज राज्य येते. राजपूर ही या राज्याची राजधानी होती. ह्युएन्संग याने ही प्रवास वर्णनात कंबोजचा उल्लेख केला आहे. वैदिक काळात हे शिक्षणाचे केंद्र होते. हे प्रजासत्ताक राज्य होते. नंतर ते गणराज्य झाले. सुदक्षिणा व चंद्रवर्मन हे कंबोज राज्याचे शासनकर्ते होऊन गेले.

**१६) अश्मक :**

हे एकच राज्य दक्षिण भारतात गोदावरी नदीच्या परिसरात होते. याची राजधानी पैठण होती. वायू पुराणशतील वर्णनानुसार येथील राजे हे इश्चांकू वंशाचे हेते. महागोविंद सूत्रांत या बौद्ध ग्रंथात अस्सक राज्याचा 'ब्रह्मदन्त' नावाचा राजा होता आणि त्याच्या राजधानीचे नाव 'पोतन' होते असा उल्लेख आहे. हे पोतन म्हणजे बुलढाणा जिल्ह्यातील 'नांदुरा' होय असे मानले जाते. अश्मक राज्याला समकालीन असलेली दंडक, कलिंग, भोज व विदर्भ ही राज्ये दक्षिण पथामध्ये समाविष्ट होती. अश्मकचा राजा अरूण याने कलिंगचा पराभव करून तो प्रदेश आपल्या राज्यास जोडला. अश्मक व अवंती यांच्यात लढाया होत. अवंतीच्या राजाने अश्मकचा पराभव करून अश्मक आपल्या राज्यास जोडले.

अशाप्रकारे इ.स. पू. ६ व्या शतकात भारतामध्ये वरील १६ महाजनपदे असून या महाजनपदांमध्ये सतत संघर्ष होत असे. त्यातून अनेक महाजनपदे नष्ट होऊन मगधाचे साम्राज्य उदयाला आले. भौगोलिक अनुकूलता, आर्थिक समृद्धी, शूर सेनानी पराक्रमी राजांची परंपरा या कारणांमुळे मगध महाजन पदाचे साम्राज्यात रूपांतर झाले.

**● महाजनपदांच्या काळातील परिस्थिती :**

**१) राजकीय परिस्थिती :**

इ.स.पू. ६ व्या शतकात अनेक छोटी मोठी जनपदे अस्तित्वात होती. त्यातूनच महाजनपदे उदयाला आली. या महाजनपदांमध्ये सतत संघर्ष होतो. या महाजनपदामध्ये राजसत्ताक व प्रजासत्ताक शासन पद्धती अस्तित्वात होती. प्रजेच्या इच्छेनुसार प्रजेच्या प्रतिनिधींनी चालवलेली शासन पद्धती म्हणजेच प्रजासत्ताक पद्धती होय. यांनाच गणराज्ये असेही म्हणत. बहुतेक राज्यात राजेशाही प्रभावशाली होती. राजा हाच सर्व सत्तेचा निरंकूश सत्ताधारी होता. त्याला मदतीसाठी व नियंत्रणासाठी मंत्रीमंडळाची निर्मिती झालेली होती. राजाची निवड राजपरिवारातूनच केली जात होती. तो केंद्रीय प्रशासनाचा प्रमुख असे. केंद्रीय प्रशासन व्यवस्थेत मंत्री परिषद, सेनापती, अमात्य, पुरोहित यांचा समावेश असून हे सर्वजण राजाला सहकार्य करत. गावाचा कारभार स्थानिक लोकांच्या मदतीने केला जात होता. गाव प्रशासनाची जबाबदारी ग्राम प्रमुख व ग्रामाध्यक्षावर असे. या काळात कोणतीही मध्यवर्ती अथवा बलवान सत्ता नसल्यामुळे संरक्षण व्यवस्था राजाला चोख ठेवावी लागे. सैन्याचा

प्रमुख सेनापती असून सैन्याचे रथदल, हत्तीदल, अश्वदल व पायदळ असे चार विभाग होते.

न्यायपद्धतीचा राजा हाच सर्वोच्च न्यायाधिश होता. तरीपण न्यायदान करण्यासाठी स्वतंत्र न्यायाधिशाची नेमणूक केलेली होती.

● **सामाजिक परिस्थिती :**

तत्कालीन सामाजिक जीवनामध्ये चातुर्वण्यव्यवस्था अस्तित्वात असून ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य व शुद्र असे वर्ण होते. ब्राह्मण वर्णाला समाजात श्रेष्ठ स्थान होते. क्षत्रीय हा राज्यकर्ता वर्ग होता. शेती, व्यापार इ. कामे वैश्य-वर्णाकडे होती. तर शुद्रांवर अनेक बंधने लादलेली होती. जन्माधिष्ठीत वर्णव्यवस्थेला या काळात महत्त्व मिळाले. त्यातूनच जाती संस्था निर्माण झाल्या.

महाजनपदांच्या काळात एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात होती. कुटुंबातील वयोवृद्ध व्यक्तींना आदराचे स्थान होते. या काळात स्त्रीयांवर अनेक बंधने लादली गेली. शील संवर्धन व आचार शुद्धतेच्या दृष्टीने स्त्रीला विवाह आवश्यक ठरविला गेला. तिच्या विवाहाची वयोमर्यादा कमी होण्यास सुरूवात. समाजात सतीची पद्धत असावी, नियोग पद्धतही होती. स्त्रीचा शिक्षणाचा अधिकार कमी होऊ लागला. बौद्धीक शिक्षण हे फक्त ब्राह्मण घेत. इतरांना शिक्षण घेण्यास कडक बंधने होती.

● **आर्थिक स्थिती :**

या काळात समाजातील प्रमुख व्यवसाय शेती हाच होता. शेतीच्या जोडीला पशुपालनाचा व्यवसाय आर्थिक जीवन संपन्न करण्यास हातभार लावत असे. जमीन महसूल राजाला द्यावा लागे. महाजनपद काळात विविध प्रकारचे व्यावसायीक होते. त्यांच्या स्वतंत्र संघटना व श्रेण्या होत्या. देशांतर्गत व परराष्ट्र व्यापार मोठ्या प्रमाणावर चालत असून वस्तू विनिमयाची पद्धती अस्तित्वात होती. नाणी प्रचारात येण्यास प्रारंभ झाला होता. राजाला शेतीतून उत्पन्नाच्या १/६ कर मिळत असे. त्याचा उपयोग राजा प्रजेच्या कल्याणासाठी करत असे.

● **धार्मिक जीवन :**

महाजनपदाच्या काळात धार्मिक जीवनात परिवर्तन घडून आले. जैन व बौद्ध धर्माच्या उदयामुळे व प्रसारामुळे वैदिक धर्माची पिछेहाट होण्यास सुरूवात झाली. या धर्मांची शिकवण लोकांना उपयुक्त ठरू लागली. वैष्णव व शैव या भिन्न पंथांचे समाजात अस्तित्व निर्माण झाले. चालीरिती, अंधश्रद्धा, जादूटोणा, भूत, पिशाच्च यांना सुद्धा धार्मिक जीवनात स्थान होते. पुनर्जन्मावर लोकांचा विश्वास होता. यज्ञ-कर्मकांड ही समाजात होत होते. मागील जन्मातील चांगल्या किंवा वाईट कर्माचे फळ या जन्मी भोगावे लागते हा विचार समाजामध्ये होता.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २.**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. वत्स या महाजनपदाची राजधानी ............ होती.

अ) श्रावस्ती ब) कुशावती क) साकेत ड) कोशांबी

२. कोसलचा ............ राजा हा वर्धमान महावीर व गौतम बुद्धांच्या समकालीन होता.

अ) बिंबिसार ब) अजातशत्रू क) प्रसेनजीत ड) उदयन

३. ............ या वास्तुविशारदाने बिंबिसारचा राजवाडा बांधला.

अ) महापद्मानंद ब) महागोविंद क) जीवक ड) कौटिल्य

४. वर्धमान महावीरांची आई ............ ची राजकुमारी होती.

अ) मगध ब) कोसल क) लिच्छवी ड) वैशाली

५. आजच्या रावळपिंडी व पेशावरच्या परिसरात ............ हे जनपद अस्तित्वात होते.

अ) शूरसेन ब) अवंती क) गांधार ड) कंबोज

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. काशी या महाजनपदाचे आधुनिक नांव काय?

२. सोळा महाजनपदांचा उदय कोणत्या शतकात झाला?

३. अंग राज्यातील दोन प्रसिद्ध शहरे कोणती ?

४. गौतम बुद्धांनी कोणत्या महाजनपदाच्या कार्यपद्धतीची व सामर्थ्याची स्तुती केली आहे?

५. कुरू राज्याची राजधानी कोणती?

## ३.२.३ आजीवक पंथ, बौद्ध आणि जैन धर्म, पंथांचा उदय :

● **प्रास्ताविक :**

इ.स.पू. ६ वे शतक भारताच्या इतिहासात धार्मिक क्रांतीचे युग म्हणून ओळखले जाते. कारण या शतकात धार्मिक क्षेत्रात व्यापक प्रमाणात परिवर्तन झाले. या क्रांतीकाळात अनेक उपासना पंथांची निर्मिती झाली. भारतात उपनिषदांचे तत्त्वज्ञान याच सुमारास उदयास आले. उपनिषदकाळापासूनच तत्कालीन धार्मिक स्थितीमध्ये परिवर्तन सुरू झाले होते. वैदिक धर्मामध्ये अनेक दोष निर्माण होऊन या धर्माचे स्वरूप किचकट व गुंतागुंतीचे झाले होते. या धर्मातील जातीप्रथा व कर्मकांड यांनी विकृत स्वरूप धारण केले होते. अशा धार्मिक अवस्थेतून लोकांना बाहेर काढणाऱ्या नवीन धर्मांची आवश्यकता निर्माण झाली. या पार्श्वभूमीवर

भारतात अनेक पंथ उदयाला आले. या नवीन संप्रदायांची संख्या ६२ होती. या अनेक संप्रदायापैकी जैन व बौद्ध धर्म हे प्रमुख असून याच पार्श्वभूमीवर या धर्मांचा उदय झाला.

**● सुधारक धर्म-पंथांच्या उदयाची कारणे :**

**१) वैदिक धर्माची अवस्था :**

मूळ वैदिक धर्माचे स्वरूप नष्ट होऊन या धर्माचे संस्कार निरर्थक, खर्चिक व किचकट बनले. कर्मकांडाला महत्त्व प्राप्त झाले. त्यामुळे सर्वसामान्यांना यासाठी वेळ देणे, खर्च करणे कठीण होऊ लागले. यज्ञ हा जीवनाचा अविभाज्य भाग बनला. प्रत्येक गोष्टीसाठी यज्ञ सक्तीचा केला. यामुळे पुरोहित/बाह्मण वर्गाचे वर्चस्व वाढले. त्यांनी धार्मिक यज्ञाला जटिल, कठोर आणि खर्चिक बनविले. पूर्व वैदिक काळातील विधी अत्यंत चांगले, सोपे व सर्वांना परवडणारे आणि सात्विक स्वरूपाचे होते. मात्र पुरोहित वर्गाकडे हा अधिकार गेल्यानंतर त्यांनी समाजाची आर्थिक लूट सुरू केली. साहित्यासाठी पैाची मागणी वाढली. सामान्य माणूस यज्ञाच्या खर्चाच्या ओझ्याखाली दबून गेला व नवीन धर्माकडे आकर्षित झाला.

**२) यज्ञाचे महत्त्व व मंत्रतंत्रावरील श्रद्धा :**

निरनिराळ्या देवतांना प्रसन्न करण्यासाठी यज्ञविधी वाढले. काही यज्ञ वर्षभर चालत. पुरोहितामार्फत यज्ञ चालत. यज्ञाचे साधे, सोपे स्वरूप नष्ट होऊन त्यामध्ये पशू व नरबळी देण्यात येऊ लागले. मोक्षप्राप्तीचे साधन म्हणून यज्ञाकडे पाहण्यात येऊ लागले. सामान्य लोकांना यज्ञ करणे कठीण असल्यामुळे त्यांच्या मोक्षप्राप्तीचा मार्ग बंद झाला. तसेच यज्ञातील कर्मकांडाबरोबर तंत्र व मंत्रास या काळात फार महत्त्व प्राप्त झाले. सात्विक ऋचांची जागा मंत्रांनी घेतली. रोगनिवारण, शत्रूचा नाश, भरभराटीसाठी, समृद्धीसाठी, मंत्रतंत्रांची आवश्यकता वाटू लागली. मंत्रावर सर्व सामान्यांची श्रद्धा निर्माण झाली. याचा फायदा भोंदू, साधू व पुरोहितांनी घेऊन सामान्य लोकांची फसवणूक होऊ लागली. त्यामुळे धर्मजागृतीची गरज समाजात निर्माण झाली व ते नवीन धर्माकडे आकृष्ट झाले.

**३) सामाजिक विषमता :**

वैदिक काळात वर्णव्यवस्था अधिक बळकट झाल्यामुळे जातीभेद तीव्र झाले. ब्राह्मण वर्गाचे वर्चस्व वाढले. क्षत्रीय व वैश्यांसाठी वेगळे नियम होते. शुद्रांची स्थिती दयनीय झाली. स्त्रीयांनाही कोणते अधिकार नव्हते. आंतरजातीय विवाह निषिद्ध होते. जाती बंधने कठोर व अपरिवर्तनीय अशी होती. समाजात श्रेष्ठ-कनिष्ठ व अस्पृश्यता या समस्या होत्या. या सामाजिक विषमतेमुळे लोकांच्या मनामध्ये वैदिक धर्माबद्दल क्रांतीची भावना निर्माण झाली.

**४) वैदिक वाङ्मय :**

वैदिक काळातील सर्व वाङ्मय हे संस्कृत भाषेतील होते. ही भाषा सर्वसामान्य लोकांना समजण्यासारखी नव्हती. त्यामुळे धर्मासंबंधीचे कोणतेही तत्त्वज्ञान अथवा विचार लोकांना समजत नव्हते. तसेच या काळात

ज्ञान संपादन करण्याचा अधिकार ठराविक वर्गासाठी मर्यादित असल्यामुळे सर्वसामान्य यापासून अलिप्त होते. ज्ञान किंवा धर्माचे तत्त्वज्ञान हे साधे, सोपे व लोकांना समजेल अशा बोलीभाषेत देणारे धर्म म्हणजे बौद्ध व जैन धर्म याकडे लोक आकृष्ट झाले.

**५) वेद मतभेद :**

वैदिक धर्मात वेद हे सर्वश्रेष्ठ मानले आहेत. वेदांत सागितलेला धर्म सर्वसामान्य लोकांना कळत नव्हता. तत्कालीन विद्वानांना सुद्धा संस्कृत भाषेतील सिद्धांतांबद्दल ठाम माहिती सांगता येत नव्हती. तसेच वेद हे अपौरुषेय आहेत असे मानले आहे. कारण त्याचा निर्माता नाही. तसेच ते ब्रह्मदेवाच्या मुखातून निघालेले आहेत. अशी लोकांची श्रद्धा होती. वेद हेच अंतिम सत्य अशी लोकांची धारणा होती. परंतु वैदिक धर्माचे मूलतत्त्वज्ञान बाजूला जाऊन रुढी-परंपरा वाढत गेल्या. परिणामी त्यास विरोध झाला.

**६) अंधश्रद्धा :**

तत्कालीन समाजात अनिष्ठ चालीरिती, रूढी, परंपरा, अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्या. जादूटोणा, भूतपिशाच्च, वशीकरण, संमोहन विद्या यावर लोकांचा विश्वास निर्माण झाला. त्यातून अनेक अंधश्रद्धा निर्माण झाल्या. समाज दिशाहीन बनला. त्यातून मार्ग काढण्यासाठी जैन व बौद्ध धर्माचा उदय झाला.

**७) आर्थिक कारण :**

तत्कालीन काळात प्रत्येक वर्णाचा व्यवसाय ठरलेला होता. त्याला आपला परंपरागत व्यवसाय सोडून दुसरा व्यवसाय करता येत नव्हता. कारण तशी धर्माने परवानगी नव्हती. एखाद्याने व्यवसाय बदलण्याचा प्रयत्न केला तर त्याला दंड केला जात होता. ब्राह्मणांचे समाजावर वर्चस्व होते. त्यांनीच सामाजिक व्यवस्था निश्चित केली होती. बदलत्या परिस्थितीनुसार समाजात बदलाची आवश्यकता असते. तसे न झाल्यामुळे बदलत्या परिस्थितीप्रमाणे अर्थव्यवस्था व समाज व्यवस्था बदलण्याची गरज निर्माण झाली.

**८) बहुदेवता वाद :**

वैदिक धर्मात अनेक देवदेवतांची पुजा केली जात होती. सुरूवातीला ३३ देवता होत्या. त्यात सातत्याने भर पडत गेली. देवतांची पुजा व आराधना केल्याने मोक्षप्राप्ती मिळते. या कल्पनेत कालांतराने बदल झाला. मनुष्य हा स्वत:चा भाग्यविधाता आहे. ऋग्वेदिक आर्यांनी एकेश्वरवादाचा सिद्धांत प्रतिपादन केला होता. तेव्हा लोकांची अशी धारणा झाली की, आपल्या आत्मोत्कर्षासाठी देवदेवतांवर विश्वास ठेवण्याची गरज नाही. या विचाराच्या विकासामुळे बहुदेवतावाद ब्राह्मण धर्माविरोधी असंतोष निर्माण होन नवीन धर्माकडे आकर्षित झाले.

वरील सर्व कारणांमुळे मोठ्या प्रमाणात वैचारिक प्रगती झाली. वैदिक धर्माविषयी लोकांच्यात अनास्था निर्माण झाली. याचवेळी महावीर व गौतम बुद्धांनी जगाला नव्या धर्माची दिशा दाखविली. सर्वसामान्य जनतेची गरज पूर्ण केली.

**● आजीवक पंथ :**

इ.स.पू. ६ व्या शतकात अनेक नवीन पथ आणि उपपंथ उदयास आले. त्यापैकीच आजीवक हा महत्त्वाचा पंध होय. हा प्राचीन पंथ म्हणून ओळखला जातो. आज हा पंथ अस्तित्वात नाही. आजीवक किंवा आजीविक या शब्दाचा नेमका अर्थ या ग्रंथाचे अधिकृत साहित्य नसल्याने स्पष्ट होत नाही. परंतु काही इतिहासकारांच्या मते आजीवक हा शब्द आजीव या शब्दापासून आला. या पंथाची स्थापना केव्हा झाली हे निश्चित सांगता येत नाही. मखलीपूत्र गोशाल हा आजीविक पंथाचा प्रवर्तक मानतात. त्यांच्यापूर्वी ११७ वर्षे आजीविक पंथाची स्थापना झाल्याचे पुरावे उपलब्ध आहेत. गोशाल आणि महावीर एकत्र राहात होते व गोशाल महावीरांचा सहा वर्षे अनुयायी होता. परंतू त्यांचे पटले नसल्यामुळे गोशाल वेगळा झाला व त्याने महावीरांचा प्रतिस्पर्धी पंथ काढण्याच्या उद्देशाने आजीवक पंथाचेच नेतृत्व स्विकारले.

**● आजीविक पंथाचे अनुयायी व तत्त्वज्ञान :**

मखलीपूत्र गोशालने वैदिक धर्माचे वाभाडे काढून त्यावर टिका करून मोठ्या प्रमाणावर प्रचार केल्यामुळे समाजातील सर्वसामान्य लोक, कनिष्ठ वर्गातील उपेक्षित जनता ही त्याच्या पंथाकडे आकर्षित झाली. कारागीर, व्यापारी व काही नव श्रीमंत लोक त्यांच्या पंथाचा अनुयायी झाले. त्यामध्ये सुद्धा भांडी बनवणाऱ्या वर्गात या पंथाचे मोठ्या प्रमाणावर अनुयायी निर्माण झाले. वायू पुराणात असा उल्लेख आहे की, इ.स.पू. ५ व्या शतकात शूद्र व अस्पृश्य लोकांचा सहभाग आजिवक पंथात अनुयायी म्हणून होता.

**● तत्त्वज्ञान :**

आजीवक पंथाचे तत्त्वज्ञान मुक्त होते. त्यात बंधने नव्हती. सर्वसामान्य लोकांना सोईस्कर असे तत्त्वज्ञान होते.

१. नियतीवर प्रचंड विश्वास ठेवला होता. कोणतीही गोष्ट नियतीशिवाय घडू शकत नाही.

२. ज्या गोष्टी घडणाऱ्या असतात त्या घडतच असतात. त्यामुळे मनुष्य आपापल्या कर्मास जबाबदार नाही. तो मुक्त, स्वतंत्र व आनंदी जीवन जगू शकतो.

३. सुखी जीवनासाठी कोणत्याही मार्गाचा अवलंब केला तरी तो कर्मास जबाबदार नाही.

४. प्रत्येक मनुष्यास सुखी जीवन जगण्याचा हक्क आहे.

५. आजीवक पंथ निरिश्वरवादाचा पुरस्कर्ता आहे. त्यामुळे पाप-पुण्य, स्वर्ग-नरक, दैव या सर्व कल्पना मान्य करत नाही.

६. आजीवक आत्मवादी होते. पुनर्जन्म व मोक्ष यावर त्यांचा विश्वास होता.

७. जीवनात भोगाव्या लागणाऱ्या सुख-दुःखास काही कारण असत नाही आणि ते मनुष्यास टाळताही येत नाही.

वरील तत्त्वज्ञान पाहता अनेक धर्मपंथातील गोष्टींचा स्विकार आजीविक पंथाने केल्यामुळे या पंथाचे तत्त्वज्ञान व्यापक बनले.

**● जैन, बौद्ध धर्म आणि आजीवक पंथ :**

जैन आणि बौद्ध धर्मापेक्षाही आजीवक पंथ अधिक लोकप्रिय बनला. अल्पावधीतच हा पंथ जैन आणि बौद्ध धर्माचा स्पर्धक होता. तात्वीक विचारसरणीतून संघर्ष वाढीस लागला. तरी सुद्धा आजीवकने उत्तर भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर प्रसार केला. दक्षिणेमध्येही म्हैसूर, तामिळनाडू हा पंथ इ.स. १४ व्या शतकापर्यंत आपले अस्तित्व टिकवून होता. त्याही अगोदर सम्राट अशोक व त्याचा नातू दशरथाने आजीवकांना आश्रय दिला होता. हे यांनी आजीवकांना बांधून दिलेल्या विहारावरून स्पष्ट होते. वराह मिहिर, बाणभट्ट, पतंजली व मिलिंद पन्हो यांच्या साहित्यात अजीविकांचा उल्लेख आहे.

**● जैन धर्म आणि आजीवक पंथ :**

आजीवक पंथाचे तत्त्वज्ञान पूर्णपणे नास्तिक व भौतिकवादी विचार मांडणारे असे होते. त्यांनी ईश्वर कल्पनेलाच आव्हान दिले. जीवनाचा उपभोग घेण्याचा विचार मांडला. तसे बुद्ध आणि महावीर यांचे तत्त्वज्ञान नव्हते. ते पूर्णपणे ईश्वराचे अस्तित्व नाकारणारे नव्हते. महावीर आणि गोशाल यांच्या मध्ये मतभेद हे तत्त्वज्ञान विषयक नसून आचारविषयक होते. शिजवलेले अन्न खाणे, स्त्रीसंग करणे, शीतल जल प्राशन करणे, मुद्दाम तयार केलेल्या वस्तूंचा परिग्रह करणे या चार गोष्टींवर महावीरांनी निर्बंध घातले होते. गोशालास मात्र हे निर्बंध मान्य नव्हते. परस्त्रीसंग केल्यास मुनीस कसलेही पाप लागत नाही असे गोशालचे मत होते. गोशालच्या स्वैर, अनैतिक वर्तनामुळेच महावीरांनी आपल्या तत्त्वज्ञानात 'ब्राह्मचर्य' या तत्त्वाचा समावेश केला असावा. भिक्षापात्रात भिक्षा मागावी असे महावीरांचे मत होते. तर ती हाताच्या ओंजळीत घ्यावी असे गोशालचे मत होते.

**● आजीवक पंथाचा ऱ्हास :**

आजीवक पंथ हा भोगवादी होता. त्याने वैदिक धर्म नाकारला. मात्र त्याला पर्यायी धर्म, तत्त्वज्ञान व जीवन पद्धती देण्यास तो असमर्थ ठरला. मानवी जन्माचा हेतू, वर्तणूक याविषयी आजीवकांमध्ये ठाम तत्त्वे नव्हती. गोशालचे वर्तन स्वैर होते. तसेच या पंथास कोणी वाली उरला नाही. त्यामुळे हा पंथ दिगंबर जैन पंथात विलीन झाला असावा असे विद्वानांचे मत आहे किंवा सुबद्ध प्रचार यंत्रणेच्या अभावानेच हा पंथ नामशेष होत गेला.

अशाप्रकारे प्राचिन धार्मिक चळवळींपैकी वैदिक धर्माविरोधी विचारांचे एक प्रातिनिधीक स्वरूप म्हणून आजीवक पंथाचा उल्लेख करणे गरजेचे आहे.

**● बौद्ध धर्म :**

इ.स.पू. ६ व्या शतकात बौद्ध धर्माचा उदय झाला. बौद्ध धर्माच्या उदयामुळे वैदिक धर्मातील कर्मकांडावर कडाडून हल्ला झाला व अस्वस्थ समाजाला प्रकाशाकडे नेण्याचे काम बौद्ध धर्मसंस्थापक गौतम बुद्धांनी केले.

● **गौतम बुद्ध - जीवन चरित्र :**

गौतम बुद्धांचा जन्म इ.स.पू. ५६६ मध्ये (वैशाख शुद्ध पौर्णिमा) नेपाळच्या सरहद्दीवर असलेल्या कपिलवस्तू नगराजवळ लुंबिनी येथे झाला. त्यांचे वडील शुद्धोदन हे शाक्य घराण्याचे राजे होते. आई मायादेवी गौतम बुद्धांच्या जन्माच्या सातव्या दिवशी मृत्यू पावल्यामुळे त्यांच्या पालन पोषणाची जबाबदारी त्यांची मावशी प्रजापती गौतमी हिच्यावर झाली. गौतम यांचे पाळण्यातील नाव सिद्धार्थ होते. परंतू मावशी गौतमीने नावांमुळेच मूळचा सिद्धार्थ गौतम झाले. बालपणापासूनच गौतम विरक्त वृत्तीचा होते. गौतम संन्याशी होण्याची शक्यता असल्याचे भविष्य वर्तवण्यात आले होते. त्यामुळे त्यांचा खूपच काळजीपूर्वक सांभाळ करण्यात आला. त्याचे बालपण अतिशय लाडात व राजवैभवात गेले. कोणत्याही प्रकारचे दु:ख त्यांच्याजवळ येणार नाही याकरीता सर्व सोयी नियुक्त असा सुंदर राजवाडा बांधून दिला. यथावकाश सिद्धार्थचा राजकन्या यशोधरा हिच्या बरोबर विवाह झाला व त्यांना राहूल हा मुलगा झाला. वयाच्या २८ वर्षापर्यंत सिद्धार्थ याप्रमाणे सुखोपभोगात जीवन घालवित होते.

● **गौतम यांचा गृहत्याग :**

संसार सुखात सिद्धार्थ यांचे मन रमन नव्हते. शुद्धोदन राजाने त्यांचा राज्याभिषेक करण्याचे ठरवले. त्यांना आपल्या राज्याची कल्पना यावी म्हणून छन्ना नावाच्या एका विश्वासू सारथ्याबरोबर राज्य पाहण्यासाठी पाठविले. फेरफटका मारत असताना सिद्धार्थ यांनी एक वृद्ध जर्जर ग्रहस्थ, एक व्याधीग्रस्त रोगी, मृतदेहाची अंत्ययात्रा व एक विरक्त पण तेज-पुंज साधू अशा चार दृश्ये पाहिली. त्या दृश्याने ते बेचैन झाले. जगात दु:ख आहे याची जाणीव त्यांना पहिल्यांदा झाली. या दु:खावर उपाय शोधला पाहिजे. त्यासाठी सर्वसंग परित्याग करून संन्यास्त वृत्ती धारण केली पाहिजे असे त्यांना वाटू लागले. त्यातून वयाच्या २९ व्या वर्षी एके रात्री पत्नी व पुत्र राहूल यांचा त्याग करून सत्य शोधण्यासाठी अरण्याच्या दिशेने गेले. काही अंतरावर अंगावरील जडजवाहिर काढून भगवी वस्त्रे धारण केली व ते पूर्णत: संन्यासी झाले. यास गौतमांचे 'महाभिनिष्क्रमण' असे म्हटले जाते.

● **ज्ञानप्राप्ती व धर्मप्रसार :**

सत्य शोधण्यासाठी अथवा दु:खावर उपाय शोधण्यासाठी सिद्धार्थ यांनी सलग सहा वर्षे भटकंती केली. अनेक ज्ञानी साधु पुरुषांची त्यांनी भेट घेतली. आलारकलाम व उद्दक राजपुत्र या दोन साधूंचे शिष्यत्व पत्करले. उपास तपास, देहदंड, तप साधना सर्व काही केले. तरीही त्यांना ज्ञान प्राप्त झाले नाही. अखेर वैशाख शुद्ध पौर्णिमेच्या दिवशी त्यांनी बोधगया येथील पिंपळ वृक्षाखाली समाधी लावली असताना ज्ञानप्राप्ती झाली. यासाठी ५ वर्षे घोर तपश्चर्या करावी लागली. अनेक यातना व कष्ट सोसल्यानंतर व ४९ व्या दिवशी समाधी लावल्यानंतर धर्माचा खरा राजमार्ग दिसला. लोक त्यांना बोध झाला म्हणून बुद्ध म्हणू लागले. ज्या पिंपळ वृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली त्यास 'बोधिवृक्ष' संबोधण्यात येऊ लागले व बौद्ध धर्माचेच ते पवित्र स्थान बनले.

दिव्य ज्ञान प्राप्त झाल्यानंतर गौतम बुद्धांनी आपले पहिले प्रवचन काशी जवळ सारनाथ या ठिकाणी दिले. बौद्ध साहित्यात ही घटना 'धम्म-चक्र प्रवर्तन' या नावाने प्रसिद्ध झाली. गौतम बुद्ध आपल्या पहिल्या प्रवचनात

उपदेश देताना म्हणाले 'माणूस व माणसाचे माणसाशी या जगातील नाते या नव्या धम्माचा केंद्रबिंदू असून ते आपल्या धम्माचे पहिले अधिष्ठान आहे. दु:खाचे अस्तित्व नष्ट करणे व ते नष्ट करण्याचा मार्ग दाखविणे हा एकच धम्माचा उद्देश आहे. सत्य, अहिंसा, अस्तेय, व्यभिचार न करणे व मादक पेय ग्रहण न करणे ही चांगल्या जीवनाची पाच तत्त्वे आहेत. त्याचे प्रत्येक व्यक्तीने पालन केले पाहिजे. ''गौतम बुद्धांच्या प्रवचनामुळे प्रभावीत होऊन बिंबीसार राजाने आपल्या प्रजेसह त्यांचे अनुयायित्व स्विकारले. अजातशत्रू व कोसलचा प्रसेनजीत या राजांनी सुद्धा बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. कपिलवस्तू शहरात आल्यानंतर बुद्धांनी आपला मुलगा राहुल यास बौद्ध धर्माची दिक्षा दिली. आजूबाजूच्या प्रदेशात जाऊन लक्षावधी लोकांना बुद्धांनी शिष्य बनवले. बुद्धांनी आपल्या धर्मप्रसाराच्या कार्यामुळे बौद्ध धर्माला लोकप्रिय बनविले. अशा या महान तथागत गौतम बुद्धांचे महापरिनिर्वाण इ.स. ४८३ साली वयाच्या ८० व्या वर्षी गोरखपूर जिल्ह्यातील कुशिनारा या ठिकाणी झाले.

**● बौद्ध धर्मप्रसाराची कारणे :**

**१) गौतम बुद्ध आणि त्यांची साधी शिकवण :**

गौतम बुद्धांचे व्यक्तीमत्त्व आकर्षक होते अद्‌भूत होते. जगातील सर्व सुखे समोर असताना त्यांनी खडतर जीवन स्विकारले व आपल्या असीम त्यागाने समाजापुढे आदर्श निर्माण केला. लोककल्याणाची त्यांची तळमळ पाहून हजारो लोक बौद्ध धर्माकडे आकर्षित झाले. बुद्धांची साधी, सरळ व सामान्य लोकांना समजेल अशी शिकवण होती. प्रत्येकाने चांगले जीवन जगावे, चांगले कर्म केले तर चांगले फळ मिळते असा साधा उपदेश त्यांनी केला. त्यामुळे सामान्य लोकांमध्ये बौद्ध धर्म अत्यंत लोकप्रिय झाला.

**२) समानतेचे तत्त्व व लोकभाषेचा वापर :**

समाजातील सर्व वर्गांना बौद्ध धर्मात प्रवेश मिळत होता. त्यांना समान वागणूक मिळत असे. पुरुषांप्रमाणेच स्त्रीयांना सुद्धा बौद्ध धर्मात सहज प्रवेश मिळत असे. तसे धर्मप्रसारासाठी त्यांनी बोली भाषेचा वापर केला. पाली ही तत्कालीन लोकभाषा होती. धर्मप्रसाराचे कार्य गौतम बुद्धांनी पाली भाषेतून केल्यामुळे बौद्ध धर्माचे तत्त्वज्ञान लोकांना सहज समजले. एकूणच समानतेच्या तत्त्वामुळे व बोली भाषेच्या वापरामुळे लोक बौद्ध धर्माकडे आकर्षित झाले.

**३) राजाश्रय :**

तत्कालीन राजांनी बौद्ध धर्माला राजाश्रय दिल्यामुळे तो झपाट्याने वाढत गेला. यामध्ये राजा शुद्धोदन, प्रसेनजीत, अजातशत्रू, सम्राट अशोक, कनिष्क व हर्षवर्धन यांनी बौद्ध धर्मास राजाश्रय दिला.

**४) बौद्ध संघ :**

धर्मप्रसार व प्रचार करण्यासाठी गौतम बुद्धांनी संघ निर्माण केला. त्यातील हजारो भिक्षूंनी जगाच्या कानाकोपऱ्यात बौद्ध धर्माचा प्रसार केला.

### ५) बौद्ध धर्मातील लवचिकता :

काळाप्रमाणे बदलण्याची लवचिकता बौद्ध धर्मात होती. स्थानिक गरजांना अनुसरून बौद्ध धर्माने आपले स्वरूप सुद्धा बदलले. वैदिक धर्मातील दोष या धर्मात काढलेले होते. पुढील काळात मंदिरांमध्ये गौतम बुद्धांच्या मूतीची स्थापना करून पुजा केली जाऊ लागली. वैदिक धर्माशी साम्य असल्यामुळे बौद्ध धर्म लोकप्रिय बनला.

### ● बौद्ध धर्माचे योगदान / कार्य :

### १) सोपा लोकप्रिय धर्म :

कर्मकांड, यज्ञसंस्था, यज्ञीय हिंसाचार व पुरोहितशाही याने ओतप्रोत भरलेला वैदिक धर्म विषमता प्रधान व त्याचे स्वरूप क्लिष्ट बनलेले होते. अशा परिस्थितीत अत्यंत साधा, सोपा, समताप्रधान व मानवतावादी धर्म लोकांना दिला. यामुळे हा धर्म भारतात अतिशय लोकप्रिय झाला.

### २) उच्च नैतिकता, अहिंसा व समानतेची शिकवण :

या धर्माने आपल्या शिष्यांकरीता एक उच्च आदर्श व नीतीयुक्त आचरण निश्चित करून दिले. त्यामुळे समाजातील चारित्र्य संवर्धनाला मोठ्या प्रमाणात मदत झाली. तसेच यज्ञातील हिंसा व त्याची अमानुषता व अनावश्यकता पटवून सांगितली. त्यामुळे देशातील पशुधनाचे संरक्षण व संवर्धन होऊ लागले.

बुद्धांनी समाजातील सर्व लोक समान आहेत व त्यांना बौद्ध धर्माच्या मार्गाने निर्वाणपदापर्यंत जाता येईल असा विचार प्रत्यक्षात राबविला. त्यामुळे समाजातील शेवटच्या घटकामध्ये सुद्धा आत्मविश्वास निर्माण झाला.

### ३) भारतीय संस्कृतीचा प्रसार :

बौद्ध धर्माचा भारत त्याप्रमाणे बाहेरही चीन, जपान, जावा, बोर्निओ इ. देशात प्रसार झाला. त्या बरोबर भारतीय संस्कृतीचा सुद्धा देशाबाहेर प्रसार झाला. भारतीय साहित्य, तत्त्वज्ञान, शिल्पकला, नृत्यकला, महाकाव्ये इत्यादींचा परदेशांत प्रसार झाला.

### ४) स्थापत्यशास्त्र, शिल्पकला क्षेत्रात प्रगती :

या क्षेत्रात बौद्ध धर्माने मोठी क्रांती घडवून आणली. बौद्ध धर्माने स्तूप विहार, मठ, स्तंभ, चैत्य यांच्या अप्रतिम कलाकृती निर्माण केल्या. बुद्धांच्या मुर्ती तयार केल्या. अजंठा, वेरूळ, सांची, सारनाथ या ठिकाणी शिल्पे व चित्रे काढली. त्यामुळे चित्रकला व स्थापत्य कलेत भर पडली. शिल्पलेख व स्तंभलेखांवर बौद्ध चरित्र कोरून ठेवण्यात आले. ग्रीक व बौद्ध कलेच्या संगमातून 'गांधार' कला उदयास आली.

### ५) शिक्षण व साहित्य क्षेत्रात प्रगती :

बौद्ध धर्माने मठाची स्थापना केली. त्याठिकाणी बौद्ध धर्माची शिकवण दिली गेली, शिक्षणाची सोय केली. निव्वळ धार्मिक नव्हे तर पुढील काळात विद्याकेंद्रे म्हणून उदयास आली. बिहार मधील नालंदा व विक्रमशिला तर गुजरातमधील वल्लभी ही बौद्ध विद्यापीठ प्रसिद्ध आहेत. बौद्ध धर्माने सर्वसामान्य लोकांना समजेल अशा

बोली भाषेत बौद्ध धर्माचा प्रचार केला, प्रसार केला. तसेच पाली व अपभ्रंश या लोकभाषांमध्ये मोठी साहित्य निर्मिती केली. अमरकोरा, जातककथा, त्रिपिटकावर आधारीत साहित्य इत्यादी साहित्याची निर्मिती झाली.

**● बौद्ध धर्मग्रंथ :**

बौद्ध धर्मग्रंथानाच त्रिपिटके म्हणतात. त्यात सुत्तपिटक, विनयपिटक आणि अभिधम्मपिटक हे तीन पिटक ग्रंथ आहेत. बौद्ध धर्मग्रंथ पाली, अर्धमागधी, संस्कृत, प्राकृत व परकीय भाषेत सुद्धा लिहिले. याशिवाय सिंहली भाषेत दिपवंश, महावंश व तिबेटी मध्ये 'दिव्यावदान' हे ग्रंथ आहेत.

**● बौद्ध धर्मातील दोन उपपंथ :**

गौतम बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर २०० वर्षात दोन मुख्य पंथ उदयास आले.

**१) हीनयान :** या पंथाचा प्रसार दक्षिण भारतात झाला. हा पंथ सनातनी, कर्मठ व संन्यासमार्गी आहे. गौतम बुद्धांना सर्वसामान्य मनुष्य मानतात.

**२) महायान :** हा पंथ सुधारकवादी व उदारमतवादी आहे. या पंथाने गौतम बुद्धांना आदर्श व दैवी विभूती मानले. भक्ती हे या पंथाचे साधन असल्यामुळे वैदिक धर्माप्रमाणे त्यांनी मूर्तीपूजा आरंभ केली. यांनीच बुद्ध मूर्तीपूजेस सुरूवात केली.

**● बौद्ध धर्माच्या ऱ्हासाची कारणे :**

बौद्ध धर्माच्या ऱ्हासाला इ.स.पू. ३ ऱ्या शतकापासून प्रारंभ झाला. त्याची कारणे पुढीलप्रमाणे–

**१) राजाश्रयाचा अभाव :**

गौतम बुद्ध राजघराण्यातील होते. त्यामुळे सुरूवातीपासूनच बौद्ध धर्माला राजाश्रय मिळाला. त्यानंतर अनेक राजांनी बौद्ध धर्माला राजाश्रय मिळाला. सम्राट अशोकाने तर संपूर्ण राज्ययंत्रणाच बौद्ध धर्माच्या प्रचार व प्रसारासाठी राबविली. सम्राट अशोकानंतर मात्र आलेल्या शुंग, वाकाटक व गुप्त राजांनी वैदिक धर्मास उत्तेजन देऊन त्याचे पुनरुज्जीवन घडवून आणले. त्यामुळे बौद्ध धर्माचा राजाश्रय संपला व त्याची पिछेहाट झाली.

**२) वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन :**

वैदिक धर्मातील कर्मकांड, दोष यांचे निवारण करून पुढे शंकराचार्य व कुमारील भट्ट यांनी वैदिक धर्मास श्रेष्ठ बनविले. बौद्ध धर्म व पंथावर टिका केली. या धर्मातील अनेक दोष स्थळे समाजाच्या निदर्शनास आणले व लोकांची मने हिंदू धर्माकडे आकर्षित केली. परिणामी हिंदू धर्माचे पुनरुज्जीव झाले व बौद्ध धर्म मागे पडला.

**३) बौद्ध धर्मातील तात्वीक मतभेद व पंथभेद :**

गौतम बुद्धांच्या निर्वाणानंतर बौद्ध भिक्षूंमध्ये वैचारिक मतभेद निर्माण झाले. त्यातून वादविवाद निर्माण

झाले. त्यामध्ये बौद्ध, भिक्षूंची शक्ती खर्च होऊन धर्म प्रसाराकडे दुर्लक्ष झाले. या मतभेदातून महायान व हीनयान पंथ निर्माण झाले.

**४) बौद्ध धर्मातील अध्यात्मिक अवनती :**

गौतम बुद्ध हे जगाला निर्वाण मार्ग दाखविणारे आचार्य ही कल्पना मागे पडली. बुद्धांना दैवी विभूती बनवले, भक्तीमार्गाचा स्विकार करून स्वत:ची शुद्धता घालवली. महायान पंथाने बुद्धांची मूर्ती पूजा सुरू केली. बौद्ध धर्मात अनिष्ठ प्रथा सुरू झाल्या. बौद्ध संघात भिक्षू-भिक्षुणीतील नीतीनियमाचे पालन संपुष्टात आले. उदार व पवित्र धर्माकडे दुर्लक्ष केल्यामुळे बौद्ध धर्माचा ऱ्हास झाला.

**५) परकीयांची आक्रमणे :**

भारताची लूट करण्याच्या इराद्याने आलेल्या हूण आक्रमकांनी व इस्लामी आक्रमकांनी अनेक बौद्ध, विहार, स्तूप व विद्यापीठे यांचा विध्वंस केला. लूटालूट केली. जाळपोळ केली. त्यामध्ये शेकडो भिक्षू मारले गेले. बौद्ध संघ व विहार यांच्या नाशाबरोबर बौद्ध धर्माची इमारत कोसळली.

वरील सर्व कारणांचा इ.स. १२ व्या शतकापर्यंत बौद्ध धर्माचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास झाला.

**● जैन धर्म :**

जैन धर्म हा वैदिक धर्माएवढा प्राचीन आहे. जिनाला परमपूज्य मानणाऱ्यांचा किंवा जिनाने ज्या धर्माचे कथन अथवा उपदेश केला तो धर्म म्हणजे जिन धर्म. ज्याने समस्त इंद्रिये व अज्ञान यावर विजय प्राप्त करून सम्यक ज्ञान प्राप्त करून घेतले तो जिन होय. जो राग, द्वेष, मोहरुपी या शत्रूंना जिंकतो तो व जो जैन धर्मात केवल अवस्थेत पोहोचतो त्या व्यक्तीला जिन म्हणतात. वर्धमान महावीरांना या विकारांवर विजय प्राप्त झाला. सामान्यत: जैनांमध्ये २४ निरर्थक होऊन गेले. जीन म्हणजेच तिर्थंकर होय. जैन धर्माचे दुसरे नाव 'अर्हत धर्म' आहे.

**● जैन धर्माची प्राचीनता :**

काही विद्वानांनी जैन धर्म खूप प्राचीन मानला गेला आहे. या धर्माची परपरा, विकास सिंधू संस्कृतीशी जोडतात. जैन धर्माचा संबंध सिंधू संस्कृतीतील पशूपती यांच्या बरोबर जोडतात. तर काही विद्वान जैन धर्माचा उदय ऋग्वेदकाळात झाला असे मानतात. ऋग्वेदाच्या मंत्रामध्ये जैन धर्माचे प्रथम तीर्थंकर ऋषभ देवांचा उल्लेख आहे. विष्णू व भगवान पुराणात ऋषभदेवाला ब्राह्मण धर्मातील विष्णूचा अवतार असे म्हटले आहे. यजुर्वेदामध्ये अजितनाथ तीर्थंकरांचा उल्लेख आहे.

**● जैन धर्मातील तीर्थंकरांची संकल्पना-परंपरा :**

जैन धर्म हा तीर्थंकर धर्म आहे. तीर्थ म्हणजे धर्म-धर्माचे प्रगटीकरण, प्रवर्तन करणारे महापुरुष म्हणजे तीर्थंकर प्रकटीकरण, प्रवर्तन करणारे महापुरुष म्हणजे तीर्थंकर होत. धर्माचे निरुपण करणारे, सर्वसंगपरित्याग करून

ज्यांनी शरीर, मन, इंद्रिये, वाणी यांना जिंकले आहे ते तीर्थंकर. त्यांच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणारे ते जैन .देवापेक्षाही तीर्थंकरांचा दर्जा श्रेष्ठ असे.

जैन धर्मामध्ये २४ तीर्थंकर होऊन गेले. जैन धर्माला यशाच्या शिखरावर नेण्याचे कार्य २३ वे तीर्थंकर पार्श्वनाथ व २४ वे तीर्थंकर महावीर यांनी केले. या जैन धर्मातील २४ तीर्थंकर पुढीलप्रमाणे -

१) ऋषभदेव, २) आदीनाथ, ३) संभव, ४) अभिनंदन, ५) सुमती, ६) पद्मप्रथा, ७) सुपार्श्व, ८) चंद्रप्रभू, ९) सुविधी, १०) शीतल, ११) श्रेयांस, १२) वासुपुज्य, १३) विमल, १४) अनंत, १५) धर्म, १६) शांती, १७) कुंथ, १८) अमर, १९) मल्ले, २०) मुनिसवीर, २१) नमी, २२) अरिष्ट नेमी, २३) पार्श्वनाथ, २४) वर्धमान महावीर.

● **ऋषभदेव :**

जैन धर्माचा संस्थापक म्हणून पहिले तिर्थंकर ऋषभदेवांना मानतात. ऋग्वेदाच्या मंत्रामध्ये जैन धर्माचे प्रथम तिर्थंकर म्हणून ऋषभदेवांचा उल्लेख आहे. ज्यावेळी मानव प्रथम अवस्थेत होता त्यावेळी ऋषभदेवांनी लोकांच्यामध्ये जागृती निर्माण केली. काही काळ चक्रवर्ती सम्राट म्हणून काम केले. काही घटनांमुळे त्यांना वैराग्य आले. त्यामुळे त्यांनी राज्यकारभाराचा त्याग केला. अरण्यात जाऊन घोर तपश्चर्या केली. तेथे त्यांना 'केवलज्ञान' प्राप्त झाले. त्यानंतर त्यांनी ज्ञानाचा उपदेश केला. त्यांना तीर्थंकर म्हटले जाऊ लागले. त्यातून जैन धर्माचा उदय झाला. त्यांनी जैन धर्माची अहिंसा, सत्य, अस्तेय व अपरिग्रह ही चार तत्त्वे सांगितली.

● **पार्श्वनाथ :**

जैन धर्माचे २३ वे तिर्थंकर म्हणून पार्श्वनाथ यांना मानले जाते. यांचा जन्म महाविरांच्या पूर्वी २५० वर्षे झाला असून ते वाराणसीचे राजे अश्वसेन यांचे पुत्र होते. ते क्षत्रीय होते. त्यांच्या मातेचे नांव वामादेवी होते. त्यांनी २० वर्षे गृहस्थधर्म सांभाळला आणि त्यानंतर त्यांनी तपश्चर्या करून कैवल्यज्ञान प्राप्त केले आणि आपल्या ज्ञानाचा प्रसार केला. याच पार्श्वनाथांचे कार्य २५० वर्षांनी वर्धमान महावीरांनी पुढे नेले.

● **वर्धमान महावीर (इ.स.पू. ५९९ ते ५२७) :**

जैन धर्माचे २४ वे शेवटचे तिर्थंकर म्हणून वर्धमान महावीर ओळखले जाते. यांचा जन्म इ.स.पू. ५९९ मध्ये वैशाली नगरच्या कुंदग्राम या उपनगरात झाला. त्यांचे वडील सिद्धार्थ हे वृज्जी संघाचे प्रधान होते. तर आई त्रिशलादेवी ही वैशालीचा राजा चेटक यांची बहिण होती. त्यामुळे वर्धमान यांना राजघराण्याचा वारसा लाभला होता. परंतु ऐहिक सुखामध्ये त्यांचे मान रमेनासे झाले. त्यातच त्यांच्या वयाच्या ३० व्या वर्षी आई वडीलांनी उपोषण, व्रतवैकल्ये करतच देहत्याग केला. यामुळे ही महावीर विरक्त बनले. त्यांनी आपले वडील बंधू नंदीवर्धन यांची संमती घेवून महावीरांनी संन्यास धर्म स्विकारला.

● **धर्मविचारांचा प्रसार :**

ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर महावीरांनी ३० वर्षे प्रवास करून जैन धर्म विचारांचा प्रसार केला. लिच्छवीची

राजकन्या पद्मावती ही महावीरांची पहिली शिष्या होती. मगध राजा बिंबिसार व अजातशत्रू हे त्यांचे शिष्य बनले. विदेह, मिथिला, अंग, मगध व कोसल इ. राज्यांमध्ये त्यांनी जैन धर्माचा मोठ्या प्रमाणावर प्रसार केला. त्यांनी एकूण १४ हजार शिष्य मिळविले. प्रवचने, संवाद व वादविवाद याद्वारे त्यांनी जनतेमध्ये मोठे परिवर्तन घडवून आणले. वयाच्या ७२ व्या वर्षी इ.स.पू. ४६७ मध्ये पटणा जिल्ह्यातील राजगृहाजवळ 'पावा' येथे महावीरांचे महानिर्वाण झाले.

**● जैन धर्म पंथ :**

जैन धर्मात दोन पंथ निर्माण झाले. याशिवाय अनेक उपपंथ ही होते. त्यातील श्वेतांबर व दिगंबर हे दोन पंथ महत्त्वाचे आहेत. हे पंथ इ.स.पू. तिसऱ्या शतकात निर्माण झाले.

**१) दिगंबर पंथ :**

दिगंबर म्हणजे आकाश हे ज्याचे वस्त्र आहे. हा सनातन पंथ असून महाविरांना थोर आत्मा पुरुष मानतात. या पंथाचे अनुयायी वस्त्र वापरत नाहीत. यांना मूर्तीपूजा मान्य नाही. यांच्या मते स्त्रीला मोक्ष प्राप्ती होत नाही. ते करपात्रात भोजन करतात. हे अनुयायी चिंतन, मनन, ध्यान धारणा, जप तप करतात. लोकभाषा म्हणून अर्धमागधीचा वापर. यांचे प्रमुख ग्रंथ संस्कृत भाषेत आहेत. केवल ज्ञानच अंतिम ज्ञान मानतात. या पंथाचा प्रामुख्याने दक्षिणेत प्रसार होता.

**२) श्वेतांबर पंथ :**

श्वेतांबर म्हणजे शुभ्र वस्त्रधारी होय. हा पंथ परिस्थितीनुसार बदलणारा सुधारणावादी पंथ होता. हे ईश्वरास मानतात व मूर्ती पूजेस यांची मान्यता आहे. स्त्रीला केवलप्राप्ती होऊ शकते. तसेच मुक्तीसाठी नग्नता आवश्यक नाही असे त्यांचे मत होते. जेवणासाठी ते काही उपकरणे व पात्रे वापरतात. एकोणीसावे तीर्थंकर मल्ली ही स्त्री आहे मानतात. मूर्तीला वस्त्रे घालतात, पुजेच्यावेळी मूर्तीला फुले वाहून मिठाईचा नैवेद्य दाखवितात. याचे बहुसंख्य ग्रंथ अर्धमागधी भाषेत होते. याही पंथाचा प्रसार दक्षिण भारतात मोठ्या प्रमाणावर झाला.

वरील दोन्ही पंथांच्या विवेचनावरून असे दिसते की, विचारांच्या मतभेदातून हे पंथ निर्माण झाले. मात्र मूलतत्त्वाच्या बाबतीत या दोन पंथामध्ये फारसे भेद नाहीत. मूर्तीपूजा करावी किंवा करू नये यावर मतभेद आहेत.

**● जैन धर्म ग्रंथ :**

जैन धर्मात जे प्रमुख ग्रंथ आहेत त्यांना 'आगम' असे म्हटले जाते. आगम म्हणजे उपदेश महावीरांनी केलेल्या प्रवचनातून जैन विचारांचा उपदेश केला. त्यातून जैन धर्म व तत्त्वज्ञानाची निर्मिती झाली. जैन धर्माचे मूळ धार्मिक ग्रंथात बारा भाग होते. बरेच विद्वान, साहित्यीक व आचार्य यांनी अनेक ग्रंथांची रचना केली. जैन धर्मग्रंथ अर्धमागधी (प्राकृत) व संस्कृत भाषेत तयार झाले. आचार्य हेमचंद्र यांनी तर्कशास्त्र, शब्दकोश, काव्यशास्त्र, योगशास्त्र व इतिहासावर प्रचंड ग्रंथ रचले. जैन साहित्यात हेमचंद्र सूरी यांना सर्वश्रेष्ठ स्थान आहे. यांचा 'परिशिष्टपर्व' हे ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहे.

● **जैन धर्माचे योगदान :**

**१) नैतिक आचरण व अहिंसेचा सिद्धांत :**

महावीरांनी दैनंदिन जीवनात नैतिक आचरण व सदाचारावर भर दिल्याने जैन धर्म साधा, सरळ व नैतिकता या सिद्दांताने परिपूर्ण बनला. तसेच त्यातील अहिंसेच्या सिद्धांतामुळे वैदिक धर्मातील पशूहत्या व नरबळी बंदी झाली. पुढील काळात या सिद्धांताचा प्रभाव महात्मा गांधीजींच्या राष्ट्रीय आंदोलनात दिसते. त्यामुळे ही सर्वात मोठी देणगी 'अहिंसा' सिद्धांत होय.

**२) वैदिक धर्मास विरोध व सामाजिक समतेचा पुरस्कार :**

जैन धर्माने वैदिक धर्मातील कर्मकांडाला विरोध करून सर्व जातीतील लोकांसाठी धर्माची दारे खुली केली व समाजिक समतेचा पुरस्कार केला.

**३) कला, स्थापत्य व साहित्य क्षेत्रातील योगदान :**

शिल्पकला, स्थापत्य, मूर्तीकला, चित्रकला व साहित्य या क्षेत्रात महत्त्वाचे योगदान दिले आहे. इतर धर्मांप्रमाणेच जैन धर्माने धर्माच्या प्रसारासाठी कलेचा आश्रय घेतला. खजुराहो मंदिर, वेरूळची लेणी, अंबेजोगाई लेणी, गिरनार, पावापूरी, राजगृह येथील मंदिरे, श्रवण बेळगोळ येथील बाहूबलीची प्रचंड मूर्ती या स्थापत्य आणि कलाकृतींनी भारतीय सांस्कृतीक जीवनात महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. तसेच साहित्याच्या क्षेत्रात काव्य, कादंबरी, नाट्य अशा ललित वाङ्मयामध्ये मोठी भर घातली. व्याकरण, काव्य, कोश, रसायनशास्त्र, छंदशास्त्र, गाथा, गणित, योगशास्त्र इत्यादी विषयांवर जैन लेखकांनी मोलाची ग्रंथरचना केली. याशिवाय हिंदी, मराठी, राजस्थानी भाषेत मोलांची ग्रंथरचना केली. याशिवाय हिंदी, मराठी, राजस्थानी, गुजराती, तमीळ व तेलगू भाषेमध्ये जैन साहित्याची निर्मिती केली.

वरील सर्व योगदानामुळे जैन धर्म प्राचीन भारताच्या इतिहासात एक महत्त्वाचा धर्म ठरला व आजही त्याचे अस्तित्व टिकून असल्याचे दिसून येते.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. भारताच्या इतिहासात ........... हे शतक धार्मिक क्रांतीचे शतक म्हणून ओळखले जाते.

अ) इ.स.पू. ४ थे ब) इ.स.पू. ५ वे क) इ.स.पू. ६ वे ड) इ.स.पू. ३ रे

२. .......... हा आजीवक पंथाचा प्रवर्तक मानला जातो.

अ) गोशाल ब) मखली क) नंदवच्छा ड) मिलींद

३. गौतम बुद्धांचा जन्म इ.स. पू. ५६६ मध्ये कपिलवस्तू नगराजवळ ........... येथे झाला.

अ) मगध ब) पावापूरी क) लुंबिनी ड) श्रवणबेळगोळ

४. गौतम बुद्धांनी ज्ञान प्राप्तीनंतर पहिले प्रवचन ........... याठिकाणी दिले.

अ) सारनाथ ब) गया क) काशी ड) वैशाली

५. जैन धर्मातील २३ वे तिर्थंकर ........... होत.

अ) महावीर ब) आजितनाथ क) पार्श्वनाथ ड) ऋषभदेव

६. ........... यांना जैन धर्माचे संस्थापक मानतात.

अ) महावीर ब) पार्श्वनाथ क) ऋषभदेव ड) अजितनाथ

७. हेमचंद्र सूरी यांचा ............ हा ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहे.

अ) तर्कशास्त्र ब) शब्दकोश क) काव्यशास्त्र ड) परिशिष्ट पर्व

८. बौद्ध धर्मग्रंथांना ............ म्हणतात.

अ) सुत्तपिटक ब) विनयपिटक क) अभिधम्मपिटक ड) हे सर्व

९. ऋजुपालिका नदीच्या काठी ............ वृक्षाखाली वर्धमान महावीर यांना ज्ञानप्राप्ती झाली.

अ) शाल ब) आंबा क) चिंच ड) पिंपळ

१०. जैन धर्मातील प्रमुख ग्रंथांना ........... असे म्हटले जाते.

अ) संगम ब) आगम क) प्रवचने ड) उपदेश

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. गौतम बुद्धांचे महाभिनिष्क्रमण म्हणजे काय ?

२. गौतम बुद्धांना ज्ञानप्राप्ती कोठे झाली ?

३. गौतम बुद्धांनी धर्मप्रसाराचे कार्य कोणत्या भाषेतून केले?

४. बौद्ध धर्मग्रंथ कोणत्या भाषेतून लिहिले?

५. बौद्ध धर्मातील दोन प्रमुख उपपथांची नावे सांगा?

६. जैन धर्मामध्ये किती तिर्थंकर होऊन गेले?

७. वर्धमान महावीरांचा जन्म कोठे झाला?

८. जैन धर्मातील दोन पंथांची नावे सांगा?

९. हेमचंद्र सूरी यांनी कोणकोणते ग्रंथ लिहिले?

१०. कोणाला अजिवक पंथाचा प्रवर्तक मानतात?

### ३.२.४ गौतम बुद्ध आणि वर्धमान महावीर यांची शिकवण :

● **गौतम बुद्ध यांची शिकवण :**

गौतम बुद्धांची शिकवण अत्यंत साधी, सोपी व सर्वांना समजेल अशा भाषेत होती. जीवनातील दु:खापासून मनुष्य प्राण्याची सुटका करण्यासाठी दु:ख मुक्तीचा व्यवहारीक मार्ग सांगितला. वेदांचे प्रामाण्य नाकारले. यज्ञातील पशूहत्येचा निषेध केला. जाती व्यवस्था व पुरोहित शाहीला आव्हान दिले. देवाचेही अस्तित्व नाकारले. जगातील सर्व मानवांच्या दु:खाचे मूळ कारण तृष्णा किंवा आसक्तीच आहे. तृष्णेचा विरोध केल्यास खऱ्या ज्ञानाची प्राप्ती होते. आणि ज्ञान प्राप्तीसाठी कर्मकांडाची आवश्यकता नाही. गौतम बुद्धांच्या शिकवणूकीचे सार सदाचार होता. त्यांची शिकवण पुढीलप्रमाणे -

**अ) चार आर्यसत्ये :**

मानवाची दु:खातून सुटका करण्यासाठी गौतम बुद्धांनी चार प्रमुख तत्त्वांचा स्विकार केला.

**१) दु:ख :** जगात सर्वत्र दु:ख आहे.

**२) दु:ख समुदाय :** दु:खाचे मुळ कारण तृष्णा म्हणजेच वासना आहे. तृष्णेमुळे पुनर्जन्म, भोगेच्छा, अनित्य बाबी हे भिविद दु:ख होते.

**३) दु:ख निरोध :** तृष्णेचा त्याग केल्याशिवाय दु:खातून मुक्त होता येत नाही.

**४) दु:ख समुदाय निरोध मार्ग :** दु:ख नाहीसे करण्याचे मार्ग अवलंबणे यालाच अष्टांग मार्ग असे म्हणतात.

**ब) अष्टांग मार्ग :**

बौद्ध धर्माच्या शिकवणुकीचे सार म्हणजेच अष्टांग मार्ग होय. दु:ख नष्ट करण्याचे हे आठ मार्ग आहेत. सारनाथ येथे 'धम्मचक्रपरिवर्तन' या विषयाचे विवेचन करताना अष्टांग मार्गाविषयी माहिती दिली ते पुढीलप्रमाणे-

**१) सम्यक दृष्टी :** चार आर्यसत्याची सतत जाणीव ठेवणे. अज्ञान सर्व दु:खाचे मूळ कारण आहे. सम्यक म्हणजे योग्य, योग्य दृष्टी कशी असावी याचे विवेचन यात आहे.

**२) सम्यक संकल्प :** इच्छेचा त्याग करून कर्मापासून मुक्ती मिळवावी आणि सत्य दृष्टीप्रमाणे जीवन सुधारण्याचा निश्चय करावा.

**३) सम्यकभाषा :** कोणालाही वाईट वाटेल असे भाषण करू नये, बोलू नये, सत्य बोलावे व मृदू बोलावे.

**४) सम्यक कृती :** नेहमी सत्कर्म करीत जावे, हिंसा, चोरी, व्याभिचार करू नये.

**५) सम्यक उपजीविका :** नीती मार्गाने मिळविलेल्या संपत्तीवर उदरनिर्वाह करावा. शुद्ध व सत्य मार्गाने उपजीविका करावी.

**६) सम्यक स्मृती :** विषयभोग दु:खमय आहे ही सतत जाणीव ठेवावी. म्हणजेच सद्सद्विवेकबुद्धी जागृत ठेवणे होय.

**७) सम्यक व्यायाम :** वाईट कृती व विचार मनात न आणणे, नीतीच्या व परहिताच्या चिंतनात कालक्रमणा करावी.

**८) सम्यक समाधी :** मनाची एकाग्रता वाढविणे व निर्वाणप्राप्ती करणे.

**क) त्रीरत्ने :**

गौतमाने शील, समाधी व प्रज्ञा ही बौद्ध धर्माची त्रिरत्ने सांगितली आहेत. या त्रीरत्नांचे पालन करणे अतिशय गरजेचे आहे असे बुद्ध सांगतात.

**१) प्रज्ञा :** धर्माचे पूर्ण ज्ञान असणे.

**२) शील :** सर्व पापांपासून मुक्त जर व्यक्तीकडे शील नसेल तर प्रज्ञेला काहीच महत्त्व राहात नाही. म्हणून शुद्ध चारित्र्य महत्त्वाचे आहे.

**३) करुणा :** दु:खी माणसाबद्दल दया असणे, दुसऱ्याचे दु:ख पाहून अंत:करण द्रवणे याला करूणा म्हणतात.

**ड) पंचशील तत्त्वे :**

गौतम बुद्धांनी आपल्या अनुयायांना ५ नियम घालून दिले. दैनंदिन जीवनात उपयुक्त ठरणारे हे नैतिक नियम होते. त्यांनाच पंचशील असे म्हणतात.

**१) अहिंसा :** कोणत्याही प्राणीमात्राची हत्या करू नये.

**२) सत्य :** नेहमी सत्य बोलावे.

**३) अस्तेय :** जे आपल्या मालकीचे नाही त्याची अभिलाषा करू नये.

**४) ब्रह्मचर्य :** व्यभिचार करू नये. ब्रह्मचर्याचे पालन करावे.

**५) अपरिग्रह :** संपत्तीचा साठा आवश्यक पेक्षा जास्त करू नये.

अशाप्रकारे गौतम बुद्धांच्या धर्मात गौतमांनी मानवी दु:खाशी संबंधीत नसलेल्या बाबींची चर्चा केली नाही. विश्वाची निर्मिती, विनाश, उत्पत्ती, आत्मतत्त्व इत्यादी दहा प्रश्नांच्या बाबतीत त्यांनी मौन स्विकारले आहे. त्यांनाच बौद्ध धर्मातील दहा अव्याकृत्ये म्हणतात. गौतम बुद्धांनी स्विकारलेला मार्ग हा मध्यम मार्ग म्हणून ओळखतात. कारण त्यामध्ये अत्यंतीक भोगवाद अथवा त्यागवाद नाही. हा सुवर्णमध्य आहे. त्यामुळेच यास मध्यम मार्ग म्हणतात. त्याचा शिकवणुकीला वेगळे आणि महत्त्वपूर्ण स्थान आहे.

**● जैन तत्त्वज्ञान अथवा वर्धमान महावीरांची शिकवण :**

जैन तत्त्वज्ञान अवैदिक मानले जाते. कारण ते वेद प्रामाण्य मानत नाहीत. या जैन तत्त्वज्ञानाला अर्हत प्रवचन, जैन शासन, अनेकांतवाद अशी ही नांवे दिलेली आहेत. वर्धमान महावीरांनी समाजाला अज्ञान, रूढी,

परंपरा व जातीभेद या शृंखरेतून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपल्या उपदेशामध्ये धर्मसंबंधी आचरण करण्याचे निती नियम सांगितले. त्यास जैन धर्माची शिकवणूक अथवा तत्त्वज्ञान म्हणतात.

**अ) जैन धर्माची त्रिरत्ने :**

जैन धर्माची प्रमुख तीन मुलतत्त्वे किंवा जैन धर्माच्या शिकवणूकीचे सार त्रिरत्ने म्हणून सांगितले. जाते. ती पुढीलप्रमाणे –

**१) सम्यक दर्शन :** सत्यावर विश्वास ठेवणे तसेच जैन तिर्थंकारांच्या शिकवणूकीवर श्रद्धा ठेवणे. सम्यक ज्ञान व सम्यक चारित्र्य या दोन्हीचा आधार म्हणजे सम्यक दर्शन होय.

**२) सम्यक ज्ञान :** महावीरांनी सांगितलेल्या ज्ञानावर विश्वास ठेवणे. ज्ञान प्राप्त करून घेतल्याने जैन धर्म समजतो.

**३) सम्यक चरित्र :** नैतिक आचारांची शुद्धता राखणे व नैतिक सदाचारमय जीवन जगणे.

वरील त्रिरत्नांचे आचरण केल्यास मोक्षप्राप्ती होऊ शकते. मोक्ष म्हणजे कर्मचा क्षय आणि तो ज्ञान प्राप्त झाल्यावरच त्याचा क्षय होऊ शकतो. त्रिरत्ने अनुसरल्यामुळे आत्म्याची शुद्ध आणि मुक्त अवस्था प्राप्त होते.

**ब) पंचमहाव्रते :**

आपले जीवन पवित्र बनविण्यासाठी व योग्य आचरण ठेवण्यासाठी पाच नियम सांगितले आहेत. त्यांना पंचमहाव्रते असे म्हणतात.

**१) अहिंसा :** कोणत्याही जीवाची हिंसा करू नये अथवा शब्द विचार या कृतीद्वारे हिंसा करू नये. जैन धर्माचा हा मूलभूत सिद्धांत होता. हिंसा म्हणजे कोणत्याही सजीव प्राण्यास दुखापत करणारी कोणतीही कृती होय. शारीरिक, वाचिक व मानकि या तीन प्रकारे हिंसा होऊ शकते. जैन धर्मियांनी (श्रावकाने) आपल्या हातून यापैकी कोणतीही हिंसा होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

**२) सत्य :** नेहमी सत्य बोलावे. आपण असत्य बोलू नये व दुसऱ्याला असत्यच बोलावे लागेल अशी परिस्थिती निर्माण करू नये.

**३) अस्तेय :** जी वस्तू आपली नाही त्याची चोरी करू नये. किंवा आसक्ती बाळगू नये.

**४) ब्रह्मचर्य :** प्रत्येकाने इच्छा, वासना, भावना यावर नियंत्रण ठेवावे. परस्त्रीगमन न करणे, कोणत्याही स्त्रीशी अश्लील भाषण न करणे, एकपत्नीकत्वाचा स्विकार करणे हेच ब्रह्मचर्य होय.

**५) अपरिग्रह :** संपत्तीचा साठा अवाश्यकतेपेक्षा अधिक करू नये. तसेच आपल्या जवळील संपत्तीचा उपयोग दुसऱ्यासाठी करावा.

**क) आत्मा :**

जीवाचे मूलतत्त्व शरीर नसून आत्मा आहे. महावीर परमेश्वराचे अस्तित्व मान्य करत नाहीत. त्यांच्या मते

प्रत्येकाचा आत्मा परमेश्वर आहे. म्हणून आत्मा परीक्षक करून आत्म्याचे खरे ज्ञान प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करावा.

**ड) तीन गुणव्रते :**

श्रावक आणि श्राविकांनी संयम आणि त्याची वृत्तीची जोपासना करण्यासाठी तीन गुणव्रते सांगितली आहेत.

**१) दिग्व्रत :** प्रत्येकाने आपल्या प्रवासाची दिशा ठरवावी.

**२) कालव्रत :** आपल्या प्रवासाची कालमर्यादा निश्चित करावी.

**३) अनर्थ दंडवत :** व्यवसायीक नीतीचे पालन करावे. अहेतूक पापे न करण्याची प्रतिज्ञा करावी.

**इ) चार शिक्षाव्रते :**

जैन अनुयायास (श्रावकास) संयम, शिस्त व संन्यस्त वृत्ती वाढावी यासाठी चार शिक्षाव्रतांचे पालन करावे. महावीरांनी व्रत, उपवास, तपस्या यावर भर दिला. यामुळे आत्मिक ज्ञान प्राप्त होते. आत्मा बालवान व शुद्ध होतो व त्यास मुक्ती मिळते. संसारात राहून मोक्षप्राप्ती मिळत नाही.

**ई) स्त्री स्वातंत्र्य :**

पार्श्वनाथ व महावीरांनी जैन धर्मात स्त्रीयांना प्रवेश खुला केला. त्यामुळे अनेक स्त्रीयांनी जैन धर्माची शिक्षा घेतली. पुरुषांबरोबर स्त्रीयांना सुद्धा आध्यात्मिक विकासासाठी जैन धर्मात संधी मिळाली.

**उ) जाती व्यवस्थेस विरोध :** महावीर जातीव्यवस्थेविरुद्ध होते. मनुष्याची जात त्याच्या कर्मावर ठरते. तो ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य व शुद्र आपल्या कर्मावरून बनतो. त्यामुळे जैन धर्मात सर्व जाती मधील लोकांना प्रवेश होता. एकूणच जैन धर्म समतेवर आधारीत होता.

अशाप्रकारे जैन धर्माचे तत्त्वज्ञान असून हा धर्म प्राचीन धर्मापैकी एक धर्म असून त्याचे नियम कडक हेते. त्यामुळे त्याचा प्रचार जलद होऊ शकला नाही. त्यांना थोडेसे अनुयायी मिळाले. परंतु ते धर्माशी एकनिष्ठ होते. म्हणून आजही जैन धर्माचे अस्तित्व असलेले दिसून येते.

**● स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ४**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. जगातील सर्व दु:खाचे मूळ कारण तृष्णा किंवा आसक्ती आहे असे ........... यांनी म्हटले आहे.

अ) गौतम बुद्ध ब) वर्धमान महावीर क) गोशाल ड) होमचंद्र सूरी

२. प्रज्ञा, शिल, समाधी ही बौद्ध धर्माची ........... आहेत.

अ) तीन तत्त्वे ब) तीन मार्ग क) त्रिरत्ने ड) आर्यसत्ये

३. जैन धर्माच्या शिकवणूकीचे सार म्हणून ........... कडे पाहिले जाते.

अ) पंच अणुव्रते ब) त्रिरत्ने क) गुणव्रते ड) शिक्षाव्रते

४. महावीरांनी ............ भाषेतून आपले तत्त्वज्ञान सांगितले.

अ) गुजराती ब) अर्धमागधी क) पाली ड) संस्कृत

५. जीवाचे मूलतत्त्व शरीर नसून ........... आहे.

अ) मन ब) आत्मा क) परमेश्वर ड) ईश्वर

ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. बौद्ध धर्माची त्रिरत्ने कोणती ?

२. बौद्ध धर्माची चार आर्यसत्ये सांगा ?

३. जैन धर्माची त्रिरत्ने सांगा?

४. जैन धर्माची पंच महाव्रते कोणती ?

५. जैन धर्मात स्त्रीयांना कोणी प्रवेश खुला केला?

## ३.३ सारांश :

इ.स.पू. सहावे शतक हे प्राचीन भारताच्या इतिहासात युगप्रवर्तक घडले. याच काळात धार्मिक क्रांती घडून आली. लोखंड या धातूचा शोध व त्यामुळे कृषी व्यवसायास झालेली प्रगती हा अमुलाग्र बदल घडून आला. उत्पादनवाढीमुळे व्यापाराची आवश्यकता निर्माण होऊन यातून नागरी समाजाचा उदय झाला. व्यापारी केंद्रे अस्तित्वात आली. अयोध्या, कपिलवस्तू, श्रावस्ती, कुशीनगर, वैशाली, पाटलीमुत्र, चंपा ही त्या काळात भरभराटीस अ ालेली महानगरे होती. प्रामुख्याने १६ मराठी राज्ये (महाजनपदे) अस्तित्वात आली. याच कालखंडात संपूर्ण मानव जातीला कल्याणकारी मार्गावर नेणाऱ्या जैन व बौद्ध धर्माचा उदय झाला. या प्रस्थापित धर्माविरुद्ध (वैदिक) केलेला एक प्रकारचा उठावच होता. या धर्मानी अहिंसा मार्गाने केलेले अनुकरण त्यामुळे सर्वत्र शांतीचे वातावरण निर्माण झाले. अनेक लोकांनी हा धर्म स्विकारलेला, प्राचीन तिर्थंकारांची परंपरा असलेल्या जैन धर्माची वाढ ही मर्यादितच राहिली. बौद्ध धर्माला मात्र लोकाश्रय व राजाश्रय मिळाल्यामुळे गौतम बुद्धांनी प्रभावी प्रचार यंत्रणा व व्यवहारवादी तत्त्वज्ञानाचा प्रसार केल्याने बौद्ध धर्म हा भारताबाहेर मोठ्या प्रमाणावर प्रसारित झाला. जैन व बौद्ध धर्माने भारतीय समाजाच्या सामाजिक, धार्मिक साहित्य, स्थापत्य व कला क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडवून आणण्याचे महान कार्य केले.

## ३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

१. महाजनपदे - प्रादेशिक राज्ये.

२. त्रिपिटक – गौतम बुद्धांच्या वचनाचे तीन भाग

३. अष्टांग मार्ग – दू:ख दूर करण्याचा मार्ग

४. महापरिनिर्वाण – महान व्यक्तीचा मृत्यू

५. आजिवक – नियतीला श्रेष्ठ मानणारे

६. सम्यक – उत्कृष्ट, चांगले.

**३.५ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे :**

- **स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १ ची उत्तरे**

अ. १) गंगा २) लोखंड ३) ऐतरेय

४) बौद्ध व जैन ५) द्रविडीयन

ब. १) हडप्पा संस्कृतीच्या काळात

२) रेशिम, मलमल, शस्त्रे, हत्तीचे दात, सोने व चांदी

३) इ.स. पू. ५ वे शतक

४) मध्य गंगेच्या खोऱ्यात

५) तमिळ भाषेतील संगम साहित्यात.

- **स्वयं अध्ययन प्रश्न क्र.२ ची उत्तरे**

अ. १) कोशांबी २) प्रसेनजीत ३) महागोविंद

४) वैशाली ५) गांधार

ब. १) बनारस २) इ.स.पू. ६ वे शतक ३) अश्वपूर व भद्रिअका

४) वज्जी किंवा वृज्जी ५) इंद्रप्रस्थ

- **स्वयंअध्ययन प्रश्न क्र.३ ची उत्तरे**

अ. १) इ.स.पू. ६ वे २) गोशाल ३) लुंबिनी

४) सारनाथ ५) पार्श्वनाथ ६) ऋषभदेव

७) परिशिष्ट पर्व ८) हे सर्व ९) शाल

१०) आगम

ब. १) सर्वसंग परित्याग करून गौतम संन्यासी बनले या घटनेला 'महाभिनिष्क्रमण' म्हणतात.

२) गयेजवळील अरण्यात पिंपळ वृक्षाखाली

३) पाली

४) पाली अर्धमागधी, संस्कृत व परकीय भाषेत

५) हीनयान, महायान.

६) २४

७) वैशाली नगराच्या कुंदग्राम या उपनगरात

८) दिगंबर, श्वेतांबर

९) तर्कशास्त्र, शब्दकोष, काव्यशास्त्र, योगशास्त्रे व परिशिष्टपर्व

१०) मखलीपूत्र गोशाल.

● **स्वयं अध्ययन प्रश्न क्र. ४ ची उत्तरे**

अ. १) गौतम बुद्ध २) त्रिरत्ने ३) त्रिरत्ने

४) अर्धमागधी ५) आत्मा

ब. १) शील, समाधी व प्रज्ञा.

२) दु:ख, दु:ख समुदाय, दु:ख निरोध, दु:ख समुदाय निरोध मार्ग

३) सम्यक दर्शन, सम्यकज्ञान, सम्यक चरित्र.

४) अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह

५) पार्श्वनाथ आणि महावीर

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) टीपा लिहा.**

१. महजनपदे व त्याची वैशिष्ट्ये.

२. महाजनपदाच्या काळातील परिस्थिती

३. आजीवक पंथ

४. गौतम बुद्ध

५. वर्धमान महावीर

६. जैन तत्त्वज्ञान

७. बौद्ध धर्माच्या ऱ्हासाची कारणे.

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. दुसऱ्या नागरीकरणाची प्रक्रिया व त्याची कारणे सांगा.

२. सोळा महाजनपदांची माहिती सांगा.

३. सुधारक धर्म, पंथांच्या उदयाची कारणे सांगा.

४. आजीवक पंथ व त्याचे तत्त्वज्ञान स्पष्ट करा.

५. गौतम बुद्धांचे जीवन व त्यांची शिकवण याची माहिती द्या.

६. बौद्ध धर्माची प्रसाराची कारणे व त्यांच्या योगदाबद्दल लिहा.

७. जैन धर्माचा उदय व विकास कसा झाला याचा आढावा घ्या.

८. भगवान महावीरांचे जीवन व त्यांची शिकवण स्पष्ट करा.

९. बौद्ध व जैन धर्माच्या योगदानाबद्दल लिहा.

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :

१. कुलकर्णी अ. रा. (१९६२) प्राचिन भारत, संस्कृती आणि इतिहास, देशमुख प्रकाशन, पुणे.

❖❖❖

# घटक – ४

# मौर्य साम्राज्य

**अनुक्रमणिका :**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

४.२.१ साधने–अर्थशास्त्र व इंडीका

४.२.२ चंद्रगुप्त मौर्य व सम्राट अशोक

४.२.३ मौर्य प्रशासन

४.२.४ अशोकाचा धम्म

४.३ सारांश

४.४ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

४.५ सरावासाठी स्वाध्याय

४.६ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


## ४.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर –

- मौर्य घराण्याच्या इतिहासविषयक विविध साधनापैकी अर्थशास्त्र व इंडिका या साधनाविषयक माहिती मिळेल.
- मौर्य साम्राज्यातील राज्यकर्ते सम्राट चंद्रगुप्त मौर्य व सम्राट अशोक याच्या साम्राज्याविस्तार कार्याविषयक माहिती जाणून घेता येईल.
- मौर्य कालीन केंद्रीय प्रशासन, विविध खाती, प्रांतीय प्रशासन, जिल्हा प्रशासन, तालुका प्रशासन, ग्राम व नगर प्रशासन आदी प्रशासन व्यवस्था अभ्यासता येईल.
- सम्राट अशोक यांच्या 'धम्म' विषयक संकल्पना, स्वरूप व कार्य आदी जाणून घेता येईल.

## ४.१ प्रस्तावना :

प्राचीन भारतीय इतिहासातील पहिले एक क्षेष्ठ साम्राज्य म्हणून मौर्य साम्राज्याचा उल्लेख केला जातो. मौर्य साम्राज्य निर्मितीपूर्व काळात भारतीय भूप्रदेश राजकीयदृष्ट्या छोट्या-छोट्या राज्यात, प्रदेशात विभागला गेला होता. अशा राजकीयदृष्ट्या विभागलेल्या विविध भारतीय प्रदेशावर प्रथमत: मौर्य घराण्यातील कार्यक्षम सम्राटांनी आपल्या एकछत्री अंमलाखाली आणण्याचे कार्य केले. ही घटना भारतीय इतिहासातील एक महत्त्वपूर्ण घटना म्हणून ओळखली जाते. मौर्य साम्राज्याची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर ही साम्राज्यासत्ता एक आदर्शवत सत्ता म्हणून नावारूपास आली. प्रजाहित समोर ठेवून निर्माण केलेली राज्यव्यवस्था, कार्यक्षम प्रशासन व्यवस्था, न्याय व्यवस्था, समृद्ध अर्थव्यवस्था अशा विविध बाबीतून मौर्य साम्राज्याची झालेली भरभराट वैशिष्टपूर्ण व आदर्शवत होती. मौर्य घराण्यातील विविध सम्राटांनी आपल्या राज्याची किर्ती वृद्धीगंत केली. मौर्य साम्राज्य काळातील वाङ्:मय, धर्म, कला इ. विविध सांस्कृतिक अंगाची वाढ ही गौरवपूर्ण अशी होती. मौर्य साम्राज्याच्या स्थापनेविषयी राधाकुमूद मुखर्जी म्हणतात कि, मौर्य साम्राज्य भारताच्या इतिहासाची वैभवशाली व साम्राज्यवादी मुहुर्तमेढ होय.

प्राचीन काळातील मौर्य साम्राज्याचा इतिहास अभ्यासण्यासाठी भौतिक, ऐतिहासिक वाङ्:मय, धार्मिक वाङ्:मय आदी विविध साधने उपलब्ध आहेत. तसेच मेगॅस्थेनिस, एरिअन, कर्टिअस, प्लूटार्क, जस्टीन यांचे परकीय साहित्य उपलब्ध आहेत. भारतीय लेखनकर्ते कौटिल्य ऊर्फ आर्य चाणक्य यांचे 'अर्थशास्त्र', विशाखदत्त यांचे 'मुद्राराक्षस', बौद्ध धर्मग्रंथ साहित्य, अशोकाचे शिलालेख इत्यादी साधनाच्या आधारे मौर्य साम्राज्याच्या इतिहासाचा अभ्यास आपणास करता येईल. मौर्य घराण्यातील सम्राट चंद्रगुप्त मौर्य, सम्राट अशोक यांनी आपल्या उत्कृष्ट अशा वैभवशाली, कार्यक्षम कारकीर्दीचा ठसा उमटवला. अशा कार्यक्षम, प्रजाहितदक्ष सम्राटांनी धर्मिक बाबीतून भारतीय भूभागाबरोबरच भारताबाहेरही शांततामय मार्गाचा एक नवीन आदर्श निर्माण करून भारताची किर्ती जगभर पसरवली.

## ४.२ विषय विवेचन :

### ४.२.१ साधने :

प्राचीन कालखंडातील मौर्य साम्राज्याचा इतिहास जाणून घेण्यासाठी तत्कालीन अनेक भौतिक व वाङ्:मयीन साधने उपलब्ध आहेत. मौर्य काळातील भौतिक साधनात उल्लेखित विविध बाबी ह्या वाङ्:मयीन ग्रंथातील संदर्भाशी मिळत्या-जुळत्या आहेत. मौर्यकालीन पुरातत्वीय शिलालेख, अभिलेख, स्तंभलेख याचबरोबर स्मारके, स्तूप, विहार, संघविश्रामगृहाच्या माध्यमातून तत्कालीन धार्मिक व सामाजिक स्थितीसह कलात्मक बाबीवर प्रकाश पडतो. सम्राट अशोक याच्या काळातील शिलालेख, अभिलेख, स्तंभलेख हे महत्त्वपूर्ण समजले जातात. शिलालेख, अभिलेख, स्तंभलेख यांच्यामधून मौर्यकाळाविषयी निश्चित, निर्विवाद व प्रमाणिक स्वरूपातील ऐतिहासिक माहिती मिळण्यास मदत होते. अशोकाचे शिलालेख हे खारोष्टी व ब्राह्मी लिपीत लेखन केलेले आहेत. अफगाणीस्तान, पाकिस्तान, भारतातील महाराष्ट्र, गुजरात, गिरनार,

ओरिसा, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश आदी प्रदेशात अशोकाचे शिलालेख प्राप्त होतात. रुद्रदामन यांच्या गिरनार शिलालेखातून मौर्य शासक चंद्रगुप्त, अशोक आणि त्याचे राज्यपाल पुष्यगुप्त व तुषास्प यांचे उल्लेख मिळतात. या शिलालेखात मौर्य शासकांनी 'सुदर्शन तलाव' निर्माण केल्याचे उल्लेख ही प्राप्त होतात. शिलालेखाबरोबरच चंद्रगुप्त मौर्य, बिंदुसार, सम्राट अशोक यांच्या काळातील प्रचलित विविध नाण्याच्या माध्यमातून तत्कालीन अनेक घटनावरती प्रकाश टाकण्यास मदत होते.

मौर्य काळात वाङ्:मयीन साहित्य मोठ्या प्रमाणात निर्माण झाले. या वाङ्:मयीन साहित्यातून तत्कालीन सामाजिक, राजकीय परिस्थिती विषयक माहिती प्राप्त होते. या वाङ्:मयीन साधनामध्ये प्रामुख्याने विष्णुगुप्त ऊर्फ कौटिल्य ऊर्फ आर्य चाणक्य रचित 'अर्थशास्त्र', पतंजली रचित 'महाभाष्य', बाण रचित 'हर्षचरित', कल्हण कृत 'राजतंरगिणी', कलिदास कृत 'मालविकाग्निमित्रम्', कात्यायनी लिखित 'वार्तिका', भास कृत वर्तिका नाटके, गुणाढयाची बृह्त्कथा आधरित रचित 'कथारित्सासागर', 'पुराणे – विष्णुपुराण, भागवत पुराण, मार्कडेय पुराण इ'., 'जैन साहित्य – बृह्त्कथा कोष, आराधना, सत्यकथा संबध, कथा कोष, हरिवंश पुराण, उत्तर पुराण, त्रिलोकसागर, धवला, आगम ग्रंथ, उत्तराध्यायन सूत्र, आवश्यक सूत्र, दशकैवलिक सूत्र, परिशिष्ट पर्वत, भद्रबाहूचरित, विचार श्रेणी, तीर्थ कल्प इ'. 'बौद्ध साहित्य-दीपवंश, महावंश, अशोकावदन, अशोकावदानमाला, मंजुश्री मूलकल्प, मिलिंदपन्हो' इत्यादी उपयुक्त साधनाचा समावेश होतो.

मौर्य काळात वाङ्:मयीन साधनाबरोबरच परकीय प्रवाशी यांच्या वृत्तांतातून मौर्यकाळाविषयी ऐतिहासिक माहिती मिळते. त्यामध्ये प्रामुख्याने डायोडोरस, कर्टियस, प्लूटार्क, स्टोबो, टॉलमी, एरियन, जस्टीन, मेगॅस्थेनिस इत्यादी परकीय प्रवाशी आपल्या वृत्तांतातून मौर्यकाळाबाबत प्रमाणिक आणि सविस्तर माहिती मिळते. तसेच चिनी प्रवाशी फाह्यान, इत्सिंग, ह्यूएनत्संग यांच्या प्रवास वर्णनातून तत्कालीन भारतीय राजकारण, समाज आणि संस्कृती यांची माहिती मिळण्यास मदत होते.

मौर्यकालीन इतिहास लेखनासाठी उपरोक्त विविध साधने उपलब्ध आहेत. त्यामधील कौटिल्य यांचे 'अर्थशास्त्र' व मेगॅस्थेनिस यांचा 'इंडिका' ही साधने मौर्यकालीन इतिहास अभ्यासासाठी उपयुक्त आहेत. याद्वारे मौर्य घराणे, मौर्य साम्राज्य यांची सविस्तर माहिती मिळते. ती पुढील प्रमाणे.

### ४.२.१.१ अर्थशास्त्र :

प्राचीन भारतीय राज्यव्यवस्था आणि अर्थव्यवस्थेच्या अध्ययनासाठी 'अर्थशास्त्र' हा ग्रंथ महत्त्वपूर्ण व प्रामाणिक माहितीचा मूलभूत स्त्रोत मानला जातो. भारताच्या प्राचीन काळातील राज्यतंत्र आणि प्रशासकीय व्यवस्था या विषयी विविध ग्रंथाची रचना झाली. त्यामध्ये मौर्य साम्राज्य संस्थापक चंद्रगुप्त मौर्य यांचे प्रधानमंत्री कौटिल्य ऊर्फ आर्य चाणक्य यांनी लिहीलेला 'अर्थशास्त्र' हा ग्रंथ महत्त्वाचा मानला जातो. या ग्रंथात उल्लेखित केलेल्या विविध बाबींमध्ये फक्त समकालीन परिस्थितीचेच प्रतिबिंब पडते असे नसून त्यातील अनेक बाबी आजच्या काळातही व्यावहारिक असल्याचे दिसते. कौटिल्य लिखित 'अर्थशास्त्र' या ग्रंथाची रचना इ.स.पूर्व २ ऱ्या शतकातील मानली जाते. या ग्रंथाचा शोध डॉ. शामाशस्त्री यांना इ.स. १९०५ मध्ये लागला. इ.स. १९०९ मध्ये 'अर्थशास्त्र' हा ग्रंथ पुस्तक रूपाने प्रकाशित करण्यात आला. अर्थशास्त्र या ग्रंथात एकूण

१५ प्रकरणे असून त्याचे १८० इतके उपविभाग आहेत. या ग्रंथामध्ये ६००० इतकी श्लोकांची संख्या आहे. अर्थशास्त्र या ग्रंथाच्या नावामध्ये 'अर्थ' हा शब्द कौटिल्य यांनी उपयोजित केला असला तरी सदर ग्रंथ मुख्यत्वे करून तत्कालीन राज्यव्यवहार व राज्याचे प्रशासन या संबधित आहे. राजाने आपल्या राज्याच्या अनेकविधी समस्या कशा प्रकारे सोडवव्यात याचे सूत्रबद्ध विवेचन कौटिल्य यांनी आपल्या ग्रंथात केले आहे.

अर्थशास्त्र ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणात महसूलबाबतच्या विविध विषयाचे विवेचन आहे. दुसऱ्या प्रकरणात साम्राज्यातील नागरीप्रशासन या विषयाचे विवेचन आहे. प्रकरण तीन व चार मध्ये वैयक्तिक कायद्यासह दिवाणी व फौजदारी कायद्याबाबत उल्लेख केले आहेत. प्रकरण पाच मध्ये साम्राज्याच्या सभासद आणि अनुपालकांची कर्तव्य व जबाबदाऱ्या याचे वर्णन करण्यात आले आहे. प्रकरण सहावे यामध्ये राज्याची सप्तांगे; स्वामी, अमात्य, दुर्ग, बल, कोष, मित्र आणि राष्ट्राच्या रूपातील कार्य याचे विवेचेन करण्यात आले आहे. उर्वरित नऊ प्रकरणामध्ये लष्करी मोहिमा, युद्धात विजय मिळवण्याची रणनीती, परराष्ट्र नीती, शत्रू देशात लोकप्रियता मिळवण्याचे उपाय, युद्ध आणि कराराची संधी आदि विविध विषयावर सविस्तरपणे विवेचन करण्यात आले आहे. अशा प्रकारे कौटिल्य रचित 'अर्थशास्त्र' हा ग्रंथ मुख्यत्वे शासनाच्या व्यवहारिक समस्यांशी संबंधित रचना आहेत. या माध्यमातून कौटिल्याने आदर्श शासनव्यवस्था कशी असावी याचे विवेचन सादर केलेले आहे.

'प्रजासुखे सुखं राज्ञ : प्रजानाम् च हिते हितम ।
नात्मप्रियम् हितं राज्ञ : प्रजानाम् तु प्रियम् हितम ।' (अर्थशास्त्र-१-१९)

(प्रजेचे सुख तेच राजाचे सुख, प्रजेचे हित तेच राजाचे हित, स्वत:ला प्रिय असे राजाचे हित नाही, प्रजेला प्रिय तेच राजाला प्रिय)

- **अर्थशास्त्र ग्रंथातील प्रमुख विषयाचे विवेचन :**

**राजा :**

साम्राज्याचा प्रमुख राजा याच्या संदर्भातील विवेचन देताना कौटिल्य सांगतो कि, राजा कल्याणकारी हुकुमशाह असावा. तो प्रजाहितदक्ष, कूटनीतिज्ञ, राजनितीतज्ञ व दंडनीतीतज्ञ असावा. त्याचे परराष्ट्र धोरण हे संधिसाधू असावे. त्यांनी शत्रूबरोबर कधी मित्रत्वाने तर कधी शत्रुत्वाने वागावे. राज्याचे प्रशासन चालवत असताना राजाने आपल्या मंत्र्याचा सल्ला घ्यावा. राजाने आपल्या प्रजेस नैसर्गिक आपत्तीवेळी नुकसान भरपाई द्यावी. गुन्हेगार यांच्याकडून गुन्ह्याची कबुली करून घेण्यासाठी सुमारे १८ प्रकारचे शारीरिक छळ सांगितले आहेत. राजाने प्रजेचा पालनकर्ता या नात्याने प्रजेचे कल्याण व रक्षण करावे. आपल्या साम्राज्यातील नगर, प्रांत व सैन्य यांची व्यवस्था चोख ठेवावी. राजाने दुर्गुण, अत्याचर व व्यभिचार या पासून दूर रहावे. राजाचे व्यक्तिमत्व आकर्षक, चैतन्यमयी असावे.

**मंत्रीपरिषद :**

राजाने आपल्या राज्याचा राज्यकारभार करताना विविध मंत्र्याची मदत घ्यावी असे कौटिल्य सांगतो.

अर्थशास्त्र या ग्रंथात कौटिल्य यांनी मंत्र्यासाठी 'तीर्थ' हा शब्द वापरला आहे. कौटिल्यांनी तीर्थ चे एकूण १८ प्रकार सांगितले आहेत. या १८ प्रकारच्या तीर्थपासून राज्याची मंत्रीपरिषद बनत असे.

**न्यायदान :**

अर्थशास्त्र ग्रंथात 'कंटकशोधक' आणि 'धर्मस्थीय' या दोन प्रकारातील न्यायव्यवस्थेचा उल्लेख कौटिल्याने केला आहे. न्यायव्यवस्थेमध्ये राजा हा प्रमुख व सर्वश्रेष्ठ मानला गेला आहे. राजाने राज्यकारभार करत असताना प्रजाहित लक्षात घेऊन कायदे करावेत. राजाने न्यायदानाच्या कामकाजासाठी राज्यातील विद्वान, पुरोहित यांची मदत घ्यावी. चारित्र्य, धर्म, राज्यशासन, व्यवहार ही न्यायव्यवस्थेची प्रमुख अंगे मानली गेली. न्यायदान करताना गुन्हेगाराना ठोठवले जाणारे आर्थिक दंड हे तीन प्रकारातील असल्याचे उल्लेख कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथात केले आहेत. पूर्वसाहस दंड (४८ ते ९६ पणांपर्यंतचा दंड), मध्यमसाहस दंड (२०० ते ५०० पणांपर्यंतचा दंड) व उत्तमसाहस दंड (५०० ते १००० पणांपर्यंतचा दंड) अशा मर्यादित स्वरूपाचा आर्थिक दंड प्रकार होते.

**जनपद :**

कौटिल्य यांनी आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथात जनपद हा शब्द प्रामुख्याने राज्य व राष्ट्र यास उद्देशून वापरला आहे. जनपदाच्या सीमा ह्या नैसर्गिक म्हणजे नद्या, पर्वत यांनी निर्धारित असाव्यात. जनपद हे जंगल, दलदल, खडकाळ भूभाग व हिंस्त्र श्वापदयुक्त नसावेत. जनपद भाग हा प्रदूषणमुक्त, भरपूर पाणी व निसर्गरम्यता यांनी नटलेला असावा.

**दुर्ग :**

कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथात दुर्ग म्हणजे किल्ले या बद्दल लेखन केले आहे. शत्रूपासून राज्याचे रक्षण होण्यासाठी दुर्ग उपयोगी ठरतात. कौटिल्याने दुर्गाचे प्रामुख्याने औदिक दुर्ग (चार बाजूने पाणी), पार्वत दुर्ग (डोंगरी), धान्वत दुर्ग (पाणी, हिरवळ नसावी) व वन दुर्ग (घनदाट अरण्य) यांचे प्रकार सांगून त्याविषयी माहिती दिली आहे.

**हेर व्यवस्था :**

हेर व्यवस्थेस गुप्तहेर व्यवस्था म्हणून ही संबोधले जाते. राजाचे कान व डोळे म्हणजे हेरव्यवस्था होय, असे कौटिल्य आपल्या अर्थशास्त्र ग्रंथात म्हणतात. हेर व्यवस्थेत प्रत्यक्ष काम करणाऱ्या स्त्री व पुरुष लोकांना 'गूढ पुरुष' असे कौटिल्य आपल्या अर्थशास्त्र ग्रंथात संबोधले आहे. साम्राज्यातील सर्व गोष्टीची व हालचालीची माहिती गुप्तपणे राजापर्यंत पोहचवण्यासाठी कार्यक्षम हेर यंत्रणा असणे आवश्यक असल्याचे कौटिल्य सांगतो.

**दंड :**

कौटिल्याने 'दंड' हा शब्द 'सैन्य' या अर्थानी आपल्या ग्रंथात वापरला आहे. सैन्यव्यवस्थेसंबंधी

कौटिल्याने अर्थशास्त्र या ग्रंथात विपूलप्रमाणात माहिती दिली आहे. सैन्यदळामध्ये प्रामुख्याने पायदळ, घोडदळ, रथदल आणि हत्तीदळ या चार विभागाचा कौटिल्याने उल्लेख केला आहे. सैन्याचे एकूण सात प्रकार बाबत कौटिल्याने सांगितले आहेत. त्यामध्ये मोलसेना- राजधानी सुरक्षेसाठी, भूतसेना-पैसे देऊन लढण्यासाठी, श्रेणी-लढाऊ सैन्य, मित्र सेना-मित्र राज्याची सेना, अमित्र सेना- शत्रू राजाची सेना, अटवी सेना-इतर जमातीचे सैन्य, ओत्साहिक सेना-युद्ध प्रसंगी लुटालूट करणारी सेना इत्यादीचा समावेश होतो.

**अर्थव्यवस्था :**

राज्याच्या आर्थिक व्यवस्थेबाबत कौटिल्य आपल्या ग्रंथात म्हणतात कि, 'राजाचा खजिना नेहमी भरलेला असावा'. विविध कराच्या माध्यमातून राज्याचे उत्पन्न वाढवावे, शेतकऱ्यांकडून १/६, व्यापारी व उद्योजक यांच्याकडून १/१० इतका कर घ्यावा. तसेच खरेदी, विक्री, जकात, आयात-निर्यात, सरकारी जंगले, खाणी उद्योग, धरणे, पाणी पुरवठा इत्यादी बरोबरच नजराणा, खंडणी, दंड आदि पासून मिळणारे उत्पन्न सरकारी खजिन्यात जमा करावे.

अशा प्रकारे कौटिल्य ऊर्फ आर्य चाणक्य यांनी आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथात उपरोक्त विविध बाबीचा आढावा आपल्याला घेता येईल.

**४.२.१.२ इंडीका :**

भारतीय भूप्रदेशावर स्वाऱ्या करून ग्रीसला परत निघालेल्या ग्रीक राजा अलेक्झांडर (सिकंदर) यांचा वाटेतच मृत्यू झाला. त्यामुळे ग्रीक सरदारांनी अलेक्झांडरने जिंकलेला भारतीय भूप्रदेश बळकावण्यासाठी गोंधळ घातला. त्यामध्ये सेल्युकस निकेटर यांनी सिंहाचा वाटा उचलला. गांधार (बलुचिस्तान) प्रदेशाचा तो राजा बनला. परंतु चंद्रगुप्त मौर्य यांनी सेल्युकस यांचा पराभव करून त्याच्यावरती तह लादला. या तहानुसार सेल्युकसने आपला वकील म्हणून मेगॅस्थेनीस यांना चंद्रगुप्त मौर्य यांच्या दरबारी ठेवले. मेगॅस्थेनीस इ.स.पूर्व ३०२ ते इ.स.पूर्व २९८ या काळात सुमारे ५ वर्ष मौर्य दरबारी वकील म्हणून राहिले.

**मेगॅस्थेनीस :**

मौर्य काळात मेगॅस्थेनीस वकील म्हणून राहत असताना, त्यांनी तत्कालीन भारतीय समाज, धर्म आणि राजकारण याचे अध्ययन करून 'इंडिका' नावाचा ग्रंथ लिहला. परंतु आज तो मूळ रुपात उपलब्ध नाही. मात्र नंतरचे युनानी इतिहासकार एरियन, डियोडोरस इत्यादीनी आपल्या ग्रंथात 'इंडिका' या ग्रंथातील उतारे, उदाहरणे व माहिती संदर्भ म्हणून देतात. या विविध संदर्भ ग्रंथासाठी इंडिका ग्रंथातून घेतले गेलेले उतारे, उदाहरणे व माहिती याचे मॅक्रेडल यांनी संकलन करून इंडिका ग्रंथ निर्माण केला आहे. मेगॅस्थेनीसनी मौर्य काळात ज्या-ज्या ठिकाणांना भेटी दिल्या व आपल्या या वास्तव्य काळात त्यांनी जे अनुभवले. तसेच मौर्य प्रशासन, त्या काळातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक जीवन, प्रथा, परंपरा आदिबाबीचे वर्णन आपल्या 'इंडिका' या ग्रंथात केले. दुभाषक यांच्या मदतीने त्यास मौर्य काळातील ज्या गोष्टी समजल्या त्या त्याने आपल्या भाषेत 'इंडिका' या ग्रंथात लिहल्या. त्याचे विवेचेन पुढीलप्रमाणे

● **इंडिका ग्रंथातील वर्णन :**

भारताचे भौगोलिक वर्णन करताना मेगॅस्थेनीस म्हणतो की, 'भारत या महाद्विपाचा आकार चौकोनी असून त्याच्या उत्तर सीमेवर हिमालय पर्वत आहे. गंगा ही भारतातील सर्वात मोठी नदी आहे'.

**राजकीय जीवन :**

मेगॅस्थेनीस मौर्य काळातील राजकीय जीवन विशद करताना म्हणतो की, राजा सर्वश्रेष्ठ असल्याने राजाच्या संरक्षणासाठी व अंत:पुरात स्त्री हेर यांची नेमणूक केली जात असे. राजा एकाच शयनकक्षात कधीच दोन रात्रीपेक्षा जास्त झोपत नसे. राजा सणसमारंभा वेळी उत्तम पोषाख, अलंकार, हिरे- माणके परिधान करी. मौर्यांच्या यांचे दरबाराविषयक विस्तृत वर्णन मेगॅस्थेनीस आपल्या ग्रंथात करतो. चंद्रगुप्त मौर्य यांचे व्यक्तिमत्व अत्यंत तेजस्वी असे होते. राजाच्या दरबारात सोने, चांदी याचा वापर करून बनवलेल्या मौल्यवान खुर्च्या होत्या. रत्नजडीत सुवर्णाच्या सिंहासनावर राजा बसत असे. राजाच्या महालाच्या भोवती सुंदर बगीचा, पक्षी, प्राणी असत. राजमहल हा स्वर्गात असल्याचे भास करत होता.

**सामाजिक जीवन :**

तत्कालीन समाजजीवन अत्यंत सुखी व समृद्ध होते. सुपीक जमीन, खनिज संपत्ती विपूल प्रमाणात होती. समाजात जातीयता पाळली जात होती. जातीची बंधने अत्यंत कडक होती. श्रीमंत लोक अनेक स्त्रियांशी विवाह करत. लोकांना सुंदर वस्त्रे अलंकार वापरण्याची हौस होती. भारतीय समाज सात विभागात विभागलेला होता. १. तत्ववेत्ता, २. गृहस्थ शेतकरी, ३. धनगर व मेंढपाळ, ४. कलाकार, ५. सैनिक, ६. हेर व दूत आणि ७. सल्लागार.

**आर्थिक जीवन :**

मौर्य साम्राज्यातील आर्थिक जीवन सुखी आणि समृद्ध होते. लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय होता. सरकारकडून दुष्काळात सापडलेल्या जनतेस मदत मिळत असे. युद्धप्रसंगी शेतीचे नुकसान होऊ नये यासाठी काळजी घेतली जात असे.

**धार्मिक जीवन :**

भारतीय लोक हे धार्मिक असून त्यांच्या पुनर्जन्म या गोष्टीवरती विश्वास आहे. साधू संत यांची समाजात रेलचेल होती. मेगॅस्थेनीस हे तक्षशीलेतील साधूंचा उल्लेख करतात.

**लष्कर :**

मौर्य साम्राज्यात लष्करी व्यवस्थेसाठी ३० सदस्यांची समिती होती. या समितीचे ६ विभागात विभाजन केले होते. त्यामध्ये प्रत्येक ५ सदस्यांची नेमणूक एका विभागासाठी केली जात असे. घोडदळ, पायदळ, हत्तीदळ, नाविक दळ, रसद दल, रथदल असे विभाग असून सैनिक धनुष्यबाण, ढाल, तलवार या हत्यारांच्या मदतीने शत्रूशी लढत असे.

**पाटलीपुत्र नगराचे वर्णन :**

मेगॅस्थेनीसने आपल्या इंडिका ग्रंथामध्ये 'पाटलीपुत्र' या मौर्य राजधानी नगराचे उत्कृष्ट वर्णन केले आहे. गंगा व शोण नदीच्या संगमावर वसलेले पाटलीपुत्र हे नगर भक्कम तटबंदीयुक्त होते. या नगरात प्रवेश करण्यासाठी १२ दरवाजे, ६४ उपदरवाजे व ५०० बुरुज उभारण्यात आले. सरदार, अधिकारी, मंत्री यांच्या निवासस्थानाची उत्तम सोय होती. या नगरच्या व्यवस्थापनासाठी ३० सद्स्याचे मंडळ कार्यरत होते. त्याच्या ६ उपसमित्या होत्या.

- **स्वयं अध्ययन प्रश्न संच क्र १**

१. कौटिल्य कृत 'अर्थशास्त्र' हा ग्रंथ इ.स. पूर्व ................ शतकात लिहला गेला.

अ) ३ ऱ्या ब) ४ थ्या क) २ ऱ्या ड) १ ल्या

२. 'अर्थशास्त्र' हा ग्रंथ .................... वरती आधारलेला आहे.

अ) धर्मशास्त्र ब) तर्कशास्त्र क) समाजशास्त्र ड) राज्यव्यवस्था

३. 'अर्थशास्त्र' या ग्रंथाचा शोध ........... साली लागला.

अ) इ.स. १९०५ ब) इ.स १९०३ क) इ.स. १९०१ ड) इ. स. १८९९

४. 'अर्थशास्त्र' या ग्रंथाचे प्रकाशन ............... साली केले गेले.

अ) इ.स. १९०६ ब) इ.स १९०७ क) इ.स. १९०८ ड) इ. स. १९०९

५. 'अर्थशास्त्र, या ग्रंथात एकूण .......... इतकी प्रकरणे आहेत.

अ) १० ब) १५ क) २० ड) २५

६. कौटिल्याने अर्थशास्त्र या ग्रंथात ......... या प्रकरणात राज्याचे सप्तांगे सांगितली आहेत.

अ) १ ल्या ब) ३ ऱ्या क) ५ व्या ड) ६ व्या

७. 'तीर्थ' हा शब्द कौटिल्याने ............ या अर्थानी वापरला आहे.

अ) मंत्री ब) लष्कर प्रमुख क) न्यायाधीश ड) नगर प्रमुख

८. गुन्हेगारांना ............... प्रकारातील आर्थिक ठोठावण्याचा उल्लेख कौटिल्य करतात.

अ) दोन ब) तीन क) चार ड) पाच

९. कौटिल्याने अर्थशास्त्र या ग्रंथात राष्ट्र, राज्य यास ........ हा शब्दप्रयोग केला आहे.

अ) महाजन पद ब) जनपद क) धर्मपद ड) महाराज्य

१०. कौटिल्याने अर्थशास्त्र या ग्रंथात किल्ल्याचे .......... प्रकार उल्लेखित केले आहेत.

अ) चार ब) सहा क) आठ ड) दहा

११. ............. सैन्य प्रकार कौटिल्याने अर्थशास्त्र या ग्रंथात सांगितले आहेत.

अ) तीन ब) पाच क) सात ड) नऊ

१२. शेतकऱ्याकडून ............. टक्के इतका कर घेण्याविषयी कौटिल्याने अर्थशास्त्र ग्रंथात उल्लेख केला आहे.

अ) १/१० ब) १/८ क) १/६ ड) १/४

१३. इंडिका हा ग्रंथ .......... यांनी लिहला.

अ) मेगॅस्थेनीस ब) डियोडोरस क) एरियन ड) चाणक्य

१४. सेल्युकस निकेटर यांनी आपला........ हा वकील मौर्य दरबारी ठेवला.

अ) डिमॅक्स ब) पेट्रोक्लीज क) डियोडोयस ड) मेगॅस्थेनीस

१५. ......... यांनी इंडिका ग्रंथाचे संकलन केले.

अ) मॅक्रेडल ब) एरियन क) डियोडोयस ड) डिमॅक्स

१६. मेगॅस्थेनीस .................. या देशातील होते.

अ) रोम ब) ग्रीस क) बॅबोलियन ड) सुमेरीन

१७. मेगॅस्थेनीस यांनी ........ ही भारतातील सर्वात मोठी नदी असलेचा उल्लेख केला आहे.

अ) गंगा ब) ब्रह्मपुत्रा क) कावेरी ड) शोण

१८. राजाच्या अंत:पुरात .......... यांची नियुक्ती असे.

अ) दासी ब) स्त्री हेर क) नायकीण ड) गूढ पुरुष

१९. मेगॅस्थेनीस यांनी भारतीय समाजाची ........ विभागात विभागणी केली.

अ) ५ ब) ७ क) ९ ड) ११

२०. पाटलीपुत्र नगरच्या व्यवस्थापनासाठी ....... इतक्या संख्याचे सद्स्य मंडळ कार्यरत असल्याचे उल्लेख मेगॅस्थेनीस करतात.

अ) २५ ब) ३० क) ३५ ड) ४०

### ४.२.२ मौर्य राज्यकर्ते–चंद्रगुप्त मौर्य व सम्राट अशोक :

इ.स. पूर्व ३२६ मध्ये सिकंदर यांचे सैनिक पंजाब मधील वेगवेगळ्या राज्यातील युद्धात गुंतले होते. या भागाच्या मगध प्रदेशावरती सिकंदर यांच्या आक्रमणामुळे देशावरती संकट ओढले गेले होते. मगध शासनाकडे विशाल सेना होती. परंतु प्रजेचे सहकार्य मात्र नव्हते. प्रजा मगध शासनाच्या अत्याचारामुळे दबली गेली होती. प्रजेवरती असह्य अशा कराचा भार मगध शासनाकडून टाकला गेल्यामुळे प्रजा असंतुष्ट झाली होती. मगध राज्याला या काळात एका अशा व्यक्तीची आवश्यकता होती, जो मगध राज्याची रक्षा करेल. आणि राज्यातील विभिन्न भागास एका शासनसूत्रामध्ये बांधून चक्रवर्ती सम्राट सारखे आदर्श निर्माण करेल. अशातच राजकीय पटलावरती एका व्यक्तीचे प्रकटन झाले. त्या व्यक्तीचे नांव चंद्रगुप्त होते. ह्याची तत्कालीन विद्वान जस्टीन यांनी 'सेन्ड्रोकोटटस' ह्या नावानी नोंद केली. विलियम जोन्स हे पहिले विद्वान होते ज्यांनी सेन्ड्रोकोटटस ची ओळख भारतीय ग्रंथामध्ये उल्लेखित चंद्रगुप्त हे एकच असल्याचे दाखवून दिले. चंद्रगुप्त यांची ही ओळख भारतीय इतिहास तिथिक्रमची आधारभूत शिला बनली गेली.

#### ४.२.२.१ चंद्रगुप्त मौर्य ( इ.स.पूर्व ३२२ ते इ.स.पूर्व २९९) :

चंद्रगुप्त यांचा वंश आणि जात याबाबत विद्वानाच्यामध्ये एकमत नाही. काही विद्वानानी ब्राह्मण ग्रंथ, मुद्राराक्षस, विष्णू पुराण यांच्या मध्यकाळातील टीका व १०व्या शतकातील धुण्डीराज यांच्याद्वारे रचलेले मुद्राराक्षस ची टिका यांच्या आधारावरती चंद्रगुप्त यांना शुद्र मानले गेले. चंद्रगुप्त यांच्या वंशाबाबत ब्राह्मण, बौद्ध, जैन परंपरा आधारित ग्रंथावरून चंद्रगुप्त हे उच्चकुलीन घराणे यांच्याशी संबधित नव्हते. चंद्रगुप्त यांच्या वंशाबाबत असलेल्या विविध दंतकथाप्रमाणेच त्यांच्या प्रारंभिक व बालपण–जीवना विषयक विविध दंतकथा मोठ्या प्रमाणात आहेत. याबाबत चाणक्य व चंद्रगुप्त कथेमधील सारांश उल्लेखनीय आहे. नंदवंशाकडून अपमानित केल्यामुळे चाणक्य यांनी त्याचा समूळ नायनाट करण्याची प्रतिज्ञा केली. दरम्यान त्यांची भेट चंद्रगुप्त बरोबर झाली. चाणक्य चंद्रगुप्त यांना आपल्या बरोबर तक्षशिला याठिकाणी घेऊन गेले. तक्षशिला या ठिकाणी चाणक्य यांनी चंद्रगुप्त यांना कूटनीती विषयक शिक्षण देऊ केले. चाणक्य यांची कुटनीती आणि चंद्रगुप्त यांचे शौर्य व युद्धकौशल्य यांच्या संगमातून नंद वंश राजा धनानंद यांच्या सत्तेचे समूळ उच्चटन केले गेले. इ.स.पूर्व ३२२ मध्ये चाणक्याने चंद्रगुप्त यांना मगध राज्याच्या सिंहासनावरती विराजमान करून सम्राट पदाचा अभिषेक केला.

- **चंद्रगुप्त मौर्य यांचा साम्राज्य विस्तार :**

नंद घराण्याचे मगध राज्य चंद्रगुप्त मौर्य यांच्या ताब्यात आल्यानंतर त्यांनी आजूबाजूच्या लहान–लहान राजांना आपल्या अंकित करून घेतले. चंद्रगुप्त मौर्य यांच्या साम्राज्य विस्तारास कोठून प्रारंभ झाला याबद्दल इतिहासकारांच्यात मतभेद दिसून येतात. मुद्राराक्षस या नाटकातील वर्णनावरून चंद्रगुप्त यांनी प्रथम पंजाब जिंकला व नंतर मगध जिंकले. डॉ. राय चौधरी व डॉ. व्ही. ए.स्मिथ यांच्या मतानुसार चंद्रगुप्त यांनी प्रथम मगध जिंकले. चंद्रगुप्त यांच्या लष्करामध्ये शक, यवन, किरात, कांबोज पारसिक व अंतलोक आदी वेगवेगळे लोक होते, असे उल्लेख तत्कालीन मुद्राराक्षस या नाटकात आले आहेत.

**१. पंजाब व सिंध वरील विजय :**

तत्काळात अलेक्झांडर (सिकंदर) यांचे सैनिक जनतेबरोबर निर्दयतेने वागले. अलेक्झांडर यांच्या सैनिकांकडून केले गेलेल्या मनुष्यहानीमुळे पंजाब व सिंध भागात असंतोष पसरला गेला. या असंतोषाला तीव्र स्वरूप देण्याचे काम चंद्रगुप्त मौर्य व चाणक्य यांनी केले. जस्टीन या ग्रीक इतिहासकारच्या मते चंद्रगुप्त मौर्य यांनी धनानंद विरोधी अलेक्झांडर यांच्या सेनानीकडे मदत मिळते का यासाठी भेट घेतली होती. परंतु त्यात त्यांना यश आले नाही. कारण तत्कालीन अलेक्झांडर यांचे सेनानी सेल्युकस व निकानोर हे अलेक्झांडर यांचे साम्राज्य आपापसात वाटून घेण्यासाठी लढले. परंतु ग्रीक सेनानायकांना भारतीय जनतेने विरोध केला. शेवटी ग्रीक सेनानायक निकानोर यांची हत्या झाली. या निर्माण झालेल्या परिस्थितीचा फायदा घेऊन पंजाब व सिंध हे दोन प्रांत ग्रीकाच्या वर्चस्वातून मुक्त करण्यात चंद्रगुप्त मौर्य यांना यश आले.

**२. पाटलीपुत्र / मगध विजय :**

चंद्रगुप्त मौर्य यांनी धनानंद यांचा वध करून मगध राज्याची गादी हस्तगत केली. आपल्या लष्करी शक्ती बरोबरच साम, दाम, दंड, भेद आदी कूटनीतीचा वापरकरून नंद सत्तेचा शेवट घडवून आणला. चंद्रगुप्त यांनी मगध राज्याची मोहीम हाती घेण्यापूर्वी हिमालय पर्वताच्या पायथ्याशी असलेले राजा पर्वतक याच्या बरोबर मैत्री करार केला. राजा पर्वतक यांच्या लष्कराची व इतर काही लढाऊ जमातींची मदत घेऊन चंद्रगुप्त यांनी मगध जिंकून घेतले. मगध राज्याची राजधानी पाटलीपुत्र हे नगर ही चंद्रगुप्त यांनी जिंकून घेतले.

**३. सेल्युकस निकेटरचा पराभव :**

चंद्रगुप्त मौर्य यांनी धनानंदाचे मगधचे साम्राज्य जिंकून पंजाबपासून मगधपर्यंतच्या प्रदेशाचा सम्राट बनले. परंतु चंद्रगुप्त मौर्य हे आपले साम्राज्य स्थापनेत व साम्राज्यविस्तार अशा कार्यात गुंतलेले पाहून ग्रीक सेनानी सेल्युकस निकेटर यांनी भारतावरती आक्रमण केले. सेल्युकस निकेटर हा अलेक्झांडर (सिकंदर) यांचा नामांकित सेनापती होता. भारतातील ग्रीकाच्या ताब्यात असलेला पूर्वीचा प्रदेश जिंकावा. सिंधू नदीच्या पूर्व किनारी असलेला प्रदेश नव्याने जिंकावा या महत्त्वकांक्षेने सेल्युकस निकेटर चाल करून आला. परंतु सेल्युकस यास चंद्रगुप्त मौर्य यांनी सिंधू नदीपलीकडेच अडवले गेले. यामुळे त्यांच्यात घनघोर अशा स्वरूपाचे युद्ध झाले. या युध्दात सेल्युकस निकेटर यांचा पूर्णपणे पराभव झाला. शेवटी सेल्युकस निकेटर व चंद्रगुप्त यांच्यामध्ये तह झाला. या तहाच्या अटी पुढीलप्रमाणे होत्या.

१. काबूल, कंदाहार, बलुचिस्तान, इराण हे प्रांत चंद्रगुप्त यांना देण्यात यावेत.

२. सेल्युकस निकेटर यांनी आपली मुलगी हेलन ही चंद्रगुप्त यांना द्यावी व त्याद्वारे उभयतांत मैत्रीचे संबंध जोडले जावेत.

३. सेल्युकस निकेटर याच्यातर्फे वकील म्हणून मेगॅस्थेनीस हे चंद्रगुप्त यांच्या दरबारी राहावा.

४. चंद्रगुप्त यांनी ५०० हत्ती सेल्युकस निकेटर यांना भेट म्हणून द्यावेत.

या तहामुळे चंद्रगुप्त मौर्य यांचा दरारा व राजकीय प्रतिष्ठा यात भर पडली जाऊन चंद्रगुप्त मौर्य यांचे साम्राज्य भारताबाहेरील प्रदेशात इराणपर्यंत पसरले गेले.

**४. चंद्रगुप्त मौर्य व दक्षिण भारत विजय :**

चंद्रगुप्त मौर्य यांनी दक्षिण भारत जिंकला होता किंवा नाही याबाबत इतिहासकारांत मतभेद आहेत. परंतु अनेक इतिहासकारांच्या मते चंद्रगुप्त मौर्य यांनी दक्षिण भारतावर विजय मिळवला होता. प्लूटार्क यांच्या मते चंद्रगुप्त मौर्य यांनी हलाब सैन्याच्या जोरावरती संपूर्ण भारत जिंकला होता. डॉ. रायचौधरी यांच्या मते नंद घराण्याचा साम्राज्य विस्तार दक्षिण भारतातही झाला होता. नंद घराण्याचा पराभव केल्यानंतर आपोआपच तो प्रदेश चंद्रगुप्त मौर्य यांच्या ताब्यात आला. डॉ. आर. के. मुखर्जी व डॉ. त्रिपाठी याच्या मते चंद्रगुप्त मौर्य हा दक्षिणेचा विजेता होता. तत्कालीन जैन व तमिळ साहित्यामध्ये चंद्रगुप्त मौर्य यांनी दक्षिण भारत जिंकला होता याबाबत उल्लेख मिळतात.

**५. पूर्व व पश्चिम भारतावरील विजय :**

कलिंग (ओरिसा) राज्य वगळता संपूर्ण भारत, बंगाल प्रांतावरती ही चंद्रगुप्त मौर्य यांनी आपली सत्ता प्रस्थापित केली होती. डॉ. राय चौधरी यांच्या मते चंद्रगुप्त मौर्य याने सौराष्ट्र राज्याचा भूप्रदेश आपल्या साम्राज्यात सामील करून घेतला होता.

अशा प्रकारे चंद्रगुप्त मौर्य यांनी संपूर्ण भारतात व भारताबाहेरील प्रदेशावरती आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते. चंद्रगुप्त मौर्य यांचे साम्राज्य हिंदुकुश पर्वतापासून ते बंगाल पर्यंत व हिमालयपासून उत्तर म्हैसूर पर्यत होते. मौर्य साम्राज्यात काबूल, कंदाहार, अफगाणिस्तान, हिरात हे भारताबाहेरील प्रांत होते. याचबरोबर पंजाब, सिंध, नेपाळ, गुजरात, माळवा, मगध, बंगाल, म्हैसूर इ. प्रांत होते. तसेच ठण्याजवळील सोपारा येथे सापडलेल्या शिलालेखावरून महाराष्ट्रात ही मौर्यांचे राज्य होते हे स्पष्ट होते. चंद्रगुप्त मौर्य यांनी २४ वर्षे इतके काळ राज्य केले. त्यांच्या कारकीर्दीच्या शेवटी उत्तर भारतात बारा वर्षाचा दुष्काळ पडल्यामुळे चंद्रगुप्त मौर्य यांनी आपला मुलगा बिंदुसार यास मौर्य साम्राज्याच्या गादीवर बसवले. चंद्रगुप्त मौर्य स्वत: भद्रबाहू या जैन साधू बरोबर म्हैसूर प्रांतात श्रवणबेळगोळ येथे जाऊन १२ वर्ष कडक तप करून जैन परंपरेप्रमाणे वानप्रस्थाश्रम स्वीकारला. चंद्रगुप्त मौर्य यांनी इ.स.पूर्व ३०० मध्ये राज्यत्याग केला. अशा या महान राजाचा मृत्यु इ.स.पूर्व २९९ मध्ये झाला.

**● बिंदुसार (इ.स.पूर्व २९८ ते इ.स. पूर्व २७३)**

इ.स. पूर्व ३००मध्ये चंद्रगुप्त मौर्य हे राज्यत्याग करून दक्षिणेत निघून गेले. चंद्रगुप्त मौर्य यांच्यानंतर त्यांचा मुलगा बिंदुसार हा मौर्य साम्राज्याच्या गादीवरती आला. बिंदुसार यांच्याविषयी विशेष माहिती तत्कालीन साधनातून उपलब्ध नाही. 'अमित्रघाता' या नावानी बिंदुसार यांना ओळखले जात होते. सत्ताग्रहण केलेल्याच्या प्रारंभीकाळात त्यास तक्षशिला येथील बंडाळीस तोंड द्यावे लागले. आपल्या शत्रूचा

यशस्वीपणे त्यांनी नि:पात केला म्हणून त्यास 'अमित्रघाता' असे संबोधले जाते. तक्षशिला येथील बंडाचे कारण अनीतिमान शासकवर्ग असे होते. बिंदुसार यांनी आपला मुलगा अशोक यांची तक्षशिला प्रांतात राज्यपाल म्हणून नेमणूक केली. तत्कालीन तारानाथ हे तिबेटी ग्रंथकार असे म्हणतात की, 'बिंदुसार यांनी पूर्व समुद्र (बंगालचा उपसागर) आणि पश्चिम समुद्र (अरबी सागर) यांच्यामधील सर्व प्रदेश जिंकून आपल्या अधिपत्याखाली ठेवला होता.' यावरून मौर्य साम्राज्याच्या अधिपत्याखाली दक्षिण भारत होता.

परकीय सत्ताधीशाबरोबर बिंदुसार यांनी आपले संबंध पूर्ववत चालू होते. सीरियाचे वकील डाईमेकस हे मौर्य दरबारी होते. इजिप्त राजाचा वकील डायोनीसीऑस हे पाटलीपुत्र या ठिकाणी होता. यांच्या निरीक्षणाचा उपयोग करून प्लिनी यांनी आपल्या लेखनासाठी करून घेतला. ग्रीक राजा अँटिओकस यांच्याबरोबर मौर्य दरबाराचा पत्रव्यवहार होता. अंजिर, दारू इत्यादी जिन्नस विकत घेतल्यानंतर बिंदुसार यांनी अँटिओकसकडे एका ग्रीक सोफिस्टाची (तर्कशास्त्र तज्ञ/शिक्षक) मागणी केली. त्यास अँटिओकस यांनी असे उत्तर दिले की, 'सोफिस्टाची (तर्कशास्त्र तज्ञ/शिक्षक) यांची विक्री करणे ग्रीक कायद्यास धरून नाही'.

आपल्या पित्याप्रमाणे बिंदुसार देखील पराक्रमी होते. चंद्रगुप्त यांनी निर्माण केलेली साम्राज्यसत्ता दृढ करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य बिंदुसार यांनी केले. बिंदुसार यांना अनेक मुले होती. बिंदुसार यांच्या मृत्युनंतर (इ.स.पूर्व २७३) आपल्या वडील बंधू सुसीम यांचा खून करून अशोक यांनी मौर्य साम्राज्याची सत्तासूत्रे आपल्या हाती घेतली.

### ४.२.२.२ सम्राट अशोक ( इ.स.पूर्व २७३ ते इ.स.पूर्व २३३)

बिंदुसार यांना अनेक पुत्र असल्याचे उल्लेख तत्कालीन साहित्यात मिळतात. अशोक हा ही एक त्यांचा पुत्र होता. अशोक बालपणी हूड व भांडखोर स्वभावाचा होता. त्यामुळे त्याची सर्वाशी भांडणे होत असत. बिंदुसार यांनी आपला पुत्र अशोक यांचा हूडपणास चांगले वळण देऊन त्यास पराक्रमी व युद्धकलेत निष्णात बनवले. बिंदुसार यांच्या काळात तक्षशिला प्रांतात मोठे बंड झाले. सदर बंडातील बंडखोराचा बंदोबस्त करण्यासाठी बिंदुसार यांनी आपला मुलगा सुशीम यास पाठवले. परंतु या कामात त्यास अपयश आले. याच कामगिरीसाठी बिंदुसार यांनी अशोकाची रवानगी केली. अशोकाने काही कालावधीतच तक्षशिलातील बंडखोराचे बंड मोडीत काढले. तक्षशिला येथे शांतता प्रस्थापित करून अशोक पाटलीपुत्रकडे निघून गेले. अशोक यांच्या कामगिरीमुळे बिंदुसार यांना आपल्या पुत्राच्या कर्तृत्वाबद्दल विश्वास वाढू लागला. याच्या परिणाम दाखल बिंदुसार यांनी अशोक यास उज्जयिनी येथे राजप्रतिनिधी म्हणून पाठवले. राजप्रतिनिधी म्हणून अशोक यांनी आपले विशेषकर्तुत्व प्रगट केले. तत्कालीन बिंदुसार यांचे प्रधान राधागुप्त यांनी बिंदुसार राजास अशोक यास आपला वारस नेमण्याची शिफारस केली. बिंदुसार यांनी राधागुप्त यांची शिफारस मान्य करून अशोकाने आपल्यानंतर मौर्य साम्राज्याच्या गादीवरती बसावे. तसेच सुशीम यांनी तक्षशिला चा प्रांताधिकारी म्हणून काम पाहावे, अशी योजना केली.

● **सम्राट अशोक यांचा राज्याभिषेक :**

बिंदुसार यांनी ठरवलेल्या योजनेप्रमाणे अशोक मौर्य साम्राज्याच्या सिंहासनावरती विराजमान झाले. परंतु तक्षशिला येथे असलेले त्याचे वडील बंधू सुशीम यांने स्वत:स मौर्य साम्राज्याची गादी मिळावी म्हणून अशोकाविरूध्द बंड केले. त्यांनी पाटलीपुत्रवरती चाल केली. अशोकाने त्याचा समूळ नाश करून आपले राज्यपद निर्विवाद ठेवले. सुशीमच्या गटातील इतर काही लोकांनी अशोकाविरुद्ध बंडे केली. परंतु तीही अशोकाने वेळोवेळी मोडीत काढली. विरोधकाचा विरोध मोडून काढण्यामध्ये अशोकाची सुमारे ४ वर्ष इतका काळ गेला. हे सर्व अशोकाच्या राज्याभिषेक सनावरून दिसते. मौर्य साम्राज्यात सर्वत्र शांतता प्रस्थापित होताच अशोकाने इ.स.पूर्व २६९ मध्ये मोठ्या थाटामाटात स्वत:चा राज्याभिषेक करून घेतला. बिंदुसार यांच्या मृत्यूनंतर सुमारे ४ वर्षांनी अशोक मौर्य साम्राज्याचा सम्राट बनला. अशोक सुमारे ३७ वर्ष मौर्य साम्राज्याचा सम्राट म्हणून राज्यकारभार करून भारताची कीर्ती दीगंत केली.

राज्यरोहणानंतर सम्राट अशोक यांनी 'देवानां पिय (देवाचा लाडका), पियदसी (प्रियदर्शी), पियदशन (प्रियदर्शन) अशी बिरुदे स्वत:स धौली येथिल शिलालेखात लावली. अशोका विषयक विविध बिरुदे ही त्यांनी त्याच्या कार्यकाळात निर्माण केलेल्या विविध शिलालेखात येतात. 'अशोक' असा उल्लेख फक्त मस्की येथील शिलालेख अज्ञेत आढळतो. अशोक युवराज असताना त्यांनी तक्षशिला व उज्जैन या विभागाचा प्रशासक म्हणून कामगिरी पार पडली. राज्यारोहणानंतर परंपरेनुसार सुमारे ८ वर्षांनी (इ.स. पूर्व २६१) त्याने कलिंगवरती स्वारी केली.

● **साम्राज्यविस्तार :**

सम्राट अशोक यांच्या कारकीर्दीच्या पहिल्या काही वर्षात महत्त्वाची अशी कोणतीही घटना घडून आली नाही. वाडवडिलांनी मिळवून ठेवलेल्या साम्राज्याचा मनमुराद उपभोग घेत, कधी शिकार करीत तर कधी मित्रमंडळीच्या सहवासात मेजवान्या यांचा आस्वाद घेत अशोकानी काही वर्षे घालवली. साम्राज्यविस्ताराच्या दृष्टीने त्यांच्या कारकीर्दीत एकाच युध्दप्रसंगात त्यास सामोरे जावे लागले. तो युद्धप्रसंग म्हणजे कलिंग देशाशी युद्ध हा होय. या युद्धामुळे सम्राट अशोक यांच्या सर्व जीवनास कलाटणी मिळाली. या युद्धानंतर लढवय्ये क्षत्रिय सम्राट अशोक हे धम्म भिक्षू बनले. पुढील आपली सर्व कारकीर्द त्यांनी आपल्या धम्म चरणात घालवली.

सम्राट अशोक यांच्या कार्यकाळातील मौर्य साम्राज्याच्या विस्ताराविषयाची माहिती तत्कालीन शिलालेख, साहित्य, परकीय प्रवासी वृत्तांत, पुरातत्वीय साधने यावरून स्पष्ट होती. भारताच्या उत्तर व पश्चिमे कडील शाहबाजगढी, मनसेहरा येथिल शिलालेखावरून मौर्य साम्राज्यविस्तार दर्शवतात. तसेच वायव्य दिशेला अशोकाच्या साम्राज्याची सीमा हिंदुकुश पर्वतापर्यंत होती. कलसी, रुम्मनदेई, सागर या ठिकाणी असलेले शिलालेख व स्तंभलेख यावरून स्पष्ट होते. तसेच डेहराडून, नेपाळ प्रदेश, तरार्ट प्रदेश इ. सम्राट अशोक यांच्या साम्राज्यात समाविष्ट होते. ह्यु-एन-त्संग यांच्या उल्लेखावरून समतट (पूर्व बंगाल) या ठिकाणी अशोकाने निर्माण केलेले स्तूप आहेत. बौद्ध ग्रंथ दिव्यावदान यामधील उल्लेखानुसार बंगाल हा मगध साम्राज्याचा भाग होता.

ओरिसा, पश्चिमेस सौराष्ट्र या ठिकाणी अशोकाचे साम्राज्य विस्तारले होते. सौराष्ट्रात जुनागड, अपरांत (कोकण), मुंबई जवळील सोपारा या ठिकाणी अशोकाचे शिलालेख मिळतात. तसेच दक्षिणेस येरागुढी, कर्नुल या ठिकाणी अशोकाचे शिलालेख मिळतात. अशोकाच्या ५ व्या व १३ व्या शिलालेखातून दिसते की, यवन, कंबोज, गांधार ही ठिकाणे मौर्य साम्राज्याच्या पश्चिम सीमेवरती होती. अशोकाचे विशाल साम्राज्यात काबूल, अफगाणिस्तान व हिंदूकुश तसेच बलुचिस्तान, मकरान, सिंध, काश्मीर, नेपाळ व दक्षिणेस तमिळ इ. भूभागवरती पसरले होते.

**● कलिंग युद्ध :**

कलिंगचे युद्ध हे अशोकाचा राज्याभिषेक झाल्यानंतर ९ व्या वर्षामध्ये (इ.स.पूर्व २६१) लढले गेले. अशोकाच्या १३ व्या शिलालेखात कलिंग युद्धाविषयक माहिती मिळते. कलिंग युद्ध हे सम्राट अशोक यांच्या जीवनातील क्रांतिकारक घटना म्हणून ओळखली जाते. कलिंग राज्य नंद घराण्याच्या काळात मगध राज्याचे एक अंग होते. नंद घराण्याचा शेवट झाल्यानंतर मगध राज्याबरोबरचे आपले संबध तोडून कलिंग राज्य स्वतंत्र झाले. मेगॅस्थेनीस यांच्या लेखन वर्णनाच्या आधारावरून प्लिनी यांनी कलिंग राज्य स्वतंत्र होते असा उल्लेख केला आहे. या विषयी प्लिनी म्हणतात की, 'कलिंग राज्यातील लोक हे समुद्रालगतच्या प्रदेशात वास्तव्यास होते, पार्थलिस ही कलिंगची राजधानी होती. कलिंग राजाजवळ सुमारे ६००० पायदळ, १००० घोडेस्वार व ७०० हत्ती इतके सैन्य कलिंग राज्याचे रक्षण करत होते'. प्लिनी यांच्या उपरोक्त वर्णनावरून हे स्पष्ट होते की कलिंगचा भूप्रदेश हा मौर्य साम्राज्याचा भाग नव्हता.

कलिंग युद्ध हे सम्राट अशोक यांच्या राज्यकाळातील एक मोठी घटना होती. या युद्धाच्या विनाशकारी दु:ष्परिणामाचे वर्णन अशोकाच्या १३ व्या शिलालेखामध्ये दिले गेले आहे. या युद्धात दीड लाख लोकांना बंदी बनवून गुलाम केले गेले. एक लाख लोकांची युद्ध काळात हत्या केली गेली. तसेच अनेक निरपराधी लोक या युद्धात मारले गेले. कलिंग युद्धकाळात मोठ्या प्रमाणात नरसंहार घडून आला. सैनिका बरोबरच सर्वसामान्य लोक, ब्राह्मण, साधू यांची हत्या केली गेली. काही लोकांना गुलाम बनवले गेले. अनेक लोक बेघर झाले. या युद्धात कलिंग राज्य जिंकून मौर्य साम्रज्याचे अंग बनिवले गेले. राजघराण्यातील व्यक्तीस कलिंग राज्याचा राज्यपाल बनविण्यात आले. कलिंगची राजधानी म्हणून तोसली(पुरी जिल्हा) घोषित केले गेले.

**● कलिंग युद्धाची कारणे :**

१. मगध साम्राज्यास सीमास धोका होऊ शकतो या भयापोटी कलिंग युद्ध झाले.

२. खारवेल यांच्या काळात मौर्य साम्राज्यास कलिंगच्या शक्तीचा अनुभव आला.

३. मौर्य साम्राज्याच्या सुरक्षासाठी कलिंग जिंकून घेणे आवश्यक होते.

४. दक्षिण भारतातील थेट संपर्कासाठी सागरी व जमीन मार्गावरती मौर्याचे नियंत्रण आवश्यक होते.

५. कलिंग राज्य हा जर स्वतंत्र देश राहिला असता तर सागरी व जमीन मार्गावरून होणाऱ्या व्यापारात अडथळा निर्माण होणारा होता.

एकूणच उपरोक्त विविध कारणामुळे कलिंग हे मगध साम्राज्यात समाविष्ट करून घेणे तत्कालीन काळात सम्राट अशोकास गरजेचे होते.

**● कलिंग युद्धाचे परिणाम :**

१. अखिल भारतीय भूप्रदेशावरती मौर्यांचे साम्राज्य निर्माण झाले.

२. सर्वत्र सम्राट अशोक यांचा दरारा वाढला.

३. कलिंग युद्धामुळे सम्राट अशोकाचे ह्दय परिवर्तन झाले.

**● कलिंग युद्ध आणि अशोकाचे ह्रदय परिवर्तन :**

कलिंग युद्धानंतर सम्राट अशोक कलिंगची पाहणी करीत असता तेथील कैक भयानक देखावे त्यांच्या दृष्टीस पडले. या युद्धामुळे व त्यातून उद्भवलेल्या रोगराईमुळे असंख्य लोकांचा झालेला संहार त्याने पाहिला. हजारोंच्या संख्येने उध्वस्त व धूळधाण झालेली कुटुंबे सम्राट अशोकास प्रत्यक्ष पहावयास मिळाली. जिकडे जाईल तिकडे आक्रोश, विधवांचे हंबरडे, आई बाप यापासून पोरक्या झालेल्या मुलांच्या किंकाळ्या सम्राट अशोक यांच्या कानी पडल्या. युद्धात लंगडे, पांगळे, अपंग झालेले असंख्य लोक त्यांनी पाहिले. एके काळी सृष्टी सौंदर्याने नटलेला कलिंगचा प्रदेश युद्धामुळे उजाड झालेला त्यास दिसला. मैलो मैलो हिंडून ही त्यास धान्याचा कण आढळला नाही. उपरोक्त युद्धोत्तोर सर्व दृश्यांचा सम्राट अशोक यांच्या मनावरती विलक्षण परिणाम झाला. पराक्रमी व कठोर अंत:करणाचा सम्राट अशोक कलिंग युद्धोत्तर दु:खपूर्ण, वेदनादायी अशा देखाव्याने विरघळून गेला. आपण आपल्या स्वार्थासाठी नाहक अशी कलिंगची दुर्दशा केली याचा सम्राट अशोकास पश्चाताप झाला.

सम्राट अशोकानी निश्चय केला की, अशा तऱ्हेच्या युद्धामुळे निर्माण होणारी आपत्ती पुन्हा आपल्या बांधवावर लादणार नाही. कलिंग युद्धाच्या नंतर ४ वर्षांनी अशोकानी आपले शांततेचे धोरण जाहीर केले. कलिंग युद्धात जी भीषण हानी झाली त्याच्या एक शतांश हानी झाली तर आपल्याल्या अत्यंत दु:ख होईल असे त्याने जाहिर केले.

**● स्वयं अध्ययन प्रश्न संच क्र २ :**

१. भारतीय साहित्यात उल्लेखित चंद्रगुप्त हे ..........या नावाने परकीय साहित्यात उल्लेखित आहेत.

अ) सेन्ड्रोकोटटस ब) सेल्युकस निकेटर क) अलेक्झांडर ड) एरियन

२. चंद्रगुप्त आणि सेन्ड्रोकोटटस हे नाम उल्लेखित व्यक्ती एकच असल्याचे..........यांनी सिद्ध केले.

अ) जस्टीन ब) विल्यम जोन्स क) मेगॅस्थेनीस ड) एरियन

३. चंद्रगुप्त मौर्य यांनी इ.स.पूर्व ........... या साली मौर्य साम्राज्य स्थापन केले.

अ) ३२० ब) ३२१ क) ३२२ ड) ३२४

४. चंद्रगुप्त मौर्य यांनी मगधच्या .......... या राज्याचा पराभव केला.

अ) पर्वतक ब) खारवेल क) सुशीम ड) धनानंद

५. सेल्युकस निकेटर यांनी ......... ही आपली कन्या चंद्रगुप्त यांना भेट दिली.

अ) हेलन ब) अप्सरा क) मेलन ड) ऐलन

६. चंद्रगुप्त मौर्य यांनी इ.स.पूर्व ........... मध्ये राज्यत्याग केला.

अ) २०० ब) ३०० क) ३०२ ड) ३०६

७. सम्राट अशोक इ.स.पूर्व ........... मध्ये मौर्य साम्राज्याच्या राजगादीवरती विराजमान झाले.

अ) २४९ ब) २५९ क) २६९ ड) २७९

८. 'अशोक' हा नाम उल्लेख .......... येथील शिलालेख आज्ञेत आढळतो.

अ) कार्नुल ब) जुनागड क) शाहबाजगढी ड) मस्की

९. कलिंग युद्धाबाबत ................ शिलालेखात माहिती मिळते.

अ) १० व्या ब) ११ व्या क) १२ व्या ड) १३ व्या

१०. .......... ही कलिंग राज्याची राजधानी होती.

अ) पार्थलिस ब) पाटलीपुत्र क) तक्षशिला ड) सौराष्ट्र

११. ........... च्या युद्धानंतर सम्राट अशोक यांच्या जीवनास कलाटणी मिळाली.

अ) मस्की ब) कलिंग क) कार्नुल ड) काश्मीर

१२. सम्राट अशोक यांनी कलिंगची ................ ही राजधानी घोषित केली.

अ) पार्थलिस ब) कार्नुल क) तोसलि ड) तक्षशिला

१३. 'देवानां पिय, पियदसी, पियदशन' अशी बिरुदावली .......... यांनी धारण केली.

अ) चंद्रगुप्त ब) बिंदुसार क) महेंद्र ड) अशोक

१४. कलिंग युद्धानंतर अशोकाने ......... या धोरणाचा अवलंब केला.

अ) युद्ध ब) साम्राज्य विस्तार क) शांतता ड) वनप्रस्थाश्रम

१५. कलिंग युद्धोत्तर दृश्यामुळे अशोकाचे ............. परिवर्तन झाले.

अ) ध्येय ब) हृदय क) धोरण ड) वागणूक

### ४.२.३ मौर्य प्रशासन :

प्राचीन भारताच्या इतिहासात एका विशाल साम्राज्यनिर्मिती बरोबरच एक कार्यक्षम प्रशासन यंत्रणा उभारणारे साम्राज्य म्हणून मौर्य साम्राज्यास ओळखले जाते. चंद्रगुप्त हे मौर्य साम्राज्याचे संस्थापक होते. त्याचबरोबर ते एक उत्कृष्ठ प्रशासकही होते. प्राचीन काळातील नामवंत राजनिती तज्ज्ञ म्हणून ओळखले जाणारे आर्य चाणक्य हे चंद्रगुप्त यांच्या राज्यप्रशासनात प्रधानमंत्री व राजगुरू होते. मौर्य प्रशासन निर्मिती व उभारणीमध्ये आर्य चाणक्य यांचा प्रभाव होता. चंद्रगुप्त मौर्य यांनी आर्य चाणक्य यांच्या मदतीने निर्माण केलेली शासनव्यवस्था ही अत्यंत उत्कृष्ठ व कार्यक्षम होती. चंद्रगुप्त मौर्य यांनी भारतीय प्रशासन व्यवस्थेचा पाया घातला. भारतीय मुलखामध्ये मुस्लीम राज्यकर्त्यांच्या आगमनापर्यंत मौर्यांनी निर्माण केलेली शासन व्यवस्था ही थोड्याफार फरकाने कायम होती असे दिसून येते.

मौर्यांनी आपल्या प्रशासनावर आपले योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी साम्राज्याचे प्रामुख्याने केंद्रीय प्रशासन, प्रांतीय प्रशासन (प्रदेश, जिल्हा), तालुका (विषय), ग्राम(खेडे) व नगर प्रशासन (शहर) असे विभाग केले. त्या विभागाची माहिती खालीलप्रमाणे.

● **केंद्रीय प्रशासन :**

मौर्याच्या केंद्रीय प्रशासनाचे प्रमुख चार भाग होते.

**अ) राजा :**

चाणक्य ऊर्फ कौटिल्य यांनी राज्याची प्रमुख सात अंगे सांगितली होती. यापैकी राजा हा राज्याचे प्रमुख अंग होते. युवराज अवस्थेत त्यास त्रयी (तीनवेद), अन्विक्षिकी (तत्त्वज्ञान), वार्ता (व्यापार शास्त्र) व दंडनिती (राज्यशास्त्र) या चार विषयाचे शिक्षण आवश्यक मानले होते. राजा हाच राज्याचा सर्वश्रेष्ठ होता. राजाच्या हाती मुलकी व लष्करी व्यवस्थेची सर्व सूत्रे असत. राज्याचा राज्यकारभार व्यवस्थितपणे चालवण्यासाठी विविध अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या, मंत्र्याच्या नियुक्त्या, गुप्तहेरांच्या नेमणुका, परकिय राज्याबरोबर करार तह करणे, न्यायदान करणे इत्यादी विविध अधिकार राजास होते.

तसेच राज्यातील प्रजेला/ जनतेला जीवित व वित्ती याची हमी देणे, व्यापार उद्योगास प्रोत्साहन देणे, नैसर्गिक आपत्तीपासून जनतेचे संरक्षण करणे, कायद्याचे राज्य निर्माण करणे इ. प्रमुख कर्तव्य राजास पार पाडावी लागत असत.

**ब) मंत्रीपरिषद :**

चाणक्य ऊर्फ कौटिल्य यांच्या मते, 'राज्यरथाची राजा व मंत्री ही दोन प्रमुख चाके आहेत. यापैकी एक ही चाक अकार्यक्षम झाल्यास राज्यरथ चालू शकत नाही.' त्यामुळे राज्यकारभारात मंत्र्यांना महत्त्वाचे स्थान असे. राजाला राज्यकारभारात मदत व्हावी यासाठी विविध मंत्री गटांची एक मंत्रिपरिषद होती. मंत्रिपरिषदेतील मंत्र्याची नेमणूक स्वत: राजा करत असे. मंत्र्यांची संख्या ही मर्यादित असावी असा दंडक मौर्य

काळात होता. चाणक्य ऊर्फ कौटिल्य यांच्या मते मंत्रिपरिषदेतील व्यक्तीच्या अंगी २५ गुण असावेत. राज्याचे धोरण ठरवणे, लष्करी मोहिमांची आखणी व नियोजन करणे, सामाजिक व सांस्कृतिक कार्याच्या योजना तयार करणे इ. बाबीची जबाबदारी मंत्रिपरिषदेवरती असे.

तसेच राजाने निश्चित केलेल्या धोरणाची अंमलबजावणी करण्याचे काम मंत्रिपरिषदेवरती असे. म्हणूनच बुद्धिमान, कार्यक्षम, प्रामाणिक, स्वच्छ चारित्र्य, अनुभवी व्यक्तीचीच मंत्री पदावरती राजा नेमणूक करत असे. कारण मंत्रिपरिषद हे राज्यरथाचे एक महत्त्वाचे चाक आहे असे म्हटले आहे. मंत्रिपरिषद सचिवास परिषदाध्यक्ष असे संबोधले जात. मौर्य कालीन विविध मंत्री व त्याची कामे पुढीलप्रमाणे

१. **महामंत्री –** महामंत्री हा मंत्रिपरिषदेतील सर्वात उच्च स्थान असलेला मंत्री होता.

२. **मंत्री व पुरोहित –** चंद्रगुप्त मौर्य यांच्या काळात आर्य चाणक्य ऊर्फ कौटिल्य यांच्याकडे ही दोन्ही पदे होती. परराष्ट्र धोरण, हेरनियुक्ती व अधिकाऱ्याची निवड आणि प्रशिक्षण हे त्यांचे काम होते.

३. **समाहर्ता (महसूलमंत्री) –** राज्यातील महसूल वसूली व इतर करवसूलीचा प्रमुख म्हणून काम पाहत असे. त्याचे मदतनिस म्हणून सुराध्यक्ष, शुल्काध्यक्ष व पोताध्यक्ष हे काम करत.

४. **सेनापती –** राज्याच्या संपूर्ण युद्ध विभागाचे कामकाज सेनापतीकडे असे. सेनापतीस राज्याचे सैन्य सुसज्ज व कार्यक्षम ठेवण्यासाठी दक्ष राहवे.

५. **युवराज –** राजाचा संभाव्य वारस म्हणून जेष्ठ पुत्राची नेमणूक एखाद्या प्रांताचे प्रशासन प्रमुख म्हणून त्याच्याकडे सोपवली जाई.

६. **प्रदेष्टा –** राज्यातील कंटकशोधक (फौजदारी) न्यायालयाचे कामकाज पाहणे.

७. **व्यावहारिक –** राज्यातील धर्मस्थीय (दिवाणी) न्यायालयाचे कामकाज पाहणे.

८. **कर्मान्तक –** शासनाच्या मालकीची शेती, जंगल, खाणी, उद्योग धंदे इ. चे व्यवस्थापन करणे.

९. **नायक –** सैन्य हालचाली, युद्ध छावण्याची जबाबदारी पार पाडणे.

१०. **दंडपाल –** सैन्याच्या विविध गरजांची पूर्तता करणे.

११. **अंतपाल –** इतर सत्ताच्या आक्रमणापासून राज्याच्या सीमांचे रक्षण करणे.

१२. **दुर्गपाल –** राज्यातील किल्ल्यांची व्यवस्था पाहणे.

१३. **दौवारिक –** राजप्रसादाचा प्रमुख या नात्यांने राजप्रसादाची संपूर्ण व्यवस्था व राजप्रसादाचे रक्षण करणे.

१४. **आटविक (वनमंत्री) –** राज्यातील जंगलाचे रक्षण करून ती सुरक्षित ठेवणे.

१५. **अंतर्वशिक –** राजाचा शरीररक्षक दलाचा प्रमुख म्हणून कामकाज पाहणे.

**१६. पौर (नागरिक)–** नगर प्रशासनाची जबाबदारी

**१७. प्रशास्ता –** राज्यातील विविध विभागाच्या कागदपत्राचे संरक्षण करणे.

**क) अमात्य :**

विविध खात्यांच्या प्रमुखाला 'अमात्य' असे संबोधले जात. समाजातील विद्वान, प्रतिष्ठित, प्रामाणिक, स्वामिनिष्ठ, स्वच्छ चारित्र्य व कार्यक्षम व्यक्तींची अमात्य म्हणून नेमणूक होत असे. राजाचे कार्यकारी निर्णय अमलात आणण्यासाठी राजा अमात्यांच्या नेमणुका करी.

**ड) विविध खाती :**

मौर्यानी आपल्या कार्यकारी शासनाची विभागणी विविध खात्यात केली होती. तसेच त्यावरती श्रेणीबद्ध अधिकारी वर्गाची नियुक्ती केली जात होती.

**१. हेर खाते :**

हेर हे राजाचे कान व डोळे समजले जात. राज्याचा कारभार, देखरेख, देशांतर्गत हालचाली, अधिकारी वर्ग व राज्यातील परकीय नागरिक यांच्या हालचालींवरती देखरेख ठेवण्याचे काम प्रामुख्याने हेरामार्फत केले जात असे. राज्यनिष्ठा आणि प्रामाणिकपणा, कार्यक्षम असे गुप्तहेरांचे दोन प्रकार होत. काही हेर हे स्थानिक असत. तर काही संचारी हेर असत. हेरांना प्रशिक्षण दिले जाई. हेरामध्ये पुरुषाबरोबरच स्त्री हेर ही नेमले जात. राजद्रोह, भष्ट्राचार, शत्रू पक्षाच्या हालचाली, कर बुडवेगिरी या बाबतची माहिती संबंधित यंत्रणेस सांगण्याचे काम हेर करत. शत्रू पक्षाच्या शक्तीचा अंदाज घेऊन त्यांच्या कमकुवत बाजू विषयीची माहिती हेर राजास देत. उत्कृष्ट हेरयंत्रणेमुळे नोकरशाहीवर नियंत्रण निर्माण होऊन राष्ट्रदोह अशा घातकी चाळ्यांना पायबंद घातला होता.

**२. परराष्ट्र खाते :**

राज्याच्या साम्राज्यविस्तारासंबंधी परराष्ट्र खाते राजाला मार्गदर्शन करत. साम्राज्याच्या शेजारील राष्ट्राबरोबर मैत्रीचे संबंध ठेवण्याचे काम परराष्ट्र खात्याच्या माध्यमातून होत असे. साम, दाम, दंड, भेद या चार तत्त्वांचा वापर करून शत्रू पक्षाचा शेवट परराष्ट्र खात्यामार्फत केला जाई.

**३. न्याय खाते :**

मौर्यकाळात राजा हाच सर्वोच्च न्यायाधीश असे. त्याच्या हाताखाली वेगवेगळे न्यायाधिकारी व न्यायालये होती. न्याय व्यवस्था ही धर्म , रूढी, परंपरा यावरती आधारित होती. आजच्या काळाप्रमाणे दिवाणी न्यायालये (धर्मस्थीय) व फौजदारी न्यायालये (कंटकशोधक) तत्कालीन कालखंडात होती. तसेच परदेशी लोकांच्या दाव्यासाठीही स्वतंत्र न्यायालये अस्तित्वात होती. विवाह, वारसा, सीमावाद, करार भंग, ऋण इत्यादी दाव्याचा समावेश धर्मस्थीय (दिवाणी) न्यायालयात होत असे. चोरी, दरोडेखोरी, मारामारी, खून, बलात्कार, भेसळ,

लाचलुचपत, राजद्रोह, इत्यादी गुन्ह्यांचा समावेश कंटकशोधक (फौजदारी) न्यायालयात होत असे. फौजदारी गुन्ह्यासाठी गुन्हेगारास दंड, फटके, कैद, जप्ती, कारावास, अवयवभंग, देहांत शासन, प्राणदंड इत्यादी स्वरूपातील शिक्षा ठोठावली जात असे. ग्रामीण भागातील किरकोळ गुन्ह्यांचा न्यायनिवाडा गावपातळीवरच दिला जात असे.

नगर व जनपदासाठी 'महामात्र' व 'रज्जूक' यांची अध्यक्षीय न्यायालये अस्तित्वात होती. मौर्यांच्या न्याय व्यवस्थेबाबत मेगॅस्थेनीस म्हणतो की, 'गुन्हे क्विंचीतत होत. खून, चोरी हे गुन्हे कोणाला माहित नव्हते. लोक आपल्या घरांना कुलुपे लावत नसत, कारण लोकाच्या जीविताचे व मालमत्तेचे संरक्षण करण्याची जबाबदारी शासनाचे असे.

**४. अर्थ खाते :**

या खात्याकडे प्रामुख्याने उत्पन्नाचे (महसूल) व खर्चाचा हिशेब ठेवण्याचे काम होते. राज्यात जनहिताच्या विविध सुविधा निर्माण करण्यासाठी राज्याची भक्कम अशी आर्थिक मजबूती असणे आवश्यक असल्याचे मत कौटिल्य ऊर्फ चाणक्य यांनी मांडले आहे. राज्याचा खजिना नेहमी भरलेला असावा. त्यासाठी जमीन महसूल हा महत्त्वाचा भाग होता. मौर्य काळात जमीन महसूलास 'भाग' या नावाने संबोधले जाई. एकूण उत्पन्नाच्या १/६ ते १/२ या प्रमाणात महसूल (भाग) वसूल केला जात होता. 'बली' व 'भाग' हे कराचे दोन प्रकार मौर्य काळात प्रचलित होते. 'बली' हा धर्मिक कर असे, तर 'भाग' हा शेती उत्पन्नावरील कर होता. मौर्य काळात जमीन महसूल (भाग) हे राज्याच्या उत्पन्नाचे सर्वात महत्त्वाचे साधन होते. त्याशिवाय विणकर, पिंजकर, आयात-निर्यात मालावरती जकात, खरेदी-विक्री व्यवहार, पूलपट्टी, बंदरे, जुगार, जंगले, उद्योगधंदे, धरणे, कालवे, नजराणे भेट, खाणीपासून उत्पन्न व्यवसाय कर, वेश्याव्यवसाय कर इत्यादी प्रामुख्याने कराच्या मध्यमातून राज्याच्य उत्पन्नाची साधने होती.

मौर्य काळात राज्याची स्वतंत्र अशी महसूल गोळा करण्याची यंत्रणा कार्यरत होती. योग्य अशा अधिकाऱ्याची नेमणूक महसूल गोळा करण्याकामी केली जात होती. राज्याकडून महसूल उत्पन्नात वाढ होण्यासाठी विविध बाबीतून प्रेरणा दिली जात असे. राज्यास महसूल(भाग) व कर रूपातून मिळालेले उत्पन्न हे मुलकी व लष्करी वर्गाचे वेतन, राज्यन कारभारासाठी नेमलेले अधिकारी वर्ग, दरबार खर्च, लोककल्याण योजना, स्थापत्य, धर्मप्रसार यावरती खर्च होत असे. अर्थखात्याच्या प्रमुखास 'भांङ्गारिक' असे संबोधले जात. त्यांच्या मदतीस 'कोषाध्यक्ष' असे. महसूल अधिकाऱ्यास 'महाअक्षपटलिक' असे संबोधले जाई.

**५. कृषी व पाटबंधारे खाते :**

मौर्य काळात शेती हा प्रमुख व्यवसाय होता. शेतीस कालव्याचे पाणी पुरवठा करून शेतीतून जास्त पिके काढण्यासाठी या खात्याची निर्मिती करण्यात आली होती. नवीन कालवे बांधणे, जुने कालवे दुरुस्ती करणे ही कामे या खात्याच्या माध्यमातून राजा करत असे. गिरनार येथील प्रसिद्ध सुदर्शन तलाव चंद्रगुप्त

यांच्या कार्यकाळात बांधला गेला. त्या कालव्याची दुरुस्ती व विस्तार सम्राट अशोक यांचे सुभेदार तुशास्प यांनी केली.

**६. दळणवळण खाते :**

मौर्य काळात दळणवळण खाते या माध्यमातून राज्यात रस्तेबांधणी, रस्ते दुरुस्ती व विस्तार, विहिरी व धर्मशाळा बांधणे, रस्त्यावरती नदी, नाले, ओढे यावरती पूल बांधणे, रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावणे, रस्त्यावर मैलाचे (अंतर) दगड लावणे, प्रवाशासाठी मदतकेंद्राची निर्मिती करणे इत्यादी लोकपयोगी कामे केली जात.

**७. जनगणना खाते :**

मौर्य साम्राज्यात लोकसंख्येच्या सर्वागीन पध्दतीची मोजदाद करण्याच्या कामासाठी स्वतंत्र जनगणना खात्याची निर्मिती केली गेली. राज्यातील लोकांची जात, लिंग, वय, उद्योग, उत्पन्न, चारित्र्य इत्यादीची सविस्तर माहिती जनगणना खात्यामार्फत ठेवली जात.

**८. आरोग्य खाते :**

मौर्य काळात सार्वजनिक आरोग्य विषयक दक्षता घेण्यासाठी स्वतंत्र आरोग्य खाते कार्यरत असे. मनुष्यासाठी दवाखाने, पशु पक्षी यांच्यासाठी सार्वजनिक दवाखाने निर्माण करण्याचे व त्यावरती नियंत्रण ठेवण्याचे काम आरोग्य खात्यामार्फत केला जाई. या खात्याच्या माध्यमातून औषधी वनस्पतीच्या बागा लावून औषधालये यांची व्यवस्था केली जात. वैद्य, शल्यचिकित्सक, परिचारिका, दाया आदि कर्मचारी यांची नेमणूक आरोग्य खाते करत असे. सार्वजनिक स्वच्छता विषयी काळजी घेण्याचे कार्य आरोग्य खात्याच्या माध्यमातून केली जात.

**९. जंगल व खाणी खाते :**

राज्यातील विविध खाणी व जंगले यांचे संरक्षण संगोपन करण्याचे काम मौर्य काळात या खात्याच्या माध्यमातून होत असे.

**१०. लोककल्याण खाते :**

राज्यातील जुगारी, मद्यापी, चोर, गणिका इत्यादी लोकांच्यावरती देखरेख ठेवण्याचे कार्य लोककल्याण खात्याच्या माध्यमातून मौर्य काळात होत असे. वेश्याव्यवसाय नियंत्रण ठेवण्यासाठी 'गणिकाध्यक्ष', द्यूतावर नियंत्रण ठेवण्यासाठी 'प्रांताध्यक्ष', दारू व्यवसाय नियंत्रण ठेवण्यासाठी 'सुराध्यक्ष' इत्यादी अधिकारी लोककल्याण खात्यामार्फत मौर्यकाळात नेमले जात.

**११. लष्कर खाते :**

मौर्य शासकांनी आपल्या विशाल साम्राज्याच्या रक्षणासाठी सुसज्ज व शिस्तबद्ध अशी लष्करी

व्यवस्था निर्माण केली होती. मौर्य काळात राजा हा लष्कराचा प्रमुख होता. मौर्य काळात लष्करातील सैनिकाचे वेतन रोख स्वरुपात दिले जाई. तसेच काही वेळेस जमिनीच्या देणगी स्वरुपात ही दिले जाई. राजाला मदत करण्यासाठी ३० सद्स्यांचे एक युद्धमंडळ होते. या युद्ध मंडळाच्या ६ समित्या असत. प्रत्येक समितीमध्ये ५ सद्स्य असत. मौर्य काळात लष्कराचे प्रमुख ६ विभाग कार्यरत होते. त्याची माहिती पुढीलप्रमाणे.

- **पायदळ विभाग –** चंद्रगुप्त मौर्य यांच्या जवळ ६ लक्ष पायदळ लष्कर होते. प्रत्येक लष्करातील सैनिकाकडे भाला, तलवार, धनुष्यबाण इत्यादी हत्यारे असत. पायदळ भरती, प्रशिक्षण, सैनिकाचे खाणे, शस्त्रपुरवठा इत्यादी कामे पायदळ समिती करत असे.

- **घोडदळ विभाग –** तत्कालीन ग्रीक इतिहासकर यांच्या मते मौर्यांच्या लष्करात ३०,००० घोडदळ होते. घोडेस्वाराजवळ भाले, ढाली व तलवार इत्यादी हत्यारे असत. घोड्याची निवड, निगा, प्रशिक्षण इत्यादी कामे घोडदळ समिती करत असे.

- **हत्तीदळ विभाग –** मौर्याच्या लष्करात ९००० इतकी हत्तीची संख्या होती. लष्करातील हत्तीस युद्धाचे प्रशिक्षण दिले जात. युद्धसाहित्य वाहतूक करण्यासाठी ही हत्तीचा उपयोग केला जाई. हत्तीची निगा, प्रशिक्षण इत्यादी कामे हत्तीदळ समिती करत असे.

- **रथदळ विभाग –** मौर्यांच्या लष्करात रथांची एकूण संख्या ८००० इतकी होती. तत्कालीन काळात राज्यघराण्यातील प्रतिष्ठीत योद्धे रथात बसून युद्ध करीत. रथ सुस्थितीत ठेवणे, सर्व शस्त्रांनिशी ते सुसज्ज ठेवण्याचे काम रथदळ विभाग समिती करत असे. रथदलाच्या प्रमुख अधिकाऱ्यास 'रथाध्यक्ष' असे संबोधले जात.

- **नाविक दळ विभाग –** चंद्रगुप्त मौर्य याच्या साम्राज्यात समुद्राचा पश्चिम व पूर्व येत असल्यामुळे त्यांनी नौदलाकडे लक्ष पुरविले. युद्धप्रसंगी नद्या ओलंडण्यासाठी नाविक दळ आरमाराचा उपयोग केला जात असे. नौका व जहाज बांधणी आणि समुद्रकिनाऱ्याचे संरक्षण करण्याचे काम नाविक दळ विभाग समिती करत असे.

- **रसद विभाग –** युद्ध प्रसंगी जखमी झालेल्या सैनिकांना उचलून नेणे, त्यास वैद्यकीय सेवा देणे,सैनिकांना शस्त्रास्त्रे, धान्य यांचा पुरवठा करणे, लष्कर व रथांच्या वाहतुकीसाठी रस्ते तयार करणे इत्यादी कामे रसद विभाग समिती करत असे.

- **प्रांतीय प्रशासन :**

मौर्य काळात विशाल अशा आपल्या साम्राज्याचा राज्यकारभार पाहण्यासाठी साम्राज्याचे विभाग पाडले गेले. मौर्य साम्राज्याचे पुढील विभाग होते.

| राज्य(प्रांत) | राजधानी |
|---|---|
| १. मगध (पूर्व प्रांत) | पाटलीपुत्र |
| २. मध्य प्रांत | उज्जैन |
| ३. कलिंग | तोसली |
| ४. दक्षिणापथ | सुवर्णगिरी |
| ५. वायव्य प्रांत | तक्षशिला |

राज्याच्या विविध विभागाचा कारभार पाहण्याचे काम 'कुमार महामंत्री' याच्याकडे सोपवले जाई. प्रांताच्या प्रमुखास 'प्रांताधिपती' असे संबोधले जाई. सामन्यात प्रांताच्या प्रमुख पदी राजपुत्राची नेमणूक केली जात असे. प्रांताधिपतीच्या मदतीसाठी व सल्ला देण्यासाठी 'प्रांतपरिषद' कार्यरत असे.

- **जिल्हा प्रशासन :**

प्रांताचे विभाजन निरनिराळ्या जिल्ह्यात/ प्रदेशात केला जाई. जिल्हा प्रशासन प्रमुखास 'प्रादेशिक' म्हणून संबोधले जाई. प्रादेशिक यांच्या मदतीसाठी 'रज्जूक' आणि 'युक्त' असे दोन अधिकारी असत. रज्जूक हे भूमापन व युक्त हे पत्रव्यवहार आणि हिशोब यांचे काम पाहत असत.

- **महाल/ विषय(तालुका) प्रशासन :**

मौर्य काळात प्रदेशाचे विभाजन हे महाल/ विषय यामध्ये केले जाई. महाल/विषय यांच्या प्रमुख अधिकाऱ्यास 'गोप' किंवा 'विषयपती' म्हणून संबोधले जाई.

- **ग्राम :**

मौर्य काळात विषय/महाल याचे विभाजन 'ग्राम' मध्ये केले जाई. मौर्य प्रशासन व्यवस्थेमधील सर्वात शेवटचा घटक म्हणून 'ग्राम' विभागास ओळखले जात असे. ग्राम विभागाचा कारभार पाहण्याचे काम ग्रामिक/ग्रामीण हा स्थानिकाच्या मदतीने करत.

- **नगर प्रशासन :**

मेगॅस्थेनीस यांच्या 'इंडिका' तसेच कौटिल्य ऊर्फ चाणक्य 'अर्थशास्त्र' या ग्रंथात व अशोकाचे शिलालेखात विविध नगरे व त्याच्या प्रशासनाविषयी माहिती मिळते. पाटलीपुत्र, तक्षशिला, उज्जयिनी, सुवर्णगिरी, कोशांबी यासारखी विविध नगरे मौर्य काळात होती. अशा नगरांचा कारभार स्वतंत्रपणे विविध स्थानिक लोकांच्या समितीच्या माध्यमातून चालवला जात. मौर्य काळात नगरांचा कारभार पाहण्यासाठी प्रत्येकी ५ सदस्य संख्या असलेल्या एकूण ६ समित्या कार्यरत असत. नगर प्रमुखास नगरपिता, नगराध्यक्ष, पौरपाल इत्यादी नावानी संबोधले जात असे. नगरामध्ये प्रशासनाच्या दृष्टीने स्थानिक लोकाच्या समिती विभागाच्या माध्यमातून केली जाणारी कामे पुढील प्रमाणे

**१. पहिली समिती :** मजुराचे दर ठरविणे, कच्चा मालाची शुद्धता राखणे, कारागिरी कलाकार यांना संरक्षण देणे, उत्पादनाचा दर्जा कायम ठेवणे इत्यादी कामे सदर समितीच्या माध्यमातून केली जात.

**२. दुसरी समिती :** नगरामध्ये प्रवेशित परदेशी नागरिकांवर देखरेख व नियंत्रण ठेवण्याचे काम या समित्याच्या माध्यमातून होत असे.

**३. तिसरी समिती :** नगरभागातील जन्म- मृत्यूची नोंद व लोकसंख्याची खाणेसुमारी करण्याचे काम ही समिती करे.

**४. चौथी समिती :** मालाचे उत्पादन, उद्योगधंदे, कारखाने यांच्यावर देखरेख ठेवण्याचे काम चौथी समिती करीत असे.

**५. पाचवी समिती :** नगर भागात विक्री होणाऱ्या सर्व मालावर कर गोळा करण्याचे काम सदर समिती कडून केले जाई.

**६. सहावी समिती :** नगरातील वजन, मापे, व्यापार, विक्री इत्यादी वर देखरेख करण्यासाठी सहावी समिती होती.

या ६ समित्याशिवाय नगर भागातील लोकांचे आरोग्य, पाणीपुरवठा, स्वच्छता, शिक्षण, उद्याने व मनोरंजन इत्यादीवरती नियंत्रण देखरेख करण्यासाठी 'नगर नियामक मंडळ' होते.

● **पाटलीपुत्र नगराचे वर्णन :**

मौर्यकालीन पाटलीपुत्र नगर हे विद्या व कलेचे माहेरघर म्हणून प्रसिद्ध होते. पाटलीपुत्र नगराची लांबी सुमारे १४.४ किलोमीटर व रुंदी ३.२ किलोमीटर इतकी होती. या नगरास ६४ वेशी (प्रवेशद्वार) व ५६० बुरुज होते. नगराच्या संरक्षणासाठी ६०० फुट रुंद व ५० फुट खोल खंदक बनविले होते. नगरात रात्री ९ ते पहाटे ३ या वेळात नगरात संचारबंदी असे. गुन्हेगार, समाजकंटक, दरोडेखोर यांना नगरात रात्रीच्या वेळी हालचालीस वाव मिळू नये हा यामागील उद्देश होता. तसेच नगरच्या संरक्षणासाठी खडे सैन्य ठेवले जात असे.

अशा प्रकारे मौर्य काळात निर्माण केले गेलेले शासन यंत्रणा अंत्यंत उत्कृष्ठ व कार्यक्षम असल्याची दिसते. मौर्य सत्ताधीशांनी आपल्या प्रशासन व्यवस्थेत सत्तेचे विकेंद्रीकरण करून एक आदर्श व लोकाभिमुख अशा प्रशासन व्यवस्था आपल्या साम्राज्यात राबिवली. केवळ कर घेऊन प्रजेचे संरक्षण करणे असा मर्यादित हेतू मौर्य काळातील प्रशासन व्यवस्थेचा नसल्याचे दिसते. तर त्यांनी त्यांच्या शासनाचे / राज्याचे स्वरूप हे कल्याणकारी, प्रजाहितदक्ष शासन अशी घडी निर्माण केली. मौर्यांनी आपल्या साम्राज्यात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी कार्यक्षमपणे प्रशासन यंत्रणा निर्माण करून ती राबवली.

● **स्वयं अध्ययन प्रश्न संच क्र ३ :**

१. ........ यांनी भारतीय प्रशासन व्यवस्थेचा पाया घातला

अ) चंद्रगुप्त मौर्य  ब) सम्राट अशोक  क) बिंदुसार  ड) धनानंद

२. मौर्य काळात मंत्रीपरिषद सचिवास .............. या नावानी संबोधले जात असे.

अ) परिषदाध्यक्ष ब) युक्त क) प्रादेशिक ड) रज्जूक

३. नगर प्रशासन व्यवस्था प्रमुख ............... हा होता.

अ) दंडपाल ब) पौर क) अंतपाल ड) अंतर्वशिक

४. मौर्य काळात विविध प्रशासकीय खात्याच्या प्रमुखास .............. या नावानी संबोधले जात.

अ) महामंत्री ब) तीर्थ क) अमात्य ड) समाहर्ता

५. नगर भागातील .......... हा न्यायालय अध्यक्ष होता.

अ) रज्जूक ब) दुर्गपाल क) दौविरिक ड) महामात्र

६. मौर्य काळात जमिन महसूल एकूण उत्पन्नाच्या .............. इतका वसूल करत..

अ) १/४ ब) १/६ क) १/८ ड) १/१०

७. .......... हा कर धार्मिक कर होता.

अ) बली ब) भाग क) शिव ड) ब्राह्मदान

८. मौर्य काळात अर्थखात्याच्या प्रमुखास ......... असे संबोधत.

अ) कर्मान्तक ब) प्रशास्ता क) भांडारिक ड) समाहर्ता

९. ....... यास महसूल अधिकारी असे संबोधले जात.

अ) कोषाध्यक्ष ब) महाअक्षपटालिक क) कर्मान्तक ड) महामात्रा

१०. गिरनार येथील सुदर्शन तलाव .......... या मौर्य राजाच्या काळात निर्माण झाला.

अ) धनानंद ब) बिंदुसार क) सम्राट अशोक ड) चंद्रगुप्त मौर्य

११. .......... यांनी सुदर्शन तलावाची दुरुस्ती व विस्तार केला.

अ) बिंदुसार ब) चंद्रगुप्त मौर्य क) सम्राट अशोक ड) धनानंद

१२. वेश्या व्यवसायावर नियंत्रण ठेवण्याचे काम...... हा अधिकारी करत असे.

अ) गणिकाध्यक्ष ब) सुराध्यक्ष क) प्रांताध्यक्ष ड) लोकाध्यक्ष

१३. रथदलाच्या प्रमुखास ....... या नावानी संबोधले जात.

अ) सैन्याध्यक्ष ब) सुराध्यक्ष क) युद्धाध्यक्ष ड) रथाध्यक्ष

१४. प्रांत प्रमुखास ........ या नावानी संबोधले जात होते.

अ) प्रांताधिपती ब) प्रादेशिक क) राजपुत्र ड) कुमार

१५. जिल्हा प्रशासन प्रमुखास ........ या नावानी संबोधले जात होते.

अ) प्रादेशिक	ब) राजपुत्र	क) प्रांताधिपती	ड) कुमार

१६. महाल प्रशासन प्रमुखास ........ या नावानी संबोधले जात होते.

अ) कुमार	ब) रज्जूक	क) युक्त	ड) गोप

१७. मौर्य काळात नगर प्रमुखास ........ असे म्हणत.

अ) विषयपती	ब) गोपपती	क) नगरपती	ड) ग्रामपती

१८. मौर्य काळात नगरांचा कारभार पाहण्यासाठी ........ इतक्या समित्या होत्या.

अ) ५	ब) ६	क) ७	ड) ८

१९. मौर्य काळात नगर भागात ............ या वेळेसाठी संचारबंदी असे.

अ) रात्री ९ ते ५	ब) रात्री ९ ते ४	क) रात्री ९ ते ३	ड) रात्री ९ ते २

२०. ........... या ठिकाणी सुदर्शन तलाव बांधला गेला.

अ) सारनाथ	ब) सांची	क) भारूत	ड) गिरनार

### ४.२.४ अशोकाचा धम्म :

कलिंग युद्धामुळे पश्चाताप झालेल्या सम्राट अशोक यांच्या जीवनाचे एक नवीन ध्येय उदयास आले. 'दिग्विजय' धोरणाचा कलिंगयुद्धानंतर सम्राट अशोकांनी धिक्कार केला व 'धर्मविजय' धोरणाचा अंगीकार केला. तलवारीच्या जोरावरती प्रदेश काबीज करण्यापेक्षा धर्म, नीतिमत्ता या जोरावरती मानवाची मने काबीज करण्याचा अशोकानी निश्चय केला. धर्मविजय हा श्रेष्ठ विजय असल्याचे अशोकाचे मत बनले. आपल्या सत्तेचा व संपत्तीचा उपयोग आपल्या राज्यात अहिंसा धोरणाचा प्रसार करण्याकामी करावयाचे व्रत अशोकानी अंगिकारले. सत्यनाथ अय्यर म्हणतात की, अशोकानी कलिंग युद्धाच्या घटनेनंतर आपल्या आयुष्याला पावित्र्याचा उजाळा देऊन आपले व्यक्तिमत्व इतके प्रखर केले की, तो बौद्ध धर्म तत्त्वाचे मूर्तिमंत प्रतिक बनला. कलिंग घटनेनंतर मनाने निर्मळ, शांत व पवित्र बनलेले सम्राट अशोक यांचा धम्म, धम्म संकल्पना, धम्म स्वरूप, धम्म कार्य इत्यादी विवेचन पुढीलप्रमाणे.

- **धम्म :**

सम्राट अशोक यांच्या शिलालेखामध्ये 'धम्म' हा शब्द प्रयोग वारंवार झालेला आहे. अशोक आपल्या शिलालेखाच्या माध्यमातून आपल्या प्रजेकडून धम्म आचरण करण्याविषयी इच्छा व्यक्त करतात. 'धम्म' हा शब्द संस्कृत भाषेतील 'धर्म' या शब्दाचा प्राकृत भाषेतील समानार्थी शब्द आहे. अशोकानी प्रस्तुत केलेला धम्म हा नवीन धर्माशी संदर्भात नव्हता. तसेच तो बौद्ध धर्म ही नव्हता. अशोकाच्या धम्माबाबत विविध

विद्वानाच्यात मतभेद आहेत. वास्तविक पाहता अशोकाचा धम्म हा विशेष धर्म (पारंपारिक धर्म) नसून ती एक सामान्यत: आचार संहिता आहे. सदर आचार संहिता ही मानवता धर्म याचा पुरस्कार करणारी होती.आपण यास जीव धर्म, नैतिक धर्म ही म्हणू शकतो. कारण अशोक यांच्या धम्म तील अहिंसा हा भाव सृष्टीतील प्राणीमांत्रासाठी होता.

● **'धम्म' म्हणजे काय ?**

सम्राट अशोकांनी आपल्या दुसऱ्या शिलालेखात 'धम्म' म्हणजे काय असा स्वत:च प्रश्न केला आहे. या प्रश्नाचे उत्तरही याच शिलालेखातील सातव्या ओळीमध्ये दिले आहे. 'अपासिनवे- बहुकयाने - दयादानेसचे- सोचयेमादवे साधवे च !' म्हणजे कमी पाप (अपासिनवे), कल्याण(बहुकयाने), दया, दान, सत्यवचन (दयादानेसचे), पवित्रता(सोचये), निर्मळ व्यवहार(मादवे) आणि संन्यासवृत्ती (साधवे) आदी मुलभूत गुणाचे पालन आणि आचरण म्हणजे धम्म असल्याचे प्रतिपादन अशोकानी केले आहे.

सम्राट अशोक यांनी आपल्या धम्मपालन आणि आचरणासाठी काही व्यावहारिक मुलभूत कर्तव्य व तत्त्वे याचा उल्लेख शिलालेखात केला आहे. ती पुढीलप्रमाणे

१. आई वडील आणि वडीलधारी माणसांचा आदर करा.

२. गुरुजनाचा सन्मान ठेवा, त्याचा आदर बाळगा.

३. मित्रमंडळी, नातेवाईक, बौद्ध भिक्षू, ब्राह्मण, कष्टकरी याच्या प्रति चांगला व्यवहार करा.

४. दास, सेवक यांच्याशी प्रेमाने वागा.

५. अहिंसेचे पालन करा.

६. कोणत्याही प्राणीमात्राची हिंसा किंवा हत्या करू नका.

७. सत्य बोला.

८. प्राण्यास दु:ख देऊ नका.

९. धनाचा संचय करू नका.

उपरोक्त अशोकाच्या धम्माचे विविध व्यावहारीक व आचरण पैलूचे स्वरूप असल्याचे दिसते.

● **धम्माद्वारे सांगण्यात आलेल्या निषेधात्मक बाबी :**

अशोकाने तिसऱ्या शिलालेखात धम्माचे आचरण करताना काही दुर्गुणाचा त्याग करण्यास सांगितले आहे. शिलालेखात असे सांगण्यात आले आहे की, 'आसिनव गामिनि नाम अथ चंडिये निठुलये, क्रोधे माने इस्सा!'. पाप (आसिनव), व्यभिचार (चंडिये), निर्दयता (निठुलये), राग, लोभ (क्रोधे माने), मत्सर (इस्सा) आदी दुर्गुणापासून दूर राहून त्याचा त्याग केला पाहिजे. मनुष्याने आपले कार्य, व्यवहार, कर्तव्य करताना नेहमी आत्मनिरक्षण करणे गरजेचे आहे. आत्मनिरक्षणामुळे मनुष्यास त्याच्यातील दुर्गुणाविषयी ज्ञान होईल. मनुष्य

आपल्यात असलेल्या दुर्गुणाचा त्याग करत करत तो धम्म भावनाच्या पूर्णत्वास येतो. धम्माचे पालन करणाऱ्यास स्वर्गप्राप्ती होईल असे उल्लेख शिलालेखात केलेले आहेत.

**● कर्मकांड निषेध :**

इ.स.पूर्व २५६ मध्ये अशोकानी आपल्या शिलालेखात पशूबली परंपरेचा निषेध केला आहे. 'इधर नकिंचि जीवं आरभित्पा प्रजूहितव्यं न च समाजो कर्त्तव्यो!' अशोकाच्या शिलालेखातील या उल्लेखाबाबत रोमिला थापर म्हणतात की, 'अशोकानी पशू हत्यापेक्षा पशू बळी यावरती जोर दिला आहे. कर्मकांड विधीसाठी बळी देणे निषेध आहे'. अशोकानी पारंपारिक अनीतिमान सामाजिक उत्सव यावरती बंदी घालून धर्माच्या नावाखाली होणाऱ्या धनाचा अपव्यव टाळला. अशा प्रकारे अशोकानी वेगवेगळ्या पारंपारिक अनैतिकपणे चालणाऱ्या अंधविश्वासू बाबीना निर्थक मानले. कर्मकांड, अंधविश्वासपूर्ण परंपराच्या ठिकाणी अशोकानी आपल्या धम्माच्या माध्यमातून सामाजिक कल्याणाचे, नैतिकतापूर्ण कर्तव्याचे पालन करण्यावरती भर दिला. अशोकानी कर्मकांड, अंधविश्वास यांना विरोध करून 'धम्म मंगल', धम्म दान' यास श्रेष्ठ बनवले.

**● धम्माची सर्वव्यापकता :**

अशोकाच्या शिलालेखद्वारे हे स्पष्ट होते की, अशोकाचा धम्म हा मनुष्यजीवनाबरोबरच प्राणी जीवनाच्या कल्याणा विषयच्या भावनेने भरलेले आहे. 'अनालम्भो प्राणानां अविहिसा भूतानाम!' यानुसार 'सृष्टीतील सर्व प्राणीजीव प्रती अहिंसा हे धम्म ची आधारभूत शिला आहे'. यावरून स्पष्ट होते की, अशोकाच्या धम्मामध्ये सर्वव्यापकता होती. अशोकाच्या धम्मातील अहिंसा हा आशय हिंसेचा पूर्ण निषेध नव्हता. अशोकाच्या पाचव्या शिलालेखात दिलेल्या सूचीमध्ये काही खास दिवसासाठी, काही खास प्राणी,पशू यांची हत्या करू नये. काही पशू, पक्षी यांना बिलकुल मारू नये, असे स्पष्ट सांगितले आहे.

अशोकानी आपल्या द्वितीय शिलालेखामध्ये मनुष्य आणि पशू, प्राणी याच्यासाठी दवाखाने व औषाधासाठी औषधी वनस्पतीची लागवड केली. घनदाट अशा विविध फळ झाडांची रस्त्याच्या दुतर्फा लागवड केली. अशोकाने आपल्या सातव्या शिलालेखात लिहीले आहे की, रस्ते मार्गावरती मी फळ वृक्षाची लागवड केली. ज्यामुळे मनुष्य आणि पशू प्राणी यांना सावली मिळेल व फळे मिळतील. रस्ते मार्गावरती प्रति दोन मैलावरती विहिरी खाणल्या. धर्मशाळांची निर्मिती केली. तलावाची बांधणी केली. हे सर्व अशोकानी मनुष्य, पशू, पक्षी, प्राणी यांच्या सुखासाठी केले. अशा प्रकारची अशोकाच्या धम्माची सर्वव्यापकता असल्याचे दिसून येते.

**● सर्वधर्माचे सार :**

अशोकानी आपल्या १२ व्या शिलालेखामध्ये तत्कालीन वेगवेगळ्या धर्म संप्रदाय लोकांच्या मधील सहनशीलता, सहिष्णुता याबाबत आपले विचार मांडले आहेत. अशोकानी या शिलालेखाच्या माध्यमातून सर्व धर्म संप्रदायाच्या कल्याणासाठी प्रार्थना केली आहे. सर्व धर्म संप्रदायाची प्रगती व वाढीसाठी अशोकानी सकारात्मकरीत्या आग्रह केला आहे. त्यांनी धर्म संप्रदायातील संत आणि ब्राह्मण अशा दोन्हीचा समान आदर

केला. सर्व धर्मपंथाची नैतिक मुल्ये, शिकवण यांना ऐकले पाहिजे व त्याचे पालन ही केले पाहिजे. अशोकानी आपला धम्म हा इतर धर्मपंथाच्या नैतिक मुल्ये, शिकवण यांच्या विरोधात नसल्याचे दाखवून दिले. अशोकानी आपल्या शिलालेखात म्हटले आहे की, 'अयंच एतस्य फल य आत्मचासंड वड्डी च होति धम्मस्स च दीपना!' अर्थात ' याचे फळ आहे की, सर्व संप्रदायाची वाढ व विकास झाला तर धम्म चा गौरव वाढतो. या बाबत रोमिला थापर म्हणतात की, 'जी गोष्ट अशोक सर्वधर्मसमभाव म्हणून सांगतात ती अशी आहे की धम्मासाठी काही रिती रिवाज, प्रथा, परंपरा सोडून देणे गरजेचे आहे. धम्म पालन केल्यामुळे आपल्या मूळ धर्म संप्रदयाची निष्ठा कमी होणार नाही.' डॉ. रामाशंकर त्रिपाठी अशोकाच्या सर्व धर्म समभावाबद्दल म्हणतात की, 'निश्चितच अशोकाच्या धम्म बद्दलाचा भाव सर्वार्थाने सर्वाच्च आहे, जो विखुरलेले संसारास ही शांती देऊ शकतो.'

● **धम्म विजय :**

अशोकानी आपल्या १३ व्या शिलालेखाच्या माध्यामातून सर्वाना एक नवीन विचार दिला आहे. हिंसा आणि विध्वंसकारी युद्धातून प्राप्त विजयापेक्षा 'धम्म विजय' सर्व श्रेष्ठ आहे. या शिलालेखाच्या माध्यमातून अशोक धम्म विजयाबाबत सांगतात की, देवताचा प्रिय धम्म विजय हा सगळ्यात महत्त्वपूर्ण विजय आहे. माझा मुलगा, नातू, पणतू यांनी हिंसा आणि विध्वंसकारी युद्धाच्या माध्यमातून नवीन देश विजय इच्छेचा त्याग करावा. जो विजय फक्त बाणाच्या जोरावरती प्राप्त केला जातो. त्यामध्ये ही सहिष्णुता व मृत्यूदंड या बाबीकडे लक्ष देऊन धम्मविजयास वास्तविक विजय समजावा. भूलोक व परलोक या दोघांसाठी ही धम्म विजय चांगला आहे. सर्व राज्याचे प्रेम हे धम्म धम्म प्रेम बनावे. ते सर्वानसाठी शुभ आहे. अशोकाची धम्म विजय ही संकल्पना रणभूमी वरील विजय युद्धाची नसून ती धम्माचे सिद्धांताच्या प्रसार, प्रचार व स्वीकृतीवरती आधारित आहे. रोमिला थापर अशोकाच्या धम्म विजय बाबत म्हणतात की 'अशोक यांचा धम्माद्वारे विजयप्राप्ती ही धम्म सिद्धांताचा न्याय विजयाचा परिणाम आहे.'

● **धम्म स्वरूप :**

अशोक यांच्या धम्माच्या स्वरूपाविषयी अनेक विद्वानाची वेगवेगळी मते आहेत. ती पुढीलप्रमाणे–

**१. बौद्ध धर्म :**

सेनार्ट ( इंन्डियन एन्टिक्वेरी, १८९१) यांच्या मतानुसार 'अशोक यांच्या शिलालेखात उल्लेखित धम्म हा बौद्ध धर्म असून तो अशोकाच्या काळातील नैतिक बौद्ध धर्माचे प्रतिनिधित्व करतो'. परंतु अशोकानी आपल्या धम्म तत्त्वज्ञानात कोठेही बौद्ध धर्माचा संदर्भ दिला नाही.

**२. उपासक बौद्ध धर्म :**

डॉ. डी.आर. भांडारकर यांच्या मतानुसार 'अशोक यांचा धम्म हा उपासक बौद्ध धर्म होता. भांडारकर म्हणतात की, भिक्षू बौद्ध धर्म आणि उपासक बौद्ध धर्म अशी दोन रूपे बौद्ध धर्माची होती. भिक्षू बौद्ध धर्माचे स्वरूप हे भिक्षू साठी होते. जो शुद्ध मूळ बौद्ध धर्म आहे. तर उपासक बौद्ध धर्म हा व्यावहारिक आणि सरळ आहे.

**३. अशोकाचा अविष्कार :**

रोमिला थापर यांच्या मतानुसार अशोकाचा धम्म हा स्वयं अशोक यांचा अविष्कार होता.

**४. राजधर्म :**

फ्लीट (जनरल ऑफ रॉयल एशियाटीक सोसायटी, १९०८) यांच्या मतानुसार 'शिलालेखात अशोकानी ज्या धर्माचे प्रतिपादन केले आहे, तो वास्तवत: राजधर्म आहे.

**५. सार्वभौम धर्म :**

सर्व धर्माचे सार हे अशोक यांच्या धम्माचे सार आहे असे मत अधिकपणे विद्वानानी मान्य केले आहे. स्मिथ असे म्हणतात की, 'अशोक यांनी सांगितलेला धम्म हा ज्या गोष्टीचे समर्थन करतो आहे ते निश्चितपणे तत्कालीन भारतातील सर्व धर्मात त्याबाबी प्रचलित होत्या'. राधाकुमूद मुखर्जी यांनी अशोकाच्या धम्मास 'विश्वधर्म व सार्वभौम धर्म' असे म्हटले आहे. अशोकाचा धम्म हा सर्व धर्माचे सार व सर्व धर्माची एक संयुक्त विचारधारा आहे. डॉ. राजबली पाण्डे यांनी अशोकाच्या धम्माबद्दल म्हटले आहे की, जरी अशोक बौद्ध धर्मिय झाला असला तरी त्यांनी त्या धर्माचे प्रतिपादन केले आहे तो धम्म सांप्रदायिक मर्यादेतील नव्हता. त्याच्या मतानुसार अशोकाचा धम्म हा सर्व धर्मातील उच्च नैतिकमूल्य आणि जीवन पद्धती याचा एकत्रित संच आणि एक समन्वय होता. या सर्व बाबीवरून स्पष्ट होते की अशोकानी प्रतिपादित केलेला धम्म हा शुद्ध बौद्ध धर्म नव्हता.

**● अशोकाचे धम्म प्रसार कार्य :**

सम्राट अशोकाने आपल्या साम्राजात व साम्राज्याबाहेर धम्म प्रसारासाठी विविध उपक्रम राबवले. ते पुढीलप्रमाणे

**● धर्म विभाग :**

सम्राट अशोकानी धम्म प्रसारासाठी प्रांतवार अधिकाऱ्याच्या नेमणुका केल्या. प्रत्येक प्रांतात 'धर्ममहामात्र' ह्या अधिकाऱ्याच्या नेमणुका करून त्याच्यावरती धम्मप्रसाराची जबाबदारी दिली गेली. तसेच स्त्रियांना मदत करण्यासाठी 'स्त्री धर्ममहामात्र' अधिकाऱ्याच्या प्रत्येक प्रांतवार नेमणूक केली. याच्यबरोबर प्रांत प्रशासनातील रज्जूक, प्रादेशिक, युक्त, प्रतिवेदक, नगर व्यावहारिक इत्यादी अधिकाऱ्याच्याकडे त्या-त्या विभागाच्या कारभाराबरोबर धम्मप्रसाराची जबाबदारी होती.

**● तीर्थक्षेत्रांना भेटी :**

बौद्ध धर्मातील प्रचलित अहिंसेच्या विचारांनी सम्राट अशोक प्रभावित झाले. त्यांनी गौतम बुद्धांच्या विविध तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या. त्यामध्ये गया, सारनाथ, सांची, कौशांबी, पाव, कुशीनगर, लुंबीनी, ग्राम इ. स्थळांचा समावेश होता.

● **धार्मिक सभा व चर्चा :**

धम्म प्रसारासाठी सम्राट अशोक यांनी ठिकठिकाणी सभा, संमेलन, वादविवाद, चर्चासत्रे इत्यादी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले.

● **तिसऱ्या बौद्ध धर्मपरिषद आयोजन :**

गौतम बुद्ध यांच्या महापरिनिर्वाणानंतर धर्मातील मतभेदांमुळे बौद्ध धर्मात महायान व हीनयान असे दोन पंथ निर्माण झाले. दिवसेंदिवस या पंथातील मतभिन्नता वाढतच होती. अशोकानी बौद्ध पंथाच्या एकमेकात असलेली मतभिन्नता दूर करण्यासाठी पाटलीपुत्र या ठिकाणी मोग्गलीपुत्र तिस्सा यांच्या अध्यक्षतेखाली इ.स.पूर्व. २४२ मध्ये बौद्ध धर्मपरिषद आयोजन केले.

● **धर्मदूत नेमणूक :**

अशोकानी धम्म प्रसार व प्रचारासाठी आपल्या साम्राज्याबाहेरील प्रदेशात धर्मदूत पाठवले. नेपाळ, सिलोन, सिरीया, इजिप्त, मॅसिडोनिया, श्रीलंका इत्यादी देशात धर्मदूताची रवानगी केली. या कामासाठी आपला पुत्र-महेंद्र, कन्या- संघमित्रा, बंधू-तिस्स, महाराणी-करुवकी इत्यादी राजपरिवारातील लोकांचा त्यामध्ये समावेश होता.

● **शिलालेख निर्मिती :**

सम्राट अशोकानी आपल्या साम्राज्यातील विविध दूरदूरच्या भागात टणक दगडांवरती दगडी स्तंभावरती विविध आलेख कोरून त्यावरती धर्माज्ञा, राजाज्ञा, धर्मतत्त्वे, नितीतत्त्वे, आदर्श तत्त्वे लिहिण्यात आल्या. यामाध्यमातून अशोकानी आपल्या धम्म संदेश लोकांपर्यंत पोहचवल्या.

❊ **स्वयं अध्ययन प्रश्न संच क्र ४**

१. सम्राट अशोकांनी .............. या विजयास श्रेष्ठ विजय मानले.

अ) दिग्विजय  ब) धर्म विजय  क) युद्ध विजय  ड) प्रांत विजय

२. ......... क्रमांकाच्या शिलालेखात अशोकानी दुर्गुणाबाबत सांगितले आहे.

अ) ३  ब) ४  क) ५  ड) ६

३. ......... क्रमांकाच्या शिलालेखात अशोकानी धर्मसहिष्णुता सांगितली आहे.

अ) ५  ब) ८  क) १२  ड) १३

४. .......... क्रमांकाच्या शिलालेखात अशोकानी धर्मविजय हा सर्वश्रेष्ठ विजय आहे असे सांगितले आहे.

अ) १२  ब) १३  क) १४  ड) १५

५. अशोकाचा धम्म म्हणजे ........... होता.

अ) बौद्ध धर्म   ब) जैन धर्म   क) हिंदू धर्म   ड) सर्व धर्म सार

६. धम्म प्रसारासाठी प्रांतात .......... हा अधिकारी होता.

अ) धर्म महामात्र   ब) महामात्र   क) प्रतिवेदक   ड) रज्जूक

७. सम्राट अशोकानी ............ धर्माच्या स्थळांना भेटी दिल्या.

अ) बौद्ध   ब) जैन   क) हिंदू   ड) वैष्णव

८. अशोकानी इ.स.पूर्व ......... मध्ये तिसरी बौद्ध धर्मपरिषद आयोजित केली.

अ) २००   ब) २४२   क) २४८   ड) ३००

९. अशोकानी परकीय प्रदेशात धम्म प्रसारासाठी ........... नेमले.

अ) प्रतिवेदक   ब) धर्म महामात्र   क) धर्मदूत   ड) महामात्र

१०. तिसऱ्या बौद्ध धर्मपरिषदेचे अध्यक्ष ......... हे होते.

अ) अशोक   ब) मोग्गलीपुत्र तिस्स   क) मेगॅस्थेनीस   ड) कौटिल्य

## ४.३ सारांश :

मौर्य साम्राज्याचे संस्थापक चंद्रगुप्त मौर्य यांनी बलाढ्य अशा साम्राज्याची निर्मिती केली. शूर, पराक्रमी व महत्त्वाकांक्षी चंद्रगुप्त यांनी आर्य चाणक्य यांच्या मदतीने मगधावरील नंद घराण्याची सत्ता उलथवून टाकली. चंद्रगुप्ताने मगध राज्याचे राजपद धारण करताच साम्राज्यवादी धोरण आखून ग्रीक सेनानी सेल्युकस निकेटर याच्या सत्तेचे उच्चाटन केले. त्यामुळे चंद्रगुप्त यांचे काबूल, कंदहार, बलुचिस्तान या भागावरती वर्चस्व निर्माण झाले. चंद्रगुप्त मौर्यांनी आपल्या विशाल साम्राज्याच्या कारभारासाठी कार्यक्षम अशी प्रशासन व्यवस्था निर्माण केली. चंद्रगुप्त मौर्य हे महान योद्धे, उत्तम प्रशासक म्हणून विविध इतिहासकारांनी त्याची नोंद घेतली. प्राचीन भारतातील पहिले विशाल साम्राज्य निर्माणकर्ता म्हणून भारतीय इतिहासात चंद्रगुप्त यांचे स्थान बनले.

चंद्रगुप्त मौर्य यांच्या नंतर मौर्य साम्राज्याच्या सत्तेवरती त्याचा मुलगा बिंदुसार हा आला. बिंदुसार यांच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा अशोक हा मौर्य साम्राज्याच्या सत्तेवरती विराजमान झाला. प्रतिभावंत, महत्त्वाकांक्षी असलेल्या अशोकाला मौर्य साम्राज्याची गादी मिळवण्यासाठी वारसासंघर्ष करावा लागला. आपल्या राज्यरोहणानंतर अशोकांनी राज्यविस्तारचे धोरण अवलंबले. त्यांनी काश्मीरवरती आपला प्रभाव निर्माण केला. राज्यविस्ताराच्या घोडदौडीत कलिंगचे युद्ध सम्राट अशोक यांच्या जीवनाला कलाटणी देऊन गेले. कलिंग विजयानंतर अशोकानी जीवनात युद्ध न करता धर्मविजयाचा संकल्प केला. मानव, पशू, पक्षी, प्राणी यांची सेवा करण्याकडे अशोकानी आपले लक्ष पुरविले. सत्य, अहिंसा, दया, क्षमा, शांती, जनहित या बाबीसाठी अशोकानी आपला वेळ व्यतीत

केला. त्यांनी धम्माची स्थापना करून तो जनमानसात रुजवला. अशोकानी आपल्या धम्माचा प्रचार आणि प्रसार आपल्या साम्राज्याच्या बाहेरील देशात केला.

मौर्य सत्ताधीशांनी विशाल अशा साम्राज्यनिर्मिती बरोबरच कार्यक्षम अशी प्रशासकीय यंत्रणा आपल्या साम्राज्यात उभारली. मौर्यांनी आपल्या प्रशासनाचे केंद्रीय, प्रांतीय, जिल्हा, तालुका, ग्राम, नगर असे विभाजन केले. त्यावरती कार्यक्षम व दक्ष असा अधिकारी वर्ग नेमला. आपल्या प्रशासन यंत्रणेच्या माध्यमातून त्यांनी आदर्श व लोकाभिमुख असा राज्यकारभार केला. यामुळे मौर्य काळात सामाजिक, आर्थिक, धार्मिक जीवनात स्थैर्य लाभले. समाजात सदाचार, नितीमत्ता, आदर्श तत्वे, परधर्म सहिष्णुता यांचे पालन केले गेले. अशोकांनी आपल्या प्रशासन यंत्रेणेला धम्म प्रसाराच्या पवित्र कार्याची जोड दिली. त्यामुळे अशोकाच्या धम्माचा प्रसार मोठ्या प्रमाणात होण्यास मदत होऊन धम्माचा प्रसार देशाबाहेर ही झाला. विश्वधर्म म्हणून अशोकाचा धम्म जगाच्या इतिहासात अजरामर झाला.

अशा प्रकारे मौर्य शासकांनी एकसंघ साम्राज्य, सहिष्णू धार्मिक धोरण, उत्कृष्ठ व कार्यक्षम प्रशासन यंत्रणाद्वारे भारतीय इतिहासात एक उत्कृष्ठ आदर्श निर्माण केला.

## ४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

*** स्वयं अध्ययन प्रश्न संच क्र १**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. क | २. ड | ३. अ | ४. ड | ५. ब |
| ६. ड | ७. अ | ८. ब | ९. ब | १०. अ |
| ११. क | १२. क | १३. अ | १४.ड | १५. अ |
| १६. ब | १७. अ | १८. ब | १९. ब | २०. ब |

*** स्वयं अध्ययन प्रश्न संच क्र २**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. अ | २. ब | ३. क | ४. ड | ५. अ |
| ६. ब | ७. क | ८. ड | ९. ड | १०. अ |
| ११. ब | १२. क | १३. ड | १४. क | १५. ब |

*** स्वयं अध्ययन प्रश्न संच क्र ३**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. अ | २. अ | ३. ब | ४. क | ५. ड |
| ६. ब७. अ | ८. क | ९. ब | १०. ड | |
| ११. क | १२. अ | १३. ड | १४.अ | १५. अ |
| १६. ड | १७. क | १८. ब | १९. क | २०. ड |

* स्वयं अध्ययन प्रश्न संच क्र ४

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. ब२. अ | ३. क | ४. ब | ५. ड | |
| ६. अ | ७. अ | ८. ब | ९. क | १०. ब |

## ४.५ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) टीपा लिहा.**

१. अर्थशास्त्र

२. इंडिका

३. कलिंग युद्ध

४. मौर्य कालीन नगर प्रशासन

**ब) पुढील प्रश्नाची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. मौर्य सम्राटांची कामगिरी विशद करा.

२. सम्राट अशोकाचा धम्म या बद्दल माहिती लिहा.

३. मौर्य कालीन प्रशासन यंत्रणाची सविस्तर माहिती लिहा.

## ४.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :


१. डॉ. हुकम चन्द जैन, २००८, भारतीय इतिहास एवं संस्कृति एनसाइक्लोपीडीया, जैन प्रकाशन मंदिर, जयपूर.

२. द्विजेन्द्रनारायण झा व कृष्णमोहन श्रीमाली (संपा.), २०११, प्राचीन भारत का इतिहास, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, ३४ वा पुनर्मुद्रण.

३. डॉ. अ.रा. कुलकर्णी, २००७, प्राचीन भारतीय संस्कृती आणि इतिहास, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

४. हेमचंद्र रायचौधरी (अनु. सदाशिव आठवले), २००६, प्राचीन भारताचा राजकीय इतिहास, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

५. रोमिला थापर (अनु. शरावती शिगावकर), २००७, अशोक आणि मौर्यांचा ऱ्हास, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

६. Sharma S.R.(Ed.), 1956, Arthashastra of Kautilya.

९. Altekar -.S., 1949, State and Government in Ancient India, Benaras.

१०. Mookherji R.C., Chandragupta and His Time,


❖❖❖

# घटक – १

# पूर्व ऐतिहासिक भारत

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

    १.२.१ विभाग १: साधनेः गाथा सप्तशती आणि पेरिप्लस ऑफ दि एरिथ्रियन सी

    १.२.२ विभाग २: प्रमुख राजेः सातवाहन आणि कुशाण

    १.२.३ विभाग ३: व्यापार आणि उद्योग

    १.२.४ विभाग ४ः हिनयान बौध्द धर्म

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


## १.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

- सातवाहन–कुशाण काळाच्या साधनांचा प्रातिनिधीक स्वरुपात परिचय होईल.
- सातवाहनांच्या तसेच कुशाणांच्या प्रमुख राजांचा; त्यांच्या कर्तृत्वाचा परिचय होईल.
- या काळातील समृध्दी दिसून येईल. विशेषतः आर्थिक समृध्दीचा याठिकाणी विचार होईल.
- या काळातील उद्योगातील वैविध्यांचा, श्रेणी पध्दतीचा, आंतरराष्ट्रीय समृध्द व्यापाराचा आपल्याला परिचय होईल.
- या काळातील थेरवादी बौध्द पंथाचा परिचय होईल.

## १.१ प्रस्तावना :

इ.स.पू. सहाव्या शतकापासून भारताच्या इतिहासात एका नव्या युगाचा प्रारंभ होतो. पूर्वी प्रागैतिहासिक आणि इतिहासपूर्व काळाचा अभ्यास करताना, आपल्याला प्रामुख्याने पुरातत्वीय साधनांवर अवलंबून रहावे लागत होते. आता, इ.स.पू. सहाव्या शतकानंतरच्या काळाचा इतिहास समजून घेण्यासाठी आपल्याला लिखित साधने मिळू लागतात. त्यामुळे इ.स.पू. सहाव्या शतकानंतर, आजपर्यंतच्या काळाला 'लिखित-इतिहास' काळ असे म्हंटले जाते. सोयीसाठी याच काळाला 'इतिहास' काळ असे म्हणतात.

इ.स.पू. सहावे शतक ते इ.स. तिसरे शतक हा एकप्रकारे 'इतिहास (लिखित-इतिहास)' कालखंडाच्या उदयाचा काळ आहे. म्हणून या काळाला 'पूर्व इतिहासकाळ' असे म्हणतात. या काळात सुरुवातीला इ.स.पू. सहावे शतक येते. हे शतक म्हणजे भारताच्या दुसऱ्या नागरीकरणाचा काळ. नगरे, १६ महाजनपदे, प्रादेशिक राज्यांचा उदय, बौध्द-जैन अशा अवैदिक पंथीयांचा उदय, नाणी इ. या शतकाची वैशिष्ट्ये होत.

पुढे इ.स.पू. चौथ्या शतकाच्या दरम्यान मौर्य साम्राज्य स्थापन होते. जवळपास संपूर्ण भारत या साम्राज्यात समाविष्ट होते.

पुढे, मौर्य साम्राज्याचा ऱ्हास होतो. संपूर्ण भारतामध्ये छोट्या-मोठ्या राज्यांचा उदय होतो. यांच्यात कधी संघर्ष असतो तर कधी मैत्री! याचवेळी वायव्य भारताकडून परकियांची आक्रमणं होऊ लागतात. युरोपातील ग्रीक आणि त्यांच्याच बॅक्ट्रियन, पर्शियन (पहलव), इंडो-ग्रीक या उपशाखा वायव्य भारतात स्थिर होतात. तर, मध्य आशियाकडून प्रथम शक नंतर कुशाण पुढे हूण यांची आक्रमणं होऊ लागतात.

अशा एकंदर अस्थिर परिस्थितीत, नर्मदेच्या उत्तरेकडे ज्याला सर्वसाधारणतः उत्तर भारत असे म्हणता येईल; या प्रदेशात 'कुशाण सत्तेचा' उदय होतो. नर्मदा नदीच्या म्हणजेच माळव्याच्या भागात 'शक सत्तेचा' उदय होतो. तर, नर्मदेच्या दक्षिणेला-म्हणजे दख्खन आणि दक्षिण भारतामध्ये 'सातवाहन सत्तेचा' उदय होतो. यातील, विशेषतः सातवाहनांच्या राजवटीत भारत पुन्हा एकवार स्थैर्य, शांतता आणि समृध्दी उपभोगतो.

या प्रकरणात आपण सातवाहन आणि कुशाणसत्तेचा अभ्यास करणार आहोत. शकांचा विचार, सातवाहनांच्या संदर्भात करता येईल.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ विभाग १: साधनेः गाथासप्तशती आणि पेरिप्लस ऑफ दि एरिथ्रियन सी :

सातवाहन-कुशाण काळाचा अभ्यास करताना आपल्याला बरीच साधने उपलब्ध होतात. यातील काही लिखित आहेत तर काही अलिखित. याठिकाणी आपण दोन प्रमुख लिखित साधनांचा, प्रातिनिधीकरित्या अभ्यास करणार आहोत. गाथा सप्तशती आणि पेरिप्लस ऑफ दि एरिथ्रियन सी.

**अ) गाथा सप्तशती :**

गाथा सप्तशती हा गोदावरी खोऱ्यातील ७०० लोकगीतांचा एक संग्रह आहे. 'हाल' या सातवाहन राजानेही लोकगीतांचे संकलन करुन, हा ग्रंथ सिध्द केलेला आहे. गोदातीरावरील प्रतिष्ठान (आजचे पैठण) ही सातवाहनांची राजधानी होती. मात्र हाल ला ग्रामीण भागात भटकंती करण्याची हौस होती. उत्तम निरिक्षण, चौकसबुध्दी आणि ऐकण्याची वृत्ती यातून त्याने अनेक लोकगीतं मिळवली. यातूनच, त्याने, अशा लोक गीतांचे संकलन केले. आणि 'गाथासप्तशती' नावाने हा ग्रंथ लिहिला.

हा ग्रंथ महाराष्ट्री प्राकृत या भाषेत लिहिलेला आहे. त्यावेळी संस्कृत ही राजभाषा होती तशीच धर्माचीही भाषा होती. मात्र सातवाहनांनी आवर्जून बोली भाषेला-महाराष्ट्री प्राकृतला महत्व दिलेले होते. सामान्य-जनांचीही भाषा होती. त्यामुळेच हाल ने, याच भाषेत हा ग्रंथ रचलेला आहे.

सातवाहनकालीन ग्रामीण भागाचे अस्सल दर्शन घडवून देणारा हा ग्रंथ आहे.

या ग्रंथातून आपल्याला, या काळातील गोदाखोऱ्याची भौगोलिक तशीच पर्यावरणाची स्थिती कळून येते. यात विविध पर्वत, नद्या, वनस्पती, फुले, प्राणी यांची माहिती मिळते. त्याचप्रमाणे ग्रामीण समाज जीवनाचाही परिचय होतो. किंबहुना, त्याकाळातील ग्रामीण समाज जीवनावर प्रकाश टाकणारा हा महत्वाचा ग्रंथ आहे असे म्हणता येईल. तसेच, कुटुंबव्यवस्था आणि त्यातील चित्र-विचित्र नातेसबंध कळून येतात. विविध नात्यांतील ताण-तणाव दिसून येतात. एका बाजूला नैतिक मूल्यांचे पालन दिसून येते आणि त्याचबरोबर दुसऱ्या बाजूला व्याभिचाराची ही उदाहरणे दिसून येतात.

त्याकाळातील विविध उपजीविकेचे मार्ग कळून येतात. शेती, पशुपालन, मासेमारी, शिकार, अन्न-संकलन असे वैविध्यपूर्ण मार्ग त्याकाळातील लोक हाताळत असत. त्यामुळेच यांच्या आहारात वैविध्य दिसून येते. त्याचप्रमाणे हे लोक विविध वस्तूंच्या कारागीरीमध्ये गुंतलेले होते हे कळून येते. या ग्रंथातून त्याकाळातील व्यापार आणि दळणवळणाच्या सुविधाही दिसून येतात.

त्याचप्रमाणे, या लोकांच्या विविध प्रकारच्या वेशभूषा आणि केशभूषा याबाबतही आपल्याला माहिती मिळते. विविध अलंकारांची माहिती मिळते. त्यांचे छंद कळून येतात. करमणूकीची साधने लक्षात येतात. एकंदर हे लोक सुखी आणि आनंदी होते हे आपल्याला लक्षात येते.

त्याकाळातील संस्कृत भाषेतील ग्रंथ आपल्याला तत्कालिन धर्माच्या अपेक्षा दर्शवितात. शिलालेख, राजांचे पराक्रम आणि कर्तृत्व सांगतात. मात्र 'गाथा सप्तशती' हा ग्रंथ त्याकाळातील ग्रामीण सामान्य माणसाबद्दल बोलतो; त्यांची माहिती देतो. म्हणून, हे एक महत्वाचे साधन आहे असे म्हणता येईल.

**ब) पेरिप्लस ऑफ दि एरिथ्रियन सी :**

या ग्रंथाचे 'तांबड्या समुद्रातील एक खलाशी' असे भाषांतर करता येईल. हा ग्रंथ कुणी लिहिला हे आपल्याला माहिती नाही.

इतिहास हा विविध साधनांच्या–म्हणजेच पुराव्यांच्या आधारे लिहावा लागतो. विविध प्रकारांची साधने उपलब्ध असतात. यातील ‘परकिय वृत्तांत’ हा साधनांचा एक महत्वाचा प्रकार आहे. विविध कारणांसाठी परकियांनी भारताला भेटी दिल्या. काही काळ त्यांनी येथे वास्तव्य केले. भटकंती केली. चौकसवृत्तीने निरिक्षण केले. काहींनी नोंदी केल्या. पुढे, ते आपल्या मायभूमीला परत गेले. तिथे, त्यांनी आपल्या त्या प्रवासाचा वृत्तांत लिहिला. यांना ‘परकिय वृत्तांत’ असे म्हंटले जाते. हे लोक, भारतात कुणाच्या आश्रयाला नसल्याने, आश्रयदात्यांचे कौतुक करण्याची सक्ती त्यांच्यावर नव्हती. कुणाशी ते संबधीतही नव्हते. थोडक्यात, त्यांचे कोणतेही हितसंबंध भारतात गुंतलेले नव्हते. त्यामुळे त्यांचे निरिक्षण आणि त्यांचा वृत्तांत हा निरपेक्ष असतो; तटस्थ असतो. म्हणूनच, अशा परकियांचे वृत्तांत हे एकप्रकारे इतिहासाचे वस्तुनिष्ठ साधन असते. म्हणून त्यांना मूल्य आहे.

अर्थात, ते मूळात भारतीय नसल्याने; भारतातील परंपरा, श्रध्दा, गुंतागुंतीचे समाजजीवन याबाबत त्यांना सखोल माहिती नसते. त्यात, ते, त्यांच्या दृष्टिकोनातून किंवा पूर्वग्रहातून भारताकडे पाहत असतात. त्यामुळे ते आपल्या वृत्तांतात काही मोठे घोळही करुन ठेवू शकतात. ही या वृत्तांतांची मर्यादाही आहे.

‘पेरिप्लस’ हे असेच एक महत्वाचे साधन आहे. यातून, आपल्याला, त्याकाळातील भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधी अत्यंत वस्तुनिष्ठ आणि मोलाची माहिती मिळते.

त्याकाळात, भारतातील देशावरील उत्पादन केंद्रं ही एकमेकांना जोडलेली असत. यातून अंतर्गत व्यापार होत असे. पुढे ही केंद्र, सह्याद्रीच्या घाटमार्गाने, पुढे, सागर किनाऱ्यांवरील बंदरांना जोडलेली असत. आणि पुढे, ही बंदरे, परदेशी बंदराना (आणि तेथून त्यांच्या देशावरील केंद्रांना) जोडलेली असत. यातून आंतरराष्ट्रीय व्यापार होत असे.

अशा उद्योग–व्यापारातील जाळ्यातील सर्व केंद्राची नावे आपल्याला ‘पेरिप्लस’ मधून माहिती होतात. त्याठिकाणी कोणत्या वस्तूंचे उत्पादन होत होते, कोणत्या बंदरातून कोणत्या वस्तूंचा व्यापार होत असे यांची माहिती मिळते. तसेच, प्रत्येक केंद्रांतील अंतर काय होतेही सुध्दा मोलाची माहिती आपल्याला मिळते.

आयातीमध्ये कोणकोणत्या वस्तूंचा समावेश होत होता? त्या वस्तू कोठून आपल्या देशात यायच्या? ही माहिती मिळते. निर्यातीच्या कोणकोणत्या वस्तू, भारतात कुठे तयार होत होत्या? त्या कोणकोणत्या देशांत निर्यात व्हायच्या? कोणकोणत्या वाहतूक साधनांचा वापर या व्यापारासाठी व्हायचा? अंतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय व्यापार कोणत्या मार्गाने होत असायचा? ही माहिती आपल्याला मिळते.

थोडक्यात, या काळाचा भारताचा जो आंतरराष्ट्रीय व्यापार होत असायचा आणि त्यामध्ये जी देशावरील उत्पादन केंद्र जुडली गेली होती याची अगदी वस्तुनिष्ठ स्वरुपाची माहिती आपल्याला या ग्रंथातून मिळते.

बहुधा हा ग्रंथ म्हणजे एकप्रकारे भारताबरोबर व्यापार करायचे ‘गाईड/हँडबुक’च होते. त्याच निश्चितच फायदा परकीय व्यापाऱ्यांना झाला असावा. आज, आपण इतिहासाचे विद्यार्थी, तत्कालिन व्यापार समजून घेण्यासाठी या ग्रंथाचा वापर करतो.

## १.२.२ विभाग २: प्रमुखराजेः सातवाहन आणि कुशाण :

मौर्य साम्राज्याचा ऱ्हास झाला. भारतभर एक गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. त्यात परकियांचीही सारखी आक्रमणं होत होती. अशा काळात, नर्मदेच्या उत्तरेकडे कुशाणांची तर दक्षिणेकडे सातवाहनांची सत्ता उदयास आली. यांच्या काळात भारताने स्थैर्य आणि समृध्दी अनुभवली.

याठिकाणी, आपण या दोन घराण्यातील प्रमुख राजांची प्रातिनिधीक स्वरुपात परिचय करुन घेणार आहोत. प्रथम आपण सातवाहनांचा विचार करु.

**अ) सातवाहन :**

सातवाहन राजांना 'शाली वाहन' असेही म्हंटले जाते. हे मूळ गोदावरी खोऱ्यातील राजे. 'प्रतिष्ठान' (पैठण) ही यांची राजधानी.

कुण्या सातवाहनने या सत्तेची स्थापना केली. म्हणून या घराण्याला 'सातवाहन' असे म्हणले जाते. याने स्वतःची तांब्याची आणि शिशांची नाणी पाडली होती (साधारण इ.स.पू. २३०). पुढे, आपल्याला, 'सिमुक' या राजाची आपल्याला माहिती मिळते. (साधारण इ.स.पू. २००) नाणेघाटमधील शिलालेखात त्याला 'अप्रतिहतचक्र दक्षिणापथपती' असे म्हणलेले आहे. म्हणजे महाराष्ट्रासह, दक्षिणेकडील काही भागात त्याचे राज्य असावे. यावेळी 'जुन्नर' ही सातवाहनांची राजधानी असावी. पुढे, प्रथम सातकर्णीपासून आपल्याला सातवाहनांची माहिती मिळू लागते.

सातवाहनांच्या सत्तेचा वास्तविक संस्थापक म्हणून प्रथम सातकर्णीला आपण ओळखतो. नागनिका नावाची याची एक राणी होती. तिने नाणेघाट येथे एक शिलालेख कोरलेला आहे. हा नाणेघाट, जुन्नर हे देशावरील शहर ते कल्याण हे बंदर या दोन ठिकाणांना जोडतो. या शिलालेखातून आपल्याला तिचा पती प्रथम सातकर्णी, सासरा आणि मुलांची माहिती मिळते.

याने, मध्य प्रदेशावर स्वाऱ्या करुन, शुंग आणि कण्वराजांचा पराभव केलेला दिसून येतो. त्याच्या एका सरदाराचा शिलालेख हा मध्य प्रदेशातील सांची येथील स्तूपाच्या तोरणावर दिसून येतो. मात्र त्याला, त्याठिकाणी आपले राज्य कायमस्वरुपी स्थिर ठेवता आले नाही असे दिसून येते. त्यामुळे त्याचे राज्य दक्षिण भारतावरच प्रामुख्याने राहिले. त्याची राजधानी जुन्नरच होती. याच्या काळात कलिंगच्या खारवेलाची दोनवेळा आक्रमणं महाराष्ट्रावर झाली. मात्र प्रथम सातकर्णीने त्याचे हल्ले परतवून लावले.

हा पराक्रमी होताच. शिवाय, याने वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन केले. काही शतकांपासून-विशेषतः सम्राट अशोकाच्या धम्मप्रसाराच्या धोरणामुळे बौध्द धर्माचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झालेला होता. यामुळे वैदिक धर्माची एकप्रकारे पीछेहाट झाली होती. प्रथम सातकर्णीने हे बदलले. त्याने 'अश्वमेध' (राज्य विस्तारासाठीचा यज्ञ) आणि 'राजसूय' (राज्याभिषेकानंतरचा यज्ञ) असे दीर्घकाळ चालणारे मोठे यज्ञ आयोजित केले. याशिवाय, कित्येक 'काम्य यज्ञ' (अपेक्षा धरुन केलेले यज्ञ) केले. तसेच, या काळात 'नित्य यज्ञ' (दैनंदिन यज्ञ) ही चालू केले. त्यामुळे, याच्या काळात पुन्हा एकवार यज्ञ संस्कृती आणि यज्ञाशी जोडलेल्या विविध सांस्कृतिक घडामोडी सुरु झाल्या; त्यांना उत्तेजन मिळत गेले.

याच्या काळात वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन झालेच. पण, त्याचबरोबर, त्याने, बौध्द धर्मालाही आश्रय दिला; अनुदानं दिली. बौध्द संघांना मदत केली. 'अक्षयनिवी' म्हणजे कायम स्वरुपी महसूल मुक्त अशी गावे/जमिनी त्यांना दान दिल्या.

हे भारतीय संस्कृतीचे एक महत्वाचे वैशिष्ट्य दिसून येते. राजा कोणत्याही धर्माचा/पंथाचा जरी असेल तरी तो अन्य पंथींयांनाही अनुदानं देत असे.

त्याच्या या यज्ञांमध्ये, त्याची राणी नागनिकाहीचेही मोठे योगदान होते. ती अत्यंत धार्मिक प्रवृत्तीची दिसते. विविध यज्ञ, दानधर्म तिने करवले होते. ती स्वतः महारठी या तत्कालिन बलाढ्य राजघराण्यातील होती. त्यामुळे, एकंदरीतच, तिच्याबद्दल एक आदर दिसून येतो. प्रथम सातकर्णीने, तिच्यासह चांदीचे एक जोड नाणेही काढले होते असे दिसते.

प्रथम सातकर्णीच्या पराक्रमामुळेच, मिराशी म्हणतात की, या घराण्याने 'सातकर्णी' हेच कुलनाम स्विकारले.

प्रथम सातकर्णीनंतर, सातवाहनांची सत्तापुढे विविध राजांकडे गेली. मात्र त्याचवेळी गुजरातकडून शकांचे आक्रमण झाले. हे परकिय होते. यांनी भारतावर वारंवार स्वाऱ्या केल्या होत्या. यातून, भारतात त्यांच्या पाच शाखा स्थिर झालेल्या होत्या. यातील गुजरात येथील पश्चिमी क्षत्रप आणि मध्य प्रदेशामधील कार्दमक क्षत्रप या महत्वाच्या शाखा होत्या. यातील गुजरातमधील नाहपान या पश्चिमी क्षत्रपराजाने महाराष्ट्रावर यशस्वी आक्रमण केले. त्याने सातवाहनांना हाकलून लावले आणि जुन्नर ताब्यात घेतले. गुजरातमध्ये त्यांची 'गिरनार' याठिकाणी राजधानी होतीच. शिवाय, त्यांनी महाराष्ट्रातील जुन्नर येथे उपराजधानी स्थापन केली. स्वतःचा चेहरा उमटवलेली चांदीची नाणी काढली. आणि, त्याने राज्य सुरु केले. त्यामुळे सातवाहनांना 'प्रतिष्ठान' येथे राजधानी हलवायला लागली. हीच पुढे, त्यांची प्रमुख राजधानी बनली.

आपली राजधानी जरी हिसकावून घेतली गेली तरी सातवाहन राजे पुन्हा परतण्याची तयारी करीत होतेच. गौतमीपुत्र सातकर्णीच्या रुपाने त्यांना सक्षम नेता मिळाला. गौतमी बलश्रीही गौतमीपुत्र सातकर्णीची माता. तिने, नाशिक येथील पांडव लेण्या (बौध्द लेण्या) येथे एक शिलालेख कोरलेला आहे. यातून आपल्याला तिच्या मुलाचे-म्हणजेच गौतमीपुत्र सातकर्णीचे कर्तृत्व समजते. तसेच त्याचा मुलगा वसिष्ठी पुत्रपुळुमावी यानेही नाशिक येथे शिलालेख कोरलेला आहे. त्यातूनही माहिती मिळते.

सर्वप्रथम गौतमीपुत्राने, विदर्भातील शकांवर हल्ला केला. पुढे, त्याने जुन्नरच्या शकांवर हल्ला केला. त्याच्या सामर्थ्यापुढे शकांचा समूळ पराभव झाला. त्याने नाहपानलाही ठार मारले असे कळते. हे विजय त्याने 'क्षहरांतक' हे बिरुद घेऊन साजरे केले. म्हणजे क्षहरातांचा-शकांचा नाश करणारा. आता जुन्नर पुन्हा ताब्यात आले. आपला विजय ठसवण्यासाठी, त्याने नाहपानाची चांदीची नाणी घेतली. त्या नाण्यांवर आपला चेहरा आणि अक्षरे उमटवली. अर्थात, नवा राजा, साधारणतः प्रचलित त्याच व्यवस्था काहीकाळ नियमित ठेवत असतो. कारण प्रजेला त्याची सवय झालेली असते. त्यामुळेच, त्याने नाहपानाची नाणी चालू ठेवली असावीत असे दिसते. अर्थात, आता राज्य त्याचे असल्याने, त्याने, त्याच नाण्यांवर स्वतःची नाणी कोरली असावीत.

जुन्नरवर पुन्हा एकदा ताबा मिळवल्यावर त्याने शकांचा पाठलाग केला. शकांकडील उत्तर महाराष्ट्र जिंकून घेतला, गुजरात ताब्यात घेतला आणि आग्नेय राजस्थानवरही त्याने सत्ता प्रस्थापित केली. या मोहिमेंतर्गत त्याला शकांबरोबरच, आणखीन दुसऱ्या परकिय सत्तांशी सामना करावा लागलेला आहे. यवन (आयोनियन ग्रीक) आणि पहलव (पार्थियन ग्रीक) या त्या सत्ता. त्यांचाही पराभव केला गेला. थोडक्यात, नाहपानाच्या निमित्ताने त्याने या तीन परकीय सत्तांशी यशस्वी सामना करुन, त्यांच्यावर विजय मिळवला. हा विजय ठसवण्यासाठी त्याने 'शकयवनपहलवनिसूदन' असे बिरुद घेतले. म्हणजे, शक, यवन, पहलव यांचा नाश करणारा.

थोडक्यात, अल्पावधीतच, गौतमीपुत्र सातकर्णीने आपली राजधानी परत मिळवलीच. शिवाय त्या काळच्या तीन बलाढ्य परकिय सत्तांचा पराभव केला. यामुळे, त्याचे राज्य महाराष्ट्र, आंध्र, गुजरात, माळवा आणि उदयपूर पर्यंत पसरलेले दिसून येते. दक्षिण भारताचा भागही त्याच्या ताब्यात आला. त्यामुळे त्याला 'त्रिसमुद्रतोयपितवाहन' असेही म्हंटले जाते. म्हणजे ज्याच्या घोड्यांनी तिन्ही समुद्राचे पाणी पिलेले आहे- दक्षिण भारत ताब्यात आहे.

वास्तविक सातवाहन हे ब्राह्ण. धर्मशास्त्रानुसार यज्ञ करणे, पौरोहित्य करणे, शिक्षण देणेही त्याची कामं. मात्र, परिस्थितीच्या आव्हानापुढे सातवाहनांनी तलवार हाती घेतली. त्यात गौतमीपुत्र सातकर्णीने तर एक साम्राज्यच निर्माण केले. तसेच, तो एक ब्राह्मण म्हणूनही आपल्या कर्तव्यांचे नियमितपणे पालन करीत असे. म्हणून त्याला 'एकम् ब्राह्ण' असे म्हंटले जाते. म्हणजे एकमेवाद्वितीय ब्राह्ण.

गौतमीपुत्रानेही वैदिक धर्माचे पालन मोठ्या प्रमाणावर केले. अर्थात, बौध्द धर्मालाही त्याने आश्रय दिला, अनुदानं दिली असे दिसून येते.

थोडक्यात, गौतमीपुत्राच्या काळात सातवाहनांचे राज्य गुजरात-राजस्थानचा काही भाग, माळवा म्हणजे मध्य प्रदेशचा पश्चिम भाग, महाराष्ट्र, आंध्र या भागात पसरलेल होते.

पुढे, सातवाहनांच्या सत्तेवर 'वसिष्ठी पुत्रपुळुमावी' (इस १३२-१६०)हा राजा आला. गौतमीपुत्राने गुजरातमधील पश्चिमी क्षत्रप संपवलेले होते. मात्र, मध्य प्रदेशातील कार्दमक शकांची सत्ता शक्तीशाली होती. इथे रुद्रदामन नावाचा एक महान राजा राज्य करत होता. पुळुमावीला दक्षिण भारताकडे अधिक लक्ष पुरवायचे होते. उत्तरेकडील बाजू सुरक्षित रहावी यासाठी त्याने एक राजकीय पाऊल उचलले. त्याने, आपला भाऊ वसिष्ठीपुत्र सातकर्णीचा, रुद्रदामनच्या मुलीशी विवाह केला. शकांबरोबरच्या या वैवाहिक संबंधांमुळे सातवाहनांची सत्तासुरक्षित राहिली. आणि मग त्याने दक्षिणेकडे लक्ष वळवले.

त्यावेळी दक्षिण महाराष्ट्र, उत्तर कर्नाटक या भागात महारथी, कूर, चुटु अशा स्थानिक राजांची सत्ता होती. या भागात पुळुमावीने आक्रमण केले. अर्थात, याठिकाणी लढाया करण्यापेक्षा, त्याने, या सत्तांशी मैत्रीचे संबंध निर्माण केले. काहींशी वैवाहिक संबंधही निर्माण केले. अशाप्रकारे, हे छोटे राजे, सातवाहनांचे मांडलिक झाले; सातवाहनांचे सरदार झाले. अशाप्रकारे, फारशा लढाया न करता, कऱ्हाड, कोल्हापूर, बनवासी हे दक्षिणेकडील प्रदेश सातवाहनांच्या राज्यात सामील झाले.

त्याच्या काळामध्ये भारताचा, पश्चिमेकडील आंतरराष्ट्रीय व्यापार जोमाचा झालेला होता. त्यामुळे याच्या नाण्यांवर 'शिडांच्या जहाजांची' आकृती कोरलेली दिसून येते. सातवाहनांची सत्ता आंध्र प्रदेशातही होती. याठिकाणी, अमरावती येथे एक बौध्द स्तूप होता. काळाच्या ओघात हा स्तूप जवळपास नष्ट झालेला होता. अशावेळी पुळुमावीने या स्तूपाचा जीर्णोध्दार केला. त्यांच्या देखभालीसाठी भूदानं दिली.

पुढे, रोमन साम्राज्य कोसळू लागले. परिणामी पश्चिमेकडील आंतरराष्ट्रीय व्यापार डळमळीत झाला. त्यात, प्रतिष्ठान येथे कमकुवत सातवाहन राजे आले. यामुळे, अनेक छोट्या-मोठ्या राजांनी डोके वर काढायला सुरुवात केली. एक अस्थैर्य निर्माण झाले. सातवाहनांना, आपले राज्य आंध्र प्रदेशात हलवावे लागले.

अर्थात, पुढे काहीच वर्षात, वाकाटकांनी महाराष्ट्रात सत्ता मिळवली आणि पुन्हा एकवार, येथे, शांतता आणि स्थैर्य निर्माण झाले. याचा अभ्यास आपण पुढील घटकांमध्ये करणार आहोत.

● **सातवाहन सत्तेची वैशिष्ट्ये :**

१. सातवाहनांनी महाराष्ट्रातील पहिले साम्राज्य निर्माण केले असे दिसून येते. सिमुकाच्या काळात दक्षिणेवर सातवाहनांची सत्ता निर्माण झालेली होती. तर गौतमीपुत्राच्या काळात तर ही सत्ता आग्नेय राजस्थानपर्यंत पोचली.

२. सातवाहन हे महाराष्ट्री प्राकृत बोलणारे राजे होते. मराठी संस्कृतीतील हे पहिले साम्राज्य होय. यांनी, परकिय सत्तांचा पाडाव करुन, स्वकियांचे एक समर्थ राज्य निर्माण केले असे दिसून येते. त्यांचे शिलालेख आणि नाणी प्राकृतमध्येच आहेत.

३. सातवाहनांची जवळजवळ ४०० वर्षे सत्ता या ठिकाणी होती. थोडक्यात, दीर्घकाळ सातवाहनांची एकछत्री राजवट याठिकाणी दिसून येते. अर्थातच, हे साम्राज्य एकसंघ राहिले. येथे स्थैर्य निर्माण झाले. शांतता राहिली. या फायदा उद्योग-व्यापारातील समृध्दीमध्ये झाला. सांस्कृतिक अविष्कारासाठी झाला.

४. दीर्घकाळ एकछत्री आणि एकसंघी राजवटीत आर्थिक परिस्थितीही समृध्द असते. येथेही तेच झाले. शेतीतर समृध्द झालीच. यातून, व्यापार आणि कारागीरी वाढली. या काळातील आपली कारागीरी तर निर्यातक्षम होती. आपल्या वस्तूंना परदेशातून प्रचंड मागणी होती असे दिसून येते. विशेषतः पैठणी या रेशमी साडीला संपूर्ण जगात वाहवा मिळालेली होती. अशा वातावरणात, भारतातील विविध उत्पादन केंद्रंही महाराष्ट्रातील केंद्रांना जोडली गेली. आणि देशावरची सर्व केंद्र, पश्चिमेकडील बंदरांना, घाट मार्गांनी जोडली गेली. यातून, भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार जोराचा होऊ लागला. विशेषतः रोम आणि भारत हा व्यापार या काळातप्रचंड समृध्दीचा होता; आणि तो भारतासाठी अधिक लाभदायक ठरला.

५. या काळातील व्यापारामध्ये, विविध व्यापारी आणि कारागीरांच्या संघांनी मोठे योगदान दिले. या संघाना श्रेणी म्हणत. बहुतेक श्रेणी या बौध्द धर्मीय होत्या. त्यामुळे, या श्रेणींनी, बौध्द धर्माला बरीच अनुदानं दिली. यातून बौध्द स्तूप, चैत्य, विहार महाराष्ट्रात निर्माण झाले.

६. या सर्व घडामोडींचे व्यवस्थापन करणे हे अत्यंत आवश्यक होते. यातून, या काळात नगरे निर्माण केली. प्लीनीच्या म्हणण्यानुसार, या काळात ३० तटबंदीयुक्त नगरे होती. म्हणजेच, सातवाहनांच्याच काळात, ज्याप्रमाणे पहिले साम्राज्य निर्माण झाले. तसेच, महाराष्ट्रातील पहिले नागरीकरण घडून आले.

७. या काळात वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन घडून आले. यज्ञ संस्कृती आणि तिला जोडलेल्या इतर सांस्कृतिक अविष्काराला व्यासपीठ मिळाले.

८. या काळातील एकंदर शांती, स्थैर्य आणि समृध्दीमुळे कलेचा विकास होणेही स्वाभाविक होते. यातूनच, उत्तम शिल्पकला निर्माण झाली. या काळातील शिल्प शैलीला 'अमरावती शैली' असे म्हणतात. ही अस्सल भारतीय शिल्पशैली होती. याच काळात, सह्याद्रीची डोंगररांग आणि तिच्या उपशाखा बौध्द धार्मिक स्थापत्यांनी सजून गेल्या. भाजे, कार्ले, बेडसा, कोंडाणा, नाशीक, जुन्नर, औरंगाबाद, अंजठातील काही गुहा इ. बौध्द गुहा स्थापत्यं आजही जगप्रसिध्द आहेत.

● **कुशाण :**

मौर्य सत्तेच्या ऱ्हासानंतर, वायव्य भारताकडे आणखीन एक परकीय सत्ता डोके वर काढू लागलेली होती. त्यांचेनाव 'कुशाण'. मुळात, मध्य आशिया-चीनच्या सीमेवरील हे भटके लुटारु. चीन-युरोपच्या सुप्रसिध्द रेशीम रस्त्याला उपद्रव देणारे. आपल्याला हे कळते की येथे यांच्या पाच टोळ्या होत्या. त्यांच्यात सदैव संघर्ष होत असे. अशावेळी कुजुल कॅडफिसेसने, या पाचही टोळ्यांना एकत्र केले. त्यांची टोळी झाली 'कुई-शुआंग'. यांनाच आपण 'कुशाण' म्हणतो. अर्थातच, कुजुल हा त्यांचा संस्थापक. पुढे कुजुलने, कुशाणांना घेऊन मध्य आशिया ओलांडली. तो, वायव्य भारताच्या सीमेवर आला. तिथे, अगोदरच ग्रीक राजे होते. त्यांच्या सेवेत कुशाण आले. कुजुल हा ग्रीक राजा 'हर्मियस' याचा राज्यपाल म्हणून कार्य करु लागला. कालांतराने तो पुढे स्वतंत्र झाला.

त्याचा मुलगा म्हणजे 'विम कॅडफिसेस'. याची वायव्य भारतात सत्ता निर्माण झाली. याच्या काळात कुशाणांचे भारतीयीकरण होण्यास सुरुवात झाली असे दिसते. त्याने शैवसंप्रदाय स्विकारला. त्याने 'महाराजाधिराज सर्वलोक इश्वर', 'माहेश्वर' अशी बिरुदं घेतली. त्यांच्या नाण्याच्या काट्याच्या बाजूला, नंदीसह, शंकर दिसू लागला. भारतामध्ये सर्वप्रथम सोन्याची नाणी चालू करणारा हा विम कॅडफिसेस होय.

कुशाणांमधील सर्वश्रेष्ठ राजा म्हणजे कनिष्क होय (इस १२७-१५०). याने सर्वप्रथम सर्व क्षत्रपांवर विजय मिळवला. ही सगळी क्षत्रप मंडळी म्हणजे ग्रीकांचे विविध भागातील राज्यपाल होते. या क्षत्रपांमध्ये जसे ग्रीक होते तसेच शकसुध्दा होते. यांच्यात सदैव संघर्ष चालत असे. त्यामुळे वायव्य भारत प्रचंड अस्थिर बनला होता. कनिष्कांने या सर्व क्षत्रपांवर विजय मिळवला; काहींना आपल्या सेवेत घेतले. या विजयानंतर, त्याने पुरुषपूर (पेशावर, पाकिस्तान) येथे आपली राजधानी निर्माण केली. अशा पध्दतीने, यानिमित्ताने, वायव्य भारत शांत झाला, स्थिर झाला.

पुढे, त्याने काश्मीरवर विजय मिळवला. त्याठिकाणी 'कनिष्कपूर' हे शहर वसवले.

काश्मीर जिंकल्यामुळे कनिष्कच्या राज्याची सीमा मध्य आशिया तसेच चीनला भिडली. येथून त्याने चीनवर आक्रमण करायची योजना आखली. हे कुशाणांचे एक पूर्ण न झालेले स्वप्न होते. त्याच्या मागच्या पिढीला यामध्ये अपयशच आलेले होते. मात्र कनिष्कला यश मिळाले. चीनचा सेनापती पेनयांग याच्याशी त्याचे युध्द झाले. यात कनिष्कचा विजय झाला. अर्थात याबाबत इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत. यानंतर, दोघांच्यात जो तह झाला त्यानुसार, मध्य आशियातील काश्गर, खोतानही महत्वाची स्थळं त्याला मिळाली.

अशा भारताच्या सीमेवरील विजयाबरोबरच; गंगेच्या खोऱ्यातही, बिहारपर्यंत त्याची सत्ता निर्माण झाली. थोडक्यात, मध्य आशिया ते बिहार आणि काश्मीर ते माळवा (प. मध्य प्रदेश) एवढा विस्तीर्ण प्रदेशावर कनिष्काची हुकुमत निर्माण झाली. कनिष्काच्या एकछत्री सत्तेखाली, हा प्रदेश एकसंघ बनला.

अशा एकछत्री आणि एकसंघी साम्राज्यात शांतता आणि समृध्दी नांदू लागली. आर्थिक परिस्थिती समृध्द झालीच. शिवाय धर्म, साहित्य, कला अशा संस्कृतीच्या विविध अंगात प्रयोग होऊ लागले; त्यांचा प्रचंड विकास घडून आला.

कनिष्क हा बौध्द धर्मीय होता. सम्राट अशोक मौर्यानंतर, बौध्द धर्मप्रसारासाठी कळकळीने प्रयत्न करणारा हा राजा होता.

त्याने, आपली राजधानी पुरुषपूर (पेशावर, पाकिस्तान) येथे स्तूप उभारलेला होता. पुढे सातव्या शतकात आलेल्या चीनी प्रवासी युवानश्वांगने तो स्तूप पाहिलेला होता. 'रत्नांनी मढवलेला असा अनेक मजली हा स्तूप होता' असे त्याने नमूद केलेले आहे. हा स्तूप, पेशावरजवळच, 'शाहजी की ढेरी' याठिकाणी आहे. येथून, एका अवशेषांची पेटीही मिळालेली आहे. त्यावर बुध्दांचे शिल्प आहे.

कनिष्कावर, अश्वघोष या बौध्द विद्वानाचा मोठा प्रभाव होता. याच अश्वघोषाने, बुध्दांचे 'बुध्दचरित' हा ग्रंथ लिहिलेला होता. त्याकाळात, हिनयानपंथी यांची पिछेहाट होत होती आणि महायानपंथ हा अधिक प्रभावी ठरत होता. त्यात बौध्द विद्वानांमध्ये मतभेदही होते. या सर्व विद्वानांच्यात विविध मुद्द्यांवर चर्चा व्हावी, आणि त्यांच्यात एकमत व्हावे हे आवश्यक होते. यासाठी कनिष्कने काश्मीरमधील 'कुंडलवन' येथे बौध्द धर्माची चौथी परिषद भरवली. या परिषदेचे अध्यक्ष होते व सुमित्र तर अश्वघोष उपाध्यक्ष होते. या परिषदेला भारतासह, जगातील ५०० विद्वान आलेले होते. तत्कालिन दळणवळणाच्या मर्यादा लक्षात घेताही एक फार मोठी गोष्ट होती. या परिषदेमध्ये बौध्द विद्वानांमध्ये बरीच चर्चा झाली. यातून बौध्द 'त्रिपीटकांचे' संकलन पूर्ण झाले.

'त्रिपीटक' म्हणजे तीन पेट्या. या त्रिपिटकांत सुत्तपीटक, अभिधम्मपीटक आणि विनयपीटक या तीन ग्रंथ समुहांचा समावेश होतो. 'सुत्तपीटक' सामान्य बौध्दांना बौध्द शिकवण समजावून सांगते, तर 'अभिधम्म पीटक' बौध्द विद्वानांना. तर 'विनयपीटक' हा बौध्द भिक्षू आणि भिक्षुणींच्या आचाराचे नियम सांगतो. हे ग्रंथसमूह आहेत. म्हणजे, प्रत्येक पीटकामध्ये आणखीन विविध ग्रंथ आहेत. जसे सुत्तपीटकामध्ये, पाच निकाय ग्रंथसमूह आणि पुन्हा त्यातील खुद्दक निकायमध्ये जातक कथांचा संग्रह! यांचे संकलन, या परिषदेमध्ये पूर्ण झाले. शिवाय, हे अधिक स्पष्ट करुन सांगण्यासाठी, त्यांच्यावर 'महाविभाषा' हे भाष्य लिहिण्यात आले.

त्याकाळी उत्तर भारतामध्ये, बौध्द धर्मातील महायानपंथीयांचा जोर होता. या पंथाच्या आग्रहामुळे, बौध्द धर्मासंबंधी लक्षणीय बदल झालेले होते. विद्वानांच्या स्तरावर; विविध पंथांबरोबर चर्चा करता यावी आणि त्यांना बौध्द मत पटवून देता यावे यासाठी 'संस्कृत भाषे' चा स्विकार करण्यात आला. स्वतःच्या उध्दारापेक्षा, समाजाच्या उध्दारावर भर देण्यात आला. यातूनच, बुध्दांच्या पूर्वजन्माच्या कथा निश्चित करण्यात आल्या. त्या कथांचा नायक बोधीसत्व बनला. बुध्दांनी, बोधीसत्वाच्या रुपाने विविध पूर्वजन्म घेतले. प्रत्येक जन्मात त्यांनी वेगवेगळी रुपे घेतली. आणि प्रत्येक जन्मात, त्यांनी-म्हणजे बुध्दांनी इतरांच्या कल्याणासाठी प्रयत्न केला. प्रसंगी आत्मबलिदानही दिले. अशा कथांतून, समाजाच्या कल्याणासाठी झटणे हे बौध्द धर्माचे ब्रीद बनले.

महायानपंथीयांचा प्रभाव सगळ्यात जास्त दिसून आला तो म्हणजे बुध्दांच्या मूर्तीमध्ये. पूर्वीच्या हिनयान पंथींयांना बुध्दांची मूर्तीपूजा-मनुष्य रुपातील पूजा अमान्य होती. महायान पंथीयांनी बुध्दांना मनुष्यरुपात पूजायला सुरुवात केली. यातून बुध्दांच्या मूर्ती बनणे सुरु झाले. वायव्य भारतामध्ये, 'गांधार' (अफगाणीस्तान) भागात ग्रीक वास्तव्याला होते. त्यांनी बुध्दांच्या पहिल्यावाहिल्या मूर्ती बनवल्या. या परकीय शैलीला 'गांधार शैली' असे म्हणतात.

इकडे कनिष्काने, गांधार शैलीतील मर्यादा लक्षात घेतल्या. आणि, भारतीय प्रकृतीच्या बुध्दमूर्ती बनवण्यास त्याने प्रोत्साहन दिले. यातून 'मथुरा शैली' ही खास भारतीय शैली निर्माण झाली. या शैलीतून निर्माण झालेल्या बुध्दमूर्ती अस्सल भारतीय आणि संन्यासाचे अतीव समाधान दर्शविणाऱ्या आहेत. अर्थात, ही सुरुवात होती. या शैलीचा अत्युच्च विकास पुढील काळात-म्हणजे गुप्तकाळात झाला.

कनिष्क हा बौध्द धर्मीय होता. असे असले तरी तो भारतीय परंपरेतील राजा बनला होता. त्याने धर्म सहिष्णूतेचे धोरण स्विकारले. म्हणूनच त्याच्या नाण्यांवर नंदीसह शिव, लक्ष्मी आणि इतर स्थानिक देवदेवता दिसून येतात.

कनिष्क लढवय्या होता. बौध्द धर्मप्रसारक होता. तो एक सुंसस्कृत राजा होता. भाषा आणि साहित्याच्या विकासाकडे त्याने जाणीवपूर्वक लक्ष दिले. त्याने दरबारात संस्कृत भाषेला प्राधान्य दिले. त्याच्या काळात उत्तम साहित्यकृती व शास्त्रे संस्कृतमध्ये निर्माण झाली. त्याच्या दरबारात शून्यवादाचा प्रवर्तक नागार्जुन, आयुर्वेदतज्ञ चरक, बुध्दचरित कर्ता अश्वघोष इ. विविध धर्म आणि संप्रदायांतील विद्वानांचा समावेश होता.

**● कुशाण सत्तेची वैशिष्ट्ये :**

१. सर्वात पहिले वैशिष्ट्य म्हणजे कुशाणांनी, मौर्यानंतर उत्तर भारतातील मोठे राज्य निर्माण केले. हे एकछत्री आणि एकसंघी राज्य होते. अशा राज्यात शांती आणि समृध्दी हातात हात घालून नांदतात.

२. चीनचा पराभव करणे हे कुशांणांचे स्वप्न होते. कनिष्काने चीनचा पराभव केल्याने, त्याच्या राज्यामध्ये मध्य आशियाचा समावेश झाला. त्यावेळी मध्य आशियातून, चीन ते युरोप हा आंतराष्ट्रीय व्यापारी मार्ग जमिनीवरुन जात होता. हा मार्ग सुप्रसिध्द होता. यातील व्यापारामध्ये चीनी रेशीम मोठ्या प्रमाणावर

असल्याने, या मार्गाला 'रेशीममार्ग' असेही म्हंटले जाते. आता या आंतराष्ट्रीय भूमार्गावर कुशाणांचे नियंत्रण निर्माण झाले.

● विम कॅडफिसेस या कुशाण राजाने सोन्याच्या नाण्यांची सुरुवात केली. विविध प्रकारची ही सुबक आणि चित्रमय अशी नाणी असत. सोन्याची नाणी असणे हे राज्याच्या आर्थिक समृध्दीचे महत्वाचे लक्षणअसते. याच नाण्यांचा विकास पुढे गुप्तकाळात झाला.

● या काळात गंगेच्या खोऱ्यातील शेती भरघोस पीक देणारी होती. या उत्तम शेतीमुळे; उद्योग आणि व्यापारमध्ये वेग आला. याचा परिणाम म्हणजे एकंदर समृध्दी निर्माण झाली.

● कुशाणांनी-विशेषतः कनिष्कने महायानपंथाचा पुरस्कार केला. यातून, मूर्तीपूजा, मूर्तीकला, संस्कृत भाषेला प्रोत्साहन मिळाले. आता वैदिकांप्रमाणेच, बौध्द विद्वान संस्कृतमध्ये आपले विचार मांडू लागले. ग्रंथ लिहिले जाऊ लागले.

● कनिष्काने बौध्द धर्माला राजाश्रय दिला; प्रसारासाठी प्रयत्न केला. असे असले तरीही वैदिक धर्मालाही त्याने आश्रय दिलेला दिसतो.

● कनिष्क आणि अन्य काही राजे वगळता, कुशाण हे मुख्यत्वे शैवपंथीय होते. त्यांच्या नाण्यांवर शैवसंप्रदायाची वैशिष्ट्ये दिसून येतात. कुशाणांच्या या नाण्यांमुळेच शंकराचे मूर्तीशास्त्र विकसित झाले. तसेच, लक्ष्मीचेही मूर्तीशास्त्र विकसित झाले.

● कुशाण काळात कलेचाही मोठ्या प्रमाणावर विकास झालेला दिसून येतो. कनिष्काच्याच काळात अस्सल भारतीय स्वरुपाच्या 'मथुरा शैलीचा' उदय झाला. या शैलीतून निव्वळ बुध्दाच्या मूर्तीतर बनल्याच. शिवाय, वैदिक-हिंदूंच्या देवदेवतांच्या मूर्ती बनणे सुरु झाले. पुढे गुप्त काळात या शैलीचा प्रचंड विकास झाला.

थोडक्यात कुशाणांच्या राज्यात उत्तर भारताने बराच काळ शांती, स्थैर्य, सुरक्षितता आणि समृध्दी अनुभवली. नाणी असो, मथुरा शैली असो; संस्कृतीच्या विविध क्षेत्रात कुशाणांनी बरेच नवे प्रयोग सुरु केले. त्यांना आश्रय दिला. याचाच मोठा विकासपुढे गुप्तकाळात झालेला दिसतो. त्यामुळे हा काळ म्हणजे, भविष्यातील गुप्त साम्राज्याच्या सुवर्णयुगाची रंगीत तालिमच होती!

**● स्वयं-अध्ययन प्रश्न-१**

**अ. योग्य पर्याय निवडा.**

१. ................ ही सातवाहनांची राजधानी होय.

अ. कोल्हापूर  ब. पुणे  क. नाशिक  ड. पैठण

२. राणी नागनिका हीने ............ याठिकाणी शिलालेख कोरला.

अ. जुन्नर  ब. नाणेघाट  क. कऱ्हाड  ड. नाशिक

३. 'अप्रतिहत चक्र दक्षिणापथपती' हे बिरुद ........... या राजाचे होते.

अ. सिमुक ब. गौतमीपुत्र सातकर्णी क. हाल ड. वसिष्ठीपुत्रपुळुमावी

४. गौतमीपुत्र सातकर्णीची माहिती ................ येथील शिलालेखातून मिळते.

अ. जुन्नर ब. नाणेघाट क. कऱ्हाड ड. नाशिक

५. .............. याने चीनी सेनापती पेनयांग याचा पराभव केला.

अ. प्रथम सातकर्णी ब. कुजुल कॅडफिसेस क. कनिष्क ड. वसिष्ठीपुत्र पुळुमावी

**ब. एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. नाणेघाट शिलालेखातून कोणत्या सातवाहन राजाची प्रामुख्याने माहिती मिळते?

२. कोणत्या राजाने शक, यवन आणि पहलव यांचा पराभव करुन, सातवाहनांची सत्ता पुनर्जीवित केली?

३. कुशाणांमधील सर्वश्रेष्ठ राजा कोण?

४. 'बुध्दचरित' हा ग्रंथ कुणी लिहिला?

५. कोणत्या राजाने बौध्द धर्माची चौथी परिषद भरवली? ती कुठे संपन्न झाली?

### १.२.३ विभाग ३ : व्यापार आणि उद्योग :

या काळातील व्यापार आणि उद्योगाकडे वळण्यापूर्वी आपण प्रथम शेतीचा विचार करु. त्यानंतर, व्यापार-उद्योगातील 'श्रेणी' या महत्वाच्या संघटनेचा विचार करु. आणि मग, पुढे, प्रथम उद्योग आणि त्यानंतर व्यापाराचा विचार करु.

**● शेती :**

गंगा-यमुनेसारख्या खोऱ्यातील जमिन ही पूर्णत: लागवडीखाली आलेली असून, शेतीतून प्रचंड प्रमाणावर अतिरिक्त उत्पादन तयार होत होते असे दिसते. येथे गहू, बार्ली, जव, तांदूळ, मका, कापूस, कडधान्यं इ. पीके उत्तम रीतीने पीकत असत. ही शेती मुख्यत्वे जिरायती स्वरुपाची होती. तरी बागायतीसाठी, राजा व प्रजा दोन्हीही प्रयत्नशील असून; पाणी पुरवठ्याचे विविध प्रकल्प या काळात राबविलेले दिसतात. असे प्रकल्प, वरेचवर दुरुस्तही केले जात असत. जसे रुद्रदामन या माळव्यातील शक राजाने, गिरनार येथील सुदर्शन तलाव दुरुस्त केलेला होता. एकंदर शेतीतील उत्पन्न जोरावर असून, राज्याच्या महसूलाचा महत्वाचा भाग हा जमिन महसूल (१/६) होता.

**● उद्योग आणि व्यापार :**

**(अ) श्रेणीपध्दत :**

या काळातील शेतीतील प्रचंड स्वरुपातील अतिरिक्त उत्पन्नाच्या जोरामुळे कारागीरी/उद्योगाचा विकास

झालेला दिसून येतो. हे उद्योग मुख्यत्वे शहरात/नागरी केंद्रात संघटीत असे झाले होते. या संदर्भात 'श्रेणी' संघटनेचे कार्य विशेष उल्लेखनीय होते. या श्रेणी प्रत्येक उद्योग/व्यापाराच्या असत. जसे लोहारांची श्रेणी, सुतारांची श्रेणी; तसेच रेशीम कापडाच्या व्यापाऱ्यांची श्रेणी, तांदळाच्या व्यापाऱ्यांची श्रेणी इ. या श्रेणींचे सभासदत्व वंशपरंपरागत स्वरुपाचे असे. 'श्रेष्ठीन्' हा या श्रेणींचा प्रमुख असून, याच्या आज्ञेतच श्रेणीतील सर्व सभासद काम करीत असत. यामधील सर्व सभासदांची जबाबदारीही अख्ख्या श्रेणीची असे. आणीबाणीच्या काळात श्रेणीतील सर्व सदस्य अडचणीतील कुटुंबाच्या मदतीला येऊन, अशा कुटुंबाच्या निर्वाहाची जबाबदारी घेत असत. या श्रेणी अतिशय महत्वाच्या असून अतिशय सधन अशा असत. त्यामूळेच, राजावरही या श्रेणींचा वचक असे. अशा श्रेणींवर लोकांचा मोठा विश्वास असे. इतर सधन लोक या श्रेणींकडे विश्वासाने ठेवी ठेवत असत. तसेच, श्रेणींच्याकडून गरजूंना कर्जही मिळत असे.

या श्रेणी, आपले उत्पादन व्यापारात पाठवत असत. हा माल, बैलगाडांच्या तांड्याद्वारे देशावरील केंद्रांना तसेच बंदरावर पाठवला जात असे. बंदराकडे जाताना, हे तांडे घाटमार्गातून प्रवास करीत. हा जो तांडा असे तो एक महत्वाच्या प्रमुखाच्या नेतृत्वाखाली प्रवास करीत असे. या व्यापारी तांड्याच्या प्रमुखाला 'सार्थवाह' असे म्हणत. याला वाटेवरील वेगवेगळी ठिकाणे, त्यांमधील अंतरे, तेथील सोयी-सुविधा, अडचणी, पर्यायी वाटेच्या व्यवस्था, बाजारपेठा, तेथील वस्तूंचा भाव, वजन-मापे, चलन इ. सर्वांची माहिती असल्याने, या व्यापारी प्रवासातील हा एक महत्वाचा घटक असे.

या श्रेणी मुख्यत्वे अवैदिक पंथियांच्या असून, अशा श्रेणींच्या योगदानातून या काळातील अवैदिक पंथीयांचा मोठा प्रसार झालेला दिसून येतो,जसे, स्तूप-विहारांना देणग्या इ.

● **श्रेणी व बौध्दधर्माचा सहसंबंध :**

आपण पाहिलेच की या श्रेण्या बहुतेक अवैदिक-विशेषतः बौध्द धर्मीय होत्या. त्यामुळे या धर्मांचा प्रसार होण्यामध्ये या श्रेण्यांच्या सोबतीचा तसेच अनुदानांचा फार मोठा आधार होता. म्हणूनच, बहुतेक बौध्द विहार/चैत्य या व्यापारी मार्गानजीकच वसलेल्या दिसून येतात. याबदल्यात, बौध्द धर्मियानी, या श्रेण्यांना समाज मान्यता, वेगवेगळ्या प्रदेशातील माहिती; त्याचप्रमाणे, विहाराद्वारे विश्रांती स्थळं आणि कोठारंही पुरवलेली दिसतात. त्यात, श्रेण्यांनी कित्येक बौध्द स्थापत्यांना अनुदानं दिलेली दिसून येतात. जसे कऱ्हाड येथील लोहारांच्या श्रेणीने, मध्य प्रदेशातील भारहूतच्या स्तूपाला देणगी दिलेली दिसून येते. कार्ले, कन्हेरी येथील लेण्या सुध्दा श्रेणींच्या अनुदानातूनच निर्माण झालेल्या आहेत. म्हणूनच, या काळातील 'श्रेणी व बौध्दसंघ' यांचे सहसंबंध उल्लेखनीय असे दिसते.

**(ब) उद्योग :**

या काळामध्ये शेतीवर, खनिजांवर, जंगलावर तसेच प्राण्यांवर आधारीत विविध उद्योग असे दिसून येतात.

**कापड उद्योग :** या काळातील कापड उद्योग प्रचंड निर्यातक्षम होता. भारतीय रेशमी कापडाने जागतिक बाजारपेठ काबीज केलेली होती. देशातील विविध भागात विविध प्रकारचे आणि उत्तम दर्जाचे कापड तयार होत

असे. विशेषतः महाराष्ट्रातील पैठणीने युरोपवर मोहिनी टाकलेली होती.

यामध्ये, सूती, रेशमी, लोकरी अशा विविध स्वरुपाचे कापड तयार होत असे. सूतकाम, वीणकाम या सर्व टप्प्यात विकास गाठलेला होता. या कापड उद्योगालाच जोडून रंगकाम, भरतकाम इ. उपउद्योगही तेजीत होते.

**खाण उद्योग :** या काळात सागरी खाणी होत्या; तसेच जमिनीतीलही. सागरी खाणीतून रत्ने, शंख, शिंपले, मोती आणि मीठ मिळवले जायचे. तर जमिनीतील खाणींमधून लोह, सोने, तांबे मिळवले जात असे.

**धातू उद्योग :** हा खाण उद्योगाला जोडूनही पाहता येईल. या काळात धातू तंत्रज्ञानही विकसित झाले होते. यांनी अशुध्द धातूपासून शुध्दधातू तयार करण्याचे तसेच मिश्र धातूंतून वस्तू बनवण्याचे तंत्रही विकसित केलेले होते. लोह, सोने, तांबे या धातूंच्या विविध वस्तू बनवल्या जात. घरातील साधने, उपजीविकेची साधने, संरक्षणात्मक साधने ही लोखंड, तांब्यापासून बनवली जात. विविध मूर्ती आणि अलंकारासाठी तांबे आणि सोने वापरले जात. तसेच, नाण्यांसाठी ही तांबे आणि सोने उपयोगात आणले जाई.

**कातडी उद्योग :** विविध प्रकारच्या कातडींपासून, कातडी वस्तू बनवल्या जात. यामध्ये 'कांत' हे मयूरपंखी, 'प्रेयक' हे ठिपक्यांचे तर 'श्यामिका' हे काळे कातडे असे.

**बांधकाम आणि शिल्प उद्योग :** या काळात हा उद्योगही विकसित झालेला होता. या काळात ३० तटबंदीयुक्त नगरे होती असे कळते. तसेच, स्तूपांच्या तोरणावरुन या काळातील स्थापत्याचा विकास दिसून येतो. ही नगरे; त्यातील घरे/महाल आणि सार्वजनिक वास्तूंनी सजलेली असत. तसेच, स्तूप, चैत्य, विहार अशी बौध्द स्थापत्यंही मोठ्या प्रमाणावर निर्माण होत होती. महायान पंथीयाच्या प्रभावामुळे पुढे-पुढे तर बुध्दांच्या शिल्पांनाही जोर आला. यातून बांधकाम आणि शिल्प उद्योग समृध्द झाला असे दिसून येते.

**जहाज बांधणी उद्योग :** आंतरराष्ट्रीय व्यापारात भारत अग्रेसर असल्याने, हा उद्योग विकसित असणे स्वाभाविकच होते. या काळातील विविध शिल्पांवरुन हे दिसून येते. विशेषतः वसिष्ठिपुत्र पुळुमावीच्या नाण्यांवर आपल्याला जहाजाची आकृतीही दिसून येते.

**(क) व्यापार :**

या काळातील व्यापाराचा विचार करता अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन मुद्द्यांच्या आधारे विचार करु. अर्थात, सर्वप्रथम या काळात व्यापारी केंद्रे आणि बंदरे कोणती होती हे समजाऊन घेऊ.

**● व्यापारी केंद्रे आणि बंदरे :**

या काळात विविध नागरी केंद्रे उदयास आलेली होती. हीच केंद्रे उद्योगांची तसेच व्यापारांचीही महत्वाची केंद्रे बनली. ही, गंगा-यमुनेच्या खोऱ्यात, नद्यांच्या किनारी, समुद्र किनारी, कच्च्या मालाजवळ, हमरस्ते व महत्वाचे जोडरस्ते ज्याठिकाणी छेदतात त्या ठिकाणी, पूर्वीच्या महाजनपदांच्या राजधानींच्या ठिकाणी, नव्या विविध राज्यांच्या राजधानींच्या ठिकाणी अशा विविध ठिकाणी उदयास आलेली होती, जसे,

हस्तीनापूर, अहिच्छत्रा, मथुरा, वाराणसी, अयोध्या, पाटलीपुत्र, कोशांबी (गंगा-यमुनेचेखोरे); कोटसूर,

चंद्रकेतूगढ, महास्थानगढ (बंगाल); सियालकोट, तक्षशीला (वायव्य भारत); बैराट, सांभर, नागरी (राजस्थान); उज्जैन, विदिशा (म. प्रदेश); प्रतिष्ठान, नेवासे, जुन्नर, नाशिक, कौंडिण्यपूर, पौनी, पवनार, तेर, कऱ्हाड, कोल्हापूर (महाराष्ट्र); वनवासी, मस्की, वडगाव-माधवपूर (कर्नाटक); नागार्जूनकोंडा, अमरावती (आंध्र प्रदेश) इ.

त्याचप्रमाणे, आग्नेय आशिया आणि पश्चिम आशिया/आफ्रिका/युरोप यांच्याशी आंतरराष्ट्रीय व्यापार जोमाने होत असल्याने, भारताच्या पूर्व किनारी व पश्चिम किनारीही विविध बंदरे विकसित झालेली होती, जसे,

ताम्रलिप्ती, पुलिकत, अरिकामेडू, कावेरीपट्टणम, पुहार (पूर्व किनारा); भृगुकच्छ/भडोच, सोपारा, चौल, दाभोळ, कल्याण, राजापूर, देवगड, विजयदुर्ग, मलबार (प. किनारा) इ.

● **अंतर्गत व्यापार :**

भारतातील विविधनगरे, उत्पादन केंद्रे, व्यापारी केंद्रे यांना जोडून जे व्यापारी जाळे निर्माण झाले होते त्याला अंतर्गत व्यापार म्हणता येईल. याचा फायदा एका बाजूला जसा देशाला होत असे. तसाच, दुसऱ्या बाजूने, हा व्यापार आंतरराष्ट्रीय व्यापारालाही जोडला गेला असे.

● **अंतर्गत व्यापारातील वस्तू :**

देशांतर्गत व्यापाराचा विचार करता, याठिकाणी, पूर्व भारतातून सुती कापडाचा पुरवठा होत असे. तर, दक्षिण भागातून; वस्त्रे, मसाल्याचे पदार्थ, चंदन, सोने, मोती, मौल्यवान खडे, हत्ती, हस्तीदंत इ. चा पुरवठा होत असे. तसेच, पश्चिम भारतातून तांबे (राजस्थान व हिमालयाचा पायथा), ऊंट (राजस्थान), कापड, कांबळे, चामडे, वन्य वस्तू (महाराष्ट्र, उत्तरप्रदेश) येत असत. तर, उत्तर/पूर्व भारतातून, लोखंड, वस्त्र, घोडे यांचा पुरवठा होत असे. उत्तरेकडून लोकर, शाली (हिमाचल प्रदेश) येत असत.

● **अंतर्गत व्यापाराचे मार्ग :**

यामध्ये, ताम्रलिप्ती बंदरापासून (पूर्व)-पाटलीपुत्र-तक्षशीला (वायव्य भारतः पुढे रेशीम मार्गाला जोडत असे) हा महत्वाचा हमरस्ता होता. हा मुख्यत्वे गंगेच्या खोऱ्यातून जात असल्याने, याठिकाणी गंगानदीचा एक जलमार्ग म्हणून अतिरिक्त फायदा होता.

या शिवाय विविध जोडरस्त्यांमध्ये पश्चिम भागातील श्रावस्ती-प्रतिष्ठान (उत्तर-दक्षिण), मथुरा-उज्जैन-भडोच (उत्तर-दक्षिण-पश्चिम बंदर), मथुरा-सिंध (उत्तर-पश्चिम) इ. तसेच, पूर्वेकडून दक्षिणेकडील ताम्रलिप्ती-अमरावती-कांचीपुरम-रैवीयर या मार्गाचाही समावेश होतो.

अर्थात, या काळातील समृध्द आंतरराष्ट्रीय व्यापार हा महाराष्ट्रातून जात असे. कारण, महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर आंतरराष्ट्रीय बंदरे होती.

देशावरील, उत्पादन केंद्रामध्ये तयार होणारा माल हा बंदरांच्या दिशेने पश्चिमेकडे जात असे. हे सर्व मार्ग महाराष्ट्रातून जात असत. पुढे, सह्याद्रीच्या डोंगररांगांचा एक मोठा अडथळा येत असे. हा अडथळा, घाटमार्गाने

पार करुन, पुढे बंदराकडे हे मार्ग जात असत. तसेच उलट बाजूने, म्हणजेच परदेशाकडून येणारा माल हा बंदर-घाट मार्ग-घाटमार्गावर गुहा-देशावरील उत्पादन केंद्राकडे पोचत असे.

अशा मार्गामध्ये कल्याण बंदर-**नाणेघाट**-जुन्नर-नाशिक/नेवासा/पैठण/तेर; चौल बंदर-**मळवली घाट**-भाजा, कार्ले गुहा-पुणे; कुडा-महाड-वाई-कराड; रत्नागिरी-**आंबा घाट**-पांडवदरा/पोहळे-कोल्हापूर इ. महत्वाच्या मार्गांचा समावेश होतो.

विविध श्रेणी आणि धर्मसंघ यांचा अन्योन्य संबंध असल्याने बौध्द गुहा या घाटमार्गावरच वसलेल्या दिसतात.

● **आंतरराष्ट्रीय व्यापार :**

या काळात भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार अत्यंत समृध्द होता. पश्चिम आणि पूर्व अशा दोन्ही दिशांना हा व्यापार चालत असे. हा व्यापार भूमार्ग आणि जलमार्ग या दोन्ही पध्दतीने होत असे. मात्र, एकंदर जलमार्ग हा अधिका किफायतशीर होता. यामध्ये भारताच्या पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीवरील बंदरांनी मोठी कामगीरी बजावली. या दोन्ही बंदरांना जोडणाऱ्या जमिनीवर सातवाहनांची प्रदीर्घ सत्ता होती. ही एकछत्री आणि एकसंघी होती. त्यामुळे, जमिनीवरील सर्व उत्पादन केंद्रे, अंतर्गत मार्गांनी या दोन्ही बाजूच्या बंदरांना जोडलेली होती. त्यामुळे प्रत्यक्ष आणि मध्यस्थ अशा दोन्ही स्वरुपात सातवाहन कालीन दक्षिण भारताने मोठी समृध्दी अनुभवली.

या काळातील भारत, व्यापारी जाळ्यांनी विविध आंतरराष्ट्रीय बंदरांना-देशांना जोडलेला होता. जसे; पश्चिमेकडे : इराण, अरेबिया, इराक, सिरिया, उ. आफ्रिका, युरोप. पूर्वेकडे : श्रीलंका, जावा, सुमात्रा, चीन

● **आंतरराष्ट्रीय व्यापारातील वस्तू :**

या काळात, निर्यातीचा विचार करता, पींके आणि जंगलापासून तांदूळ, मिरची, आले, डाळी, नारळ, नीळ, साखर, लाकूड, डींक, औषधे, सुगंधी द्रव्ये, सुती कापड, वस्त्रं, तरपशु-पक्ष्यांमध्ये हत्ती, गेंडे, सिंह, वाघ, माकडे, मोर, पोपट, अजगर, प्राणी उत्पादनांमध्ये हस्ती दंत, लोकर, कातडे, कासवपाठ आणि खाणी व धातूंमध्ये पोलाद, तांबे, रत्ने, जडजवाहीर इ. वस्तूचा समावेश होता.

तर, आयातीमध्ये, कमरपट्टे (अलेक्झांड्रिया), चादरी (कांबोज), मद्य (इटली, अरेबीया), तांबडे मोती (इटली), टीन, शीसे (प.रोमन साम्राज्य), काचसामान इ. चा समावेश होतो.

तर, पूर्व आणि पश्चिमेमध्ये मध्यस्थ म्हणून काम करताना, चीनकडून रेशीम, सुमात्राकडून लवंग तर श्रीलंकेकडून तांदूळ, आले, सोने, चांदी, रत्ने, मोती, मौल्यवान खडे इ. वस्तू भारतीय लोक घेत असत. मग पुढे, ते पश्चिमेकडे पाठवित असत.

● **आंतराष्ट्रीय भूमार्ग :**

आता, आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या संदर्भात विविध मार्गांचा विचार करु. यामध्ये भूमार्ग आणि जलमार्ग असे दोनप्रमुख मार्ग येतात.

**(अ) पश्चिमेकडे :**

भूमार्गाचा विचार करता, युरोपला जाणारा पश्चिमेकडील मार्ग लक्षात घेऊ. हा सुरुवातीच्या काळात, वायव्य भारतातून जाणारा होता; जसे, पुष्कलावती-खैबर खिंड-काबूल खोरे-हिंदूकूश पर्वत-मध्य आशियातील बॅक्ट्रिया-रेशीम मार्ग (पुढे प. आशिया-युरोप). मात्र पुढे, या मार्गाभोवतालच्या प्रदेशामध्ये सारखे संघर्ष होऊ लागले. हा संघर्ष लूटालूट किंवा हा मार्ग ताब्यात घेण्यावरुन होत असे. यामध्ये पार्थियन ग्रीक, शक, कुशाण इ. सदैव संघर्षात मग्न असत. त्यामूळे एकंदरीतच या मार्गाचा प्रदेश हा धोकादायक बनला.

त्यामूळे, प.आशिया व युरोपकडे जाण्यासाठी समुद्रमार्गाचा पर्यायपुढे आला. यावेळी, इ.स. ४६ च्या जवळपास हिप्पोलसने मोसमी वाऱ्याचा शोध लावला. त्यामुळे समुद्री व्यापार हा पूर्वीपेक्षा कमी धोकादायक बनला. यावेळी शक विशेषत: सातवाहनांनी हा पश्चिमेकडे जाणारा समुद्रमार्गी आंतरराष्ट्रीय व्यापार संघटीत केला. हा इंडो-रोमन व्यापार पुढे भारतीयांसाठी अतिशय फायदेशीर ठरला. हा समुद्रमार्ग पुढील प्रमाणे होता, जसे,

१. कोकणातील बंदरे-पर्शिया आखात-किनाऱ्या किनाऱ्याने-बॅबिलोन (पुढे युरोप)

२. कोकणातील बंदरे-एडन (प.आशिया व युरोपचे जोड ठिकाण)-तांबडा समुद्र-सुएझ (आफ्रिकेचे प्रवेशद्वार)-अलेक्झांड्रिया (इजिप्त मधील ग्रींकांची वसाहत)-(पुढे युरोप)

३. कोकणातील बंदरे-डायस्कोरिडा-पूर्व अफ्रिकेच्या किनाऱ्यावरील बंदरे (पुढे आफ्रिका आणि युरोप) इ.

**(ब) पूर्वेकडे :**

हा व्यापार चीन बरोबर असे. येथेही चीनशी व्यापार सुध्दा खुष्कीच्या-भूमार्गाने चालत असे जसे, १. भारत-आसाम-ब्रह्मदेश-चीन किंवा २. सिक्कीम-तिबेट-चीन असा. मात्र, इथेही आग्नेय आशियातील समुद्रमार्गे हा व्यापार हा दोही पक्षांसाठी किफायतशीर होता.

**चलन/नाणी :**

भारतामध्ये विनिमयासाठी नाण्यांची परंपराही, इ.स.पू. सहाव्या शतकापासून सुरु झाली. अर्थात, ही नाणी आजच्यासारखी प्रतिकात्मक मूल्य असलेली नव्हती. तर 'अंतर्गत मूल्य' असणारी होती. म्हणजे, नाण्यातील धातू हा ज्या शुध्दतेचा आणि वजनाचा असे त्याची किंमत त्या नाण्याला मिळे.

मौर्यकालीन व्यापार हा साधारणत: एकसमान नाण्यांद्वारे चालत असे. जसे, निष्क, कार्षापण. यांना 'आहत नाणी' असे म्हणत. ही बहुतेक चांदीची असत. आणि यावर फक्त चिन्हेच असत. पुढे, ग्रीकांच्या आगमनानंतर; छाप्याच्या बाजूला राजाचा मुखवटा व त्याचे नाव/बिरुद तर काट्याच्या बाजूला देवता अशाप्रकारची नाणी प्रचारात आली. अगाथोक्लोसच्या नाण्यांवर प्रथमतः भारतीय देवता दिसू लागतात. तर शकांची मुख्यत्वे चांदींची नाणी दिसून येतात.

कुशाणांनी मोठ्या प्रमाणावर सोन्याची नाणी चलनात आणली. अर्थात, ही सोन्याची नाणी आंतरराष्ट्रीय

व्यापारासाठी वापरात असत. दैनंदिन व्यापार मात्र तांब्याच्या नाण्यांत चालत असे. यांच्या नाण्यांवर छाप्याच्या बाजूला ओव्हरकोट घातलेला राजा, ज्याच्या हातात एक भाला आहे आणि तो समोर असणाऱ्या वेदीमध्ये आहुती देतो आहे अशी आकृती कोरलेली असे. तर काट्याच्या बाजूला देवता दिसत. तर, सातवाहनांनी मुख्यत्वे तांबे, शिसे, पोटीन अशा स्वस्त धातूंमधील नाणी प्रचारात आणली. अर्थात, प्रथम सातकर्णी, गौतमीपुत्र सातकर्णी आणि पुळुमावीनंतरचे काही राजे यांनी चांदीची ही नाणी काढलेली दिसून येतात. सातवाहनांच्या नाण्यांवर, काट्याच्या बाजूला काही विशिष्ठ प्रतिमा दिसून येतात, जसे, सोंड उचललेला हत्ती, उज्जैन चिन्ह, टेकड्या आणि जवळ सूर्य-चंद्र इ. छाप्याच्या बाजूला चेहरा आणि अक्षरे दिसतात.

अशा महत्वाच्या सत्तांप्रमाणे महाराथी, कूर, चुटु अशा छोट्या सत्ता सुध्दा नाणी काढत असत. त्याचबरोबर काही व्यापारी केंद्रे व श्रेणींना सुध्दा नाणी काढायची परवानगी मिळालेली होती. तसेच, कुणींद-यौधेय यासारखी समकालीन गणराज्येही आपापली नाणी काढीत असत.

**● स्वयं-अध्ययन प्रश्न-२**

**अ. योग्य पर्याय निवडा**

१. सातवाहन-कुशाण काळात जमिन महसूलाचा दर .............. असे.

अ. १/३ ब. १/४ क. १/५ ड. १/६

२. .......... च्या नाण्यावर शिडांच्या जहाजांची आकृती आढळते.

अ. प्रथम सातकर्णी ब. गौतमीपुत्र सातकर्णी क. वसिष्ठीपुत्र पुळुमावी ड. हाल

३. तक्षशीला हे व्यापारी केंद्र भारताच्या ...............भागात येते.

अ. आग्नेय ब. नैऋत्य क. ईशान्य ड. वायव्य

४. .............. हे मध्य प्रदेशातील महत्वाचे व्यापारी केंद्र होय.

अ. मस्की ब. उज्जैन क. चंद्रकेतूगढ ड. अहिच्छत्र

५. देशावरील जुन्नर आणि कल्याण हे बंदर...............या घाटाने जोडलेले आहे.

अ. नाणेघाट ब. आंबा घाट क. मळवलीघाट ड. आंबोलीघाट

**ब. एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. श्रेणीच्या प्रमुखाला आणि व्यापारी तांड्यांच्या प्रमुखाला काय म्हणत असत?

२. महाराष्ट्रातील कोणत्या कापडाने युरोपवर मोहिनी टाकलेली होती?

३. महाराष्ट्रातील महत्वाच्या व्यापारी केंद्राची नावे सांगा.

४. भारताच्या पूर्व किनाऱ्यावरील बंदरांची नावे सांगा.

५. सातवाहनांच्या नाण्यांवर कोणत्या प्रतिमा दिसून येतात?

### १.२.४ विभाग ४: हिनयान बौध्द धर्म :

बुध्दांच्या महापरिनिर्वाणानंतर काही वर्षातच विविध विचारप्रवाह निर्माण होऊ लागले. यांना आपण पंथ असे म्हणू शकू. बुध्दांनी जे विचार मांडले त्यांचा विविधप्रकारे अर्थ लावला जाऊ लागला. अशा एकूण १८ विचारधारा होत्या असे आपल्याला समजते. यातील, सुरुवातीची परंपरा म्हणजे 'स्थविरवाद' किंवा थेरवाद' होय. या थेरवादालाच, 'निकाय' असे म्हणले जाते. तसेच, महायानपंथीय लोक, या पंथाला 'हिनयानपंथ' असे ओळखतात.

यांच्या विचारानुसार, गौतम बुध्द हे एक मानव होते; आणि त्यांनी, त्यांच्या प्रयत्नाने निर्वाणपद प्राप्त केलेले आहे. म्हणजेच हे बुध्दांना अवतारी, चमत्कारी, देव वगैरे मानत नाहीत. तर, ते, त्यांना मनुष्य समजतात. दुसरं असं की, ज्याप्रमाणे बुध्दांनी प्रयत्नांनी निर्वाणपद प्राप्त केले त्याचप्रमाणे आपणही प्रयत्न केले तर आपल्यालाही बुध्दत्व प्राप्त होऊ शकते. म्हणून, असे अर्हतपद प्राप्त करण्यासाठी सतत प्रयत्न करीत राहिले पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे.

यांनी 'संन्यासा'ला अधिक महत्व दिलेले आहे. आणि संन्यस्त भिक्षूंनी, सातत्याने प्रयत्नशील राहून, स्वतःचा उध्दार करुन घ्यायचा आहे, असे ते म्हणतात.

यांचा फक्त बुध्दांवर विश्वास आहे. आणि ते, बुध्दांच्या मूळ शिकवणूकीशी अगदी प्रामाणिक असतात. त्यांना बुध्दवचनात कोणतेही फरक मान्य नाहीत. तसेच, बुध्दवचनांचा, इतरांनी लावलेला अन्वयार्थ किंवा स्पष्टीकरणही अमान्य आहे.

यांनी जसे बुध्दांच्या मूळ शिकवणूकीवर भर दिला. त्याचप्रमाणे फक्त पाली भाषेतच लेखन केले.

तसेच, ते बुध्दांप्रमाणेच मूर्तीपूजेच्या विरोधी आहेत. बुध्दांच्या मूर्ती ऐवजी; त्यांच्या प्रतिकांना ते महत्व देतात. जसे, स्तूप, कमळ, हत्ती, पाऊल, चक्र इत्यादी. शिवाय, या प्रतिकांचे ते पारंपारिक अर्थाने पूजनही करत नाहीत. कोणत्याही कर्मकांडाला ते थारा देत नाहीत. तर बुध्दांच्या प्रतिकासमोर ध्यान लावणे हीच यांची पूजनपध्दती आहे.

अशा या हिनयानपंथाचा भारताबरोबरच अन्य देशांतही प्रसार झालेला आहे. विशेषतः श्रीलंका, ब्रह्मदेश, कंबोडिया या देशांत मोठा प्रसार झालेला दिसून येतो.

या हिनयानांचे वैभवशाली धार्मिक स्थापत्य या काळात तयार झाले. विशेषतः सातवाहनांच्या काळात, सह्याद्रीची डोंगररांग आणि तिच्या उपशाखांमध्ये कित्येक गुहास्थापत्य निर्माण झाले. यामध्ये चैत्य दिसून येतात. हे बुध्दांचे प्रार्थनास्थळ असते. तसेच, विहार दिसून येतात. हे भिक्षूंच्या निवासासाठी खोदले गेले असते. असे अनेक चैत्य-विहार महाराष्ट्रात दिसून येतात. 'भाजे' या ठिकाणी या स्थापत्याचा प्रारंभ झाला. पुढे कार्ले, भाजे,

बेडसा, औरंगाबाद, नाशिक, जुन्नर अशा विविध ठिकाणी आपल्याला या लेण्या दिसून येतात. याठिकाणी अन्य शिल्पं जरी दिसत असली तरी बुध्दांची मात्र मूर्ती दिसून येत नाही. तर चैत्यामध्ये फक्त स्तूपाची दगडी प्रतिकृती दिसून येते. आंध्र प्रदेशातील अमरावती शैलीतील शिल्पांमध्येही बुध्दांची मूर्ती दिसून येत नाही. तर बुध्दांच्या प्रतिकांचे पूजन करणारे भक्तगण दिसून येतात. हीच कथा मध्य प्रदेशातील स्तूपांची. येथील सांची आणि भारहूत स्तूपांच्या तोरणांवर बुध्दांचे फक्त प्रतिमात्मक अंकन आहे.

हे स्थापत्य निर्माण होणेही प्रचंड खर्चाची बाब असे. यासाठी, या काळातील राजे आणि धनाढ्य श्रेणींच्या आर्थिक मदतीतून या लेण्या निर्माण झालेल्या आहेत. पुढे भारत आणि रोमन व्यापार डळमळीत झाला. याचा प्रतिकूल परिणाम एकंदर परिस्थितीवर झाला. येथील राजे, पूर्वेकडे आंध्र प्रदेशात निघून गेले. तर श्रेण्या आर्थिकदृष्ट्या ढासळल्या. मात्र हीनयानांचे धार्मिक स्थापत्य अशा परिस्थितीतही निर्माण होत होते. अर्थात पूर्वीसारखे शिल्पांनी सजलेले वैभवशाली स्थापत्य तयार होणे हे अशक्य होते. त्यामुळे, साध्या स्वरुपाचे स्थापत्य या काळात दिसू लागते. ढवळीकर अशा स्थापत्यांना 'उत्तर हिनयानकालीन स्थापत्य' असे म्हणतात. असे चैत्य-विहार आपल्याला कोल्हापूरजवळील पोहळे, पांडवदरा; कऱ्हाडजवळील जाखीणवाडी, आगाशीव; वाईजवळ पालकेश्वर इ. ठिकाणी दिसून येतात.

## १.३ सारांश :

मौर्यांच्या ऱ्हासानंतर, भारतभर गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. विविध राज्यांमध्ये संघर्ष होत होता. त्यात परकियांची आक्रमणं होत होती. अशा काळात नर्मदेच्या उत्तरेकडे कुशाणांनी तर दक्षिणेकडे सातवाहनांनी राज्य निर्माण केले. हे राज्य आपल्या एकछत्री, एकसंघी प्रशासनाने उत्तम राखले. परिणामी भारतात दीर्घकालीन स्थैर्य आणि शांतता प्रस्थापित झाली. यातून शेती-उद्योग विकसित झालेच. शिवाय आंतरराष्ट्रीय व्यापाराने कळस गाठला. आर्थिक समृध्दी निर्माण झाली. या समृध्दीतून कला-स्थापत्यात उत्तम प्रगती झाली. हीनयानांच्या प्रभावाखालील बौध्दगुहा स्थापत्यं आणि स्थानिक मथुराशैलीचा उदय हे याचे उदाहरण.

## १.४ पारिभाषिक शब्द :

चैत्य : हे बौध्द प्रार्थना मंदिर.

विहार : हे बौध्द भिक्षूंचे निवासस्थान.

स्तूप : बुध्दांच्या तसेच अनुयायांच्या पार्थिव अवशेषांवर बांधलेले अर्धगोलाकृती स्थापत्य.

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

- **स्वयं-अध्ययन प्रश्न-१**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. ड. पैठण  २. ब. नाणेघाट  ३. अ. सिमुक

४. ड. नाशिक ५. क. कनिष्क

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. प्रथम सातकर्णी

२. गौतमीपुत्र सातकर्णी

३. कनिष्क

४. अश्वघोष

५. कनिष्काने; कुंडलवन येथे

● **स्वयं-अध्ययन प्रश्न-२**

**अ. योग्य पर्याय निवडा.**

१. ड. १/६ २. क. वसिष्ठीपुत्र पुळुमावी ३. ड. वायव्य
४. ब. उज्जैन ५. अ. नाणेघाट

**ब. एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. श्रेष्ठीन्; सार्थवाह

२. पैठणी

३. प्रतिष्ठान, नेवासे, जुन्नर, नाशिक, कौंडिण्यपूर, पौनी, पवनार, तेर, कऱ्हाड, कोल्हापूर

४. ताम्रलिप्ती, पुलिकत, अरिकामेडू, कावेरीपट्टणम, पुहार

५. सोंड उचललेला हत्ती, उज्जैन चिन्ह, टेकड्या आणि जवळ सूर्य-चंद्र

**१.६ सरावासाठी स्वाध्याय :**

**अ) टीपा द्या.**

१. गाथासप्तशती

२. पेरिप्लस ऑफ दि एरिथ्रियन सी

३. हिनयान बौध्दधर्म

४. श्रेणीपध्दती

५. सातवाहनकालीन अंतर्गत व्यापार

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. सातवाहनांच्या प्रमुख राजांची माहिती द्या.

२. कनिष्काच्या अनुषंगाने, कुशाणांची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

३. सातवाहन-कुशाण काळातील व्यापाराची माहिती द्या.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ :


१. मिराशी, वा.वि. सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेख. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ. मुंबई. १९७९ (हा ग्रंथ, ईबुक स्वरुपात, मंडळाच्या वेबसाईटवर निःशुल्क उपलब्ध आहेः (इ-बुक डाऊनलोड - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ) (marathi.gov.in)

२. मोरवंचीकर, रा.श्री. सातवाहनकालीन महाराष्ट्र.

३. थापर, रोमिला. अर्लि इंडिया. केसागरप्रकाशन, पुणे.

४. जोशी, महादेवशास्त्री. भारतीय संस्कृतीकोश.

५. जोगळेकर, स.आ. हालसातवाहनाची गाथा सप्तशती. पद्मगंधा प्रकाशन, पुणे.


❖❖❖

## घटक – २

# अभिजात युग

अनुक्रमणिका


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

 २.२.१ प्रमुख राजे – गुप्त व वाकाटक.

 २.२.२ अर्थव्यवस्था आणि बृहतभारत

 २.२.३ साहित्य व विज्ञान

 २.२.४ धर्मव्यवस्था

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द

२.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## २.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास –

- अभिजात युग या शब्दाचा अर्थ लक्षात येईल.
- गुप्त व वाकाटक या समकालीन सत्तांच्या ऐतिहासिक साधनांची माहिती होईल.
- गुप्त व वाकाटक या समकालीन सत्तांचा राजकीय इतिहास अभ्यासता येईल.
- गुप्त व वाकाटककालीन अर्थव्यवस्था विशद करता येईल.
- बृहतभारत या संकल्पनेची अधिक माहिती होईल.
- गुप्त व वाकाटककालीन साहित्याची माहिती होईल.

- गुप्त व वाकाटककालीन विज्ञानविषयक माहिती होईल.
- गुप्त व वाकाटककालीन धर्मव्यवस्था पाहता येईल.

## २.१ प्रास्ताविक :

प्राचीन भारताच्या इतिहासात इ.स. ३ रे शतक ते ६ व्या शतकातील समकालीन असलेल्या उत्तर भारतातील गुप्त व दक्षिण भारतातील वाकाटक सम्राटांनी आपल्या पराक्रमाच्या व बुद्धिमत्तेच्या जोरावर कार्यक्षम, प्रजाहितदक्ष व सामर्थ्यशाली सत्ता प्रस्थापित केली. भारतातील राजकीय जीवनातील अशांतता दूर करून भारतात विशाल साम्राज्य निर्माण केले. या साम्राज्याद्वारे दीर्घकालीन शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित केली. आर्थिक, सामाजिक, साहित्यिक व वैज्ञानिक क्षेत्रात सर्वांगिण विकास घडवून आणला. स्थापत्यकला, चित्रकला, मंदिर उभारणी, वास्तुकला, मूर्तिकला, संगीतकला, धातुकाम या क्षेत्रात गुप्त व वाकाटक सम्राटांनी सर्जनशील व अभिजात स्वरूपाच्या नवनिर्मितीची भरीव कामगिरी करून आपल्या अतुलनीय कार्याचा या कालखंडावर एक ठसा उमटविला. या काळात अभिजनांचा एक वर्ग उदयास येऊन त्यांनी साहित्य, शिल्प, स्थापत्य व तत्वज्ञान क्षेत्रात सर्जनशील स्वरूपाची नवनिर्मिती केली. राजदरबारातही उच्च संस्कृती होती ती अभिजनाशी संबधित होती. सर्वच क्षेत्रात उच्चतम प्रगतीचा कळस गाठला. भारतीयांनी आपला सांस्कृतिक ठेवा भारताबाहेरील देशांनाही दिला. म्हणूनच हा कालखंड प्राचीन भारताचे सुवर्णयूग किंवा भारताचा वैभवशाली कालखंड किंवा अभिजात कालखंड मानला जातो.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ प्रमुख राजे – गुप्त व वाकाटक :

**● गुप्त कालखंड – इ.स. ३०० ते इ.स. ४७० :**

गुप्त कालखंड हा प्राचीन भारतीय इतिहासातील वैभवाचा कालखंड मानला जातो. मौर्यकालखंडानंतरचे कार्यक्षम, प्रजाहितदक्ष, सामर्थ्यवान, सत्ताधीश म्हणजे गुप्तराजे होत. मौर्य साम्राज्याच्या विघटनानंतर निरनिराळया प्रदेशात स्वतंत्र बनलेल्या शुंग, कण्व, सातवाहन, खारवेल तसेच परकीय आक्रमकापैकी ग्रीक, शक, कुशाण इ. ना भारतात विशाल साम्राज्याची निर्मिती करता आली नाही. त्यांच्यातील परस्पर संघर्षामुळे राजकीय जीवनात दीर्घकालीन अशांतता होती. राजकीय जीवनातील ही अशांतता दुर करून भारतात विशाल साम्राज्याची प्रस्थापना करण्याचे व या साम्राज्यामुळे समाजाचा सर्वांगिण विकास घडवून आणण्याचे श्रेय गुप्त घराण्यातील सत्ताधिशांना दिले जाते.

**● गुप्त घराण्याच्या इतिहासाची साधने :**

गुप्त युगापासून प्राचीन भारतीय इतिहास अधिक स्पष्ट होऊ लागतो. त्यासंबंधीचे असंख्य ऐतिहासिक साधने उपलब्ध आहेत. पुराणग्रंथ, स्मृतीवाड्मय, कालीदास, भास, भवभूती, इत्यादी विद्वानांचे अभिजात संस्कृत वाड्मय, प्राकृत वाड्मय, बौद्धवजैन धर्मियांचे याकाळातील वाड्मय यांचा इतिहाससाधन म्हणून उपयोग

होतो. राजाने स्वत: किंवा मांडलिकांनी अगर मंत्री किंवा भाट यांनी लिहिलेल्या आलेखातूनही मोठया प्रमाणात माहिती मिळते. सुवर्ण, तांबे व चांदीची नाणी उपलब्ध आहेत. मोठ्या प्रमाणात सुवर्णनाणी चलनात असावीत असे दिसते. उत्तर भारतात आधुनिक काळात ठिकठिकाणी झालेल्या उत्खननात मिळालेल्या अवशेषावरून या काळातील सर्वांगिंण बाबीची माहिती मिळणे शक्य होते. चिनी प्रवाशी फाहीयान याच्या फो-कॉ-की ग्रंथातून गुप्त राजधानी पाटलीपुत्र येथील वास्तव्याच्या अनुभवाची माहिती मिळते. तसेच पाटलीपुत्र, मथुरा, माळवा इ.ठिकाणचे धार्मिक जीवन चित्रित होते. गुप्तांनी भारतात विशाल व भक्कम साम्राज्याची निर्मिती केली. इ.स. ३ ऱ्या शतकाच्या अखेरीस या राज्याचा उदय झाला. श्रीगुप्त हा गुप्त घराण्याचा संस्थापक होय. श्रीगुप्तानंतर महाराजा घटोत्कच गुप्त सत्तेवर आला.

**१) पहिला चंद्रगुप्त (इ.स. ३२० ते इ.स. ३३५) :**

गुप्त वंशातील पहिला कार्यक्षम व महत्वाकांक्षी सत्ताधिश म्हणजे पहिला चंद्रगुप्त होय. गुप्त घराण्याची प्रतिष्ठा वाढवून गुप्त राजाला महाराज्याधिराजाचा दर्जा त्याने प्राप्त करून दिला. राजा, महाराजा, महाराजाधिराज, सम्राट, एकराट या पदव्या प्राचीन भारतीय राज्यसत्तेचे स्वरूप त्याची व्याप्ती दर्शवणारे पूरावे आहेत. चंद्रगुप्ताने अनेक महाराजांना आपल्या अधिपत्याखाली आणले होते. अशा राजा महाराजांचा अधिपती म्हणजे महाराजाधिराज बनला. साम्राज्य विकासातला हा एक महत्वाचा टप्पा तो टप्पा या काळात गाठला गेला हे चंद्रगुप्ताचे सर्वात मोठे योगदान होय.

**१. साम्राज्यविस्तार :**

पुराणातील उल्लेखावरून व नाण्यावरून चंद्रगुप्ताचा राज्यविस्तार सांगता येतो. आयोध्या, प्रयाग, द. बिहारमधील मगध, औध, वैशाली गुप्त साम्राज्यात समाविष्ठ होते. अलाहाबाद शिलालेखात नेपाळ हे राज्य गुप्त साम्राज्याच्या राज्य म्हणून उल्लेखलेले आहे.

**२. लिच्छवी घराण्याशी संबंध :**

चंद्रगुप्ताने लिच्छवी राजकन्या कुमारदेवीशी विवाह करून मगध राज्यावर आपली सत्ता प्रस्थापित केली. कौमुदी महोत्सव या नाटकातून व नाण्यातून या घटनेचे संदर्भ आढळतात. लिच्छवी राजसत्तेसारख्या बलवान आणि प्रभावी राजघराण्याशी सोयरसंबंध प्रस्थापित झाल्यामुळे गुप्तांचीही प्रतिष्ठा वाढली म्हणूनच असे मानले जाते की चंद्रगुप्ताने आपल्या नाण्यांवरही अभिमानाने लिच्छवी राजकन्या कुमारदेवीचा उल्लेख केला आहे.

**३. गुप्तशक कालगणनेस सुरूवात :**

पहिला चंद्रगुप्त हा शककर्ता होता. नवी कालगणना आपल्या राज्यारोहणाच्या तारखेपासून (२६ फेब्रुवारी ३२०) नवीन वर्षगणना सुरू केली. आपल्या व आपल्या पत्नीच्या नावे कुमारदेवी हिच्या नावाची नाणी पाडली. पण काही शतकेच ही कालगणना प्रचलित राहिली. सुरूवातीच्या या काही वर्षातील शिलालेख, नाणी मात्र गुप्तशतकातील आहेत. महाराज्याधिराजने इ.स. ३३५ पर्यंत राज्य केले.

### ३. पहिल्या चंद्रगुप्ताचा अखेरचा काळ :

चंद्रगुप्ताच्या मृत्युविषयी फारशी माहिती मिळत नाही. काही इतिहासकारांच्या मते त्याचा मृत्यू नैसर्गिक झाला असावा तर काहीच्या मते त्याने आपला पुत्र समुद्रगुप्ताला सिंहासनावर बसविले व वानप्रस्थाश्रम स्विकारून अरण्यात गेला. तसेच सिंहासन कधी सोडले याबाबत माहिती उपलब्ध नाही.

## २) समुद्रगुप्त (इ.स. ३३५ ते इ.स. ३८०) :

विविध प्रकारची नाणी, संस्कृत धार्मिक व लौकिक वाड्मय, बौद्ध व जैन ग्रंथ, अलाहाबाद येथील स्तंभालेख इत्यादी साधनांच्या आधारे समुद्रगुप्तांच्या जीवन व कार्याची माहिती मिळते. प्राचीन भारतातील पराक्रमी राजा, कुशल संघटक व विद्वान राजा म्हणून त्याला सर्वश्रेष्ठ स्थान मिळाले. पहिल्या चंद्रगुप्ताच्या राज्यविस्ताराचे कार्य पुढे चालवून सामर्थ्याच्या मदतीने गुप्तांच्या सत्तेला उत्तर व दक्षिण भारतातील सर्वश्रेष्ठ विस्तारित सत्ता बनविण्याचे श्रेय समुद्रगुप्ताला दिले जाते.

### १. समुद्रगुप्ताचे बालपण :

युवराज असतानाच समुद्रगुप्ताने शस्त्रविद्या व इतर निरनिराळया विषयांमध्ये प्राविण्य मिळविण्यास सुरूवात केली होती. राज्यकारभार ज्ञान, साहित्य, कला, संगीत इत्यादी विषयाची आवड होती. म्हणूनच समुद्रगुप्त कनिष्ठ असतानाही त्याची युवराज म्हणून नेमणूक केली. पुढील काळात समुद्रगुप्ताने आपल्या असामान्य पराक्रमाने विशाल व एकसंघ साम्राज्याची निर्मिती केली.

### २. राज्यारोहण :

समुद्रगुप्ताचे राज्यारोहण इ.स. ३३५ मध्ये झाले असले तरी त्याच्या राज्यारोहणासंबंधी इतरही काही मते व्यक्त केली जातात. नालंदा ताम्रपटानुसार हे राज्यारोहण इ.स. ३२५ मध्ये झाले असावे. तर काहीच्या मते इ.स. ३२० मध्ये राज्यावर झाला असावा. त्यानेच गुप्तशक सुरू केला असावा. गया ताम्रपटानुसार इ.स. ३२८ च्या दरम्यान समुद्रगुप्त सत्तेवर होता असे दिसते. असे असले तरी पहिल्या चंद्रगुप्तानंतर समुद्रगुप्त राजपदावर झाला हे निश्चित.

### ३. समुद्रगुप्ताचे राज्यविस्ताराचे कार्य :

सत्तेवर येताच समुद्रगुप्ताने साम्राज्यविस्ताराचे धोरण आखले. त्याच्या नाण्यावर ''सर्वराजोच्छेता'' अशी पदवी कोरलेली आहे. सत्तेवर येताच आपल्या कार्याला सुरूवात केली. पण साम्राज्यविस्तार सहजशक्य नव्हते. कारण त्यावेळची राजकीय परिस्थिती अवघड होती. सर्व उत्तर भारत छोट्या राज्यांमध्ये विभागला होता. परकीय आक्रमणाचा धोका संभवत होता. छोट्या राज्यांची राजकीय व्यवस्था एकाच प्रकारची नव्हती. काही राज्ये राजसत्ता तर काही राज्ये गणराज्ये होती. विंध्य प्रदेशात अनेक छोटी राज्ये होती. गुजरात व बंगाल विभागला होता. दक्षिणेत चेर, चोल, पांडय, पल्लव यांची स्वतंत्र राज्ये होती. व त्यांचा परस्परांत संघर्ष सुरू होता अशा परिस्थितीत समुद्रगुप्ताला आपले दिग्विजयाचे धोरण अमलात आणणे सोपे नव्हते. यावर मार्ग काढून

गुप्त साम्राज्यात उत्तर व दक्षिण भारतात विस्तार करण्यासाठी पुढील काळात त्याने निरनिराळया मोहिमांची आखणी केली. अलाहाबाद प्रयाग-प्रशस्तीमध्ये या मोहिमांच्या स्वरूपाची व त्या मोहिमांद्वारे जिंकलेल्या प्रदेशाची सविस्तर माहिती दिली आहे.

**अ) आर्यावर्तातील मोहिम :**

पाटलीपुत्राच्या आसपास अनेक लहान लहान राज्ये होती. त्यांच्यात सदैव संघर्ष चाललेला असल्याने राजकीय जीवनात अशांतता होती. ही राज्ये गुप्तराज्यालाही विरोध करीत होती रूद्रदेव, नागदेव, चंद्रवर्मा, गणपतीनाथ, नागसेन, नंदिन व अच्यूत या राजांनी समुद्रगुप्ताविरूद्ध संघ केला होता. रूद्रदेव या राजाकडे याचे नेतृत्व होते. त्यामुळेच पाटलीपुत्रांच्या आसपासची ही राज्ये जिंकणे समुद्रगुप्ताला आवश्यक वाटल्याने त्याने पहिल्या लष्करी मोहिमेची आखणी केली. या मोहिमेत पश्चिम व पूर्वेकडील सरहद्दीवर असलेल्या सर्व राजांवर आक्रमण केले. व त्यांना पराभूत करून तो प्रदेश आपल्या साम्राज्यात समाविष्ठ केला. या विजयामुळे समुद्रगुप्ताला राजधानीच्या आसपासच्या प्रदेशात दीर्घकालीन शांतता निर्माण करणे शक्य झाले. बुंदेलखंड, पश्चिम उत्तर प्रदेश, मध्य भारत या प्रदेशाचा समावेश त्यात होतो. यातील बहुतेक राजे नाग वंशीय होते म्हणून या उत्तर मोहिमेच्या विजयाप्रित्यर्थ समुद्रगुप्ताने आपले राजचिन्ह म्हणून 'गरूड' या नाग सर्पाला ठार मारून खाणाऱ्या पक्षाला स्विकारले.

या विजयानंतर समुद्रगुप्ताने आपले लक्ष जबलपूर व छोटा नागपूर या भागात राज्य करणाऱ्या १८ राजांकडे वळविले. हा प्रदेश पर्वतराजींनी व घनदाट अरण्यांनी वेढलेला असल्यामुळे या राज्यांना 'अटविक राज्ये' असे नाव होते. या सर्व अटविक राजांना समुद्रगुप्ताने जिंकले परंतु त्यांना आपल्या साम्राज्यात समाविष्ठ न करता, मानसन्मानाने वागवून फक्त नाममात्र मांडलिकत्व स्विकारण्यास लावले. समुद्रगुप्ताला आपली दक्षिण मोहिम राबविण्यासाठी अटविक राज्यांचा उपयोग होईल या धोरणाने त्यांना आपलेसे करून घेतले.

**ब) दक्षिण भारतातील साम्राज्यविस्तार :**

राजधानीच्या आसपासच्या प्रदेशात स्थैर्य निर्माण केल्यानंतर समुद्रगुप्ताने दक्षिणेकडची मोहिम हाती घेतली. त्यावेळी दक्षिण भारतात नर्मदा व गोदावरी नदीच्या प्रदेशात वाकाटक घराण्याची प्रबळ सत्ता होती. त्यामुळे या सत्तेशी संघर्ष न करता पूर्व किनाऱ्याने दक्षिण भारतात प्रवेश करण्याचे मुत्सद्धेगीरीचे धोरण आखले. दक्षिण भारतात एकूण १२ राज्ये होती. त्या सर्वांचा पराभव समुद्रगुप्ताने केला पण हा विजय सोपा नव्हता. कारण या राजांनी कांचीच्या विष्णूगुप्ताच्या नेतृत्वाखाली समुद्रगुप्ताला शह देण्यासाठी एक संयुक्त संघ तयार केला. पण इतिहास संशोधक प्रा. घोष यांनी म्हटल्याप्रमाणे समुद्रगुप्ताने अलेक्झांडरप्रमाणे अतिशय कौशल्याने सेनेची रचना करून या संघाचा पराभव केला. पण ती राज्ये आपल्या साम्राज्यास न जोडता मोठया उदारमनाने त्यांना अंतर्गत स्वायतता बहाल केली. दक्षिणेतील मांडलिकत्व पत्करलेले कोसलचा महेंद्र, कोट्टूरचा स्वामिदत्त, एरंडपलाचा दामन, कांचीचा विष्णुगुप्त, वेंगीचा हस्तिवर्मन, पिस्तापूरचा महेंद्र, पल्लवचा उग्रसेन, देवराष्ट्राचा कूबेर, कुस्तलपूरचा धनंजय हे राजे होते. समुद्रगुप्ताच्या दक्षिण दिग्विजयाच्या पराक्रमाचे विश्लेषण करताना आर. सी. मुजूमदार म्हणतात, 'अलाहाबाद स्तंभालेखात संपूर्ण भारताचे साम्राज्य उभारण्याची

समद्रगुप्ताची महत्वाकांक्षा होती. पण संपूर्ण भारत आपल्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली आणण्याचे महाकठीण काम आहे हे जाणून त्याने तसा प्रयत्न केला नाही.

दक्षिण भारतात मिळविलेल्या या विजयामुळेच इतिहासकार व्हिसेंट स्मिथ यांनी त्याला 'भारतीय नेपोलियन' म्हटले आहे. दक्षिण भारतात कांचीपर्यत मिळविलेल्या त्याच्या विजयामुळे माळवा व सौराष्ट्राच्या प्रदेशातील शकांनी, सरहद्दीच्या प्रदेशात राज्य करणाऱ्या कुशाणांनी व सिलोनच्या राजानी यावेळी समुद्रगुप्ताशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. थोडक्यात उत्तर भारतात विजय मिळविल्यानंतर दक्षिण भारतात कांचीपर्यंत गुप्तांचे साम्राज्य विस्तारित करण्यात यावेळी समुद्रगुप्ताला यश आलेले दिसते.

**क) सीमेवरील राज्यांचा पराभव :**

आपल्या साम्राज्याच्या सरहद्दीच्या प्रदेशात शांतता व सुव्यवस्था टिकविणे आवश्यक आहे. याची जाणीव असल्यानेच समुद्रगुप्ताने सीमेवरील राजांच्या विरोधात तिसरी मोहिम आखली पण दक्षिण भारतात मिळविलेल्या विजयामुळे या राजांनी मोहिमेच्या प्रारंभीच शरणागती स्विकारली. त्यामध्ये पूर्व राजस्थानचे मालव, अजमेर, जयपूरचे अर्जुनायन, भरतपूरचे यौधेय, सियालकोटचे मद्रक, झांशीचे अभीर, मध्यप्रांताचे प्रार्जून यांचा समावेश होतो. याशिवाय सनकनिक, काक, खरपरिक व इतर काही आदिवासी राजांनाही समुद्रगुप्ताचे श्रेष्ठत्व व सत्ता मान्य करून मांडलिकत्व पत्करले होते. उत्तरेतील काही प्रदेश वगळता त्याने बहुतेक सर्व राजांकडून आपले वर्चस्व मान्य करवून ठराविक रक्कम खंडणीच्या स्वरूपात घेऊन त्यांना स्वातंष्य बहाल केले होते. दवाक, कामरूप, नेपाळ व कर्तपूर येथील राजांनी गुप्ताचे मांडलिकत्व स्विकारले. यामुळे उ. भारतात हिमालयापर्यंत गुप्तांनी नियंत्रण प्रस्थापित केले.

**ड) पश्चिमेकडील गणराज्यांचा पराभव :**

या काळात पश्चिम भारतात अनेक गणराज्ये अस्तित्वात असून त्यांच्यात सदैव संघर्ष होत होता. त्यामुळेच परकीय आक्रमणांनी या संधीचा फायदा घेऊन भारतीय प्रदेशावर आक्रमण केले व वायव्य सरहद्द प्रांतात त्यांनी राजकीय वर्चस्व निर्माण केले. त्यामुळे समुद्रगुप्ताने आपली चौथी लष्करी मोहिम गणराज्यांविरूद्ध आखली. त्यांचा पराभव करून गणराज्याचा प्रदेश आपल्या राज्यात समाविष्ठ करून घेतला. त्यांना अंतर्गत स्वातंत्र्य दिले.

**इ) परकीय सत्तांशी संबंध :**

वरील लष्करी मोहिमांतील समुद्रगुप्ताच्या असामान्य पराक्रमामुळे वायव्येच्या प्रदेशातील कुशाण व अवंतीचे क्षत्रप यांनी समुद्रगुप्ताचे मांडलिकत्व स्विकारले. दक्षिणेत कांचीपर्यंतचा प्रदेश जिंकताना समुद्रगुप्ताने दाखविलेल्या लष्करी कौशल्य व पराक्रमाची जाणीव झाल्याने सिलोनचा राजा व हिंदी महासागरातील काही बेटांवरील राजांनी समुद्रगुप्ताबरोबर मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. सिलोनचा राजा मेघवर्ण याने सिलोनहून भारतात येणाऱ्या तीर्थयात्रेसाठी बौद्धगयेला येणाऱ्या यात्रेकरूंसाठी एक विहार व विश्रामगृहे बांधण्याची समुद्रगुप्ताकडे परवानगी मागितली व ही परवानगी समुद्रगुप्ताकडे दिल्याची माहिती मिळते. यावरून आपल्या पराक्रमाच्या प्रभावावर परकीय सत्तांना मैत्रीचे संबंध जोडण्यासाठी जाणीव करून देण्यात समुद्रगुप्त यशस्वी झाला.

**४. समुद्रगुप्ताचा साम्राज्यविस्तार :**

इ.स. चौथ्या शतकाच्या मध्यास समुद्रगुप्ताचे साम्राज्य देशातील सर्वात सुपीक व समृद्ध लोकजीवन असलेल्या प्रदेशात विस्तारले होते. पूर्वेस ब्रम्हपूत्रेपासून पश्चिमेस यमुना व चंबळ नदीपर्यंत आणि उत्तरेस हिमालयाच्या पायथ्यापासून दक्षिणेस नर्मदा नदीपर्यंत गुप्त साम्राज्य पसरले होते. या मर्यादेच्या बाहेर आसाम व गंगेच्या मुखापर्यंत प्रदेश, हिमालयाच्या उतारावरील राज्ये, माळवा व राजपुतांना या भागातील राज्ये राजनिष्ठा दर्शविणाऱ्या तहांनी वा मैत्रीसंबंधानी समुद्रगुप्ताच्या साम्राज्याशी जोडली गेली होती. दक्षिणेतील राज्यांना आपल्या सैनिकी सामर्थ्याने नमवून त्यांना मांडलिकत्व पत्करायला समुद्रगुप्ताने भाग पाडले. थोडक्यात सहा शतकापूर्वी अस्तित्वात अशोकाच्या साम्राज्याकडुन जास्त प्रदेश समुद्रगुप्ताच्या साम्राज्यात समाविष्ठ होता. त्यामुळे परकीय सत्ताही समुद्रगुप्ताच्या नियंत्रणाखाली राहिल्या. काश्मिर, पश्चिम पंजाब, पश्चिम रजपुताना, सिंध व गुजरात वगळता पूर्ण उत्तर भारत, छत्तीसगड, ओरिसा, दक्षिणेत अपरांतपर्यंतची लांब पूर्व किनारपट्टीइतका मोठा समुद्रगुप्ताचा साम्राज्य विस्तार होता.

**५. समुद्रगुप्ताची बिरूदे :**

समुद्रगुप्ताने आपल्या कर्तृत्वाला शोभतील अशी अनेक बिरूदे आणि पदव्या आपल्या नावाशी जोडून घेतल्या होत्या. 'अप्रतिरथ' (अद्वितीयरथी), 'अप्रनिवर्यावीर्य' (अद्वितीय पराक्रमी), 'कृतांतपरशू' (मृत्यू देणारा परशूधारक), 'सर्वराज उच्छेता' (सर्व राजांना उखडून टाकणारा), 'व्याघ्रपराक्रम' (वाघाचे शौर्य असलेला), अशी काही बिरूदे त्याने आपल्या नाण्यावर कोरली आहेत. या नाण्यांच्या दुसऱ्या बाजूस 'सिंहवाहिनी' (दूर्गा किंवा पार्वती), 'विध्यंवाहिनी', 'हेमावती' (साम्राज्यविस्तार पर्वतापासून हिमावतापर्यंत) मकरवाहिनी अशीही अक्षरे कोरलेली असून ती अर्थपूर्ण आहेत.

**६. समुद्रगुप्ताची साम्राज्यव्यवस्था :**

आपल्या असामान्य पराक्रमाने साम्राज्याची निर्मिती करणारा सत्ताधिश म्हणून समुद्रगुप्त जितका प्रसिद्ध आहे तितकाच भविष्यकाळाची जाणीव ठेवून साम्राज्याची व्यवस्था करणारा द्रष्टा राजा म्हणूनही समुद्रगुप्त प्रसिद्ध आहे. मौर्य सत्तेचे पतन होण्यास त्याच्या विशाल साम्राज्याचा कारभार कारणीभूत होता याची समुद्रगुप्ताला जाणीव होती. या काळात संपूर्ण साम्राज्याचा कारभार पाटलीपूत्र या राजधानीच्या शहरातून केला जात होता. या काळात जलद दळणवळणाची कोणतीही साधने उपलब्ध नव्हती. त्यामुळेच एखादया प्रातांत उठाव किंवा बंड झाल्यास राजधानीच्या ठिकाणाहून सैन्य किंवा मदत पाठविणे अशक्य होते. याची जाणीव ठेवून समुद्रगुप्ताने विशाल साम्राज्याच्या निर्मिती इतकेच त्याने या साम्राज्याच्या व्यवस्थेकडे लक्ष दिले. त्याने मिळविलेल्या प्रदेशाबाबत ग्रहण, मोक्ष व अनुग्रह असे धोरण स्विकारले. राजधानीच्या आसपास असलेल्या राजांना त्याने पराभूत केले. ही राज्ये नष्ट केली व तो प्रदेश आपल्या साम्राज्यात समाविष्ठ करून प्रत्यक्ष शासनयंत्रणेच्या खाली आणला. आपल्या राजधानीच्या आसपासच्या प्रदेश निष्कलंक करणे, हे त्याचे यामागील धोरण होते. त्याच्या पलीकडे असलेल्या राजांना समुद्रगुप्ताने पराभूत केले पण नष्ट केले नाही. किंवा त्यांचा

प्रदेश कायमस्वरूपी आपल्या नियंत्रणाखाली आणण्याचाही आग्रह त्याने धरला नाही. काही राजांना आपल्या अंतर्गत कारभाराच्या बाबतीत स्वातंत्र्य दिले. व त्यांना मांडलिकत्व स्वीकारण्यास भाग पाडले तर काही राजांबरोबर केवळ मित्रत्वाचे संबंध स्थापन केले. समुद्रगुप्ताने साम्राज्याच्या व्यवस्थेच्या दृष्टीने घेतलेल्या या विशेष काळजीमुळेच गुप्तांचे साम्राज्य दीर्घकाळ टिकणे शक्य झाले असे म्हटले जाते. साम्राज्य निर्मितीबरोबरच साम्राज्याची व्यवस्था करण्याचे समुद्रगुप्ताचे हे कार्य महत्वपूर्ण व अनन्यसाधारण मानले जाते.

समुद्रगुप्ताने आपल्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली असलेल्या प्रदेशाचा राज्यकारभार करण्यासाठी विविध प्रशासकीय अधिकाऱ्याची नेमणूक केली. त्या प्रदेशात शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याचे, कर वसूलीचे व काही प्रमाणात न्यायदानाचे काम सोपविले. या अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवणारी यंत्रणाही निर्माण करण्यात आली. ही प्रशासन यंत्रणाच या साम्राज्याचे दीर्घकाळ अस्तित्व टिकविण्यास उपयुक्त ठरली असे दिसते.

**समुद्रगुप्ताचे सांस्कृतिक कार्य :** समुद्रगुप्त हा वैदिक धर्मानुयायी होता. लष्करी मोहिमामध्ये विजय मिळाल्यानंतर त्याने अश्वमेध यज्ञ केल्याची माहिती मिळते. अनेक वर्षापासून प्रचलित नसलेल्या यज्ञ परंपरेला त्याने प्रतिष्ठा मिळवून दिली. वैदिक धर्माला प्रतिष्ठा मिळवून दिली. समुद्रगुप्त युवराज असतानाच विविध विषय, कला, काव्य इत्यादी विषयात प्राविण्य मिळविण्याचा प्रयत्न केलेला होता. तो प्रतिभावान कवी व संगिततज्ञ होता. त्याने रचलेली काव्ये उपलब्ध नसली तरी अलाहाबादच्या आलेखात त्याला 'कवींचा राजा' म्हटले आहे. एका नाण्यावर वीणावादनात तल्लीन झालेल्या समुद्रगुप्ताची प्रतिमा कोरलेली आहे. यावरून त्याच्या संगिताच्या आवडीची कल्पना येते. विविध विषयाच्या विद्वानांना व कलाकारांना त्याने राजाश्रय दिलेला होता. म्हणूनच या काळात साहित्याच्या क्षेत्रात प्रगती झाली. बौद्ध पंडित वसुबंधू व प्रयागप्रशस्ती लिहीणारा हरिसेन यासारख्या विद्वानांना त्याने राजाश्रय दिलेला होता. साम्राज्य निर्मितीबरोबरच राजकीय जीवनात शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे समाजाचा आर्थिक विकास घडवून आणणे. धार्मिक जीवनातील सहिष्णुततेचा धोरणाचा स्विकार व विद्वान व कलाकारांना दिलेला राजाश्रय यामुळे त्याकाळात समाजाचा सांस्कृतिक विकास झाला.

**७. समुद्रगुप्ताच्या कार्याचे मुल्यमापन :**

भारताच्या संपूर्ण इतिहासात समुद्रगुप्ताचे कार्य अत्यंत महत्वाचे आहे. त्याने प्रचंड साम्राज्य मिळविले आणि ते सुस्थितीत ठेवले. समुद्रगुप्त हा राजकारणी, मुत्सद्धी, उत्तम प्रशासक आणि सुबुद्ध राज्यकर्ता होता. जवळजवळ सर्वच यूद्धे त्याने जिंकली पण पराभव झाला नाही. किंवा त्याच्या साम्राज्यावर आक्रमण करण्यास कोणी धजावला नाही. विशाल साम्राज्य एकसंघ ठेवण्यासाठी त्याने काही राजांशी मैत्री केली. काहीशी तह केले. काहींना मांडलिकत्व करून त्यांच्याकडुन भरघोस खंडणी वसूल केली. त्याची सैन्यरचना कुशल होती. प्रसिद्ध इतिहासकार डॉ. व्ही.ए. स्मीथ समुद्रगुप्तास 'भारतीय नेपोलियन' असे म्हणतात.

थोडक्यात आपल्या सत्तेच्या विशाल व एकसंध साम्राज्याच्या स्थापनेबरोबरच विविध योजनाद्वारे समाजाचा सर्वांगिण विकास घडवून आणण्याचे कार्य केले. समाजाचा या सांस्कृतिक प्रगतीमुळेच समुद्रगुप्ताच्या कारकिर्दीतच सुवर्णयुगाच्या निर्मितीला प्रारंभ झाला. प्राचीन भारतातील व गुप्त घराण्यातील एक सर्वश्रेष्ठ, पराक्रमी, कर्तृत्ववान, विद्धान व व्यासंगी सत्ताधिश म्हणून समुद्रगुप्त ओळखला जातो.

### ३) दुसरा चंद्रगुप्त:-(इ.स. ३८० ते इ.स. ४१५) :

समुद्रगुप्तानंतर त्याच्या अनेक मुलांपैकी जेष्ठ पुत्र रामगुप्त हा सत्तेवर आला. त्याच्या कारकिर्दीतील शकांच्या आक्रमणशिवाय इतर कोणत्याही घटनेची किंवा त्याच्या कार्याची माहिती मिळत नाही. बाणभट्टाचे हर्षचरित्र, राजशेखरचा काव्यमिमांसा या ग्रंथात राष्ट्रकूट राजा अमोघवर्ष याच्या ताम्रपटात समुद्रगुप्तानंतर गुप्तांच्या सत्तेवर आलेल्या रामगुप्त नावाच्या राजाचा उल्लेख मिळतो. भेलसाजवळ व पुरण येथे रामगुप्ताची काही नाणी मिळाली आहेत. तत्कालीन मिळणारी नाणी व ग्रंथात त्याचा उल्लेख आहे. विशाखादत्तने लिहिलेल्या 'देवीचंद्रगुप्तम' नावाच्या एका नाटकात पुढील माहिती आढळते. समुद्रगुप्तानंतर सत्तेवर आलेल्या रामगुप्ताच्या काळात शकांनी या साम्राज्यावर आक्रमण केले व अहिपूर येथे रामगुप्ताला वेढा घातला. या वेढ्यामुळे असहाय्य बनलेल्या रामगुप्ताने लोकांचे प्राण वाचविण्यासाठी शकांना काही प्रदेश देण्याची व ध्रुवदेवी ही आपली पत्नी शक राजाकडे पाठविण्याची अट मान्य केली. यावेळी त्याचा बंधू दुसरा चंद्रगुप्त सैन्यात त्याच्याबरोबर होता. त्याला त्या अपमानकारक अटी मान्य होणे शक्य नव्हते. त्याने स्त्रीवेश धारण करून आपल्या सैन्यासह शकांच्या छावणीत प्रवेश केला. व कामांध बनलेल्या शक राजाला ठार करून आपल्या प्रदेशाचे व घराण्याच्या प्रतिष्ठेचे रक्षण केले. शेवटी रामगुप्तचा खून करून त्याच्या ध्रुवदेवी या पत्नीशी विवाह केला.

दुसरा चंद्रगुप्त हा गुप्त घराण्यातील एक सामर्थ्यशाली, धाडशी आणि उत्तम प्रशासक राजा होता. समुद्रगुप्ताच्या काळातील सुवर्णयुगाची परंपरा चंद्रगुप्ताने कायम ठेवली. उलट अधिकच वैभवशाली परंपरा निर्माण केली. लहानपणापासूनच पराक्रमी व धाडसी असलेल्या चंद्रगुप्ताने शकांविरूद्धच्या युद्धात आपल्या पराक्रमाची व मुत्सद्धीगीरीची प्रजेला जाणीव करून दिली. रामगुप्ताच्या काळात अकार्यक्षम बनलेल्या केंद्रीय सत्तेचा फायदा घेऊन पाटलीपुत्राच्या आसपासच्या काही राजांनी बंड व उठाव करण्यास सुरूवात केली होती. माळवा, गुजरात व वायव्येकडच्या प्रदेशातील काही सत्ताधिशांनी आपली स्वतंत्र राज्ये निर्माण करण्याचे प्रयत्न चालविले होते. या बंडखोर राजांवर आक्रमण करून त्यांना आपल्या नियंत्रणाखाली आणणे हे दुसऱ्या चंद्रगुप्ताचे पहिले कर्तव्य ठरले.

महाराणी दत्तदेवीचा हा पूत्र विक्रमादित्य, नरेंद्रचंद्र, सिंहचंद्र, नरेंद्रसिंह, सिंहविक्रम या नावांनीही ओळखला जात होता. शिवाय त्याचा देवगुप्त, देवराज, देवश्री असाही उल्लेख करण्यात आला आहे. दुसऱ्या चंद्रगुप्ताने आपले साम्राज्य पूर्व सीमेपर्यंत व्यवस्थित राखले. गुप्तकाळातील १८२१ सूवर्ण नाण्यापैकी दुसऱ्या चंद्रगुप्ताची सुमारे ९८३ नाणी आहेत. यावरून दुसऱ्या चंद्रगुप्ताचा गुप्त साम्राज्यावर खूपच प्रभाव होता असे दिसते. वाकाटकाशी सहकार्याचे संबंध ठेवण्याच्या दृष्टीने आपली कन्या प्रभावतीगुप्ता हिचा विवाह वाकाटक राजा पहिला पृथ्वीसेन (इ.स. ३६० ते ३८५) याचा वारस युवराज दुसरा रूद्रसेन याच्याशी करून दिला त्यामुळे पश्चिम भागातील शकांचा प्रदेश ताब्यात आणणे शक्य झाले.

#### १. दुसऱ्या चंद्रगुप्ताचे कार्य :

सत्तेवर येताच दुसऱ्या चंद्रगुप्ताने बंड किंवा उठाव करणाऱ्या राजांविरूद्ध प्रथम मोहिमा सुरू केल्या. या राजांना पराभूत करून आपल्या नियंत्रणाखाली आणले. या राजांनी किंवा मांडलिकांनी पुन्हा अशा प्रकारचे

प्रयत्न करू नयेत यासाठी त्याने आपल्या प्रशासनयंत्रणेचा विस्तार केला. राजधानीच्या आसपासच्या प्रदेशात शांतता व स्थैर्य निर्माण केल्यानंतर साम्राज्यविस्ताराचे प्रयत्न त्याने सुरू केले.

**अ) शकांविरूद्ध आक्रमण :**

या काळात माळवा, गुजरात, व काठेवाडच्या प्रदेशात शक घराण्यातील तिसरा रूद्रसिंह याची सत्ता होती. रामगुप्ताच्या काळात अकार्यक्षम बनलेल्या केंद्रिय सत्तेचा फायदा घेऊन शकांनी गुप्तांच्या सत्तेवर आक्रमण करण्याचा प्रयत्न केलेला होता. त्यामुळे सत्तेवर येताच दुसऱ्या चंद्रगुप्ताने प्रथम शकांविरूद्ध मोहिम आखली. शक व गुप्त राजांतील हे युद्ध दीर्घकाळ चालले. अखेर या युद्धात शकांचा पराभव झाला. पराभूत झालेल्या शकांचे राज्य आपल्या साम्राज्यास जोडले. दुसरा चंद्रगुप्त हा 'शकारी' या नावानेही ओळखला जातो. या युद्धाची माहिती गुप्तांच्या अमात्य वीरसेन व मांडलिक सनकानिक महाराज यांच्या उदयगिरी येथील आलेखात व सेनापती आमर कार्दव यांच्या सांची येथील आलेखात मिळते. सुमारे तीनशे वर्षे परकीय सत्तधिशांच्या ताब्यात असलेला प्रदेश परत मिळवून गुप्त साम्राज्यात समाविष्ठ करण्याचे श्रेय दुसऱ्या चंद्रगुप्ताला दिले जाते. गुप्त साम्राज्याला लागून असलेली लहानलहान गणराज्येही गुप्त साम्राज्यात समाविष्ठ केली या विजयामुळे दुसरा चंद्रगुप्त 'गणारी' म्हणून ओळखला जातो. यामुळे पूर्व किनाऱ्यापासून पश्चिम किनाऱ्यापर्यंत प्रदेश गुप्त राजांच्या ताब्यात आला याबरोबरच कल्याण, भडोच, सोपारा ही बंदरेही गुप्तांच्या ताब्यात आल्याने भारतीय व्यापाऱ्यांना पूर्वेकडील व पश्चिमेकडील देशांशी व्यापार करण्याची संधी मिळाली. त्यामुळेच परराष्ट्रीय व्यापाराला चालना मिळून भारतात या व्यापाराच्या बदल्यात मोठया प्रमाणावर सोने येण्यास सुरूवात झाली. मोठया प्रमाणावर वाढलेल्या या व्यापारामुळेच उत्तर भारतातील उजैयिनी, तक्षशीला यासारख्या व्यापारी केंद्रांचा विकास झाला.

**क) पूर्व व दक्षिणेकडील साम्राज्यविस्तार :**

रामगूप्ताच्या काळात पुर्वेकडील राजांनी स्वातंष्य प्रस्थापित करण्याचे प्रयत्न सुरू केले. तेव्हा दुसऱ्या चंद्रगुप्ताने आपल्या सुसज्ज सैन्यासह या राजांवर आक्रमण केले व त्यांचा पराभव करुन तो प्रदेश आपल्या साम्राज्यात जोडला. दक्षिणेकडील राज्यांवरही आपल्या पराक्रमाने व मुत्सद्धेगीरीने राजकीय वर्चस्वाची पुनर्स्थापना केली.

**इ) कुशाणांचा पराभव**

साम्राज्यात व साम्राज्याच्या सरहद्धीच्या प्रदेशात शांतता प्रस्थापित केल्यानंतर वायव्य सरहद्ध प्रातांत सुमारे २५० ते ३०० वर्षे राज्य करणाऱ्या कुशाणविरूद्ध दुसऱ्या चंद्रगुप्ताने मोहिम आखली. मेहरौली येथील आलेखात दिलेल्या माहितीवरून दुसऱ्या चंद्रगुप्ताने या मोहिमेच्या काळात सिंध व सहा नदयांचा प्रदेश ओलांडून बाल्हिकांना पराभूत केले. हिंदुकूश पर्वत ओलांडून बाल्ख येथील राजाला पराभूत केले. पंजाब व सिंध प्रदेशावर गुप्तांचे वर्चस्व प्रस्थापित झाले.

**फ) नाग व वाकाटकांशी संबंध :**

दुसऱ्या चंद्रगुप्ताने स्वतंत्रपणे राज्य करणाऱ्या राजाविरूद्ध प्रत्यक्ष युद्ध न करता वैवाहिक संबंध प्रस्थापित करून मुत्सद्धेगीरीने त्यांना जिंकण्याचे धोरण स्वीकारले. मध्य भारतात यावेळी नाग घराण्याची प्रबळ सत्ता होती. कुबेरनागा या कन्येशी दुसऱ्या चंद्रगुप्ताने विवाह करून मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित केले. यातून त्यांना प्रभावती ही मुलगी झाली. तिचा विवाह वाकाटक राजा दुसरा रूद्रसेन याच्याशी केला. पुढील काळात दुसरा रूद्रसेन यांच्या मृत्युनंतर आपल्या लहान मुलाच्या नावाने प्रभावती गुप्ताने राज्यकारभार केला. या काळात दुसऱ्या चंद्रगुप्ताचे अमात्य, अधिकारी व काही विद्वान वाकाटकाच्या दरबारी आला होता असे मानले जाते. त्यामुळेच या काळात गुप्तांचे वर्चस्व निर्माण झाले होते असे दिसते. युद्धाऐवजी वैवाहिक संबंधाद्वारे शत्रू राष्ट्राशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचे मुत्सद्धेगीरीचे धोरण दुसऱ्या चंद्रगुप्ताने स्विकारले. त्यामूळेच या काळात भारतात गुप्तांच्या सत्तेला विरोध करणारा कोणताही सत्तधीश राहिला नाही. हे दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या कार्याचे वैशिष्टय होय.

**ग) सांस्कृतिक कार्य :**

दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या मोहिमा व त्यात मिळालेले विजय राजकीय दृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या महत्वाच्या होत्या. यामुळे भारतीय एकसंघता व एकात्मकता निर्माण होण्यास गुप्ताचे साम्राज्य अत्यंत उपयोगी पडते. भारतीय संस्कृती परदेशातही रूजवण्यास उपयुक्त ठरली. दुसऱ्या चंद्रगुप्ताला विविध विषयाची आवड होती. त्यामुळेच त्याने निरनिराळ्या विषयातील विद्वानांना आपल्या दरबारी राजाश्रय दिला होता. धन्वंतरी, क्षपणक, अमरसिंह, शंकू, वेताळभट्ट, धरकपूर, कालिदास, वराहमिहीर या त्याच्या दरबारातील विद्वानांना 'नवरत्न दरबार' म्हणून ओळखले जात होते. या विद्वानांना दिलेल्या राजाश्रयामुळेच या काळात अभिजात संस्कृत साहित्याची निर्मिती झाली असे दिसून येते. बौद्ध व जैन विद्वानांनी या काळात विविध कलाकरांनाही दुसऱ्या चंद्रगुप्ताने राजाश्रय दिला होता. त्यामुळे वास्तुकला, मुर्तिकला, शिल्पकला इत्यादीच्या प्रगतीलाही गती मिळाली. समाजाचा सर्वांगिन विकास होऊन व्यापार व उदयोगधंद्याना चालना मिळाली. साहित्य व कला या क्षेत्रात बरीच प्रगती घडून आली. म्हणून हा कालखंड अभिजात युग किंवा सुवर्णयुग किंवा वैभवाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. विस्तारित साम्राज्य व समाजाच्या सर्वांगिन प्रगतीच्या सुवर्णयुगाच्या निर्मितीचे श्रेय दुसऱ्या चंद्रगुप्ताला दिले जाते.

**४) कुमारगुप्त महेंद्रादित्य (इ.स.४१५ ते इ.स.४५५) :**

दुसऱ्या चंद्रगुप्तानंतर त्याचा पूत्र कुमारगुप्त गादीवर आला. त्याच्या राज्यारोहणासाठी त्याचा कनिष्ठ बंधू गोविंदपूत्र विरोध करू लागला. पण त्याला माळव्याकडे पाठवून आपल्या मार्गातील अडचण दूर केली. कुमारगुप्ताने ४० वर्षाहून अधिक काळ समर्थपणे राज्यकारभार केला. त्याच्या कारकिर्दीसंबंधीचे १३ शिलालेख उपलब्ध झाले आहेत. त्याने आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्याचा प्रयत्न केल्याची माहिती त्याच्या सुमारे १३९५ चांदीच्या नाण्यातून मिळू शकते. ही नाणी सातारा जिल्हयात व आणखी १३ नाणी वऱ्हाडातील एलिचपूर येथे सापडली आहेत. यावरून दक्षिणेत त्याचा प्रभाव होता असे दिसते. आपले वडिलोपार्जित

साम्राज्य व्यवस्थितपणे सांभाळले होते. त्याने साम्राज्यविस्तारासाठी केलेल्या लढयातील विजयाप्रित्यर्थ अश्वमेध यज्ञही केला होता.

कुमारगुप्ताने दक्षिणेवर स्वारी केल्यामुळे त्या प्रदेशाचा राजा पुष्यमित्र शुंग याच्याशी त्याचे संबंध बिघडले. पण त्यावेळी हूणांनी उत्तरेत आक्रमण केल्यामुळे त्यास आपली दक्षिण मोहिम आवरती घ्यावी लागली, हे आक्रमण परतावून लावले. दरम्यान वृद्धत्वामुळे कुमारगुप्तांचे निधन झाले.

कुमारगुप्त हा उत्तम प्रशासक होता. आपल्या प्रजेला त्याने संतुष्ट ठेवण्याचा प्रयत्न केला. शेजारच्या राजांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. प्रधानमंत्री, सेनापती, इतर मैत्री व अधिकारी त्याच्या प्रशासनात होते. त्यांचा सल्ला घेतला जात होता. 'उपरिक महाराज' हे प्रांतप्रमुखाचे पद राजपरिवारातील किंवा निकटच्या मित्राकडे सोपविले. साम्राज्य अनेक प्रांतांत व प्रांत अनेक जिल्हयात प्रशासन सोईसाठी सोपविण्यात आले. प्रशासनातील सर्वात लहान घटक म्हणून 'ग्राम' होते. बंगाल, माळवा व सौराष्ट्र हे साम्राज्यातील महत्वाचे प्रांत होते.कुमारगुप्ताचे धार्मिक धोरण सहिष्णू होते. व्यापार वाढला. जलमार्ग व खुष्कीच्या मार्गाने व्यापार चालू होता.

**५) स्कंदगुप्त विक्रमादित्य (इ.स.४५५ ते इ.स.४६७) :**

हुणांचे आक्रमण परतवून लावत असतानाच कुमारगुप्ताचा मृत्यू झाला. या संधीचा फायदा घेऊन कुमारगुप्ताच्या जेष्ठपुत्राने पुरूगुप्ताने गादी बळकावली. पुरूगुप्त हा जेष्ठ पूत्र असल्याने गादीचा कायदेशीर वारस होता पण स्कंदगुप्ताला हे आवडले नाही. म्हणून त्याच्याशी यूद्ध करून पराभूत केले व सत्ता आपल्याकडे घेतली. हुणांवरील विजयामुळे स्कंदगुप्ताची प्रतिष्ठा वाढली होती व सैनिकांचाही त्यास पाठिंबा होता.
स्कंदगुप्ताने एकूण बारा वर्षे राज्य केले. पण त्यास त्या काळात अनेक आपत्तींना तोंड दयावे लागले. अंतर्गत संघर्षातही त्याची शक्ती खर्च झाली. हूणांशी संघर्ष करण्यात त्याची जास्त शक्ती खर्च झाली. हूणांनी भारतावर आक्रमण करून कंबोजवर ताबा मिळविला त्यांनंतर गुप्त साम्राज्याच्या गांधार देशावर आक्रमण केले. हूणांचे हे आक्रमण स्कंदगुप्ताने यशस्वीपणे परतावून लावले.

● **स्कंदगुप्ताचे कार्य :**

**१. हूणांचा पराभव :**

स्कंदगुप्ताच्या कारकिर्दीतील अतिशय महत्वपूर्ण घटना म्हणजे हूणांचे आक्रमण होय. युरोप व आशिया खंडातील सत्ताधीश व प्रजेला हूणांनी त्रस्त केले होते. राक्षसी महत्वाकांक्षा व पाशवी अत्याचाराबद्दल हूण प्रसिद्ध होते. गुप्ताच्या राज्यावर त्यांनी हल्ला केला. तेव्हा स्कंदगुप्ताने त्यांना पराभूत करून भारताबाहेर हाकलले. गुप्तांच्या इतिहासातील ही एक महत्वपूर्ण घटना ठरली. आशिया व युरोपमध्ये स्कंदगुप्ताचे श्रेष्ठ कर्तृत्व सिद्ध झाले. या विजयाचे वर्णन करताना आलेखात म्हटले आहे की कंसाला ठार करून दृष्टा देवकीकडे कसा गेला तसाच स्कंदगुप्त हुणांचा पराभव करून साश्रूनयनांनी वाट पाहणाऱ्या आपल्या मातेकडे गेला. स्कंदगुप्ताच्या कारकिर्दितील या महत्वपूर्ण विजयानंतर त्याने 'विक्रमादित्य' ही पदवी धारण केली. स्कंदगुप्ताची ही पदवी त्याच्या कर्तृत्वाची निदर्शक व यथार्थ होती.

**२. प्रशासन व्यवस्था :**

गुप्ताच्या विशाल साम्राज्याच्या रक्षणासाठी स्कंदगुप्तने प्रशासनयंत्रणाही कार्यक्षम असावी याकडे लक्ष दिले. भविष्यकाळाची जाणीव ठेवणाऱ्या राज्यकर्त्याप्रमाणे त्याने साम्राज्याच्या संरक्षणासाठी विशेष व्यवस्था केली. पश्चिम व वायव्येकडील सर्व प्रातांत त्याने गोप्त नावाच्या विशेष अधिकाऱ्याची नियूक्ती करून प्रदेश संरक्षणाची जबाबदारी त्याच्यावर सोपविली. वायव्येकडून भविष्यकाळात होणाऱ्या संभाव्य आक्रमणाची जाणीव ठेवून विशेष काळजी घेणारा हा शेवटचाच सत्ताधीश होय.

**३. स्कंदगुप्ताची लोकोपयोगी कामे :**

स्कंदगुप्ताने हूणाविरूद्ध केलेल्या आक्रमणाचा साम्राज्याच्या आर्थिक स्थितीवर परिणाम झाला. पण या अवस्थेतही त्याने लोकोपयोगी कार्याकडे लक्ष दिले. गिरनार येथील शिलालेखात त्याच्या लोकोपयोगी कार्याची माहिती दिली आहे. सुदर्शन नावाचा तलाव चंद्रगुप्त मौर्याच्या पुष्यगुप्त नावाच्या प्रांतिक अधिकाऱ्याने बांधला होता. अशोकचा राज्यपाल 'तुशास्प' याने या तलावातून कालवे काढले. उजैनिया महासत्रप रूद्रदामन याने इ.स.१५० च्या सुमारास या तलावाची दुरूस्ती केली. स्कंदगुप्तांच्या काळात या तलावाचा अतिवृष्टीमुळे बांध फुटला. त्यामुळे आसपासचा प्रदेश वाहून जाण्याची भिती निर्माण झाली. तेव्हा स्कंदगुप्ताने तत्परतेने याची दुरूस्ती केली व लोकांच्या जीवनाचे व प्रदेशाचे रक्षण केले.

**४. स्कंदगुप्ताच्या कार्याचे मूल्यमापन :**

गुप्त घराण्यातील शेवटचा कर्तृत्ववान व प्रजाहितदक्ष व कार्यक्षम राजा स्कंदगुप्त याचा मृत्यू इ.स.४३७ मध्येझाला. प्रकृती अस्वास्थामूळे दिवंगत झाला. धर्मसहिष्णु, प्रजाहितदक्ष, कार्यक्षम, पराक्रमी अशा गुप्तघराण्यातील शेवटचा राजा स्कंदगुप्त होता. पण त्याच्या कारकिर्दीनंतर गुप्त घराण्याचा हळूहळू प्रभाव कमी होत गेला. भानूगुप्तानंतर गुप्त सत्ता लयास गेली व साम्राज्याचे पूर्णत: विघटन झाले. गुप्त घराणे नष्ट झाल्यावर बहुतेक सर्व राज्ये स्वतंत्र झाली आणि त्यावर वेगवेगळी राजघराणी सार्वभौमत्वाचा अधिकार सांगत स्वतंत्रपणे राज्यकारभार करू लागली.इ.स.५४४ मध्ये गुप्त साम्राज्य संपुष्टात आले.

**● वाकाटक (इ.स.२५० ते इ.स.५५०)**

दक्षिण भारताच्या इतिहासात सातवाहनानंतर दुसरी प्रभावशाली सत्ता म्हणजे वाकाटकांची सत्ता होय. दक्षिण भारतात आपली स्वतंत्र सत्ता स्थापन करून उत्तर भारततही या सत्तेचा प्रभाव निर्माण करण्याचे काम सातवाहनानी केले. पण इ.स. २५० च्या सुमारास सातवाहन घराणे नष्ट झाले. त्यानंतर आभीर, शक, इक्ष्वाकू इत्यादी राजांनी आपली सत्ता निर्माण केली. सातवाहनानंतर आलेल्या वेगवेगळया घराण्याचे उल्लेख पुराणात आढळतात पण वाकाटकांचा उल्लेख आढळत नाही. गुप्तांच्या समकालीन असलेल्या व विदर्भाच्या प्रदेशावर सुमारे तीनशे वर्षे राज्य करणाऱ्या प्रबळ अशा वाकाटक सत्तेविषयी इ.स. १८३६ पर्यंत काहीही माहिती मिळत नव्हती. सन १८३६ मध्ये शिवनी येथे द्वितीय प्रवरसेन याचा एक ताम्रपट मिळाला व त्याआधारे या घराण्याच्या इतिहासावर प्रकाश टाकणे शक्य झाले. वाकाटक घराण्याची व त्याकाळातील समाजजीवनाची माहिती मोठया

प्रमाणावर प्रकाशात आणण्याचे श्रेय महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी यांना दिले जाते.

**● वाकाटक घराण्याच्या इतिहासाची साधने :**

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात उपलब्ध झालेल्या विविध साधनांवरून वाकाटकाची माहिती मिळविता येते. अजंठयाच्या लेण्यातील काही शिलालेखावरून वाकाटक राजाची नावे मिळतात. पुराणग्रंथातूनही काही प्रमाणात माहिती मिळते. दुसरा विंध्यशक्ती या वाकाटक राजाचा वाशिम ताम्रपट व प्रभावती गुप्ता हिचा पूणे येथील ताम्रपट वाकाटक घराण्यावर प्रकाश टाकण्यास उपयुक्त ठरला. याशिवाय अमरावती व इतरत्र मिळालेले शिलालेख उत्खननात मिळालेले स्थापत्य व शिल्पकलेचे अवशेष साधन म्हणून उपयुक्त ठरतात. नागपूरजवळ रामटेक व पवनार येथे महत्वपूर्ण मूर्तीचे अवशेष मिळाले आहेत. नांदेड जिल्हयातील पेणगंगेच्या काठावर शिदुरची लेणी वाकाटक कालीनच आहेत. अजंठयाच्या काही शैलस्थापत्याची निर्मिती वाकाटक काळातच झाली. या विविध साधनावरून वाकाटकांचे सत्ताधिश त्यांच्या कारकिर्दीतील महत्वाच्या घटना व त्या काळातील समाज जीवन यावर प्रकाश टाकणे शक्य होते.

महामहोपाध्याय डॉ. वा.वि. मिराशी यांनी विदर्भ व मराठवाडा परिसरात वाकाटकाचे अस्तित्व दाखवणारे अनेक अवशेष शोधून काढले व डॉ. जयस्वाल यांचे मते खोडून काढले. दक्षिण भारतात स्वतंत्र सत्तेची प्रस्थापना करणाऱ्या वाकाटकाचे मूळ स्थान विदर्भातील रामटेकजवळ असलेले 'नंदीवर्धन' हेच असल्याचे त्यांनी सिद्ध केले. वाशिम येथे उपलब्ध झालेल्या ताम्रपटावरून वाकाटकांच्या 'वत्सगुल्म' शाखेचा इतिहासही प्रकाशात आला. महाराष्ट्रातील अकोला जिल्हयातील वाशिम ही वाकाटकांच्या वत्सगुल्म शाखेची राजधानी होती हेही सर्वमान्य झाले आहे. तरीही वाकाटकांच्या सर्वांगिन इतिहासावर प्रकाश टाकण्यासाठी अजूनही साधनाची अपूर्णता आहे.

**१. पहिला विंध्यशक्ती (इ.स. २५० ते इ.स. २७०) :**

गुप्ताच्या समकालीन असलेल्या वाकाटक घराण्याचा संस्थापक पहिला विंध्यशक्ती होय. इ.स. २५० च्या सुमारास त्याने या स्वतंत्र सत्तेची स्थापना केली. अजंठा येथील शिलालेखावरून विंध्यशक्ती हा ब्राम्हण विष्णूगुप्त शाखेचा होता असे समजते. मिराशींच्या मते हे घराणे दक्षिणेकडे वेल्लूरजवळ राहणारे असावे व विदर्भाचा बराच मोठा प्रदेश त्यांनी जिंकलेला असावा. हरितीपूत्र विंध्यशक्ती असा या संस्थापकाचा उल्लेख आढळतो. काही शिलालेखात विंध्यशक्ती वंशकेतू म्हणून त्याचा उल्लेख आहे. पुराणग्रंथात व अजंठ्याच्या शिलालेखत त्याचे नाव प्रथम आढळते. वंशकेतू म्हणजे पहिला नृपती होय. त्याच्या दोन राजधानीचे उल्लेख मिळतात. एक राजधानी 'पुरिया' या नगरीत तर 'चनका' ही दूसरी राजधानी होय. पण अद्यापही या दोन शहरांची निश्चित माहिती मिळालेली नाही. विंध्यशक्तीने विविध लढायाद्वारे आपल्या सत्तेचा विस्तार केला. आलेखात तो औदार्य व शौर्यात अतुलनीय असून इंद्रासारख्या श्रेष्ठ व विष्णूसारख्या प्रबळ होता असे वर्णन आढळते. विदर्भाच्या प्रदेशात वाकाटकाची स्वतंत्र सत्ता प्रस्थापित करण्याचे कार्य याने केले असे मानतात.

### २. प्रवरसेन पहिला.(इ.स. २७० ते इ.स. ३३०) :

हा वाकाटक वंशातील सर्वात प्रबळ राजा होता असे मानले जाते. त्याने उत्तरेत पूरिक नगरी जिंकून येथे आपली राजधानी केली. पुराणात याने ६० वर्षे राज्य केल्याची माहिती दिली आहे. सत्तेवर येतात आपल्या पराक्रम व सैन्यसामर्थ्याद्वारे त्याने साम्राज्यविस्ताराला सुरूवात केली. उत्तरेस नर्मदा नदीपर्यंत स्वाऱ्या करून त्याने पुरिका शहर आपल्या ताब्यात घेतले व तेथेच आपली राजधानी निश्चित केली. दक्षिणेत उत्तर कुंतलातील कोल्हापूर, सातारा, सोलापूर, पूर्वेस दक्षिण कोसल, कलिंग, आंध्र हे भाग आपल्या वर्चस्वाखाली आणले.

प्रवरसेन हा वैदिक धर्माचा अनुयायी होता. एकूण सात यज्ञ केल्याची माहिती मिळते. अग्निहोम, उवथ, षोडशी, वाजपेय, अतिराज व आष्टोर्याम हे सात यज्ञ होत. घटोत्कच लेण्यातील शिलालेखात त्याने केलेल्या अश्वमेध यज्ञाचा स्पष्ट उल्लेख आहे. या अश्वमेध यज्ञामुळे अनेक सत्ताधिशांनी त्याचे मांडलिकत्व स्विकारले असावे वाजपेय यज्ञाच्या शेवटी त्याने मोठया प्रमाणावर दानधर्म करून 'सम्राट' ही पदवी धारण केली. त्याने स्वत:ला 'धर्ममहाराज' असेही म्हटले होते. पूरिका राजधानिच्या परिसरात असलेल्या नागराजांना त्याने पराभूत केले व या राजधानीच्या शहरातून साम्राज्याच्या कारभार करण्यास त्याने राजधानीच्या शहरातून साम्राज्याचा कारभार करण्यास त्याने सुरूवात केली. तत्कालीन भारतातील धाराशिव सत्तेशी त्याने वैवाहिक संबंध जोडले. आपला यूवराज गौतमीपूत्र याचा विवाह त्याने धाराशिव राजा भवनाग याच्या राजकन्येशी केला. या वैवाहिक संबंधामुळे वाकाटक सत्तेला राजनैतिक प्रतिष्ठा प्राप्त झाली. प्रवरसेनाच्या दरबारी देव नावाचा अत्यंत विद्वान व कर्तबगार मंत्री होता. घटोत्कच येथील लेण्यामध्ये त्याचा उल्लेख आढळतो.

**● वाकाटक सत्तेचे विभाजन :**

पहिल्या प्रवरसेनानंतर वाकाटक सत्तेच्या विघटनाला सुरूवात झाली. त्याला चार पूत्र असल्याची माहिती मिळते. गौतमीपूत्राचा विवाह धाराशिवच्या कन्येशी झाल्याची माहिती मिळते. पण त्यांची नाणी मिळत नाही किंवा त्याच्या राज्याभिषेकाचीही माहिती मिळत नाही. यावरून अल्पवयातच त्याचे निधन झाले असावे. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा रूद्रसेन पहिला हा सत्तेवर आला. त्याने उत्तर विदर्भाचा प्रदेशावर प्ररिका किंवा नंदिवर्धन येथून राज्य केले. प्रवरसेनाचा दुसरा मुलगा सर्वसेन याने दक्षिण विदर्भच्या प्रदेशावर वत्सगुल्म(वाशिम जि. अकोला) येथून राज्य केले. ही माहिती अजिंठ्याच्या शिलालेखात मिळते.

**अ) नंदीवर्धनशाखा :**

### ३. पहिला रूद्रसेन (इ.स. ३३० ते इ.स. ३५०)

पहिल्या प्रवरसेनच्या मृत्यूनंतर वाकाटक सत्तेचे विभाजन झाले. उत्तर विदर्भाच्या प्रदेशावर गौतमीपूत्राचा मुलगा पहिला रूद्रसेन याने आपले वर्चस्व स्थापन केले. इ.स.३३० मध्ये तो सत्तेवर आला हीच वाकाटकाची किंवा नंदीवर्धन शाखा म्हणून ओळखली जाते. हा गुप्त राजा समुद्रगुप्ताच्या समकालीन होता. अलाहाबादच्या आलेखात याचा उल्लेख आहे. रूद्रसेन नावाच्या राजाने समुद्रगुप्ताच्या आठ राजांचा एक संघ केला होता अशी

माहिती मिळते. समुद्रगुप्ताने या राज्यसंघाचा पराभव केला त्यामुळे वाकाटकांचा मध्य भारतातील प्रभाव झाला असावा 'भारशिव महाराज भवनाग दौहित्र' असा पहिल्या रूद्रसेनचा उल्लेख त्याच्या वंशजाच्या आलेखात आढळतो. यावरून भारशिव महाराजाचे त्याला सहाय्य झाले असावे. समुद्रगुप्तच्या दक्षिण भारतातील मोहिमेच्यावेळी महाकांतारचा व्याघ्रराज, कूळचा भंटराज व पिष्ठपूरचा महेंद्रगिरी या राजांनी रूद्रसेनचे वर्चस्व झुगारून समुद्रगुप्ताचे मांडलिकत्व स्वकारले. पहिल्या रूद्रसेनच्या कारकिर्दीत नंदीवर्धन शाखेची सत्ता नर्मदा नदी व विंध्य पर्वत याच्यातील प्रदेशापूरतीच मर्यादित राहिली असे दिसते. पण जरी सत्ता मर्यादित असली तरी त्याने आपले स्वतंत्र राज्याचे अस्तित्व कायम टिकविले. प्रभावशाली गुप्त राजांचे मांडलिकत्व स्विकारले नाही हे त्याच्या कारकिर्दीचे खास वैशिष्ट्य होय.

**२. पहिला पृथ्वीसेन (इ.स. ३५० ते इ.स. ४००)**

रूद्रसेनच्या मृत्यूनंतर पहिला पृथ्वीसेन सत्तेवर आला. तो गुप्तराजा दूसरा चंद्रगुप्त याचा समकालीन होता. चंद्रगुप्ताने शक क्षत्रपांवर आक्रमण केले. त्यावेळीी गुप्तराजाला पहिल्या पृथ्वीसेनने मदत केली असावी म्हणूनच चंद्रगुप्ताला भारतात सुमारे ३०० वर्षे असलेली परकीय सत्ता नष्ट करणे शक्य झाले असावे असे मानले जाते. चंद्रगुप्ताने आपली कन्या प्रभावतीगुप्ता हिचा विवाह पहिला पृथ्वीसेनचा मुलगा रूद्रसेन याच्याशी केला. गुप्तराजांनी प्रस्थापित केलेल्या या वैवाहिक संबंधावरून या काळात वाकाटक सत्ता एक प्रबळ सत्ता म्हणून ओळखली जात होती. त्याने नंदीवर्धन ही राजधानी केली. ही राजधानी नागपूरपासून ४५ कि.मी. अंतरावर असलेल्या नागरधन येथे होती. येथे केलेल्या उत्खननात वाकाटककालीन अनेक अवशेष मिळाले आहेत.

**३. दुसरा रूद्रसेन–प्रभावती गुप्ता– (इ.स. ४०० ते इ.स. ४०५) :**

पहिल्या पृथ्वीसेननंतर त्याचा मुलगा रूद्रसेन हा सत्तेवर आला पण अल्पकाळात त्याचा मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूमुळे त्याची पत्नी प्रभावतीगुप्ता आपल्या अल्पवयीन मुलाच्या नावाने राज्यकारभार करत होती. तिच्या उपलब्ध असलेल्या ताम्रपटावरून ती स्वत: राज्यकारभार करीत होती असे मानता येते. वाकाटकाच्या एकूण प्रशासनावर तिचा प्रभाव होता. गुप्त सत्ताधीशांचे मोठया प्रमाणावर सहाय्य झाल्याने आर्थिक व राजकीय जीवनात स्थैर्य प्रस्थापित करणे तिला शक्य झाले. या काळात गुप्ताचे निरनिराळे अधिकारी तिला मदत करत असत. गुप्तांच्या दरबारातील कवी कुलगुरू कालीदास या काळात दक्षिण भारतात आला होता. नागपूर परिसरातील रामटेक किंवा रामगिरी येथे त्याचे वास्तव्य होते. प्रभावतीगुप्ताच्या दिवाकरसेन व दामोदरसेन यांना कालीदासने शिक्षण दिले असावे. 'मेघदूत' या महाकाव्याची रचना कालीदासाने याच काळात केली. प्रभावतीगुप्ता ही रामभक्त असून तिने कलाकारांना व विद्वानांना आश्रय दिला होता. रामटेक व पवनार येथील राममंदिरे हिच्या काळातच बांधली गेली. प्रभावतीगुप्ताच्या काळात स्थापत्यकलेच्या विकासाला चालना मिळाली. नांदेड जिल्हयातील शिदुर येथील लेणी याचकाळात कोरली असावीत. येथे रामाचे एक असामान्य शिल्प आहे. साम्राज्याचे रक्षण, राजकीय शांतता, आर्थिक स्थैर्य, कला व साहित्यक्षेत्रात मोठयाप्रमाणावर प्रगती घडवून आणणारी एक कर्तबगार स्त्री राज्यकर्ती म्हणून प्रभावतीगुप्ता ओळखली जाते. दिवाकरसेन अकाली मृत्यू पावल्यामूळे तिचा दुसरा मुलगा दामोदरसेन सत्तेवर आला.

### ४. दामोदरसेन (इ.स. ४२० ते इ.स. ४५०) :

दामोदरसेनने राज्यारोहणप्रसंगी दुसरा प्रवरसेन असे आपल्या पूर्वजाचे नाव धारण केले. या राजाची माहिती देणारे चौदा ताम्रपट व काही शिलालेख मिळतात. ताम्रपटाच्या उपलब्धतेवरून त्याच्या कतृत्वाची कल्पना येते. आपल्या सत्तेचे योग्यप्रकारे रक्षण करून त्यात वाढ करण्याचे काम दुसऱ्या प्रवरसेनने केले. त्याने नंदिवर्धनाच्या शेजारी प्रवरपूर हे नवे शहर वसविले व काही काळातच त्याने प्रवरपूर(पवनार) येथे आपली राजधानी वसविली.

दुसरा प्रवरसेन वैदिक धर्माचा अनुयायी व शिवोपासक होता. आपल्या वैष्णवपंथीय मातेचा त्याच्या मनावर प्रभाव होता. या मातेच्या आग्रहास्तव त्याने श्रीरामाच्या चरित्रावर 'सेतूबंध' नावाचे काव्य महाराष्ट्री प्राकृतात लिहिले. त्याने काही गाथाही लिहिल्या. तो विद्वान व कलाकारांच्या आश्रयदाता होता. समकालीन सत्ताधिश असलेल्या कुंतलाबरोबर त्याचे प्रारंभी मैत्रीचे व नंतर नातेसंबंध प्रस्थापित झाले. त्याने आपला मुलगा नरेंद्रसेन याचा विवाह कुंतल राजकन्या अजितमभट्टारिका हिच्याशी केला. या विवाहसंबंधामुळे वाकाटकाची राजकीय प्रतिष्ठा आणखीनच वाढली.

### ५. नरेंद्रसेन (इ.स. ४५० ते इ.स. ४७०) :

दुसऱ्या प्रवरसेननंतर सत्तेवर आलेल्या नरेंद्रसेनने गुप्तराजांच्या अकार्यक्षमतेचा फायदा घेतला व उत्तरेत आपल्या साम्राज्याचा विस्तार केला. माळव्याचा काही भाग त्याने जिंकला कोसाम व मालव येथील राजांनी त्याचे मांडलिकत्व स्वीकारले. नरेंद्रसेनच्या कारकिर्दीच्या शेवटी नलवंशीय राजा भवदत्त वर्मा याने वाकाटकाच्या प्रदेशावर आक्रमण केले. वाकाटकाचा बराचसा प्रदेश त्याने जिंकून घेतला.

### ६. दुसरा पृथ्वीसेन (इ.स. ४७० ते इ.स. ४९०) :

नलवंशीय राजा भवदत्त वर्मा याने वाकाटकाच्या बराचसा प्रदेश जिंकून घेतल्यावर दुसऱ्या पृथ्वीसेनने आपली राजधानी प्रवरापूरहून पद्मपूर(आमगावजवळ भंडारा) येथे हलविली व तेथून नलावर स्वारी करून त्याची राजधानी पुष्करी उध्वस्त केली. त्याने उत्तरेस आपली सत्ता वाढवून चेदी देशापर्यंत वाढविली. पण वाकाटकांना ही सत्ता दीर्घकाळ टिकवता आली नाही. नलवंशीय राजा भवदत्त वर्मा याचा प्रभाव वाढत गेला. हरिसेन या शेवटच्या वाकाटक राजाच्या कारकिर्दीत नंदीवर्धन शाखेची सत्ता नष्ट झाली. कोणीही पराक्रमी राजा सत्तवर नसल्याने या नंदीवर्धन शाखेचे अस्तित्व नष्ट झाले व हा प्रदेश वत्सगुल्म शाखेच्या राजांनी ताब्यात घेतला. सातवाहनानंतर दक्षिण भारतात काहीकाळ स्वतंत्र व बलवान सत्ता निर्माण करण्याचे कार्य वाकाटकांच्या नंदीवर्धन शाखेने केले. या शाखेतील शूर धाडशी राजांनी आपल्या सत्तेचा विस्तार केला. आर्थिक प्रगती, कला, साहित्य इत्यादी त्यांनी चालना दिली. वैदिक धर्म व त्या धर्मातील पंथांना त्यांनी राजाश्रय दिला.

### ब) वाकाटकाची वत्सगुल्म शाखा :

वाकाटकांच्या या वत्सगुल्म शाखेचे राज्य मराठवाडा व विदर्भ परिसरात विस्तारित होते. वत्सगुल्म ही त्यांची राजधानी म्हणजे आजच्या अकोला जिल्ह्यातील वाशिम होय. वाशिमच्या परिसरात वाकाटकांचे अनेक अवशेष मिळाले आहेत. पेणगंगेच्या काठावरही आज अवशेष मिळतात. मराठवाड्यात निरनिराळया लेण्या या

काळात कोरल्या गेल्या. विदर्भातील काही मंदीराचे बांधकामही या काळातच झाले. वाकाटकाची नाणी व ताम्रपट विदर्भ व मराठवाड्यात मोठया प्रमाणावर मिळतात. या विविध वाङ्मयीन व भौतिक साधनांवरून वाकाटकांच्या वत्सगुल्म शाखेची माहिती मिळणे शक्य होते.

**१. सर्वसेन (इ.स. ३३० ते इ.स. ३९५) :**

इ.स. ३३० ते ३५० च्या सुमारास पहिला प्रवरसेनचा मुलगा सर्वसेन याने वाकाटकांच्या वत्सगुल्म या स्वतंत्र शाखेची स्थापना केली. यावेळी नंदीवर्धन शाखेवर सर्वसेनचा पुतण्या म्हणजेच पहिल्या प्रवरसेनचा नातू पहिला रूद्रसेन हा सत्ताधिश होता. दक्षिण विदर्भाच्या प्रदेशावर त्याने आपले वर्चस्व प्रस्थापित केले. पर्वतापासून दक्षिणेस गोदावरी नदीपर्यंत त्याचे साम्राज्य पसरलेले होते. साम्राज्यविस्ताराच्या या कार्यात त्याला ‘रवि’ नावाच्या त्याच्या सचिवाने मोठया प्रमाणात मदत केली होती. सर्वसेनच्या कारकिर्दीत वत्सगुल्म किंवा वाशिम या शहराला विद्या व संस्कृती यांचे प्रमुख केंद्र म्हणून प्रसिद्धी मिळाली असे दिसते. सर्वसेन हा उत्तम कवी होता. त्याने ‘हरिविजय’ नावाचे काव्य महाराष्ट्री पाकृतात रचले याशिवाय त्याने काही प्राकृत गाथा रचल्याचीही माहिती मिळते. सर्वसेनने वैदिक धर्माला राजाश्रय दिलेला असून ‘धर्ममहाराज’ ही उपाधी लावलेली होती.

**२. विंध्यसेन (इ.स. ३५५ ते इ.स. ४७०)**

वाशिमच्या ताम्रपटात याचा दुसरा विंध्यशक्ती म्हणून उल्लेख आढळतो. याच्या कारकिर्दीत विदर्भ व मराठवाडयातील सर्व जिल्हयांचा प्रदेश वत्सगुल्म शाखेत समाविष्ठ झालेला असावा. आपल्या कारकिर्दीच्या ३७ व्या वर्षी दिलेल्या ताम्रपटात वाकाटक राजाने नदी तटावरील अग्रहाराला एक गाव दान दिल्याची माहिती मिळते. नंदितट किंवा नंदितरू हा नांदेडचा पहिला उल्लेख या ताम्रपटात आढळतो. यावरून नांदेडपर्यंतचा प्रदेश त्याच्या साम्राज्यात समाविष्ट झालेला होता असे दिसते. हा नंदिवर्धन शाखेचा राजा पहिला पृथ्वीसेन यांच्या समकालीन होता. कुंतल देशाच्या राजाचा त्याने पराभव केल्याची माहिती मिळते. हा वैदिक धर्मानुयायी होता. त्याने ‘धर्ममहाराज’ अशी उपाधी धारण केली होती. वाकाटकाच्या वत्सगुल्म शाखेचा राज्यविस्तार याच्या कारकिर्दीतच झाला.

**३. हरिसेन (इ.स. ४७५ ते इ.स. ५००)**

सर्वसेनच्या मृत्यूनंतर दुसरा प्रवरसेन सत्तेवर आला. अजिंठयाच्या शिलालेखात त्याच्या पुसट नावाखेरीज इतर काही माहिती मिळत नाही. तो उदार व कार्यक्षम शासक होता असे दिसते.दुसरा प्रवरसेननंतर देवसेन राजा सत्तेवर आला. देवसेननंतर  सत्तेवर आलेला हरिसेन हा वत्सगुल्म शाखेचा शेवटचा पराक्रमी व महत्वाकांक्षी राजा होय. त्याने अवंती (माळवा), कोसल (छत्तीसगड व त्यालगतचा प्रदेश), कलिंग(ओरिसा), आंध्र, लाट (गुजरात), पश्चिमेस अरबी समुद्रापासून पूर्वेस बंगालच्या उपसागरापर्यंतचा प्रदेश आपल्या अधिपत्याखाली आणला. हरिसेनचा सचिव वराहदेव (हस्तिभोजचा मुलगा) हा बौद्धधर्मिय असल्याने जगप्रसिद्ध अजिंठ्यातील १६ व्या क्रमांकाचे लेणे यानेच खोदवून त्याला शिल्प चित्राकृतीनी भूषविले. याशिवाय या काळात

अजिंठ्यातील १, २, १७ व १९ क्रमांकांची लेणीही कोरली गेली व त्याबरोबरच चित्रितही केल्या गेल्या. या लेण्याच्या स्वरूपात भारतीय कलाकारांनी शैलस्थापत्य व चित्रकला या क्षेत्रात असामान्य प्रगती केली असे मानता येते. अजंठा लेण्यांना UNESCO (युनेस्कोने) जागतिक वारसा स्थळ म्हणून निश्चित केले. हरिसेनच्या कारकिर्दीत वाकाटक घराण्याची सत्ता व प्रतिष्ठा शिखरावर होती. त्याच्या काळात भारतातील कोणतीही अन्य सत्ता हरिसेनाइतकी प्रभावशाली व विस्तृत नव्हती. इतिहासकार आळतेकर म्हणतात 'हरिसेन समर्थ, राज्यकर्ता, कुशल प्रशासक आणि ख्यातनाम सेनापती असावा.' हरिसेननंतर एक दोन राजे झाले असावेत. पण त्यांचा उल्लेख सापडत नाही. इ.स. ५५० च्या सुमारास महिष्पतीच्या कलचूरीनी वाकाटकांच्या विदर्भात आपले राज्य स्थापन केले. इ.स. ३ ऱ्या शतकापासून ते ६ व्या शतकापर्यंत दक्षिणेत जी राजघराणी झाली. त्यामध्ये वाकाटक हे सर्वश्रेष्ठ असून त्याच्या कामगिरीने दक्षिण भारताच्या संस्कृतीवर मोठा परिणाम झाला आहे. वाकाटक राजे कला व साहित्याचे दिलदार आश्रयदाते होते. वत्सगुल्म शाखेचा वाकाटक राजा सर्वसेन याने 'हरिविजय' ही काव्यरचना केली आहे. वैदर्भी वाकाटक राजाच्या दरबारात संस्कृत भाषेची वऱ्हाडी शैली नावारूपाला आली होती. अजिंठयाच्या लेण्यातील काही सर्वोत्कृष्ट गिलावचित्रे वाकाटकाच्या काळात खोदली गेली आहेत याची इतिहासाने नोंद घेतली आहे.

- **स्वयंअध्ययन प्रश्न–१**

**अ. योग्य पर्याय निवडा.**

१) .........हा गुप्त घराण्याचा संस्थापक होय.

अ)श्रीगुप्त ब) समुद्रगुप्त क) चंद्रगुप्त ड) स्कंदगुप्त

२) ............... नाण्यावर सर्व राजोच्छेता अशी पदवी कोरली आहे.

अ)श्रीगुप्त ब) समुद्रगुप्त क) चंद्रगुप्त ड) स्कंदगुप्त

३) ............... या राजाने नवी कालगणना सुरू केली.

अ) श्रीगुप्त ब) पहिला चंद्रगुप्त क) समुद्रगुप्त ड) दुसरा चंद्रगुप्त

४) वाकाटक घराण्याचा संस्थापक ... ........... हा आहे.

अ) पहिला विंध्यशक्ती ब) पहिला प्रवरसेन क) पहिला रूद्रसेन ड) सर्वसेन

५) वाकाटक घराण्याचा ... .... हा शेवटचा पराक्रमी राजा होय.

अ) सर्वसेन ब) देवसेन क) विंध्यसेन ड) हरिसेन

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. शकांचा पराभव करणारा शकारी म्हणून कोणत्या गुप्त सम्राटाला ओळखले जाते ?

२. कोणत्या गुप्त सम्राटाने आपले राजचिन्ह म्हणून गरूड या पक्षाला स्विकारले ?

३. गुप्त घराण्याचा शेवटचा पराक्रमी राजा कोण?

४. वाकाटकाचे राज्य दक्षिणेत कोणत्या प्रदेशावर होते ?

५. हरिविजय काव्य या काव्याचा निर्माता कोण ?

## २.२.२ अर्थव्यवस्था व बृहतभारत :

### अ) अर्थव्यवस्था :

फाहियान या चिनी यात्रेकरूने केलेल्या वर्णनावरून या काळातील लोकांच्या आर्थिक जीवनाची कल्पना येते. मगध राज्यात अनेक शहरे असुन तेथील धनिक लोकंानी बौध्द धर्माला पाठिंबा दिला होता व त्यासाठी दानधर्मही केला होता हे फाहियानच्या लिखानावरून कळते. या काळात समाजाच्या आर्थिक प्रगतीचे प्रतिबिंब सामाजिक जीवनाच्या स्थैर्यात, विविध अलंकार व सौंदर्यप्रसाधनात दिसते. दळणवळणाच्या साधनांचा मोठया प्रमाणात विकास झाल्यामुळे गुप्त काळ व वाकाटक काळात शेती, व्यापार व उदयोगधंदे या क्षेत्रात प्रगती झाली आणि आर्थिक विकासास चालना मिळाली. म्हणून या काळाला वैभवशाली कालखंड किंवा सुवर्णयुग म्हटले जाते. प्रमुख व्यवसाय शेती हाच होता. जमिन महसूल, प्रत्यक्ष कर, जकात कर, आयात निर्यात कर, जंगले, मिठागर, खाणी, विविधकर शासनाची उत्पनांची साधने होती.

### १) शेती :

समाजातील मोठा वर्ग हा शेती व्यवसाय करत असे. सत्ताधीशांनी शेतीचा विकास करण्यासाठी अनेक प्रयत्न केले. शेतीसाठी पाणीपुरवठयाच्या योजना आखल्या. या काळात जमिनीची मोजणी करून उत्पादन क्षमतेनुसार तिची प्रतवारी केली जात असे. शेती कसण्याच्या पद्धतीच्या व अवजारांच्या उल्लेखावरून या काळात शास्त्रशुद्ध पद्धतीने शेती केली जात होती असे दिसते. शेतीतून मोठ्या प्रमाणावर पीक येण्यासाठी तलाव व कालव्याच्या आधारे पाणीपुरवठा केला जात होता. स्कंदगुप्ताने सुदर्शन नावाचा तलाव दुरूस्त केल्याचा उल्लेख मिळतो. चरक व सुश्रृत संहितेत बियाणांची निवड, धान्यांची प्रतवारी इत्यादीची माहिती दिली आहे. याकाळात शेतीतून तांदुळ, गहू, कापूस, निरनिराळी फळे व पालेभाज्या उत्पादन केल्या जात असत. संपूर्ण देश अन्नधान्याने समृध्द होता. पशूपालन हा ही व्यवसाय होता. शेतीकामासाठी गुलामांचाही वापर करत असल्याचा उल्लेख आढळतो. त्यांची खरेदी-विक्री होत होती अशी माहिती मिळते. शेतीतील मोठ्या प्रमाणावरील उत्पन्नामुळे समाज सुखी व समृद्ध बनला होता.

### २) व्यापार :

व्यापार हा समाजाच्या सर्वांगिन विकासासाठी उपकारक घटक होता. व्यापाराच्या प्रगतीसाठी राजमार्ग व जलमार्गाची सोय होती. राज्याच्या सीमेवर व्यापार शुल्क घेण्यात येत असे. साम्राज्यविस्तार, दीर्घकालीन शांतता व सुव्यवस्था, संरक्षणाची दक्षता, रस्ते, धर्मशाळा इत्यादींमुळे याकाळात अंतर्गत व्यापाराला चालना मिळाली. कोसांबी, उज्जैयिनी, तक्षशिला, प्रतिष्ठान, नंदिवर्धन, प्रवरपूर, वत्सगुल्म या शहरांचा व्यापारी केंद्रे

म्हणून विकास झाला.गंगा,ब्रम्हपुत्रा,कृष्णा,कावेरी या नदयांच्या जलमार्गाने व्यापार चालत असे. परदेशांशीही व्यापार चालत असे. मंगलोर, कल्याण, भडोच, जयगड, सलिदूत, ताम्रलिप्ती ही बंदरे प्रसिद्ध होती. तेथून चीन, जावा, सुमात्रा, चंपा, इराण ,रोम देशांशी व्यापार चालत असे. चंदन, अत्तर, केशर सौंदर्यप्रसाधने यांची निर्यात होई. तर सोने,रेशिम, घोडे, हस्तिदंत नीलमणी इत्यादींची आयात होई. देशांतर्गतही मोठया प्रमाणावर व्यापार चालत होता. व्यापार हा अतिशय फायद्याचा व समृद्धता वाढविणारा होता.

विविध वस्तूंना व्यापार करणाऱ्यांनी व्यावसायिक समस्यांची उकल करण्यासाठी श्रेणी व संघटनांची निर्मिती केली होती. या श्रेणीचे नियम सभासदावर बंधनकारक असून या श्रेणी बँक म्हणूनही काम करीत असत. लोकांकडून विश्वासाने मिळालेल्या ठेवीतून व्यापाऱ्याना आर्थिक सहकार्यही केले जात होते.

**३) उद्योग :**

औद्योगिक क्षेत्रातही फार मोठया प्रमाणात प्रगती झाली होती.या काळात रेशमी व सुती कापड विणणे, अलंकार तयार करणे, अशूद्ध धातूपासून शुद्ध धातू बनविणे, जहाज बांधणे, घरातील उपयुक्ततेची भांडी व शेतीची अवजारे तयार करणे, हस्तकलेच्या वस्तू बनविणे इत्यादींना मोठया प्रमाणावर चालना मिळाली होती. या विविध उद्योगांना शासनाच्या वतीने चालना देण्यात आली होती. उद्योगांच्याही स्वतंत्र श्रेणी असत. विविध उद्योगातील कामगारांचे कौशल्य टिकविणे, उदयोगाला आर्थिक सहाय्य करणे हे काम या श्रेणी करत. श्रेणीकडून कर्ज मिळत असे. छोटे छोटे व्यावसायिकही होते. परीट, सुतार, सोनार, लोहार, शिंपी, चर्मकार, कापड रंगविणारे, शिलाई करणारे व्यावसायिक होते.

**४) चलनव्यवस्था :**

या काळात नाण्यांचा चलनव्यवस्थेसाठी सर्रास वापर करत. गुप्त राजांनी त्यांच्या कोरीव लेखात दीनार असा उल्लेख केलेली सोन्याची नाणी मोठया संख्येने प्रचलित होती.नियमित आकार व वजन असलेली ही नाणी विविध प्रकारात व उपप्रकारात सापडतात.नाण्यांवर गुप्त राजांची ठळक चित्रे असुन त्यांतून गुप्तांची युध्दाबद्दलची आवड दर्शवली जाते. क्वचितप्रसंगी वस्तुविनिमय पद्धत होती. सोने, चांदी, तांबे या धातूंच्या नाण्याचा वापर केला जाई. गुप्तराजांनी सुवर्णनाण्याचा चलनात जास्तीत जास्त वापर केला. शुद्ध सोन्याची व अतिशय प्रगत होती. समुद्रगुप्ताची नाणी सुमारे ११८ ते १२२ ग्रॅम वजनाची होती. स्कंदगुप्ताची नाणी ही १४६ ग्रॅम वजनाची होती. सुवर्णनाण्याप्रमाणे चांदीचीही नाणी होती. तांब्याची मात्र अतिशय कमी प्रमाणात होती ही नाणी शासनाच्या वतीने तयार केली जात. व्यापारी श्रेणी किंवा संघटनांचीही नाणी प्रचलित होती. नाण्यावर गरूड, लक्ष्मी, घोडा, धनुष्यबाण, राजा, यांचे चित्र रेखाटले जात असत. प्राचीन भारताच्या इतिहासात समुद्रगुप्ताच्या नाण्याइतकी प्रगत व अर्थपूर्ण नाणी क्कचितच आढळून आली आहेत.नाण्यांचा उपयोग अधिकारी, सैनिक, प्रशासकीय कर्मचारी यांच्या वेतनासाठी तसेच जमिनीच्या खरेदी-विक्रीसाठी होत असे.

- **बृहद्‌भारत** (Greater India) **:**

आशियातील असा प्रदेश की जो भारतीय संस्कृतीने प्रभावित आहे त्याला 'बृहद्‌भारत' असे म्हटले जाते.

हे लक्षात घेतले पाहिजे की, याठिकाणी भारतीय राजांची ''राजकीय सत्ता'' नव्हती. तर व्यापार, धर्मप्रसार या माध्यमातून भारतीय संस्कृतीचा याठिकाणी प्रभाव निर्माण झाला.

या संस्कृतीचा प्रसार पुढील प्रदेशात झाला. **आग्नेय आणि पूर्व आशिया :** दक्षिण ब्रह्मदेश, मलाय द्वीपकल्प, मध्य आणि दक्षिण थायलंड, सुमात्रा-जावा (इंडोनेशिया), कंबोडिया, चंपा (विएटनाम), फिलीपाईन्स; **दक्षिण आशिया :** अफगाणिस्तान; **मध्य आशिया :** बाल्ख-बदकशान, उजबेकिस्तान, **पूर्व आशिया :** तिबेट, भूतान, चीन

वरील सर्व प्रदेशात भारतीय संस्कृतीचा जो प्रभाव निर्माण झाला त्याची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**व्यापारी संबंध :** आग्नेय आशियाला 'सुवर्णभूमी' म्हणत. भारतातील कलिंगचे, त्यांच्याशी व्यापारी संबंध होते. तर बंगाल येथील पाल राजांचे श्रीविजयशी व्यापारी संबंध होते. या देशांमध्ये भारतीय व्यापाऱ्यांच्या वसाहती स्थापन झाल्या. काही भारतीय व्यापाऱ्यांनी इथे राज्यंही निर्माण केली.

**धर्मप्रसाराचा मोठा हात :** हिंदूंच्या ईश्वरदत्त राजपदाचा सिद्धांत तेथील देशांना पसंत पडला. तिथल्या राज्यकर्त्यांनी भारतीय ब्राह्मण पुरोहिताना निमंत्रित केले. त्यांच्याकडून तेथील राजांनी राज्याभिषेक करवून घेतला. तिथून, तिथल्या अभिजन वर्गावर, हिंदूंच्या धार्मिक आणि अध्यात्मिक परंपरांचा आणि तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडला. तिथून ते सर्व स्तावर झिरपत गेले. तर सम्राट अशोकाच्या योजनेंतर्गत बौद्ध धर्माचा प्रसार सुरू झाला. भारतीय बौद्ध भिक्षू तिकडे जाऊ लागले. तर तिकडील बौद्ध भिक्षूंसाठी भारत म्हणजे 'देवभूमी'. ते बौद्ध भिक्षू, देवभूमीकडे येऊ लागले. यातून सांस्कृतिक देवाणघेवाण सुरू झाली.

भारतीय संस्कृतीचा हा प्रभाव विविध बाबींमध्ये दिसून येतो. जसे;

**भाषा :** तेथील स्थानिक भाषेवर भारतातील पाली आणि संस्कृत भाषेचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर पडलेला दिसून येतो.

**धर्म, विविध धर्मशास्त्रे :** भारतीय धर्मांचा प्रभाव तेथील स्थानिक धर्मांवर, त्यांच्या समजुतीवर पडला. तेथे, भारतीय परंपरांची स्थानिक रुपांतरं निर्माण झाली. हिंदूंच्या विधी, पंचांग, इश्वरदत्त राजपद ही संकल्पना, बौद्ध धर्माच्या थेरवाद (हीनयान) तसेच महायान मार्गांचा प्रभाव पडलेला आहे.

**ईश्वरदत्त राजपदाचा सिद्धांत :** अगदी पूर्वीपासून भारतीय राज्यसंस्थेमध्ये 'ईश्वरदत्त राजपदाचा' सिद्धांत आहे. म्हणजे ईश्वराने राजाला राज्य दिलेले असून, राजा हा फक्त ईश्वराला जबाबदार धरला जातो. अशा भारतीय संस्कृतीच्या प्रभावाने तेथील राजांनी - जसे ख्मेर, जावा येथील राजे, स्वत:ला देवाचा अंश म्हणवून घेऊ लगले. पूर्वजांच्या पूजेबरोबर शिव आणि विष्णूची पूजा सुरू झाली. त्याला जोडून महाकाव्ये प्रसिद्ध होऊ लागली.

**राज्यशास्त्र आणि प्रशासकीय पद्धती :** भारतीय राजनीतिशास्त्र हे जगप्रसिद्ध असे होते. कौटिल्य, कामंदक असे महत्त्वाचे राजनीतिशास्त्रज्ञ भारतात होऊन गेले. त्यात त्यांनी राजपद, प्रशासनपद्धती इत्यादी विविध विषयावर चर्चा केलेली आहे. प्रशासनाची भाषा ही संस्कृत राहिलेली आहे. यांचा प्रभाव पडून, या विविध देशांतही संस्कृत

ही शासकीय भाषा म्हणून स्विकारली गेली. तसेच विविध आदेशासाठी तसेच भूदानासाठी शिलालेख प्रसिद्ध केले जात. त्याचाही प्रभाव या देशांत पडलेला दिसून येतो.

**स्थापत्य :** हिंदू मंदिरे ही जगप्रसिद्ध आहेतच. नागर आणि द्राविड या महत्त्वाच्या शैलीनबरोबरच अनेक प्रादेशिक शैली भारतभर दिसून येतात. याचा प्रभाव या देशातील मंदिरांवर पडला. येथील बऱ्याच मंदिरांवर हिंदू मंदिर स्थापत्यशैलीचा प्रभाव दिसून येतो. जसे बौद्ध मंदिर, अंगरकोर वाट (कंबोडिया), विष्णु मंदिर (जावा, इंडोनेशिया). प्रंबनन हे त्रिमूर्ति मंदिर तर इंडोनेशीयातील सर्वात मोठे मंदिर आहे. तर बोरोबुदूर (जावा, इंडोनेशिया) येथे जगातील सर्वात मोठे बौद्ध मंदिर दिसून येते.

**साहित्य–महाकाव्ये :** प्राचीन भारतीय साहित्य हे अभिजात साहित्य मानले जाते. जगभर त्यांची भाषांतरे झालेली आहेत. विशेषत: भारतीय महाकाव्यानी तर सर्वांना मोहिनी घातलेली आहे. यांचा प्रभाव या देशांवर पडला. तेथील साहित्यांमध्ये हे दिसून येते. तसेच विविध सादरीकरणाच्या ज्या कला आहे; जसे नाटक, नृत्य इत्यादीवर तर हा प्रभाव ठळकपणे जाणवतो.

असा हा बृहदभारत कसा निर्माण झाला हे पाहण्यासाठी येथील देशांचा थोडक्यात विचार करू.

- **आग्नेय आशिया (ख्मेर साम्राज्य) :**

**कंबुज/कंबोडिया :** दुसऱ्या जयवर्मनने या राज्याची स्थापना केली. याच्यावर प्रथम हिंदू संस्कृतीचा प्रभाव होता. पुढे, १२ व्या शतकानंतर या ठिकाणी बौद्ध धर्माचा प्रभाव निर्माण झाला. या प्रभावातून येथे ख्मेर साम्राज्य (अंकोर) निर्माण झाले. महेंद्रपर्वत ही त्यांची राजधानी होती. ९ ते १५ व्या शतकापर्यंत हे साम्राज्य होते. म्हणजे याठिकाणी प्रथम हिंदू संस्कृतीचा नंतर बौद्ध संस्कृतीचा प्रभाव दिसून येतो.

**फुनान** (इंडोचीनी द्वीपकल्प : कंबोडिया, लाओस, विएटनाम) : या ठिकाणी भाषा ख्मेर आहे. मात्र लिपीसाठी भारतीय देवनागरी लिपीचा वापर केला जाऊ लागला.

**चेनला** (इंडोचीनी द्वीपकल्प) : या ठिकाणी दक्षिण भारतीय संस्कृतीचा प्रभाव दिसून येतो. भारतातील चालुक्य आणि पल्लव यांच्या प्रभावातून, त्यांच्या धर्तीवर शिलालेखांची रचना केली गेली. वीरवर्मन हा येथील पहिला राजा होय की ज्याने 'हरीहर' ही संकल्पना मांडली. तसेच ईश्वरदत्त राजपदाचा सिद्धांत मांडला.

**लांखसुखा** (मलाया द्वीपकल्प) : हे एक हिंदू राज्य दिसून येते.

**चंपा** (दक्षिण आणि मध्य व्हिएटनाम) : याठिकाणी हिंदू संस्कृतीचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव पडला.

- **आग्नेय आशियातील बेटे (श्रीविजय साम्राज्य) :**

**श्रीविजय** (सुमात्रा बेट, इंडोनेशिया) : याठिकाणी महायान आणि वज्रयान या बौद्ध पंथाचा प्रभाव दिसून येतो. याठिकाणी हजारो बौद्ध विद्वान असून भारतीय बौद्ध विद्वान येथील शैक्षणिक केंद्रे चालवीत असत. धर्मकिर्ती हा येथील एक महत्त्वाचा बौद्ध विद्वान होय. हा येथील तसेच भारतातील नालंदा विद्यापीठातही बौद्ध तत्त्वज्ञान शिकवीत असे. येथील महाराज बलपुत्र या राजाने भारतातील नालंदा विद्यापीठाजवळ एक बौद्ध विहार स्थापन

केलेला होता. अशा दक्षिणेकडील श्रीविजय आणि उत्तरेकडील ख्वेर साम्राज्य यांची सदैव चढाओढ चाललेली दिसून येते.

**सलकनगर** (पश्चिम जावा, इंडोनेशिया) : येथे एक प्रसिद्ध भारतीय व्यापारी होता. त्याने येथील स्थानिक मुलीशी विवाह केला. यांच्या विवाहानंतर, त्या व्यापाऱ्याने याठिकाणी 'सलकनगर' हे राज्य स्थापन केले.

**तरूमनगर** (जकार्ताजवळ, इंडोनेशिया) : येथे पूर्णवर्मन हा एक महत्त्वाचा राजा होऊन गेला. याला येथील किनारी प्रदेश विकसित करायचा होता. त्यावेळी भारतीय ब्राह्मण शास्त्रज्ञ जगप्रसिद्ध होते. त्यामुळे त्याने या ब्राह्मण शास्त्रज्ञांना निमंत्रित केले. त्यांच्या मदतीने कालवा बांधला आणि या कालव्याच्या मदतीने येथील किनारी प्रदेश हा शेती आणि वसाहतीखाली आणला.

**कलिंग्ग** (जावा बेट, इंडोनेशिया) : याठिकाणी प्रथम हिंदू राज्य निर्माण झालेले होते. पुढे याठिकाणी बौद्ध राज्य निर्माण झाले.

- **नैऋत्य/दक्षिण आशिया :**

**झाबूलीस्थान** (दक्षिण अफगाणिस्तान) : याठिकाणी हिंदू तसेच बौद्ध धर्माचाही प्रभाव दिसून येतो. त्यामुळे येथील राजांना 'बौद्ध-शाही' असे म्हणत. या बौद्धशाही राजांनी ७-९ शतकांमध्ये, अरब आक्रमकांचे हल्ले यशस्वीपणे परतून लावलेले दिसून येतात. हे राजे प्रामुख्याने बौद्ध धर्मीय होते. मात्र हिंदूंच्या शैव आणि सौर पंथाचा प्रभावही येथे दिसून येतो. त्यामुळे सूर्य ही येथील एक प्रमुख देवता दिसून येते.

**काबूल** (अफगाणिस्तान) : इथे तुर्कशाही हे एक घराणे होते. हे बौद्ध धर्मीय होते. पुढे ९ व्या शतकात याठिकाणी हिंदूशाही घराणे स्थापन झाले.

**घुर** (मध्य अफगाणिस्तान) : हा प्रदेश बौद्ध धर्मीय होता. जवळजवळ १० व्या शतकापर्यंत याठिकाणी बौद्ध धर्म अस्तित्वात होता.

**नुरीस्तान** (पूर्व अफगाणिस्तान) : या प्रदेशातही बौद्ध धर्माचा मोठा प्रभाव होता. किंबहुना, बौद्ध धर्माच्या प्रयत्नानेच याठिकाणी शिक्षण आणि प्रशासन पहिल्यांदाच सुरू झालेले दिसून येते.

- **मध्य आशिया :**

**बाल्ख :** बौद्ध धर्माच्या प्रसारामुळे याठिकाणी बौद्ध धर्म प्रस्थापित झाला. येथे ''नव विहार'' हा एक मोठा बौद्ध विहार होता.

**खोतान :** हा ही बौद्ध धर्मीय प्रदेश. मात्र याठिकाणी भारतातील रामायण हे महाकाव्य हे अत्यंत प्रसिद्ध असे होते.

**उझबेकीस्तान व ताजकिस्तान :** अगदी अशोकाच्या काळापासून भारत आणि चीन या दोन देशात बौद्ध धर्माच्या अनुषंगाने सांस्कृतिक देवाणघेवाण सुरू झाली. या दोन देशांमधील, विविध प्रदेश ही बौद्ध विचारांनी

प्रभावित झाले. त्यमुळे हे दोन देश म्हणजे चीन-भारत यामध्ये बौद्ध विद्वानांना पूल असे म्हणता येईल. याठिकाणी बरेच बौद्ध विहार ही निर्माण झालेले होते.

● **पूर्व आशिया :**

**भूतान, तिबेट :** या देशांमध्ये बौद्ध धर्माचा प्रचंड प्रभाव आहे. तिबेट तर बौद्धधर्मियांचे एक तीर्थक्षेत्रच आहे.

साधारणत: गुप्त-वाकाटक काळापासून बृहदभारत ही संकल्पना अस्तित्वात आली. ती पुढे अनेक शतके अखंडपणे विकसित होत होती. भारताच्या या सांस्कृतिक प्रभावाच्या खूणा आजही या देशात दिसून येतात. विशेषत: भारताच्या पूर्वेकडील देशात तर हे प्रामुख्याने जाणवते.

आजही येथील बऱ्याच ठिकाणी भारतीय नमस्काराने स्वागत केले जाते. आजही बाली येथे हिंदू लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर आहे. विएटनाम येथील चाम लोक हे अजूनही हिंदू चालीरीती पाळतात. थायलंड, ब्रह्मदेशी आणि ख्मेर लोक बौद्ध असले तरी, त्यांच्यावर हिंदू चालीरीतीचा प्रभाव आहे. आजही थायलंडमधील दरबारात ब्राह्मण धार्मिक विधी करतात. बोर्नीयो (मलाया द्वीपकल्प) येथील दायक लोक जो धर्म पाळतात तो हिंदू धर्माने प्रभावित आहे. तिबेट, भूतान, श्रीलंका हे दोन देश तर बौद्ध धर्मीयच आहेत. तिबेटला तर बौद्ध तीर्थक्षेत्रच म्हणता येईल. येथील विविध कलाप्रकारांवर भारतीय महाकाव्याचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. इंडोनेशिया, कंबोडिया, मलेशिया, थायलंड येथील नृत्यनाटिका आणि वेयांग छाया-बाहुल्या खेळांवर रामायण आणि महाभारत यांच्या कथांचा प्रभाव दिसून येतो.

● **स्वयंअध्ययन प्रश्न - २**

**अ. योग्य पर्याय निवडा.**

१. गुप्त व वाकाटक काळात राज्याचे उत्पन्न प्रामुख्याने..........पासुन मिळत असे.

अ) शेतीकर ब) व्यापारीकर क) जकात ड) व्यवसायकर.

२ ........या राजाने सुदर्शन तलावदुरुस्त केल्याचा उल्लेख आहे.

अ) सर्वसेन ब) स्कंदगुप्त क) विंध्यसेन ड) हरिसेन

३. गुप्त व वाकाटक काळात प्रामुख्याने.......... या धातुची नाणी चलनात होती.

अ) सुवर्ण ब) तांबे क) कॉपर ड) ब्रॉझ

४. स्कंदगुप्ताची नाणी........ग्रॅम वजनाची होती.

अ) १४० ब) १४६ क) १५० ड) १५६

५. बृहतभारत संकल्पना .....या राजवटीत अस्तिवात आली.

अ) मौर्य ब) सातवाहन क) कुशाण ड) गुप्त व वाकाटक.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. गुप्त काळात संस्कृत शिक्षणाची महत्वाची केंद्रे कोणती होती?

२. गुप्त व वाकाटककालीन कोणत्या लेण्याना जागतिक वारसा स्थळ (वर्ल्ड हेरिटेज साईट) म्हणून दर्जा मिळाला आहे?

३. गुप्त व वाकाटककालात कोणत्या वस्तूंची आयात होई?

४. गुप्त व वाकाटककालीन श्रेणी ही कशाची संबधित होती ?

५. गुप्त व वाकाटकालीन व्यापार कोणकोणत्या परकीय देशांनी चालत असे ?

## २.२.३ साहित्य व विज्ञान :

### १) साहित्य :

गुप्त व वाकाटक राजांचा कालखंड अभिजात कालखंड मानला जातो. जवळजवळ सर्व क्षेत्रात नवनिर्मिती झाली.तसेच हा कालखंड संस्कृत भाषेतील साहित्याच्या दृष्टीनेही 'सुवर्णयुगाचा किंवा वैभवाचा कालखंड मानला जातो. सत्ताधिशांनी साहित्य निर्मिती केली त्याशिवाय विविध विद्वानांना राजाश्रय दिल्यामुळे प्रचंड संस्कृत साहित्याची निर्मिती झाली.या कालखंडातील बहुसंख्य साहित्यकृतीचा मूलाधार धर्म हा होता. यापूर्वी संस्कृत ही राजभाषा म्हणून ओळखली जाण्यास सुरूवात झाली. यापूर्वी संस्कृत ही भाषा ही प्रचलित असली तरी या काळात या भाषेला व भाषेतील साहित्य निर्मितीला चालना मिळाली.

- **वाड्मय निर्मिती:**

नारद, याज्ञवल्क्य, फाहायन, बृहस्पती व व्यास इत्यादी स्मृतीग्रंथातून जीवनाचा अनेक आंगोपांगाचा विचार करून धर्माधिष्टीत व विहित मार्ग कोणता याचे विवेचन करण्यास आले.

कालीदास, भवभूती, भारवी, माघ, वीरसेन, मातृगुप्त, भर्तृश्रेष्ठ, दंडी, सुबंधू, शुद्रक, विशाखादत्त,अमरसिंह इत्यादी प्रसिद्ध कवी व नाटककार यांनी या काळात मोठया प्रमाणावर साहित्याची निर्मिती केली.

मेघदूत, ऋतुसंहार, कुमारसंभव, रघुवंश या सुंदर काव्याच्या रचनेमूळेच कालीदासाला 'कविकुलगुरू' म्हटले आहे. याशिवाय मालविकाग्नीमित्र, विक्रमोवंशीय व शाकुंतल ही कालीदासाची प्रंसिद्ध नाटके होत.जगातील शंभर उत्कृष्ठ साहित्यकृतीमध्ये कालीदासानी लिहिलेल्या शाकुंतल नाटकाचा अंतर्भाव होतो. युरोपियन भाषांत अनुवादित झालेली सर्वात पहिली साहित्यकृती होय. चंद्रगुप्त दुसरा याच्या दरबारातील नवरत्नापैकी अमरसिंह याने संकलित केलेला 'अमरकोश' हा या काळातील संस्मरणीय ग्रंथ होय.हा काळ म्हणजे अभिजात वाङ्मयीन इतिहासातील एक तेजस्वी टप्पा होय. जुन्या साध्या संस्कृत शैलापेक्षा भिन्न अलंकारिक शैली या अभिजातवाड्मयाने विकसित केली. भारवीचे किरातार्जुनीय, दंडीचे काव्यदर्शन व दशक कुमारचरित, भट्टीचे रावणवध, सुबंधुचे स्वप्रवासवदत्त, श्रीधरदासाचे स्वदुक्तीकर्णामृत, वाकाटक राजा प्रवरसेन दुसरा याचे सेतूबंध व रावणहो हे प्रसिद्ध काव्य, प्राकृत गाथांचा गाथासप्तशती या ग्रंथातही समावेश होता. राजा सर्वसेनचा हरिविजय, विशाखादत्तचे

मुद्राराक्षस, शुद्रक राजाचे मृच्छकटिक हे प्राचीन नाटयवाङ्मयातील हे एक उत्कृष्ठ नाटक मानले जाते. सर्व नाटके सुखांतिका होत्या.तसेच उच्च व निच्च वर्गातील पात्रे वेगळी भाषा बोलत. स्त्रिया व शुद्र हे प्राकृत तर उच्च वर्गातील पात्रे संस्कृत भाषेचा वापर करतात.

भारवीचे किरातार्जुनीय हे महाकाव्य, दंडीचे दशककुमार चरित्र, गद्य काव्य, पंचतंत्र हा संस्कृत कथा वाङ्मयातील सर्वश्रेष्ठ कथासंग्रह त्याचे सिरियन, अरबी, ग्रीक भाषांत भाषांतर झाले आहे. वसुबंधू व धर्मपाल या बौद्ध विद्वानांनी बौद्ध धर्मग्रंथ लिहीले. पाली, तामीळ व प्राकृत भाषेतूनही वाङ्मयनिर्मिती झाली.

अशाप्रकारे भारतीय साहित्य वाड़मयास मोठे प्रोत्साहन मिळाले. गुप्त व वाकाटक राजे स्वत: साहित्यिक कवी व विद्वान असल्याने त्यांनी साहित्य, कला व संस्कृतीला उत्तेजन दिले.

● **विज्ञान :**

या काळात विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातही फार मोठी प्रगती झाली. गुप्त व वाकाटक राजांनी विविध विद्वानांना राजाश्रय दिल्यामुळे संस्कृत भाषेतील साहित्याबरोबरच या काळात खगोलशास्त्र, धातुविषयक इत्यादी विविध विषयावर स्वतंत्र ग्रंथनिर्मिती झाली.

आर्यभट्ट हा पाटलीपुत्रचा रहिवासी असून प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ व गणितशास्त्रज्ञ होता. त्याने गणितशास्त्रावर 'आर्यभट्टीय' हा ग्रंथ लिहीला. त्याने सूर्यसिद्धांत मांडला. सूर्यग्रहण व चंद्रग्रहणाचीशास्त्रीय कारणमीमांसा केली होती. पृथ्वी स्वत:च्या आसाभोवती फिरते हा सिद्धांत प्रथमच त्याने मांडला.

या काळात गणित, ज्योतिष, वैद्यकशास्त्र, रसायनशास्त्र, विज्ञान यासारख्या अनेक शास्त्राचा विकास झाला.शल्यचिकित्सेचाही विकास झाला. वराहमिहीर हा खगोलशास्त्रज्ञ व जोतिषी म्हणजे 'पंचसिद्धांतिका' ग्रंथाचा लेखक होय. या ग्रंथात भूगोल, वनस्पतीशास्त्र, खगोलशास्त्र या सर्वच शास्त्राची चिकित्सा आहे. अमरसिंहचा अमरकोश हा ग्रंथ महत्वाचा आहे ब्रह्मगुप्त या शास्त्रज्ञाने 'गुरूत्वाकर्षणाचा सिद्धांत' सांगितला वैदिक व रसायनशास्त्रावरही लेखन केले आहे. भारतीय वैदयक शास्त्राचा प्रणेता म्हणजे आयुर्वेदाचा प्रणेता धन्वंतरी हा गुप्त काळातील प्रसिद्ध वैद्य होय. बाणभट्टाने 'अष्टांग संग्रह' हा ग्रंथ लिहीला. पालकाम्य याने 'हस्त्थुपवेद' हा ग्रंथ लिहून आयुर्वेदाच्या आधारे प्राण्यांना औषधोपचार करणारे शास्त्र विकसित केले. चरकने चरकसंहिता वैद्यकशास्त्रावर लेखन केले. हस्तायुर्वेद व अश्वशास्त्र या दोन वैद्यकिय ग्रंथात प्राण्यांच्या रोगावरील उपचाराविषयी माहिती दिली आहे. धातुशास्त्राचा विकास दर्शविणारा दिल्लीच्या मेहरौली येथील कुतुबमिनारच्या शेजारील पंचधातूचा स्तंभ या काळातीलच आहे. इ.स. चौथ्या शतकात तयार झालेल्या या स्थंभावर पंधरा शतके उलटल्यावरही कोणताही गंज चढलेला नाही.बुध्दाच्या अनेक कांस्य प्रतिमा प्रगत धातु तंत्रज्ञानामुळे मोठया प्रमाणात निर्माण केल्या गेलेल्या आढळतात. कामंदकचा राजनितीशास्त्रावरील ग्रंथ, वात्सायनचे कामसूत्र, ईश्वरकृष्ण, दिडनाग, प्रशस्तपाद इत्यादी दार्शनिकाचे ग्रंथ या काळातील आहेत.उजैन हे शहर ज्योतिषशास्त्राच्या अध्ययनाचे प्रमुख केंद्र होते.

बौद्ध आचार्य मैत्रेय, असंग, वसुबंधु, कुमारजीव, धर्मपाल यांनी या काळात विविध विषयावर लेखन केले. जैन आचार्य जिनचंद्रमणी, सिद्धसेनामणी, देवनंदी यांनी निरनिराळया विषयावर लेखन केले.

● **स्वयंअध्ययन प्रश्न-३.**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) गुप्त व वाकाटकाची........ही राजभाषा म्हणुन वापरात होती.

अ) प्राकृत ब) संस्कृत क) मराठी ड) यापैकी कोणतीही नाही.

२) वाग्भटाने ............... हा आयुर्वेदावर ग्रंथ लिहिला.

अ) अष्टांगसंहिता ब) चरकसंहिता क) पंचतंत्र ड) रघुवंश

३) .............. ने मेघदूत हे महाकाव्य लिहिले.

अ) कालिदास ब) वराहामिहीर क) सर्वसेन ड) हरिसेन.

४) वात्सायन याने ..... हा ग्रंथ लिहिला.

अ) अष्टांगसंहिता ब) चरकसंहिता क) कामसूत्र ड) रघुवंश

५) धातुशास्त्राचा विकास दर्शविणारा पंचधातुचा स्तंभ........येथे आहे.

अ) नाशिक ब) वाराणसी क) पैठण ड) दिल्ली

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कविकुलगुरू कोणाला म्हटले आहे ?

२) मुद्राराक्षस या ग्रंथाचा लेखक कोण ?

३) पृथ्वी स्वत:च्या आसाभोवती फिरते हा सिद्धांत प्रथम कोणी मांडला ?

४) कोणत्या शास्त्रज्ञाने गुरूत्वाकर्षणाचा सिद्धांत सांगितला?

५) पंचसिंध्दातिका या ग्रंथाचा लेखक कोण?

**२.२.४ धर्म :**

वैदिक, जैन व बौद्ध या तिन्ही धर्मालाही स्वातंत्र्य व लोकप्रियता होती. विविध धर्म व पंथाचे समाजात अस्तित्व असतानाही त्यांच्यात धार्मिक संघर्ष झाल्याची माहिती मिळत नाही. गुप्त व वाकाटक राजांनी परधर्मसहिष्णुतेच्या धोरणामुळे सर्व धर्मांना स्वातंत्र्य होते.

**१) वैदिक धर्म :-**

● **हिंदू धर्म :**

या काळात शैव, वैष्णव, शाक्त, भागवत व सौर या उपपंथाना वैदिक धर्मात महत्व प्राप्त झाले होते. गुप्तराजे व वाकाटक राजांनी वैदिक धर्माला राजाश्रय दिला होता.जवळजवळ सर्वच गुप्तराजे व वाकाटक राजे

वैष्णव धर्मानुयायी होते. त्यांनी अनेक यज्ञ केल्याचेही उल्लेख आढळतात. शैवपंथाचाही विकास झाला होता.हरिषेण हा शैवपंथिय होता. विष्णु, शिव, दुर्गा, चामुंडी, वामन, वराह, नृसिंह, जगदंबा, भवानी, महिषासूरमर्दिनी, उमा, सूर्य, हेमावती देवतांची उपासना केली जात असे. अनेक पुजाविधीच्या केंद्रस्थानी स्त्रीदेवता होत्या. अनेक मंदिरेही बांधण्यात आली.मंदिरात जाऊन मुर्तीची पुजा करणे हे हिंदू धर्माचे एक सामान्य लक्षण बनले. अनेक सणसभारंभ साजरे केले जाऊ लागले. पुरोहितांचे महत्व वाढले. भक्तिमार्गाचा विकास झाला.

**● भागवत पंथ :**

मौर्योत्तर काळात भागवत धर्म उदयास आला. विष्णुची पूजाअर्चा करणे हे या धर्माचे केंद्र होते. भक्ति व अहिंसा ही भागवत धर्माची ठळक वैशिष्टे होती. अवताराच्या नव्या तत्वाची शिकवण या धर्माने दिली. विष्णुच्या दहा अवतारांच्या चक्राचा इतिहास लोकांसमोर मांडण्यात आला. विष्णूपुजेतुन मिळणारे लाभ लोकप्रिय होण्यासाठी अनेक पुस्तके लिहिण्यात आली त्यापैकी 'भागवतपुराण' हे महत्वाचे पुस्तक होते. विष्णुचा प्रत्येक अवतार धर्म रक्षणासाठी महत्वाचा मानला गेला. धर्म म्हणजे वर्णविभाजित समाज आणि राजाने रक्षण केलेली पितृसत्ताक कुटूंबसंस्था असे समजले जाई.

**२) जैन धर्म :**

मगध हे जैन धर्मियांचे प्रमुख केंद्र होते. वल्लभी या ठिकाणी प्रसिध्द जैन सभा गुप्तकाळातच झाली. जैन धर्माला स्वातंत्र्य व लोकप्रियता असली तरी नंतर कठीण आचरणामुळे ती कमी होऊ लागली. आचारविरहित परकीय आक्रमकापासून धर्मरक्षण करण्यासाठी जैन धर्म पश्चिम व दक्षिणेस जास्त प्रसारित झाला. या धर्मातील तिर्थंकरांच्या मुर्ती करून त्यांचे पूजन केले जाण्यास सुरूवात झाली. पूजेविषयी काही नियमही सांगीतले गेले. श्वेतांबर व दिगंबर असे दोन्ही पंथ लोकप्रिय होते. श्वेतांबर जैन पंथियांचे मथुरा व वल्लभी हे प्रमुख केंद्र होते.तर उत्तर बंगाल, कर्नाटक व दक्षिण भारतात दिगंबर जैन धर्माचा प्रसार अधिक झाला. या काळात जैन धर्मियांनी अनेक मंदिरे उभारली.

**३) बौद्ध धर्म :**

गुप्तकाळात बौद्ध धर्माला राजाश्रय मिळाला नव्हता. फाहियान या चिनी प्रवाशाने या काळात भारतात अनेक बौद्धविहार व चैत्यगृहे असल्याची माहिती दिली आहे. महायान पंथाची लोकप्रियता वाढण्यास सुरूवात झाली. गौतम बुद्धांची मूर्ती करून तिचे नियमित स्वरूपात पूजन केले जाऊ लागले. अजंठा लेण्यामध्ये गौतम बुद्धांचे जीवन रेखाटले आहे. गौतम बुद्धांना सर्वज्ञ, सर्वशक्तिमान मानण्यास प्रारंभ झाला. कोसांबी, मथूरा, सारनाथ येथे बौद्ध विहार व स्तूप होते. अजंठा, वेरूळ, कान्हेरी येथे बौद्ध भिक्षू संघाचे वास्तव्य होते. या विहारातून बौद्ध धर्म व तत्वज्ञानाचे शिक्षण दिले जाई. बौद्ध धर्माची शिकवण व शैव आणि वैष्णव या वैदिक धर्माच्या संप्रदायांनी मांडलेली भक्तिसंप्रदायाची विचारप्रणाली यात जवळपास सारखेपणा असल्याचे दिसून येते. बौद्ध धर्माने हिंदु धर्मातील अनेक बाबींचा स्विकार केला होता. मगध हे बौद्धांच्या शिक्षणाचे केंद्र बनले होते.

या काळातील राजांनी धार्मिक सहिष्णुततेचे धोरण स्विकारले होते. विविध धर्माचे लोक समाजजीवनात

वास्तव्य असले तरी त्यांच्यात कोणत्याही प्रकारचे धार्मिक संघर्ष किंवा छळ या काळात झाल्याची माहिती मिळत नाही.

● **स्वयंअध्ययन प्रश्न–३.**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. गुप्त राजांनी ........ धर्माला राजाश्रय दिला.

अ) बौद्ध ब) जैन क) वैदिक ड) द्रविड

२. श्वेतांबर व दिगंबर हे ........या धर्मातील दोन उपपंथ आहेत.

अ) बौद्ध ब) जैन क) वैदिक ड) द्रविड

३. वैदिक धर्मात .........हे दोन उपपंथ होते.

अ) हिनयान व महायान ब) श्वेतांबर व दिगंबर क) शैव व वैष्णव ड) यापैकी नाही.

४. विष्णुचे एकुण...... अवतार सांगितलेले आहेत.

अ) सहा ब) आठ क) दहा ड)बारा

५. ......... या लेण्यात गौतम बुद्धांचे जीवन रेखाटले आहे.

अ) हाथीगुंफा ब)अजंठा क) कार्ले ड)भाजे

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. बौद्ध धर्मात कोणते दोन उपपंथ होते.?

२. कोणत्या चिनी प्रवाशाने गुप्त व वाकाटककालीन बौद्धविहार व चैत्यगृहे असल्याची माहिती दिली आहे?

३. गुप्तकाळात कोणत्या ठिकाणी प्रसिध्द जैन सभा झाली?

४. विष्णुच्या अवतार कल्पनेची माहिती कोणत्या गुप्तकालीन पुस्तकातून मिळते?

५. हरिषेण राजा कोणत्या उपपंथाचा होता?

## २.३ सारांश :

उत्तरेत गुप्त व दक्षिणेत वाकाटक सम्राटांनी राजकीय जीवनात सुव्यवस्था प्रस्थापित केली. समाजात शांतता व समृद्धीता निर्माण करून समाजाचा सर्वागिण विकास घडवून आणला. आपल्या कार्यक्षम प्रशासन यंत्रणेबरोबरच आर्थिक संपन्नता प्राप्त केली. साहित्य, विज्ञान, स्थापत्यकला, शिल्प, चित्रकला, वास्तूकला, मंदिरउभारणी, धातू या क्षेत्रात अतुलनीय कामगिरी करून आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविला. म्हणून या काळाला प्राचीन भारताचे सुवर्णयुग म्हटले जाते.

## २.४ पारिभाषिक शब्द :

१) मांडलिक- सार्वभौम सत्तेच्या ताब्यातील राजा.

२) गणराज्य - लोकांच्या समुहाद्वारे चालवलेली शासनव्यवस्था.

३) विहार- बौद्ध भिक्षूंचे निवासस्थान.

४) स्तूप - गौतम बुद्ध व त्यांच्या अनुयायांच्या पार्थिव अवशेषावर अथवा वापरातील वस्तूवर उभारलेली घुमटाकृती वास्तू हे एक पूजेचे प्रतिक होते.

५) चैत्य - बौद्ध भिक्षूंचे निवासस्थान.

६) हूण- प्राचीन काळातील परदेशातील एक भटकी जमात.

७) जागतिक वारसा स्थळ - World Heritage Site

८) युनेस्को- UNESCO : United Nations Educational Scientific and Cultural Organization

## २.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

- **स्वयंअध्ययन प्रश्न-१**

**अ. योग्य पर्याय निवडा.**

१.-अ) श्रीगुप्त　　२) -ब) समुद्रगुप्त　　३) -ब) पहिला चंद्रगुप्त

४) -अ) पहिला विंध्यशक्ती　　५)-ड) हरिसेन

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) शकांचा पराभव करणारा शकारी म्हणून दुसरा चंद्रगुप्त गुप्त सम्राटाला ओळखले जाते.

२) समुद्रगुप्त या गुप्त सम्राटाने आपले राजचिन्ह म्हणून गरूड या पक्षाला स्विकारले.

३) गुप्त घराण्याचा शेवटचा पराक्रमी राजा स्कंदगुप्त विक्रमादित्य हा होय.

४) वाकाटकाचे राज्य दक्षिणेत विदर्भ व मराठवाडा या प्रदेशावर होते.

५) हरिविजय काव्य या काव्याचा निर्माता राजा सर्वसेन हा होय.

- **स्वयंअध्ययन प्रश्न-२**

**अ. योग्य पर्याय निवडा.**

१.- अ) शेतीकर　　२-ब) स्कंदगुप्त　　३.- अ) सुवर्ण

४.- ब) १४६　　५.-ड) गुप्त व वाकाटक.

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. गुप्त काळात संस्कृत शिक्षणाची महत्वाची केंद्रे उजैयिनी,मथुरा व वाराणसी ही होती

२. गुप्त व वाकाटककालीन अजिंठालेण्यांना जागतिक वारसा स्थळ (वर्ल्ड हेरिटेज साईट) म्हणून दर्जा मिळाला आहे.

३. गुप्त व वाकाटककालात रेशीम, घोडे, हस्तिदंत, नीलमणी या वस्तूंची आयात होई .

४. गुप्त व वाकाटककालीन श्रेणी ही व्यापाराशी संबधित होती .

५. गुप्त व वाकाटकालीन व्यापार जावा,सुमात्रा,इराण,रोम या परकीय देशांनी चालत असे.

- **स्वयंअध्ययन प्रश्न–३.**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) – ब) संस्कृत २) – अ) अष्टांगसंहिता ३) – अ) कालिदास

४) – क) कामसूत्र ५) –ड) दिल्ली

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कविकुलगुरू कालिदास याला म्हटले आहे.

२) मुद्राराक्षस या ग्रंथाचा लेखक विशाखादत्त हा होय.

३) पृथ्वी स्वत:च्या आसाभोवती फिरते हा सिद्धांत प्रथम आर्यभट्ट याने मांडला .

४) बृहतगुप्त या शास्त्रज्ञाने ‘गुरूत्वाकर्षणाचा सिद्धांत सांगितला.

५) पंचसिंध्दातिका या ग्रंथाचा वराहमिहीर हा होय.

- **स्वयंअध्ययन प्रश्न–४.**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१.–क) वैदिक २.–अ) जैन ३)–क) शैव व वैष्णव

४.–क) दहा ५.–ब) अजंठा

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. बौद्ध धर्मात हिनयान व महायान हे दोन उपपंथ होते.

२. फाहियान या चिनी प्रवाशाने गुप्त व वाकाटककालीन बौद्धविहार व चैत्यगृहे असल्याची माहिती दिली आहे.

३. गुप्तकाळात वल्लभी या ठिकाणी प्रसिध्द जैन सभा झाली.

४. विष्णुच्या अवतार कल्पनेची माहिती भागवतपुराण या गुप्तकालीन पुस्तकातून मिळते.

५. हरिषेण राजा शैव उपपंथाचा होता.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) टीपा द्या.**

१) स्कंदगुप्त

२) वाकाटकांची वत्सगुल्भ शाखा

३) गुप्त-वाकाटकालीन अर्थव्यवस्था

४) गुप्त-वाकाटक कालीन धर्म

५) गुप्त-वाकाटकालीन साहित्य व विज्ञान

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) समुद्रगुप्ताच्या कार्याची सविस्तर माहिती द्या.

२) दुसरा चंद्रगुप्त विक्रमादित्य कार्याची माहिती द्या.

३) वाकाटक राजघराण्याची माहिती द्या.

४) गुप्त काळाला 'सुवर्णयुग' का म्हणतात?

५) बृहद्‌भारत' ही संकल्पना स्पष्ट करा.

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :

१. आर. एस्. शर्मा-एन्शंट इंडिया, मराठी अनुवादक-वासंती फडके

२. रोमिला थापर- दी पेंग्वीन हिस्टरी ऑफ अर्लि इंडिया, मराठी अनुवादक- प्राचार्य रं.ना.गायधनी व वासंती फडके.

❖❖❖

# घटक – ३

# गुप्तोत्तर कालखंड

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचनः–

  ३.२.१ साधने : ह्युएन्त्संग किंवा युवानश्वांग

  ३.२.२ उत्तरभारत : हर्षवर्धन

  ३.२.३ दक्षिण : बदामाचे सुरूवातीचे चालुक्य

  ३.२.४ दक्षिण भारत : पल्लव

३.३ सारांश.

३.४ स्वंयअध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सरावासाठी स्वाध्याय

३.६ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


## ३.० उद्दिष्टे :

या घटकात आपल्या लक्षात येईल की,

- गुप्तोत्तर कालखंडावरती प्रकाश टाकण्यासाठी युवान श्वांगच्या प्रवासवर्णन या साधनाचे किती महत्व आहे ते समजून घेणे.
- हर्षवर्धनाच्या राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक व प्रशासन व्यवस्थेवरती प्रकाश टाकणे.
- बदामीच्या सुरूवातीच्या चालुक्य राजांच्या इतिहासावरती प्रकाश टाकणे.
- दक्षिण भारतातील पल्लवराजांच्या इतिहासावरती प्रकाश टाकणे.

## ३.१ प्रस्तावना :

प्राचीन भारताच्या इतिहासातील 'सुवर्णयुग' म्हणून गुप्तकाळास ओळखले जाते. या काळात भारतीय

समाजाने सामाजिक, भौमिक, सांस्कृतीक व वाङमयीन क्षेत्रात प्रचंड प्रगती केली होती. गुप्त राजे एकापेक्षा एक सरस, विद्वान, कलाप्रेमी, प्रजाहितदक्ष होते. म्हणून त्यांच्या काळात राज्य वैभवसंपन्नतेच्या शिखरावरती पोहोचले होते. पण या सत्तेच्या ऱ्हासास सुरूवात ६ व्या शतकाच्या मध्यावर झाली. अनेक मांडलीक राजे स्वतंत्र झाले. केंद्रियसत्तेचा दबदबा नाहीसा झाला. यामुळे लहान-लहान प्रादेशिक राज्ये निर्माण झाली. व ती आपापसात सत्तेसाठी संघर्ष करू लागली. या संधीचा फायदा 'हूण' आक्रमकांनी घेतल्याने गुप्तसत्तेचा ऱ्हास झपाट्याने होऊ लागला ही अराजकतेची परिस्थिती पुढीलकाळात 'हर्षवर्धन' या राजाने संपविली. उत्तर भारतात हर्षवर्धनाची बलाढ्य सत्ता उभी रहात असताना दक्षिणेतही 'बदामीचे चालुक्य' आणि 'पल्लव' राजांनी भारतीय इतिहासात आपले अस्तित्व दाखवून दिले या सर्वाचा आढावा घेणे आवश्यक आहे.

## ३.२ विषय विवेचन :

### ३.२.१ साधने - ह्युएनत्संग विा युवानश्वांग (इ.स. ६३० ते इ.स. ६४५) :

इ.स. ६३० ते इ.स. ६४५ या काळात ह्युएत्संग किंवा युअनश्वांग भारतात आला. हा चीनी प्रवासी हर्षवर्धनाच्या काळात भारतात आला. तो १४ ते १५ वर्षे भारतात राहीला. बौद्ध धर्माचा अभ्यास करण्यासाठी आलेल्या युवानश्वांगला भारतभर फिरताना जे अनुभवाला आले, जे पाहिले व ऐकले ती सर्व माहिती प्रवासवर्णन रुपाने लिहून ठेवले आहे. त्या प्रवासवर्णनाचे नाव आहे 'ता-तांग-सिसुकी' (पाश्चात्य जगाची माहिती) भारताच्या इतिहासात या ग्रंथाला खूप महत्व आहे. ह्यूएनत्संग हर्षवर्धनाच्या काळात भारतात आला. बौद्धधर्माचा अभ्यास करण्यासाठी, बौद्ध धर्मिय पवित्रस्थळांना भेटी देणे यासाठी तो खासकरून आला होता. भारतभर अनेक बौद्ध ठिकाणांना त्यांने भेटी दिल्या. या बरोबरच हर्षवर्धन कालीन सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक स्थितीचे बिनचूक वर्णनही केले. त्याचा हा ग्रंथ हर्षवर्धनकाळीन भारताचा इतिहास समजून वर्णनही केले. त्याचा हा ग्रंथ हर्षवर्धनकाळीन भारताचा इतिहास समजून घेण्यासाठी खूप उपयुक्त आहे.

- **पूर्वपिठीका :**

ह्युएनत्संगचा जन्म इ.स. ६०० मध्ये चीनमधील होनास प्रांतातील 'चिन-लिऊ' या ठिकाणी झाला. त्याचा भाऊ बौद्ध धर्माचा अनुयायी होता. ह्यूएनत्संगने 'लोपांग' या बौद्ध धर्माच्या अभ्यासकेंद्रात बौद्ध धर्माचा अभ्यास केला. त्यांने २० व्या वर्षी बौद्धधर्माची दिक्षा घेतली आणि तो बौद्ध भिक्षू बनला. त्यांने चीनमधील सर्व बौद्ध साहित्य अभ्यासले पण बौद्ध धर्माचे मूळतत्वज्ञान समजून घेण्यासाठी आणि या साहित्याचा सखोल अभ्यास करण्यासाठी बौद्धधर्माची भूमी म्हणजे भारतभूमीत जाण्याचा निर्णय घेतला. भारतात जाण्यासाठी चीनच्या सम्राटाने ह्यूएनत्संगला परवानगी नाकारली गुप्तपणे भारतात येण्यासाठी निघाला. गोबीच्या वाळवंटातून अत्यंत कठीण प्रसंगाना सामना देत, समस्यांवरती मात करीत ताश्कंद, बलख व गांधार मार्गे इ.स. ६३० मध्ये काश्मीरमध्ये आला.

**अ) ह्यूनत्संगचा भारतप्रवास :**

ह्यूनत्संग काश्मीरमध्ये दोन वर्षे राहीला व या काळात त्यांने संस्कृत भाषा शिकून घेतली. तेथून तो मथुरा

येथे गेला. हर्षवर्धनाला ही बातमी समजताच त्याने ह्यूनत्संग यास कनोजला येण्याचे आमंत्रण दिले आणि कनोज येथे भरविलेल्या सर्वधर्मपरिषदेत त्याला अध्यक्षस्थान दिले. त्यानंतर तेथून तो प्रयाग, काशी, अयोध्या, श्रावस्ती, कपिलवस्तू, कुशीनगर, पाटलीपूत्र, गया, राजगृह इ. स्थळांना भेटी दिल्या. अनेक विहार व चैत्यगृहांना भेटी दिल्या. नालंदा विद्यापिठात दोन वर्षे राहिला. तेथे त्याने बौद्ध धर्माचा अभ्यास केला. तो पुढे दक्षिण भारतात गेला. तेथील चालुक्यराजा पुलकेशी याच्या दरबारात कांही काळ थांबला. अजिंठ्यांची जगप्रसिद्ध बौद्ध लेणी त्याने पाहिली. या लेण्याविषयी त्याने तोंडभरून स्तुती केली आहे. पुढे तो सौराष्ट्र, कलिंग, ओरिसा येथील स्थळांना भेटी देऊन इ.स. ६४० मध्ये कांजीवरम येथे पोहोचला. संपूर्ण भारतभर भ्रमणामध्ये तत्कालीन राजकीय, धार्मिक व सामाजिक परिस्थितीचे सूक्ष्म निरिक्षण केले. आणि शेवटी इ.स. ६४४ मध्ये सिंध, खैबरखिंड, काबूल, हिंदूकूश, खोतान मार्गे चीनला निघाला इ.स. ६४५ मध्ये तो चीनमध्ये पोहोचला. परत जाताना त्याने गौतमबुद्धाच्या पार्थिवदेहाचे अवशेष, बुद्धाची सुवर्णमूर्ती, चंदनाची मूर्ती, सौप्यप्रतिमा, महायानपंथाचे १२० ग्रंथ, आणि बौद्धतत्वज्ञानाचे जवळजवळ ६५० हून अधिक ग्रंथ सोबत नेले. हे सर्व साहित्य घेऊन तो चीनमध्ये पोहोचला तेव्हा तेथील सम्राटाने त्याचे फार मोठे स्वागत केले. त्याने सोबत नेलेल्या साहित्यावर, पाहिलेल्या अनुभवावर 'तातांगसियुकी' हा प्रवासवर्णनपर ग्रंथाचे लेखन केले. शेवटी त्याचा मृत्यू इ.स. ६६४ मध्ये झाला.

**ब) ह्यूएनत्संगच्या वर्णनातील तत्कालीन भारत :**

आपल्या १४ वर्षाच्या भारतभ्रमणातून ह्यूएनत्संगने तत्कालीन भारताच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतीक स्थितीवरती प्रकाश टाकला आहे. आपल्या प्रवासवर्णनातून तत्कालीन, परिस्थितीचे नेमकेपणाने चित्रण केले आहे.

सम्राट हर्षवर्धनाच्या काळात तो भारतात आला होता. हर्षवर्धनाची राजधानी कनोज येथे बराचकाळ तो राहील्यामुळे तेथील वर्णन त्याच्या प्रवासवर्णनात आले आहे. तो म्हणतो की हर्षवर्धनाजवळ एक लाख घोटदळ, साठहजार हत्ती, आणि असंख्य पायदळ होते. उत्तर भारताप्रमाणे द. भारतातही दुसरा पुलकेशी हा सुद्धा पराक्रमी राजा होता. त्यांनी अनेक दौरे काढले असल्याचे तो सांगतो. जुनी प्रसिद्ध शहरे ओस पडली होती, नविन कांही नगरे निर्माण झाली होती. पाटलीपूत्रचे वैभव संपले होते आणि कनोज या राजधानीला महत्व प्राप्त झाले होते असे तो सांगतो. कनोजची त्याने खूप स्तूती केली आहे. तेथील वाडे, सुंदर बागा, तलाव याशिवाय धनसंपन्न व सुखी लोक, कुलीन व प्रामाणिक होते. तटबंदी हे गावचे, नगराचे वैशिष्ट्यच होते. राज्यभर शांतता व सुरक्षितता होती. त्याने हर्षवर्धनाच्या दानधर्माचे तोंड भरून स्तुती केली आहे. उत्तमरस्ते, झाडी, पाणपोई, धर्मशाळा याचेही वर्णन त्याने केले आहे.

आपल्या प्रवासवर्णनात तो म्हणतो की भारतात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण आहेत. प्रत्येकवर्णाचे व्यवसाय ठरलेले आहेत. वर्णसंकर हा गुन्हा समजला जात होता. एकमेकांमध्ये रोटी-बेटी व्यवहार होत नसत. ब्राह्मण हा वर्ण सर्वश्रेष्ठ मानला गेला तर शूद्र हा कनिष्ठवर्ण होता. सतीप्रथा अस्तित्वात असल्याचे तो सांगतो. गावच्या वेशीबाहेर मांग, महार, गारूडी या खालच्या वर्गातील लोकांना रहावे लागत होते. शूद्रांचा स्पर्श सुद्धा अपवित्र मानला गेला होता. या काळात सोने व चांदीची नाणी प्रचलित होती. मराठी माणसाबद्दल

ह्यूएनसंग म्हणतो, हे लोक स्वाभिमानी, शूर, सच्चे व साधे आहेत. उपकारकर्त्याबाबत ते कृतज्ञ असतात, पण ते अपमानाचा बदला घेतात.

तत्कालीन धार्मिक परिस्थितीचे वर्णन करताना ह्यूएनत्संग म्हणतो की, समाजामध्ये ब्राह्मण वर्गाचे वर्चस्व होते हा वर्ग धार्मिक विधी करत असे. नद्यांच्या संगावरील स्नानाला लोक पवित्रमानत होते. कारण येथे स्नान केल्यास पुण्य मिळते अशी लोकांची समजूत होती. येथे बौद्ध धर्माचा प्रसार होत होता पण हूणांच्या आक्रमणामुळे त्यास उतरती कळा लागली होती.

आपल्या प्रवासवर्णनात तो म्हणतो, आर्थिकदृष्ट्या भारतातील लोक सुखी व संपन्न आहेत. येथील शेती सुपीक आहे. शेतकरी अत्यंत कष्टाळू आहेत. त्यांची रहाणी अत्यंत साधी आहेत. शेती बरोबरच छोटे-छोटे उद्योग आहेत. सूती व रेशीम कापड बनविण्यात हे लोक माहीर आहेत. अमिनीमार्गे मोठा व्यापार चालत असे. मोठ्या नद्या व समूद्रमार्गेही भारतातून परदेशात मालाची ने-आण होत होती.

तत्कालीन भारतात विद्यादानाचे मोठे काम चालत होते असे ह्यूएनत्संग म्हणतो. हिंदू धर्माचे मठ, बौद्ध विहारे येथून हे मोफत शिक्षण दिलेजात होते. मठ आणि विहारांना श्रीमंतलोक व राजे मोठमोठ्या देणग्या देत असत. बोद्ध धर्माचे शिक्षण प्राकृत भाषेत, तर हिंदू धर्माचे शिक्षण हे संस्कृत भाषेत दिले जात होते. नालंदा, वल्लभी ही मोठी विद्यापीठे भारतात असल्याचे तो सांगतो. नालंदा विद्यापिठात एकहजार पाचशे प्राध्यापक तर आठहजार पाचशे विद्यार्थी होते. विद्यापीठाचे नियम अत्यंत कडक व शिस्तबद्ध होते. अनेक विषयावरती विद्यापीठात वादविवाद चालत होते असे तो आपल्या प्रवासवर्णनात लिहतो. तो म्हणतो, जगातील कित्येक विद्यार्थी भारतात या विद्यापिठात शिकण्यासाठी येत असत.

थोडक्यात भारतातील सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतीक माहिती एकत्र करून त्याचे चीनीलोकांना समजण्यासाठी चीनी भाषेत भाषांतर करणारा, बौद्ध तत्वज्ञान चीनला समजावून सांगणारा परकीय इतिहासकार ह्यूएनत्संगला भारतात मानाचे स्थान आहे. म्हणूनच त्याला 'प्रवासीयात्रेकरूंचा राजा' असे म्हणतात.

- **स्वंयअध्ययन प्रश्न .१**

**एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. ह्यूएनत्संग हा चीनी प्रवासी भारतात कोणत्या साली वास्तव्यास होता?

२. ह्यूएनत्संगने कोणता प्रवासवर्णनपर ग्रंथ लिहीला?

३. ह्यूएनत्संग कोणत्या धर्माचा अभ्यास करण्यासाठी भारतात आला होता?

४. ह्यूएनत्संगने कोणत्या विद्यापीठामध्ये बौद्ध व संस्कृततत्वज्ञानाचा अभ्यास केला?

५. इतिहासकार 'प्रवासीयात्रेकरूंचा राजा' असे कोणास संबोधतात?

### ३.२.२ उत्तर भारत : हर्षवर्धन (इ.स. ६०६ ते इ.स. ६४७)

गुप्त साम्राज्य मोडकळीस आल्यावर उत्तरभारतात इ.स. ६ व्या शतकात अनेक लहानमोठी राज्ये अस्तित्वात आली. कनोजच्या पश्चिमेला 'स्थानेश्वर' या ठिकाणी वर्धन घराणे उदयास आले. सध्याच्या पंजाब प्रांतात हे राज्य होते. स्थानेश्वर येथे वर्धन वंशाची स्थापना पुष्यभूती याने केली. त्याच्यानंतर नरवर्धन व राज्यवर्धन प्रथम हे वर्धन राजे होऊन गेले. त्याच्यानंत सत्तेवर आला तो राज्यवर्धन प्रथमचा मुलगा आदित्यवर्धन व आदित्यववर्धनानंतर त्याचा पुत्र प्रभाकर वर्धन सत्तेवर आला. याच्याकाळात वर्धन सत्तेचा विस्तार मोठ्याप्रमाणात झाला. प्रभाकर वर्धनच्या काळात त्याचे साम्राज्य गुजरात, पंजाब, गांधार, माळव्यापर्यंत पसरले होते. प्रभाकरवर्धनचा विवाह माळव्याच्या यशोवर्माच्या मुलीशी झाल्याने त्याचीही प्रतिष्ठा वाढली. प्रभाकरवर्धन यास तीन मुले होती १) राज्यवर्धन दुसरा २) हर्षवर्धन ३) राजश्री  राजश्रीचा विवाह कनोजचा राजा गृहवर्मा याच्याशी झाला होता. बंगालचा शासक राजा शशांक आणि कनोजचा राजा गृहवर्मा यांच्यामध्ये शत्रूत्व होते. शशांकने गृहवर्मावरती आक्रमण करून त्यास ठार मारले आणि राजश्री हिला कैद करण्यात आले. तसेच वर्धनघराण्याच्या सत्तेवर असलेल्या राज्यवर्धनालाही शशांकने कटकारस्थान करून ठार मारले. राज्यवर्धनच्या मृत्यूनंतर इ.स. ६०६ मध्ये हर्षवर्धन स्थानेश्वरच्या गादीवर बसला.

**अ) हर्षवर्धनच्या अभ्यासाची साधने :**

हर्षवर्धनाचा अभ्यास करण्यासाठी वाङ्मयीन भौतिक साधने मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत.

**१. हर्षवर्धनची नाटके :**

हर्षवर्धनने 'रत्नावली', 'प्रियदर्शिका', आणि 'नागानंद' अशी तीन नाटके लिहील्याचा उल्लेख सापडतो. बौद्ध आणि हिंदू धर्म यांच्यामध्ये समझोता घडवण्याचे जे काम हर्षवर्धनाने केले होते त्याची माहिती नागानंद या नाटकात पहावयास मिळते. तर रत्नावली आणि प्रियदर्शिका या नाटकामधून प्रेमकथेचे कथानक रंगविले आहे या साहित्यामधून हर्षवर्धनाची माहीती मोठ्याप्रमाणात उपलब्ध होते.

**२. शिलालेख व ताम्रपट :**

बंटाखेडा आणि सोनपतच्या शिलालेखामधून हर्षवर्धनाच्या व्यक्तीमत्वाच्या विविध पैलू वरती प्रकाश टाकता येतो. त्याच्या कालखंडावरती प्रकाश टाकता येतो. मौखरी, प्रतिहार, चालूक्य व मैत्रक या राजघराण्यांच्या शिलालेखातून हर्षवर्धनाच्या परराष्ट्रधोरणाची माहिति मिळू शकते.

**३. बाणभट्टाचे हर्षचरित्र :**

हर्षवर्धनाच्या दरबारात असलेल्या बाणभट्ट या कवीने 'हर्षचरित्र' हा महत्वाचा ग्रंथ लिहीला. तो संस्कृत भाषेचा अभ्यासक होता. त्याने हर्षवर्धनाची कारकिर्द जवळून पाहिली होती. त्यामुळे त्याच्या ग्रंथात स्थानेश्वरचा इतिहास, हर्षवर्धनाच्या युद्धमोहिमा, त्याची शासनव्यवस्था, तत्कालीन समाजजीवन, रूढी, परंपरा, हर्षवर्धनाचा दरबार इ. ची सविस्तर माहिती या ग्रंथात त्याने दिली आहे. हर्षचरित्रामध्ये कांही दोषही दिसतात. यामध्ये

बाणभट्टाने हर्षवर्धनाची वारेमाप स्तुती केली आहे. ती कांहीअंशी खोटी वाटते, कालानुक्रम योग्यपद्धतीने लिहिला नाही. असे असले तरी हर्षवर्धन आणि तत्कालीन परिस्थिती समजून घेण्यासाठी हा ग्रंथ अत्यंत उपयुक्त आहे.

**ब) हर्षवर्धनापुढील समस्या :**

इ.स. ६०६ साली स्थानेश्वर राजा बनलेल्या हर्षवर्धनासमोर अनेक समस्या निर्माण झाल्या.

१. हर्षवर्धनाला राज्यकारभाराचा कोणताही अनुभव नव्हता कारण राज्यारोहण प्रसंगी त्याचे वय १६ वर्षाचे होते.

२. राजरोहणप्रसंगी वडीलांचे निधन झालेले होते व आई यशोमती सती गेली होती.

३. बहीण राजश्री विधवा झाली होती व ती विंध्यपर्वतात निघून गेली होती तिचा शोध घेणे ही हर्षवर्धनापुढील मोठी समस्या होती.

४. बंगालचा शासक शशांक याने हर्षवर्धचा मोठा भाऊ राज्यवर्धनचा खून कला होता, त्याचा बदला घेणे व आपले सामर्थ्य वाढविणे.

५. हर्षाची बहीण राजश्री विधवा झाल्यामुळे कनोजचा वारसाचा प्रश्न सोडविणे.

६. स्थानेश्वर आणि कनोजचा राज्यकारभार सांभाळणे व साम्राज्यविस्तार करणे.

**क) हर्षवर्धनाची कामगिरी :**

**१. बहिण राजश्रीचा शोध :**

राज्यरोहणानंतर हर्षवर्धनाने पहिले काम हाती घेतले ते म्हणजे आपली बहीण राजश्रीचा शोध घेणे. राजश्री ही मौखरी घराण्यातील राजा गृहवर्मा याची पत्नी होती. ती देवगुप्ताच्या ताब्यात होती. देवगुप्त हा माळव्याचा राजा असून त्यांने हर्षवर्धनाच्या भावाला ठार मारणाऱ्या बंगालच्या शशांकला मदत केली होती. आणि राजश्रीला कैदेत ठेवले होते व कनौजवरती कब्जा प्राप्त केला होता. त्यामुळे मोठ्या सैन्यानिशी हर्षवर्धनाने देवगुप्तावरती आक्रमण केले. हर्षवर्धनाच्या सैन्यासमोर देवगुप्ताचा टिकाव लागला नाही. दरम्यान बहिण राजश्रींने देवगुप्ताच्या बंदिवासातून पलायन केले आणि ती विंध्य पर्वताकडे निघून गेली.

हर्षवर्षनाने बहिणीच्या शोधासाठी विंध्यपर्वताकडे कूच केले. वाटेत भिल्लजमातीचा राजा व्याघ्रकेतू, बौद्धभिक्षू दिवाकर मित्र यांच्या मदतीने राजश्रीचा शोध घेतला. राजश्री ही उद्विग्न होऊन सती जाण्याच्या विचारात होती. हर्षवर्धनाने तिची समजूत काढली. आणि कनौजकडे परत आणले. राजश्रीच्या शोधमोहिमेत हर्षाला सेनापती भंडीचे खूपच सहकार्य लाभले.

**२. बंगालच्या शशांकचा पराभव :**

शशांक हा बंगालच्या गौड घराण्यातील राजा होता. त्याची माळण्याचा राजा देवगुप्त याच्याशी मैत्री होती. या दोघांनी मिळून कनौजचा राजा गृहवर्मा याला ठार मारले. यामुळे राजा शशांकचे महत्व वाढले होते.

त्याचबरोबर राज्यवर्धनालाही गोड बोलून फसविले आणि बेसावध अवस्थेत असलेल्या राज्यवर्धनालाही शशांकने ठार मारले. या विविध कारणामुळे हर्षवर्धनाच्या मनात शशांकविषयी कमालीची चीड निर्माण झाली. या मोहिमेत हर्षाचा सेनापती भंडी याला शशांकचा भाऊ माधवगुप्ताने मदत केली. हर्षवर्धन आणि शशांक या दोघांमध्ये जवळजवळ इ.स. ६३० पर्यंत म्हणजे शशांकच्या मृत्यूपर्यंत संघर्ष चालू होता. मात्र शशांकाचा निर्णायक पराभव हर्षवर्धनाला करता आला नाही. परंतू त्याच्या शिलालेखावरून गौड, उटकळ, मिथिला, सिंध, नेपाळ, सुराष्ट इ. प्रदेशावरती राज्य होते असे दिसते.

**३. कनोजच्या वारसाचा प्रश्न सोडविला :**

बहिण राजश्रीच्या शोधानंतर हर्षवर्धनाने आपल्या सामर्थ्यात वाढ केली. शशांक आणि देवगुप्त या दोघांपासून कनोजला मुक्त केले. राजश्री निपुत्रिक असल्यामुळे कनोजच्या वारसाचा प्रश्न निर्माण झाला होता. कनोजच्या सभेने व मंत्रिपरिषदेने हर्षवर्धनानेच कनोजचे राजपद सांभाळावे असा ठराव पास केला आणि हर्षाने कनोजच्या प्रशासनाची घडी बसविली व कनोजच्या वारसाचा प्रश्न निकालात काढला.

**४. आसामच्या राजाशी मैत्री करार :**

कामरूप (आसाम) चा राजा भास्करवर्माने हर्षाकडे आपला दूत पाठवून मैत्री करण्याची इच्छा व्यक्त केली. हर्षवर्धनानेही तात्काळ इ.स. ६१३ मध्ये हा मैत्री करार केला.

**५. चालुक्य राजा दुसरा पुलकेशी याच्याशी संबंध :**

दक्षिणेतील चालुक्यवंशीय राजा दुसरा पुलकेशी याचे प्रचंड सामर्थ्य होते. तो दक्षिणाधिपती होता. हर्षवर्धनाची दक्षिणेत राज्यविस्तार करण्याची इच्छा होती. त्याप्रमाणे तो जेव्हा दक्षिण मोहिमेवरती निघाला तेव्हा दुसरा पुलकेशी यांने नर्मदानदीच्या काठीच हर्षाला अडविले. या दोघांमध्ये युद्ध झाले किंवा नाही याबाबतीत इतिहासकारांच्यामध्ये मतभेद आहेत. मात्र या दोघांच्यामध्ये करार झाला आणि त्यानुसार दोघांनीही नर्मदा नदी ही आपल्या राज्याची सीमा म्हणून मान्य केली. आणि दोघांनीही एकमेकांच्या प्रदेशावरती आक्रमण न करण्याचे मान्य केले.

**६. वल्लभीच्या राजाला मांडलिक बनविले :**

वल्लभीचा राजा ध्रुवसेन दुसरा याचा इ.स. ६३५ मध्ये हर्षवर्धनाने पराभव केला. त्याला आपला मांडलिक बनविले. याशिवाय हर्षवर्धनाने आपली मुलगी ध्रुवसेनदुसरा याला देऊन त्याच्याशी नातेसंबंध निर्माण केले.

**७. चीनशी मैत्री :**

हर्षवर्धनाने इ.स. ६४१ मध्ये चीनला एक शिष्टमंडळ पाठविले व मैत्रीची इच्छा व्यक्त केली. त्यामुळे चीनचेही एक शिष्टमंडळ भारतात आले आणि हर्षवर्धन व चीन यांच्यामध्ये मैत्रीचे संबंध प्रस्थापित झाले.

**८. ओरिसाप्रांत जिंकला :**

हर्षवर्धनाने इ.स. ६४३ मध्ये ओरिसा प्रांत जिंकला. पंजाब व काश्मिर, माळवा, राजपुताना, सौराष्ट्र येथील

राजांनी हर्षाचे मांडलीकत्व मान्य केले. हर्षाचे उत्तरभारतात सत्ता होती पण दक्षिण भारतात त्याची सत्ता विस्तारता आली नाही.

**ड) हर्षवर्धनाचे धार्मिक धोरण :**

वर्धन घराण्याचा संस्थापक पूष्यभूती हा शैवपंथीय होता. हर्षवर्धनाचे आजोबा आणि वडिल सूर्योपासक होते. हर्षाचा भाऊ राज्यवर्धन व बहिण राजश्री बौद्धधर्मीय होते. दिवाकर मित्र आणि बहिण राजश्री यांच्यामुळे हर्षवर्धन पुढील काळात बौद्ध धर्माकडे आकृष्ट झाला. तो महायानपंथीय बौद्ध धर्माकडे वळला. यातच इ.स. ६४३ मध्ये त्याची आणि ह्यूएनत्संगची भेट झाली. अणि त्याचाही प्रभाव त्याच्यावर पडला की ज्यामुळे तो बौद्धधर्माकडे आकृष्ट झाला. सम्राट अशोकाप्रमाणे तोही अहिंसावादी बनला. त्याने आपल्या साम्राज्यात.

१) प्राणीहत्या बंद केली. २) मांसाहार निषिद्ध ठरवला. ३) बौद्ध विहारे बांधली. ४) चैत्य व स्तूप बांधले. ५) नालंदा, वल्लभी बौद्ध विद्यापीठातील बौद्ध चळवळीला सहकार्य केले. ६) दुर्मिळ बौद्ध ग्रंथांचे हस्तलिखित तयार करण्यासाठी प्रयत्न केले. ७) ओरिसामध्ये महायान बौद्ध पंडीतांची विद्वतपरिषद बोलाविली इ.

**१. कनौजची सर्वधर्मपरिषद (इ.स. ६४३) :**

इ.स. ६४३ मध्ये महायानपंथाचा प्रसार करण्यासाठी हर्षवर्धनाने कनौज(उत्तरप्रदेश) येथे एक सर्वधर्मपरिषद भरविी या परिषद्रचे अध्यक्ष चीनी प्रवासी ह्यू-एन-त्संग याने भूषविले. ही परिषद एकूण २३ दिवस चालली. या परिषदेचे वैशिष्ट्य म्हणजे बौद्धभिक्षूशिवाय या परिषदेला जैन व ब्राह्मण पंडित उपस्थित होते. या परिषदेला जवळजवळ ३००० बौद्ध भिक्षू, तितकेच वैदिक पंडित, नालंदा विद्यापिठातील १०० प्रतिनिधी व तज्ञ हजर होते. याशिवाय हर्षांचे मांडलिक राजे उपस्थित होते. या परिषदेमध्ये ह्यू-एन-त्संग याने महायान पंथीय तत्वज्ञान मोठ्या हिरीरीने मांडले. कनौजमध्ये या परिषदेसाठी एक प्रचंड विहार बांधले. या विहारात सहाफूट उंचीची गौतम बुद्धांची सुवर्णमुर्ती प्रतिष्ठापीत करण्यात आली. ही परिषद संपेपर्यंत बुद्धांच्या या सुवर्णमूर्तीची मिरवणूक दररोज काढली जात असे. या मिरवणूकीत ३०० हत्ती असत असा उल्लेख सापडतो. तर स्वतः हर्षवर्धन या पालखीला खांदा देत असे. महायानपंथाविरोधी लोकांना ह्यू-एन-त्संगचे वाढते महत्व न आवडल्याने त्याचा खून करण्याचा प्रयत्न केला पण तो अयशस्वी झाला. त्यामुळे हर्षवर्धनाने शेकडो लोकांना शिक्षा ठोठावल्या.

**२. प्रयाग येथील मोक्षपरिषद – (इ.स. ६४३) :**

कनौजच्या सर्वधर्मपरिषदेनंतर प्रयाग(अलाहाबाद) येथील गंगा-यमुनेच्या संगमावरील महादानभूमीवर ही मोक्षपरिषद भरविली. ही सहावी परिषद होती. दर ५ वर्षांनी अशी परिषद हर्षवर्धन भरवित असे. ५ वर्षाच्या काळात जमा झालेली सर्व संपत्ती तो जनतेमध्ये वाटून टाकत असे. या परिषदेला जवळजवळ ५०००० प्रतिनिधी सहभागी झाले होते. तर १८ राजे उपस्थित होते. ही परिषद ७५ दिवस चालत असे. पहिल्या दिवशी गौतम बुद्धांच्या प्रतिमेची, दुसऱ्या दिवशी सूर्याच्या प्रतिमेची आणि तिसऱ्या दिवशी शिवाच्या प्रतिमेची मिरवणूक काढली जात असे. ह्यू-एन-त्संगच्या प्रवासवर्णनात नोंदविल्याप्रमाणे हर्षवर्धनाने आपली सर्व संपत्ती या परिषदेत वाहून

टाकली. शेवटी आपल्या अंगावरील कपडे, दागदागिनेही वाटून टाकले. अशाप्रकारे दानधर्म करणारा हर्षवर्धन हा जगाच्या इतिहासातील एकमेव दानशूर राजा होता.

● **हर्षवर्धनाची योग्यता :**

इ.स. ६०६ मध्ये हर्षवर्धनाचे राज्यारोहण झाले. त्यांने ४० वर्षे सत्ता सांभाळल्यानंतर इ.स. ६४७ मध्ये त्याचा मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूमुळे प्राचीन भारतातील एका वैभवशाली पर्वाची समाप्ती झाली. प्राचीन भारताच्या इतिहासातील शेवटचा सम्राट म्हणून हर्षवर्धनाकडे पाहिले जाते. आदर्श राज्यकर्ता, साम्राज्यनिर्माता, कुशल प्रशासक, विद्या व कलांचा आश्रयदाता, दयाळू, दानशूर व धर्मनिष्ठ राजा म्हणून हर्षाची योग्यता तपासावी लागते.

**१) आदर्श राज्यकर्ता :**

प्रजेचे संरक्षण आणि संवर्धन हेच राजाचे मूळ कर्तव्य असते असे मानणारा व त्याप्रमाणे आपला वर्तनव्यवहार करणारा सम्राट हर्षवर्धन हा एक आदर्श राज्यकर्ता होता. समूद्रगुप्त आणि सम्राट अशोक या दोन महान राज्यकर्त्यांमधील गुणांचा संगम हर्षवर्धनामध्ये दिसतो. तो राज्यात दौरे काढून प्रजेची विचारपूस करीत असे. प्रजेमध्ये राहून राज्यकारभार करणारा प्राचीन भारतातील हा एक आगळावेगळा राजा होता.

**२) बलशाही साम्राज्याचा निर्माता :**

बलशाही साम्राज्याचा निर्माता म्हणून हर्षवर्धनाने नावलौकीक मिळविला. उत्तम योध्याचे गुण त्याच्यामध्ये वयाच्या १४ व्या वर्षीच दिसले होते. हुणांचे आक्रमण परतवून लावले, दिग्विजयी मोहीम यशस्वी केली, दक्षिणभारत सोडता संपूर्ण भारताच्या प्रदेशावरती आपले साम्राज्य निर्माण केले.

**३) आदर्श बंधू :**

आदर्श बंधू म्हणून हर्षवर्धनाची योग्यता श्रेष्ठ दर्जाची होती. बहिण राजश्रीचा शोध घेतला. ज्येष्ठबंधू राज्यवर्धनाच्या मूत्यूला जबाबदार असलेल्या देवगुप्ताचा पराभव केला. कनोजच्या वारसाचा प्रश्न योग्यप्रकारे हताळून प्रजेला शिस्तबद्ध प्रशासन दिले.

**४) विद्या व कलाप्रेमी सम्राट :**

हर्षवर्धन हा विद्यांचा व कलांचा आश्रयदाता होता. 'हर्षचरित' लिहीणारा बाणभट्ट हर्षाच्या दरबारात होता. स्वतः हर्षवर्धन हा उत्तम नाटककार होता. 'रत्नावली' 'प्रियदर्शिका' व 'नागानंद' अशी तीन नाटके त्याने लिहली. बौद्ध विद्वान 'दिवाकर मित्र' हर्षाच्या आश्रयाला होता. हरिदत्त आणि 'सूर्यशतकाचा' कर्ता 'मयूर' हे सुद्धा त्याच्या आश्रयाला होते.

**५) निधर्मी सम्राट :**

सम्राट हर्षवर्धन हा सर्वधर्मसमभाव मानणारा राजा होता. बौद्ध धर्माला दिलेल्या राजाश्रयामुळे त्याला 'भारताचा दुसरा अशोक' असे संबोधले जाते. दयाळूपणा आणि धर्मनिष्ठता हे गुण हर्षवर्धनाच्या अंगी होते. बौद्ध

धर्माच्या प्रचारप्रसारासाठी 'अंहिसा' या तत्वाचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना जनतेला दिल्या होत्या. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्याला जबरक्षिची तरतूद केली होती. हर्षवर्धनाने सहावेळा धर्मपरिषद भरविली. दर पाच वर्षांनी ही परिषद भरविली जात असे. ही परिषद गंगा-यमूना नदीच्या संगमाकाठी राज्यातील 'प्रयाग' या ठिकाणी भरविली जात असे. या परिषदेमध्ये राज्यातील जनतेला आपली सर्व संपत्ती वाटून टाकीत असे. थोडक्यात धर्माच्याबाबतीत हर्षवर्धन हा सहिष्णू होता.

- **हर्षकालीन शासनव्यवस्था :**

संपूर्ण उत्तरभारतभर पसरलेली वर्धन साम्राज्याची प्रशासन व्यवस्था ही वैशिष्ट्यपूर्ण होती. गुप्तसाम्राज्याप्रमाणे होता. सतत परिश्रम, प्रजेच्या कल्यासासाठी झटण, जनकल्याणाच्या योजना राबविणे, राज्यामध्ये शांतता व सुव्यवस्था निर्माण होण्यासाठी योग्य प्रकारची प्रशासनव्यवस्था हर्षाने आखली होती. म्हणूनच ती गुप्तशासनापेक्षा अधिक चोख व कार्यक्षम होती.

**१) सम्राट :**

प्रशासनव्यवस्थेमध्ये राजा हा सर्वोच्य स्वामी होता. न्यायदान करणे, लष्करी कारवाई संबंधी सर्व अधिकार राजाला असे. अनियंत्रित राजेशाही असली तरी अनियंत्रित नव्हता. मंत्रीपरिषदेचा सल्ला, धर्मसभेचा निर्णय, लोकनिंदा, धर्म व नितीबंधने इ. गोष्टींचे नियंत्रण राजाच्या अधिकारावर होते. हर्षवर्धन प्रशासनामध्ये दररोज इतका मग्न असे की, त्याची भेट घेणे मोठे अवघड काम होते. सतत राज्यात दौरे काढलीजात होती. गुप्तभेटी घेतल्या जात होत्या. अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करणे, पदच्यूत करणे, इ. बाबतीत अंतिम सत्ता ही हर्षाच्या हाती होती. थोडक्यात हर्षवर्धन हा लोककल्याणकारी सम्राट होता. तो स्वतःला लोकसेवक समजत असे.

**२) मंत्रीपरिषद :**

राज्यकारभारात मदत करण्यासाठी मंत्रीपरिषदेची निर्मिती हर्षवर्धनाने केली होती. एका-एका मंत्र्याकडे एका-एका विभागाची जबाबदारी दिली जात होती. हर्षवर्धन हा जरी सर्व प्रकारचे निर्णय घेत असलातरी मंत्रिपरिषदेशी सल्ला मसलत करूनच कोणताही निर्णय घेत असे. राज्याचा वारस ठरविणे, राज्याची सुरक्षितता, विस्तार, आर्थिक व्यवस्थापन, परराष्ट्र संबंध इ. प्रश्नांबाबतीत मंत्रीपरिषद राजाला सल्ला देत असे. योग्य सल्ल्याचा विचार हर्षवर्धन करित असे.

**३) प्रादेशिक विभाग :**

राज्यकारभारच्या सोयीसाठी साम्राज्याचे विभाजन निरनिराळ्या प्रांतात करण्यात आले. भुक्ती (प्रांत), विषय (जिल्हा), भोग (महाल), पृथम (तालुका), व ग्राम (खेडे) असे प्रशासनाचे विभाग होते. प्रांताच्या प्रमुखाला भुक्ती म्हटले जाते असे तत्कालीन ताम्रपटातून व शिलालेखातून प्रांताचे अधिकारी म्हणून लोकपाल, महासामंत, या अधिकाऱ्यांचा उल्लेख आढळतो.

**४) जिल्हाप्रशासन :**

भुक्ती (प्रांत) ची विभागणी विषयात (जिल्हा) केली जात असे. आयुक्त, मीमांसक, भागपती, महाप्रतिहार

इ. अधिकारी जिल्हाप्रशासन पहात असत.

**५) तालुका व ग्रामप्रशासन :**

विषयाची विभागणी भोग(महाल) व पृथम (तालुका) मध्ये केलेली होती. ग्राम हा प्रशासनाचा शेवटचा घटक होता. यातील अधिकारी म्हणजे महत्तर, शौलिकक, आग्रहारिक, मौलिक (वनरक्षक) धृवाधिकरण, तलवाहक, भांडारगाराधिकृत इ. अधिकारी होते. अक्षपटलिक हा ग्रामस्तरावरचा अधिकारी होता. या सर्व अधिकाऱ्यांची कामे निश्चित केलेली होती. ''धृवाधिकरण' हा जमीन महसूल वसूल करणारा अधिकारी तर 'तलवाटक' हा गावचे उत्पन्न व खर्च पहाणारा अधिकारी.

- **महसूल व्यवस्था :**

चीनी प्रवासी ह्यूएनत्संगच्या माहितीनुसार हर्षवर्धनाने आपल्या साम्राज्यातील जमिनीचे चार भाग केले होते. त्यापैकी एक राज्यव्यवस्थेच्या खर्चासाठी, दुसरा दानधर्मासाठी, तिसरा विद्वान लोकांना मदत करण्यासाठी, आणि चौथा धार्मिक कारणासाठी राखून ठेवला जात असे. तीन प्रकारचे कर जनतेकडून घेतले जात होते. भागकर किंवा 'भूमीकर' हा रोख रकमेत किंवा धान्याच्या स्वरूपात वसूल केला जात असे. शेतकरी व व्यापाऱ्यांकडून 'नगदीकर' घेतला जाई. त्याला 'हिरण्य' असे संबोधले जात असे. आणि शेतीतून येणाऱ्या उत्पन्नाच्या १/६ भाग राजाला कर म्हणून द्यावा लागत असे. याशिवाय मांडलीक राजाकडून मिळणारा कर, नजराणे हे सरकारमध्ये जमा होत असे. सरकारी उत्पन्नापैकी निम्मे उत्पन्न राज्यकारभारासाठी व उर्वरीत उत्पन्न विद्या, कलांना आश्रय, दानधर्म यासाठी खर्च केला जात असे.

- **सैन्यव्यवस्था :**

लष्करी प्रशासन हा केंद्रीय प्रशासनाचाच एक भाग होता. हर्षवर्धनाने विशाल लष्कराची उभारणी केली. बलाढ्य साम्राज्याच्या रक्षणासाठी सैन्यव्यवस्थाही तितकीच भक्कम असावी लागते याची जाणीव असल्याने हर्षाने सैन्यभरती मोठ्या प्रमाणात केली. त्याच्या पायदळात ६ लाख सैन्य, घोडदळात १ लाख घोडे, हत्तीदळात ६०,००० हत्ती होते याशिवाय मित्र व मांडलीक राजाकडूनही युद्धकाळात सैन्याची मदत होत असे. त्याच्या घोडदळात अफगाणिस्तान, इराण, अरबस्तान येथील जातीवंत घोड्याची वर्णी होती. दवंडी पिटून लायक लोकांची सैन्यात भरती केली जात असे. राजाच्या शरीररक्षकदलात शूर व विश्वासू लोकांची भरती केली जात असे.

- **न्यायव्यवस्था :**

ह्यूएनत्संगच्या वृत्तांतानुसार हर्षाच्या काळात कायदे कडक असल्यामुळे गुन्हेगारांची संख्या अतिशय कमी होती. राजद्रोहाच्या गुन्ह्यासाठी जन्मठेप तर हातपाय तोडण्याही शिक्षा होत्या. गुन्ह्याचे स्वरूप पाहून शिक्षा दिली जात असे. हर्षवर्धनाच्या काळात गुप्त काळापेक्षा जादा कडक फौजदारी कायदा होता. न्यायदानासाठी स्मृती साहित्यातील नियम वापरले जात होते. साक्षीदारांच्या साक्षी तपासून न्यायाधिश न्याय देत असत. राजा हाच सर्वोच्च न्यायाधीश होता.

- **हर्षवर्धनकालीन सांस्कृतिक जीवन :**

हर्षवर्धन हा न्यायी, सदाचारी, जनकल्याण हेच राज्यकारभाराचे मुख्य सूत्र आहे असे मानणारा विद्वान व पराक्रमी राजा असल्यामुळे त्याने विशाल साम्राज्याची उभारणी केली. मिळविलेल्या साम्राज्याचे सुराज्यात रुपांतर करण्यासाठी तितकीच उत्कृष्ट प्रशासन व्यवस्था निर्माण केली. त्यामुळे प्राचीन भारतातील एक प्रगतीचा काळ सम्राट हर्षवर्धनाने निर्माण केला. त्याच्या काळातील सांस्कृतिक जीवनाचा आढावा घेणे आवश्यक आहे तो पुढील प्रमाणे.

**अ) सामाजिक जीवन :**

चीनी प्रवासी ह्यूएनत्संगने लिहिलेल्या वृत्तांतावरून तत्कालीन सामाजिक परिस्थिती कशी होती हे समजते. हर्षवर्धनाच्या काळात चातुर्वर्ण्यव्यवस्था आणि जातीची बंधने कडक होती. बाणभट्टाचे चरित्र, हर्षवर्धनाची नाटके यामधून सामाजिक जीवनाची कल्पना येते. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार वर्णाबरोबर काही पोटजातीसुद्धा याकाळात उदयास आल्या. व्यक्तिची योग्यता ही कर्तबगारीवर न ठरवता ती त्याच्या वर्णावरती अवलंबून होती. विद्यार्जन व धार्मिक कामे ब्राह्मणांच्याकडे, राज्यकारभार व देशरक्षण क्षत्रियांच्याकडे तर शेती व्यापार हे वैश्यांच्याकडे होती. शूद्रांनासमाजात महत्वाचे स्थान नव्हते त्यांना गावाबाहेर रहावे लागे.

सर्वसाधारण माणसांचा पोशाख अतिशय साधा होता तर श्रीमंत लोक सुती, रेशीम व लोकरीचे कपडे वापरीत असत. स्त्रीयांच्या दागिण्यांमध्ये माणिक, मोती, हार-तुरे, आंगठ्या यांचा समावेश होता. स्त्रीया खांद्यापासून खाली संपूर्ण शरीरभर वस्त्र वापरीत असत. लोक शाकाहारी असल्याने कांदा-लसून सुद्धा खात नसत. रोजच्या आहारात दुध व दुग्धजन्य पदार्थ, भाज्यांचे प्रमाणे जास्त होते. स्त्रीयांना स्वातंत्र्य होते. बालविवाहाची पद्धती रूढ होती. विधवाविवाहास भाग समाजमान्यता नव्हती. सतीची प्रथा प्रचलित होती.

**ब) आर्थिक जीवन :**

ह्यूएनत्संगच्या प्रवासवर्णावरून तत्कालीन समाज हा सुखी व संपन्न जीवन जगत होता. आर्थिक सुबत्ता मोठ्या प्रमाणात होती. त्यामध्ये कार्यक्षम प्रशासन व्यवस्थेमुळे आर्थिक परिस्थिती उत्तम होती. अंतर्गत आणि परराष्ट्रीय व्यापाराला मोठ्या प्रमाणात चालना मिळाल्यामुळे विविध उद्योगांना चालना मिळाली. कापडउद्योग हा तर खूप प्रसिद्धीस आला. पाटलीपूत्र हे ठिकाण राजकीय आणि शैक्षणिक केंद्र म्हणून ओळखले जात होते. तसेच ते आर्थिकदृष्ट्याही महत्वाचे केंद्र बनले होते. सोन्याचांदीच्या नाण्याबरोबर कवड्यांचाही वापर चलन म्हणून वापर होत होता. एकदंरीत तत्कालीन प्रजा सुखी समाधानी जीवन जगत होती.

**क) धार्मिक परिस्थिती :**

हर्षवर्धनाच्या काळात हिंदूधर्म, बौद्धधर्म आणि जैन धर्म, याशिवाय विविध पंथाचे लोक रहात होते. हिंदू धर्माची लोकप्रियता वाढत होती. येथे मूर्तीपूजा रूढ होती. शिव-विष्णू, सूर्य, देवी, गणपती इ. देवतांच्या उपासना तत्कालीन लोक करीत होते. संस्कृत ही सुशिक्षित व उच्चभ्रू वर्गाची भाषा होती. याकाळात बौद्ध धर्माला कमी महत्व प्राप्त झाले. यामध्येही 'महायान' आणि 'हिनयान' या दोन पंथाचा उदय होऊन महायानपंथ लोकप्रिय होऊ

लागला. हिनयान पंथीय लोक बौद्ध धर्मातील जून्या गोष्टीला चिकटून बसले. बौद्ध धर्मात कर्मकांडाचे प्रस्थ वाढत गेले. यामुळे बौद्ध धर्माची पिछेहाट झाली. या काळात हर्षवर्धनाने आपल्या उत्तरार्धात बौद्ध धर्माचा स्विकार केल्याने बौद्ध धर्म पुन्हा एकदा वाढीस लागला जैन धर्म फक्त दक्षिण भारतात स्थिर झाला. याधर्मामध्येही 'दिगंबर' आणि श्वेतांबर' हे दोन पंथ निर्माण झाले. पश्चिम भारतातील मैगक, गुर्जनांनी जैन धर्माचा स्विकार केला. हर्षवर्धन याने जरी बौद्ध धर्माचा स्विकार केला असला तरी तो इतर धर्मियांबाबतीत फार सहिष्णू होता. त्यामुळे त्याच्या काळात धार्मिक संघर्ष झाल्याच्या घटना पहावयास मिळत नाहीत.

**ड) शैक्षणिक परिस्थिती :**

हर्षवर्धनाच्या काळात शिक्षणपद्धती ही उच्च दर्जाची होती. बौद्ध विहार हे धर्माचे नव्हे तर शिक्षणाचे केंद्र समजले जात असे. कनौज, गया, जालंधर, मोंघीर येथील बौद्धविहार हे ज्ञानदानासाठी विशेष प्रसिद्ध होते. तसेच हिंदू धर्माच्या मठातूनही शिक्षण दिले जात असे. प्रयाग, वल्लभी, गया, कनौज या ठिकाणी मोठी विद्यापीठे उदयास आली. जगभरातील विद्यार्थी या विद्यापिठामध्ये येऊन ज्ञानार्जन करीत असत. नालंदा हे विद्यापीठ सर्व विठापीठामध्ये त्याकाळी प्रसिद्धीस आले. या विठापीठामध्ये धर्म, वर्कशस्त, तत्वज्ञान, व्याकरण, वैद्यकशास्त्र, सांख्यतत्वज्ञान इ. विषय शिकवलेजात होते. या विद्यापिठात १०,००० विद्यार्थी शिक्षण घेऊ शकतील अशी व्यवस्था करण्यात आली होती. ह्यूएनत्संगच्या माहितीवरून तत्काळीत शिक्षणपद्धतीवरती प्रकाश टाकता येतो.

**इ) वाङ्मय आणि कला :**

स्वतः हर्षवर्धनच मोठा साहित्यिक असल्यामुळे त्यांने विद्वानांना राजाश्रय दिला. 'हर्षचरित' लिहिणारा बाणभट्ट त्याच्या दरबारात होता. याशिवाय हरदत्त, जयसेन हे विद्वानही दरबारात होते. प्राकृत आणि संस्कृत भाषेत ग्रंथरचना करण्यात आली. हर्षवर्धनाची स्वतःची 'रत्नावली', 'प्रियदर्शिका', व नागानंद अशी तीन नाटके लिहीली आहेत.

हर्षवर्धनाच्या कलेवरती गुप्त व वाकाहककालीन कलेचा प्रभाव दिसतो. या काळात सोने, चांदी, चंदनाच्या मूर्त्या केल्या जात होत्या. 'हर्षचरित' व 'कादंबरी' या ग्रंथामधून अजिंठ्याच्या भिंतीचित्रातील वास्तुविशेषांची, वस्त्रांची, दागदागिन्यांची व प्रसाधनांची माहिती मिळते. वास्तुकलेबरोबर मूर्तीकला, चित्रकला, शिल्पकला, संगीत, नृत्य, नाटके इ. क्षेत्रातही नेत्रदिपक प्रगती झाली.

- **स्वयंअध्ययन प्रश्न –१**

**ब) रिकाम्या जागा भरा.**

१. हषवर्धनाची ........ ही बहिण होती.

अ) राजश्री  ब) यज्ञश्री  क) सप्तश्री  ड) रत्नावली

२. ........ याने 'हर्षचरित्' हा ग्रंथ लिहिला.

अ) गागाभट्ट  ब) बाणभट्ट्  क) रामभट  ड) आर्यभट

३. ........ या परिषदेनंतर महायानपंथी विरोधी लोकांना ह्यूएनत्संगचा खून करण्याचा प्रयत्न केला.

अ) प्रयाग ब) कनौज क) पाटलीपूत्र ड) सारनाथ

४. हर्षवर्धनच्या काळात ........ प्रकारचे कर घेतले जात होते.

अ) दोन ब) तीन क) चार ड) पाच

५. हर्षवर्धनाच्या काळात ........ हे विद्यापीठ प्रसिद्धीस आले.

अ) गया ब) वल्लभी क) तक्षशिला ड) नालंदा

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. हर्षवर्धनाने कोणती नाटके स्वतः लिहीली आहेत?

२. चीनी प्रवासी ह्यूएनत्संग हा भारतात कोणत्या साली आला होता?

३. राज्यवर्धनाला कोणत्या राजाने कपटाने ठार मारले?

४. कनौज येथील सर्वधर्मपरिषदेचा अध्यक्ष कोण होता?

५. कोणते अधिकारी जिल्हाप्रशासनाचा कारभार पहात असत?

## ३.२.३ दक्षिण : बदामीचे सुरूवातीचे चालुक्य :

दक्षिण भारताच्या प्राचीन इतिहासात बदामीच्या चालूक्य वंशास किंवा राजवटीस अत्यंत महत्वाचे स्थान आहे. नर्मदा नदीपासून सातवाहनांनी आपली स्वतंत्र सत्ता दक्षिणेत निर्माण केली त्यानंतर वाकाटक राजांनीही दक्षिणेत आपली स्वतंत्र सत्ता निर्माण केली. वाकाटक सत्तेच्या विघटनानंतर इसवीसनाच्या सहाव्या शतकाच्या मध्यावर दक्षिण भारतात एका वैभवशाली महत्वपूर्ण राज्याचा उदय झाला. ते म्हणजे बदामीचे चालुक्य मंदिर स्थापत्याचा अप्रतिम अविष्कार चालुक्य स्थापत्यामधून झाला. जवळजवळ दोनशे वर्षे चालुक्यांची सत्ता होती. चालुक्यांच्या अनेक शाखा विविध भागात राज्य करीत होत्या. त्यातील महत्वाच्या चार सत्ता होत्या. त्यापैकी पिष्टपूरचे चालूक्य, बादामीचे चालूक्य, बेमुलवाड्याचे चालुक्य आणि कल्याणीचे चालुक्य. बदामीचे चालुक्य हे सर्वात अगोदरचे घराणे होय. वेमुलवाड्याच्या चालुक्यांनी राष्ट्रकुटांचे मांडलीकत्वच स्विकारले होते. विविध पुराणे जैन वाङमय, ह्यूएनत्संगचा प्रवासवृत्तांत, बदामी, पट्टदरकल, ऐहोळ येथील मंदिरे, विविध शिलालेख, व ताम्रपटातून चालुक्य घराण्यावरती प्रकाश टाकता येतो.

- **चालुक्यांचे प्रारंभीचे राजे :**

इ.स.वीसनाच्या सहाव्या शतकाच्या पूर्वाधात जयसिंह हा राजा चालुक्य वंशात होऊन गेला. हाच या घराण्याचा किंवा चालुक्य वंशाचा संस्थापक मानला जातो. त्याच्यानंतर त्याचा मुलगा रणराग हा चालुक्याच्या गादीचा वारस बनला. मात्र या दोघांनी साम्राज्यविस्तार कोठेपर्यंत केला याची विश्वसनीय माहिती तत्कालीन कागदपत्रात सापडत नाही. विजापूरच्या प्रदेशात चालुक्यांनी आपली सत्ता निर्माण केली. या घराण्यातील राजांनी पुढे दोनशे वर्षे आपली सत्ता विंधपर्यत, महाराष्ट्र, आंध्रप्रदेशच्या कांही भागावर निर्माण केली.

**१) पहिला पुलकेशी : (इ.स. ५३५ ते इ.स. ५६५)**

पुलकेशी पहिला हा खऱ्याअर्थाने पहिला स्वतंत्र चालुक्य राजा होय. चालुक्य घराण्यातील राजांनी इ.स. ५३५ ते इ.स. ७४७ पर्यंत राज्य केले. यातील पुलकेशी पहिल्यांने इ.स. ५६५ पर्यंत सत्ता आपल्या ताब्यात ठेवली. चालुक्य घराण्याचा संस्थापक म्हणूनही त्यांचा उल्लेख केला जातो. याने 'अग्निहोम' 'वाजपेय', 'पौंडरिक', 'अश्वमेध' इ. यज्ञ केल्याचे उल्लेख मिळतात. पुलकेशी पहिल्याने 'सत्याश्रय', 'पृथ्वीवल्लभ', 'रणविश्रम', 'महाराज' अशा उपाध्या स्वतःला लाऊन घेतल्या. त्याने बदामी (वातापी) येथे एक प्रचंड किल्ला उभारला असून तो फक्त दगडावरती दगड रचून उभारला आहे. त्याने रामायण, मनूस्मृती, पुराणे यासाठी अभ्यास केला होता. २१ वर्षे राज्यकरून इ.स. ५६६ मध्ये त्याचा मृत्यू झाला.

**२) किर्तीवर्मन : ( इ.स. ५६७ ते इ.स. ५९८)**

पुलकेशीप्रथम राजाच्या मृत्यूनंतर त्याचा मोठा मुलगा किर्तीवर्मन चालुक्यांचा राजा झाला. त्यानेही 'सत्याश्रय' 'पृथ्वीवल्लभ' अशा पदव्या स्वतःला लाऊन घेतल्या. त्याच्या पराक्रमाची माहिती देणारा एक शिलालेख वातापी येथे सापडला आहे. यांने सुंदर राजवाडे, मंदिरे यांची उभारणी केली. त्यांने वंग, अंश, कलिंग, मद्रक, केरळ, महिवक्र, पांड्य, चोल, गंग इ. राजांचा पराभव केल्याची माहिती मिळते. यांने आपल्या काळात सत्तेचा विस्तार केला. 'अग्निस्त्रोम', 'बहुसूत्री' असे यज्ञ केले. इ.स. ५९७ मध्ये कीर्तीवर्मनचा मृत्यू झाला.

**३) मंगलेश : (इ.स. ५९८ ते इ.स. ६१०)**

किर्तीवर्मनाच्या मृत्यूवेळी त्याचा मुलगा पुलकेशी दुसरा हा अल्पवयीन असल्याने त्याचा लहान बंधू मंगलेश हा सत्तेवरती आला. त्यांने सत्तेवरती येताच बुद्धराज या कलचुरी राजाचा पराभव केला. त्यांने रेवतीद्विप हे रत्नागिरी जिल्ह्यातील बेट जिंकले. त्याच्या कारकिर्दीतच चालुक्य घराण्यात यादवीस प्रारंभ झाला. ऐहोळ येथील शिलालेखामध्ये या यादवी युद्धाचा उल्लेख आढळतो. आपल्यानंतर आपल्या मुलास गादीवर बसवण्याचा मंगलेश याने प्रयत्न केला. परंतु त्याचा पुतण्या गादीवर पुलकेशी दुसरा याला ते आवडले नाही. यामुळे यादवी युद्ध झाले या युद्धात मंगलेश मारला गेला आणि दुसरा पुलकेशी सत्तेवरती आला.

**४) दुसरा पुलकेशी : ( इ.स. ६१० ते इ.स. ६४४)**

हर्षवर्धन या श्रेष्ठ सम्राटाच्या समकालीन चालुक्य नृपती म्हणजे सत्याश्रय पुलकेशी दुसरा. मंगलेश या त्याच्या चुलत्याचा वध करून तो सत्तेवरती आला होता. इ.स. ६१० मध्ये प्रमुख म्हणून राहीला. यादवी काळात राज्यात अनागोंदी माजली होती. अनेक छोटी-छोटी प्रांत चालुक्य साम्राज्यातून फुटून बाहेर पडली. पुलकेशी दुसरा यांने या बिकट परिस्थितीला तोंड देतच गादीवरती बसला आणि भेदनीतीचा वापर करून शत्रूंना वठणीवरती आणले. भारतातील हर्षवर्धन, आणि दक्षिणेतील राजा नृसिंहवर्मा या बलाढ्य दोन राजाबरोबर तिसरे नाव दुसऱ्या पुलकेशीचे जोडले गेले. त्यांने साम्राज्याचा विस्तार करताना कदंबाची राजधानी वनवासी जिंकली. म्हैसूरच्या गंग राजांना पराभूत केले. कोकणातील मौर्याचा शेवटचा दुवा असणाऱ्या राजाचा पराभव करून घारापूरी बेटावरही ताबा मिळविला गुर्जराना पराभूत केले. शके ५३४ मध्ये पुलकेशी दुसरा याने सम्राट हर्षवर्धनाचाही पराभव केला.

मात्र याबाबतीत इतिहासकारामध्ये मतभेद आहेत. पुलकेशीने त्रिमहाराष्ट्रीकांचा प्रदेश जिंकला. त्यामुळे ९९,००० खेडी त्याच्या ताब्यात आली. त्याने दक्षिण कोसल व कलिंग वरतीही स्वारी केली. दक्षिणेतील पल्लव, चोल, पांड्य व चेर या राजानांही अपले वर्चस्व मान्य करावयास लावले. त्यांने पर्शियाशी सांस्कृतिक संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. पर्शियाचे एक शिष्टमंडळही पुलकेशी दुसरा याच्या दरबारात आले होते. इ.स. ५४० च्या दरम्यान पल्लवांचा प्रभाव वाढला आणि ६४२ मध्ये पल्लवराजा नृसिंहवर्मन यांने इ.स. ६४२ मध्ये बादामीवरती हल्ला केला. यातच दुसरा पुलकेशी याचा मृत्यू झाला. एक युगप्रवर्तक कालखंड संपला आणि चालुक्य सत्तेला ग्रहण लागले.

### ५) पहिला विक्रमादित्य : (इ.स. ६५५ ते इ.स. ६८१)

पुलकेशी दसुरा याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा पहिला विक्रमादित्य सत्तेवरती आला. वडीलांच्या मृत्यूमुळे साम्राज्य डबघाईला आले होते. अनेक सामंत व मांडलीक राजांनी चालुक्याशी संबंध तोडून स्वतंत्र अस्तित्व घोषित केले. इ.स. ६५५ मध्ये विक्रमादित्याने पल्लवांच्या ताब्यातून बदामी ही राजधानी जिंकून घेतली. इतकेच नाही तर पल्लवांची राजधानी कांचीपूरम चालुक्यांनी जिंकून घेतली. मात्र हा विजय क्षणिक ठरला. पल्लवांनी उठाव करून राजधानी मुक्त केली. पुन्हा एकदा विक्रमादित्याने पांड्य, चेर या राजांना आपल्या अंकीत केले. गुजरातवरची पकड पक्की केली. याचा मृत्यू इ.स. ६८१ मध्ये झाला. पुढे चालुक्यांचे राज्य जवळजवळ १०० वर्षे टिकले.

### ६) विनयादित्य : (इ.स. ६८१ ते इ.स. ६९५)

पहिला विक्रमादित्य याचा मुलगा म्हणजे विनयादित्य होय. त्यांने अनेक बिरूदे लावली. याच्या काळातही पल्लवासोबत संघर्ष सुरूच होता. यात पल्लवांचा पराभव विनयादित्याने केला. पांड्य व गंग राजांना पराभूत केले. पर्शिया व सिलोन येथील राजांना मदत केली.

### ७) विजयादित्य : (इ.स. ६९३ ते इ.स. ७३३)

या चालुक्य राजाने एकूण ३७ वर्षे राज्य केले. त्यांने पल्लवांचा पराभव करून त्यांच्याकडून जबर खंडणी वसूल केली. त्यांने पट्टदक्कल येथे शिवमंदिराची उभारणी केली.

### ८) विक्रमादित्य दुसरा : (इ.स. ७३३ ते इ.स. ७४५)

हा विजयादित्याचा मुलगा होय. यांने विक्रमादित्य पहिल्याची अखंड विजयी परंपरा कायम ठेवली. त्यांने पल्लवांचा समूळ नाश केला. पांड्य, चेर, चोल यांचा निर्णायक पराभव केला. अनेक मंदिरे उभारली विद्वानांना राजाश्रय दिला.

### ९) किर्तीवर्मन दुसरा : (इ.स. ७४५ ते इ.स. ७५५)

हा बदामी वंशातील शेवटचा राजा होय. याच्याच काळात चालुक्याच्या ऱ्हासाला सुरूवात झाली. राष्ट्रकुटांनी याचा पराभव केला व सत्तेचा शेवट झाला.

- **चालुक्यांचे प्रशासन :**

**१) राजेशाही :**

तत्कालीन शासनव्यवस्था ही राजेशाहीची होती. राजपद हे वंशपरंपरेने चाळत आलेले असे. राजाच्या ज्येष्ठ पुत्रास राजा म्हणून घोषित केले जात असे. राजेशाही ही अनियंत्रित नव्हती तर तीचे स्वरूप लोककल्याणकारी होते.

**२) मंत्रीमंडळ :**

राजाला आपल्या साम्राज्याचा कारभार एकट्याने करता येणे शक्य नसे. म्हणून राज्यकारभाराच्या मदतीसाठी राजा मंत्रीमंडळ नेमत असे. मंत्र्यावरती एक-एक विभागाची जबाबदारी दिली जात असे. मंत्रीमंडळाने राजाला सल्लाही द्यावा असे मानले जात होते.

**३) प्रशासकीय विभाग :**

आपल्या विशाल साम्राज्याचा कारभार करणे शक्य होत नसल्याने साम्राज्याचे विविध प्रांतात विभाजन केले गेले. प्रातांचे गुनहे विभाग व जिल्हा आणि तालुका अशी विभागणी करून त्याच्या प्रमुखपदी राजघराण्यातील किंवा विश्वासू व्यक्तीच्या नेमणूका केल्या जात असत.

**४) ग्राम :**

ग्राम किंवा खेडे हा प्रशासनातील शेवटचा घटक होता. त्याच्या प्रमुखाला 'गावुंडा' म्हटले जात असे. गावचा सर्व कारभार या अधिकाऱ्यास पहावा लागत असे.

**५) न्यायव्यवस्था :**

राजा हा सर्वश्रेष्ठ न्यायाधिश होता. मात्र न्यायदान करण्यासाठी स्वतंत्र न्यायालयांची व न्यायाधिशाची नेमणूक केलेली होती. धर्मशास्त्र, स्मृती, परंपरा हाच न्यायव्यवस्थेचा आधार होता.

**६) महसूल व्यवस्था :**

चालुक्य राजांनी महसूलाची चोख व कार्यक्षम उभारणी केली होती. एकूण उत्पन्नाच्या चौथा हिस्सा हा शेतकऱ्याला कर म्हणून राजाला द्यावा लागत असे. याशिवाय जकात, आयात कर, निर्यात कर, मांडलीक राजाकडून मिळणारी खंडणी महसूलामध्ये जमा होत असे.

**७) लष्करी व्यवस्था :**

चालुक्यांचे लष्कर शक्तीशाली, सुसज्ज व प्रशिक्षित होते. या लष्करी ताकदीच्या जोरावरच त्यांनी विशाल साम्राज्याची निर्मिती केली. हर्षवर्धन सारख्या बलाढ्य सम्राटाशी दोन हात करून त्याचा पराभव केला. ह्यूएनत्संग म्हणतो चालुक्यांचे लष्कर हे युद्धशास्त्रांचे सर्व नियम काटेकोरपणे पाळत होते. पायदळ व घोडदळ सुसज्ज ठेवले होते.

- **धार्मिक जीवन :**

चालुक्यांच्या काळात हिंदू, बौद्ध व जैन धर्म प्रचलित होते. तसेच शैव व वैष्णव पंथही प्रचलित होता. चालुक्यांच्या काळात धार्मिक सलोखा असल्यामुळे धार्मिक संघर्ष झाल्याचे दिसत नाही. अनेक राजांनी यज्ञ केलेले आहेत तसेच दानधर्मही केल्याची माहिती आढळते. चालुक्य राजे वैदिक धर्माचे अनुयायी होते पण ते इतर धर्माबाबत सहिष्णुवृत्तीचे होते. चालुक्य राजांनी शिव व विष्णुची अनेक मंदिरे बांधल्याचे दाखले मिळतात. या काळात जैन व बौद्ध धर्माचाही प्रसार झाल्याचे दिसते. जवळजवळ ५००० भिक्षू चालुक्याच्या प्रदेशात बौद्ध धर्माचा प्रसार करत होते. विजयदित्य आणि विक्रमादित्य या राजांनी बौद्ध भिक्षू जैन धर्मानुयायींना गावे दान केल्याची उदाहरणे सापडतात.

- **विद्या व शिक्षण :**

चालुक्य राजे विद्या व कलाप्रेमी होते. विजयादित्याच्या काळात १४ विद्यासंपन्न असणारे हजारो लोक होते. बदामी/वातापी हे शहर विद्या व शिक्षणाचे मोठे केंद्र होते. वेद, पुराण, मिमांसा, न्याय, धर्म, तत्वज्ञान, अर्थशास्त्र, इंडनीती इ. विषय अभ्यासासाठी होते. यासंदर्भातील अनेक कानडी भाषेतील शिलालेख सापडतात. प्रथम पुलकेशी याला पुराणे, रामायण, महाभारत, मनुस्मृती धर्मसुत्रे, राज्यशास्त्र इ. चे चांगले ज्ञान होते. मंगलेश या राजाला सर्व शास्त्रे अवगत होती.

- **साहित्य :**

या काळातील साहित्य हे कन्नड व संस्कृत भाषेत तयार झाले. दुर्विनीत याने 'शब्दावतार' हा ग्रंथ कन्नड भाषेत लिहिला. विजयभट्टारिका ही प्रसिद्ध कवचित्री होती. श्रीवरदेव हा प्रसिद्ध कन्नड साहित्यिक होता. त्याने 'चुडामणी' नावाचा ग्रंथ लिहिला. त्यामध्ये ९६००० श्लोकांचा संग्रह होता.

- **कला व स्थापत्य :**

राजकीय पराक्रमाबरोबरच चालुक्यांनी सांस्कृतिक क्षेत्रातही भरीव कामगिरी केली आहे. चालुक्य सम्राट हे विद्या व कलेचे भोक्ते होते. विक्रमादित्य पहिला यांने चौदा विद्यामध्ये श्रेष्ठ असलेल्या हजारो विद्वानांना आश्रय दिला होता. तसेच विक्रमादित्य दुसरा याची पत्नी लोकमहादेवी हीने अनेक संगीतकार व नर्तक यांना राजाश्रय दिला. रविकीर्ती, बिल्हण, पंच, रत्न, दुर्गासिंह इ. प्रसिद्ध कन्नड व संस्कृत कवी चालुक्यांच्या दरबारी होते.

चालुक्यांनी दक्षिणभारतात मंदिर स्थापत्याची परंपरा सुरू केली. हे मंदिरशिल्प कर्नाटकाच्या सांस्कृतिक जीवनाचे अविभाज्य अंग आहे. चालुक्यशैलीत इंडो-आर्यन व द्रविड या दोन कलेचे समिश्रण आढळते. चालुक्यकालीन मंदिर जवळून आकर्षित वाटते. नाजूक नक्षीकाम, अलंकृत स्तंभ, सुंदर कोरीव काम मनामध्ये भरते. बदामी, एहोळ, महाकूट, पट्टरकल येथे बांधलेली मंदिरे आजही सुस्थितीत आहेत.

- **स्वंयअध्ययन प्रश्न – २**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. ........ या चालुक्य राजाने सम्राट हर्षवर्धनाचा पराभव केल्याचे म्हटले जाते.
अ) दुसरा पुलकेशी ब) मंगलेश क) किर्तीवर्धन ड) पहिला विक्रामादित्य

२. ........ या चालुक्य राजांने पर्शियाशी सांस्कृतिक संबंध प्रस्थापीत करण्याचा प्रयत्न केला.

अ) पहिला पुलकेशी ब) मंगलेश क) दुसरा पुलकेशी ड) विजयादित्य

३. बदामीच्या चालुक्य वंशातील ........ हा शेवटचा राजा होय.

अ) विक्रमादित्य दुसरा ब) किर्तीवर्धन दुसरा क) विजयादित्य ड) विनयादित्य

४. चालुक्य राजे शेतीतून येणाऱ्या उत्पन्नाच्या ........ हिस्सा कर म्हणून घेत असत.

अ) दुसरा ब) तिसरा क) चौथा ड) पाचवा

५. 'चुडामणी' नावाच्या ग्रंथात ........ श्लोकांचा संग्रह आहे.

अ) १०० ब) १००० क) ९६००० ड) ९२०००

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. चालुक्यांच्या किती शाखा किंवा सत्ता मानल्या जातात?

२. कोणत्या चालुक्य राजाने दगडावरती दगड रचून प्रचंड किल्ला बांधला आहे?

३. कोणत्या राजाने रेवतीद्विप हे रत्नागिरी जिल्ह्यातील बेट जिंकले?

४. चालुक्यकालीन ग्राम प्रमुखाला कोणत्या नावाने संबोधले जात असे?

५. दक्षिण भारतात मंदिर स्थापत्याची परंपरा कोणी सुरू केली?

### ३.२.४ दक्षिण भारत : पल्लव :

इ.स.वी सनाच्या ३२५ मध्ये दक्षिणभारतात चालुक्याप्रमाणेच एका महत्वाच्या सत्तेचा उल्लेख केला जातो ती सत्ता म्हणजे 'पल्लव'. पल्लवांना कांचीचे पल्लव असेच म्हणतात. या घराण्यासंबंधी फारशी माहिती उपलब्ध नाही. आणि उपलब्ध माहितीबाबतही इतिहासकारांच्यामध्ये ममतभिन्नता आहे. पल्लवांची सत्ता सातवाहनांच्या काळात पुढे आली. पल्लव सातवाहनांच्या पदरी होते. सातवाहनांच्या ऱ्हासानंतर ते पुढे आले आहेत. त्यांनी कांचीला राजसत्ता स्थापन केली. विविध शिलालेख, ताम्रपट, नाणी, प्राचीन पुरातत्वीय अवशेष, तमिळभाषेतील वाङ्मय, ह्यूएनत्संगचे प्रवासवर्णन यावरून पल्लव घराण्याचा इतिहास मांडता येतो. पाशिचमात्य अभ्यासकांनी पल्लव या शब्दाचा अर्थ पार्शियनाशी लावला. तर काहींनी सिलोनशी संबंध जोडला. डॉ. के. पी. जयस्वाल यांच्यामते 'पल्लव' हे राजघराणे म्हणजे वाकाटकाच्याच सत्तेचा भाग असावा' नंतरच्या काळात यातील एखाद्याने कांचीला आपली सत्ता स्थापन केली असावी. विष्णुगोप हा पल्लव राजा समुद्रगुप्ताच्या समकालीन होता. समुद्रगुप्ताने त्याचा पराभव केल्याचा उल्लेख अलहाबाद प्रशस्तीमध्ये आढळतो. तो इ.स. ३५० ते इ.स. ३७५ दरम्यान सत्तेवर असावा. पल्लवांचा आणखीन एक महत्वाचा राजा म्हणजे सिंहविष्णू किंवा अवनीसिंह तो इ.स. ५७५ मध्ये पल्लवांच्या गादीवर बसला.

**१. सिंहविष्णू : (इ.स. ५७५ ते इ.स. ६००)**

सिंहविष्णू या पल्लव राजापासून पल्लव घराण्याची माहिती क्रमवारपणे पहावयास मिळते. यालाच पल्लव घराण्याचा संस्थापक मानले जाते. याने चोल राजाचा पराभव करून कृष्णेपासून कावेरीपर्यंत सत्तेचा विस्तार केला. 'भारवी' हा थोर संस्कृत कवी त्याच्या दरबारात होता. सिंहविष्णूने सिलोन आणि तीन तमिळ राजांचा पराभव केला होता असा उल्लेख आढळतो.

**२. पहिला महेंद्रवर्मन : (इ.स. ६०० ते इ.स. ६३०)**

हा सिंहविष्णूचा मुलगा असून पल्लवांचा सर्वात पराक्रमी राजा होता तो स्वतः विद्वान असून संस्कृतमध्ये पारंगत होता. तसाच तो युद्धकलेतही निपूण होता. त्याने संगीतावरती एक स्वतंत्र ग्रंथरचनाही केली आहे. अखंड शिळेतून मंदिर खोदण्याची कला यानेच सुरू केली. याच्या काळात त्रिचिनापल्ली, चिंगलपूर, अर्काट या भागात अनेक मंदिरे उभारली. याच काळात पल्लव व चालुक्य यांचा वारंवार संघर्ष झाल्याचे व पुलकेशी दुसरा याने महेंद्रवर्मन पहिला याचा अनेकवेळा पराभव केल्याची माहिती मिळते. त्यामुळे महेंद्रवर्मनाने उत्तरेकडे सत्तेचा विस्तार न करता दक्षिणेकडे आपल्या सत्तेचा विस्तार केला. सुरूवातीला तो जैन धर्मिय होता. नंतर तो शिवभक्त झाला तो शैवपंथी बनला.

**३. पहिला नरसिंहवर्मन : (इ.स. ६३० ते इ.स. ६६८)**

पहिला महेंद्रवर्मनाचा ज्येष्ठ मुलगा म्हणजे पहिला नरसिंहवर्मन. पल्लव घराण्यातील पराक्रमी राजा. याने आपली सत्ता व प्रतिष्ठा वृद्धीगंत केली. दुसरा पुलकेशीच्या बदामी राज्यावर आक्रमण केले. यामध्ये पुलकेशी मारला गेला. याशिवाय नरसिंहवर्मनने चोल, केरळ या राज्यांचा पराभव केला. सिलोनवरती आक्रमण करून तोही प्रदेश त्याने जिंकल्याची माहिती मिळते. चीनी प्रवासी ह्यूएनत्संग याने नरसिंहवर्मनच्या राज्यास भेट दिली. त्याच्या प्रवासवर्णनात नरसिंहवर्मनबाबत माहिती मिळते. नरसिंहवर्मनाने नेक बौद्ध, जैन व वैदिक धर्माची मंदिरे बांधली. त्याने पल्लव सत्तेला प्रगतीच्या शिखरावरती पोहचवले.

**४. दुसरा महेंद्रवर्मन : (इ.स. ६६८ ते इ.स. ६७०)**

हा पल्लव राजा फक्त दोनच वर्षे सत्तेवरती होता. याच्या काळात घडलेली महत्वाची घटना म्हणजे चालुक्य राजा पहिला विक्रमादित्य याचा त्यांने केलेला पराभव ही होय. कारण नरसिंहवर्मनानंतर हळूहळू पल्लव सत्ता संघर्षात ओढली गेली. चालुक्य-पल्लव संघर्ष तीव्र बनत गेल्याचे दिसते.

**५. पहिला परमेश्वरन : (इ.स. ६७० ते इ.स. ६९५)**

हा दुसरा महेंद्रवर्मन या राजाचा मुलगा. याच्या काळातही चालुक्य-पल्लव संघर्ष चालूच होता. चालुक्यराजा विक्रमादित्याने पल्लवांवरती आक्रमण करून परमेश्वरन याला पळवून लावले. पुढे राज्याबाहेर निराश्रीत झालेल्या पहिल्या परमेश्वरांने सैन्यांची जुळवाजूळव केली आणि पुन्हा चालुक्यावरती आक्रमण केले. यावेळी परमेश्वरनचा विजय झाला. हा शिवभक्त असल्याने त्यांने कांची येथे शिवाचे मंदिर बांधले असल्याचे दिसते.

**६. दुसरा नरसिंहवर्मन : (इ.स. ६९५ ते इ.स. ७२२)**

हा पहिल्या परमेश्वरन या राजाचा मुलगा पल्लवांच्या गादीवरती इ.स. ६९५ मध्ये आला. त्याने जवळजवळ २७ वर्षे राज्य केले. याच्या काळात पल्लव व चालुक्य यांच्यामधील सततचा संघर्ष काहीकाळ थांबला होता. म्हणून याची कारकिर्द ही शांतता व भरभराटीची झाली. त्यामुळे द्रविडीशिल्पकला वैभवास पोहोचली. त्यांने बांधलेले कांची येथील कैलासनाथाचे मंदिर आणि पनमलाई येथील शिवमंदिर द्राविडी शिल्पकलेची उत्तम नमुने आहेत. याने व्यापाराकडे लक्ष दिले. सागरी व्यापार वाढविला. चीनशी सलोख्याचे संबंध निर्माण करण्यासाठी आपला एक खास दूत चीनला पाठवला. चीनी सत्तेनेसुद्धा त्याचा मोठा गौरव केला.

**७. दुसरा परमेश्वरन : (इ.स. ७२२ ते इ.स. ७३०)**

दुसरा नरसिंहवर्मन या राजाचा हा मुलगा होय. याला एकूण आठ वर्षे राजसत्ता उपभोगावयास मिळाली. याच्या काळात पल्लव-चालुक्य संघर्ष पुन्हा सुरू झाला. चालुक्य राजा दुसरा विक्रमादित्याने पल्लवांची राजधानी कांची वरती तीनवेळा हल्ला केला. दुसऱ्या परमेश्वरनचा पराभव केला. शेवटी चालुक्यराजांना मोठी खंडणी देऊन चालुक्यांशी तह केला. तेंव्हा विक्रमादित्याने माघार घेतली.

**८. दुसरा नंदिवर्मन : (इ.स. ७३० ते इ.स. ८००)**

दुसरा परमेश्वरन याला मूल न झाल्यामुळे दुसरा नंदिवर्मन याला वयाच्या १२ व्या वर्षी पल्लवांच्या गादीवरती बसविण्यात आले. याने जवळजवळ ७० वर्षे पल्लव राजगादी सांभाळली. त्याच्या या प्रदिर्घ काळामध्ये अनेक महत्वपूर्ण घटना घडल्या. सुरवातीलाच चित्रमय याने गादीचा तोतया वारसदार म्हणून पांड्य व चेर या राजांच्या मदतीने नंदिवर्मन या अल्पवयीन वारसदारावरती हल्ला केलाव व नंदिग्राम येथे त्याला पकडले. मात्र पल्लवांचा सेनापती उदयचंद्र याने आपल्या वारसदाराला चित्रमयकडून सोडवून घेतले आणि चित्रमयचा शिरच्छेद केला. याच बरोबर कैलासनाथ मंदिरातून लूट केलेल्या सर्व मौल्यवान वस्तु मंदिराला परत केल्या, इ.स. ७५० मध्ये राष्ट्रकुट राजा दंतिदूर्ग यांने कांचीवर हल्ला करून पल्लवांचा पराभव केला. मात्र दंतिदुर्गाने आपली कन्या देवा हीचा नंदिवर्मनाशी विवाह लावून वैवाहीक संबंध निर्माण केले.

दुसऱ्या नंदिवर्मनाने इ.स. ७६० मध्ये गंगराजा श्रीपुरूष याचा पराभव करून त्याच्याकडून मोठी खंडणी वसूल केली. त्याचबरोबर पांड्य राजाच्या सत्तेला आळा घालण्यासाठी पांड्यसत्तेवर आक्रमण केले. मात्र नंदिवर्धनच्या सैन्यात फूट पडली परिणामी नंदिवर्मनचा पराभव झाला. नंदिवर्मनाला शत्रूशी झालेल्या लढायात फार मोठा पराक्रम गाजविता आला नाही. मात्र दीर्घकाळ पल्लवांची सत्ता ताब्यातून जाऊ दिली नाही हा राजा विष्णुभक्त होता. त्याने कांची येथे वैकुंठ-पेरूमल मंदिर बांधले. तो कलाप्रेमी होता. उत्तम साहित्यकृतीची निर्मितीही याच्या काळात झाली. याच्या काळात थोर वैष्णव संत तिरूमंगाई होऊन गेला.

**९. शेवटचे पल्लवराजे (इ.स. ८०० ते ८९७) :**

नंदीवर्मननंतर त्याचा मुलगा दंतिवर्मन गादीवरती आला. त्यानंतर तिसरा नंदिवर्मन, नृपतुंगवर्मन, अपराजिवर्मन असे पल्लव राजे सत्तेवरती आले. इ.स. ८९७ मध्ये अपराजिवर्मन या शेवटच्या पल्लव राजावरती चोल राजा पहिला

आदित्या याने हल्ला करून त्याचा प्रदेश जिंकून घेतला.

अशारितीने दक्षिण भारताच्या राजकीय पटकावरून पल्लवांची सत्ता नष्ट झाली. यानंतर चोलांनी पल्लवांची जागा घेतली.

**पल्लवकालीन प्रशासन आणि सांस्कृतिक प्रगती :**

- **राज्यव्यवस्था :**

पल्लवराज्यव्यवस्थेतही परंपरेने राजसत्ताक पद्धती अस्तित्वात होती. राजाच्या मोठ्या मुलास वंशपरंपरेने सत्तेचा प्रमुख बनता येत असे. अनियंत्रित राजेशाही अस्तित्वात होती. परंतु पल्लव राजे अनियंत्रित नव्हते तर न्याय आणि धर्माला मान्य असणारा राज्यकारभार ते करत होते. 'धर्ममहाराजा' 'धर्ममहाराजधिराजा' अशा बिरूदावल्या त्यांनी लावल्या होत्या. पल्लव राजे विद्वान व सुसंस्कृत होते. राज्यकारभाराच्या सोयीसाठी मंत्रीमंडळाची नियुक्ती त्यांनी केली. पल्लव राजांनी शिक्षण घेतल्याची माहीती विविध शिलालेखातून मिळते. राजपुत्रास मनुस्मृती, पुराणे, रामायण, महाभारत, राज्यशास्त्र या विषयाचे चांगले ज्ञान अवगत होते. तसेच राजाला सर्वशास्त्रे अवगत होती.

- **प्रशाकीय विभाग :**

पल्लव राजे आपल्या राज्याची विभागणी 'राष्ट्र' अशा प्रकारात करीत असत. प्रत्येक राष्ट्रावरती 'व्याप्रित' (राज्यपाल)ची निमणूक केली जात होती. प्रत्येक राष्ट्राची एक स्वतंत्र राजधानी होती. राष्ट्रची विभागणी 'भोग' किंवा 'विषय'(जिल्हा) मध्ये केली जात असे. 'भोग' ची विभागणी ग्राममध्ये केली जात असे. ग्रामाचा कारभार ग्रामसभा पहात असे. गावातील उद्याने, मंदिरे, पाणवठे, तलाव यांचे काम पहाण्यासाठी 'सभा' अनेक समित्यांची नियुक्त्या करीत असे. लागवडीखालील जमिन व नापीक जमीन याची व्यवस्थित नोंद पल्लव प्रशासनाने ठेवलेली आहे.

- **सैन्यव्यवस्था :**

ह्यूएनत्संगच्या प्रवासवर्णनानुसार पल्लवांनी सैन्यव्यवस्थेकडे विशेष लक्ष दिले होते. त्यांनी पायदळ व घोडदळ काळजीपूर्वक ठेवले होते. त्यांना युद्धशास्त्राचे पुरेपूर ज्ञान होते व त्याचे आचरणही केले जात होते.

- **समाज :**

पल्लवकालीन समाजरचनेवरती उत्तरभारतील आर्यांच्या समाजरचनेचा प्रभाव होता. पुरोहित व क्षत्रियांचे समाजावरती वर्चस्व होते. या दोन वर्गाला राजाकडून दान व बक्षिसे मिळत असत. यांच्यानंतर शेतीकरणारा शेतकरी समाज होता आणि शेवटचा वर्ग म्हणजे कारागिर, शेतमजूर हा होय. समाजामध्ये धर्मबाह्य वर्तन करणाऱ्यास राजा कठोर शिक्षा करीत असे. ब्राह्मणांना समाजातील उच्चदर्जाचे स्थान होते. ब्रह्मणांचा देव लोकांशी संपर्क असतो अशी अंधश्रद्धा त्याकाळी रूढ झाली होती. वर्णव्यवस्थेचे अस्तित्व मोठ्या प्रमाणात होते. मृत जनावरे ओढणे, झाडलोट, साफसफाई ही कामे समाजातील 'शूद्र' या वर्गाकडे होती. अस्पृश्यता प्रथा प्रचलित होती. शेतकऱ्यांकडून करांची वसूली करणे आणि गुन्हेगारांना सजा देण्याचे काम राजाचे अधिकारी गावोगावी

फिरून करीत असत. इ.स. ४ थ्या शतकात ब्राह्मणांच्या १८ प्रकारच्या मागण्यांनाही शेतकऱ्यांना तोंड द्यावी लागे.

- **धार्मिक परिस्थिती :**

पल्लव राजे शैव व वैष्णव पंथीय होते. कांही राजे जैनधर्मिय होते. त्यांनी जैन मंदिराना देणग्या दिल्याचे आढळते. या काळात वैदिक धर्माचे पुनरूज्जीवन होऊन धार्मिक क्रांती झाली. जैन व बौद्ध धर्म तुलनेने खूप मागे पडले. बौद्ध धर्माला उतरती कळा लागली. मात्र पल्लवराजांच्या पदरी 'धर्मपाल' हा बौद्ध धर्म शिक्षक वास्तव्यास होता. पल्लव राजांनी शैवपंथीय व वैष्णव पंथिय अनेक प्रसिद्ध मंदिरांची रचना केली आहे ती मंदिरे आजही सुस्थितीत आहेत.

- **वास्तु, शिल्प व मूर्तीकलेचा विकास :**

पल्लवांच्या काळात वास्तुकला, शिल्पकळा व मूर्तीकलेचा विकास झाला. याशिवाय चित्रकलेचाही विकास झाला. अखंड खडक खोदून मूर्ती बनविण्याची कला पल्लवानीच आणली. वराहमंदिरातील दशावतार लक्ष्मी, सूर्य, दूर्गा यांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. बुद्धांची गुहामंदिरे, द्राविड मंदिरेही त्यांनी उभारली आहेत. महाबलीपुरम येथील नगरात अनेक मंदिरे बांधली आहेत. या काळात कांचीचे कैलासनाथाचे मंदिर, विख्यात आहे. मंदिर वास्तुकलेबरोबर शिल्प व मूर्तीकलेचाही विकास मोठ्या प्रमाणात झाला. याशिवाय शिक्षण, साहित्य, कला इ. क्षेत्रातील प्रगतीमुळे या काळाला वैभवाचा कालखंड मानले जाते.

**३.३ सारांश :**

इ.स. ६ वे शतक ते इ.स. १२ व्या शतकापर्यंत भारतात मोठ्या प्रमाणात राजकीय परीवर्तन पडून आले. गुप्तसाम्राज्याच्या ऱ्हासानंतर उत्तरभारतात लहान लहान राज्ये आणि दक्षिण भारतात स्वतंत्र राज्ये जन्माला आली. गुप्तांच्या नंतर एका महान सत्ताधिशाने राज्य केले तो म्हणजे हर्षवर्धन. भारताच्या इतिहासातील श्रेष्ठ राजांच्या मालिकेत हर्षवर्धनाचा उल्लेख केला जातो. याची माहिती चीनीप्रवासी ह्यूएनत्संगच्या प्रवासवर्णनात पहावयास मिळते. ह्यूएनत्संगचे स्थान आजही भारतीय इतिहासात आणि चीनमध्येही महत्वाचे मानले जाते. उत्तरेत हर्षवर्धनाच्या सत्तेवेळी दक्षिणभारतातही जी राज्ये उदयास आली. त्यामागे बदामीचे चालुक्य आणि त्यानंतरची महत्वाची सत्ता म्हणजे पल्लवांची एकूणच गुप्तोत्तर कालखंडातील भारताच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक विकासामध्ये या राजांनी भर घातली कल्याणकारी राज्याची भूमिका सत्यात आणली.

- **स्वंयअध्ययन –३**

**रिकाम्या जागा भरा.**

१. 'भारवी' हा संस्कृत कवी ........ याच्या दरबारात होता.

अ) सिंहविष्णू ब) पहिला महेंद्रवर्मन क) पहिला नरसिंहवर्मन ड) परमेश्वरन

२. अखंड शिळेतून मंदिर खोदण्याची कला ........ याने सुरू केली.

अ) दुसरा नरसिंहवर्मन ब) दुसरा परमेश्वरन क) पहिला महेंद्रवर्मन ड) सिंहविष्णू

३. दक्षिण भारतात पल्लवांच्या सत्तेचा प्रभाव ........ या राजाने निर्माण केला.

अ) पहिला महेंद्रवर्मन ब) पहिला नरसिंहवर्मन क) दुसरा परमेश्वरन ड) दंतिवर्मन

४. कांची येथील कैलासनाथाचे मंदिर ........ या पल्लव राजाने बांधले.

अ) दुसरा परमेश्वरन ब) पहिला महेंद्रवर्मन क) दुसरा नरसिंहवर्मन ड) दंतिवर्मन

५. पल्लवांच्या कारकिर्दीत ........ पंथाच्या प्रसाराला गती मिळाली.

अ) महानुभाव ब) शैव व वैष्णव
क) चिश्ती व सुऱ्हावर्दी ड) कादिरीया व नक्शबंदिया

## ३.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयंअध्ययन प्रश्न क्रमांक –१**

अ) १) अ, २) –ब, ३) –ब, ४) –ब, ५) ड

ब) १) रत्नावली, प्रियदर्शिका, नागानंद, २) इ.स. ६३० ते ६४५, ३) शशांक, ४) ह्यू–एन–त्संग, ५) मिमांसक, भागपती, महाप्रतीहार

**स्वयंअध्ययन प्रश्न क्रमांक –२**

अ) १) –अ, २) –क, ३) –ब, ४) –क, ५) क

ब) १) चार, २) पहिला पुलकेशी, ३) –मंगलेश, ४) गावुंडा, ५) चालुक्य

**स्वयंअध्ययन प्रश्न क्रमांक –३**

अ) १) –अ, २) –ब, ३) –ब, ४) –क, ५) –ब

## ३.५ सरावासाठी स्वाध्याय

**अ) टीपा द्या.**

१) युवान श्वांग (त्यु–एन–त्संग)

२) हर्षवर्धनकालीन शासन व्यवस्था.

३) चालुक्यकालीन धार्मीक जीवन.

४) पल्लवकालीन सांस्कृतीक प्रगती.

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) हर्षवर्धनाची योग्यता स्पष्ट करा.

२) बदामीच्या चालुक्यांची माहिती द्या.

३) पल्लव राजघराण्याची माहिती द्या.

## ३.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :


१) D. N. Jha - Ancient India.

२) K. Nilkanth Shastri - A History of South India.


❖❖❖

# घटक – ४
# समाज आणि संस्कृती

अनुक्रमणिका


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

४.२.१ प्राचीन भारतीय स्त्रीयांचा दर्जा

४.२.२ वर्णव्यवस्था

४.२.३ प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्था

४.२.४ कला (मध्याश्मयुगीन चित्रकला ते अजंठा चित्रे)

४.२.५ स्थापत्य (महाराष्ट्रातील गुहास्थापत्य ते मध्य प्रदेशातील बांधीव मंदिरे)

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


## ४.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

- वैदिक काळापासून, गुप्तोत्तर काळापर्यंत स्त्रीयांचे स्थान कसे बदलत गेले ते लक्षात येईल.
- एकंदर प्राचीन भारतात, वर्ण व्यवस्थेचा उगम होऊन, तिचे जातीव्यवस्थेत कसे रुपांतर झाले ते समजून येईल.
- प्राचीन भारताच्या जगप्रसिध्द शिक्षण पध्दतीचा विकास कळून येईल.
- मध्याश्मयुगीन आणि अजंठा गुहाचित्रांच्या अनुषंगाने प्राचीन भारतातील चित्रकलेचा विकास लक्षात येईल.

- प्राचीन भारतातील स्थापत्याचा विकास हा पूर्वऐतिहासिक गुहा स्थापत्यापासून, बांधीव मंदिरापर्यंत कसा झाला हे ध्यान्यात येईल.

## ४.१ प्रास्ताविक :

एखाद्या समाजाची प्रगती ही त्या समाजाने स्त्रीला दिलेल्या स्थानावरून लक्षात येते. प्राचीन काळात भारतीय स्त्रीचा दर्जा मिश्रस्वरूपाचा होता. वैदिक काळात समाजात स्त्रियांना आदराचे स्थान होते. प्रारंभी तिला पूर्णपणे स्वातंत्र्य हेते. नंतरच्या स्वातंत्र्यावर सामाजिक बंधने आली. चूल व मूल एवढेच तिचे अधिकार क्षेत्र राहिले. बौद्ध, जैन धर्मातील भिक्षुणी स्त्रियांना बरेच स्वातंत्र्य होते. मौर्यकालात स्त्रियांची स्थिती मिश्र स्वरूपाची होती. मात्र याच काळात गणिका, वेश्या व दास या प्रथांचा विकास झाला व बालविवाहाचे प्रमाण वाढत गेले. मौर्योत्तर काळात ग्रीक, शक, कुशाणांची परकीय आक्रमणे सुरू झाली. तत्कालीन राजकीय अस्थिरता, परकीयांच्या आगमनाने प्रारंभीचे राजकीय, सामाजिक व पारिवारीक स्वास्थ्य नष्ट झाले. मौर्योत्तर काळातल्या अस्थिरतेमुळे स्त्री असहाय, आश्रित व परावलंबी होऊन तिला पिता, पती व पुत्राच्या आश्रयाची गरज निर्माण झाली. म्हणून ती परावलंबी बनली. गुप्त काळात वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन झाले. स्त्रियांचा दर्जा सुधारला. विविध क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय कर्तबगारी दाखविली. दुर्दैवाने गुप्त काळाच्या विनाशानंतर हूण, मुस्लिमांची आक्रमणे, छोट्या सत्तांचा उदय, त्यांच्यातील संघर्ष व अस्थिरता इ. कारणामुळे स्त्री पावित्र्य, स्त्री अस्तित्व व स्त्री रक्षण इ. प्रश्न निर्माण झाले. प्राचीन भारतीय स्त्रियांचा मिश्र दर्जा अभ्यासतांना स्त्री शिक्षण, विवाह, मालमत्ता, वारसा, कायदा, न्याय, स्त्रीधन आणि नियोग, वेश्या, दासी, सती, वैधव्य व पतिव्रत्य इ. घटकांवर प्रकाश टाकावा लागतो. तसेच उपजीविकेच्या साधनांवर नियंत्रण प्रस्थापित झाले की कलेचा उदय होतो; तिचा विकास होऊ लागतो. भारतामध्ये चित्रकलेच्या पहिल्या खूणा, या, आपल्याला मध्याश्मयुगीन गुहा चित्रांतून दिसून येतात. पुढे, अजंठाच्या भित्तीचित्रातून त्यांची उत्कर्षावस्था दिसून येते. त्यापुढे, चोल-पल्लवांच्या मंदिरामध्येही चित्रं दिसून येतात. दुर्देवाने अशा कलाविशेषाचे पुरावे मात्र मर्यादित स्वरुपात शिल्लक राहिलेले आहेत. त्यामुळे मध्याश्मयुगीन आणि अजंठा येथील गुहाचित्रांचा प्रातिनिधीक स्वरुपात विचार करायचा आहे. वास्तविक शिल्पकलाही सुध्दा एक कलाच. ते ही भारताचे एक महत्वाचे वैशिष्ट्य आहे. मात्र विस्तारभयास्तव आपण चित्रकलेकडेच लक्ष द्यायचे आहे.

## ४.२ विषय विवेचन :

### ४.२.१ प्राचीन भारतातील स्त्रीयांचा दर्जा :

#### १. स्त्री शिक्षण :

वैदिक काळात स्त्रियांना सन्मान व प्रतिष्ठा होती. मुलाप्रमाणे मुलीलाही शिक्षण दिले जात व उपनयन संस्कारही करत. वैदिक काळात अनेक विद्वान स्त्रीया निर्माण झाल्या होत्या. अपाल, घोषा, विश्ववारा, सिकता, लोपामुद्रा व निवावसी या विदुषी म्हणून प्रसिद्ध होत्या. त्यांनी ऋग्वेदातील काही मंत्रांची रचना केल्या आहेत. शकुंतला, रुक्मिणी उत्तम कवयित्री होत्या. कन्येस धर्म, तत्त्वज्ञान, नृत्य, संगीत व गायनाचेही शिक्षण देण्यात

येत असे. काही स्त्रीया अध्यापन कार्यही करत असत. अध्ययन करणाऱ्या स्त्री विद्यार्थीनींचे ब्रह्मवादिनी व सद्योवधू हे दोन प्रकार होते. मैत्रेयी, गार्गी, सुलभा व वाक्यनवी या स्त्रीया विद्येत प्रवीण होत्या. उपनिषद व सूत्रकाळातही स्त्रिया शिक्षणात पारंगत होत्या. गार्गी व याज्ञवल्क्यपत्नी मैत्रेयी या स्त्रिया विद्वान होत्या. चंद्रगुप्ताने शरीर रक्षक म्हणून स्त्रियांची नियुक्ती केली होती. कैकेयी, इंद्रसेना, विश्वला व सत्यभामा युद्धशास्त्रात निपुण होत्या. गुप्तकाळात अनेक राजस्त्रिया विविध कलात पारंगत होत्या. सहाव्या शतकात बौद्ध व जैन विहारातूनही शिक्षण दिले जात होते. गुप्त काळापर्यंत क्षत्रिय स्त्रियांना शिक्षणाची सोय होती. परंतु नंतरच्या काळात बालविवाह व स्त्रियांवरील जाचक निर्बंधामुळे भारतीय स्त्रिया निरक्षर बनत गेल्या. त्यामुळे त्यांना स्वातंत्र्य राहिले नाही.

**२. विवाह पद्धती :**

विवाह हा पवित्र संस्कार होता. सामान्यत: वधूगृही विवाह होई. सप्तपदीसमयी कन्यादान, होम, पाणिग्रहण, अग्नि-परिणय, अश्वारोहण, लाजाहोम इत्यादी विधी करण्यात येऊ लागले. विवाहसंस्थेला स्थैर्य प्राप्त झाले होते व समाजात अनेक प्रकारचे विवाह प्रचलित झाले होते. स्मृतीमध्ये विवाहाचे आठ प्रकार दिले आहेत. १) ब्राह्मविवाह, २) प्रजापत्य, ३) दैव, ४) आर्ष, ५) पिशाच्च, ६) राक्षस, ८) असूर, ८) गंधर्व. या आठ पैकी पहिले चार चांगले व इतर चार त्याज्य मानले जात ते पुढीलप्रमाणे-

**१) ब्राह्म विवाह :** यामध्ये मुलीचे पिता विद्यासंपन्न, सद्‌गुणी असलेल्या मुलास आपल्या कन्येसोबत विवाहासाठी आमंत्रित करीत असे.

**२) प्रजापत्य विवाह :** यात वराची विधीपूर्वक पूजा करून कन्यादान केले जात व वधू-वरास गृहस्थीजीवन सुखी, आनंदी जगा असा आशिर्वाद कन्या पिताकडून दिले जाई.

**३) दैव विवाह :** यात मुलीच्या विवाहासाठी वधूपिता यज्ञ आयोजित करून यज्ञ विधीपूर्वक संपन्न करणाऱ्यास कन्यादान करीत असे. हा विवाह सामान्याकरीता नसल्याने अल्पावधीतच हा विवाह कालबाह्य ठरला.

**४) आर्ष विवाह :** या विवाहात कन्यापित्यास वराकडून एक बैल-गाय दिले जाई.

**५) पिशाच्च विवाह :** हा विवाह हिंदू समाजात निंदनीय समजला आहे. यात मुलीला मद्य पाजून बेशुद्ध करून तिची फसवणूक करून विवाह केला जाई. याज्ञावाल्क्य या विवाहास छळयुक्त व कपटयुक्त म्हणतो.

**६) राक्षस विवाह :** यात वधुपित्याशी युद्ध अथवा बलप्रयोग करून कन्या अपहरण केले जाईल.

**७) असूर विवाह :** यात वधूपित्यास वर पक्षाकडून धन देवून केलेल्या विवाहाला असूर विवाह म्हणत.

**८) गंधर्व विवाह :** एकमेकांच्या प्रेमात पडलेल्या युवक-युवतीने परस्परांच्या संमतीने केलेला विवाह हा गंधर्व विवाह होय.

या आठ प्रकाराशिवाय विवाहाच्या अनेक प्रथा कालौघात निर्माण झाल्या. त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे-

**१) स्वयंवर विवाह :** ही विवाह पद्धती ऋग्वेदकाळात सुरू झाली आणि क्षत्रियांत हा प्रकार प्रचलित होता. इंदूमती, द्रौपदी, सीता, दमयंती आणि यशोधरा यांचे विवाह स्वयंवर पद्धतीचे होते. त्यांनी पतीची निवड स्वत: केली होती. या पद्धतीत अनेक युवा-युवती एकत्र येत असत. अशा प्रसंगी कोणती तरी शर्यत किंवा परीक्षा लावत असत. जमलेल्या पुरुषामधून कन्या पतीची निवड करीत असत.

**२) अनुलोम विवाह :** उच्च वर्णीय पुरुषांचा निम्नवर्णीय स्त्रीशी झालेला विवाह हा अनुलोम विवाह होय. उदा. भृगुवंशी ब्राह्मण ऋषी च्यवनचा क्षत्रीय राजकुमारी सुकन्येशी झालेला विवाह.

**३) प्रतिलोम विवाह :** उच्चवर्णीय स्त्रीचा कनिष्ठवर्णी पुरुषांबरोबर झालेलल्या विवाहास प्रतिलोम विवाह म्हणत. ब्राह्मण स्त्री, क्षत्रिय किंवा क्षत्रिय स्त्री व शुद्र पुरुष यांचा विवाह प्रतिलोम प्रकारात मोडत असत. उदा. ब्राह्मण ऋषी शुक्राचार्य पुत्री देवयानी व ययाति यांचा विवाह होय.

**४) बहुपती-पत्नी विवाह :** एकपति-पत्नी विवाह शास्त्रोक्त व बहुमान्य असला तरीही समाजात बहुपत्नी व बहुपती विवाहाचे उल्लेख आढळतात. उदा. दशरथाला तीन, पंडू राजाला दोन (माद्री-कुंती), याज्ञवल्क्य ऋषीला दोन (कात्यायनी-मैत्रेयी) व श्रीकृष्णाला १६ सहस्त्र पत्नी होत्या. बहुपतित्वाची प्रथा अपवादरुपाने अस्तित्वात होती. उदा. द्रौपदी - पाच पांडवांचा विवाह बहुपती विवाह होता.

**५) पुनर्विवाह :** प्राचीन काळात पुनर्विवाह प्रचलित होता. ऋग्वेद व धर्मसूत्रकारांनीही त्यास संमती दिली होती. पती हरवला किंवा मृत्यू पावला अशा स्थितीत स्त्रीला पुनर्विवाहाची परवानगी होती. तैतरिय संहितेत पुनर्विवाहाचा उल्लेख आहे.

**६) बालविवाह :** रजोदर्शनापूर्व ज्या कन्येचा विवाह त्यास 'बाल विवाह' म्हटले जाईल. आपल्या मुलीचा विवाह ८ व्या वर्षी न करणारा पिता नरकात जाईल असे मनूने म्हटले. चालुक्य कन्येचा विवाह गोव्याच्या कदंब राजकुमारीशी बाल्यावस्थेत झाला होता.

**७) केशवपन :** पतीच्या मृत्यूनंतर स्त्रीचे केशवपन केले जाईल. मध्ययुगीन काळात विधवा केशवपनाची प्रचलीत होती. ती प्राचीन काळी फारशी रूढ झाली नव्हती. वेद व धर्मसूत्रात केशवपनाचा संदर्भ मिळत नाही. विधवांनी वैराग्य वृत्तीने जीवन जगावे असा दंडक होता. बौद्ध भिक्षुणी मुंडण करीत. त्याचा प्रभाव पडून मध्ययुगात विधवांमध्ये केशवपनाची प्रथा रूढ झाली असावी असा युक्तीवाद काही धर्मग्रंथांनी केलेला आहे.

**८) सतीप्रथा :** पती निधनानंतर त्यांच्या चितेवर उडी टाकून त्या बरोबर सहगमन करणे म्हणजे सती जाणे होय. प्राचीन काळी ही प्रथा फारशी प्रचलित नव्हती. सती प्रथेचा पहीला उल्लेख इ.स.पू. ५१० मध्ये एरण शिलालेखामध्ये मिळतो. सतींना स्वर्गप्राप्ती होते व त्यांचा सर्वत्र सन्मान होतो. या धारणेपोटी धर्मशास्त्रकारांनी स्त्रीप्रथेचे समर्थन केले. प्राचीन ग्रीक व जर्मन लोकांत ही प्रथा प्रचलित होती. मूळात सती गेलेल्या स्त्रीची संपत्ती हडप करण्याच्या हेतूने काही नातलग मंडळी तिला सती जाण्यास प्रवृत्त करीत असा युक्तीवादही करता येतो.

**९) हुंडा पद्धती :** ऋग्वेदकाळात वरपक्षास हुंडा देण्याची प्रथा होती. दैव विवाह प्रकारात वधू पिता वराला हुंडा देऊन कन्यादान करीत असे. हा विवाह समाजमान्य व प्रतिष्ठीत समजला जाई. जरी हुंडा पद्धत प्रचलित

असली तरी ती अत्यंत मर्यादित होती. हुंड्याची सक्ती वधूपित्यावर नव्हती. वराला वधूपिता सालंकृत कन्यादान करीत असे.

**१०) स्त्रीधन :** विवाहाच्या वेळी स्त्रीला भेटवस्तू स्वरूपात जे दान दिलेले असते त्यास स्त्रीधन म्हणत. अशाप्रकारच्या स्त्रीधनाचा प्रथम उल्लेख ऋग्वेदात मिळतो. स्त्रीला वैयक्तिक मिळालेल्या संपत्तीचा स्त्रीधनात समावेश होतो. विवाहप्रसंगी पिता कन्येस अलंकार, जमीन, रथ, पालख्या, पशू, जमिनी, गांवे आणि दासदासी भेट स्वरूपात देत असे. मनूने सहा प्रकारच्या स्त्रीधनाचे उल्लेख केलेला आहे. स्त्रीच्या पतीला संकटप्रसंगी स्त्रीधन वापरण्याचा अधिकार होता. परंतु त्याकरीता स्त्रीची संमती अनिवार्य होती.

**११) नियोग पद्धती :** प्राचीन काळापासून (वैदिक) भारतात नियोग प्रथा होती. या प्रथेच्या अंतर्गत नपुसंक पती असेल आणि त्याची मान्यता असेल तर पुत्रहिन पत्नी नियोजित पुरुषांबरोबर लैंगिक संबंध ठेवून पुत्रांना जन्म देऊ शकत होती. काही धर्मशास्त्रांनी नियोगाला संमती दिली तरीही इतरांनी त्याचा निषेध केला. कालांतराने ही प्रथा बंद झाली.

**१२) पडदा पद्धती :** वैदिक काळात पडदा पद्धती नव्हती. कोणत्याही धर्मग्रंथात ह्या प्रथेचा उल्लेख नाही. स्त्रीयांना सामाजिक व धार्मिक सण समारंभात सामील होण्याचे पूर्ण स्वातंत्र्य होते. उत्तर वैदिक काळात स्त्रियांवर अनेक निर्बंध घातले गेले. त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले. पण पडदा पद्धतीचा उल्लेख तत्कालीन साहित्यात सापडत नाही. पुढे मध्ययुगात मुस्लिमांच्या आगमन व प्रभावानंतर उत्तर भारतात ही प्रथा सुरू झाली असावी.

**१३) घटस्फोट :** धर्मशास्त्राची घटस्फोटाला मान्यता नव्हती. म्हणून घटस्फोट व स्त्रीच्या पूनर्विवाहाला असहमती दाखविली आहे. नारदांनी पती नपुंसक असेल किंवा संन्यासी झाला असेल तर स्त्रीला घटस्फोट घेण्याचा अधिकार दिला आहे. तरीदेखील सहजासहजी हिंदू स्त्री-पुरुषांना घटस्फोट घेण्याची मूभा नव्हती.

**१४) वेश्या :** प्राचीन भारतीय समाजात वेश्या व्यवसाय प्रचलित होता. गणिका हा वेश्यांचाच उपप्रकार होता. वात्सायनाचे कामसूत्र, कौटिल्याचे अर्थशास्त्र तसेच जैन व बौद्ध ग्रंथात वेश्या व त्यांच्या व्यवसायाची माहिती मिळते. बौद्धांच्या साहित्यात आम्रपाली या वेश्येसंदर्भात उल्लेख मिळतो. चंद्रगुप्त मौर्यांच्या राजवटीत वेश्यांना राजाश्रय मिळाला होता.

**१५) वारसा हक्क :** वैदिक काळात कन्या आणि पुत्राला समान लेखले होते. पती-पत्नीला स्वगृहातील चीज वस्तूंचे समान भागीदार समजले होते. परंतु वास्तविक पाहता स्त्रीला संपत्तीमध्ये समान हक्क दिले नाहीत. जेष्ठ मुलाप्रमाणे जेष्ठ मुलीला वारसाहक्क नव्हता. मुलाप्रमाणे पत्नी, माता किंवा मुलीला मालमत्तेचा वाटा मिळत नव्हता. पुनर्विवाहाचा मर्यादित अधिकार दिला गेला तरीही संपत्तीचा हक्क मिळत नव्हता. कन्या अविवाहित असल्यास किंवा तिचा पतीवियोग झाल्यास तिला मालमत्तेचा वारसा मिळत असत. थोडक्यात स्त्रीला सहजासहजी मालमत्तेचा हक्क मिळत नव्हता.

**१७) सामाजिक, धार्मिक जीवनातील स्थान :** पूर्व वैदिक काळात स्त्रीयांना सामाजिक व धार्मिक क्षेत्रात सन्मान व प्रतिष्ठा होती. धर्मसूत्राच्या काळात मुलींचा विवाह लवकर सुरू झाल्याने स्त्री शिक्षणापासून वंचित

झाली व परिणामी स्त्रियांना शूद्राचे स्थान दिले गेले. बहुतांश सर्वच हिंदू धर्मग्रंथांनी स्त्रीयांच्या स्वातंत्र्याचा संकोच केला. बौद्ध व जैन धर्म ग्रंथांनी स्त्रीविषयक उदार भूमिका ठेवली. परंतु पूर्व वैदिक काळात स्त्रियांना जी उदार वागणूक दिली होती तिचा लोप उत्तर वैदिक काळात झाल्याचे दिसते. स्त्री ही पुरुषाची दासी व उपभोग्यवस्तू आहे असे स्त्रीचे चित्र निर्माण करण्यात आले. त्यामुळे स्त्रियांचे सामाजिक व धार्मिक स्थान खालावले.

उपरोक्त विवेचनाचे सर्वांगीण सुक्ष्मावलोकन केल्यास स्त्रीचे परस्पर विरोधी स्थान व तिचे भिन्न रुपे दृष्टोत्पत्तीस येतात. पूर्व वैदिक, मौर्य व गुप्त काळात स्त्रियांची स्थिती समाधानपूरक होती. अन्य मौर्योत्तर काल व गुप्तोत्तर काळात त्यांना दुय्यम स्थान प्राप्त झाले. त्यांच्यावर अनेक निर्बंध घातले गेले. त्यासाठी राजकीय अस्थैर्य, बाह्य आक्रमणे, भारतीयांची मानसिकता इ. गोष्टी कारणीभूत ठरल्या. त्यामध्ये धर्मशास्त्रकारांनीही कमालीचा दुजाभाव केला होता. प्राचीन भारतीयांनी आदर्श स्त्रीजीवनाचे रूप जगापुढे ठेवले. मात्र परिस्थितीजन्य दोषांमुळे त्यांना कनिष्ठ स्थान प्राप्त झाले.

● **स्वयं अध्ययन प्रश्न – १**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. प्राचीन भारतात विवाहाचे एकूण ............ प्रकार होत.

अ) ८ ब) ६ क) ४ ड) २

२. ................ हा वेश्यांचाच उपप्रकार होता.

अ) गणिका ब) दासी क) दोन्ही ड) यापैकी नाही.

३. .............. हा विवाह हिंदू समाजात निंदनीय समजला आहे.

अ) आर्ष विवाह ब) दैव विवाह क) ब्राह्म विवाह ड) पिशाच्च विवाह

४. रजोदर्शनापूर्व ज्या कन्येचा विवाह होत त्यास ............ म्हटले जाईल.

अ) जरठ विवाह ब) बाल विवाह क) विधवा विवाह ड) दैव विवाह

५. मनूने स्त्रिधनाचे ............ प्रकार सांगितले आहेत.

अ) ४ ब) ६ क) ८ ड) १०

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. सती प्रथेचा पहिला उल्लेख कोणत्या शिलालेखात मिळतो ?

२. विवाहाप्रसंगी वधूला देण्यात येणाऱ्या भेटवस्तूस काय म्हटले जात असे?

३. विवाहापर्यंत शिक्षण घेणाऱ्या स्त्रीला काय म्हणले जात असे?

४. कोणत्या विवाह प्रकारास कन्यापित्यास एक बैल-गाय दिली जाते?

५. कोणत्या सम्राटाने शरीररक्षक म्हणून स्त्रियांची नियुक्ती केली होती?

**४.२.२ वर्णव्यवस्था :**

ऋग्वेकाळात प्रारंभी वर्ण व जाती असा भेद नसावा. कालौघात समाजाच्या वाढत्या गरजा भागविण्यासाठी श्रमविभागणीच्या तत्वावर वर्णव्यवस्था निर्माण झाली. वर्णाश्रम हा भारतीय सामाजिक जीवनाचा मुख्य पाया आहे. वर्णव्यवस्था ही भारतीयांची केवळ गरज नूसन धार्मिक ऋण फेडण्याचे ते एक अनिवार्य साधन आहे. या व्यवस्थेने सामाजिक शिस्त निर्माण केली. मात्र त्याचबरोबर एक शोषणाची व्यवस्थाही निर्माण झाली.

**अ) वर्ण उत्पत्ती व सिद्धांत :**

**१) दैवी सिद्धांत :**

- ऋग्वेदाच्या १० मंडलातील पुरुषसुक्तात विराट पुरुषाच्या अंगातून चार वर्ण निर्माण झाल्याचे म्हटले आहे.
- महाभारतामध्ये विराट पुरुषाऐवजी ब्रह्माच्या शरीरातून वर्णव्यवस्था निर्माण झाल्याचे म्हटले आहे.
- विष्णू पुराणात भगवान विष्णू पासून वर्ण निर्माण झाल्याचे माणले आहे.
- वायुपुराणात क्षत्रियाला ब्रह्माच्या वक्षातून उत्पन्न मानले आहे.

**२) गुण-कर्म सिद्धांत :**

- गीतेमध्ये श्रीकृष्णांनी वर्ण उत्पत्ती गुण व कर्मावर आधारीत केली आहे.
- महाभारताच्या शांतिपर्वात व काही पुराणात सुद्धा वर्ण उत्पत्ती कर्म आधारीत झाल्याचे मानले आहे.

**३) रंग-उत्पत्ती सिद्धांत :**

- वर्णाचाच दुसरा अर्थ रंग रंगाचा अर्थ घेवून ऋग्वेदात गौर रंगाच्या आर्याचा एक वर्ग व काळ्या अनार्यांचा दुसरा वर्ग असे दोन वर्ग निर्माण झाले. ही उत्पत्ती पाश्चात्य विद्वानांनी मांडलेली आहे. कारण त्यांच्याकडे सामाजीक भेद रंगावर आधारलेले होते.

**४) जन्मावरून वर्ण उत्पत्ती सिद्धांत :**

- महाकाव्य काळात वर्ण हा जन्मावरून ठरविण्यात आला.

**ब) स्वरूप :**

प्रारंभीची वर्णव्यवस्था गुण कर्मावर आधारीत होती. परंतु आर्य व अनार्य संपर्कामुळे वर्णभेद निर्माण झाले. काही अनिष्ठ प्रथामुळे वर्णव्यवस्थेची तटबंदी निर्माण होवून परस्पर वर्णातील रोटी-बेटी व्यवहार बंद झाले. वर्ण

हा जन्माधिष्ठीत बनल्याने प्रत्येक वर्ण स्वत:स श्रेष्ठ व इतर वर्णास कनिष्ठ समजू लागला. वर्ण शुद्धीकरणाला महत्त्व प्राप्त झाले व वर्ण संकर निषीद्ध ठरविले. शुद्रांना हीन लेखले गेले. थोडक्यात ऋग्वेदकालीन गुणकर्मावर आधारीत वर्णव्यवस्था लुप्त झाली व जातीची बंधने दृढमुल झाली. उपनिषदकाळात वर्णव्यवस्था पक्की होत जाऊन त्यातून अनेक जाती उत्पन्न झाल्याचे दिसते. प्रत्येक वर्णाच्या लोकांची कामे ठरविण्यात आली. या काळातील चातुवर्णाची कामे पुढीलप्रमाणे आहेत.

**१) क्षत्रिय :**

राज्यरक्षण, वर्धन करणाऱ्यांचा, लढाऊ वृत्ती जोपासणाऱ्यांचा हा वर्ग होय. शिवाय अध्ययन, यजन, दान, प्रजारक्षण व राज्यकारभार ही या वर्णाची प्रमुख कर्तव्ये होती. ते कर माफ असलेले विशेषाधिकार संपन्न लोक होते. युद्धकलेत ते प्रविण होते. त्यामुळे त्यांचा धर्म क्षात्रधर्म बनला.

**२) ब्राह्मण :**

ब्रम्हाविषयी जाणकार, विद्या व धर्माचा उपासक तो ब्राह्मण. अध्ययन, अध्यापन, यजन, याजन, दान, प्रतिगृह्य ही त्यांची प्रमुख कर्तव्ये होती. सर्व धार्मिक विधी व संस्कार तोच पार पाडीत असे. विद्या व वेदरक्षण व निस्वार्थ भावना बाळगून ते समाजात आदर्शस्थानी होते. क्षत्रियांवर त्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी होती.

**३) वैश्य :**

पशूंचे रक्षण, दान, अध्ययन, वाणिज्य, व्याजबट्टा व शेती ही वैश्यांची मुख्य कर्तव्ये. या वर्णात सामान्य लोकांचा समावेश होईल. ह्या वर्गाला 'विश' असे नाव होते. त्यापासून वैश्य असा शब्द तयार झाला. पूर्वी ते कर देत, अध्ययन, यजन व दान ही कामे करीत. नंतरच्या काळात हा वर्ण फायदेशीर असलेल्या व्यापाराकडे आकर्षीत झाला. त्यामुळे पुढील काळात वैश्य म्हणजे व्यापारी हा विचार रूढ झाला.

**४) शुद्र :**

हे ही वैदिक आर्यच होते. ब्राह्मण, वैश्य क्षत्रिय या तीन वर्गातील लोकांची सेवा करणे हे शूद्रांचे मुख्य कर्तव्य. त्यांची आज्ञा पाळणे अनिवार्य असे. अन्यथा त्यांना कठोर दंड दिला जाई. वेदाध्ययन, यज्ञ किंवा उपनयनाचे अधिकार शूद्रांना नव्हते. फक्त कष्टाची व हलकी मानली गेलेली कामे ते करीत. रोमिल थापर, आर. एस. शर्मानी मौर्य काळात शुद्रांची स्थिती दयनीय असल्याचे म्हटले आहे. मात्र भारतीय दासांची स्थिती इतर देशांच्या तुलनेत बरीच चांगली होती असे परकीय प्रवासी इतिहासकारांनी म्हटले होते.

**ड) वर्णसंकर :**

या चार वर्णाशिवाय पुढे काही काळानंतर परस्परांच्या संबंधामुळे संकर जाती भारतात निर्माण झाल्या. सूत, वैदेह, मागध ही संकर (त्रैवर्णिक) जातीची उदाहरणे असून त्यांची स्वतंत्र कर्तव्येही आहेत. चातुवर्णाबाहेरील लोकांना 'व्रात्य' म्हटले जाई. त्यांना वर्णव्यवस्था मान्य नव्हती. त्यांची बोलीभाषा प्राकृत होती. ते भटके जीवन जगत. या लोकांचे वास्तव्य अधिक मगध देशात आढळल्याचे दिसले. निषाद लोकांत आर्येतरांचा समावेश

होता आणि सध्याच्या भिल्लांशी त्यांची तुलना करता येईल. वर्णव्यवस्था ही अन्यायी होती. प्रारंभी वर्णव्यवस्था गुणावर आधारीत होती. ती पुढील काळात जन्म आधारीत बनली. परिणामी श्रेष्ठ कनिष्ठ याची भावना निर्माण झाली.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे या वर्णव्यवस्थेमुळे समाजात विषमता निर्माण होऊन समाज दुभंगला गेला. कनिष्ठ वर्गाच्या लोकांना मूलभूत अधिकार नाकारण्यात आले.

● **स्वयं अध्ययन प्रश्न – २**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. ............ हा वर्ण देशातील अर्थव्यवस्था सांभाळणारा महत्त्वपूर्ण घटक होता.

अ) ब्राह्मण ब) क्षत्रिय क) वैश्य ड) शुद्र

२. ............ विषयी जाणकार, विद्या व धर्माचा उपासक तो ब्राह्मण होय.

अ) विष्णू ब) ब्रह्मा क) महेश ड) गणेश

३. ............ मध्ये वर्ण शब्द सर्वप्रथम येतो.

अ) सामवेद ब) अथर्ववेद क) ऋग्वेद ड) यजुर्वेद

४. शुद्र वर्णाचा सर्वप्रथम उल्लेख ऋग्वेदाच्या १० मंडळातील ............... या सुक्तामध्ये मिळतो.

अ) पुरुष ब) रुद्र क) देवी ड) श्री

५. क्षत्रिय हे .............. कलेत निष्णात होते.

अ) युद्ध ब) संगीत क) नृत्य ड) गायन

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. ब्राह्मण पुरुष व क्षत्रिय स्त्री दांपत्याच्या संततीला काय म्हणत?

२. अनार्य वैश्यांना कोणती संज्ञा होती?

३. ईश्वर विषयक धार्मिक ज्ञानाला काय म्हटले जात?

४. कोणाच्या काही प्रथा देवता व जीवन पद्धतीचा आर्यांनी स्विकार केला?

५. कोणत्या पुराणात भगवान विष्णू पासून वर्णाचा उद्‌भव मानला आहे.

**४.२.३ प्राचीन भारतीय शिक्षण पद्धती :**

भारतीय संस्कृतीत ज्ञान, ज्ञानदान व ज्ञान प्राप्तीला विशेष महत्त्व होते. शिक्षणाला मनुष्याचे तृतीय नेत्र मानले होते. वैदिक, जैन, बौद्ध व हिंदू धर्मांनी ज्ञानाला श्रेष्ठ स्थान दिले होते. गीतेमध्ये ज्ञानाइतकी जगातील

पवित्र वस्तू नाही 'नही ज्ञानेन सदृशं पवित्र मिह विद्येत! ४-३८) अशा शब्दात ज्ञानाचे महत्त्व सांगितले. ज्ञान प्राप्त करण्याच्या विविध पद्धती प्राचीन भारतात रूढ झालेल्या होत्या. त्यापैकी वैदिक व बौद्ध शिक्षण पद्धती प्रमुख होत्या. भारतीयांनी आपल्या शिक्षणाचे ध्येय ज्ञान साधना, शील, व्यक्तीविकास व सामाजिक वारसाचे संरक्षण असे मानलेले होते. शिक्षण पद्धती व शैक्षणिक संकुलांची निर्मिती प्रारंभी वैदिक काळात आली व तिचा उत्कर्ष व विस्तार बौद्ध काळात झाला.

**अ) शिक्षणाची प्रमुख उद्दिष्टे :**

प्राचीन शिक्षण व्यवस्था उच्च दर्जाच्या मानवी मूल्यांवर आधारीत होती. तिचा पाया धर्म आध्यात्म व आदर्श मनुष्य व समाज निर्माण करणे हे तिचे मूळ उद्दिष्ट होते. धर्म, नीती, सदाचरणनिष्ठ हे प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीचे मूळ होते. वैदिक व बौद्ध शिक्षण प्रणालीने हीच मूल्ये जोपासली होती. प्राचीन शिक्षणात भौतिक शिक्षणाला अग्रक्रम दिले तरीही त्यावर अध्यात्मिक व नैतिक मूल्यांचे वर्चस्व होते. त्यामुळे भारतीय व्यक्ती सदाचारी व प्रगत बनू शकला. हे भारतीय शिक्षण व्यवस्थेचे फल होते. प्राचीन शिक्षण व्यवस्थेचे उद्दिष्ट व आदर्श पुढीलप्रमाणे -

**१) चारित्र्यांची जोपासना :**

शिक्षणाचा प्रमुख उद्देश उत्तम व्यक्ती चारित्र्य निर्माण करणे हा होता. जगातल्या इतर देश, धर्म, संस्कृतीच्या व शिक्षण पद्धतीच्या तुलनेमध्ये भारतीय प्रणालीने नीतीमूल्यांना अधिक प्राधान्य दिले होते. शिलाशिवाय विद्या व्यर्थ आहे म्हणून नीतीमान व चारित्र्य संपन्न मनुष्य व समाज निर्माण करणे हे शिक्षणाचे अंतिम लक्ष होते.

**२) व्यक्तीमत्त्वाचा सर्वांगीण विकास :**

मनुष्याची सर्वांगीण उत्पत्ती हेच भारतीय शिक्षणाचे अंतिम ध्येय होते. भौतिक शिक्षणामुळे मानवी जीवन संपन्न व सुलभ होईल. परंतु अध्यात्मिक व धार्मिक शिक्षणाने मन, बुद्धी, भावना, प्रवृत्ती व विचारांची मशागत होऊन त्यांना स्थैर्य लाभेल. तसेच संयम, सद्‌गुणांची वाढ होईल आणि नीतीमूल्य व चारित्र्य संपन्नतेची वृद्धी होईल. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांना भौतिक व आध्यात्मिक शिक्षण द्यावे म्हणजे व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास होईल ही प्राचीन शिक्षण तज्ञांची उच्च भूमिका होती. आणि अनुरोधाने त्यांनी शिक्षण व्यवस्थेची निर्मिती केली होती.

**३) संस्कृतीचे जतन व संवर्धन :**

या काळात शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट सांस्कृतिक वारसाचे जतन व संवर्धन करणे हे राहिले आहे. वैदिक काळातील शिक्षण पद्धतीही याला अपवाद राहिली नाही. शिक्षणाद्वारे राष्ट्रीय व सामाजिक संस्कृतीचे जतन व संवर्धन करणे हे तत्कालीन शिक्षण व्यवस्थेचे अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य होते. विद्यार्थ्यांना संस्कृतीचे गहन ज्ञान देऊन सांस्कृतिक वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत पोचवला जात असे.

### ४) उपजिविकेची सुविधा :

व्यवहार कुशल शिक्षण देणे हे सदैव सर्व शिक्षण संस्थांचे कार्य राहिले आहे. प्राचीन काळात देखील शिक्षण पद्धतीने जीवनोपयोगी शिक्षणाला प्राधान्य दिले. त्यामुळे विद्यार्थी आपले भावी आयुष्य सुखी-समाधानी जगू शकला. वैदिक व बौद्ध शिक्षण केंद्राच्या अभ्यासक्रमात अनेक व्यावसायिक विषयांचा समावेश होता. व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना 'अंतेवासीय' म्हणत. प्रत्येक व्यावसायिक कलावंत व कारागीर आपल्या मुलांना पिढीजात धंद्याचे उदा. सुतार, लोहार, सोनारकाम वगैरे शिक्षण देत. या व्यवस्थेमुळे विद्यार्थी स्वावलंबी बनला व त्याच्या उपजिविकेची सोय झाली.

### ५) कलाक्षेत्रातील भरभराट :

प्राचीन शिक्षणात स्थापत्य, शिल्प, चित्र, संगीत, नृत्य, नाट्य व धातूकाम इत्यादी कलेचा समावेश होता. औद्योगिक संघाच्या व्यवसाय शिक्षण संस्था मार्फत व काही विद्या केंद्रामार्फत त्या कलांचे ज्ञान दिले जात असे. राजवाड्यात व मंदिरात रंगशाळा व नृत्यशाळा होत्या. राजदरबारात कलावंतांना राजाश्रय दिला जात व असे कलावंत कलेच्या ज्ञानदानाचे कार्य करीत. अनेक कलावंत गुरुकुल पद्धतीने स्वत:च्या मुलांबरोबरच इतर विद्यार्थ्यानाही आपल्या पिढीजात कलांचे ज्ञान देत. निष्णात कलावंताचा उदय व शिक्षणात कला विषयाचा समावेश ह्या दोन कारणामुळे प्राचीन काळी विविध कलांची भरभराटी झाली.

### ६) भाषा, तत्वज्ञान, साहित्य, शास्त्राचा उत्कर्ष :

विविध धार्मिक प्रमुखांनी शिक्षण संस्था निर्माण केल्या आणि धर्माच्या प्रसारासाठी तत्त्वज्ञान साहित्य व शास्त्राची निर्मिती केली. असंख्य विद्वान पंडीतांनी बहुमुल्य ग्रंथाची रचना केली. परिणामी संस्कृत, पाली, मागधी, तामिळी व प्राकृत भाषांचा विकास झाला. वैदिक, जैन व बौद्ध धर्मियांनी उच्च कोटीचे तत्त्वज्ञान, शास्त्र व वाङ्मय धर्मात केले. शिक्षण व साहित्य निर्मिती ह्या बाबी परस्पर पुरक असल्यामुळे शिक्षणाद्वारे बहुमुल्य तत्त्वज्ञान, साहित्य व शास्त्राचा उत्कर्ष झाला.

### ब) गुरुकुल शिक्षण पद्धती :

प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीचे एक प्रमुख वैशिष्ट म्हणजे गुरुकुल शिक्षण पद्धती होय. विद्वान, तपाचरणी व ऋषीमुनी, मनुष्य वस्तीपासून दूर असलेल्या अरण्यात 'पर्णकुटी' बांधून राहत. त्यांना आश्रम म्हणत. ह्या आश्रमाला गुरुकुल देखील म्हणत.

गुरुकुल शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थी आपल्या घरापासून दूरवर्ती असलेल्या गुरुगृही शिक्षण घेत असे. अशा विद्यार्थ्यांस अनिवासी किंवा आचार्य कुलवासी म्हटले जात होते. धर्मग्रंथावरून स्पष्ट होते की, विद्यार्थ्याने उपनयन संस्काराने गुरुकुलात प्रवेश करावा व विविध विषयांचे ज्ञान प्राप्त करावे. शिक्षण देणाऱ्या अध्यापकांना गुरु तर विद्यार्थ्यांना शिष्य म्हणत. भारतीय शिक्षण व्यवस्थेत ह्या 'गुरु शिष्य परंपरेला' उच्च स्थान होते.

### १) गुरुशिष्य नाते :

गुरुशिष्याचे नाते जिव्हाळ्याचे होते. गुरु हा शिष्याचा अध्यात्मिक पिता असल्याने माता पित्यापेक्षा गुरुला

अधिक सन्मान दिला जात. गुरुगृही विनामुल्य विद्यार्थ्यांच्या निवास, भोजन व अध्ययनाची सोय होती. गुरुच्या कठोर शिस्तीची, शिक्षेची भीती असली तरीही गुरुपती-पत्नी शिष्याची स्वत:च्या मुलाप्रमाणे काळजी घेत.

**२) विद्यार्थ्यांचा गणवेश :**

यावेळी विद्यार्थ्यांनी साधी राहणी व उच्च विचारसरणीला प्राधान्य दिले होते. धोतर, उपरणे, हरिणाजिन (बसणे झोपणे) व दण्ड-कमंडलु इत्यादी वस्तू ते स्वत: जवळ बाळगत असे. ही त्यांच्या रोजच्या वापराची साधने होती. थोडक्यात हा सर्व विद्यार्थ्यांचा गणवेश होता.

**३) छात्र दिनचर्या :**

गुरुकुलातील छात्राची दिनचर्या पुढीलप्रमाणे होती. सूर्योदयापूर्वी पहाटे चार वाजता विद्यार्थ्यांना उठावे लागे. प्रातर्विधीनंतर व अग्नी सूर्योपना पार पाडीत. बौद्धविहारातही हीच पद्धती होती. दोन प्रहरी भोजनाची वेळ होईपर्यंत अध्ययन व अध्यापन चाले. गुरुला नम्रतापूर्वक वंदन करून गुरुसमीप बसून शिष्य गुरुकडून विविध वेदांच्या ऋचांची संस्था घेत असे. मध्यम काळापर्यंत विद्यार्थी नियोजित वेदाचे, शास्त्राचे व विविध विषयांचे पाठांतर, चिंतन व मनन करीत. दुपारच्या जेवणानंतर व दोन प्रहाराच्या विश्रांतीनंतर विद्यार्थी सायंकाळपर्यंत पुन्हा अध्ययन करीत. सायंकाळी आश्रमाबाहेर थोडाचा फेरफटका मारल्यानंतर सायंसंध्या, प्रार्थना व भोजन होत असे. भोजनानंतर ते गुरुमार्फत शंका निरसन करीत. रात्रीच्या ९ ते पहाटे ४ पर्यंत निद्रेचा कालावधी होता. संयमी, नीतीमान, चारित्र्यवान व शिस्तप्रिय आदर्श विद्यार्थी निर्माण व्हावा हा वरील दिनचर्येचा हेतू होता.

**४) अभ्यासक्रम :**

भारतात सर्व ज्ञानाचे मूळ म्हणजे वेद मानले जात. म्हणून वेदांना अभ्यासक्रमात महत्त्वपूर्ण स्थान होते. वैदिक काळात वेदांची रचना अखंडपणे चालू होती. मुलांच्या शिक्षणास वर्ग झालेपासून सुरूवात होई. पुढे धानुपाठ, उणादी सूत्रे, अष्टाध्यायी इ. शिकत. व्याकरणाचा अधिक अभ्यास महाभाष्य, वाक्यप्रदीप इ. आकर ग्रंथांच्या साह्याने केला जाई. सर्वसाधारणपणे विद्यार्थ्यांना शब्दविद्यालयाकरण, शिल्पस्थान विद्या, चिकित्साविद्या, हेतूविद्या व आत्मविद्या याचा अभ्यास शिकविला जाई. वेद, वेदांगे, संख्ययोग इ. तत्त्वज्ञान, बौद्ध धर्मग्रंथ इत्यादीकांचाही अभ्यासक्रम समावेश होता. ज्योतिष व वैद्यक, लष्करी शास्त्रे व विविध कला यांचेही शिक्षण दिले जाईल. प्रत्येकाच्या वर्णधर्माला अनुसरून योग्य ते शिक्षण दिले जात असे.

**५) छात्र कर्तव्य :**

गुरुच्या घरी शिकत असताना शिष्यास घरातील अनेक कामात मदत करावी लागे. त्यांना स्वत:चे कपडे धुणे, स्वयंपाकासाठी सरपण गोळा करणे, भांडी धुणे, आश्रमातील सडा, जमिन स्वच्छ राखणे अनिवार्य होते. आश्रमात व्रताचे पालन करणे, नशिली पदार्थांचे सेवन न करणे व सहकारी शिष्याशी सौजन्याने वर्तन ठेवणे आणि गुरुच्या आज्ञेचे पालन करणे इत्यादी गोष्टीचे पालन करणे बंधनकाकर होते.

**६) समावर्तन :**

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक छात्र, गुरु व ज्ञानप्राप्तीच्या ऋणातून मुक्तीसाठी आपल्या कुवतीप्रमाणे

सुवर्ण, रौप्य, गाय, भूमी, ग्राम व अन्य धनाच्या रुपाने 'गुरुदक्षिणा' अर्पण करीत असत. गुरुदेखील आश्रमातील सर्वांसमोर विद्यार्थ्यांचे शिक्षण उत्तम रितीने पूर्ण झाल्याचे जाहीर करीत. ह्यावेळी गुरु व शिष्य गुरुदक्षिणा कमीत कमी एक गाय देत. ह्या सोहळ्यास 'समावर्तन' समारंभ म्हणत. या पदवीदान समारंभ प्रसंगी गुरु शिष्याला 'सत्यंब्रयान् प्रियं ब्रुयात' ह्या शब्दांत समाजाशी व आप्तजनाशी कसे वर्तन ठेवावे ह्या विषयी उपदेश करीत.

**७) सत्तारंभ व सुट्टया :**

शिक्षणाचे सत्र श्रावणशुक्ल पक्षापासून मार्गशिर्ष (ऑग-डिसें) महिन्यापर्यंत चाले. साधारण काही गुरुकुलात वर्षभर अध्ययन चालत असे. अमावस्या, पौर्णिमा, ग्रहण, यज्ञ, जन्मोत्सव, राज्याभिषेक, सार्वजनिक धार्मिक समारंभ आणि मृत्यू प्रसंगी नित्य नैमित्तिक सुट्ट्या दिल्या जात. त्यांना 'अनाध्याय' असे म्हणत.

अशाप्रकारे स्पष्ट होते की, प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीमध्ये गुरुकुल शिक्षण पद्धती ही उच्च कोटीचे शिक्षण संपादन केंद्र होती. याची विस्ताराने माहिती हर्षचरित्र, जातककथा आणि अल्बेरुनीच्या प्रवास वर्णनात मिळते.

**क) प्राचीन विद्यापीठे :**

लेण्या व विहार पद्धतीमधून प्राचीन विद्यापीठांचा जन्म झाला. वैदिक संस्कृतीच्या कालखंडात गुरुकुल पद्धतीने शिक्षण देण्याची व्यवस्था होती. परंतु बौद्ध धर्माच्या उदयानंतर मोठमोठ्या विहारामधून ज्ञानदान करणारी विद्यापीठे स्थापन झाली. वास्तविकत: वर्षावास काळात भिक्षू विहारात राहून अध्यापन, चिंतन आणि मनन करीत. हजारो विद्यार्थी अशा विहारातून धम्माचे ज्ञान घेऊ लागले. या विहाराचे रुपांतर पुढे मोठमोठ्या नगरातील बौद्ध अभ्यासकेंद्रात झाले व त्यातून भव्य इमारतीही निर्माण झाल्या. अशाप्रकारे भिक्षूंच्या वर्षावास काळातील वास्तव्याने व अभ्यास केंद्राच्या माध्यमातून प्राचीन भारतीय बौद्ध विद्यापीठाची निर्मिती झाली. त्याची माहिती पुढीलप्रमाणे -

**१) तक्षशिला ह्न**

प्राचीन भारतातील एक प्रसिद्ध विद्यापीठ तक्षशिला ही नगरी प्राचीन गांधार देशाची राजधानी होती. पूर्वी भारतात असलेले हे ठिकाण सध्या पाकिस्तानात रावळपिंडीजवळ आहे. तक्षशिला नगरी व विद्यापीठ यांचे उल्लेख रामायण, महाभारत आणि जातकांत मिळतात.

कैकेयीपुत्र भारताने तक्षशिला नगर वसविले व त्याला तक्ष या आपल्या मुलाचे नाव दिले असे मानले जाते. इ.स.पू. ८ व्या शतकापासून इ.स. ४ थ्या शतकापर्यंत सु. १२०० वर्षे हे विद्यापीठ अस्तित्वात होते. प्रारंभी हे ठिकाण वैदिक संस्कृतीचे व राजनीतीचे केंद्र होते. परंतु नंतरच्या काळात ते बौद्ध ज्ञानदानाचे प्रमुख केंद्र बनले. भारतातील व पश्चिम मध्य आशियातील शेकडो विद्यार्थी येथे शिक्षण घेत होते. कौटिल्यासारखे विद्वान पंडीत तर चंद्रगुप्तासारखे कर्तबगार राजपुत्र ह्या विद्यापीठात होते. येथे वेद्वाङ्मय, आयुर्वेद, धनुर्वेद, स्थापत्यशास्त्र व नाणकशास्त्राच्या अभ्यास व संशोधनाची व्यवस्था होती हे प्राचीन भारतातील वेदविद्येचे श्रेष्ठ विद्याकेंद्र होते.

### २) नालंदा विद्यापीठ :

हे भारतातील व जगातील प्रसिद्ध बौद्ध शिक्षण केंद्र होते. च्यां युवान श्वांगने या विद्यापीठाची मुक्त कंठाने स्तुती केली आहे. गुप्त सम्राट समुद्रगुप्त व कुमारगुप्ताच्या पुढाकाराने (स. ३७०-४५५) ह्या विद्यापीठाची स्थापना झाली. हर्षवर्धनाच्या काळात ते भरभराटीला आले. हर्षवर्धनाने १०० खेडी विद्यापीठाच्या खर्चासाठी दान दिलेली होती. ह्या खेड्यातील लोक विद्यापीठाला सढळ हाताने वस्तूच्या रुपाने अन्न, वस्त्र, पुरवत. आज नालंदा हे शहर बिहार राज्यातील पाटण्याच्या पूर्वेस ४० मैलावर असून तेथेच विद्यापीठ होते. तेथे दहा हजार विद्यार्थी एका वेळी शिक्षण घेत. या विद्यापीठाची द्वारपरीक्षा अत्यंत कडक होती. येथील 'धर्ममायायोग' नावाचे ग्रंथालय होते. त्याच्या तीन उप विभागांना रत्नाद्धी, रत्नसागर, आणि रत्नरंजक अशी नावे होती. त्यामध्ये लाखो ग्रंथ होते. विद्यापीठातल्या विविध सभागृहात रात्रंदिवस वादविवाद, परिसंवाद, प्रश्नोत्तरे व चर्चासत्र चालत. सर्व जगातील विद्यार्थी या विद्यापीठातून शिक्षण घेण्याकरीता येत असत. नालंदा विद्यापीठात धर्माबरोबरच तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान, व्याकरण, वैद्यकशास्त्र आणि संख्या तत्त्वज्ञान हेही शिकविण्यात येई. या विद्यापीठात धर्मपाल, चंद्रपाल, नागार्जून, गुणमती असे थोर विद्वान-आचार्य होऊन गेले. हे विद्यापीठ पुढे तेराव्या शतकात बखत्यार शिलजीने उध्वस्त केले.

### ३) विक्रमशिला :

बंगालच्या देवपाल राजाने ८ व्या शतकात भागलपूर जिल्ह्यात विक्रमशीला विद्यापीठ स्थापिले. या ठिकाणी विशेषकरून बौद्ध तांत्रिक विद्येचा अभ्यास होई. श्रीराज, दीपांकर, तथागतरक्षित, अभ्यंकरगुप्त, वेरोचण व रत्नाकरशांती विद्यापीठातील प्रसिद्ध आचार्य होते.

### ४) वल्लभी :

गुजरातमध्ये 'वल्लभी विद्यापीठाची' स्थापना सातव्या शतकात झालेली होती. हे विद्यापीठ हीनयान पंथाचे केंद्र होते. वल्लभी ही मैत्रकांची राजधानी होती. त्यामुळे नालंदाप्रमाणेच याही विद्यापीठास राजाश्रय लाभला. स्थिरमती व गुणमती हे वल्लभीचे कुलपती प्रसिद्ध आहेत. येथेही प्रवेशेच्छूंना प्रवेश परीक्षा द्यावी लागे. प्रवेश परीक्षेत नापास झालेल्यांच्या डोळ्यातून वाहिलेल्या अश्रूंचा तेथे नेहमी चिखल असे, अशी प्रशस्त इत्सिंग देतो. या विद्यापीठात एक वेळी ६००० विद्यार्थी शिक्षण घेत होते. येथील अभ्यासक्रमात गणित, अर्थशास्त्र, धनुर्विद्या, करपद्धती इ. लौकिक विषयांचाही समावेश होता. या विद्यापीठातून शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना वल्लभीच्या राज्यात मोठ्या अधिकाराच्या जागा मिळत.

### ड) प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीतील दोष :

प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीचे टिकात्मक विश्लेषण केले असता तिच्यामध्ये जसे गुण दिसून येतात तसेच दोषही दिसतात ते पुढीलप्रमाणे सांगता येतील -

### १) धर्माला अधिक महत्त्व :

प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीमध्ये धर्माला प्राधान्य दिल्याचे दिसते. यात व्यवहारिक दृष्टिकोणापेक्षा

आदर्शवाद जोपासला गेला होता.

**२) स्त्री शिक्षणापासून वंचित :**

प्रारंभी ऋग्वेदात स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबर शिक्षणाचा अधिकार दिला होता. कालांतराने स्त्री शिक्षण स्वातंत्र्य नाकारले गेले होते. गुरुकुलातही स्त्रीयांना शिक्षणाची सोय नव्हती.

**३) लौकिक विषय नाकारले :**

यावेळी अभ्यासक्रमात लौकिक विषयांपेक्षा धार्मिक विषयांना प्राधान्य दिले होते. बहुतांश शिक्षक पुरोहित असल्याने त्यांचा दृष्टीकोन धार्मिक होता. वेद-पुराणांना अभ्यासक्रमात मानाचे स्थान होते. याउलट इतिहास, अर्थशास्त्र, गणित राज्यशास्त्र सारखे विषय दुर्लक्षित राहिले होते. परिणामी त्यांचा विकास झाला नाही.

**४) पाश्चात्य ज्ञानाविषयी संकुचित दृष्टी :**

भारतीय विद्वानांनी ज्ञान-विज्ञान क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले होते. परंतु याचवेळी त्यांनी विदेशातील ज्ञान-विज्ञान क्षेत्रातील झालेली प्रगती स्विकारली नाही. येथे त्यांच्या अहंभाव व संकूचीत विचारामुळे युरोपातील प्रगत ज्ञान क्षेत्रातील झालेले बदल आपल्याला आत्मसात करता आला नाही. आपल्याला या आधुनिक ज्ञानापासून वंचित रहावे लागते. भारतीय विद्वानांच्या या संकुचीत स्वभावाचे वर्णन अल्बेरुनीने आपल्या प्रवास वृत्तांत केले आहे.

**५) शुद्र ज्ञान वंचित :**

वैदिक काळात शूद्रांना हिन लेखले होते. ब्राह्मण क्षत्रिय व वैश्यांना शिक्षणाचा अधिकार होता. शुद्रांना शिक्षणाचा अधिकार नसल्याने ते शिक्षणापासून वंचित राहिले होते.

**६) संस्कृत भाषेला प्राधान्य :**

शिक्षण व्यवस्थेत संस्कृत भाषेला अधिक प्राधान्य होते. लोकभाषेला शिक्षण पद्धतीमध्ये स्थान नव्हते. परिणामी लोकभाषेची उपेक्षा झाली. तिचा विकास होऊ शकला नाही.

उपरोक्त भारतीय शिक्षण पद्धतीतील दोष हे नंतरच्या काळातील होते. वास्तविक भारतीय संस्कृतीच्या उत्कर्ष काळात शिक्षण विषयक दृष्टीकोन विशाल व व्यापक होता. सर्वांना शिक्षणाचा अधिकार होता. या शिक्षण व्यवस्थेने अनेक विद्वान निर्माण केले. या विद्वानांच्या पांडित्याने देश-विदेशातील विद्यार्थी, ज्ञान संपादन करण्यासाठी भारतात आले. प्राचीन शिक्षणानेच भारतीय संस्कृतीचा वारसा सुरक्षित ठेवला व तो समृद्ध केला. आजही प्राचीन शिक्षणाचे अनेक तत्त्व आजच्या शिक्षण पद्धतीला आदर्श आणि अनुकरणीय आहेत.

- **स्वयंअध्ययन प्रश्न-३**

**अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१. नालंदा हे विद्यापीठ ............ काळात भरभराटीला आले.

अ) कुमारगुप्त ब) हर्षवर्धन क) समुद्रगुप्त ड) सम्राट अशोक

२. प्रयागच्या पवित्र संगमावर (उ.प्र.) ............ या मुनींचा प्रसिद्ध आश्रम होता.

अ) भारद्वाज ब) वाल्मिकी क) कण्वऋषी ड) संदिप

३. बुद्धांनी आपल्या धर्मप्रसाराचा आरंभ ........... येथून केलेला होता.

अ) लुम्बिनी ब) सारनाथ क) राजगृह ड) पावापुरी

४. मूलत: 'ज्ञान' हा शिक्षणाचा ............ आहे.

अ) श्वास ब) आत्मा क) परमात्मा ड) पाया

५) नालंदा विद्यापीठाचे ............. हे मुख्य आचार्य (कुलगुरु) होते.

अ) शिलभद्र ब) रत्नाकर क) स्थिरमती ड) गुणमती

**ब) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) कोणत्या पद्धतीत शिक्षण घेताना विद्यार्थी गुरुगृही राहून ज्ञानार्जन करीत?

२) कोणत्या सम्राटाने नालंदा विद्यापीठाच्या खर्चासाठी १०० खेडी दान दिली होती?

३) इ.स. ८ व्या शतकात देवपाल राजाने कोणते विद्यापीठ स्थापिले?

४) भारतात सर्व ज्ञानाचे मूळ कशास मानले जात होते?

५) कोणता संस्कार विधी प्राचीनकाळचा पदवीदानसमारंभ होता?

## ४.२.४ कला (मध्याश्मयुगीन चित्रकला ते अजंठा चित्रे)

**● मध्याश्मयुगीन चित्रकला :**

अश्मयुगीन मानवाचे जीवन हे भटके होते. शिकार आणि अन्नसंकलन करुन, ते आपला निर्वाह करीत असत. पुढे मध्याश्मयुगामध्ये पर्यावरण बदलले. त्यानुसार नवी आव्हाने तयार झाली. मात्र मानवाने, आपल्या हत्यारांमध्ये बदल करुन, या बदललेल्या पर्यावरणाला जुळवून घेतले. त्यात तो यशस्वी झाला. त्याचा आत्मविश्वास वाढला. त्याचे आता, पूर्वीपेक्षा जास्त असे पर्यावरणावर नियंत्रण निर्माण झाले. त्यामुळे तो वेगवेगळ्या प्रदेशामध्ये आता भटकू लागला. त्याची लोकसंख्या वाढली. त्याची स्थैर्याकडे वाटचाल सुरु झाली. अशा, तुलनेने सुखद पार्श्वभूमीवर, तो स्वत:ला आता व्यक्त करु लागला. तो चित्रे काढू लागला.

१८६७-८ मध्ये भारतीय पुरातत्व खात्याच्या कार्लाइल यांनी सोहागीघाट (जि. मिर्झापूर) याठिकाणी महाश्मयुगीन गुहाचित्रांचा शोध लावला. पुढे, व्हि. एस.वाकणकर यांनी मध्यप्रदेशातील भिमबेटका याठिकाणी गुहाचित्रांचा अभ्यास केला. आजपर्यंत, जवळपास १५० गुहाचित्रांचा शोध लागलेला आहे. यातील बहुतेक गुहाचित्रं ही मध्य प्रदेशातील विंध्य डोंगररांगातच वसलेल्या आहेत. चांगले पर्जन्यमान, पाण्याचा बारमाही

पुरवठा, अश्मयुगीन हत्यारांसाठी योग्य दगड, विविध लहान मोठे वसत असलेली घनदाट जंगले यामुळे या गुहांमध्ये, मानवाने, अगदी पूराश्मयुगापासून याठिकाणी आश्रय घेतलेलादिसून येतो.

मानवाने ही गुहाचित्रे गुहांच्या छत आणि भिंतीवर काढलेली आहेत. ही मुख्यत्वे रेखाचित्रे आहेत. यातील बाह्यरेषा काढून पूर्ण झाल्या की मग चित्रांमध्ये रंग भरला जाई. संशोधकांनी अशाप्रकारे १२ चित्रशैली शोधून काढलेल्या आहेत. या मानवाने रंगासाठी, नैसर्गिक रंगांचा वापर केलेला आहे. म्हणजे स्थानिक खनिजे आणि वनस्पतींचा वापर केलेला आहे. यामध्ये लाल, हिरवा, पिवळा, काळा अशा रंगांचा समावेश होतो. हे रंग टिकावेत म्हणून यामध्ये चरबी किंवा डिंक मिसळला जात असे. तसेच, ही चित्रं काढण्यासाठी तो जो ब्रश वापरत होता तो, प्राण्यांच्या शेपटीपासून बनवलेला असे.

चित्रांचे विषय जर आपण पाहिले तर, मुख्यतः प्राणी व शिकारींचे प्रसंग चित्रित केलेले आहेत. या प्राण्यांच्यामध्ये वाघ, गेंडा, हरणे, रानडुकरे, माकडं, ससे, रेडा, कोल्हा इ. दिसतात. हे स्थिरही आहेत, आणि त्यांच्या विविध हालचालीही चित्रित केलेल्या आहेत. बाह्य रेषा काढून, त्यामध्ये भौमितिक आकारांनी यांची शरीरं सुशोभित केलेली दिसून येतात. शिकारीच्या दृश्यात सामूहिक तसेच एकेकट्यांनी केलेल्या शिकारीची; सापळा लावून पकडल्याची ही चित्रं आहेत. भाले, धनुष्य-बाणांबरोबर सूक्ष्मास्त्रं जोडलेली हत्यारे यामध्ये दिसून येतात. त्याचबरोबर मधासारखी वन्यउत्पादनं गोळा करणारी माणसेही चित्रांतून दिसतात.

एक चित्र असे आहे की यात, एक आडवा मनुष्य दिसतो, त्याच्या शेजारी एक मडके आहे आणि जवळ एकजण वाकून उभा आहे. हे चित्र, या मानवाच्या मरणोत्तर जीवनावरील श्रध्दा दर्शविते. म्हणजे, हे एका अंत्यसंस्काराच्या विधीचे चित्र असावे. शेजारी मडक्यामध्ये अन्नपदार्थ, पाणी वगैरे ठेवले असावेत. जेणेकरुन, मृत्युनंतरही त्याचा प्रवास सुखकर होईल अशी श्रध्दा दिसते. थोडक्यात मानवाचा, मृत्युनंतरही प्रवास सुरु असतो असा विश्वास या लोकांचा दिसून येतो. अशी श्रध्दा आपल्याला पहिल्यांदा मध्याश्मयुगीन काळात दिसते. पुढे, ही श्रध्दा अधिक बळकट होत गेलेली दिसते.

तसेच, या चित्रातील मडक्यावरुन दिसते की, त्या मानवाने मडकी बनवणे याच काळात सुरु केले असावे. अर्थात, ही मडकी, हाताने बनवलेली आणि कच्ची (उन्हात वाळवलेली) अशी असावीत.

अशी गुहाचित्रे, मध्याश्मयुगीन मानव का काढत होता? असा प्रश्न पडतो. काही विद्वानांच्या मते अशी चित्रे निव्वळ गुहा सजवण्यासाठी काढलेली नव्हती. तर ही चित्रे काढण्यामागे काहीएक धार्मिक कारणे आहेत. त्यांच्या मते, ही चित्रे ज्या गुहांत काढलेली आहेत त्या गुहा मानव राहण्यासाठी वापरत नव्हता. शिवाय, यातील बरीचशी चित्रे जणूकाही गिरवल्यासारखी काढलेली आहेत. म्हणजेच, एखाद्या प्राण्याचे चित्र काढून, ते जर वारंवार गिरवले तर तो प्राणी मिळेल अशी श्रध्दा त्याची असावी.

- **अजंठा चित्रे :**

औरंगाबाद जिल्ह्यात फर्दापूर या गावापासून ६-७ किमीवर अजंठ्याच्या लेण्या आहेत. मुख्य रस्त्यापासून

लेण्या ४ किमी अंतरावर डोंगरांमध्ये या लेण्या खोदलेल्या आहेत. लेण्यापर्यंत जाण्यासाठी, पर्यटन विभागाच्या निर्धूर बसेस उपलब्ध असतात. एकंदर भागात कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होणार नाही याची काळजी घेतली जाते.

या लेण्या भारतात जरी असल्या तरी साऱ्या जगाने त्या आपल्या मानलेल्या आहेत. युनेस्कोने, अजंठ्याच्या चित्रांना 'विश्वस्मारक' अशी नोंद केलेली आहे.

अजंठा-सातमाळा डोंगररांगामध्ये या लेण्या आहेत. आणि त्याही डोंगराच्या आतल्या बाजूला. डोंगराच्या नालाकृती अर्धवर्तुळात या गुहा आहेत. समोर दरीत वाघोरा नदी वाहत राहते. आज या गुहा सलग अशा पायवाटेने जोडलेल्या जरी असल्या तरी पूर्वी असे नव्हते. प्रत्येक गुहांना स्वतंत्र पायऱ्या होत्या आणि त्याखालील नदीपर्यंत जात होत्या.

चैत्य म्हणजे बौद्धमंदिर तर विहार म्हणजे भिक्षूंच्या निवासस्थानाची जागा. येथे एकूण ३० गुहा आहेत. यातील पाच (९, १०, १९, २६, २९) चैत्य आहेत तर उरलेले विहार. अर्थात, याठिकाणी, चैत्य आणि विहारांच्या संयुक्त गुहाही दिसून येतात. या लेण्यांचे काळानुसार दोन भाग पडतात. पहिल्या भागात २, ९, १० हे चैत्य आणि ८, १२, १३, १५ अ हे विहार येतात. या सातवाहनकालीन लेण्या. साधारण इसपूच्या दुसऱ्या-पहिल्या शतकातील या हिनयानपंथाच्या प्रभावाखाली आहेत. त्यामुळे येथे चैत्यामध्ये बुध्दमूर्ती दिसून येत नाहीत. स्तूप हे बुध्दांचे प्रतिक म्हणून येते. उर्वरित गुहा या वाकाटक कालीन आहेत. या गुहा इस पाचव्या शतकापासून सहाव्या शतकापर्यंत निर्माण झाल्या. या महायानपंथी यांच्या प्रभावाखाली आहेत. येथे बुध्दांच्या मूर्ती आणि चित्रं दिसून येतात. यातील गुहांना वाकाटकांनी, त्यांच्या मांडलिकांनी, त्यांच्या सरदारांनी अनुदानं दिलेली होती. जसे, वराहदेव या वाकाटकांच्या मंत्रीने, क्र. १६ ची गुहा, भिक्षूंना दोन दिली होती. तर एका सरदाराने क्र. १७ ची गुहा. पुढे अनेक वर्षे या गुहा बौध्द भिक्षूंनी गजबजलेल्या होत्या. सातव्या शतकात आलेल्या युवानश्वांग या चीनी प्रवाशाने त्यांना भेट दिलेली होती.

येथील, वाकाटककालीन लेण्यामध्ये एक मोठा बदल घडून आला. पूर्वीसारखे चैत्य आणि विहार ही दोन खोदकामं करण्याऐवजी, या काळात, संयुक्त गुहा तयार झाल्या. म्हणजे विहारांची मूलभूत रचना. आता, त्यातील खोल्या जाऊन भिंती आल्या. त्या भिंतीवर चित्रं किंवा शिल्पं आली. तर एका बाजूला दरवाजा आणि डोंगराकडील बाजूला गाभारा (पूर्वी चैत्यात असे) आला. त्यात स्तूपाऐवजी आता बुध्दांची मूर्ती दिसू लागली. थोडक्यात, जमिनीवर जशी बांधीव मंदिर असतात तशीच रचना आता या लेण्यांची झाली.

अजंठा येथे लक्षवेधी आहेत ती म्हणजे येथील चित्रे.

बुध्द, बुध्दांच्या जीवनातील विविध प्रसंग, त्यांना आलेली संकटं आणि त्यांचा, त्यांनी केलेला परिहार, त्यांनी केलेले चमत्कार. येथील चित्रांचा हा मुख्य विषय.

मग, त्याकाळातील जनजीवन, नगरे, राजा-राणी आणि त्यांच्या सेविका. विविध वेशभूषा/केशभूषांतील, दागदागिन्यातील सारी मंडळी. राजापासून भिकाऱ्यापर्यंत आणि उत्सवापासून वादळा पर्यंत असे वैविध्य पूर्ण

विषय या चित्रांत दिसतात. शिवाय, त्याकाळचे पशुपक्षी, वन्यजीवन, लता-वेली येतात. टोकदार टोपी आणि दाढी असलेले परके ईराणी पाहुणे दिसतात. येथे मद्य प्राशन करीत, एकमेकांवर रेलणारे स्त्री-पुरुष आहेत, प्रियजनांच्या विरहामूळे बेशुध्दावस्थेतील स्त्रीया आहेत तसेच मोहमाया यांना कंटाळून, बुध्दांना शरण गेलेले त्यागीही आहेत.

सगळ्यात महत्वाचा विषय म्हणजे जातक कथा. या बुध्दांच्या पूर्वजन्मांच्या कथा. महायानांची अशी श्रध्दा आहे की, बुध्दांना जी ज्ञान प्राप्ती झाली, तत्पूर्वी त्यांनी अनेक जन्मे घेतले होते. यावेळी त्यांना 'बोधिसत्व' असे म्हंटले जाते. हा बोधीसत्व, प्रत्येक जन्मात वेगवेगळ्या रुपात जन्म घेतो. कधी हत्ती, कधी हंस, कधी हरीण, कधी ब्राह्मणाचा/क्षत्रियाचा/वैश्य वाण्याचा मुलगा इ. या प्रत्येक जन्मात बोधीसत्व ज्ञानप्राप्तीचा प्रयत्न करत असे. पण, स्वतःच्या उध्दारापेक्षा, त्याने, बाकीच्यांच्याच कल्याणांसाठी आयुष्यभर प्रयत्न केले. त्यामुळे कोणत्याही जन्मात त्यांना बौध्दत्व प्राप्त झाले नाही. मात्र, ज्यावेळी त्यांनी शुध्दोदन आणि माया यांच्या ठिकाणी जन्म घेतला, त्या जन्मात त्यांना ज्ञान प्राप्ती झाली. ते बुध्द झाले. तर, अशा बुध्दांच्या पूर्वजन्मीच्या कथा म्हणजे बोधीसत्वाच्या, विविध रुपातील कथा. या कथा अजंठा येथे चितारलेल्या आहेत.

ही चित्रं, लेण्यातील भिंतीवर आणि छतावर काढलेली आहेत. यासाठी प्रथम भिंत तासून, गुळगुळीत करण्यात आली. मग त्यावर चिखलाचा लेप देण्यात आला. हा लेप ढासळू नये म्हणून त्यात शेण, तांदळाचे कूस, भूसा मिसळण्यात आलेला होता. क्वचित गोणपाटही चिकटवलेले होते. यावर पुन्हा एकवार चिखलाचा लेप दिला जातो. यावेळी मात्र, हा मऊ असतो. यावर चुना फासून, पार्श्वभूमी तयार केली जाते. तपकीरी रंगाने बाह्यरेखाद्वारे विषय चितारला जातो. मग, या बाह्यरेखा आणखीन गडद केल्या जातात. रंग भरले जातात. हे रंगही आहेत नैसर्गिक खनिजापासून आणि भाजीपाल्यापासून बनवलेले. तो टिकावा म्हणून त्यात डिंक मिसळला जात असे. येथे हे लक्षात घेणे गरजेचे आहे की हे सर्व काम हा चिखल कोरडा व्हायच्या आतपूर्ण केले जायचे. म्हणजे, पार्श्वभूमीसह ते चित्रही कोरडे होईल! त्यात, चित्र चुकुन चालत नाही; कारण ओल्या पार्श्वभूमीवरील रेषा खोडता येत नाहीत. यावरुन अंदाज येईल की अजंठाची चित्रे काढणाऱ्या चित्रकारांनी किती अचूक आणि वेगवान काम केले आहे ते!

ही चित्रे द्विमितीय असल्याने, खोलीचा भास देण्यासाठी; बाह्यरेषा गडद करण्यात आलेल्या आहेत. तसेच, कथा चितारताना, घटनांचा क्रम सलगच असेल असे नाही. त्यामुळे गाईडच्या मदतीने या कथा समजाऊन घ्याव्या लागतात.

अजंठ्याची या चित्रांना भित्तीचित्रे असेही म्हणले जाते.

येथील चित्रे, दोन काळात काढलेली आहेत. गुहा क्र. ९ आणि १० येथील चित्रेही इ.स.पू. २-३ ऱ्या शतकात निर्माण झालीत. ही हिनयानांच्या प्रभावाखाली होती. त्यामुळे या चित्रांत बुध्द, मनुष्य रुपात दिसत नाहीत. तर दुसरा टप्पा ४-५ व्या शतकापासून सुरु होतात. ही महायानांच्या प्रभावाखालील. या काळातील प्रत्येक गुहेमध्ये चित्रे जरी असली तरी क्र. १, २, १६, १७ या गुहांतील चित्रे, तुलनेने अधिक व्यवस्थित राहिलेली आहेत.

१. या लेण्यात, गाभाऱ्याजवळील भिंतीवर पद्मपाणी (डाव्या बाजूला) आणि वज्रपाणी बोधीसत्वाची (उजव्या बाजूला) चित्रे आहेत. इथे पद्मपाणी बोधिसत्व हा निळ्या रंगाचे कमळ हाती घेतलेला आहे. याच्या शरीरावर जवळपास दागिने नाहितच. आजूबाजूला वाद्यं वाजवणारे वादक आहेत, दंगा करणारी माकडं आहेत पण बोधिसत्व मात्र सहज, शांत आणि अंतर्मग्न असा आहे. तर वज्रपाणी विविध दागदागिन्यांनी मढलेला आहे. तसेच, बुध्दांच्या ध्यानात विघ्ने घालणारा मार दिसतो. गाभाऱ्याच्या उजव्या भिंतीवर 'बुध्दांचा श्रावस्तीचा चमत्कार' हे चित्र येते. सभामंडपाच्या भिंतीवर विविध जातक कथा दिसतात. 'शिबीजातक' (इथे बोधिसत्व शिबीराजा आहे), 'नंद-सुंदरीची' कथा, 'शंकपाल जातक' (इथे बोधिसत्व मगधाचा राजा आहे) इ. डाव्या भिंतीवर 'महाजनक जातक', 'कल्याणकरीन जातक' आहे. वज्रपाणीच्या चित्राजवळ 'चंपेय जातक' (याठिकाणी बोधिसत्वाने नागाचा जन्म घेतलेला आहे) आहे.

या लेण्याचे छत सुध्दा चित्रित आहे. याठिकाणी पाने-फुले-लता यांची सुंदर सजावट दिसून येते. तसेच मद्यप्राशनात गढलेले परकीय पाहुणेही येथे दिसतात.

२. हे लेणे, छतावरील सुंदर सजावटींमुळे अधिक लक्षवेधी झालेले आहे. एकमेकांतील वर्तुळं आणि त्यातील सजावटींची कमाल यामुळे हे छत अत्यंत देखणे झालेले आहे.

शिवाय याठिकाणी 'हंस जातक' (बोधिसत्वाचा हंस जन्म), 'विदूर पंडित जातक' (बोधिसत्व इंद्रप्रस्थचा मंत्री), 'रुरुजातक' (हरणाच्या जन्मातील बोधिसत्व) अशा कथा आहेत.

१० (सातवाहनकालीन लेणे) याठिकाणी, राजा आपल्या परिवारासह बोधी वृक्ष आणि स्तूपाला भेट देतो असे सुंदर चित्र आहे. हे लेणे हिनयानांच्या प्रभावाखाली होते. त्यामुळे स्वाभाविकतःच याठिकाणी बुध्द, मनुष्य रुपात नाहीत. तर वृक्ष आणि स्तूप या प्रतिक रुपात आहेत. उजव्या भिंतीवर 'साम जातक' (बोधिसत्व आता साम म्हणून) आहे. ही श्रावणबाळाच्या कथेसारखी आहे. त्याच्याजवळ 'छदंत जातक' (बोधिसत्वाचा हत्तीचा जन्म) आहे.

१६. येथे डाव्या भिंतीवर 'नंद-सुंदरी'ची कथा येते. 'हस्ती जातक' (बोधिसत्व हत्तीच्या जन्मात), 'महाउम्मग्ग जातक' (न्यायनिवाडा करणारा बोधिसत्व) अशा कथा येतात. गाभाऱ्याच्या दाराजवळ 'श्रावस्तीचा चमत्कार' ही कथा आहे. पुढे, उजव्या भिंतीवर बुध्दांच्या आयुष्यातील प्रसंग येतात, जसे, बुध्दांची कष्टी अवस्था पाहून, सुजाताने 'पायस' हा पदार्थ देणे, राजगृहामध्ये भिक्षाटन करणारे बुध्द, निद्रीस्त माया इ.

१७. या लेण्यात भरपूर चित्रे आहेत. प्रवेशद्वारावरच, सात 'मानुषी बुध्दांची' चित्रे आहेत. डाव्या बाजूला, बुध्दांच्या भेटीला येणारा, इंद्र आपल्या अप्सरांसह दिसून येतो. तसेच 'वेस्सांतर जातक' दिसून येते. उजव्या बाजूला 'टाळ वाजवणाऱ्या अप्सरेचे' सुंदर आणि प्रसिध्द चित्र आहे. त्याच्या उजवीकडे 'बुध्दांनी नालागिरी या मदमस्त हत्तीला कसे शांत केले' तो प्रसंग आहे.

आता मंडपांमध्येही चित्रे आहेत. डाव्या बाजूला 'छदंत जातक' येते. त्यानंतर 'महाकपी जातक' येते. पुन्हा 'हस्ती जातक' आहे. 'हंस जातक', 'वेस्सांतर जातक', 'महा-सुतसोमा जातक' आहे. गाभाऱ्याच्या उजव्या बाजूच्या भिंतीवर 'शरभ-मृग जातक' (बोधिसत्व हरणाच्या जन्मात) आहे. उजवीकडे 'मच्छ जातक'

(माशाचा जन्म) आहे. शरभ-मृग जातकच्या खालील बाजूस 'माती-पोसक जातक' (बोधिसत्व परोपकारी हत्तीच्या जन्मात) आहे. पुढे, गाभाऱ्याच्या दाराजवळ 'साम जातक' आहे. डाव्या बाजूला 'महिष जातक' आहे. उजव्या भिंतीवर 'सिंहलवदन जातक' आहे.

तसेच, येथेही 'सिबी जातक', 'रुरुजातक', निग्रोधमिग जातक' इ. कथा येतात.

तसेच, या लेण्यामध्ये प्रसिध्द बुध्द आणि राहूल-यशोधरा भेटीचे चित्र आहे.

● **स्वयं-अध्ययन प्रश्न-४**

**अ. योग्य पर्याय निवडा.**

१. सोहागी घाट येथे............यांनी, मध्याश्मयुगीन गुहाचित्रांचा शोध लावला.

अ. फर्ग्युसन ब. बर्जेस क. कनिंगहॅम ड. कार्लाईल

२. अजिंठ्याची चित्रे..............जिल्ह्यात आहेत.

अ. पुणे ब. अहमदनगर क. औरंगाबाद ड. नाशिक

३. इ.स.पू. पाचव्या शतकातील अजिंठ्याची चित्रे..............या राजघराण्याच्या काळात निर्माण झाली.

अ. सातवाहन ब. कुशाण क. पल्लव ड. वाकाटक

४. पद्मपाणी आणि वज्रपाणी बोधिसत्वाचे जगप्रसिध्द चित्र अजिंठ्याच्या लेणी क्र...........येथे आहे.

अ. १ ब. २ क. ३ ड. ४

५. ......... जातक ही बौध्द कथा हिंदूच्या श्रावणबाळाच्या कथेसारखी आहे.

अ. विदूर पंडित ब. हस्ती क. साम ड. रुरु

**ब. एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. भीमबेटका येथील गुहा चित्रांचा कुणी अभ्यास केलेला आहे?

२. इ.स.पू. पाचव्या शतकानंतरच्या अजिंठा चित्रांवर, बौध्द धर्माच्या कोणत्या पंथाचा प्रभाव आहे?

३. बोधिसत्व म्हणजे कोण?

४. 'टाळ वाजवणाऱ्या अप्सरेचे' जगप्रसिध्द चित्र अजिंठ्याच्या किती क्रमांकाच्या लेण्यात आहे?

५. कोणत्या बौध्दपंथांच्या प्रभावानुसार, अजंठा लेण्यात बुध्दांना मनुष्य रुपात चित्रित आणि शिल्पांकित केले गेले?

### ४.२.५ स्थापत्य (महाराष्ट्रातील गुहा स्थापत्य ते मध्य प्रदेशातील बांधीव मंदिरे)

वास्तविक नवाश्मयुगापासून मानव काही इमारती बांधून राहू लागला. पुढे हडप्पा संस्कृतीच्या काळाततर भारतातील पहिली वाहिली नगरंच निर्माण झाली. व्यवस्थित तटबंदी, घरं, सार्वजनिक उपयोगाच्या इमारती, रस्ते, पाणीपुरवठ्याची साधने, सांडपाण्याच्या निचरा करण्याची पध्दत अशा कित्येक-अगदी आधुनिक वाटाव्यात अशा रचना निर्माण झाल्या. पुढे, इ.स.पू. ६ व्या शतकामध्ये भारतातील दुसरे नागरीकरण घडून आले. इथेही विविध इमारतींनीही नगरं सजली. त्यानंतर, इ.स. सनाच्या सुरुवातीच्या शतकातसुध्दा नगरं दिसतात.

अशा प्रकारच्या वास्तूंना 'निधार्मिक स्थापत्य' असे म्हंटले जाते. आणि याचा विचार आधीच्या घटकांमध्ये, विविध संदर्भानुसार केलेला आहेच.

याठिकाणी 'धार्मिक वास्तूंचा' आपल्याला विचार करायचा आहे. जसे आपल्याला घर तसे आपल्या देवालाही घर असावे असे मानवाला वाटू लागले. यातून, धार्मिक वास्तूंची सुरुवात झाली. विविध प्रयोग करत, चुकत-माकत, दुरुस्त्या करत, नवे बांधत अशा धार्मिक वास्तूंचा विकास झालेला दिसून येतो. साध्या झोपडीवजा 'देवायतन' पासून, शिल्पांनी खचाखच भरलेल्या दक्षिणेतील मंदिरापर्यंत हा विकास आहे. याठिकाणी या धार्मिक वास्तूंचा विकास आपण पहावयाचा आहे. त्यातही प्रातिनिधीक स्वरुपात महाराष्ट्रातील गुहास्थापत्य आणि मध्य प्रदेशातील बांधीव मंदिरे यांचा विचार, काहीसा सखोल करायचा आहे.

धार्मिक वास्तूंचा विकास लक्षात घेता, आपल्याला, तीन मुख्य प्रकार लक्षात घ्यावे लागतील. पहिला प्रकार म्हणजे गुहा मंदिरे किंवा शैलगृहे किंवा लेणी. ही डोंगरामध्ये 'खोदलेली' असतात. यामध्ये महाराष्ट्रातील बौध्द आणि हिंदू लेण्यांचा विचार होईल. दुसरा टप्पा म्हणजे बांधीव मंदिरे. ही, सपाट जमिनीवर, आजच्या प्रमाणे, सुटे-सुटे अवशेष जोडून, बांधली जातात. यामध्ये मध्य प्रदेशातील प्रारंभीच्या मंदिरांचा विचार होईल. आणि तिसरा प्रकार म्हणजे 'एक पाषाणीय मंदिरे'. इथे सपाट जमिनीवर, एकच खडक घेऊन, त्यात मंदिर खोदले गेले.

विस्तारभयास्तव, भारतातील विविध शैलीतील, विविध लेण्यांचा तसेच मंदिरांचा विचार करता येणे अशक्य आहे. त्यामुळे, प्रातिनिधिक स्तरावर निवडक लेण्यांचा, बांधीव मंदिरांचा तसेच एक पाषाणीय मंदिरांचा विचार करायचा आहे.

**अ) शैलगृहे/लेणी :**

लेणी म्हणजे डोंगरामध्ये कोरलेले मंदिर/निवास व्यवस्था. डोंगरामध्ये या लेण्या 'कोरल्या' किंवा 'खोदल्या' जातात. यामध्ये बांधकाम असे येत नाही; तर येते ते खोदकाम/कोरीव काम. इथे, डोंगराच्या कडेचा भाग निवडला जातो. त्यावर लेण्याच्या दरवाज्याचे रेखाचित्र काढले जाते. आणि मग, वरच्या बाजूने कड्यामध्ये खोदकाम सुरु होते. इथे पहिल्यांदा छताचे काम होते, त्यानंतर उतरत-उतरत, शेवटी तळाचे काम होत असते. प्रवेशद्वार निर्माण झाले की पुन्हा वरच्या बाजूने आतमध्ये खोदणे सुरु होते. इथेही, प्रथम छताचे काम पूर्ण होते,

त्यानंतर, खांबांचे, शिल्पांचे आणि मग शेवटी फरशीचे/जमीनीचे काम होते. थोडक्यात 'आधी कळस मग पाया' असे हे खोदकामाचे तंत्र आहे.

थोडक्यात, लेणी खोदणे म्हणजे, अपेक्षीत असलेल्या रचना तशाच ठेवून; त्याच्या अवती भोवतीचा दगड काढून टाकणे होय. मग शिल्लक राहते ते म्हणजे 'लेणे'.

या स्थापत्य प्रकाराची सुरुवात झाली बिहारमध्ये. सम्राट अशोक आणि त्याचा नातू दशरथ यांनी या पहिल्या लेण्या खोदल्या (इ.स.पू. तिसरे शतक). या लेण्या आजीवक पंथीयांना दान दिलेल्या आहेत. बाराबार टेकड्यातील सुदाम आणि लोमश ऋषींच्या या गुहा आहेत. या लेण्यांची दोन वैशिष्ट्ये दिसून येतात. एक म्हणजे, हा एक आयताकृती हॉल आहे. आणि त्या हॉलचा दरवाजा काटकोनात आहे. म्हणजे, आपण या लेण्यात प्रवेश एकदा केला की पटकन डाव्या बाजूला वळायचे. हॉल तिथे आहे. दुसऱ्या शब्दात, या हॉलची लांबी कडची बाजू, डोंगरकड्याला समांतर आहे. दुसरे वैशिष्ट्य म्हणजे, दरवाज्याच्या दर्शनी भाग हा शिल्पकारांनी बनवण्यापेक्षा, सुताराने बनवल्यासारखा वाटतो.

या लेण्यांचा खऱ्या अर्थाने विकास झाला तो महाराष्ट्रामध्ये. भारतातील लेण्यांमध्ये, जवळ जवळ ८० टक्के लेणी या महाराष्ट्रातच आहेत.

● **महाराष्ट्रातील लेणी :**

सातवाहन काळात, महाराष्ट्रातील पहिल्यावाहिल्या लेण्या तयार झाल्या. त्या आहेत बौध्द धर्मीय. त्यात ही थेरवादी (हिनयान) पंथांच्या प्रभावाखाली. त्यामुळे अर्थातच, बुध्दांच्या मनुष्य रुपातील मूर्ती या काळात नाहीत. जी दिसतात ती प्रतीकेच! हे आपण पहिल्या प्रकरणात पाहिलेले आहे. बिहारमधील लेण्यांपेक्षा, येथील लेण्यामध्ये एक महत्वाचा बदल झाला. तो म्हणजे, आता लेण्या या डोंगराच्या पोटात सरळ खोदलेल्या आहेत. त्यामुळे दरवाज्यातून, आपण सरळ, लेण्यांच्या शेवटी जाऊ शकतो. अशा या लेण्या ज्या आहेत त्यांचे दोन प्रमुख प्रकार पडतात, चैत्य आणि विहार. चैत्य म्हणजे प्रार्थनास्थळ आणि विहार म्हणजे भिक्षूंचे निवासस्थळ.

जे चैत्य असतात, त्याची अगदी साधी रचना असते. एक चापाकार सभागृह असते. चापाकार म्हणजे आयताची एक बाजू, जी डोंगराच्या पोटात असते ती अर्धगोलाकृती केलेली असते. ही डोंगराच्या आतील बाजूला असते. या अर्धगोलाकृती भागामध्ये एक दगडी स्तूप असतो. त्याच्या सर्व बाजूने प्रदक्षिणा घालता येते. हा झाला 'गाभारा'. मग या स्तूपासमोर, खांबांच्या रांगा असतात. यांना 'नासिका' असे म्हंटले जाते. हा मुख्य हॉल/मंडप/आयत झाला. त्यापुढे, एक आडवी ओसरी असते. त्यापलिकडे प्रवेशद्वार. तर विहारामध्ये, एक चौकोनी हॉल असतो. आणि त्याच्या तीनी बाजूला खोल्या असतात. या भिक्षूंच्या निवासासाठी/अभ्यासासाठी असतात.

महाराष्ट्रात, हिनयानपंथीयांच्या पहिल्या वाहिल्या लेण्या तयार झाल्या त्या 'भाजे' (इ.स.पू. २००-१५०) या ठिकाणी. आणि या काळाच्या शेवटच्या लेण्या दिसतात 'कार्ले' येथे (इस ५०-१५०).

● **भाजे आणि कार्ले :**

भाजे येथील चैत्य हे सगळ्यात पहिले लेणे होय. हे चापाकार असून, गाभारा, त्यापुढे नासिकेसह, मंडप येतो. यामध्ये २७ खांब असून, त्यांना तळखडे ही नाहीत, न स्तंभशीर्षे. एकंदर योजना चापाकार असल्याने, छत गजपृष्ठाकार येते. गंमत म्हणजे लेणी दगडी जरी असली तरी छताच्या आतील भागात लाकडी तुळया आहेत. गाभाऱ्यात दगडी स्तूप आहे. गाभारा म्हणजे या आयताकृती रचनेचा डोंगराच्या पोटातला, अर्धगोलाकृती भाग. या लेण्याचा दर्शनी भाग सुंदर आहे. येथील दरवाज्यावर, चैत्य (नालाकृती) तोरण आहे. त्याच्या भोवती, खिडक्या आणि सज्जे यांची सजावट आहे.

तर भाजे येथील विहार हा ही पहिलाच विहार. येथे एका मोठ्या चौकाभोवती खोल्यांची मांडणी केलेली आहे. येथे षटकोनी/अष्टकोनी खांब आहेत. आणि हे खांब जेथे वर जुळतात, त्याठिकाणी 'हस्त' दिसून येतात. याठिकाणी मानवी शिल्पंही दिसतात. दरवाज्यावर चैत्यतोरणांची प्रतिकृती आणि जाळ्या दिसून येतात.

त्यानंतर, कोंडाणे (रायगड जिल्हा), पितळखोरे (औरंगाबाद जिल्हा), अजिंठा येथील ८,९,१०,१२ ही लेणी (औरंगाबाद जिल्हा), बेडसे (पुणे जिल्हा), नाशिक येथील पांडवलेणी, जुन्नर येथील तुळजा लेणी (पुणे जिल्हा) अशा ठिकाणी चैत्य, विहार अशा लेणी तयार झाल्या. यातील विकासाच्या दृष्टीने शेवटचे म्हणजे कार्ले येथील लेण्या.

कार्ले येथील चैत्य ही चापाकार आहे. गाभारा, नासिका युक्त मंडप आहेच. छत गज पृष्ठाकार आहे, दरवाज्यावर चैत्य तोरण आहे. छताच्या आतल्या बाजूलाला कडी तुळया आहेत. गाभाऱ्यात दगडी स्तूप आहे.

शिवाय, विविध नवे बदल ही झालेले दिसतात. आता, दाराजवळ आडवी ओवरी आलेली आहे. ही ओवरी संपताच, मोठे स्तंभ उभारलेले दिसतात. यावर सिंहध्वज होते. म्हणजे स्तंभशीर्ष. या लेण्याचा दरवाजा आता आयताकृती झालेला आहे. त्यावर एक तुळयी देऊन, दोन मजल्यांचा आभास केलेला आहे. यातील वरच्या मजल्याला पूर्वी एक लाकडी सज्जा असे. अशा या दर्शनी बाजूला पायथ्याशी हत्तींची रांग दिसून येते. जणू काही या हत्तींनी हे लेणे आपल्या पाठीवर घेतलेले आहे. हे ओलांडल्यावर, लेण्यात प्रवेश करण्यासाठी तीन दरवाजे दिसून येतात. यातील मधल्या, मुख्य दरवाज्याने आपण सरळ गाभाऱ्यातील स्तूपाकडे जातो. तर, बाजूच्या दोन दरवाज्यातून, आपण नासिकेत, म्हणजे खांबांऱ्या रांगातून पुढे जातो.

येथील खांब लक्षणीय आहेत. आता, या खांबांना तळखडे ही आहेत आणि स्तंभ शीर्षेही! या खांबांच्या तळाशी, मोठी भांडी ठेवल्या सारखी रचना आहे. पूर्वी, लाकडी खांबांना वाळवी लागते म्हणून त्याखाली जागा करुन, प्रसंगी पाणी ठेवले जायचे. त्याच विचारांचा प्रभाव येथे दिसतो. तर खांबांच्या वर, म्हणजे स्तंभ शीर्षांवर वेगवेगळी शिल्पे आहेत. सिंह, हत्ती, घोडे अशा प्राण्यांच्या पाठीवर बसलेल्या स्त्री पुरुषांची ही शिल्पं आहेत. ही दानकर्त्यांची शिल्पं आहेत.

सुरुवातीच्या या ज्या लेण्या आहेत त्यामध्ये एक महत्वाचा विशेष दिसून येतो. प्रवेशद्वारावर जाळी असणे, तेथील खांब थोडे तिरके/आत झुकणारे असणे, आतील खांबाना भांड्या सारखे तळखडे असणे, छताच्या आतल्या बाजूला लाकडी तुळया असणे, तुळया आणि खांब जिथे जोडतात त्या ठिकाणी 'हस्त' असणे इ.

गोष्टी आपल्याला खटकतात. कारण हे सगळे घटक लाकडी स्थापत्यात आवश्यक असणारे घटक आहेत. दगडी खांबाना वाळवी लागण्याचा प्रश्नच येत नाही मग तळाशी तो भांड्याचा आकार का? गुहा जर खोदलेलीच असेल तर लाकडी तुळ्यांचे काय काम? किंवा, खांब आणि तुळ्यामध्ये, आधारासाठी हस्त का? माटे यांच्या मतानुसार, या सर्वांचे कारण म्हणजे डोंगरातील गुहा खोदण्याचे तंत्र हे आपल्या देशात विकसित झाले नव्हते. आपण लाकडीची इमारत बांधत होतो. म्हणजे सुतारकामालाच महत्व असायचे. मात्र, पुढे आपल्याला परकियांकडून गुहा खोदण्याचे तंत्र समजले. मात्र शिल्पी हे मूळात सुतारच होते. त्यामुळे, परिचित अशा लाकडी कामाचीच सवय असल्याने; तेच मॉडेल डोळ्यासमोर ठेवून, ही खोदकामं झाली.

अर्थात, पुढे वाकाटक काळापर्यंत ही कला आपल्या चांगल्या अंगवळणी पडली होती. आता दगडामध्ये काम करणारे शिल्पी व्यवस्थित निर्माण झाले होते. त्यामुळे, वरील बाबी अनावश्यक आहेत हे आता कळून चुकले. त्यामुळे अशा गोष्टी पुढे दिसत नाहीत.

पुढे, साधारणतः तिसऱ्या-चवथ्या शतकाच्या दरम्यान, म्हणजे 'वाकाटक' काळात, पुन्हा एकवार लेण्यांचे मोठ्या स्वरुपात काम सुरु झाले. या ही बौध्द लेण्याच आहेत. मात्र आता महायानांचा प्रभाव आहे. त्यामुळे बुध्दांच्या प्रचंड मुर्ती, चित्रे, बुध्द चरित्रातील कथा, चमत्कार इ. गोष्टी आता दिसू लागतात. या काळातील सर्वात महत्वाच्या लेणी आहेत त्या अजिंठा येथे. याठिकाणी 'चैत्य' आणि 'विहार' यांना एकत्र करण्यात आले. म्हणजे मध्ये एक चौकोनी हॉल असतो. तेथे खांबांच्या रांगा असतात. या हॉलच्या, डाव्या-उजव्या बाजूला खोल्या ऐवजी, भिंती येतात. त्यावर चित्रं येतात. समोरच्या बाजूला, जिथे पूर्वी स्तूप असे; आता त्यांची जागा बुध्दांची प्रचंड मूर्ती घेते.

ही परंपरा, पुढे बदामी चालुक्य काळात (इस ६ वे शतक) चालू राहते. 'बदामी' येथे हिंदू, बौध्द आणि जैन लेणी तयार होतात. पुढे, राष्ट्रकूट काळात (इस ८ वे शतक), 'वेरुळ' येथे लेणी निर्माण होतात. येथेही हिंदू, बौध्द आणि जैन अशा तिघांच्या लेणी दिसू लागतात. तशाच प्रकारे, या दोन्हीही ठिकाणी, अजंठा येथील 'चैत्य-विहाराचा कॉंबो' हा जो प्रयोग झाला, तो नियमित होतो. फक्त एक बदल होतो. अजंठा येथे हॉलच्या दोन्ही बाजूच्या भिंतीवर चित्रं होती. आता, त्याभिंतीवर चौकटी आल्या. आणि त्या चौकटीत, चित्रांची जागा प्रचंड मोठ्या शिल्पांनी घेतली.

**● वेरुळ मधील लेणी :**

वेरुळ हे औरंगाबादच्या वायव्येय आहे. येथे बदामीच्या चालुक्यापासून राष्ट्रकुटांच्या काळापर्यंत लेणी खोदल्या गेल्या. येथे हिंदू, बौध्द आणि जैन धर्मीयांच्या लेणी आहेत. शिल्प वैभवांचा विचार करता, याठिकाणी हिंदू लेण्यांमध्ये प्रचंड वैविध्य जाणवते. लेण्यामध्ये गाभारा-समोर मोठा सभा मंडप; त्यात स्तंभ-आणि भिंतीवर मोठ्या चौकटीमध्ये भव्य शिल्पं दिसतात. याठिकाणी एकूण ३४ लेण्या आहेत. यातील पहिली १२ लेणी बौध्द, नंतर १७ लेण्या हिंदू तर उर्वरित ५ जैन धर्मीयांच्या आहेत. या सर्व लेणी पश्चिमेकडे तोंड करुन आहेत. अजंठाची लेणी मुख्यत्वे चित्रांसाठी आणि वेरुळची लेणी या शिल्पांसाठी जगप्रसिध्द आहेत.

● **बौध्द लेणी :**

येथील क्र. १० चे चैत्य असून, उर्वरित विहार आहेत. प्रत्येक ठिकाणी, गाभाऱ्यात बुध्दांची भव्य मूर्ती आहे. काही प्रातिनिधीक लेण्यांचा विचार करता;

२. गाभाऱ्यात धर्मचक्र परिवर्तन मुद्रेतील बुध्द, डाव्या-उजव्या बाजूला अवलोकितेश्वर (अक्ष माला आणि कमळ धारण केलेला बोधिसत्व) आणि मंजूश्रीची (जटेमध्ये स्तूप धारण केलेले) तसेच जांभाल (हिंदूंचा कुबेर) ही शिल्पं आहेत.

३. ओसरीच्या डाव्या कोपऱ्यात अवलोकितेश्वर आणि अष्टभयाचे शिल्पांकन आहे.

४. हे दुमजली लेणे आहे. वरच्या मजल्यावर अवलोकितेश्वर तर खालील मजल्यावर पद्मपाणी बोधिसत्वाची शिल्पं आहेत.

५. हा सर्वात मोठा विहार असून, याला 'महानवाडा' असेही म्हणले जाते. येथे सभामंडपाच्या मध्यभागी बाक खोदलेले आहेत. सभोवती, भिक्षूंच्या राहण्यासाठी १७ खोल्या खोदल्या आहेत. येथे, अवलोकितेश्वर बोधिसत्व द्वारपालांच्या जागी आहे.

६. याठिकाणी महामायूरी (मोर वाहन असलेली बौध्दांची विद्यादेवता), तारा (अवलोकितेश्वराची शक्ती), पद्मपाणी (हातात कमळ घेतलेला बोधिसत्व), वज्रपाणी (नक्षीदार मुकुट आणि त्यात वज्र असलेला बोधिसत्व) यांची शिल्पं आहेत.

८. हे चैत्य आणि विहाराचे काँबीनेशन. येथे व्रजपाणी, मंजुश्री, महामायूरी, अशी शिल्पे आहेत. तर बाहेरच्या बाजूला जांभाल आणि त्याची पत्नी हारीती (बालकांचे रक्षण करणारी) यांची शिल्पं आहेत.

१०. या लेण्याला 'विश्वकर्मा' किंवा 'सूताराची झोपडी' असे म्हणले जाते. हे एकमेव चैत्यगृह. देगलूरकरांच्या मते हे भारतातील शेवटचे चैत्यगृह आहे. हा दुमजली चैत्य आहे. वरील मजल्यावर, प्रवेशद्वाराच्या आजूबाजूला बोधिसत्व आहेत. हे ज्या चौकटीत कोरलेले आहेत त्यावर शिखराची प्रतिकृती आहे. नागर (वर आमलक असणारे) आणि द्रावीड (मजल्यांचे शिखर) अशा दोन्ही शैलीचीही शिखरे आहेत. याठिकाणी आठ बुध्दांच्या मूर्ती आहेत. शेवटची मैत्रेयची (असा बोधिसत्व की जो आता बुध्द हा अवतार घेणार आहे) आहे.

११. हे दोन मजल्याचे असल्याने, याला 'दोतल' असे म्हणले जाते. येथे मैत्रेय, स्थिरचक्र (तलवार धारण केलेला), ज्ञानकेतू (ध्वज फडकवणारा), मंजुश्री अशा बोधिसत्वांची शिल्पे आहेत.

१२. हे तीन मजल्याचे असल्याने, याला 'तीनतल' असे म्हणले जाते. येथे 'मंडल' हे शिल्प आहे. या मंडलात बुध्द आणि बोधिसत्वांची शिल्पे आहेत. सर्वात वरच्या मजल्यावर, अंतराळाच्या (गाभारा आणि सभामंडप जोडणारा भाग) भिंतीवर सात मानुषी (प्रत्येकाच्या मागे, वेगवेगळे वृक्ष) बुध्द आणि सातध्यानी (प्रत्येक कल्पातील बुध्द) बुध्द यांची शिल्पं आहेत.

● **हिंदू लेणी :**

१४. याला 'रावण की खाई' असे म्हणतात. उत्तर भिंतीत दुर्गा, गजलक्ष्मी (हत्तीकडून अभिषेक), वराह अवतार यांची शिल्पं आहेत. गाभाऱ्याच्या भिंतीवर, उत्तरेकडे, सप्तमातृका आणि वीरभद्र (वीणाधर शिव), काल-काली (सापळ्यासारखे, दात विचकणारे) आहेत. तर दक्षिणेकडे अंधकासूरवध शिव, रावणाचे गर्वहरण, नृत्य करणारा शिव, सारीपाटाच्या खेळात मग्न झालेले शिव-पार्वती, महिषासूरमर्दिनी अशी शिल्पं आहेत.

१५. हे 'दशावतार' लेणे. शिलालेख असणारे हे एकमेव लेणे. याठिकाणी दंतीदुर्ग या राष्ट्रकूट राजाचा शिलालेख आहे. गाभाऱ्याच्या मागे सदाशिव मूर्ती आहे. मंडपाच्या प्रवेशद्वाराच्या बाजूला गंगा (मगरीवरील) आणि यमुना (कासवावरील) नदी देवता आहेत. येथील तळमजल्यावर शिल्पं नाहीत. पहिल्या मजल्यावर सुंदर शिल्पं आहेत. उत्तरेकडील भिंतीत अंधकासूरचा वध करणारा शिव, नटराज, सारीपाट खेळणारे शिव पार्वती, कल्याण सुंदर (शिव पार्वतीचा विवाह), रावणानुग्रह, मार्कंडेय याची कथा, गंगावतरण अशा कथाही आहेत. पुढे, अंतराळात; गणेश, गजलक्ष्मी, कार्तिकेय (हाती कोंबडा आणि मोर हे वाहन), लिंगोद्भव शिव अशी शिल्पं आहेत. तर दक्षिण भिंतीवर त्रिपुरांतक शिव, गोवर्धन धारी कृष्ण, शेषशायी विष्णू, वराह अवतार, वामन अवतार, नृसिंह अवतार असे विष्णूचे अवतार आहेत, तशीच गजेंद्रमोक्षाची कथाही आहे.

१६. हे जगप्रसिध्द 'कैलास मंदिर' होय. याला 'विश्व स्मारक' हा बहुमान मिळालेला आहे. एक पाषाणीय मंदिरे या भागात आपण त्याचा विचार करु.

२१. याला 'रामेश्वर' म्हणले जाते. सुरुवातीला गणेश, नंदी, गंगा, लकुलिश यांची शिल्पं आहेत. दक्षिण भागात सप्तमातृकापट, सारीपाट खेळणारे शिवपार्वती अशी शिल्पं आहेत. उत्तरेकडे कल्याण सुंदर, महिषासुरमर्दिनी, रावणाचे गर्वहरण अशी शिल्पं आहेत.

२२. याला 'निळकंठ' असे म्हणले जाते. २४. याला 'तेली का घाना' असे म्हणले जाते. २५. याला 'कुंभारवाडा' असे म्हणले जाते. येथे कुबेर, गजलक्ष्मी, सूर्य यांची शिल्पं आहेत. २६. याला 'जनवसा' असे म्हणले जाते. २७. याला 'गवळ्याचे लेणे' असे म्हणतात. येथे वराह अवतार, शेषशायी विष्णू, त्रिमूर्ती, महिषासूरमर्दिनी इ. शिल्पं आहेत.

२९. याला 'धूमार' किंवा 'सीतेची नहाणी' असे म्हणले जाते. हे सगळ्यात मोठे लेणे. हे तीनी बाजूनी डोंगरापासून वेगळे करण्यात आलेले आहे. त्यामुळे, या लेण्यात तीन बाजूने प्रवेश करता येतो. अर्थात, मुख्य प्रवेश पश्चिमेकडून आहे. या प्रवेशाजवळच सिंह आणि हत्तींची भव्य शिल्पं आहेत. आत मंडपामध्ये, कल्याण सुंदर हे एक भव्य शिल्प आहे. जवळच सरस्वतीचे शिल्प आहे. दक्षिण भिंतीत रावणाचे गर्वहरण तर उत्तरभिंतीत अंधकासुराचा वध ही शिल्पं ही भव्य आहेत.

**● जैन लेणी :**

३०. याला 'छोटा कैलास' असेही म्हणतात. गाभाऱ्यात महावीरांची मूर्ती आहे. तर वरच्या मजल्यावर सुमतीनाथांची मूर्ती आहे. तर मंडपाच्या भिंतीवर, मातंग सुमतीनाथ, यक्ष-यक्षीणी, पार्श्वनाथ यांच्या मूर्ती आहेत. ३०-अ. येथे गजलक्ष्मीचे शिल्प आहे.

३१. येथे गोम्मत, पार्श्वनाथ यांच्या मूर्ती आणि भक्तगणांची शिल्पे आहेत. ३१-अ मध्ये महावीर, पार्श्वनाथ, ऋषभनाथ यांच्या मूर्ती आहेत.

३२. याला 'इंद्रसभा' असे म्हणले जाते. मुख्य लेणे, आणि त्याच्या प्रवेशाजवळ उजव्या, डाव्या बाजूला दोन लेण्या असे हे संकुल आहे. प्रवेशाजवळच एक एकपाषाणीय मंडप आहे. त्याच्या शेजारी हत्ती आणि मानस्तंभ आहे. डाव्या गुहेत पार्श्वनाथ, गोम्मत यांच्या मूर्ती आहेत. मुख्य लेणे दोन मजली आहे. वरच्या मजल्यावर मातंग आणि सिध्दायिका (धनदेवता; हिंदूंचा कुबेर) यांचे भव्य शिल्पं आहेत. तसेच महावीरांचीही मूर्ती आहे. या लेण्यांतील बरीचशी भित्ती चित्रं आजही शिल्लक आहेत.

३३. याला 'जगन्नाथ सभा' म्हणले जाते. येथील गाभाऱ्यात सुमथीनाथांची मूर्ती आहे.

**ब) मध्य प्रदेशातील बांधीव मंदिरे :**

बांधीव मंदिरे म्हणजे, आज जसे आपण घरं बांधतो त्याप्रमाणे. म्हणजे एक मोकळी जागा असते. त्याठिकाणी पाया वगैरे खणला जातो. मग खांब, दगड, शिल्पं इ. सुटे-सुटे भाग, दुसऱ्या ठिकाणी व्यवस्थित घडवून घेतले जातात. आणि मग नकाशाप्रमाणे, त्याजागेवर, हे सुटे भाग जोडत मंदिर बांधले जाते.

अशी सुरुवातीची मंदिरे आपल्याला मध्य प्रदेशात दिसू लागतात. सांची येथील क्र. १७ चे मंदिर, तिगवा येथील कंकाली मंदिर (मूळचे विष्णू मंदिर), भूमरा येथील शिवमंदिर, नाचणा आणि देवगड ही मंदिरे 'बांधीव मंदिराच्या' विकासातील प्रारंभीची मंदिरे होत. ही सर्व मंदिरे अगदी प्राथमिक स्वरुपाची होत. पुढे, पुढे त्यांच्यात विविध शैली निर्माण झाल्या.

सांची येथील क्र. १७ चे मंदिर हे या विकासातील पहिले मंदिर. साधे, छोटे. फक्त गाभारा आणि मुख मंडप अशी रचना. थोडक्यात, माटे यांच्या मते, फक्त पूजा करणाऱ्याला सोयीचे व्हावे एवढीच साधी रचना. गाभाराच महत्वाचा!

तिगव्याच्या विष्णू मंदिरात थोडी शिल्पं वाढतात. हे ही एक छोटे मंदिर आहे. या मंदिरात फक्त गाभारा आणि त्यासमोरील मुखमंडप अशी रचना आहे. मुखमंडपाच्या समोरील बाजूला जे खांब आहेत, त्यावर पूर्ण कलश किंवा घंटेचे रुपक दिसून येते. तर स्तंभशीरावर सिंहांचे शिल्प दिसून येते. स्तंभावरील ही योजना, पूर्वीच्या हिनयानी चैत्यातील खांबांची आठवण करुन देतात. या मंदिराचे छत सपाट आहे. द्वारशाखेवर गंगा-यमुनेची शिल्पं आहेत.

पुढे, भूमरा येथील मंदिरामध्ये काही गोष्टींची भर पडते. मुख्य रचना, गाभारा आणि मुखमंडप अशीच आहे. फक्त आता हे मंदिर जोत्यावर येते. गाभाऱ्याच्या बाजूने जोता अधिक विस्तृत केला जातो. प्रदक्षिणेची सोय येथे होते. या प्रदक्षिणामार्गाच्या भोवती खांब येतात. कदाचीत गाभाऱ्यापासून, या खांबापर्यंत उतरते छत असावे.

तर, नाचणा येथील मंदिरात मुख्य रचनाही भूमरा सारखीच ठेवली जाते. फक्त याठिकाणी प्रदक्षिणा

मार्गाभोवतीचे खांब जातात. त्याठिकाणी व्यवस्थित भिंत येते. आता हा मार्ग अंधारी होतो. मग प्रकाशासाठी, या भिंतीमध्ये जाळ्या बसवल्या जातात. सगळ्यात महत्वाचं म्हणजे गाभाऱ्यावरती आणखीन एक मजला येतो. इथे शिखराची कल्पना दिसते.

देवगड येथील दशावतार मंदिर हे, या विकासातील शेवटचे मंदिर. म्हणजे याठिकाणी मंदिरांच्या मूलभूत संकल्पना स्पष्ट होतात. इथेही मंदिर, गाभारा आणि मुखमंडप असेच आहे. जोत्यावर आहे. मात्र आणखीन काही महत्वाची भर येथे पडत जाते. जोत्याला चारही बाजूने पायऱ्या येतात. मंदिराला चारही बाजूने मंडप येतात. मंदिराच्या भिंतीवर नर-नारायण, शेषशायी विष्णू, गजेंद्रमोक्ष अशी सुंदर शिल्पं येतात. सगळ्यात महत्वाचं म्हणजे, गाभाऱ्यावर आता व्यवस्थित शिखर येते. हे शिखर कसे होते? हे या मंदिरातील द्वार शाखेवरील शिखरांच्या प्रतिकृती सांगतात. हे शिखर म्हणजे विविध टप्प्यांचे, चैत्य (नालाकृती) तोरणांची सजावट असणारे, सगळ्यात वर आमलक असणारे असे होते. कोनाकृती आणि आकाशाकडे झेपावणारे असे. पुढे उत्तरेकडे जी नागर शैलीतील मंदिरे दिसतात त्यांच्या शिखरांचीही सुरुवात म्हणता येईल.

थोडक्यात, गाभारा आणि मुखमंडप (सांची)- खांब, त्यावर शिल्पं, द्वार शाखेवर शिल्पं (तिगवा)- जोत्यावर मंदिर, प्रदक्षिणा मार्ग (भूमरा)-भिंतींनी झाकलेला प्रदक्षिणा मार्ग, गाभाऱ्यावर मजला (नाचणा)- मुखमंडप, शिखर आणि शिल्पांसह पूर्ण मंदिर (देवगड) असा हा बांधीव मंदिराचा प्रवास आपल्याला शोधता येतो. ही मंदिरं साधी आहेत, छोटी आहेत. मात्र मंदिराची मूलभूत रचना या मध्य प्रदेशातील पहिल्यावाहिल्या मंदिरांच्या ठिकाणी स्पष्ट होते.

अनेक शतकं गेली. पुढे, एक-दोन भक्तांपेक्षा, अधिकाधिक लोकांना सामावून घेण्याची आवश्यकता निर्माण झाली. यातून मंदिरांचे विविध भाग निर्माण झाले. मग गाभारा-त्यासमोर मुखमंडप (अंतराळ)-त्यापुढे सभामंडप-मग खुला नृत्य मंडप अशी रचना तयार झाली. मंदिराला तीन ठिकाणी प्रवेशमार्ग तयार झाले. गाभाऱ्याची भिंत वगळता, तिन्ही बाजूला भद्र (मंडप) आले. समोरच्या मुख्य बाजूच्या मंडपाला 'मुखमंडप' म्हणले जाऊ लागले. मग मंदिराला कधी जोडून किंवा सुटा असा आणखीन एक मंडप, गाभाऱ्याकडे तोंड करुन आला. याला 'नंदी मंडप' (जर मंदिर शिवाचे असेल तर) किंवा 'गरुड मंडप' (जर विष्णूचे असेल तर) म्हणले जाऊ लागले.

असे पूर्ण मंदिर मोठ्या जोत्यावर आले. या जोत्यावर विविध थर आले. त्याथरांवर शिल्पं आली. मंदिराच्या भिंतीवर चौकटी आल्या. त्या चौकटीत शिल्पं आली. गाभाऱ्यावर शिखर आले. आकाशगामी उंच शिखरं असली तर, त्यांना 'नागर मंदिर' म्हणले जाऊ लागले. मजल्यांचे, बसके शिखर असेल तर त्यांना 'द्रविड मंदिरे' म्हणू लागले. मग पुन्हा, यामध्ये विविध प्रदेशानुसार प्रादेशिक शैली निर्माण होऊ लागल्या. मग या मंदिरांना पोटात घेणारा मोठा प्राकार आला. या प्रकारात परिवार देवतांची उपमंदिरे आली. या प्राकाराचे देखणे प्रवेशद्वार आले. पुढे दक्षिण भारताते हे प्रवेशद्वारच प्रचंड मोठे बनवणे सुरु झाले. याला 'गोपूर' असे म्हणतात.

अशा मंदिरांच्या प्रमुख दोन शैली 'नागर' आणि 'द्राविड'. 'नागर' मंदिरे साधारणतः उत्तर भारतात मोठ्या प्रमाणावर दिसतात. त्यामध्ये प्रादेशिक शैलीही दिसून येतात, जसे, गुजरातची सोळंकी शैलीतील मंदिरे, मध्यप्रदेशात उत्तर भागात प्रतिहार शैलीची, दक्षिण भागात परमारशैलीची तर पूर्व भागात चंदेल शैलीची;

बंगालमध्ये पाल-सेनांची, ओरिसा शैलीतील इ. दक्षिणेकडे मंदिर शैलीचा महत्वाचा प्रकार म्हणजे 'द्रावीड शैलीची' मंदिरे. यामध्ये पुन्हा 'वेसर', 'फामसणा' या शैलींची. मलप्रभेच्या काठावरील कर्नाट-द्राविड शैलीची, तामीळनाडू येथील पल्लव-चोलांची तसेच पांड्य आणि नायकांची, दक्षिण कर्नाटकातील होयसळ शैलीची, पश्चिम कर्नाटकातील कदंब शैलीची इ.

थोडक्यात, मध्य प्रदेशामध्ये जो बांधीव मंदिरांचा प्रयोग सुरु झाला त्यांची पुढे प्रचंड व्याप्ती वाढली. ही व्याप्ती फक्त संख्येत नव्हती तर गुणात्मक होती. शैलींतील वैविध्य, आकार-प्रकारातील वैविध्य, शिल्प-चित्रकलेचा उत्कर्ष यांने प्राचीन भारत समृध्द झालेला दिसून येतो.

**क) एकपाषाणी मंदिरे :**

एकपाषाणी मंदिरे म्हणजे, एका मोठ्या खडकातच, खोदून मंदिर बांधले जाते. पल्लवांनी महाबलीपुरम येथे बांधलेले रथमंदिर (सातवे शतक) आणि राष्ट्रकुटांचे, वेरुळ येथील कैलास मंदिर (आठवे शतक) ही या प्रकाराची महत्वाची उदाहरणे आहेत.

पल्लव हे तामीळनाडूतील राजे. 'कांची' ही त्यांची राजधानी. यांच्यातील पहिला नरसिंहवर्मन (इस ६३०-६६८) हा एक थोर राजा होऊन गेला. यालाच 'मामल्ला' (महामल्ल) असे म्हणतात. यानेच 'महाबळीपुरम' हे शहर वसवले. याला 'मामल्लापुरम' असेही म्हणले जाते. याचा मुलगा पहिला परमेश्वर वर्मन (इ.स. ६७२-७००). या दोघांच्या काळात, म्हणजे सातव्या शतकात ही रथमंदिरे निर्माण झाली आहेत.

पल्लवांनी, महाबलीपुरम याठिकाणी, एक पाषाणीय मंदिरं खोदली. यांना 'रथ' असे म्हंटले जाते. इथे, जमिनीवर असलेला एक मोठा खडक निवडला गेला. त्या खडकात, मंदिरांच्या रेखाकृती काढण्यात आल्या. आणि मग त्या रेखाकृतीनुसार, तिथेही मंदिरं खोदली गेली. असे येथे एकूण आठ मंदिरे किंवा रथ आहेत. यापैकी, एका ठिकाणी, दौपदी, अर्जुन, भीम, धर्मराज, नकुल-सहदेव अशा ५ रथांचे एक संकुल आहे. त्यानंतर, काही अंतरावर, गणेश हा एक रथ आहे. त्यापासून काही अंतरावर वलयंकुट्टाई आणि पिडारी असे दोन रथ आहेत.

सर्वप्रथम, ५ रथांचे संकुल पाहू. द्रौपदी, धर्मराज, अर्जुन, भीम आणि नकुल-सहदेव असे ते रथ होत. पहिल्या नरसिंहवर्मन या पल्लव राजाच्या काळात हे निर्माण झाले.

**द्रौपदीरथ (दुर्गा)** : हे चौरसाकृती आहे. यांना 'कूट' असे म्हणले जाते. यांचे छत चारी बाजूला उतरते असे खोदलेले आहे. अशा उतरत्या छतामूळे, हे एखाद्या झोपडीसारखे दिसते. हे एकमजली आहे. याच्या चारी बाजूला, चौकटी असून; या चौकटीत शिल्पं दिसून येतात. यामध्ये दुर्गा, महिषासूरमर्दिनी अशी शिल्पं आहेत. तर गाभाऱ्यात, दुर्गेची मूर्ती आहे. शेजारी बुटके गण आहेत. या रथाच्या शेजारीच सिंहाचे शिल्प आहे. हे दुर्गेचे वाहन!

**अर्जुनरथ (शिव)** : हे द्रौपदीरथाजवळ, एकाच प्लॅटफॉर्मवर आहे. हे ही 'कूट' रचनेचेच आहे. याचे शिखर हे द्रावीडी शैलीतील, मजल्यांचे आणि सर्वात वर स्तूपी अशा प्रकारचे आहे. हे दोन मजल्यांचे आहे. याच्याही तिन्ही भिंतीत, चौकटी आणि चौकटीमध्ये शिल्पं दिसून येतात जसे, शिवनंदी, ऐरावतासह इंद्र, गरुडासह विष्णू.

मंदिरापुढे मुखमंडपासारखी छोटी रचना आहे. हिच्या पायथ्याशी पल्लव शैलीतील सिंह आहेत. गाभाऱ्यात शिवमूर्ती असावी. कारण शेजारीच नंदीचे भव्य शिल्प आहे.

**भिम रथ (विष्णू)** : हे आयताकृती आहे. यांना 'शाला' असे म्हणले जाते. हे विष्णूचे मंदिर असावे असे काहींचे म्हणणे आहे.

**धर्मराज रथ (शिव)** : हे 'कूट' रचनेचे. आणि जवळपास अर्जुन रथासारखेच दिसणारे. मात्र, हे तीन मजली असून, शिल्पांनी सजलेले असे आहे. यामध्ये अधिककरुन शिव आणि त्यासंबधीत विविध शिल्पं दिसून येतात, जसे, तांडवनृत्य करणारा शिव, चंडेश्वर शिव, विणाधर-दक्षिणामूर्ती, अंधकासूरवध मूर्ती, स्कंद, सोमस्कंद (स्कंदासह शिवपार्वती), अर्धनारीश्वर, गंगाधर शिव इ. तरीही हरीहर (शिव आणि विष्णूचे एकत्व दर्शविणारे), ब्रह्म, विष्णू, कुष्णाचे कालियामर्दन, सूर्य अशी शिल्पंही आहेत.

**नकुल-सहदेव** : हा 'चापाकार' रचनेचा आहे. म्हणजे, आयताची, रुंदीकडील एक बाजू, नालाकृती/ अर्धवर्तुळाकार केलेली असते. त्यामुळे, छत ही गजपृष्ठाकार करावे लागते. महाराष्ट्रातील हिनयानी बौध्दलेण्या अशाप्रकारच्या आहेत. जवळच हत्तीचे भव्य शिल्प आहे.

हे पंचरथ संकुल, पांडवांच्या नावावरुन जरी असले तरी पांडव आणि महाभारत यांचा, या मंदिरांशी काहीही संबंध नाही. ही दुर्गेची, विष्णूची, शिवाची मंदिरे आहेत.

या पंचरथसंकुलाच्या थोडेसे दूर 'गणेश रथ' हे एक रथमंदिर आहे. हा तीन मजली, 'शाला' रचनेचा रथ आहे. गाभाऱ्यात शिवलिंग होते; आता गणेशाची मूर्ती आहे. पहिला परमेश्वरम याच्या काळात हे मंदिर खोदले गेले.

गणेशरथाच्या थोडे पुढे 'वलयंकुट्टाई' आणि 'पिडारी' अशी रथमंदिरे आहेत. दोन्ही 'कूट' रचनेची आणि द्रवीडी शिखर असणारी आहेत.

महाबळीपुरम येथील रथकुट, शाला, चापाकार अशा सर्व रचनांचा प्रयोग केलेले असे आहेत. बहुतेक सर्वांच्या भिंतीवर, अर्धस्तंभ आहेत. यामुळे चौकटी तयार झालेल्या आहेत. या चौकटीमध्ये विविध शिल्पं दिसून येतात. एक द्रौपदी रथ वगळता; सर्व टीपीकल द्रविड शैलीतील पल्लव मंदिरे आहेत. म्हणजे मजल्यांचे शिखर आणि त्यावर स्तूपी अशा स्वरुपाचे. मुखमंडपाचे जे खांब आहेत ते अष्टकोनी आणि निमुळते आहेत. आणि त्यांच्या पायाजवळ पल्लवशैलीचे सिंह आहेत.

ही एकपाषाणीय मंदिरे. तरीही, सर्वसाधारण मंदिरांसारखे, भक्तांना मोठ्या संख्येने सामावून घेणारे हे नाहीत. हे मध्य प्रदेशातील सुरुवातीच्या बांधीव मंदिरांप्रमाणे, गाभारा आणि छोटासा मुखमंडप अशा रचनेचे आहेत. एका-दोघांना, किंवा एका कुटुंबाला पूजा करण्यासाठी योग्य अशी!

याउलट वेरुळचे एकपाषाणीय कैलास मंदिर. वेरुळचे कैलास मंदिर हे ही एक पाषाणात खोदले जरी असले तरी मंदिरासारखे हे एक मंदिर आहे. आणि असे भव्य-दिव्य मंदिर एका दगडात खोदले याचे आश्चर्य वाटल्याखेरीज रहात नाही. राष्ट्रकूटांचा राजा कृष्ण (इस ७५७-८३) याने हे मंदिर बांधले. अर्थात, याची सुरुवात

कृष्णने केली आणि शंभर वर्षानंतर हे काम पूर्ण झाले. पल्लवांच्या कांची येथील कैलासनाथ मंदिराचा प्रभाव यावर आहे. म्हणूनच, हे एक उत्कृष्ठ असे 'द्रविड' शैलीतील मंदिर आहे.

वेरुळ येथील डोंगराच्या कडांमध्ये, विविध गुहा खोदल्या गेलेल्या होत्या. यातील १६ नंबरची गुहा म्हणजे कैलास मंदिर होय.

याठिकाणी डोंगराच्या कडामध्ये एक भव्य चौकोन निवडला गेला. त्या चौकोनाच्या तिन्ही बाजूंनी मोठे चर खणले गेले. यामुळे, एक मोठा शिलाखंड हा कडांपासून सुटा झाला. हा शिलाखंड ५० मीटर लांब, ३३ मीटर रुंद आणि २९ मीटर उंच असा भव्य आहे. या शिला खंडावर, मंदिराची पूर्ण कल्पना रेखाटली गेली. आणि त्यानुसार, हा शिलाखंड खोदण्यास सुरुवात झाली. 'आधी कळस मग पाया' हेच पूर्वीचे लेण्यांतील सूत्र वापरले गेले. आणि अशाप्रकारे मंदिराचे विविध भाग तयार झाले. या मंदिरात द्रविड शैलीतील पूर्ण विभाग दिसतात. तसेच, चिक्कार शिल्पं दिसतात. या मंदिराच्या बाजूला, त्याच्यापासून वेगळा झालेला जो डोंगरकड्याचा भाग आहे, त्यात ही गुहा खोदून, शिल्पं कोरलेली आहेत.

यामध्ये सगळ्यात खाली जोता किंवा पीठ येते. यावर हत्ती, सिंह यांची शिल्पं दिसतात. या जोत्यावर हे मंदिर येते. गाभारा-अंतराळ-सभा मंडप (याच्या तिन्ही बाजूस अर्ध मंडप)-मुख मंडप-नंदी मंडप-गोपूर अशी मंदिराची रचना आहे. सात उपमंदिरेही आहेत. हे सगळे मंदिर दुमजली आहे. वरचा मजला दगडी पुलाने जोडलेला आहे. संपूर्ण मंदिराच्या जोत्यावर हत्तींची रांग आहे. जणूकाही या हत्तींनीच या मंदिराला तोलून धरलेले आहे. यातील नंदीमंडपाच्या जवळ दोन मोठे हत्ती आणि ध्वजस्तंभ खोदलेले आहेत. मंदिराच्या भिंतीवर अर्धस्तंभ (फक्त दिसणारा अर्धा भाग) आणि कोनाडे (देव कोष्ट) आहेत. आणि यातून जिथे म्हणून मोकळी जागा दिसते त्याठिकाणी शिल्प कोरलेले आहे. तर मंदिराचे शिखर द्रविडी पध्दतीचे असून, अष्टकोनी आहे.

हे मंदिर शिल्पांनी भरुन गेलेले आहे. खरे तर हे कैलास म्हणजे शिवमंदिर आहे. त्यामुळे शिव, त्याचा परिवार आणि त्यांच्या कथा या येथे आहेतच. शिवाय विष्णूच्या संदर्भांतील विविध अवतार, कथा याठिकाणी दिसतात. तसेच देवींचीही शिल्पं आहेतच.

हे मुख्य शिवाचे मंदिर. त्यामुळे शिव-पार्वती, विविध रुपातील शिव, विष्णू/पार्वतीसह शिव, अनुग्रह करणारा शिव, शिक्षा करणारा शिव अशी अनेक शिल्पं याठिकाणी आहेत. कल्याणसुंदरमूर्ती, उमासहित शिव; नटराज, तांडवनृत्य, भिक्षाटन करणारा शिव, लिंगोद्भव शिव; अर्धनारीनटेश्वर, हरीहर; रावणावर अनुग्रहकरणारा शिव, मार्कंडेयावर अनुग्रह करणारा शिव (कालारि शिव), गंगावतरण; अंधकासूराचा वध करणारा शिव, त्रिपुरांतक शिव, रावणाचा गर्व हरण करणारा शिव इ.

तर विष्णूच्या विविध अवतारातील तसेच कृष्णलिलेची शिल्पं आढळतात, जसे; नृसिंह, शेषशायी विष्णू, वामनावतार, वराह अवतार, कृष्ण-गोवर्धनधारी, कालिया मर्दन इ.

तसेच; गणेश, कार्तिकेय, गजलक्ष्मी, महिषासूरमर्दिनी, नदी देवता, रती-मदन यांची शिल्पं आहेत. तसेच,

रामायण-महाभारतातील विविधप्रसंग हे ही शिल्पांकित केलेले आहे.

पूर्वी हे मंदिरपूर्ण रंगवलेले होते. तसेच त्यामध्ये काही भित्तीचित्रं ही होती. आता, काहीच भित्तीचित्रं शिल्लक राहिलेली आहेत.

**● स्वयं-अध्ययन प्रश्न-५**

**अ. योग्य पर्याय निवडा.**

१. भारतातील लेण्यांची सुरुवात .............. येथे दिसून येते.

अ. कार्ले  ब. भाजे  क. बाराबर  ड. महाबलीपुरम

२. महाराष्ट्रातील पहिली लेणी ........... येथे आहेत.

अ. कार्ले  ब. भाजे  क. बाराबर  ड. महाबलीपुरम

३. बदामी येथील लेणी .............. या राजघराण्याच्या काळात बांधली गेली.

अ. सातवाहन  ब. चालुक्य  क. राष्ट्रकूट  ड. चोल

४. वेरुळच्या ............ लेण्याला 'विश्वस्मारक' हा बहुमान मिळालेला आहे?

अ. दशवतार (क्र. १५)  ब. निळकंठ (क्र. २२)
क. धूमार (क्र. २९)  ड. कैलास (क्र. १६)

५. भारतातील पहिली बांधीव मंदिरे .............. या राज्यात निर्माण झाली.

अ. गुजरात  ब. महाराष्ट्र  क. मध्य प्रदेश  ड. राजस्थान

**ब. एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. बाराबार टेकड्यांतील लेण्या कोणत्या पंथांच्या आहेत?

२. चैत्य आणि विहार म्हणजे काय?

३. बांधीव मंदिरे म्हणजे काय? ती सर्वप्रथम कोणत्या राज्यात निर्माण झाली?

४. रथमंदिर म्हणजे काय? ती कोणत्या काळात निर्माण झाली?

५. मध्य प्रदेशातील कोणती मंदिरे 'पहिली बांधीव मंदिरे' समजली जातात?

## ४.३ सारांश :

हा घटक प्राचीन भारतातील सामाजिक संस्थांचा ऐतिहासिक आढावा घेतो. पूर्व वैदिक काळात समानसंधी आणि समताहीचा, पुरुषांच्या बरोबरीने, स्त्रीया आनंद घेताना दिसतात. पुढे, उत्तर वैदिक

काळापासून, तिच्यावरील बंधने वाढत राहतात. तसेच, पूर्ववैदिक काळात एक समानसंधी असलेला, लोकशाही प्रधान समाज दिसून येतो. मात्र उत्तर वैदिक काळात वर्णव्यवस्थेमध्ये समाजाचे विभाजन होते. कालांतराने या वर्ण व्यवस्थेचेही जाती व्यवस्थेत रुपांतर होते. विविध कारणांमुळे या जातींची संख्या वाढतच जाते. प्राचीन काळातील शिक्षणपध्दती हा भारतीय संस्कृतीने दिलेला वैभवशाली वारसा आहे. त्यावेळची प्राचीन गुरुकुल पध्दती, विद्यापीठं, तेथील विविध विषय, तज्ज्ञ शिक्षक यामुळे या शैक्षणिक केंद्रांनी जगातील विद्यार्थ्यांना निमंत्रण दिलेले होते. या वारशाबरोबरच, प्राचीन भारताने एक मोठा समृध्द वारसा दिलेला आहे; आणि तो म्हणजे कला-स्थापत्याचा. कोणत्याही समृध्द संस्कृतीमध्ये आणि गुण ग्राहक प्रजेमुळे त्याठिकाणी साहित्य-कलेचा विकास दिसून येतो. प्राचीन काळातील मंदिरस्थापत्याचे प्रयोग; त्यांच्या विविधशैली आणि चित्रकला यांना अखिल विश्वाची मान्यता मिळालेली आहे. अजिंठ्याची चित्रे आणि वेरुळचे कैलास लेणे यांची 'विश्वस्मारक' ही बहुमान मिळालेला आहे.

### ४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**नियोग :** पती जर आपत्यप्राप्तीसाठी असमर्थ असेल तर त्याच्या संमतीने पत्नीचा नियोजित पुरुषाबरोबर पुत्र प्राप्तीसाठी केलेली नियुक्ती म्हणजे नियोग.

**बहुपतीत्व :** एका स्त्रीचा एकाहुन अधिक पुरुषांसोबत झालेला विवाह.

**गणिका :** नृत्यगायनादी चौकष्ट कलांत प्रवीण असणाऱ्या रुपगुणसंपन्न गायक, नर्तक, वेश्यांना गाणिका म्हणत.

**स्त्रीधन :** पतीकडून, वडीलांकडून किंवा पुत्राकडून आंदण व अन्य मार्गाने मिळालेल्या संपत्तीला स्त्रीधन मानले होते.

**ब्राह्मण :** ब्राह्म धातूपासून ब्राह्मण शब्दांची उत्पत्ती झाली असून ज्ञानी, त्यागी, सदाचारी, पवित्र, चिंतनशील, नम्र, संयमी व बुद्धिमान असणारा ब्राह्मण समजला जाई.

**शूद्र :** वैदिक आर्यांच्या वर्णव्यवस्थतील एक वर्ण. त्रैवर्णिकांची सेवा हा त्यांच्या कर्तव्याचा मुख्य भाग होय. विवाहबाह्य संततीच्या जातीही शूद्र गणल्या गेल्या.

**गांधर्व विवाह :** वधूवरांच्या परस्परावर असलेल्या प्रेमामुळे व एकमेकांच्या संमतीने केलेला विवाह गांधर्व विवाह होय. या विवाहास मातापित्यांच्या पूर्वसंमतीची आवश्यकता नसे.

**द्विज :** द्विज म्हणजे दोनदा जन्मलेला. मनुष्य जन्मतः शूद्रच असतोत. मात्र उपनयन संस्कारामुळे (ज्ञानप्राप्तीने) त्याच्या व्यक्तीमत्त्वाला एक सुरेख आकार येऊन तो द्विजपदाला पोहोचतो अशी धारणा होती.

**गुहाचित्रे** : गुहांच्या भिंती आणि छतावर काढलेली चित्रे

**चैत्य** : बौध्द प्रार्थना स्थळ

**विहार** : बौध्द भिक्षूंचे निवासस्थळ

**गुहामंदिरे/शैलगृह/लेणी** : डोंगरामध्ये खोदलेली मंदिरे.

**बांधीव मंदिरे** : सुटे-सुटे भाग आणून, ती जोडून, बांधलेली मंदिरे.

**एकपाषाणीय मंदिरे** : एका खडकात खोदून काढलेली मंदिरे.

**चापाकार :** आयताची रुंदीकडील एक बाजू बहिर्वक्र करणे.

## ४.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

- **स्वयंअध्ययन प्रश्न-१**

**अ)** १) ८    २) गणिका    ३) पिशाच्च

४) बालविवाह    ५) ६

**ब)** १) एरण शिलालेख    २) स्त्रीधन    ३) सद्योवधू

४) आर्षविवाह    ५) सम्राट चंद्रगुप्त

- **स्वयंअध्ययन प्रश्न-२**

**अ)** १) वैश्य    २) ब्रह्मा    ३) ऋग्वेद

४) पुरुष    ५) युद्ध

**ब)** १) सूत    २) पणी    ३) ब्रह्मविद्या

४) अनार्यांच्या    ५) विष्णू

- **स्वयंअध्ययन प्रश्न-३.**

**अ)** १) हर्षवर्धन    २) भारद्वाज    ३) सारनाथ

४) आत्मा    ५) शिलभद्र

**ब)** १) गुरुकुल    २) सम्राट हर्षवर्धन    ३) वल्लभी

४) वेद    ५) समावर्तन

- **स्वयंअध्ययन प्रश्न-४**

**अ. योग्य पर्याय निवडा.**

१. ड. कार्लाईल    २. क. औरंगाबाद    ३.ड. वाकाटक

४.अ. १    ५.क. साम

**ब. एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. व्हि. एस.वाकणकर

२. महायान

३. महायानांची अशी श्रध्दा आहे की, बुध्दांना जी ज्ञानप्राप्ती झाली, तत्पूर्वी त्यांनी अनेक जन्मे घेतले होते. यावेळी त्यांना 'बोधिसत्व' असे म्हंटले जाते. हा बोधीसत्व, प्रत्येक जन्मात वेगवेगळ्या रुपात जन्म घेतो.

४. १७

५. महायान

● **स्वयंअध्ययन प्रश्न–५**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१.क. बाराबर    २. ब. भाजे    ३. ब. चालुक्य

४.ड. कैलास (क्र. १६)    ५. क. मध्य प्रदेश

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. आजीवक पंथाच्या

२. बौध्दांच्या प्रार्थनास्थळांना 'चैत्य' तर बौध्द भिक्षूंच्या निवासस्थानांना 'विहार' म्हणतात.

३. सुटे भाग एकत्र जोडून बांधलेल्या मंदिरांना 'बांधीव मंदिरे' असे म्हणतात. ती सर्वप्रथम मध्य प्रदेश येथे निर्माण झाली.

४. एक पाषाणीय मंदिरांना 'रथ मंदिरे' असे म्हणतात. ती पल्लव राजांच्या काळात, महाबळीपुरम येथे निर्माण झाली.

५. सांची येथील क्र. १७ चे मंदिर, तिगवा येथील कंकाली मंदिर (मूळचे विष्णूमंदिर), भूमरा येथील शिवमंदिर, नाचणा आणि देवगडचे दशवतार मंदिर

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय :

**ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) प्राचीन भारतातील स्त्रीयांची परिस्थिती स्पष्ट करा.

२) प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीचा आढावा घ्या.

३) वर्णव्यवस्थेची थोडक्यात माहिती लिहा.

४) अजंठ्याच्या चित्रांच्याअनुषंगाने, भारतीय चित्रकलेचा विकास स्पष्ट करा.

५) महाराष्ट्रातील गुहामंदिरे/शैलगृह/लेण्यांची माहिती द्या.

६) एकपाषाणीय मंदिरांबाबत माहिती द्या.

**अ) टिपा लिहा.**

| | |
|---|---|
| १) सतीप्रथा | २) ८ विवाह प्रकार |
| ३) वर्णव्यवस्था | ४) गुरुकुल शिक्षण |
| ५) प्राचीन भारतीय विद्यापीठ | ६) अजिंठ्याची चित्रे |
| ७) महाबळीपूरम येथील रथमंदिरे | ८) मध्य प्रदेशातील बांधीव मंदिरे, |
| ९) वेरुळची लेणी | |

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : वैदिक संस्कृतीचा विकास, प्रज्ञा पाठशाळा, वाई.

२. के.सी. श्रीवास्तव : प्राचीन भारत का इतिहास तथा संस्कृती.

६. कुलकर्णी अ. रा. : प्राचीन भारत संस्कृती आणि इतिहास, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २००७.

८. अशोक चौसाळकर : प्राचीन भारतीय राजकीय विचार, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २०११

९. डी. एन. झा. : प्राचीन भारत एक ऐतिहासिक रुपरेखा, के. सागर प्रकाशन, पुणे.

१. देगलूरकर, गो. बं. वेरुळदर्शन. स्नेहल प्रकाशन. पुणे. २००८

२. माटे, मधुकर श्रीपाद. प्राचीन भारतीय कला. महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ. नागपूर, १९७४.

३. थापर, रोमिला. अर्ली इंडिया. के'सागर पब्लिकेशन, पुणे, २०१८


❖❖❖